खाडिलकरांचा लेखसंग्रह

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २२०२

भाग दुसरा

(श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचे सन १९१८ पासून सन १९२९ पर्यंतचे निवडक लेख आणि अध्यक्षीय भाषणें यांचा संग्रह)

आवृत्ति पहिली

सन १९४९

REFBK-0007141

किंमत ६ रुपये

ನಿಲುವು
ಲಕ್ಷಣ
ಸಂಗತಿ
ವಿಶ್ವಾಸ
೨೨೦೨.

ह. क. ७१४१

॥ श्री ॥

खाडिलकरांचा लेखसंग्रह

REFBK-0007141

भाग दुसरा

(श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचे सन १९१८
पासून सन १९२९ पर्यंतचे निवडक लेख आणि
अध्यक्षीय भाषणें यांचा संग्रह)

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळसंकेत
अनुक्रम १७९६५ दि: ३१/१२/५४
क्रमांक २२०२ दि: २१/१२/५४

प्रकाशक आणि मुद्रक

श्री. यशवंत कृष्ण खाडिलकर

श्रीदत्तात्रय प्रिंटिंग प्रेस, १३ शेणवीवाडी,
खाडिलकर रोड, मुंबई नं. ४.

आवृत्ति पहिली

सन १९४९

किंमत ६ रुपये

आभार

'खाडिलकरांचा लेखसंग्रह,' भाग दुसरा, वाचकांच्या हातीं देतांना मनाला समाधान होत आहे. या लेखसंग्रहांत १९१८ सालापासून २० सालापर्यंतचे केसरींतील लेख, काकासाहेबांच्या संपादकत्वाखालीं चाललेल्या लोकमान्यांतील कांहीं लेख आणि नवाकाळमधील १९२९ पर्यंतचे लेख संग्रहित केलेले आहेत. त्याशिवाय काकासाहेबांची नाट्य संमेलनापुढील, कीर्तन संमेलनापुढील व साहित्य संमेलनापुढील तीन अध्यक्षीय भाषणें या संग्रहांत दिलीं आहेत.

लेखसंग्रहासाठीं केसरीच्या फायली कै. लो. टिळक यांचे नातू श्री. जयंतराव टिळक यांनीं व केसरी कचेरीनें आपुलकीनें दिल्या. लोकमान्य पत्राच्या फायली पुष्कळ प्रयत्न करूनहि मिळूं शकल्या नाहींत. तथापि लोकमान्याचा पहिला अंक श्री. रामभाऊ पटवर्धन सांगली, व लो. टिळकांविषयींच्या लोकमान्यांतील लेखमालेचे अंक वी. दत्ताराम आणि कंपनीचे श्री. गो. शि. लिमये यांनीं अत्यंत जपून ठेवल्यामुळें त्यांजकडून मिळूं शकले. याबद्दल श्री. जयंतराव टिळक, केसरी कचेरी, श्री. पटवर्धन व श्री. लिमये यांचा मनःपूर्वक आभारी आहें.

केसरींतील लेखांची निवड काकासाहेब खाडिलकरांनीं स्वतःच करून ठेवली होती. नवाकाळमधील लेखांची या संग्रहासाठीं निवड त्यांच्या पश्चात करण्याचा प्रसंग आला. व ती निवड करतांना मनाचा मोठा गोंधळ उडाला पण केसरींतील लेखांची निवड करतांना काकासाहेबांनीं जी पद्धति स्वीकारल्याचें आढळून आलें त्याच पद्धतीला वाट पुसत नवाकाळमधील लेखांची निवड केली आहे. लेखसंग्रहाच्या पहिल्या भागाप्रमाणेंच दुसऱ्या भागासाठींहि श्री. न. र. फाटक यांनीं 'लेखसंग्रहाची पार्श्वभूमि व स्थायीभाव' हा लेख या संग्रहासाठीं दिला आहे. संग्रहांतील लेख वाचतांना या लेखाचा उपयोग वाचकांकडून होईलच.

नवाकाळ कचेरी
मुंबई नं. ४
ता. ५–९–४९

प्रकाशक

'लेखसंग्रहा'ची पार्श्वभूमि व स्थायीभाव

आज कै. काकासाहेब खाडिलकरांच्या लेखसंग्रहाचा दुसरा खंड महाराष्ट्रीय जनतेला सादर होत असून त्यांत केसरींतील १९१८ ते १९२० पर्यंतचें, लोकमान्यांतील १९२१ सालांतले आणि त्यानंतर नवाकाळमधील १९२९ फेब्रुवारी पर्यंतचे या प्रमाणें संपादकीय लेख व पुढें त्यांनीं निरनिराळ्या परिषद्-संमेलनांतून केलेलीं भाषणें यांचा समावेश केलेला आहे. लोकमान्यांत काकासाहेबांनीं लिहिलेले सर्व लेख प्रयत्न करूनहि मिळाले नाहींत. फक्त १९२१ सालांतील कै. लो. टिळकांची विचारसरणी व कामगिरी या विषयांसंबंधीं त्यांनीं पहिल्या पुण्यतिथीच्या निमित्तानें लिहिलेले जेवढे लेख मिळाले तेवढयावरच तूर्त समाधान मानून घ्यावें लागत आहे. नवाकाळमधील लेखांची निवड करतांना त्या त्या विषयांवरील प्रातिनिधिक वाटणारा लेख घ्यावयाचा असें धोरण ठेवलेलें आहे त्यांच्या नवाकाळमधील बहुतेक लेखांतून सुभाषितांसारखें नवें नवें विवेचन असल्यामुळें वरील धोरण अंमलांत आणतांना मनाला एक प्रकारचा संकोच वाटत असतांहि विस्तारभयानें सारे लेख घेण्याचा मोह आवरण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. शेवटचा लेख काकासाहेबांचा नव्हता ही गोष्ट महशूर आहे; परंतु त्या लेखावरून त्यांना एक वर्षाची कैद भोगावी लागली, हें त्याचें महत्त्व लक्षांत घेऊन त्याला या संग्रहांत स्थान दिलें. अशाच महत्त्वासाठीं 'महाराष्ट्र काँग्रेस कमिटी' (पान २३८) या लेखाचा प्रस्तुत संग्रहांत आदर केलेला आहे. या लेखांत पक्षापक्षाचा कलह उद्भवला असतां जनतेनें स्वहिताची जाणीव बाळगून कसें वागावें, या विषयीं उद्बोधक सूचना असल्या तरी या लेखानिमित्त, ज्याच्यावर त्यांत टीका आहे, त्या

पक्षांतील कांहीं प्रमुखांनी काँग्रेसकडे बेअब्रूची फिर्याद केली होती, याचें स्मरण पुष्कळांना असेल. काकासाहेबांच्या टीकेची दिशा व धार ही त्या लेखाच्या योगानें अनुभवास आल्याशिवाय रहात नाहीं, म्हणून त्याला टाळणें योग्य वाटलें नाहीं.

या संग्रहाचा प्रारंभ कै. टिळकांच्या गुणसंकीर्तनपर लेखानें होत असल्यामुळें ह्याच्या अनुरोधाने टिळक-चरित्रविषयक लेखांचा परामर्श अगोदर घेऊन मग इतर लेखांकडे वळणें उचित होईल. टिळकांचें केळकरांनीं लिहिलेलें चरित्र प्रसिद्ध झाल्यावर त्यावर नाखूष असलेल्या टिळकभक्तांशीं बोलतांना पुष्कळदां सवड मिळाल्यास आपण तीन चारशें पानें भरतील इतक्या बेताचें टिळकांविषयीं लेखन करणार आहों, असा संकल्प काकासाहेबांच्या मुखांतून बाहेर पडत असे. १९२६ मध्यें यांनीं आपला लेखसंग्रह प्रसिद्ध करण्याची कल्पना मनावर घेऊन केसरीच्या १८९६ पासून फायली जमविल्या तेव्हां या निमित्तानें टिळकांच्या चरित्राचेंहि सहज निरीक्षण होऊन सदर संकल्प तडीस नेतां येईल, असे उमेदीचे उद्गार ते काढीत असत; परंतु लेखसंग्रहाचा बेत तेव्हां मागें पडल्यावर टिळक चरित्राविषयीं लिहिण्याचा हेतूहि मागें पडला. १९४६ मध्यें लेखसंग्रहाच्या कल्पनेला मूर्त स्वरूप येण्यासाठीं केसरींतील लेखांची निवड करतांना टिळकांच्या चरित्राविषयीं त्यांच्या अंतरंगांत प्रेरणा उत्पन्न होण्याजोगें त्यांचें प्रकृतिमान उरलें नव्हतें. यामुळें तो संकल्प सिद्धीस जाण्याचा योग आला नाहीं; तरी सुद्धां काकासाहेबांनीं टिळकांच्या कर्तृत्वाची मूर्ति आपल्या हृदयांत कशी निर्माण केली होती, याचा परिचय त्यांच्या टिळकांविषयींच्या लेखांवरून जिज्ञासूंना होण्यासारखा आहे.

लो. टिळकांना १९०८ सालीं मुंबई हायकोर्टानें सहा वर्षांची शिक्षा दिल्यावर काकासाहेबांनीं केसरींत जे दोन लेख लिहिले आहेत, त्यांच्याकडे

या संदर्भात लक्ष देणें अवश्य आहे. ते लेख पहिल्या भागांत ४२७ ते ४४६ या पानांत आहेत. टिळकांचें वय शिक्षेच्यावेळीं ५२ वर्षांचें होतें. त्यांचें शरीर मधुमेहासारख्या रोगानें व देशकार्याच्या धकाधकीनें जर्जर झालेलें होतें; अशा स्थितींत कित्येक दिवस आपल्या खटल्याचें काम स्वतःच अतिशय परिश्रम घेऊन त्यानीं पार पाडलें. आपल्याला बरीच मोठी शिक्षा होणार याचीहि त्यांना अटकळ होती, यामुळें त्यांनीं आपल्या बचावाच्या भाषणाला देशोद्धाराच्या उपदेशाचें रूप दिलें ज्यूरीनें त्यांना दोषी ठरविल्यावर त्यांनीं जे स्फूर्तिदायक उद्गार अत्यंत निर्भयतेनें काढले, त्यांना अर्वाचीन राजकीय इतिहासानें चिरंजीवपद अर्पण केल्यास नवल वाटायला नको. काकासाहेबांच्या चित्तावर त्या खटल्याच्या प्रसंगाचा व त्या धीरोदात्त उद्गारांचा अतिशय खोल परिणाम झाला होता. पहिल्या भागांतील पूर्वनिर्दिष्ट लेखांत काकासाहेबांनीं टिळकांच्या चरित्राचें व कर्तृत्वाचें जें सार निवेदन केलें आहे, त्यांत या परिणामाच्या छटा जशा विविधतेनें दिसतात तशाच टिळकभक्तीच्याहि छटा एकतानतेनें अनुभवास येतात. टिळकांच्या राजकीय कर्मयोगाची काकासाहेबांनीं मांडलेली मीमांसा (पान ४३१–४३२) पाहिल्यास टिळकांच्या कामभिरीचें गीतोपदेशाची कसोटी लावून आपल्या अंतरंगांत त्यांनीं कसें आकलन व संकलन केलें होतें, याबद्दल अधिक विवेचन करण्याची जरूरी नाहीं. टिळकांनीं आपला खटला स्वतः कां चालविला याचें काकासाहेबांनीं केलेलें स्पष्टीकरण आणि त्यानंतर टिळकांच्या चरित्राचें सांगितलेलें रहस्य टिळकभक्तांना आज देखील वाचनीय वाटेल. 'टिळक आणि दावर' या मथळ्याच्या दुसऱ्या लेखांत काकासहेबांनीं हायकोर्टातील टिळकांच्या शेवटच्या उद्गारांची महती निवेदन केलेली आहे. या निमित्तानें त्यांनीं दावर यांच्या शिव्याशापांच्या भाषणाचा इत्यर्थ टिळकांच्या उद्गारांतील स्वराज्यविषयक

सळमळीच्या तुलनेनें लोकांच्या निदर्शनास आणलेला आहे.

१९१४ मध्यें टिळक आपली शिक्षा भोगून परत स्वदेशांत व स्वजनांत आल्यानंतर त्यांनीं पुनः आपल्या चळवळींत चैतन्य ओतलें. त्यानंतर १९१८ सालीं स्वराज्याच्या शिष्टाईसाठीं ते विलायतेस जाण्याला निघाले तेव्हां पुण्यास निघालेल्या त्यांच्या प्रचंड मिरवणुकीच्या निमित्तानें काकासाहेबांनीं लिहिलेल्या लेखांत आणखी एकदां टिळकांची राजकारणांतील थोरवी गाईलेली असून 'स्वराज्य संघाची दुसरी परिषद्' या लेखांतहि तोच प्रकार अनुभवास येतो. केसरींतील 'लोकमान्यांची शिकवणूक' हा काकासाहेबांचा केसरींतील शेवटचा लेख (१० आगस्ट १९२० पान-१३३-१३९) टिळकांच्या चरित्राचें आध्यात्मिक स्वरूप लोकांना समजावून देण्यासाठींच लिहिलेला आहे. टिळक-चरित्रावर आजपर्यंत लिहिल्या गेलेल्या लेखांत या लेखाला अत्युच्च श्रेणीमध्यें बसवावें लागेल. ता. १ आगस्ट १९४८ रोजीं मुंबईच्या रेडियोसाठीं काकासाहेबांनीं केलेल्या भाषणाच्या वेळीं याच लेखांतील विचार त्यांच्यापुढें होते. 'लोकमान्य' दैनिकाच्या पहिल्या अग्रलेखांत त्यांनीं टिळक-चरित्र केसरींतल्या शेवटच्या लेखाप्रमाणें पुनः एकदां वर्णून टिळक व गांधी यांच्या चळवळीची अभिन्नता स्पष्ट केली आहे. त्या लेखांतील अखेरचा मजकूर काकासाहेबांची म. गांधींच्या राजकारणांतील भूमिका व प्रतिज्ञा यांवर झगझगीत प्रकाश टाकणारा आहे. (पान १४५)

'गुरुस्थानीं असलेल्या लो. टिळकांचें चरित्र डोळ्यापुढें ठेवून, लोकांचा संसार नेटका व्हावा म्हणून त्यांनीं सोसलेल्या कारागृहवासासारख्या तपश्चर्येनें उद्दीप्त होणारी राष्ट्रभक्ति नीट जागी ठेवून, आणि त्यांच्या परिपक्व उपदेशांतील समबुद्धीला आमचें पाऊल वांकडें न पडण्याबद्दल नमन करून, त्यांनीं दाखविलेला स्वराज्याचा मार्ग त्यांच्या संप्रदायास शोभेल

अशा रीतीनें चोखाळण्यास त्यांच्याच नांवाचें हें दैनिक पत्र कधींहि कमी करणार नाहीं ' अशी लोकमान्य दैनिकाच्या पहिल्या अग्रलेखांत केलेली प्रतिज्ञा यथार्थ असल्याचें सिद्ध करण्यासाठीं त्या दैनिकाच्या दोन वर्षांतील संपादकीय कारकीर्दीत काकासाहेबांनीं टिळक व गांधी यांच्या विचारसरणींत भेद नाहीं हें महाराष्ट्राच्या गळीं उतरण्यासाठीं बरेच लेख लिहिले; त्यांतले कांहीं या संग्रहांत आलेले असून ते वाचकाईनें वाचल्यास टिळकांचें चरित्र व शिकवण त्यांनीं किती व कशी आत्मसात् केली होती याचा उत्तम प्रकारें अनुभव येतो. ' आज टिळक असते तर ' असा प्रश्न उपस्थित करून त्यांनीं खिलाफतीच्या चळवळीशीं फारकत साधली असती, कायदे–मंडळाच्या निवडणुकी लढविल्या असत्या, तडजोडीचें धोरण स्वीकारलें असतें, वगैरे मुद्दे महाराष्ट्रासमोर ठेवण्याचा उद्योग कित्येक टिळकानुयायांनीं १९२०–१९२३ या सालांत अतिशय आग्रहानें व चिकाटीनें चालविला होता. तो उद्योग कसा चुकीचा होता, हें महाराष्ट्राला पटविण्यासाठीं कांहीं लेखांत टिळक चरित्राची माहिती नमूद करून तर कांहीं लेखांत प्रखर युक्तिवाद लढवून काकासाहेबांनीं गांधीजींच्या चळवळीची जी सेवा केली तिला महाराष्ट्राच्या तत्कालीन राजकीय वाङ्मयांत तोड सांपडणार नाहीं. भाषा, विचार, आणि माहिती अशा तिन्हीं अंगांनीं हे लेख वाचण्याजोगे आहेत. टिळकांच्या गीतारहस्यावर काकासाहेबांचें अपरिमित प्रेम असल्यामुळें ह्या ग्रंथाची त्यांनीं केसरींतील शेवटच्या लेखांत जशी स्तुति केली आहे तशीच लोकमान्यांतहि एक स्वतंत्र लेख लिहून केली आहे. हे दोन्ही लेख एकत्र घेऊन वाचल्यास टिळकांचें जीवन आणि त्यांनीं संशोधिलेलें गीतारहस्य यांत मुळींच भेद नसल्याचा काकासाहेबांचा सिद्धान्त वाचकांच्या अंत:करणावर ठसण्यास उशीर लागणार नाहीं. काकासाहेब कधीं कधीं म्हणत असत कीं टिळकांचें गीतारहस्य अजून विदेहावस्थेंत आहे. तें कर्मभूमींत जसें उतरावें तसें

उतरलेलें नाहीं, जेंव्हां त्याचा प्रचार हरिदास, पुराणिक, अध्यापक, देश-कार्यांतील वक्तेप्रवक्ते लोकांत करायला लागतील व असा प्रचार लोकांच्या दिनचर्येंत सहजपणानें उतरलेला आहे असें दिसेल तेव्हांच गीतारहस्य सदेहावस्थेनें कर्मभूमींत उतरलें असें ठरणारें आहे. याचा अर्थ गीता-रहस्याचीं लोकांनीं पारायणें व पोपटपंची करावी असा नसून गीतारहस्यांत दाखविलेल्या दिशेनें बुद्धीच्या क्षेत्रांतील सर्व व्यवहार होऊं लागले पाहिजेत, असें काकासाहेब आपल्या म्हणण्याचा खुलासा करीत असत. त्यांनीं १९३० नंतर प्राचीन ग्रंथांचा अभ्यास करून जीं नव्या विवेचनाचीं पुस्तकें लिहिलीं आहेत, तीं त्यांनीं आपल्यापुरती गीतारहस्याची सेवा कशी केली याची साक्ष पटविणारीं आहेत. काकासाहेबांनीं टिळक-चरित्र लिहिलें असतें तर त्याचें स्वरूप कसें दिसलें असतें, याची कल्पना टिळकांवरील लेखांनीं करून घेतां येते.

१९२२ च्या मार्चमध्यें म. गांधींना सरकारनें तुरुंगांत अडकविल्यावर जो बुद्धिभेद थांबावा म्हणून काकासाहेबांनीं टिळक-चरित्राचा आपल्या अधिकारानें ऊहापोह केला तो बुद्धिभेद पुढें जास्तच भडकला. काकासाहेबांना 'लोकमान्या'ला राम राम ठोकून 'नवाकाळ' काढावा लागला याच्या मुळाशीं हा बुद्धिभेदच होता. १९२३ च्या मार्चमध्यें 'नवाकाळ' सुरू केल्यावर या बुद्धिभेदाच्या आधाराची एक नवी फळी काँग्रेसमध्यें उभी राहिली. देशांतील अनेक नामांकित पुढारी त्या फळीचे पुरस्कर्ते असले तरी काँग्रेसमध्यें या फळीला बहुमताचा आशीर्वाद कधींच लाभला नाहीं. १९२४ मध्यें म. गांधी तुरुंगांतून सुटले व त्यांनीं या फळीला मार्ग मोकळा करून दिल्यावर अवघ्या दोन वर्षांत ती दुभंगली. म. गांधी पुनः राजकारणाच्या रणक्षेत्रांत आपल्या पूर्वीच्या निष्ठेनें व तशाच जोमानें उतरतांच बुद्धिभेदाच्या मोहिमेचा प्रभाव ओसरत गेला, व म. गांधींच्या

विचारसरणीची स्वतंत्रपणें तरफदारी करण्याचें कामहि संपुष्टांत आलें. म. गांधी जो पवित्रा टाकतील तो तसा कां टाकावा लागला, याचा खुलासा ते स्वत: आपल्या नियतकालिकांच्या द्वारें अविश्रांतपणें करीत असत; तो खुलासा महाराष्ट्राच्या सामान्य जनतेला समजावून सांगण्याची जबाबदारी काँग्रेस पक्षीय मराठी वृत्तपत्रकारांची होती. ही जबाबदारी काकासाहेब आपल्या लेखणीच्या कसलेल्या कुशलतेनें व अत्यंत समरततेनें पार पाडीत होते.

गांधीजी तुरुंगांत व बाहेर काँग्रेसच्या गोटांत फूट अशा स्थितींत गांधींच्या राजकारणाविषयीं लोकांची भक्ति टिकवून धरण्याचें काम अतिशय बिकट होतें; परंतु ज्याकरितां काँग्रेसचे कित्येक पुढारी गांधींच्या राजकारणाशीं फटकले तो मुख्य विषय कौन्सिलांत जाण्याचा होता. १९२३ मध्यें कायदेमंडळांतील खऱ्याखुऱ्या लोकमताला धाब्यावर बसवून मिठाचा कर बिनदिक्कत वाढविल्यामुळें कायदेमंडळांतील लढाईच्या परिणामकारकतेबद्दल लोकांचा विश्वास डळमळणें स्वाभाविक होतें. हा प्रसंग काकासाहेबांसारख्यांच्या नजरेंतून सुटणें शक्य नसल्यामुळें त्यांनीं गांधींच्या राजकारणासाठीं त्याचा उपयोग करून घेतला. नवाकाळ निघाल्यानंतर राष्ट्रीय निशाणाचा झगडा सुरू झाला. तो लोकांच्या स्वराज्यविषयक स्वाभिमानाचा दर्शक होता. याशिवाय त्यावर्षी काँग्रेसमध्यें व काँग्रेसबाहेर जें घडलें त्याची माहिती काकासाहेबांच्या १९२३ सालाच्या लेखांतून आलेली आहे. नवाकाळमध्यें टिळकांच्या कर्तृत्वाचीं तत्त्वें काकासाहेबांनीं लोकमान्यांतल्या लेखमालेप्रमाणें विस्तारानें प्रतिपादन केलेलीं नाहींत. १९२३ मधील त्यांचा फक्त एकच लेख 'लो. टिळक आणि समूहाचा आत्मयज्ञ' या संग्रहांत घेतलेला आहे. टिळकांच्या कर्तबगारींतील आणखी एका अज्ञात किंवा झांकलेल्या मूल्यावर प्रकाश टाकणारा तो लेख आहे.

१९२४ ते १९२९ या पांच वर्षांत म. गांधींच्या दुर्दम्य प्रेरणेमुळें

हिंदी राजकारणाचीं चक्रें अतिशय वेगानें फिरूं लागलीं होतीं. सारा देश त्या वेगानें गजबजून गेला होता आणि जनतेच्या जीवनाची चिरकालीन स्थिरता हादरून तिला स्वराज्यानुकूल आकार धारण करण्याची आवश्यकता वाटूं लागली होती. गांधींनीं कौन्सिलांतील राजकारण दास–नेहरूंच्या पुढारीपणाच्या गळ्यांत टाकून खादीचा प्रसार, हिंदु–मुसलमानांचें ऐक्य, अस्पृश्यता निवारण यासारखीं कार्यें आपल्या अंगावर घेतलीं. तुरुंगांतून सुटल्यावर थोडयाच अवधींत हिंदु–मुसलमानांच्या एकीसाठीं गांधीजींनीं दिल्लीस मोठा उपवास केला; या उपवासांत शक्ति क्षीण झाल्याचा अनुभव येत असतांहि उरल्या–सुरल्या शक्तीनें अर्धा तास चरख्यावर सूत काढण्याचें आपलें व्रत त्यांनीं सोडलें नाहीं. परंतु या उपवासाच्या पूर्वी म. गांधींना आपल्या कांहीं अनुयायांच्या उच्छृंखळपणाचा जो अनुभव आला त्याबद्दल काका-साहेबांनीं प्रकट केलेलीं मतें अवश्य नजरेखालीं घालण्यासारखीं आहेत. महात्माजींनीं यावेळीं नमतें घेतलें; परंतु आपला मार्ग सोडला नाहीं. त्यांनीं खादीच्या वाढीची संस्था निर्माण केली. चरख्याचें स्वराज्याच्या चळवळींत महत्त्व काय व त्याविरुद्ध निघणाऱ्या आक्षेपांत भरीवपणा कितपत आहे, यासंबंधाचे १९२४–२५ सालांतले लेख ,पाहिल्यास काकासाहेबांच्या संपादकीय कर्तव्यदक्षतेबद्दल निराळा पुरावा द्यायला नको.

१९२५ च्या विशेष महत्त्वाच्या घटना बावला खुनाच्या खटल्याचा निकाल, याच दिवसांत इंग्लंडांत उघडकीस आलेलें काश्मीरच्या महाराजांचें एक कुलंगडें, दासबाबूंचा मृत्यु, वऱ्हाडचे ना. तांबे यांनीं मध्यप्रांत सरकारांत केलेला प्रवेश, खादीच्या प्रसारावरून म. गांधींचा डॉ. रविंद्रनाथ टागोर यांच्याशीं झालेला वाद, आणि दास–नेहरूंनीं स्थापन केलेल्या पक्षांतील फाटाफूट या होत. बावलाच्या खुनाशीं मुमताज नामक स्त्रीचा संबंध असल्या-मुळें त्या खटल्याच्या निकालाबद्दल लिहितांना काकासाहेबांनीं मातृहृदयाचें

जें वर्णन केलें आहे, तें त्यांच्या मूलगामी दृष्टीचें एक ठळक प्रमाण आहे. (पान ३५४) या खुनाच्या प्रकरणानें अखेरीस इंदूरच्या तत्कालीन महाराजांवर आपलें राज्य सोडण्याची पाळी आली, त्यासंबंधाच्या लेखांत काकासाहेबांनीं संस्थानिकांच्या दीनावस्थेची माहिती स्पष्ट केली आहे. 'नीतिभ्रष्ट व निर्लज्ज' या लेखांत काश्मीर नरेशाच्या प्रकरणावरून इंग्लंडच्या सामाजिक नीतिमत्तेच्या ऱ्हासाचें घोर स्वरूप उघड केलेलें आहे. दासबाबूंच्या स्मारकावर करण्यांत आलेल्या कुत्सित आरोपांचें निराकरण 'मेलेल्यांना खाऊन जगणें' या लेखांत आहे. गांधी–टागोर वादांतील गांधींची भूमिका काकासाहेबांनीं 'कंटाळवाणा चरखा' या लेखांत संदेहातीत केली आहे. दास–नेहरूंच्या पक्षांतून बाहेर पडून जयकर-केळकरांनीं स्थापन केलेल्या सवत्या सुभ्याचा समाचार 'नवे संभाजी' या लेखांत पहायला सांपडतो. १९२६ सालांत या सवत्या सुभ्याचा जो मतप्रचार टिळकांच्या नांवावर सुरू झाला होता, त्याला 'टिळक आणि प्रतियोगी सहकारिता' या लेखांत उत्तर आहे (पान ४१६). या लेखावरील संस्कृत श्लोक गायित्री मंत्रांतील कित्येक शब्द गुंफून काकासाहेबांनीं 'लोकमान्य' पत्राचें ब्रीद म्हणून तयार केला होता. मार्गें लोकमान्याच्या पहिल्या अग्रलेखांतील एक उतारा दिलेला आहे. तो या श्लोकाचें भाषांतर किंवा हा श्लोक ह्यांतील विचारांचें संस्कृत रूपांतर ठरणारा असल्याचें चाणाक्ष वाचकांना सांगायला नको.

१९२७ सालांत चीनमध्यें डॉ. सन्यतसेन यांच्या राष्ट्रीय पक्षाची संघटना प्रबळ झाल्याचा अनुभव येऊं लागला. या संघटनेची माहिती 'नव्या चीनचे दैवत' या लेखांत आलेली आहे. याच वर्षी अफगाण अमीर अमानुल्ला हे हिंदुस्थानांतून युरोपच्या प्रवासाला गेले. १९२७ हें शिवाजी महाराजांचें जन्मवर्ष मानणारांनीं मुंबईत ना. जयकरांच्या पुढाकारानें एक

मोठा त्रिशतसांवत्सरिक महोत्सव साजरा केला. त्यास अनुलक्षून काका-साहेबांनीं शिवाजीच्या कामगिरीचें धोरण दाखविणारे लेख लिहिले तें इतिहासाच्या अभ्यासकांना मार्गदर्शक होणारे आहेत. १९२८ मध्यें साऱ्या जनतेचें लक्ष वेधून घेणारा 'बारडोलीचा सारावंदीचा सत्याग्रह' सुरू झाला. १९२९ सालच्या प्रारंभीं अफगाणिस्तानांत राज्यक्रांति झाली. फेब्रुवारी महिन्यांत मुंबईस 'हिंदुमुसलमानांचा भयंकर दंगा' १८९३ सालानंतर छत्तीस वर्षांनीं सुरू झाला. 'नवाकाळ'मधील त्याविषयींचा एक अग्रलेख व त्यानंतर चार दिवसांनीं प्रसिद्ध झालेलीं संकीर्ण समालोचनांतील कांहीं स्फुटें, याच्या आधारें काकासाहेबांवर राज्यद्रोहाचा आरोप ठेवून सरकारानें त्यांस एक वर्षाची कैदेची शिक्षा फर्मावली. यानंतर काकासाहेबांनीं 'नवाकाळ'साठीं कांहीं लिहिलें नाहीं. तीन वर्षांपूर्वी एका लहानशा वेदान्ताच्या पुस्तकावर त्यांनीं एक १५–२० ओळींचा अभिप्राय लिहिला होता, तो त्यांचा नवाकाळ-मधील शेवटचा लेख म्हणतां येईल. त्यांच्या नाटकाशिवायच्या लेखनाचा प्रारंभ एका पुस्तकावरील अभिप्रायानें झाला. शेवट देखील अशा अभि-प्रायानें व्हावा हा योगायोग डोळ्यांत भरणारा आहे. सदर अभिप्राय लिहितांना काकासाहेबांचा हेतु काय होता हें समजायला आज कांहींच साधन नाहीं. परंतु आपल्या वृत्तपत्रीय लेखनाची अंतिम सीमा पुस्तकाच्या अभिप्रायानेंच पूर्ण व्हावी, असें त्यांच्या मनांत तेव्हां असावें, असें वस्तुस्थितीवरून मानायला हरकत नाहीं.

येथवर पूर्वीच्या आणि या संग्रहांतल्या लेखांचा त्रोटक आढावा वाचकांपुढें ठेवला आहे. त्याच्या अनुरोधानें काकासाहेबांच्या संपादकीय कामगिरीचें स्वरूप निवेदन केल्यास तें अस्थानीं होणार नाहीं. यासाठीं टिळक चरित्रांतील निरनिराळ्या घटनांकडे पहाण्याची काकासाहेबांची दृष्टि कशी होती हा प्रश्न प्रथम विचारांत घेणें उचित होईल. टिळकांना

१९०८ सालीं सहा वर्षांची शिक्षा झाल्यावर त्या निमित्तानें त्यांचें त्यापूर्वीचे २५।३० वर्षांचें चरित्र सांगतांना काकासाहेबांनीं अनेक प्रकरणांचा निर्देश करून (पान ४३०) "स्वराज्याच्या ध्रुवाकडे दृष्टि निश्चल ठेवावयाची व त्या दृष्टीच्या रोखानें त्या त्या परिस्थितींत कोणते कर्म इष्ट आहे त्याचा सिद्धांत बांधून त्याप्रमाणें कायावाचामनानें (तें) आचरीत असावयाचें....एकदां सिद्धांत ठरून कर्माला आरंभ झाल्यावर त्या कृत्यास चालत्या गाडयाचें स्वरूप येईपर्यंत अडचणींची, अडथळ्यांची, संकटांची, द्रव्यहानीची, किंवा शरीरक्लेशाची त्यांनीं केव्हांहि पर्वा केलेली नाहीं.... परिस्थितीशीं झगडून आपणास पुढें पाऊल टाकावयाचें आहे, ह्याविषयीं ते सावधान असल्यामुळें स्वतःच्या पावलापुढें परिस्थितीला त्यांनीं कधींहि ...जाऊं दिलेलें नाहीं. अंतिम साध्याकडे दृष्टि ठेवून राजकीय व इतर चळवळींतील आपले सिद्धांत रा. टिळक ह्यांनीं ठरविलेले आहेत.... अंतिम साध्यासंबंधानें राजकीय चळवळींतील कर्मयोग्यांत सर्वांत पुढच्या रांगेंत उभे रहाण्याची पराकाष्ठा करण्यांत त्यांनीं कमी केलेलें नाहीं. स्वदेशभक्तीच्या सूत्रानें त्यांच्या निरनिराळ्या चळवळी एके जागीं गोंवता येतात.... बाह्यतः परस्पर विरोधी दिसणारीं कर्में स्वदेशभक्तीच्या दृष्टीनें सुसंगत दिसूं लागतात....राजकीय चळवळीचा अंतिम साध्याचा त्यांचा सिद्धांत कायम ठरलेला आहे; व त्याबद्दल त्यांच्यावर कोणाचीच धक्कादृष्टि नाहीं, पण रोजच्या वर्तनांत जे नियम रा. टिळक घालून देत असत व त्याबरहुकूम अंगीकृत कार्याची, दम न खातां, मेहनतींत कुचराई न करतां, परिस्थितीकडे पूर्ण लक्ष पोंचवून व सरकारनें जितकी म्हणून साधनें वापरण्याची परवानगी कायद्यानें दिली असेल त्यांचा पूर्ण उपयोग करून जी एकसारखी पाठ पुरवीत असत, त्यामुळें ते कांहीं अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत खुपत" टिळकांच्या कामगिरीचें तात्त्विक दृष्टीनें

जें रहस्य काकासाहेबांनीं या विवेचनाच्या द्वारें ग्रथित केलें आहे त्या रहस्याविषयीं साशंक होण्याची त्यांना पुढें कधींच पाळी आली नाहीं. म. गांधींच्या चळवळीचीं कित्येक उपांगें टिळकांच्या चळवळीहून भिन्न दिसणारीं असली तरी दोघांचा अंतिम सिद्धांत व देशोद्धाराचा कळवळा या दोन्ही गोष्टी सारख्याच जाज्वल्य असल्यामुळें त्यांच्या सूत्रानें गांधींच्या राजकारणाचे टिळकांसंबंधांतील श्रद्धेचा व निष्ठेचा अभिनिवेश, आवेश व उत्साह चढता वाढता ठेवून समर्थन करतां आलें. 'नवाकाळ'च्या पहिल्या 'स्वत.संबंधानें' या लेखांत '१८९६ सालापासून रा. खाडिलकर यांच्या लेखाचें धोरण वाचकांस माहीत असल्यामुळें धोरणासंबंधानें नवी ओळख करून देण्याची जरुरी नाहीं. लो. बाळ गंगाधर टिळक यांचें शिष्यत्व स्वेच्छेनें व आनंदानें स्वीकारून ज्या मताचा अंगिकार रा. खाडिलकर यांनीं केला, तीं मतें आज जशींच्या तशीं कायम आहेत. लो. टिळक यांनीं आपल्या विचारसरणीला जें वळण लावलें, तें वळण म्हणजे सद्रूचा मोठा प्रसाद होय, असा रा. खाडिलकर यांचा दृढ विश्वास असून, गेलीं दोन वर्षें 'लोकमान्य' पत्राचे संपादक या नात्यानें सांप्रतच्या नव्या काळांत त्यांनीं जें धोरण स्वीकारलें होतें, तेंच धोरण नव्या पत्राच्या रूपानें आजपासून वाचकांच्यापुढें मांडण्यांत येत आहे. म. गांधी यांनीं सुरू केलेली असहकारितेची चळवळ म्हणजे लो. टिळक यांच्या धोरणाचें परिपक्व फळ होय, याविषयीं सर्व विचारी लोकांची एकवाक्यता झालेली आहे. ज्या वृक्षाचें बीजारोपण लो. टिळक यांनीं केलें, जो वृक्ष लो. टिळक यांच्या हयातीतच वाढीस लागून फलोन्मुख झाला व ज्या वृक्षाचें पूर्ण स्वरूप म. गांधी यांच्या चळवळीमुळें जनतेच्या दृष्टीस पडलें, त्या वृक्षाच्या सांवलीखालीं बसून 'नवाकाळ' पत्र आपलें रोजचें काम करणार आहे.' असें काकासाहेबांचें आत्मनिवेदन आलेलें आहे. ह्याचा रंग 'लोकमान्या'च्या

'स्वतःसंबंधानें' या प्रारंभीच्या लेखांतहि भरपूर दृष्टीस पडतो. १ आगस्ट १९४८ रोजीं रेडियोवरील संवादांत हेच विचार त्यांनीं प्रकट केले आहेत. या सर्वांची संगति लावल्यास 'मी टिळकाइट आहें' असा जो उद्गार लो. टिळकांच्या नातवाच्या कानीं आयुष्याच्या अखेरीस घातला तो कसा यथार्थ होता, याविषयी खात्री पटेल. गांधींच्या स्वावलंबनपर आध्यात्मिक विचारसरणीचें काकासाहेबांनीं १९०९ सालच्या एका लेखांत स्वागत केलें असून टिळक १९१८–१९१९ या वर्षांत विलायतेस असतां रौलट कायद्याच्या निषेधाच्या निमित्तानें झालेल्या देशव्यापी सत्याग्रहाचा काका-साहेबांनीं केसरीमधून जो पाठपुरावा केला आहे तो पाहिल्यास व टिळकांनीं मृत्युपूर्वी गांधीजींविषयीं दाखविलेली अनुकूलता (जी 'खुद्द टिळकांचेच उद्गार' या लेखांत नमूद आहे) विचारांत घेतल्यास काकासाहेबांची गांधींच्या राजकारणांतील भूमिका पूर्वीच्या परंपरेलाच धरून भक्कम असल्याचें लक्षांत येईल. 'लोकमान्यांची शिकवणूक' या लेखांत 'लो. टिळक यांचें चरित्र भूतकालाला व्यापून पुढील इतिहासावर पसरलेलें दिसत आहे.' असें एक सूचक वाक्य आलेलें आहे. तें वाक्य काकासाहेबांचें टिळकशिष्य या नात्याचें भावी कर्तव्य लक्षांत आणून देणारें आहे. याप्रमाणें टिळका-संबंधी काकासाहेबांच्या साऱ्या लेखांचें परिशीलन केल्यास टिळक चरित्रा-प्रमाणें त्यांनीं आपल्या रहागीला व संपादकीय कामगिरीला वळण लावलें होतें याबद्दल शंका रहाणार नाहीं. टिळकांच्या शिकवणुकीला धरून काका-साहेबांनीं स्वराज्याच्या ध्येयाची अखंड सेवा केली, असें तात्पर्य स्वीकारावें लागतें.

काकासाहेबांचे लेख वाचीत असतां त्यामध्यें मनुष्य प्राण्याच्या वैयक्तिक व सामुदायिक जीवनाच्या देशोद्धारमूलक अनुभवांतून निघणाऱ्या अनेक चिरस्थायी तत्त्वांचा साधक बाधक ऊहापोह दृष्टीस पडतो. असा ऊहापोह

करण्याची त्यांची वृत्ति केसरींत प्रवेश करण्यापूर्वीच त्यांच्या ठिकाणीं चालू घडामोडींच्या अखंड चिंतनमननाचें परिपाकावस्थेस आलेली होती, असें त्यांचे वि. ज्ञा. विस्तारांतले लेख वाचल्यास ध्यानांत येणारें आहे. नाटकांतील संवादांतहि अशा तऱ्हेचा ऊहापोह दृष्टीस पडतो. केसरीच्या पहिल्या लेखांत त्यांचें दर्शन घडतें. पुढें पुढें तर असा उहापोह बहुधा प्रत्येक लेखांत आल्याचें पहावयास सापडतें. समोर आलेल्या विषयाची चर्चा करतांना तो विषय मानवी स्वभावांतून कसा उद्भवतो या प्रश्नाचें बिनचूक उत्तर काढून त्याच्या अनुरोधानें जनतेला व राज्यकर्त्यांना ज्याच्या त्याच्या कर्तव्याचा मार्ग सुचविणें हा प्रकार काकासाहेबांच्या लेखनांत जेवढया मोठया प्रमाणांत आढळतो तेवढा दुसऱ्या कोणत्याहि त्या काळच्या वृत्तपत्रसंपादकाच्या लेखनांत आढळणार नाहीं. या प्रकारांत उपमादृष्टांतादि शृंगारसाज नाहीं. शक्यतोंवर अगदीं साध्या भाषेंत काकासाहेब आपली विचारसरणी वाचकांना समजावून देत असत. या संबंधाचे केसरींतील व लोकमान्यांतील लेख सोडून लोकमान्य नवाकाळच्या लेखांतील उदाहरणांचा निर्देश करावयाचा म्हटल्यास 'टिळक आणि स्वावलंबन' या लेखांतील स्वावलंबनाचें विवेचन, 'टिळक आणि बहिष्कार' यांतील चिकाटीच्या गुणांचें स्पष्टीकरण 'विद्वान नाहींत' यांमधील विद्वत्ता आणि पराक्रम या दोन गुणांची सामुदायिक उठावणीच्या दृष्टीनें केलेली मीमांसा, 'कंटाळवाणा चरखा' यांतील नित्यकर्माचें, व यमनियमांचें दाखविलेलें महत्त्व, 'दरिद्र नारायण' यांतील दरिद्र्याच्या अंगीं स्वयंसिद्ध असलेल्या स्वोद्धाराच्या सामर्थ्याचें निरूपण, 'कौन्सिलांवर बहिष्कार कां घातला?' यांतील आरामतलबी राजकारणाच्या विघ्नसंतोषीपणांवर प्रकाश टाकणारा युक्तिवाद, वगैरे भाग हा संग्रह काळजीनें वाचणारांच्या सहज डोळ्यांत भरणारे आहेत.

मराठी भाषेमध्यें वृत्तपत्रांच्या द्वारें अनेक नवे नवे शब्द रूढ झाले आहेत. काकासाहेबांच्या युद्धविषयक लेखांतून लष्करी व्यवहाराच्या परिभाषेचे किती तरी शब्द दाखवितां येतील. राजकीय परिभाषा मराठींत कशी बनत गेली याचा अभ्यास करणारांनाहि काकासाहेबांचे अनेक लेख उद्‌बोधक वाटतील. १८९७ सालीं टिळकांना शिक्षा झाल्यावर जनता किंवा लोकपक्ष या ऐवजीं त्यांनीं प्रजापक्ष असा शब्द वापरला आहे. त्यापूर्वी राष्ट्रीयत्व याबद्दल 'राष्ट्रधर्म' असा शब्द केसरीमध्यें उपयोगांत आल्याचें दृष्टीस पडतें. १९१८ सालीं पहिलें महायुद्ध संपतां संपतां Self-deterMination हा शब्द उदयास आला. हल्लीं त्याचा मराठी पर्याय स्वयंनिर्णय असा आहे. परंतु काकासाहेबांनीं प्रारंभीं केसरीच्या लेखांत 'स्वसंमति' हा शब्द योजलेला आहे. 'आर्गनाइज्ड' म्हणजे देहधारी, सँक्शन म्हणजे हत्यार, या प्रमाणें त्यांनीं वेळोवेळीं पुष्कळ नवे शब्द मराठींत आणण्याचा प्रयत्न केला आहे. आतां पहिल्या देहधारी ऐवजी संघटित हा शब्द जास्त प्रचारांत आलेला आहे. यासंबंधांत आणखीं बरींच उदाहरणें दाखवितां येतील.

एखादा विषय विवेचनाला घेतला कीं, त्याच्या अतिशय व्यापक दृष्टीनें परामर्श करण्याची काकासाहेबांच्या बुद्धीची ठेवण वाचकांच्या नजरेंतून सुटणार नाहीं असा भरंवसा आहे. टिळक विलायतेस जाण्याला निघाले त्यावेळीं येथें व इंग्लंडांत राजकीय दृष्टया महायुद्धाच्या जबरदस्त तडाख्यापायीं हिंदी स्वराज्याच्या मागणीला कसे अनुकूल वारे वाहूं लागलें होते याचें काकासाहेबांच्या या संग्रहांतल्या पहिल्याच लेखांतील विवरण या विषयीं खात्री पटवून देण्यास पुरेसें आहे. पहिली चिरोली चकमक, टिळक पर्स फंड, म. गांधी चुकले काय ? हे लेख वरील खात्रीला दुजोरा देणारे आहेत. केवळ मासल्यासाठीं त्यांचा उल्लेख केला आहे. त्यांच्या

बुद्धीच्या ठेवणीचा आणखी एक गुण, मुख्य ध्येय व त्याला उपयोगी पडणारीं साधनें यावर लोकांची दृष्टि खिळून टाकणें हा होय. एखाद्या विषयाचा आत्मा कोणता व त्याचीं शोभेचीं वस्त्र-प्रावरणासारखीं अपरिहार्य महत्त्वाचीं नसलेलीं अंगें-उपांगें कोणतीं याचा मनाशीं योग्य निश्चय करून आत्म्याच्या अवस्थेची बारीक छाननी करणें व बाकीचीं अंगें-उपांगें दृष्टिआड ठेवणें, या पद्धतीचा परिचय काकासाहेबांच्या साऱ्याच लेखांतून होणारा आहे. वृत्तपत्राच्या संपादकीय कर्तव्याचा बोध करून घेण्याला त्यांच्या या गुणाकडे होतकरू वृत्तपत्रकारांनीं लक्ष देणें अवश्य आहे. 'श्री शिवाजी महोत्सव' (पान ३०१) हा लेख एका इंग्रजी पुस्तकाच्या निमित्तानें लिहिलेला असला तरी शिवाजी उत्सवाचा उपयोग खादीच्या चळवळीला कसा होईल, याची चर्चा केली आहे. साहसप्रियता, कर्तव्यतत्परता व आत्मयज्ञाची रुचि या गुणांवर हिंदुस्थानांत इंग्रजी राज्याची उभारणी झाली. इंग्रजांच्या या गुणांचीं फळें त्यांच्या हातून हिरावून घ्यावयाचीं असतील तर देशांत वाटेल त्या साहसांत आनंदानें उडी घ्यावयास अनिवार्य प्रेरणा देणारी व उत्साहानें त्या साहसाचीं येतील तीं संकटें सोसण्याची शक्ति पुरविणारी नवी देशहितैकनिष्ठ श्रद्धा उत्पन्न झाली पाहिजे. या नव्या श्रद्धेचा पाया वंगभंगाच्या क्षोभांतून अवतरलेल्या स्वदेशीच्या चळवळीचे वेळीं टिळकांनीं घातला. त्या श्रद्धेला अनन्यभक्तीचें रूप देण्याचें कार्य खादीच्या चळवळीनें गांधी करीत आहेत. एके काळीं अलौकिक आत्मयज्ञ करणाऱ्या शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रानें या कार्याला मदत केली पाहिजे, असें या लहानशा लेखाचें तात्पर्य आहे.

प्रस्तुत संग्रहाच्या शेवटीं काकासाहेबांची कित्येक अध्यक्षीय भाषणें जोडलीं आहेत. नाटय असो, कीर्तन असो किंवा साहित्य असो, काकासाहेब या सर्वांचा विचार राष्ट्रहिताची दृष्टि चळूं न देतां कसा करीत असत,

याचा पुरावा या भाषणांतून आहे. राष्ट्रहिताची जबाबदारी टाळून यापैकीं कोणताहि विषय यशस्वी रीतीनें चोखाळतां येणार नाहीं, असा काकासाहेबांचा या भाषणांतील सिद्धांत स्पष्ट दिसणारा आहे. या सिद्धांताच्या उज्ज्वलतेमुळें त्यांच्या विचारांना अनेक स्थळीं विलक्षण तेज चढलेलें आहे. १८९३ सालापासून १९४८ पर्यंत म्हणजे उणीपुरी ५५ वर्षें आपल्या बौद्धिक सद्गुणांचें धन राष्ट्रहिताच्या अनन्य भक्तीनें मराठी भाषेच्या द्वारें नाटकें, व्याख्यानें, वृत्तपत्रीय लेख आणि पारमार्थिक पुस्तकें अशा भिन्न भिन्न शाखांनीं महाराष्ट्र जनतेला, स्वतःकरितां फळाची अपेक्षा न बाळगतां अर्पण करणाऱ्या या महनीय पुरुषाच्या नाटकांचा गौरव महाराष्ट्राकडून सतत चाललेला आहे. काकासाहेबांच्या पारमार्थिक पुस्तकांचेंहि परिशीलन होत आहे. व्याख्यानांचा गौरव त्यांच्या हयातींत होऊन गेला. त्यांचें वृत्तपत्रांतील संपादकीय लेखन संग्रहरूपानें प्रसिद्ध व्हावें, अशी उत्कंठा अलीकडे कित्येक वर्षें महाराष्ट्र जनतेकडून तीव्रतेनें व्यक्त होत असे. ती उत्कंठा आतां यथामति तृप्त केली जात आहे. काकासाहेबांच्या इतर वाङ्मयाप्रमाणें या वाङ्मयाचाहि महाराष्ट्रांत आदर होईल असा पूर्ण विश्वास आहे.

—न. र. फाटक

अनुक्रमणिका

लेख.	पान नं.
१ स्वराज्याची शिष्टाई	१
२ स्वराज्य संघाची दुसरी परिषद	९
३ मुंबईची यशस्वी काँग्रेस	१६
४ दिल्लीची राष्ट्रीय सभा	२५
५ पहिली चिरोली चकमक	३८
६ बॅ. बॅप्टिस्टा यांचा अनुभव	४६
७ मुंबई–दिल्लीचा हरताळ	५५
८ धामधुमीचा आठवडा	६४
९ सत्याग्रहाला सुळीं कां चढवितां?	७३
१० अकाळ विकाळ शिक्षा	८३
११ लटुपटीचें बंड व माफीचें बिल	९०
१२ राष्ट्रीय सभा व बादशाही जाहीरनामा	१०१
१३ टिळक पर्स फंड	१०८
१४ स्वराज्य व शिष्टमंडळ	११६
१५ जुन्नरची झटापट	१२४
१६ लोकमान्यांची शिकवणूक	१३३
१७ स्वतः संबंधानें	१४०
१८ खुद्द टिळकांचेच उद्गार	१४६
१९ टिळक आणि मुसलमान	१५३
२० टिळक आणि खिलाफत	१५८

२१ टिळक आणि कौन्सिलांतील टक्कर	१६४
२२ टिळक आणि स्वावलंबन	१७१
२३ टिळक आणि तडजोड	१७७
२४ टिळक आणि राष्ट्रीय सैन्य	१८३
२५ टिळक आणि गीतारहस्य	१८९
२६ टिळक आणि बहिष्कार	१९६
२७ स्वतःसंबंधानें	२०२
२८ मिठावरील कर नापास झाला	२०५
२९ वेश्येखातर मिठावर कर	२०८
३० मिठावरील कर दुप्पट झालाच	२१४
३१ राष्ट्रीय निशाणाचा झगडा	२१७
३२ समेट संपला	२२०
३३ कौन्सिलांवर बहिष्कार कां घातला	२२५
३४ कौन्सिलाच्या बहिष्काराची चळवळ बंद ठेवण्याचा ठराव	२३१
३५ महाराष्ट्र काँग्रेस कमिटी	२३८
३६ विद्वान नाहींत	२४२
३७ महात्मा गांधी चुकले काय ?	२४८
३८ लो. टिळक व समूहाचा आत्मयज्ञ	२५५
३९ राष्ट्रीय निशाणाचा विजय	२६२
४० दिल्लीच्या काँग्रेसची तडजोड	२६७
४१ सन्मान कोणाचा करावयाचा ?	२७५
४२ करणी आणि शिष्टाई	२७९
४३ कोकोनाडाची काँग्रेस	२८६

४४	महात्मा गांधी ह्यांचा संदेश	२९१
४५	असेंब्लीला धाब्यावर बसविलें	२९६
४६	श्रीशिवाजी महोत्सव	३०१
४७	महात्माजींचें मत	३०६
४८	पराभव व फजिती	३११
४९	हिंदु–मुसलमानांची पायधरणी	३१७
५०	प्राण असेतों सूत काढणार	३२०
५१	वरवंटा फिरूं लागला	३२४
५२	त्रिमूर्तींचा खादीचा अवतार	३२९
५३	वेड्याचा चरखा	३३६
५४	एका घमेंडखोराचा मृत्यु	३४२
५५	नीतिभ्रष्ट आणि निर्लज्ज	३४८
५६	मुमताज खटल्याचा निकाल	३५३
५७	दासबाबू	३५७
५८	संसारापुरती मजुरी	३६३
५९	मेलेल्यांना खाऊन जगणें	३६८
६०	सुताची संस्था	३७३
६१	नामदार तांबे	३७८
६२	कंटाळवाणा चरखा	३८३
६३	नवे संभाजी	३८८
६४	काँग्रेस आणि उष्ट्यांतील रस	३९२
६५	होळकर गादी सोडणार	३९६
६६	छातीवरचें दडपण	४००
६७	पहारेकऱ्याला हजार रुपये	४०४

६८ शर्यतीचा जुगार	४०८
६९ इंग्लंडची सद्दी संपली	४१२
७० टिळक आणि प्रतियोगी सहकारिता	४१६
७१ कंगालखाना आणि खादी	४२२
७२ दरिद्र नारायण	४२६
७३ साम्राज्य आणि हिंदुस्थान	४३०
७४ एकी आणि काँग्रेस	४३४
७५ स्वामी श्रद्धानंद	४३८
७६ काँग्रेस व खादीचे नोकर	४४२
७७ नवी दिल्ली	४४६
७८ नव्या चीनचें दैवत	४४९
७९ शिवाजी आणि सह्याद्री	४५४
८० शिवाजी आणि कोकणपट्टी	४५९
८१ शिवाजी आणि मुसलमान	४६३
८२ ओडवायर आणि डायर	४६९
८३ अफगाणिस्थानचे अमीर	४७३
८४ अफगाणिस्थान व जर्मन विमानें	४७७
८५ सरकार उलथलें जाईल काय ?	४८१
८६ चीनचें नवें स्वरूप	४८६
८७ शेतकऱ्यांचें बंड	४९१
८८ पाहिजे दाता	४९७
८९ अफगाणिस्थानांत राज्यक्रांति	५०३
९० श्री. कृ. प्र. खाडिलकर यांच्यावरील राज्यद्रोहाच्या खटल्यास कारणीभूत झालेला लेख मुंबईचे दंगे व बोल्शेव्हिक बिल	५१०

खाडिलकरांचीं अध्यक्षीय भाषणें

९१ नाटयसंमेलनापुढील भाषण ५१७

९२ कीर्तनसंमेलनापुढील भाषण ५२३

९३ नागपूर साहित्यसंमेलनाचें अध्यक्षीय भाषण ५३३

दुरुस्ती

खुद्द टिळकांचेच, उद्गार, टिळक आणि मुसलमान, टिळक आणि खिलाफत या अनुक्रमें पान १४६, १५२ व १५८ वरच्या लेखांच्या तारखा अनुक्रमें २३ जुलै १९२२, २४ जुलै १९२२, व २५ जुलै १९२२ अशा चुकीनें आल्या आहेत. त्या अनुक्रमें २० जुलै १९२१, २१ जुलै १९२१, व २२ जुलै १९२१ अशा वाचाव्यात.

अनुक्रम..... वि: .....

अनुक्रम ..... वी: वि: ...

॥ श्री ॥

खाडिलकरांचा लेखसंग्रह

(भाग दुसरा)

ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 4987

* स्वराज्याची शिष्टाई

उदईक म्हणजे बुधवारीं रात्रीं मुंबईहून मद्रास मेलनें निघून लो. टिळक, श्री. खापर्डे, श्री. करंदीकर, श्री. केळकर व बाबू विपिनचंद्र पाल हे पांच पुढारी मद्रास–कोलंबोवरून इंग्लंडला स्वराज्याचे शिष्टाईकरतां जावयाचे आहेत. गेल्या आठवडयांत लो. टिळक यांचा सन्मान पुणें शहराकडून करण्यांत आला. महाराष्ट्राचें केंद्रस्थान पुणें शहर होय आणि त्या पदवीला साजेसाच सन्मान पुणें शहरानें लो. टिळक यांचा केला. रेमार्केटमध्यें भरलेल्या दहा बारा हजार लोकांच्या सभेंत स्वराज्याच्या कार्याविषयीं पुणेंकरांची आतुरता स्पष्ट दिसली; खंडवानी मॅन्शनमधील मेजवानीच्या वेळीं पुणें शहरची एकी व व्यापारी वर्गाचा उत्साह दृष्टीस पडला; आणि शनिवारीं रात्रीं निघालेल्या मिरवणुकीनें तर महाराष्ट्रांतील गेल्या दोन तीन महिन्यांतील समारंभांवर ताण केली. बायका–मुलें, हिंदु–मुसलमान, तरुण–वृद्ध, सर्व तऱ्हेच्या सर्व दर्जाच्या जनसमूहानें गायकवाडाचें वाडयापासून तों मोतीचौकापर्यंत, मिरवणुकीस प्रारंभ होण्यापूर्वीच, रस्ता इतका फुलून गेला होता कीं, गेल्या वीस पंचवीस वर्षांतील श्रीगजाननाच्या सर्व मिरवणुकींनीं आपलें पुण्य लो. टिळक यांच्या या मिरवणुकीत

* केसरी, ता. २६ मार्च १९१८

अर्पण केल्यासारखें वाटलें ! असला अपूर्व सन्मान ह्यापूर्वी गेल्या शंभर वर्षांत पुणें शहरानें दुसऱ्या कोणाचाहि केलेला नाहीं. गेले दोन तीन महिने सर्व महाराष्ट्रानें लो. टिळक यांचा सन्मान विलक्षण केला यांत शंका नाहीं. त्या सर्व सन्मानांच्या मंदिरावर पुणें शहरानें गेल्या आठवड्यांत कळस चढविला ! हा सन्मान गुजराथी–मारवाडी व्यापाऱ्यांनीं केला; हा सन्मान श्रीमंत–गरीब सर्व दुकानदारांनीं केला; हा सन्मान पुण्यांतील सर्व सुखवस्तु स्त्री–पुरुषांनीं केला; हा सन्मान पुण्यांतील हरएक मनुष्यानें केला. लो. टिळक पुण्यांत वाढलेले; त्यांच्या कामगिरीचें मुख्य स्थान पुणें शहर; लोकांत जागृति व्हावी म्हणून पुण्याचा प्रत्येक उंबरठा त्यांनीं झिजविलेला; तेव्हां केवळ त्यांच्या दर्शनाचे कुतुहलामुळें हा सन्मान झाला असें म्हणतां येत नाहीं महाराष्ट्राच्याच नव्हे तर हिंदुस्थानच्या इतिहासांत शें दोनशें वर्षांनीं होणारी फार मोठी गोष्ट घडून येत आहे व त्या कार्याचे सिद्धयर्थ हिंदुस्थानांतील जनसमूहानें करावयाच्या उद्योगांतील

स्वयंभू पुढारी

ह्या नात्यानें लो. टिळक विलायतेस जात आहेत, ह्या जाणिवीमुळेंच पुणें शहरानें एवढा अपूर्व सन्मान केला. परमेश्वरी सूत्रानें चार पांच वर्षांपूर्वीची सर्व जगाची स्थिति आज पालटून टाकिली आहे. चार पांच वर्षांपूर्वीचें इंग्लंड आज उरलेलें नाहीं. सभोंवारची स्थिति पालटलेली आहे आणि स्वराज्याचे दिवस जवळ येत चालले आहेत, हें लोकाच्या ध्यानीं आलेलें आहे. तेव्हां स्वराज्याच्या चळवळीकरतां विलायतेस जाणाऱ्या पुढाऱ्यांचा सन्मान करण्यास लोकांनीं उत्सुकता दाखविली, हें साहजिकच होय. हें कालमाहात्म्य तीनचार वर्षांपूर्वीच पुरें ओळखून, आपल्यांतील दुही मिटवून, होमरूलची चळवळ सुरू करून, काळाचे ओघाला हिंदुस्थानचे कार्याला जुंपण्याची तयारी ज्या पुढाऱ्यांनीं केली, त्यांच्या उद्योगाला दुजोरा न

देण्याइतका हतभागी हिंदुस्थान खास नाहीं, हे महाराष्ट्रानें लो. टिळक यांचा गौरव करून सिद्ध केलें अहे. लोकांच्या विश्वासाचें व मदतीचें आश्वासन अशा रीतीनें मिळवीत असतांना लो. टिळक यांनीं महाराष्ट्रांतील निरनिराळ्या व्याख्यानांत विलायतेंतील कार्याचें धोरण व्यक्त केलें. हें धोरण ऐकण्याची संधि ज्यांना मिळाली त्यांच्या मनांत कार्याच्या मोठेपणाविषयीं आतां कोणत्याहि प्रकारची शंका रहाणें शक्य नाहीं. हें शुभ कार्य आहे, आणि 'शुभस्य शीघ्रं' या न्यायानें हें कार्य लांबणीवर टाकणें उचित नव्हे. 'इंग्रजी साम्राज्यांतील सर्व देशांना स्वराज्य दिलेंच पाहिजे' या म्हणण्यास महायुद्धामुळें मूर्त स्वरूप प्राप्त झालें; स्वराज्य देण्याचा बादशाही हुकूम जाहीर झाला; व स्टेट सेक्रेटरींचा हिंदुस्थानांतील दौरा संपून स्वराज्याचा रिपोर्ट बाहेर पडण्याची वेळ येऊन ठेपली. अशा वेळीं ज्यांच्या हातीं स्वराज्याच्या स्वरूपाची

साम्राज्यांतील भागी

हिंदुस्थानास देण्याचें आहे, त्या इंग्लंडच्या लोकांतच आमच्या स्वराज्याची चळवळ करणें जरूर आहे. हिंदुस्थानाला स्वराज्य मिळण्याला इंग्लंडांतील लोकांच्या मनाची जी अनुकूल स्थिति पाहिजे ती आज उत्पन्न झाली आहे. गेल्या दोन महिन्यांत रशियाच्या तहानें युरोप खंडाची व आशिया खंडाची सर्व राजकीय स्थिति पालटून टाकली आहे. सर्व रशिया प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें पिळून टाकण्यास जर्मनीनें सुरवात केली आहे, आणि पश्चिम रणभूमींत जरी इंग्लंडचा जय झाला तरी जर्मनीच्या तोंडांतून रशिया बाहेर पडण्याची आतां फारशी आशा नाहीं. लढवय्यांच्या दृष्टीनें रशिया निदान दोनतीन पिढ्या नामशेषच रहाणार, आणि रशियाच्या लष्करी मृत्यूमुळें तितका काळ रशियाच्या महायुद्धांतील दोस्तांना लष्करी

दृष्ट्या सुतकांतच घालवावा लागणार, यांत संशय नाहीं. रशियाचें लष्कर पुन्हां जिवंत होईतों, म्हणजे आणखी दोन तीन पिढ्यांनीं हल्लींची स्थिति पालटून जाईतों, सांप्रतचें महायुद्ध संपल्यावरहि, अशुभाचें कालहरण करीत जर्मनीस डोईजड न होऊं देण्याच्या तरतुदींत नेहमीं चूर होऊन रहाणें इंग्लंडला भाग आहे. रशियाच्या लष्करी मृत्यूमुळें युरोप खंडावर व आशिया खंडावर ओढवलेलें संकट टाळण्यासाठीं सांप्रतचें महायुद्ध संपल्या-वरहि इंग्लंडला दोन चार पिढ्या लष्करी दृष्टीनें एकसारखी कंबर बांधून उभें रहावें लागेल. पूर्वी इंग्लंडनें कधींहि डोक्यावर घेतलेलें नाहीं, इंग्लंडनेंच काय पण दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रानें उचललेलें नाहीं, एवढें मोठें लष्करी ओझें इंग्लंडास महायुद्धानंतर उचलावयाचें आहे. नेपोलियनला हाणून पाडण्याचा उद्योग ज्या लष्करी तयारीपुढें निस्तेज ठरेल असला दीर्घोद्योग, स्वतःच्या मनगटाचे जोरावर करणें इंग्लंडला भाग आहे. रशिया मरण पावल्यामुळें अफगाणिस्तान–बलुचिस्तानपर्यंत जर्मनीचे हात पसरले आहेत, आणि टर्की जर्मनीनें बगलेंत मारलेला असल्यामुळें मुसलमानी हृदयांचींहि सूत्रें जर्मनीच्या हातीं गेलीं आहेत. महायुद्धानंतर जपानी मदतीवर अवलंबून राहून स्वस्थ बसणें योग्य होणार नाहीं. 'माझ्यावर पूर्ण विश्वास टाका व मला पाहिजे तें एकट्यानें करूं द्या' असें म्हणणारा भागीदार भागी मोडून एकटाच मालक होण्याच्या तयारीला लागला म्हणून समजावें. अमे-रिकेच्या धर्मार्थ खेळाची मदत आज होत आहेच–त्यामुळें महायुद्ध पार पडलें हें खरें; पण धर्मार्थ खेळांच्या मदतीवर कोणत्या संस्था चिरस्थायी झाल्या आहेत? अंतस्थ शक्तीचीच जुळवाजुळव नीट करावी लागते, तेव्हां कायमचें निभावतें. अमेरिका व जपान यांवर भार न टाकतां, व महायुद्धा-नंतर प्रसंगविशेषीं हल्लींप्रमाणें इटली व फ्रान्स ह्यांचीहि दोस्ती उपयोगी पडणार नाहीं हें ध्यानीं ठेवून, इंग्रजी साम्राज्याला स्वतःच्या पायावर उभें राहून रशिया गिळंकृत केल्यानें माजलेल्या टर्की–जर्मनांशीं झुंजण्याची

सतत तयारी ठेवणें भाग पडत आहे. आजच्या महायुद्धांत सर्व युरोपचा खिळखिळाट झाला आहे; कोणालाहि यश मिळो, दोनहि पक्ष निःसत्व झाले आहेत; मग रशियास खाऊन टाकण्यास मिळाल्यामुळें जर्मनी पुनः थोडया अवधींत धष्टपुष्ट झाला तर कसें ? इंग्रजी साम्राज्याला एक-दयालाच तसल्या जर्मनीशीं लढणें भाग पडेल. महायुद्ध सुरू असतांना व महायुद्ध संपल्यावरहि इंग्लंडची मुख्य करामत स्वतःजवळचें मनुष्यबळ उपयोगांत आणण्याच्या कौशल्यावर अवलंबून रहाणार, हें उघड आहे. इंग्रजी साम्राज्य आरमारी शक्तीवर इतके दिवस अवलंबून होतें; आतां आरमारी शक्ति पूर्वीच्याइतकी उपयोगाची नसून मनुष्यबल अधिक महत्त्वाचें झालें आहे. आरमारी शक्तीचे दिवस मागे पडले; मनुष्यबलाचा काळ सुरू झाला. यावेळीं साम्राज्याच्या सत्तेचा भाग कोणाला मिळेल ?

मनुष्यबलाचें भांडवल

या भागींत जो आणूं शकेल त्याला ही भागी कालमाहात्म्यामुळेंच मिळाली पाहिजे. हिंदुस्थानाइतकें मनुष्यबल इंग्रजी साम्राज्यांत दुसरीकडे कोठेंहि नाहीं. जपानच्या ऐवजीं जर हिंदुस्थानावर विश्वास टाकला, अमेरिकेकडे धर्मार्थ मदत मागण्याऐवजीं जर हिंदुस्थानाला स्वराज्याच्या हक्काचे उपयोगांत तरवेज करून सोडलें, तर पुढील महायुद्धांत जपान व अमेरिका यांच्या मदतीहून अधिक मदत हिंदुस्थानाकडून इंग्लंडास होणारी आहे. ह्या मदतीचें भांडवल बरोबर घेऊन लो. टिळक भागीचे करारमदार मुक्रर ठरविण्याकरितां विलायतेस जात आहेत. मनुष्यबलाचें भांडवल लष्करी दृष्टीनें आज मूर्तिमंत बनून इंग्रजी साम्राज्याचे उपयोगीं तें प्रत्यक्ष पडण्यास हिंदुस्थानांतील लोकसंख्येस स्वराज्याच्या यंत्रांतून घालून नीट व्यवस्थित करून बाहेर काढणें जरूर आहे. हिंदुस्थानांत तीस कोटी लोक आहेत. हा कच्चा माल नोकरशाहीच्या यंत्रांत घालून काढला असतां पांचसहा लाख शिपायांची मदत होऊं शकते असा अनुभव पटला आहे. स्वराज्याचे यंत्रांत

जर हा कच्चा माल घातला तर कोटयवधि लष्कराची मदत होऊं शकली पाहिजे असा युरोपचा सिद्धांत आहे. इंग्लंडला महायुद्धानंतरहि मनुष्यबलाची अत्यंत जरूरी लागणार ह्यांत संशय नाहीं. मग हिंदुस्थानाला स्वराज्य देण्याचा कायदा पास करा म्हणून इंग्लंडला सांगण्याची शिष्टाई तरी कशाला पाहिजे? जी गोष्ट साध्या वैराशिकानें सहज सिद्ध होणारी आहे, ती गोष्ट इंग्लंडला समजणार नाहीं व इंग्लंड करणार नाहीं असें कसें म्हणावें? आजची युरोपची व आशियाची परिस्थिति कोणालाहि सहज समजण्यासारखी आहे; मनुष्यबलाची योग्यता आज इंग्रजी मुत्सद्यांना जितकी समजते तितकी इतरांना समजणें शक्य नाहीं. स्वराज्य हा एकच इलाज मनुष्यबलास रणांगणावर मर्दुमकी गाजविण्यास लावणारा आहे, हें रशियाच्या अधःपातानें सिद्ध केलें आहे. रशियांत मनुष्यबल होतें, पण स्वराज्य नव्हतें; त्यामुळें झारसाहेबांची सत्ता चुटकीसरशी ढांसळून गेली. स्वराज्याशिवाय मनुष्यबल निरुपयोगी होतें, इतकेंच नव्हे तर स्वतःचा घ आपणावरोवर इतरांचाहि हें असलें मनुष्यबल नाश केव्हां करील त्याचा नेम नसतो, हें रशियाच्या लष्करी मृत्यूनें शाबीत केलें आहे. मनुष्यबल व स्वराज्य यांची सांगड जर हिंदुस्थानांत इंग्रजी मुत्सद्यांना घालतां आली नाहीं तर इंग्रजी साम्राज्याचें वैभव ओहोटीस लागल्यावांचून रहाणार नाहीं. ही पालटलेली स्थिति आतां इतकी व्यक्त झाली आहे कीं, विचारी मनुष्यास ह्या नव्या काळाचे विरुद्ध जातां येणें शक्य नाहीं. मग स्वराज्याच्या मार्गात अडथळा कोणता? जी गोष्ट इंग्रजांच्या व हिंदुस्थानच्या हिताची आहे ती लवकर घडून येण्याला इंग्लंडांत व हिंदुस्थानांत चळवळ कशाला? निश्चयाच्या उद्योगाची येथें जरूरी काय? परमेश्वरानें स्वराज्याचा काळ स्थापित केला; इंग्रजी मुत्सद्यांचें व हिंदी पुढाऱ्यांचें मनोगत एक करून स्वराज्याचा मार्ग देवानें दाखविला; ह्या गोष्टी खऱ्या आहेत. पण ह्या मार्गानें जाणाऱ्या इंग्रजांना व हिंदी लोकांना ठेंचा लागाव्या म्हणून रस्त्यांत

मोठमोठे दगड येऊन पडले आहेत. हे खडक लोभमूलक आहेत; ते मनुष्यानें उत्पन्न केलेले आहेत, व ते मनुष्यानींच फोडून काढले पाहिजेत. मनुष्यांच्या देहाचा व अंतःकरणाचा स्वभाव असा आहे कीं, कोणताहि अभ्यास फार दिवस झाला असतांना त्या अभ्यासासंबंधाच्या शारीरिक व मानसिक गांठी आपोआप उत्पन्न होतात. बुद्धीनें व परमेश्वरी प्रेरणेनें पूर्वीच्या अभ्यासांत फरक करण्याचें ठरविलें तरी ह्या गांठीं नेहमी आड येतात. हिंदुस्थानांत नोकरशाहीच्या जागीं स्वराज्य सुरू केलें पाहिजे असें परमेश्वरानें, इंग्रजी मुत्सद्यांनीं व हिंदी पुढाऱ्यांनीं ठरविलें तरी

नोकरशाहीच्या गांठी

इंग्लंडांत व हिंदुस्थानांत फोडून काढल्याखेरीज स्वराज्याची स्थापना होऊं शकणार नाहीं. नोकरशाहीवरच अवलंबून असणाऱ्या हजारों गांठी हिंदुस्थानच्या मर्मस्थानीं खिळून बसल्या आहेत व ह्या गांठी विलायतेस तर फारच जाचक झाल्या आहेत. नोकरशाहीचा हा घट्ट झालेला भाग हिंदुस्थानच्या कांहीं लोकांकडून 'स्वराज्य नको' असें येथें वदवीत आहे, तर इंग्लंडांतल्या लोकांना निराळ्याच भ्रमांत पाडीत आहे. हिंदुस्थानचें मनुष्यबल स्वराज्याच्या यंत्रांत घातलें तर लष्करी सामर्थ्य उत्पन्न न होतां उलट स्वराज्ययंत्रच या कच्च्या मालाच्या ओबडधोबडपणानें मोडून जाईल; मग आजचें पांच सहा लाख लष्करहि गेलें व पुढलें साठसत्तर लाखांचें लष्करही गेलें; तेव्हां हातचें सोडून पळत्याच्या मागें लागूं नका असें विलायतच्या लोकांना या गांठी सांगत आहेत. हिंदुस्थानांत ही गांठींची सांथ आतां कमी झाली आहे. लखनौच्या व कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभांनीं बऱ्याच गांठी फोडल्या आहेत. लो. टिळक यांच्या स्वराज्याच्या दौऱ्यानें व ठिकठिकाणच्या त्यांच्या सन्मानानें या गांठीं निस्तेज ठरल्या आहेत. सर्व हिंदुस्थानानें लो. टिळक यांना आतां असें आश्वासन दिलें आहे कीं, या गांठींमुळें हिंदुस्थानची प्रकृती बिघडण्याची आतां धास्ती उरलेली नाहीं;

पण विलायतच्या गांठी फोडावयाच्या राहिल्या आहेत, व त्या फुटल्यावर हिंदुस्थानांत गांठी दृष्टीसच पडणार नाहींत. विलायतच्या गांठी फोडल्या-शिवाय हिंदुस्थानांतील अवशिष्ट राहिलेल्या गांठी फोडण्याचे नादीं लागणें योग्य नाहीं. कारण आतां येथें शिल्लक राहिलेला विरोध हा विलायतच्या गांठीचा अवधाणा होय. विलायतचे अडथळे हिंदी पुढाऱ्यानांच दूर करावयाचे आहेत असें नाहीं, तर दूरदर्शी इंग्रजी मुत्सद्यांचेंहि तेंच काम आहे. परमेश्वरी नेमानेमानें या स्वराज्याच्या चळवळीसंबंधानें इंग्लंडचें व हिंदुस्थानचें हित एकमेकांत मिसळून गेलें आहे; तेव्हां ज्या पुढाऱ्यांवर सर्व हिंदुस्थानचा विश्वास आहे, सर्व हिंदुस्थानासंबंधानें कोणतीहि हमी देण्याइतक्या पाठबळाचें आश्वासन ज्या पुढाऱ्यांना ह्या शिष्टाईचे प्रसंगीं सर्वांनीं दिलें आहे, ते पुढारी विलायतेस गेल्यावर, हिंदुस्थानांतील नोकरशाहीच्या जुन्यापुराण्या पण अधिक टणक झालेल्या गांठी फोडतांना इंग्रजी मुत्सद्यांचें साहाय्य त्यांना मिळाल्यावांचून कसें राहील? नोकरशाहीच्या आवाळूंना संभाळून बाळगण्यापेक्षां विलायतच्या लोकांना इंग्रजी साम्राज्याच्या वचावाची व वैभवाची काळजी अधिक आहे; तेव्हां विलायतेसहि लो. टिळकांच्या विचारसरणीचा, स्वार्थत्यागाचा, व हिंदुस्थानच्या वतीनें बोलण्याच्या स्वयंभू हक्काचा योग्य परिणाम झालाच पाहिजे. हिंदुस्थानांतील लोकांचें आपणांस पूर्ण पाठबळ आहे, असें आश्वासन असल्या प्रसंगीं शिष्टाईस जाणाऱ्या पुढाऱ्यांना लागत असतें; व तें आश्वासन गेल्या दोन तीन महिन्यांतील ठिकठिकाणच्या समारंभांनीं पूर्णपणें दिलें आहे. ह्या आश्वासनामुळें विलायतेंतील सिडनहॅमी लोभाच्या गांठी फोडण्यास त्यांना विशेष उमेद आली आहे. परमेश्वरानें आतांपर्यंतच्या स्वराज्याच्या उद्योगांत जसें यश त्यांना दिलें तसेंच तेथें विलायतेंतील उद्योगांत परमेश्वरानें द्यावें, अशी आपल्या हजारों वाचकांच्या तर्फे 'केसरी'ची यावेळीं परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे!

* स्वराज्य-संघाची दुसरी परिषद

गेल्या बुधवारी रात्रीं मद्रास मेलनें मुंबईहून निघून लो. टिळक वगैरे मंडळी कोलंबोकडे रवाना झाली, त्यावेळीं मुंबई शहरानें केलेला त्यांचा सन्मान विशेष थाटाचा व मुंबईच्या स्वराज्यावरील प्रेमास साजेसाच झाला. मारवाडी व्यापाऱ्यांनीं पंधरा हजार रुपयांची मदत केली; कापडबाजारांतील सभेंत पंधरा हजारांची थैली नजर करण्यांत आली; डॉक्टरांनीं पांच हजार रुपये दिले; चायना बागेंत थाटाची मेजवानी झाली; स्त्रियांनीं गौरव केला; शांतारामाचे चाळींत जंगी जाहीर सभा भरली; व चाळीस गिरण्यांतील मजुरांनीं प्रत्येकीं एक आणा वर्गणी करून हजार रुपये लोकमान्यांना दिले. बुधवार सायंकाळची मिरवणूक उत्साहपूर्वक होती व मुंबईंतील सर्व दर्जाच्या व सर्व प्रकारच्या लोकांनीं लोकमान्यांचा निरोप अंतःकरणाच्या कळवळ्यानें घेतला. त्या तीन चार दिवसांत मुंबईस सकाळ संध्याकाळ एकसारखे समारंभ होत होते व त्यामुळें व्यवस्थापकांची विशेष तारांबळ झाली होती; तथापि मुंबईंतील निरनिराळ्या व्हॉलंटियर कोअरांनीं सर्व सभांतून व मिरवणुकीच्या वेळीं उत्तम रीतीनें काम केल्यामुळें सर्व समारंभ उत्तम रीतीनें पार पडले. मुंबईच्या ह्या समारंभांत मंगळवारीं रात्रीं फ्रेंच पुलाजवळील मंडपांत भरलेली स्वराज्यसंघाची दुसरी परिषद विशेष महत्त्वाची होय. विलायतेस जाणाऱ्या शिष्टाईच्या मंडळाला निरोप देण्याच्या दृष्टीनें, गेल्यासालचा आढावा ऐकून उत्साह वाढविण्याच्या दृष्टीनें, व पुढील कामाची दिशा आंखून त्याची तरतूद लावण्याच्या दृष्टीनें ह्या परिषदेचें अभिनंदन केल्याशिवाय कोणाहि स्वराज्यवाद्याला राहवणार नाहीं.

स्वराज्य संघाची पहिली परिषद दहा महिन्यांपूर्वी नाशकास भरली.

---

* केसरी, ता. २ एप्रिल १९१८

त्यावेळच्या स्थितींत व आजचे स्थितींत कितीतरी अंतर ! त्यावेळीं नाशिकच्या प्रांतिक सभेच्या मंडपांत परिषद भरते का पोलिसच्या हरकतीमुळें परिषद बंद ठेवावी लागते अशी चिंता होती. यंदा तशांतला कांहींच भाग दृष्टीस पडला नाहीं, इतकेच नव्हे तर असल्या परिषदेला हजर रहाण्यानें कोणाची कोणावर इतराजी होईल अशी शंकाहि कोणाच्या मनांत आली नाहीं. नाशिकच्या पहिल्या परिषदेचे दिवस फार मागें पडले व नव्या काळास आतां पूर्णपणें सुरवात झाली हें मुंबईच्या परिषदेनें सर्वांच्या नजरेस आणलें. भीतीचा लवलेश कोठेंहि नव्हता. उलट एक प्रकारच्या उत्साहानें व या कामी ' आम्ही यशस्वी होणार ' या भरंवशानें सर्व परिषद भारून गेली होती. गेल्या सालीं काळजी होती, यंदा उत्साह होता; गेल्या सालीं भर दोन प्रहरींहि पडद्याचे सावलींत बागुलबोवा आहेसें वाटलें, यंदा पहाटेंच्या शीतल समयीं उदयास येत चाललेल्या स्वराज्याचा उत्साहजनक उजेड दृष्टीस पडला ! दहाबारा महिन्यांत इतकें अंतर पडेल, असें पहिल्या परिषदेच्या वेळीं कोणाच्याहि स्वप्नीं आलें नव्हतें. पण कालचक्र गेल्या दहाबारा महिन्यांत फार झपाट्यानें फिरलें व पुढील दहा बारा महिन्यांत याहूनहि अधिक वेगानें तें फिरेल यांत संशय नाहीं. काळ बदलला ही गोष्ट तर खरीच; पण या बदललेल्या काळीं झोपीं न जातां योग्य रीतीनें लोकांस जागृत करण्याचा उद्योग स्वराज्य संघानें गेल्या सालीं केला ही गोष्ट तितकीच खरी आहे. गेल्या सालीं स्वराज्य-संघानें नेटानें उद्योग केला म्हणूनच संघाची दुसरी परिषद पहिल्या परिषदेहून निराळ्या स्वरूपाची झाली. पहिल्या सालीं स्वराज्य-संघाचे सभासद दहा बारा हजार होते, दुसऱ्या वर्षी ही संख्या तिपटीनें वाढली. नाशिकच्या परिषदेस शंभर रुपयें वर्गणी देणाऱ्या तहाहयात सभासदांचा वर्ग नवीन निर्माण करण्याचा नियम पास झाला आणि एका वर्षांत सहा सातशें तहाहयात सभा-

सद झाले. तहाहयात सभासद होऊन व डेप्युटेशनला मदत करून ठिक-ठिकाणच्या लोकांनीं स्वराज्यसंघाचा फंड इतका वाढविला कीं, गेल्या सालच्या खर्चवेंच भागून अडीच लाखांची शिल्लक सेक्रेटरीस दाखवितां आली. स्वराज्य-संघाच्या कामाचा रिपोर्ट इतका उत्साहजनक होण्यास ठिकठिकाणच्या सेक्रेटरींनीं व इतर सभासदांनीं गेल्या सालीं दाखविलेला उद्योगीपणा कारणीभूत झाला त्यांत संशय नाहीं. पण लो. टिळक यांचा निरलस उद्योग सर्व ठिकाणच्या उद्योगांना प्रेरित करणारा आत्मा ठरला. लो. टिळक यांच्या स्वराज्याचे दौऱ्याचा गेल्या सालीं अत्यंत उपयोग झाला. इतर प्रांतांत स्वराज्याची एवढी मोठी चळवळ गेल्या सालीं दृष्टीस पडली नाहीं व आपल्या प्रांतांत दृष्टीस पडली, या भेदाचें कारण तेथील लोक स्वराज्याविषयीं उत्सुक नाहींत हें नव्हे तर लो. टिळक यांच्याप्रमाणें सतत व चिकाटीनें उद्योग करणारा पुढारी इतरत्र नाहीं हें होय. येथील गेल्या सालची स्वराज्याची चळवळ व्यक्तिमाहात्म्याचें फळ होय. तेव्हां पुढील सालीं लो. टिळक शिष्टाईकरतां इंग्लंडांत असतांना येथील चळवळ थोडीबहुत मंदावेल कीं काय अशी भीति वाटणें साहजिक आहे. ही भीति स्वराज्य-संघाच्या मध्यवर्ती कमिटीलाहि वाटली व स्वराज्याचा हिंदुस्थानांतील उद्योग शिथिल न पडेल अशी सदर कमिटीनें व्यवस्थाहि केली. स्वराज्य-संघाचे अध्यक्ष बॅ. बॅप्टिस्टा हे सांप्रत विलायतेस आहेत व उपाध्यक्षांपैकीं लो. टिळक च ना. खापर्डे हे विलायतेस जाण्यास निघाले आहेत; त्यामुळें मूळच्या उपाध्यक्षांपैकीं ना. बेलवी तेवढे जाग्यावर शिल्लक राहिले. ना. बेलवी यांच्या बरोबरचे दोन उपाध्यक्ष विलायतेस जाणार तर पांच नवीन उपाध्यक्षांची जोड त्यांना देण्यांत आली आहे. मुंबईचे ना. मनमोनदास रामजी, बेळगांवचे रा. गंगाधरराव देशपांडे, वऱ्हाडचे रा. अणे, नागपूरचे डॉ. मुंजे व कलकत्त्याचे पंडित अंबिका प्रसाद वाजपेयी हे नवीन उपाध्यक्ष होत

स्वराज्य-संघाचे उत्साही व कर्ते जनरल सेक्रेटरी रा. पं. केळकर हेहि विलायतेस जात असल्यामुळें आणखी चार जॉइंट जनरल सेक्रेटरी नेमण्यांत आले. पुण्याचे रा. गोखले, मुंबईचे डॉ. साठये, उमरावतीचे रा. बाबासाहेब खापर्डे व नागपुरचे रा. वैद्य हे चार नवे जॉईंट जनरल सेक्रेटरी होत. नवे उपाध्यक्ष व नवे सेक्रेटरी हे सर्व उत्साही, निश्चयी व कार्यक्षम धुढारी आहेत. स्वराज्यावरील आपली निष्ठा त्यांनीं कृतीनें व्यक्त केली आहे. रा. गंगाधरराव देशपांडे हे पुढील सालीं पुण्यास राहून स्वराज्य-सेवा करणार असल्यामुळें कर्नाटक, महाराष्ट्र, मुंबई, वऱ्हाड, मध्यप्रांत वगैरे निरनिराळ्या विभागांना आपापला उपाध्यक्ष व जॉइंट जनरल सेक्रेटरी मिळाल्यासारखें झालें आहे. लो. टिळक ह्यांच्या गेल्या सालच्या उद्योगाचा संचार सर्वांच्या अंगीं आज झालेला आहे. तेव्हां या संचाराच्या जोरावर नव्या सालची स्वराज्याची चळवळ स्वराज्याचे नवे उपाध्यक्ष व जाइंट जनरल सेक्रेटरी नेटानें पुढें चालवतील, असा आमचा पूर्ण भरंवसा आहे.

मुंबईच्या परिषदेंत स्वराज्य-संघाच्या नव्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका झाल्या, इतकेंच नव्हे तर नव्या सालच्या कामाचीहि दिशा ठरविण्यांत आली. पहिल्या वर्षी सरकारी अधिकारी व स्वराज्यसंघ यांमध्यें तेढ उत्पन्न होते कीं काय, ही भीति होती. ती भीति दुसऱ्या वर्षी नष्ट झाली. स्वराज्य-संघाचें ध्येय इंग्रजी छत्राखालील स्वराज्य हें होय. इंग्रजी सत्तेचेंहि हेंच धोरण आहे अशी बादशाही हुकूमानें प्रसिद्ध झाल्यामुळें सदर तेढीच्या भीतीला थाराच शिल्लक राहिला नाहीं. ह्या स्वराज्याच्या ध्येयांतील पहिला हप्ता म्हणजे लखनौ-कलकत्ता काँग्रेसनें पास केलेला स्वराज्याचा ठराव होय. हीहि बाब स्वराज्य-संघानें पूर्णपणें मान्य केलेली असल्यामुळें स्वराज्य-संघानें गेल्या सालीं केलेली स्वराज्य-सेवा म्हणजे राष्ट्रीय सभेचीच

सेवा होय. स्वराज्य संघाचे सभासद म्हणजे राष्ट्रीय सभेचे असाधारण सेवक होत. राष्ट्रीय सभेसारख्या अवाढव्य सभेस वर्षभर एकसारखें बोलणें, हलणेंचालणें सोईचें होत नाहीं; तेव्हां स्वराज्य-संघासारख्या आटपशीर चलाख व कळकळीच्या संस्थांनीं राष्ट्रीय सभेची सेवा वर्षभर करीत राहिल्याशिवाय राष्ट्रीय सभा कधींहि यशस्वी होणार नाहीं. चुक्यांचें प्रायश्चित्त स्वतः भोगावयाचें, आणि उद्योगाचीं गोड फळें तेवढीं मालकाच्या पदरांत टाकावयाचीं, अशा धोरणानें काम करणाऱ्या एकनिष्ठ सेवकांची जरुरी राष्ट्रीय सभेस फार होती.गेलीं दोन वर्षें राष्ट्रीय सभेस असले नोकर स्वराज्य-संघानें लाभून दिल्यामुळें राष्ट्रीय सभेचें महत्त्व फार वाढलें आहे. ही राष्ट्रीय सभेची सेवा पुढील सालींहि पूर्वीच्याच निश्चयानें, निष्ठेनें व चिकाटीनें केली पाहिजे, असें मुंबईच्या परिषदेनें ठरविलें. स्टेट सेक्रेटरी मॉंटेग्यूसाहेब तयार करीत असलेल्या योजनेचें धोरण प्रसिद्ध झाल्याबरोबर राष्ट्रीय सभेस आपलें मत प्रदर्शित करावें लागेल. लखनौस जें मत प्रदर्शित झालें, कलकत्त्यास जें मत खुंटा हालवून घट्ट बसविल्याप्रमाणें ठाम करण्यांत आलें, तेंच मत तिसऱ्या उच्चाराचें वेळीं पूर्वीच्याच करारी बाण्यानें उच्चारलें जाण्यास हरकत पडूं नये अशा प्रकारची राष्ट्रीय सभेची सेवा पुढील तीन चार महिन्यांत सर्व स्वराज्यवाल्यांनीं केली पाहिजे, असें लो. टिळक यांनीं स्वराज्यसंघाला बजावून सांगितलें. लोकमान्यांच्या ह्या उपदेशाप्रमाणें राष्ट्रीय सभेची सेवा वरीलप्रमाणें करण्याचेंहि व्रत स्वराज्य-संघानें मोठ्या हौसेनें पत्करिलें ही संतोषाची गोष्ट होय.

राष्ट्रीय सभेनें स्वराज्याचा पहिला हप्ता म्हणून लखनौस जी मागणी केली व कलकत्त्यास जी मागणी ठरविण्यांत आली, ती मागणी पूर्णपणें पदरांत पडण्याचे दिवस आतां आले आहेत. यावेळीं लोभामळें किंवा

भीतीमुळें आम्ही आपला आंखलेला मार्ग सोडतां कामा नये. राजकारणांत तडजोड नेहमींच करावी लागते. राजकारण तडजोडीचीं वस्त्रें पांघरीत असतें; इतर वस्त्रप्रावरण त्याला माहीत नाहीं. वस्त्रासंबंधानें तडजोडीस हरकत नाहीं; पण शरीरासंबंधानें व आंतील आत्म्यासंबंधानें तडजोड यावेळीं उपयोगाची नाहीं. स्वराज्याचा आत्मा सर्व हिंदुस्थानांत खेळला पाहिजे, हें बादशहांनींच आतां ठरविलें आहे. हा आत्मा कोणत्या देहानें आज उद्यां प्रकट व्हावयाचा, हा मुख्य प्रश्न आहे. हा देहावरील वस्त्रालंकारांसंबंधानें, स्वराज्यसंघाचा व राष्ट्रीय सभेचा हट्ट नाहीं; पण देह मात्र राष्ट्रीय सभेनें चित्र काढल्याप्रमाणेंच असला पाहिजे. हातपाय तोडल्यामुळें लुला झालेला किंवा कान–डोळे फोडल्यामुळें आंधळा–बहिरा झालेला असतां कामा नये, असा राष्ट्रीय सभेचा हट्ट आहे. हा हट्ट सयुक्तिक आहे, सत्यास धरून आहे, व परमेश्वरी प्रेरणेनेंच उत्पन्न झालेला आहे, असें लोकमान्यांनीं मुंबईच्या परिषदेंत जाहीर केलें. लखनौ-कलकत्त्याचा ठराव अंमलांत येण्यास सांप्रतचा काळ पूर्णपणें अनुकूल आहे; ह्या ठरावाचें माप पुरतें घ्या, कमी घेऊं नका, अशी परमेश्वराची प्रेरणा आहे; तेव्हां ह्या वेळीं आलेली राष्ट्रीय सभेची खरी सेवा करण्याची संधी कोण व्यर्थ दवडणार? मनुष्यबलाच्या भांडवलाचे जोरावर इंग्रजी साम्राज्यांत राष्ट्रीय सभेनें ठरविलेल्या पुऱ्या मापाची भागी पदरीं पडण्याची वेळ आली आहे; ह्या वेळेसंबंधानें संशय घेऊन संदेहाचे स्वाधीन मन करून अर्ध्यावर संतुष्ट होणें म्हणजे परमेश्वराला धिक्कारणें होय. हिंदी राष्ट्रांत वरील प्रकारचा आत्मघातकी संदेह उत्पन्न करण्याचा प्रयत्न पुढील दोन चार महिन्यांत करण्यांत येईल, हें उघड आहे. अशा संदेहाच्या वेळीं लो. टिळक यांच्या सारख्या पुढाऱ्यांच्या अंतःकरणाच्या प्रवृत्तीच प्रमाणभूत मानल्या पाहिजेत. परमेश्वरी प्रेरणेचा ध्वनि इतरांच्या अंतःकरणांत स्पष्टपणें

ऐकूं येत नसतो. लो. टिळक यांच्या प्रमाणें एकनिष्ठेनें, पूर्ण स्वार्थत्यागानें, अनन्य भावानें देशसेवा करावी तेव्हांच परमेश्वरी प्रेरणेच्या व्यक्त ध्वनीचें आधारस्थान होण्याइतकें अंतःकरण निर्मल होतें. परमेश्वरानें सांप्रतचा अनुकूल काल आणिला आहे, आणि अनंत हस्तांनीं कमलावर देत असतांना आपले दोन हात पुढें न करतां एकच हात पुढें करणें म्हणजे परमेश्वरी कृपेस आपण पात्र नसून करंटे होण्यास लायक आहोंत असें कबूल करणें होय. हा करंटेपणा सोडून द्या, नेटाचा उद्योग करा, म्हणजे मंत्रिमंडळ राष्ट्रीय सभेचा ठराव पूर्णपणे अंमलांत आणण्याचा हुकूम करीलच करील, अशी परमेश्वरी प्रेरणा लोकमान्यांची वाणी स्वराज्य–संघाचे मंडपांत वदली आहे; आणि स्वराज्य–संघाच्या सर्व सभासदांनीं ह्या प्रेरणेवर भरंवसा ठेवून दृढ निश्चयानें स्वराज्याचा गाडा पुढें चालविण्याचें ठरविलें आहे. स्वराज्य संघाची मुंबईची परिषद परमेश्वरी प्रेरणेच्या निश्चयानें सुशोभित झाल्यामुळें गेल्या सालच्या रिपोर्टाचे दृष्टीनें, पुढील व्यवस्थेच्या दृष्टीने, व स्वराज्याच्या उद्योगाच्या धोरणाचें दृष्टीनें ती पूर्ण यशस्वी झाली, यांत नवल नाहीं.

---

* मुंबईची यशस्वी काँग्रेस

बॅरिस्टर हसन इमाम यांच्या अध्यक्षतेखालीं गेल्या गुरुवारपासून जादा काँग्रेसचें काम सुरू होऊन गुरुवार, शुक्रवार शनिवार व रविवार असे चार दिवस काम चालून सर्व प्रकारांनीं ही काँग्रेसची बैठक यशस्वी ठरली, हें कळविण्यास आम्हांस संतोष वाटतो. काँग्रेसचा मंडप विस्तीर्ण व भव्य होता; प्रतिनिधींची संख्या साडेचार हजारांजवळ होती; आणि उत्सुक प्रेक्षकांनीं चारहि दिवस तो मंडप गच्च भरून जात होता. मुंबईंतील प्रमुख श्रीमंत लोक सभेस हजर होते, आणि इतर राष्ट्रीय सभांहून अधिक मोठा असा स्त्रियांचा जमाव प्रत्येक दिवशीं दृष्टीस पडत असे. सामान्य उत्साह व बाह्य देखावा या दोनहि दृष्टींनीं मुंबईची जादा काँग्रेस लखनौ व कलकत्ता यांच्या तोडीची झाली यांत संशय नाहीं. सं. प्रांत, बिहार, बंगाल मद्रास, मध्यप्रांत, वऱ्हाड, महाराष्ट्र, गुजराथ, सिंध व पंजाब येथून भरपूर प्रतिनिधि आलेले होते; आणि सर्व पक्षांचे आणि सर्व मतांचे पुढारीहि सभेस हजर होते. सर वाच्छा व सुरेंद्र बाबू हे हजर नव्हते व त्यांची गैरहजेरी सर्वांस जाणवलीहि. नेमस्त पक्षाचे हे दोन प्रमुख पुढारी राष्ट्रीय सभेच्या मंडपांत जरी दृष्टीस पडले नाहींत तरी नेमस्त पक्षाचें मुख्य बळ सभेंत हजर होतें. नेमस्त पक्षापैकीं पंडित मदन मोहन, महमुदाबादचे राजेसाहेब, ना. ललुभाई सामळदास, सर दिनशा पेटिट, ना. चुनीलाल मेथा, मि. सुब्बाराव, दि. ब. गोविंदराव अय्यर, ना. कामत, रा. हरिभाऊ आपटे वगैरे प्रमुख मंडळी हजर होती. डॉ. रासबिहारी घोष व डॉ. सुब्रह्मण्य अय्यर यांच्याकडून सहानुभूतिपर तारा आल्या होत्या. इतर सर्व पक्षांचे प्रमुख पुढारी हजर होते हे सांगावयास नकोच. जादा काँग्रेसच्या

केसरी, ता. ३ सप्टेंबर १९१८

चक्त्यांत नेमस्त पुढाऱ्यांनीं प्रमुख भाग उचललेला होता. निरनिराळ्या ठरावांवरील भाषणांत नेमस्त पक्ष अग्रेसर होता; इतकेंच नव्हे तर सब्जेक्टस् कमिटींतील वादविवादांतहि पं. मदन मोहन मालवीय यांच्या नेतृत्वाखालीं या पक्षानें राष्ट्रीय सभेच्या ठरावांना योग्य वळण देण्याचें काम स्वतःचें शिरावर घेण्यास बिलकूल कसूर केली नाहीं. माँटेग्यू-चेम्सफर्ड यांच्या योजनेसंबधानें नाना प्रकारचीं मतें आज हिंदुस्थानभर चोहोंकडे खेळत अहित. ही सर्व मतें केंद्रस्थानीं आणून राष्ट्राचें मत म्हणून त्या मतांची एक गांठ बनविणें हें राष्ट्रीय सभेचें मुख्य काम आहे. अशा प्रकारच्या भिन्न भिन्न

मतांची गांठ

मुंबईच्या जादा काँग्रेसनें बांधली आणि पुढील कांहीं वर्षांच्या राजकीय चळवळीला मुंबईची जादा काँग्रेस आदर्शाप्रमाणें झाली, याबद्दल मुंबईस जमलेल्या प्रतिनिधींचें व निरनिराळ्या पक्षांच्या पुढाऱ्यांचें जितकें अभिनंदन करावें तितकें थोडेंच होणार आहे. मुंबईच्या जादा काँग्रेसच्या कामाला बुधवारींच सुरवात व्हावयाची होती. पण मंगळवारीं भरलेल्या आँ. इं. काँग्रेस कमिटीमध्यें पं. मदन मोहन मालवीय यांनीं बाहेर राहिलेल्या नेमस्तांना आंत आणण्यास एक दिवसाची फुरसत मागितली म्हणून सभेचें काम गुरुवारपर्यंत तहकूब ठेवण्यांत आलें. सर वाच्छा यांच्याकडे पंडितजी तडजोडीस गेले असतांना पंडितजींच्या असें अनुभवास आलें कीं, सर चाच्छा यांच्या पक्षाची मनधरणी करण्याचा हिय्या केला ही त्यांच्या आयुष्यांतील त्यांनीं सर्वांत मोठी चूक केली. पं. मदन मोहन यांच्या चुकीमुळें हजारों लोकांना मोठी गैरसोय सोसावी लागली, आणि व्यवस्थापकांची तर तारांबळ उडाली. सर्वांनीं ही गैरसोय मोठ्या आनंदानें सोसली आणि पंडितजींची चूक जरी गैरसोईची झाली. तरी त्यामुळें अखेरीस मुसलमान,

हिंदु, नेमस्त व राष्ट्रीय या चारीहि दोन्यांचा गोफ अधिक घट्ट मुंबईस गुंफला गेला. सर वाच्छा व सुरेंद्रबाबू हे नेमस्तपक्षाचे कित्येक वर्षांचे नामांकित पुढारी असल्यामुळें मुंबईस जरी नेमस्त पक्षाचा मुख्य भाग हजर होता, तरी स्वतःच्या कृतीबद्दल पं. मदन मोहन मालवीय व इतर नेमस्त पुढारी अंशतः साशंक होते. एक दिवसाच्या तडजोडीच्या खटपटीनें त्यांचीं मनें निःशंक झालीं; आपली कोठेंहि चूक झाली नाहीं, तर उलट सर वाच्छा हेच हट्टी आहेत अशी खूणगांठ त्यांची त्यांनाच पटली; आणि स्वच्छ बुद्धीनें व मोकळ्या मनानें पवित्र म्हणून राष्ट्रीय सभेच्या कामाचा बोजा शिरावर घेण्यास ते उद्युक्त झाले. राष्ट्रीय सभेच्या मंडपांत हजर राहिलेल्या नेमस्त पक्षाची ही दिलसफाई पुढील कार्यास फार उपयोगी पडली. अशा दृष्टीनें विचार केला असतां बुधवारचा दिवस फुकट गेला नाहीं, तर उलट कामींच लागला असें म्हणावें लागतें. माँटेग्यु–चेम्सफर्ड यांच्या योजनेसंबंधाच्या भिन्नभिन्न मतांची गांठ बनविण्याचें काम लो. टिळक यांनीं आपल्या भाषणांत म्हटल्याप्रमाणें भोपळे व ऊंस यांचा भारा बांधण्याइतकें अवघड होतें. सभेंत हजर राहिलेल्या भिन्नभिन्न मतांच्या लोकांत एकमेकांविषयीं आदर, पूज्यभाव व प्रेमभाव नसता तर मुंबईच्या जादा काँग्रेसमध्यें संमिश्र पक्षाची जोरकस गांठ बनलीच नसती. मंगळवार व बुधवार हे दोन दिवस दिलसफाईच्या कामांत गेल्यावर सर्व पुढाऱ्यांचे दृष्टिकोन एकतऱ्हेचे झाले; आणि त्यामुळें एकीच्या आनंदानें व उत्साहानें गुरुवारीं कामास सुरवात झाली. राष्ट्रीय सभेच्या सुदैवानें यंदा राष्ट्रीय समेला बुद्धिमत्तेनें, तेजस्वीपणानें व सौजन्यानें लायक असेच अध्यक्ष मिळाले. बॅ. हसन हे दिसण्यांत ज्याप्रमाणें शांत व प्रसन्न आहेत त्याप्रमाणें विचारांत व आचारांतहि स्वच्छ व गंभीर आहेत. मोठ्या गंभीर आवाजानें

से आपलें भाषण वाचीत असतांना सांप्रतच्या आणीबाणीच्या प्रसंगांतून राष्ट्रीय सभेस पार पाडून नेण्यास समर्थ असलेलाच अध्यक्ष आपणांस मिळाला असें सर्वांना वाटलें; आणि शेवटच्या बैठकीच्या अखेरीस कृतकार्य होऊन 'वंदे मातरम्' म्हणून त्यांनीं जेव्हां सर्वांस विनयानें नमस्कार केला त्यावेळीं सर्व राष्ट्रीय सभेला कृतार्थ झाल्याचा आनंद अनुभवण्यास मिळाला. अध्यक्षांचें भाषणांत सांप्रतच्या प्रसंगाचें वर्णन स्पष्टपणें केलें असून मॉंटेग्यु–चेम्सफर्ड यांच्या योजनेंतील सर्व दोष खुलासेवार दाखविले आहेत. रिसेप्शन–कमिटीचे चेअरमन ना. पटेल व अध्यक्ष बॅरिस्टर हसन इमाम या दोघांचींहि भाषणें राष्ट्रीय सभेच्या परंपरेस साजेशीं झालीं, इतकेंच नव्हे तर नवीन दिशा समजून घेण्यास पुरेशींहि झालीं. मंगळवार व बुधवार हे दोन दिवस अनुकूल परिस्थिति उत्पन्न करण्यांत गेले आणि गुरुवारीं स्वागत कमिटीचे चेअरमन व राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष या दोघांनीं आपल्या भाषणांनीं राष्ट्रीय सभेच्या कामास फार चांगला प्रारंभ करून दिला. मॉस्लेम लीगच्या रिसेप्शन कमिटीचें चेअरमन सर फाझलभाई करीमभाई व लीगचे अध्यक्ष महमुदाबादचे राजेसाहेब यांचीं भाषणें राष्ट्रीय सभेच्या कामास उचलून धरणारींच झालीं. यंदा लीग व कॉंग्रेस हें दोनहि प्रवाह पूर्णपणें एकमेकांत मिसळून वहात होते. सभा भरण्याच्या जागा भिन्नभिन्न होत्या खऱ्या; पण मन व बुद्धी हीं एकच होतीं. कॉंग्रेसला मॉस्लेम लीगचे पुरस्कर्ते हजर होते आणि लीगच्या बैठकींना राष्ट्रीय सभेचे पुढारी हजर होते. लीग व कॉंग्रेस यांमधील भिन्नभाव यंदां पूर्णपणें नाहींसा झाला. कारण कॉंग्रेसच्या सब्जेक्टस् कमिटीच्या वेळीं लीगच्या कमिटीचे लोक हजर राहून वादविवादांत त्यांनीं पडण्यास हरकत नसावी, अशी परवानगी अध्यक्ष हसन इमाम यांनीं पहिल्या दिवसाच्या अखेरीस

राष्ट्रीय सभेमधून मागितली आणि राष्ट्रीय सभेनेंहि टाळ्यांच्या गजरांत ती दिली! गुरुवार रात्रीपासून सब्जेक्टस् कमिटींत हिंदू व मुसलमान या दोघांतीलहि नेमस्त व राष्ट्रीय पुढारी विचार करूं लागले आणि तीन दिवसांच्या विचारानंतर मॉंटेग्यु-चेम्सफर्ड यांच्या योजनेसंबंधानें राष्ट्रीय सभेचें मत मुक्रर ठरून रविवारीं सकाळीं आठ वाजतां सुरूं झालेल्या बैठकींत पं. मदनमोहन मालवीय यांनींच स्वराज्याच्या योजनेसंबंधाचा ठराव सभेपुढें मांडला. मुंबईच्या जादा कॉंग्रेसचें मुख्य काम या ठरावांतच आहे. लखनौ येथें आमच्या स्वराज्याचा मसुदा तयार झाला, कलकत्त्यास तो मसुदा तावून सुलाखून पक्का ठरला. मॉंटेग्यू चेम्सफर्ड या जोडीनें तो मसुदा नाकारल्यामुळें मुंबईच्या जादा कॉंग्रेसवर मोठी जोखीम येऊन पडली. मॉंटेग्यूसाहेबांनीं जबाबदार राज्यपद्धतीचा रस्ता आंखला आणि आपले रेलहि टाकले. हे रेल उचलून काढून स्वतःच्या रस्त्यावर आणून टाकावयाचें कीं आपले डबे त्या रेलवर नेऊन उभे करावयाचे असा प्रश्न राष्ट्रापुढें येऊन पडला. कोणी म्हणत, आपलें डबेहि नकोत, मॉंटेग्यूसाहेब बसवतील त्या वडारी गाडींत बसूं या. कोणी म्हणत मॉंटेग्यूंचा रस्ता नको; रस्ताहि आमचा आणि डबेहि आमचे, असाच हट्ट धरूं या. अशा प्रकारचा तंटा पडल्यामुळें आपापसांतील या भांडणांत राष्ट्रीय सभेनें तटजोडीच्या कुशलतेनें आणि राष्ट्रकार्याच्या दूरदृष्टीनें मॉंटेग्यूसाहेबांच्या योजनेच्या पायावरच आणि चौकटीच्या आंतच आपली स्वराज्याची इमारत उभारण्याचें ठरविल्यामुळें सर्व संकटांतून राष्ट्रीय सभा पार पडली, इतकेंच नव्हे, पूर्वीहून राष्ट्रीय सभा अधिक सबल झाली. मॉंटेग्यू–चेम्सफर्ड यांच्या योजनेंत हिंदुस्थान देश स्वराज्यास अद्याप लायक नाहीं असें म्हटलें आहे. या मताचा मुंबईच्या जादा कॉंग्रेसनें पूर्ण निषेध केला

आहे, आणि हिंदी राष्ट्र आज स्वराज्यास लायक आहे असें जाहीर केलें आहे. ग्रामपंचायती, म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्ड येथें स्वातंत्र्य, प्रांतिक सरकारांत अंशभाग व मध्यवर्ती सरकारांत सध्यां कांहीं नाहीं, अशा तऱ्हेची माँटेग्यूची योजना त्रिधारी आहे. खालः पासून वरपर्यंत चोहींकडे स्वराज्याला आजच प्रारंभ झाला पाहिजे आणि पंधरा वर्षांच्या आंत पूर्ण स्वराज्य मिळालें पाहिजे, असा ठराव राष्ट्रीय सभेनें पास करून माँटेग्यूसाहेबांचे रेलवरील डबे कुचकामाचें ठरविलें. माँटेग्यूसाहेबांची व्यवस्था अव्यवस्थित आहे असें ठरवितांना प्रजाजनांच्या जन्मसिद्ध हक्कांचा उच्चारहि स्वराज्याच्या बिलांतच झाला पाहिजे, असें राष्ट्रीय सभेनें जाहीर केलें. शरीराचें व मालमत्तेचें संरक्षण व संगोपन निर्विघ्नपणें करण्याचा हक्क प्रजाजनांना असून व्यक्तीव्यक्तींचें निरनिराळें संघ बनविणें व तसें करतांना सभांचा, व्याख्यानांचा व छापखान्यांचा उपयोग निर्विघ्नपणें करण्याचा हक्कहि प्रजाजनांना आहे. व्यक्ति, मालमत्ता आणि छापखान्यांसारखी उन्नतीची साधनें यांना सामान्य कायद्याहून निराळ्या व मुद्दाम केलेल्या दडपशाहीच्या कायद्याचे अडथळे असतां कामा नयेत. हें शरीरस्वातंत्र्य, हें द्रव्यस्वातंत्र्य आणि हें बुद्धिस्वातंत्र्य स्वराज्याच्या बिलांत जाहीर करा, अशी मुंबईच्या जादा काँग्रेसनें जोराची मागणी केली. या जन्मसिद्ध हक्कांच्या उच्चाराबरोबरच व कबुलीबरोबरच हिंदुस्थानांतून बाहेर जाणाऱ्या व आंत येणाऱ्या मालावर योग्य ती जकात ठेऊन सर्व राष्ट्राच्या संपत्तीचें संगोपन व संवर्धक करण्याचा हक्क हिंदुस्थानास मिळाला पाहिजे असा ठराव सभेंत पास झाला. स्वराज्यास आम्ही लायक आहों; दिल्ली दूर न मानतां दिल्लीसच स्वराज्यास प्रारंभ झाला पाहिजे; स्वतःचा व राष्ट्राचा बचाव करण्याचे जन्मसिद्ध हक्क आम्हांस मिळाले पाहिजेत; असें मुंबईच्या जादा काँग्रेसनें प्रारंभीच्या तीन ठरावांत

स्पष्टपणें जाहीर केलें. सभोंवारची परिस्थिति निर्बल करण्याचें हें काम संपल्यानंतर मॉंटेग्यू चेम्सफर्ड साहेबांच्या योजनेंतील पायावरच

स्वराज्याचें नवें मंदीर

उभारण्यास राष्ट्रीय सभेनें सुरवात केली. हा योजनेसंबंधाचा ठराव मुख्य होय आणि इतर ठराव सभोंवारची भूमि स्वच्छ करण्याकरितां व आजूबाजूचीं विघ्नें टाळण्याकरितां केलेले आहेत. मॉंटेग्यूसाहेब व चेम्सफर्डसाहेब यांनीं जबाबदार राज्यपद्धतीसंबंधानें मनःपूर्वक केलेलां प्रयत्न आमच्या लक्षांत उतरला असून हेतूंच्या स्थितीहून कांहीं ठिकाणीं पुढें पाऊल पडत आहे; तथापि ही योजना निराशाजनक व असमाधानकारक असून राष्ट्रीय सभेनें सुचविलेले महत्वाचें फेरफार या योजनेंत केल्याशिवाय स्वराज्याची पहिली भक्कम पायरी असें त्या योजनेस कोणींहि म्हणणार नाहीं. राष्ट्रीय सभेनें जें संमिश्र पक्षाचें म्हणून मत योजनेसंबंधानें दिलें तें वरील प्रकारचें होय. हें सर्व हिंदी राष्ट्राला पसंत पडेल यांत मुळींच शंका नाहीं. मॉंटेग्यू-चेम्सफर्ड स्कीमच्या योगानें हिंदी राष्ट्रांत नुसतें उजाडलें आहे हें या ठरावाच्या प्रारंभीं कबूल केलें आहे. उजेड दिसूं लागला खरा, पण सर्व जीवन वाढीस लावणाऱ्या सूर्याचे किरण दिसूं लागल्याशिवाय राष्ट्राच्या जीवनक्रमास केव्हांहि प्रारंभ व्हावयाचा नाहीं. हे किरण कोणते, ते कोणत्या ठिकाणीं कसे पडले पाहिजेत, याची खुलासेवार याद राष्ट्रीय सभेच्या या ठरावाला जोडलेली आहे. प्रांतिक सरकारांत ज्याप्रमाणें राखून ठेवलेलीं खातीं व दिलेली खातीं असे विभाग केलेले आहेत तसे विभाग हिंदुस्थान सरकारांतहि झाले पाहिजेत, म्हणजे स्वराज्यास प्रारंभ दिल्लीसच झाला पाहिजे, असा महत्त्वाचा फेरफार प्रथमदर्शनीं सुचविण्यांत आला आहे. उगीच निष्कारण घासाघीस होऊन बिल पास होणें लांबणीवर पडूं नये

म्हणून प्रांतिक सरकारकडे पोलिस व न्यायखातें हीं सहा वर्षेंपर्यंत ठेवण्यांत आलीं असून बाकींची सर्व खातीं या योजनेंत लोकनियुक्त कायदे-कौन्सिलाच्या हवालीं करण्यांत आलीं आहेत. प्रांतिक कायदे कौन्सिलच्या उरावर बसविलेली ग्रँड कमिटी, वरिष्ठ कायदे कौन्सिलाच्या मानगुटीवर बसलेलें स्टेट कौन्सिल हीं काढून टाका; निदान तेथें लोकनियुक्त सभासद अर्धे तरी ठेवा; आणि गव्हर्नरांना व लाटसाहेबांना दिलेली सर्टिफिकिटाची व खर्च-वेंचाची नवी शक्ती काढून टाकून तिजोरी कायदे–कौन्सिलच्या हवाली करा; असें राष्ट्रीय सभेचें म्हणणें आहे. लष्कर, आरमार, परराष्ट्रीय संबंध, पोलिस, कायदेकानू व न्यायखातें ह्यांच्या संबंधाचे खर्च भागवितांना जर पैशांची टंचाई पडली तर एक वर्षापुरतें रेग्युलेशन काढून आपल्या तांतडीच्या गरजा भागवून घ्याव्यात, व इतर प्रसंगीं कायदे-कौन्सिलच्या मार्फतच खर्चवेचाची व्यवस्था लावून घ्यावी, असलें धोरण मुंबईच्या जादा काँग्रेसनें आंखलेलें आहे. अडचणीच्या व तांतडीच्या वेळीं सरकारनें काय करावें हा प्रश्न या धोरणामुळें सुटतो आणि स्वराज्याच्या हक्काभोंवतीं घातलेल्या तुरुंगाच्या भिंतीहि उलथून पडतात. पोलिस व न्यायखातें खेरीज-करून प्रांतिक सरकारचीं सर्व खातीं आज द्या, वरिष्ठ सरकारच्या खात्यांत वांटणी करून पंधरा वर्षांत पूर्ण स्वराज्य द्या, सरकारी खात्यांना लागावयाच्या खर्चवेंचाची अडचण पडूं न देतां त्या खर्चवेंचाच्या नांवानें स्वराज्याच्या हक्काच्या पायांत शृंखला घालूं नका, असलें थोडक्यांत राष्ट्रीय सभेच्या नव्या मंदिराचें स्वरूप आहे. हें नवें मंदिर उभारतांना लखनौच्या मंदिरांतील मुख्य मुख्य दिवाणखाने माँटेग्युसाहेबांच्या योजनेच्या पायावर मुंबईच्या जादा काँग्रेसनें आणून ठेवलेले आहेत. अशी तडजोड झाल्यानें नेमस्तांचीहि तक्रार राहिलेली नाहीं आणि राष्ट्रीयांचेंहि समाधान झालें

अहे. मुंबईच्या जादा काँग्रेसचें यश यांतच आहे. मुसलमान व हिंदु, राष्ट्रीय व नेमस्त, पुढारी व अनुयायी या सर्वांचा एकोपा मुंबईस पूर्णपणें झाला; आणि सर्वांनाच यश मिळालें! या यशाचे मुख्य वांटेकरी अध्यक्ष हसन इमाम हे तर आहेतच; पण त्यांच्या बरोबरच मॉस्लेम लीगचे पुढारी आणि सब्जेक्टस् कमिटीतील निरनिराळ्या मतांचें पुरस्कर्ते यांच्याहि पदरांत हें यश टाकणें जरूर आहे. त्याचप्रमाणें रिसेप्शन कमिटीचे चेअरमन ना. पटेल, जादा काँग्रेसचे सेक्रेटरी डॉ. साठे, बॅ. जयकर वगैरे मंडळी, जादा काँग्रेसची तयारी करणाऱ्या व व्यवस्था ठेवणाऱ्या निरनिराळ्या पोटकमिट्या आणि पांच सहा दिवस सभेचें काम लांबलें तरी हौसेनें सेवा करणारे स्वयंसेवक हे सर्व ह्या यशाचे भागीदार असून मुंबई शहराची या जादा काँग्रेसच्या संबंधानें करावी तेवढी प्रशंसा थोडीच होणार आहे. अध्यक्ष साहेबांनीं शेवटीं म्हटल्याप्रमाणें मुंबई शहर इमारतींच्या भव्यपणांत व बाहेरच्या देखाव्यांतच सुंदर नसून अंतःकरणानेंहि सुंदर आहे, ह्या प्रशंसेस मुंबईचें राष्ट्रभक्त ह्यावेळीं पूर्णपणें लायक ठरले यांत संशय नाहीं.

---

* दिल्लीची राष्ट्रीय सभा

गुरुवार ता. २६ डिसेंबरपासून दिल्ली येथें सुरू झालेली राष्ट्रीय सभा मंगळवार ता. ३१ डिसेंबर रोजीं समाप्त झाली. राष्ट्रीय सभेच्या स्वागत मंडळाचे चेअरमन हकीम अजमलखान आणि राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष पं. मदन मोहन मालवीय यांचीं भाषणें विचारपूर्ण झालीं. दोघांनींहि आपलीं भाषणें इंग्रजींत लिहिलेलीं होती, तथापि हकीम अजमलखान यांचें भाषण देशी भाषेंतच वाचून दाखविण्यांत आलें. पं मदन मोहन मालवीय यांनीं आपल्या भाषणाचा मुख्य भाग इंग्रजींत लिहून आणलेला होता व तो इंग्रजींतच वाचून दाखविला. तथापि भाषणाच्या प्रारंभीं व शेवटीं त्यांनीं हिंदी भाषेंत अर्धा अर्धा तास आपले विचार बोलून दाखविले. इंग्रजींत यंदां भाषणें फार कमी झालीं. ऊर्दू आणि हिंदी भाषेंतून काँग्रेसचें बरेसचें काम या वर्षी चाललें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. संयुक्त प्रांतांतून काँग्रेसकरतां सात आठशें शेतकरी वर्गांतले प्रतिनिधि यंदा आलेले होते; आणि प्रेक्षकांतहि काँग्रेसला नेहमीं न येणाऱ्या वर्गांतील लोक बरेच दिसत होते. यामुळें देशी भाषांना काँग्रेसच्या मंडपांत यंदा विशेष महत्त्व प्राप्त झालें होतें. कोणताहि वक्ता बोलण्यास उभा राहिला असतां प्रथम 'हिंदी' असा आवाज सर्व मंडपभर उत्पन्न होत असे आणि वक्ता मुंबई मद्रास किंवा बंगाल या बाजूचा असून त्याला हिंदी येत नाहीं असें समजल्यावरच इंग्रजींत भाषण करण्याची परवानगी प्रतिनिधींकडून त्याला मिळे. देशी भाषा, देशी रिवाज, देशी विचार या सर्वांकडे यंदा काँग्रेसचें लक्ष अधिक वेधलेलें दिसत होतें. काँग्रेसचा मंडपहि एका दृष्टीनें देशी थाटाचा

---

* केसरी ता. ७ जानेवारी १९१९

होता. दहा पंधरा हजार लोक बसतील इतका विस्तीर्ण मंडप आंतून देशी तऱ्हेनें शृंगारलेला होता, आणि दिल्लींतील प्राचीन इमारतींचें अनुकरण करण्याकरतां मंडपाच्या साध्या छपराच्या मध्यभागीं एक मोठा घुमट बसविलेला होता. लखनौ किंवा कलकत्ता या दोनहि ठिकाणच्या मंडपांहून दिल्लीचा मंडप अधिक विस्तीर्ण होता. लखनौचा मंडप सुंदर असून विशेष नटविलेला होता; कलकत्त्याचा अगदीं साधा होता; दिल्लीचा बाहेरून साधा, आंतून शृंगारलेला आणि बारा हजार लोक बसतील एवढा मोठा, पण खांबांची गर्दी विशेष झाल्यामुळें थोडासा गैरसोईचा झालेला होता. मंडप एवढा मोठा होता तरी शेवटच्या दिवसाशिवायकरून बाकी सर्व दिवस अगदीं गच्च भरून जात असे. सुमारें सहा हजार प्रतिनिधी आणि तितकेच प्रेक्षक यांची गर्दी मंडपांत सर्व काळीं सारखीच होती. इतका अपूर्व उत्साह लखनौस किंवा कलकत्त्यास दिसला नाहीं. सं. प्रांत किंवा पंजाब येथें काँग्रेसविषयीं भक्ति विशेष नाहीं, असा आक्षेप काँग्रेसवर आजपर्यंत लादण्यांत येत होता. पण या आक्षेपाला दिल्लीच्या काँग्रेसनें हरताळ फांसला. यंदा पंजाबचे प्रतिनिधी हजारावर होते आणि दिल्ली प्रांतांतल्या लोकांनीं तर काँग्रेससंबंधानें सर्वांवर ताण करावयाची असाच निश्चय केलेला दिसत होता. काँग्रेसच्या मंडपांत नेहमीं दृष्टीस पडणारा १०–१२ हजार लोकांचा तो विस्तीर्ण जमाव स्वराज्याच्या आशेनें इतका भरलेला दिसत होता कीं, राजकीय बाबीविषयीं पंजाब, दिल्ली व संयुक्त प्रांत येथील लोकांची अनास्था आहे असें यापुढें कोणासहि म्हणतां येणार नाहीं. सर्व जमाव काँग्रेसच्या चर्चेंत मोठया आस्थेनें व कळकळीनें मन घालीत होता. ज्या योगानें पूर्ण स्वराज्यचे हक्क लांबणीवर पडतील असल्या कोणत्याहि विचारास या मोठया जमावाच्या विचारसरणींत स्थळच मिळत नव्हतें. स्वराज्याचे दिवस जवळ आले आहेत आणि हिंदुमुसलमानांनीं एकजुटीनें

व निश्चयानें जर उद्योग केला तर फलप्राप्ती झालीच पाहिजे, अशा तऱ्हेचा उत्साह मंडपांतील समाजांत पसरलेला होता. या उत्साहामुळें काँग्रेसचें काम सर्व दृष्टींनीं यशस्वी झालें. ज्या उत्साहानें लोक मंडपांत आले तोच उत्साह वक्त्यांनीं वृद्धिंगत केला, आणि काँग्रेसच्या ठरावांनीं त्याच उत्साहाचें दृढीकरण करण्यांत आलें. मॉंटेग्यू–चेम्सफर्ड यांच्या योजनेसंबंधानें लोकमत प्रदर्शित करण्याचें काम दिल्लीच्या काँग्रेसच्या हातून चांगल्या रीतीनें पार पडलें हें तर खरेंच; पण त्याहूनहि अधिक महत्त्वाची कामगिरी म्हणजे पंजाब, दिल्ली व सं. प्रांत हा भाग दिल्लीच्या काँग्रेसनें हलवून सोडला. दिल्लीच्या सत्तेंत भागी न देण्याचा संकल्प नोकरशाहीनें केलेला असतांना काँग्रेसची राजकीय चळवळ इतक्या जोराची होईल, असें पुष्कळांना वाटलें नव्हतें. पण तो अंदाज चुकीचा ठरला ही संतोषाची गोष्ट होय. नुसती मुंबई जागी होऊन काय उपयोगाची, दिल्ली जागी झालीच पाहिजे, असे उद्गार कांहींनीं मुंबईच्या जादा काँग्रेसमध्यें काढले होते; पण दिल्लीच्या काँग्रेसनें आतां

दिल्ली जागी झाली

असेंच सर्वांना म्हणावें लागेल. दिल्लीच्या लोकांच्या मनांत अध्यक्ष पं. मदन मोहन मालवीय यांची मोठी मिरवणूक काढावयाची होती. पण या मिरवणुकीस पोलिसनें खो घातल्यामुळें लोकांचीं मनें खट्टू झालीं.या खट्टूपणामुळें उत्पन्न झालेला चेव काँग्रेसच्या मंडपांत हरएक प्रसंगीं दृष्टीस पडत होता. पोलिस, कायदा, व न्याय ही खातीं लोकांच्याच हातांत असलीं पाहिजेत अशा प्रकारचा निश्चय सर्वांचा झालेला आहे, असें सदर चेवामुळें हरएक प्रसंगीं दृष्टीस पडत होतें. स्वसंमतीचें तत्त्व सर्व जगाला लागू करण्यांत येत असून अध्यक्षांचा सन्मान करण्याच्या लहानसान बाबींतहि आपल्या इच्छेप्रमाणें आपणांस वागतां येऊं नये हें शल्य दिल्लीच्या हृदयांत

एकसारखें सलत असलेलें दिसत होतें. पंजाब, दिल्ली व संयुक्त प्रांत येथील पुढाऱ्यांनीं कांग्रेसच्या कामासंबंधानें यंदा विशेष मेहनत केली होती आणि त्या मेहनतीचें फळ म्हणून दिल्ली जागी झाली होती; जाग्या झालेल्या दिल्लीला पोलिसनें अशा रीतीनें प्रारंभींच टोंचल्यामुळें पुन्हां दिल्ली झोंपी जाईल अशी भीति वाळगण्याचें कारण उरलें नाहीं. महायुद्धाची परिसमाप्ति आणि स्वसंमतीच्या तत्त्वाचा तह यांची वाटाघाट हिंदुमुसलमानांत एकसारखी चालली होती. प्रेसिडेंट विल्सन आणि इंग्रजी मंत्री लाईड जॉर्ज यांच्या निरनिराळ्या उद्गारांचें विवेचन कांग्रेसच्या मंडपांत, मंडपाबाहेर आणि इतर सर्व ठिकाणीं एकसारखें चाललें होतें. स्वागत मंडळाचे चेअरमन हकीम अजमलखान किंवा अध्यक्ष मदन मोहन मालवीय यांच्या भाषणांतहि स्वसंमतीच्या तत्त्वांचा अनुवाद वारंवार ऐकूं येत होता. इतकेंच नव्हे तर राष्ट्रीय सभेच्या निरनिराळ्या ठरावांवरील वक्त्यांनाहि स्वसंमतीचें तत्त्व मूलाधारासारखें झालें होतें. या स्वसंमतीच्या तत्त्वाकडे सर्व जगाचें लक्ष सांप्रत गेलेलें आहे. तेव्हां राष्ट्रीय सभेवरहि त्या तत्त्वाचा शिक्का यंदा पडावा यांत कांहीं नवल नाहीं. राष्ट्रीय सभेंत जे ठराव पास झाले त्या ठरावांतहि तीनच ठराव विशेष महत्त्वाचे होते; आणि या तीनहि ठरावांना

स्वसंमतीचे ठराव

असें म्हणावयास हरकत नाहीं. मॉंटेग्यू-चेम्सफर्ड-स्कीमसंबंधाचा, स्वसंमतीच्या तत्त्वासंबंधाचा आणि औद्योगिक कमिशनसंबंधाचा असे तीन प्रमुख ठराव यंदा पसार झाले. हिंदुस्थानची राज्यव्यवस्था कोणत्या स्वरूपाची असली पाहिजे हें कोणी ठरवावयाचें, लोकांनीं का नोकरशाहीनें ? स्वसंमतीच्या तत्त्वाकडे पाहिलें असतां लोकांनींच आपल्या राज्यव्यवस्थेचें स्वरूप निश्चित केलें पाहिजे असें म्हणणें भाग पडतें. आज युरोपांत झुकोस्लाव्ह किंवा जुगोस्लाव्ह आणि कॉकेरीस पर्वतांतले आर्मिनियन

किंवा तांबडया समुद्राच्या कांठचें अरब यांना जर तहाच्या परिषदेचे वेळीं हें तत्व लावण्यास प्रेसिडेंट विल्सन व लाईड जॉर्ज हे तयार होत आहेत, तर हिंदुस्थाननेंच असें कोणचें मोठें पाप केलें आहे कि, या तत्त्वाला अनुसरून राजकीय पक्षाचा विचारहि हिंदुस्थाननें करूं नये ? जगाला जो न्याय लागू तोच न्याय हिंदुस्थानालाहि लागू झाला पाहिजे. हिंदुस्थान कांहीं जगाबाहेरचें राष्ट्र नाहीं. हिंदुस्थानची प्राचीन सुधारणा किंवा हल्लींची स्थिति दोहीकडे पाहिलें असतांहि हिंदुस्थानांस स्वसंमतीचें तत्त्व न लावणें म्हणजे पृथ्वीच्या पाठीवरील एक पंचमांश लोकांना अन्यायानेंच वागविणें होय असें दिसून येईल. स्वसंमतीच्या तत्त्वाला अनुसरूनच दिल्लीच्या राष्ट्रीय सभेंतील वक्ते व प्रतिनिधी स्वराज्याच्या हक्कांना आज आम्ही लायक आहोंत असें वारंवार प्रतिपादन करीत होते. हिंदुस्थानास स्वसंमतीचें तत्त्व लावलें आहे असें इंग्लंडनें उद्यां जर जाहीर केलें तर हिंदुस्थानच्या मागणीचें स्वरूप कोणत्या तऱ्हेचें होईल हें आजच निश्चित करण्यास दिल्लीच्या काँग्रेसचें ठराव उपयोगी पडणारे आहेत. राज्यव्यवस्थेचें स्वरूप तुमचें तुम्हीच ठरवा, असा हुकूम इंग्लंडनें केल्यानंतर हें स्वरूप ठरविणाऱ्या संस्था तरी हिंदुस्थानांत कोणत्या आहेत ? राष्ट्रीय सभा, मुस्लिम लीग, नेमस्तांची परिषद, वरिष्ठ कायदे कौन्सिल व प्रांतिक कायदे कौन्सिल इतक्या संस्थांचीं मतें घेऊन बहुमत कोणत्या बाजूचें आहे हें एकदां ठरविलें म्हणजे तेंच हिंदुस्थानचें मत होय, असें म्हणण्यास हरकत नाहीं. लखनौ येथें स्वराज्याचा पास झालेला ठराव स्वसंमतीच्या तत्त्वाला धरून होता, हें वरील कसोटी लावली असतां तेव्हांच ध्यानांत येईल. हिंदुस्थानसरकारच्या कायदे–कौन्सिलांतील सभागृहानें जो स्वराज्याचा मसुदा तयार केला त्याच मसुद्यांतील तत्त्वें घेऊन लखनौचा ठराव बनवलेला होता. तेव्हां लखनौच्या ठरावाला कायदे कौन्सिलें व राष्ट्रीय सभा यांची

संमति होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. मुंबईच्या जादा कॉंग्रेसच्या वेळीं कांहीं नेमस्त कॉंग्रेसमधून फुटून नेमस्तांची परिषद भरविण्यांत आली. पण या नेमस्तांच्या परिषदेनें तरी काय केलें ? जादा कॉंग्रेस, नेमस्तांची परिषद आणि वरिष्ठ कायदे-कौन्सिल या तीनहि संस्थांच्या ठरावांकडे जर पाहिलें तर मुंबईच्या जादा कॉंग्रेसच्या ठरावांतील मागण्या सर्वसंमत असून स्वसंमतीचें तत्त्व लागू केलेल्या हिंदुस्थानच्याच मागण्या त्या ठरावांत नमूद केलेल्या आहेत, असें दिसून येईल. दिल्लीच्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष पं. मदन मोहन मालवीय यांनीं आपल्या भाषणांत या मुद्यांचा सविस्तर विचार केला असून सर्वसंमत अशा मागण्यांची यादीच्या यादी वाचकांपुढें मांडली आहे. नेमस्त परिषद आणि राष्ट्रीय सभा यांच्या मध्यें विशेष तफावत नाहीं, हें ही यादी वाचली असतां कोणाच्याहि ध्यानांत येईल. दोघांमध्यें फरक आहे तो मागण्यासंबंधानें नाहीं तर अंतःकरणाच्या वृत्तीसंबंधानें आहे. दोघांच्याहि मागण्या एकाच स्वरूपाच्या, दिल्लीच्या सत्तेंत भागी मिळाल्याशिवाय स्वराज्याचे खरे हक्क मिळाल्यासारखे होत नाहींत हें दोघांनाहि कबूल; जकाती लोकांचे हातांत असल्याशिवाय औद्योगिक भरभराट होणार नाहीं, हें दोघांचेहि ठाम मत; अशा प्रकारची विचारसरणींतील एकी असतांना आपल्या मागण्या प्राप्त न झाल्या तरी नेमस्त पुढारी नोकरशाहीकडे सस्मित व आनंदित मुद्रेनें पहाणार आणि नोकरशाही जवळ आली असतां प्रफुल्लित चेहरे करून आनंदाच्या टाळ्या वाजवणार! उलट पक्षीं राष्ट्रीयसभा आपणास समाधान झालें नाहीं असें सांगून निराशेच्या स्वरानें आपल्या मागण्यांची मागणी करणार! तेव्हां हा फरक विचारसरणीचा नसून वर्तनांतील धोरणासंबंधाचा आहे. अमुक इतक्या मागण्या प्राप्त झाल्याशिवाय राष्ट्राचें खरें हित होणार नाहीं असें सिद्ध झाल्यावर आनंदी चेहरा करतां येणें हें प्रामाणिक

लोकांना कसें साधणार? व तसें तें साधलें नाहीं तर नेमस्तांनीं तरी राष्ट्रीय सभेला कां दोष द्यावा? दिल्लीच्या काँग्रेसमध्यें बोलण्यास उभे राहून ना. शास्त्री यांनीं असें जाहीर केलें कीं, माँटेग्यु–चेम्सफर्ड यांच्या योजना दुरुस्तीशिवाय निरर्थक असून कांहीं तर रस्त्यांच्या बाजूला उभे केलेल्या शिगायांच्या निर्जीव बाहुल्यांसारख्या अहेत. या योजनेंत जर जीव यावयाचा असेल तर राष्ट्रीय सभेनें सुचविलेल्या दुरुस्त्या त्यांत अवश्य झाल्या पाहिजेत. रंगी बेरंगी निर्जीव बाहुल्या लहान मुलांची खेळणी होत असतात, मोठया माणसांच्या सुखांचें साधन असल्या बाहुल्या होऊं शकत नाहींत. लहान मुलांना जर स्वसंमतीचें तत्त्व लावलें तर तें खेळण्याच्या वस्तूसंबंधानेच लागू पडतें. हिंदुस्थानला

खेळण्याच्या वस्तू

नको आहेत. बाल्यावस्था संपून तरुण वयांतील कल्याणप्रद सर्व जबाबदाऱ्या शिरावर घेण्यास हिंदुस्थान आज लायक व तयार झाला आहे; इतकेंच नव्हे तर अशा लायकीचा आत्मविश्वास ज्यावेळीं मनुष्याच्या मनाला पटूं लागतो त्यावेळची उत्सुकताहि आज हिंदुस्थानांत दिसत आहे. दिल्लीच्या राष्ट्रीय सभेनें जर कांहीं सिद्ध केलें असेल तर तें हेंच होय. मुंबईच्या जादा काँग्रेसचा माँटेग्यू–चेम्सफर्ड स्कीमसंबंधाचा ठराव दिल्लीच्या राष्ट्रीय सभेनें पुन्हां पास केला; इतकेंच नव्हे तर त्या ठरावाच्या पुढेंहि एक पाऊल टाकलें. दिल्लीच्या राष्ट्रीय सभेच्या या ठरावांसंबंधानें मंडपांत थोडासा मतभेद दृष्टीस पडला. पुढें पाऊल आज टाकूं नका असें मिसेस बेझंट यांचें म्हणणें होतें; आणि ना. शास्त्री तर राष्ट्रीय सभेला नेमस्तांच्या परिषदे-इतके मागें ओढून घेण्यास तयार झाले होते. ना. शास्त्री यांचें भाषण राष्ट्रीय सभेनें शांत चित्तानें ऐकून घेतलें; आणि काँग्रेसमध्यें पुनः परत आले त्याबद्दल त्यांचा गौरवहि सर्व प्रतिनिधींनीं केला. तथापि त्यांच्या पिछेहाटीच्या

उपसूचनेस सहा हजार प्रतिनिधींच्या सभेंत पांच सहांहून अधिक मतें पडलीं नाहींत.नव्या सुधारणांसंबंधानें मुंबईच्या जादा काँग्रेसचें मत दिल्लीच्या राष्ट्रीय सभेनें पूर्णपणें स्वीकारलें, इतकेंच नव्हे तर ना. शास्त्री यांच्या उपसूचनेमुळें खुंटा हलवून बळकट केल्यासारखी स्थिति झाली. पंजाबी काय, सं. प्रांताचे लोक किंवा दिल्लीचे लोक काय, कोणालाहि नेमस्तांची हास्यवदन दाखवण्याची वृत्ति पसंत पडली नाहीं. सरळ प्रामाणिकपणानें खरें खरें बोलून दाखवावें हाच मार्ग सर्वांना पसंत पडला; आणि मुंबईच्या जादा काँग्रेसनें प्रामणिकपणानें लोकमत प्रदर्शित केलें होतें असा छाप दिल्लीसहि सदर ठरावावर मारण्यांत आला. दिल्लीच्या ठरावानें एका बाबींत मुंबईच्या पुढें पाऊल टाकलें. ती बाब म्हणजे प्रां. सरकारांत खात्यांची वांटणी न करतां आजच सर्व खातीं लोकांच्या हवाली करावींत ही होय. मुंबईच्या कायदे–कौन्सिलनें हीच मागणी केली. मद्रास, बंगाल, सं. प्रांत येथील नामदारांनींहि हीच मागणी केली. या मागणीला इतर ठिकाणचे नामदार विरुद्ध नाहींत अशी स्थिति गेल्या तीन चार महिन्यांत झाल्यामुळें सर्व प्रांतांत ती दृष्टीस पडली. प्रांतांचें जें मत तेंच राष्ट्रीय सभेचें मत; प्रांतांची बेरीज केली असतां राष्ट्रीय सभा होते. प्रांत निराळे आणि राष्ट्रीय सभा निराळी असा भेद करतां येत नाहीं. प्रांताप्रांतांना काय पाहिजे हें प्रांतांनीं ठरविल्यानंतर त्या त्या प्रांतांचे प्रतिनिधि राष्ट्रीय सभेंत हजर असतांना प्रांताप्रांतांची मागणी उचलून धरल्याशिवाय ते प्रतिनिधि कसे राहतील ? मुंबई इलाख्यांत तेवढीं सर्व खातीं लोकांच्या हातीं असावीं आणि पंजाबांत असूं नयेत, असें मुंबई इलाख्याचे प्रतिनिधी कसें म्हणूं शकतील ? प्रांताप्रांतांत व लोकांलोकांत लावालावी करून देण्याचें काम नोकरशाहीचें आहे, राष्ट्रीय सभेचें नव्हे. या लावालावीस राष्ट्रीय सभेनें स्थळ दिलें नाहीं हें योग्य झालें.मिसेस बेझंट यांच्या मतें हा असला प्रश्न पुढें यावयासच

नको होता. आणि आला नसता तर एका अर्थी बरें झालें असतें हेंहि खरें आहे. पण खुद्द अध्यक्ष साहेबांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत या मुद्याचा उल्लेख केल्यानंतर आणि प्रां. कायदेकौन्सिलच्या मतांना पुष्टि मिळविण्याकरितां ठिकठिकाणचे प्रतिनिधी मुद्दाम सभेला आलेले आहेत असें दृष्टीस पडल्यानंतर मुंबईच्या जादा काँग्रेसपुढें एक पाऊल जाण्याशिवाय काँग्रेसला गत्यंतरच नव्हतें. स्वसंमतीचें तत्त्व हिंदुस्थानास लावलेंच पाहिजे म्हणून आग्रह धरणाऱ्या प्रतिनिधींना प्रांताप्रांतांच्या कायदेकौन्सिलांच्या मतांचा सन्मान करणें भागच होतें. मुंबई इलाख्याच्या कायदे-कौन्सिलनें सर्व खातीं लोकांच्या हातीं दिलीं पाहिजेत असें ठासून सांगावयाचें आणि राष्ट्रीय सभेनें मात्र सहा वर्षांनीं सर्व खातीं हवालीं केलीं तरी चालतील असें म्हणावयाचें हें स्वसंमतीचें तत्त्व कोणतें? मुंबईच्या कायदेकौसिलांत नेमस्तांच्या परिषदेचे सभासद आहेत इतकेंच नव्हे तर नोकरशाहीच्या तंत्रानें वागणारेहि कांहीं सरकारनें नेमलेले देशी सभासद आहेत. नोकरशाहीच्या तंत्रानें वागणाऱ्या या सभासदांनाहि जी मागणी नोकरशाहीचें पित्त खवळून सोडणारी वाटली नाहीं ती मागणी अव्यवस्थितपणाची व तडजोडीला सोडून होय असें राष्ट्रीय सभेला तरी कसें वाटणार? नेमस्त नामदार जी मागणी कायदेकौन्सिलांत करतात, नोकरशाहीच्या कालेंतले नामदार जी मागणी करतात, तीच मागणी राष्ट्रीय सभेनें केली असतांना नेमस्तांच्या दृष्टीच्या किंवा सरकारच्या दृष्टीच्या तडजोडीशीं विघाड होऊं शकत नाहीं असें दिल्लीच्या राष्ट्रीय सभेस वाटल्यास त्यांत नवल तें काय? या मुद्यासंबंधानें वेझंट बाईंना शेंपन्नासच्च मतें पडलीं आणि राष्ट्रीय सभेनें मुंबईच्या जादा काँग्रेसच्या पुढें एक पाऊल टाकण्याचें ठरविलें. या ठरावावर भाषणें होतांना राष्ट्रीय सभेंत

किरकोळ मतभेद

दृष्टीस पडला ही गोष्ट खरी आहे; पण त्या मतभेदामुळें राष्ट्रीय सभेच्या कट्टया अभिमान्यांत फाटाफूट होऊन राष्ट्रीय सभेच्या चिंधड्या कांहीं काळानें होतील अशी बीजें या प्रसंगांत बिलकूल नव्हतीं. मतभेद म्हणजे फाटाफूट व मारामाऱ्या असें ज्यांना वाटतें त्यांना वरील प्रकारचा भ्रम झालेला आहे. राष्ट्रीय सभेचें हित व यशहि ज्यांना पाहवत नाहीं अशा कांहीं अँग्लो–इंडियन पत्रांच्या सुराशीं आपला सूर या बाबींत कांहीं नेमस्त पत्रांनीं मिळवावा हेंहि त्यांच्या शीलास धरूनच आहे. पण थोडासा विचार केला असतां हा मतभेदाचा प्रकार फाटाफुटीस कारणीभूत होण्यासारखा बिलकूल नाहीं हें कोणाच्याहि ध्यानी येईल. सहा वर्षांनीं सर्व खातीं द्या म्हणणें आणि आज द्या म्हणणें एवढ्या मतभेदामुळें राष्ट्रीय सभेंत कशी फाटाफूट होणार ? ज्याला किरकोळ मतभेद म्हणतात तशाच स्वरूपाचा हा मतभेद नव्हे काय ? आपली किरकोळ स्वरूपाची सूचना पसार न झाल्यास सेक्रेटरीच्या कामाचा बोजा उचलण्यास वेझंट वाईनीं स्वयंस्फूर्तीनें पुढें येऊं नये आणि दुसऱ्याच्या झालेल्या नेमणुकींनाच संमति द्यावी यांत कोणतें गैरशिस्त आहे ? आम्हांस तर या बाबतींत कोठें मारामारी किंवा फाटाफूट दिसत नाहीं. निरोगी व वाढत्या शक्तीच्या लक्षणांतच असल्या प्रकाराचा समावेश केला पाहिजे. दुसरी एक मतभेदाची बाब राष्ट्रीय सभेपुढें आली तीहि अशाच तऱ्हेची होती. स्वसंमतीच्या तत्त्वाला धरून राष्ट्रीय सभेचे यंदाचे सर्व ठराव तयार करण्यांत आलेले होते. हें असें व्हावें हें कालमाहात्म्य होय. कोणासहि हें चुकवितां आलें नसतें ! सर्व जगाला नवें वळण देणारें महायुद्ध नुकतेंच संपून जगाची नवी रचना ठरविणारी तहाची परिषद युरोप खंडांत ज्या तत्त्वाची कांस धरून बसली आहे त्या स्वसंमतीच्या तत्त्वाच्या छत्राखालीं राष्ट्रीय सभेचें काम चालल्यासारखें न दिसावें

तर व्हावें तरी काय ? युरोपांतील लोकांनाच बुद्धि आहे, अंतःकरणें आहेत, शरीरें आहेत आणि हिंदुस्थानांतील लोकांना यांतील कांहीं नाहीं असें का मानावयाचें ? सर्व जगावर जो प्रकाश पडतो, सर्व जगभर जो वारा सुटतो, आणि सर्व पृथ्वीतलावर जें जीवन वहात रहातें तो प्रकाश, तो वायु, किंवा तें पाणी हिंदुस्थानच्या वांट्याला बिलकूल आलें नाहीं असें कसें होईल ? युरोपनें स्वसंमतीच्या तत्त्वाला मस्तकावर धारण केलें असतां हिंदुस्थानची राष्ट्रीय सभा त्या तत्त्वापासून दूर दूर कशी राहील ? हें तत्त्व हिंदुस्थानाला लागूं केलें पाहिजे असा ठराव राष्ट्रीय सभेनें पास केला आणि तहाच्या परिषदेनें राष्ट्रीय सभेच्या वतीनें प्रतिनिधि घेतले पाहिजेत व तहाच्या परिषदेंतच स्वसंमतीच्या तत्त्वाचे हक्क हिंदुस्थानास मिळाले पाहिजेत असें राष्ट्रीय सभेनें ठरविलें. हिंदुस्थानच्या वतीनें तहाच्या परिषदेंत बसण्याकरतां लो. टिळक, महात्मा गांधी व सय्यद हसन इमाम यांना राष्ट्रीय सभेनें आपल्यातर्फे निवडलें आहे, असें ठरावांत नमूद करण्यांत आलें. या ठरावावर नोकरशाहीच्या तर्फेच्या अँग्लो-इंडियन पत्रांची अशी टीका आहे कीं, स्वसंमतीच्या संबंधाचे हे ठराव पोरकट स्वरूपाचे असून राष्ट्रीय सभेच्या व्यावहारिक इभ्रतीस कमीपणा आणणारे आहेत. हिंदुस्थान सरकारला तहाच्या परिषदेंत जागा मिळण्याची जेथें मुष्कील तेथें राष्ट्रीय सभेसारख्या संस्थांनीं आपले वकील पाठवावयाचे म्हणजे व्यवहारी लोकांच्या दृष्टीनें आपलें हंसेंच करून घेण्यासारखें आहे. राष्ट्रीय सभा कोणत्या झाडाचा पाला आणि लो. टिळक कोणत्या सांदीकोपऱ्यांतले पुरुष कीं, राष्ट्रीय सभेला व लो. टिळकांना प्रेसिडेंट विल्सन यांनीं ओळखावें ? आणि तहाच्या परिषदेंत थोडीशी जागा द्यावी ? व्यवहारदृष्टया

लहान तोंडीं मोठा घास

घेण्यापैकींच हें कृत्य होय. तेव्हां असलें हास्यास्पद कृत्य जी राष्ट्रीय

सभा करते तिच्या म्हणण्याकडे मुत्सद्यांनीं लक्ष देण्याचें कारण नाहीं. शाब्दिक स्वप्नसृष्टींत फाजील संचार करण्याची संवय लागल्यामुळें राष्ट्रीय सभेचा अधःपात लवकर होईल, असे कांहीं अँग्लो-इंडियनी पत्रांनीं तारे तोडले आहेत. राष्ट्रीय सभेच्या ठरावामुळें प्रे. विल्सन यांजकडून तहाच्या परिषदेंत वसण्याकरितां लो. टिळक यांना आमंत्रण येईल अशी राष्ट्रीय सभेंतील कोणत्याहि प्रतिनिधीची अटकळ सदर ठराव पास करतांना नव्हती व आजहि नाहीं. तहाच्या परिषदेनें हिंदुस्थानास स्वसंमतीचें तत्त्व लावण्याचा प्रश्न घेतला पाहिजे, असें राष्ट्रीय सभेच्या प्रतिनिधींना वाटलें व आजहि वाटत आहे. हें वाटणें व्यवहाराला सोडून बिलकूल नाहीं. सर्व जगाचा व्यवहार आज ह्याच मनोवृत्तीनें व्यापलेला आहे. जगाच्या व्यवहारांत हिंदुस्थाननें स्वतःस गुंतवून घेण्याचा प्रयत्न करणें किंवा तशा प्रयत्नास उत्तेजन देणारे ठराव पास करणें ही गोष्ट हिंदुस्थानच्या उन्नतीस आजकाल अत्यंत जरुरीची आहे. जगाच्या व्यवहाराच्या प्रचंड ओघापासून हिंदुस्थानास आजपर्यंत मुद्दाम होऊन अलिप्त ठेवण्यांत आलें आहे. आणि अशा रीतीनें अलिप्त राहण्यांतच आपलें कल्याण आहे, असें पराधीन बुद्धीच्या व दुर्बळ हृदयाच्या कांहीं लोकांना वाटूं लागलें आहे. जगाच्या ओघापासून हिंदुस्थानास अलिप्त ठेवण्यांत नोकरशाहीचा फायदा आहे खरा, पण हिंदुस्थानचा फायदा नाहीं. जगाच्या ओघांत जाऊन पडण्यास हिंदुस्थाननें धडपड केलीच पाहिजे. जगांतील लहान मोठीं सर्व राष्ट्रें व सर्व लोक असली धडपड करीत असतांना हिंदुस्थाननें स्वस्थ बसणें म्हणजें निर्जीवतेचेंच चिन्ह होय. टाकाल तेवढया भाकरीवर आम्ही संतुष्ट नाहीं हें जसें राष्ट्रीय सभेनें औद्योगिक कमिशनसंबंधानें विस्तृत ठराव करून जाहीर केलें, तसेंच नोकरशाहीनें ठरवून दिलेल्या बुद्धीच्या डबक्यांतील पाण्यावरहि आम्ही

खूप नाहीं असें राष्ट्रीय सभेनें तहाच्या परिषदेसंबंधाचा ठराव पास करून जाहीर केलें. डबक्यांतून बाहेर पडून सर्व जगाला व्यापणाऱ्या समुद्राच्या रोखानें राष्ट्रीय सभेनें यावर्षी पाऊल पुढें टाकलें आहे. डबक्यांतच हिंदुस्थानास बुडवून ठेवण्याची इच्छा करणाऱ्या नोकरशाहीला हें पसंत पडलें नाहीं पण ह्यांत व्यवहारशून्यता कोठेंच नाहीं. स्वप्नांतील आनंद चाखण्याचा वेडगळपणा ह्यांत बिलकूल नाहीं. प्रेसिडेंट विल्सन व मि. लाईड जार्ज हे महात्मे स्वप्नसृष्टींतलें नव्हत; तहाची परिषद म्हणजे आजकाल घडत असलेलीच गोष्ट आहे, आणि स्वसंमतीचें तत्त्व हें जगाला हलविणाऱ्या परमेश्वरी तेजांतला एक अंश आजकाल होऊन बसलें आहे. नोकरशाही भूतकाळापेक्षां एक बाब होऊं लागली आहे; आणि स्वप्नांत किंवा काळोखांत दुबळ्या लोकांना भिवविण्यापलीकडे अधिक शक्ति या भूतांच्या हातीं ठेवण्याची परमेश्वरी इच्छा नाहीं, असें महायुद्धानें जाहीर केलें आहे. ह्या सर्व गोष्टी आज प्रत्यक्ष व्यवहारांत आहेत आणि या जगाच्या व्यवहाराशीं स्वतः संलग्न होण्याचा ठराव राष्ट्रीय सभेनें पास केल्यास हिंदुस्थानांतील नोकरशाहीच्या बगलबच्चांशिवाय इतर कोणीहि राष्ट्रीय सभेस व्यवहारशून्य म्हणणार नाहीं. जगाच्या व्यवहाराशीं स्वतःची सांगड घालण्याचा यंदा करण्यांत आलेला प्रयत्न कायमचा टिको आणि जगाच्या सामान्य ओघांपासून मिळावयाच्या फायद्यांना हिंदुस्थान ह्यापुढें केव्हांहि पूर्वीप्रमाणें न मुको, असेच उद्गार सर्व राष्ट्रभक्तांच्या तोंडून या प्रसंगीं निघाल्यावांचून रहाणार नाहींत.

* पहिली चिरोली चकमक

सर व्हॅलेंटाईन चिरोल यांजवर लो. टिळक यांनीं केलेल्या अब्रु नुकसानीच्या फिर्यादीच्या निकालासंबंधानें रा. दादासाहेब करंदीकर यांची तार गेले शुक्रवारीं आली. खटल्याचा निकाल चिरोलच्या बतीचा झाला असाच त्या तारेंत मजकूर आहे. रूटरचीहि तार वरीलप्रमाणेंच प्रसिद्ध झालेली आहे. शुक्रवार ता. २१ फेब्रुवारी रोजीं खटल्याचें काम संपून ज्यूरीनें लो. टिळक यांच्या विरुद्ध निकाल दिला, ही बातमी एक दोन दिवसांतच म्हणजे २२–२३ तारखेलाच दिल्लीस सरकारी मंडळींना प्रथम पोंचली आणि दिल्लीहून खासगी तार म्हणून मुंबईस २४ तारखेस प्रसिद्ध झाली. खटल्याच्या पहिल्या तीन चार दिवसांचा सविस्तर गोषवारा विलायतच्या पत्रांतून गेल्या डाकेनें हिंदुस्थानांत आला आहे. शिवाय खटला चालत असतांना रूटरनें राजकीय दृष्टीचे मुद्दे तारेनें पाठवले आहेत. खटल्यासंबंधाची ही सर्व हकिकत गेल्या व या अंकांत प्रसिद्ध केली आहे. रूटरनें दिलेल्या तारांचें स्वरूप, सर व्हॅलेंटाइन चिरोल यांच्या-तर्फे सर एडवर्ड कार्सन यांनीं केलेलीं भाषणें व निकालाची तार हिंदुस्थान सरकारच्या गोटांत तांतडीनें कळविण्याची झालेली घाई इत्यादि गोष्टी लक्षांत घेतल्या असतां या नुकसानीच्या खासगी खटल्यास राजकीय व सरकारी स्वरूप देण्यांत येऊन लो. टिळकांचा खटला बुडवण्यांत आला, असें कोणासहि वाटल्यावांचून रहाणार नाहीं. या खटल्यांत प्रथमपासूनच या दृष्टीनें राजकीय स्वरूप होतें ही गोष्ट खरी आहे. केवळ खासगी स्वरूपाचा हा खटला नव्हता. लो. टिळक व त्यांचे अनुयायी यांच्याविरुद्ध

---

* केसरी, ता. ४ मार्च १९१९

सर व्हॅलेटाइन चिरोल यांनीं केलेलीं विधानें खोटीं आहेत हें कायद्याच्या कोर्टांत ठरविणें लो. टिळक यांना इष्ट वाटलें, याचें कारण खासगी नफा-नुकसानीचें नसून राजकीय चळवळीच्या दृष्टीचेंच होतें. राष्ट्रीय पक्षाच्या राजकीय चळवळींना सर व्हॅलेनटाइन चिरोल यांचीं विधानें अत्यंत त्रासदायक व जाचक असल्यामुळें लो. टिळकांना या खटल्याचा खटाटोप करावा लागला. या उद्योगास सुरवात झाली त्यावेळीं राजकीय स्वरूपाचा हा खटला आहे ही गोष्ट सर्वांच्या लक्षांत होती; किंबहुना खटला राजकीय स्वरूपाचा असल्यामुळेंच विलायतेंतील हें दुखणें विलायतेसच नष्ट करून राष्ट्रीय पक्षाचा मार्ग विलायतेस खुला करणें आवश्यक वाटून विलायतेस खटला चालवण्याची खर्चाची मोठी जोखीम शिरावर घेण्यांत आली. खटला राजकीय स्वरूपाचा आहे हें प्रथमपासूनच लक्षांत होतें; तरी सरकारी हात या खटल्यांत इतक्या उघडपणें दिसेल अशी कल्पना खटल्याच्या सुरवातीच्या वेळीं नव्हती. मुंबईस कमिशनचें काम सुरूं झालें त्यावेळीं प्रथम सरकारी हात दिसला आणि विलायतेस काम चाललें असतांना तो हात चांगलाच प्रकट झाला. रूटरच्या तारा व सर एडवर्ड कार्सन यांचीं विधानें वाचलीं असतांना नोकरशाहीचा हात कोणते खेळ खेळत होता हें तेव्हांच लक्षांत येतें. लो. टिळक यांच्याविरुद्ध झालेल्या निकालावर अपील असल्यामुळें निकालांतील कायद्याच्या प्रश्नासंबंधानें वाटाघाट करण्याची वेळ अद्याप आलेली नाहीं. तथापि या खटल्यांत दिसून आलेल्या नोकरशाहीच्या या ढवळीढवळीसंबंधानें दोन शब्द लिहिणें जरूर आहे. विलायतच्या लोकांकडून आपल्या सनदशीर चळवळीस न्याय मिळाल्याशिवाय राहणार नाहीं असा लो. टिळकांचा पूर्ण विश्वास असून या विश्वासाला अनुसरूनच आजपर्यंतच्या त्यांच्या सर्व राजकीय चळवळी व राजकीय स्वरूपाचे खटले यांची उभारणी करण्यांत आलेली आहे. हा विश्वास

चिरोली ठेंच

लागून मस्तकाला कळ जाऊन, पाय रक्तबंबाळ होऊन जमिनीवर सपशेल पडलेला या खटल्यानंतर पहात असतांना कांहींना आनंद होईल व विलायतच्या न्यायप्रियतेबद्दलच्या लोकमान्यांच्या कल्पना लोकमान्यांना बऱ्याच भोंवल्या याबद्दल ते राष्ट्रीय पक्षाला टोमणेहि मारतील. नोकरशाहीपैकीं ज्यांनीं या खटल्यांत ढवळाढवळ केली त्यांनाहि संतोष होऊन विलायतेस राष्ट्रीय पक्षाची राजकीय चळवळ कोणींहि कितीहि जोरानें केली असतांना हिंदुस्थानांतील आपल्या अरेरावी हक्कांस धक्का लागूं शकणार नाहीं अशा आनंदांतहि ते मग्न होतील. या गोष्टी खऱ्या आहेत. पण सरकारी हात दिसूं लागल्यानंतरहि ज्या विश्वासानें लो. टिळक यांनीं हा खटला चालविला त्याचेकडे पाहिलें असतां त्यांचा सनदशीर मार्गावरील विश्वास डावपेंचाच्या स्वरूपाचा नसून अंतःकरणाच्या स्फूर्तीचाच आहे हें सर्वांच्या ध्यानांत येईल. सनदशीर राजकीय चळवळीचे दोन भाग असतात. लोकमत तयार करून राजकीय हक्क मिळवण्याची व पचनीं पडण्याची शक्ति कायदेशीर व सनदशीर रीतीनें उत्पन्न करणें हा या चळवळीचा मुख्य भाग आहे. आम्ही आमच्या पायावरच उभे राहिलें पाहिजे. याचकांप्रमाणें इतराकडें पहाण्याची वृत्ति टाकून दिली पाहिजे, वगैरे सिद्धांत पुढें ठेवून स्वावलंबनाचा मार्ग शिकविणारे सर्व पुढारी वरील पहिल्या भागाकडे विशेष लक्ष पुरवीत असतात. राष्ट्रीय पक्षाचें बीद स्वावलंबनाचें असून या मताचाच पुरस्कार लो. टिळकांनीं केलेला आहे. या स्वावलंबनासंबंधानें त्यांचा विश्वास जितका दृढ आहे तितकाच दृढ सनदशीर चळवळींतील दुसऱ्या भागासंबंधानें आहे. हा दुसरा भाग म्हणजे हिंदुस्थान सरकारच्या स्थितीसंबंधाचा होय. हिंदुस्थानानें स्वतः आपल्या पायावर उभें राहिलें पाहिजे हें जितकें खरें आहे तितकेंच हिंदुस्थानानें सभोंवारच्या स्थितीकडे लक्ष पोंचवून

या परिस्थितीच्या सूत्रांत स्वतःचें सूत्र गुंतवून घेतलें पाहिजे हें तत्त्व देखील खरें आहे. परिस्थितीची दृष्टि व स्वावलंबन यांच्या मिलाफानें कार्यसिद्धि होत असते. ही परिस्थितीची दृष्टि ओळखून जगाच्या राजकीय चळवळीशीं ओघ मिळाला पाहिजे तरच यश मिळेल; एरवीं मिळणार नाहीं. स्वतःच्या पायावर उभें रहाण्याच्या खटपटीसंबंधानें लो. टिळक यांचा जसा सनदशीर मार्गावर पूर्ण विश्वास आहे, त्याप्रमाणें जगाच्या सूत्राशीं हिंदुस्थानचें सूत्र सांगडण्याच्या कामींहि लो. टिळक यांचा सनदशीर मार्गावरच पूर्ण विश्वास आहे. जगाच्या परिस्थितीचा फायदा हिंदुस्थानांतील लोकांच्या स्वावलंबनाच्या उद्योगाला मिळवून देण्याचा सनदशीर व कायदेशीर मार्ग कोणता ? हिंदुस्थानचा व इंग्लंडचा स्वराज्य व साम्राज्य अशा दृष्टीचा जडलेला संबंध तुटला जाण्यांत हिंदुस्थानचें बिलकुल हित नाहीं, अशी लो. टिळकांची अंतःकरणपूर्वक ठाम समजूत असून या निश्चित मताला धरूनच महायुद्धाच्या प्रारंभापासूनच जगाच्या परिस्थितीसंबंधानें त्यांनीं आपलें व आपल्या पक्षाचें वर्तन अढळपणानें आंखून ठेवलेलें होतें. महायुद्धाच्या वेळीं व महायुद्ध-समाप्तीच्या हल्लींच्या काळांत निर्बल लोकांचें व देशांचें संरक्षण करणाऱ्या ज्या स्वसंमतीच्या तत्त्वाला इंग्लंडच्या जबाबदार मुत्सद्यांनीं व पुढाऱ्यांनीं उचलून धरलें त्याच राजकीय तत्त्वांना अनुसरून इंग्लंडच्या लोकांच्या पुढाऱ्यांच्या मार्फतच जगाच्या परिस्थितीशीं हिंदुस्थानचा उद्योग संलग्न करण्याची खटपट लो. टिळक सांप्रत करीत आहेत. लोकमान्यांची हिंदुस्थानांतील चळवळ कायदेशीर रीतीनें व सनदशीर रीतीनें स्वावलंबनाच्या मार्गाची आहे. त्याप्रमाणें विलायतेंतील खटपटहि कायदेशीर व सनदशीर असून स्वावलंबनाच्याच स्वरूपाची आहे. जगाच्या राजकीय जीवनाशीं हिंदुस्थानचें राजकीय जीवन गुंतवून सोडण्याचें काम विलायतेंतील हिंदी चळवळीनें यापूर्वी केलें आहे; पण आजपर्यंतचें तें काम

परावलंबी झालें. हिंदुस्थानांत नोकरशाहीला प्रसन्न करून हक्क मिळवावयाचे हा जसा येथें कांहींचा परावलंबी प्रयत्न चालू आहे तसा इंग्लंडांतहि त्यांचाच परावलंबी प्रयत्न चालू आहे. इंग्रजी लोकांच्या, इंग्रजी इतिहासाच्या व इंग्रजी मुत्सद्यांच्या वर्तनांतील कायदेशीर राजकीय तत्त्वावर मुख्य मदार ठेवून लोकांत जागृति व तद्द्वारा शक्ति उत्पन्न करणें याला ज्याप्रमाणें हिंदुस्थानांतील सनदशीर स्वावलंबनाची चळवळ म्हणावयाचें, त्याप्रमाणें विलायतचे लोक व विलायतचे मुत्सद्दी जगाच्या परिस्थितीचा विचार करतांना कायदेशीर रीतीनें ज्या राजकीय तत्त्वांवर विसंबून राहतात त्याच स्वसंमतीच्या राजकीय तत्त्वांची कांस धरून इंग्रजी लोकांच्या मुत्सद्यांच्या मार्फतच जगाच्या राजकीय ओघांत जाऊन पडणें ही हिंदुस्थानाबाहेरची सनदशीर स्वावलंबनाची राजकीय चळवळ होय. महायुद्धामुळें या असल्या परदेशाच्या चळवळीकडे हिंदुस्थानांतील राष्ट्रीय पक्षाच्या पुढाऱ्यांचें लक्ष वेधलें असून येथील स्वराज्याच्या चळवळीवरहि या असल्या दृष्टीचा परिणाम गेलीं तीन चार वर्षें होऊं लागला आहे. परदेशांतील या सनदशीर आणि स्वावलंबी चळवळीच्या सुरवातीलाच चिरोलची ठेंच लागून हिंदुस्थानांतील स्वावलंबी चळवळीला जे अडथळे आहेत तेच अडथळे जसेच्या तसे परदेशांतहि कायम आहेत अशी इशारत या खटल्यानें सर्व राष्ट्रीय पक्षाला दिली आहे. स्वराज्याच्या चळवळीमुळें येथें नोकरशाहीच्या पोटांत जसें दुखतें तसेंच विलायतेंतील राष्ट्रीय पक्षाच्या चळवळीमुळें नोकरशाहीचेंच पोट दुखतें. हिंदुस्थानांतील राजकारणाचा जगाच्या राजकारणाशीं संबंध नोकरशाहीच्या मार्फतच पाहिजे असा नोकरशाहीचा हट्ट साहजिकपणें असणार; आणि या स्वार्थी हट्टाच्या विरुद्ध जेव्हां जेव्हां आमची परदेशींची सनदशीर चळवळ जाईल तेव्हां तेव्हां हिंदुस्थानांतल्याच पद्धतीनें परदेशांतहि आमच्या सनदशीर व कायदेशीर मार्गाच्या आड

उभी राहण्यास नोकरशाही क्षणाचाहि आळस करणार नाहीं, हें चिरोलच्यां खटल्यानें निदर्शनास आणलें आहे. आपल्यासारखा खटला होण्यावरोवर

चिरोली सूड

उगवण्यास हिंदुस्थानांतील नोकरशाहीला व हिंदुस्थान सरकारास सर व्हॅलें-टाइन चिरोल यांनीं पाचारण केलें आहे. राष्ट्रीय पक्षाला चिरडून टाकणें इष्ट आहे हें सिद्ध करण्याकरितांच मीं पुस्तक लिहिलें आणि या पुस्तका-संबंधाच्या अब्रूनुकसानीच्या फिर्यादींत राष्ट्रीय पक्षास हार खावी लागली असल्यामुळें आतां तर या पक्षावर अजिबात वरवंटा फिरविण्यास तुम्ही चुकूं नका व ही संधि व्यर्थ जाऊं देऊं नका अशा आशयाची विनंति हिंदु-स्थान सरकारला व नोकरशाहीला सर व्हॅलेंटाइन चिरोल यानीं गेल्या आठवंडयांत केली आहे. खटल्यांतील प्रश्नोत्तरांकडे पाहिलें, सर एडवर्ड कार्सन यांच्या विचारसरणीकडे पाहिलें, किंवा चिरोली सूडाच्या कल्पनेकडे पाहिलें तर एकच गोष्ट प्राधान्येंकरून डोळ्यांपुढें येते ती ही कीं, नोकर-शाहीच्या कृत्यावर टीका करणारे लोक अत्याचारी, खुनी, अराजक ठरवून चालल्यावरोवर ओलेंहि जाळून मोकळें होण्याचा हिंदुस्थानांत जसा प्रयत्न आमच्या स्वराज्याच्या सनदशीर चळवळीविरुद्ध चालू आहे तसाच प्रयत्न विलायतेंतहि आमच्या स्वावलंबनाच्या चळवळीविरुद्ध चालूं ठेवून इतर कोणत्याहि कारणानें पेटलेल्या आगींत आम्हांस उचलून टाकण्यास नोकरशाहींतील कांहीं लोक बिलकूल कमी करणार नाहींत. असल्या आगींत राष्ट्रीय पक्षास जिवंत जाळण्याचा पूर्वी बऱ्याच वेळां प्रयत्न झालेला आहे, व त्या वेळीं आगीच्या दिव्यांतून तावून सुलाखून राष्ट्रीय पक्ष बाहेर पडलेला आहे. आणि चिरोली सुडाच्या दिवटया हातांत धरून पेटवण्यांत येणाऱ्या आगींतूनहि राष्ट्रीय पक्ष पूर्वीप्रमाणेंच आधिक तेजस्वी होऊन बाहेर पडेल यांत संशय नाहीं. आयर्लंडातील अल्स्टरच्या बंडखोरांचे

पुढारी सर एडवर्ड कार्सन यांनीं घडून आलेल्या गोष्टी व त्यावरील टीका, यांच्या क्रमाकडे दुर्लक्ष करून मागाहूनचे टीकाकारच पूर्वीच्या गोष्टी घडवून आणतात असला व्युत्क्रम कोटिक्रम करण्यास वजावें यांत कांहीं आश्चर्य नाहीं. हिंदुस्थानांतील नोकरशाहीनें याच पद्धतीची कांस आजपर्यंत कित्येक वेळा धरली आहे व सांप्रतच्या रौलेट बिलाच्या वेळांतहि असल्याच हातचलाखीवर नोकरशाही अवलंबून राहिली आहे. ही हातचलाखी उघडकीस आणणाऱ्या राष्ट्रीय पक्षाच्या वतीनें जर तुम्ही निकाल दिलात तर हिंदुस्थानसरकारचें काय होईल आणि हिंदुस्थानांतील गोरे आधिकारी कोणत्या संकटांत पडतील याचा विचार करा, असें एडवर्ड कार्सन यांनीं दरडावून सांगितल्यावर चिरोलचे खटल्याचा निकाल राष्ट्रीय पक्षाविरुद्ध व्हावा यांत नवल तें काय ? महायुद्धाच्या परिसमाप्तीच्या वेळीं इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांत मजुरांचे संघ विकोपास जाऊन अस्वस्थता उत्पन्न झाली असतांना आणि अत्याचार, खून, अराजकता इत्यादि अस्वस्थतेचीं वादळें युरोपाप्रमाणें इंग्लंडांतहि उत्पन्न होण्याचीं चिन्हें दिसत असतांना सर एडवर्ड कार्सन यानीं त्याच खुनांचा व अत्याचारांचा बागुलबोवा जर ज्यूरीला दाखविला तर ज्यूरी भयाभीत झाल्यावांचून कशी राहील? युरोपांतील ज्या वादळांचा फायदा घेऊन रौलेटबिलांना बिलायतेंतील मुत्सद्यांची अंशतः संमति येथील नोकरशाहीनें मिळविली आहे, त्याच वादळाचा फायदा घेऊन लो. टिळक यांचाहि खटला बुडवण्यांत आला आहे. आपलीं तत्वें सत्याला धरून आहेत, सनदशीर आहेत, त्याबद्दल राष्ट्रीय पक्षास बिलकुल संशय नाहीं; आणि याच मार्गानें गेलें असतांना अखेरीस यश मिळेल असा राष्ट्रीय पक्षाचा दृढ विश्वास आहे. सनदशीर व कायदेशीर मार्ग न सोडतां सत्याला धरूनच राष्ट्रीय पक्ष चळवळ करीत असल्यामुळें हिंदुस्थानांत दोन चार प्रसंगांच्या आगीच्या दिव्यांतून

तो पार पडला आहे.अशा रीतीने येथें आगीच्या ज्वाळा सोसल्यामुळेंच हिंदुस्थानांतील स्वराज्याच्या चळवळींत स्वावलंबनाची ज्योत पेटलेली दिसत अहे. हिंदी स्वराज्याच्या चत्नवळीला जगाच्या राजकीय उलाढालींशीं एकजीव करून सोडण्यास विलायतेस जी सनदशीर पण स्वावलंबनाची ज्योत पेटवणें भाग अहे, त्या ज्योतीकरतां चिरोलेच्या खटल्याची पहिली चकमक गेल्या आठवडयांत उडाली अहे. या चकमकींतून निघणाऱ्या ठिणग्या राष्ट्रीय पक्षाचें अंग ठिकठिकाणीं पोळण्यास कमी करणार नाहींत हें राष्ट्रीय पक्ष ओळखून अहे. पण असल्या चकमकींतूनच तेजाचे किरण निघत असतात व परदेशीं करावयाच्या सनदशीर चळवळीची ज्योत पेटत असते, असा राष्ट्रीय पक्षाचा विश्वास अहे. तेव्हां या पहिल्या चकमकीच्या ठिणग्यांना न भितां आपल्या तरणोपायाकरितांच हें किरण आहेत हें ओळखून पूर्वीहून दुप्पट जोराने, ईर्ष्येनें व विश्वासानें परदेशांतील आपली चळवळ पुढें चालविण्यास राष्ट्रीय पक्ष चुकणार नाहीं, अशी आम्हास आशा आहे.

---

* बॅ. बॅप्टिस्टा यांचा अनुभव

गेले गुरुवारीं सकाळीं नागोया आगबोटीनें बॅ. बॅप्टिस्टा विलायतेहून मुंबईस परत आले, आणि शुक्रवारीं सायंकाळीं मुंबईतील होमरूल लीगच्यातर्फे त्यांचें स्वागत सार्वजनिक रीत्या करण्यांत आलें. ह्यासंबंधाची हकीकत आजचे अंकांत दुसरीकडे दिलीच आहे. बॅ. बॅप्टिस्टा हे वीस एकवीस महिने विलायतेंत होते; आणि विलातेंतील मजूर पक्ष व हिंदी स्वराज्य ह्यांची सांगड घालून देण्याच्या कामीं त्यांनीं चांगलें यश संपादिलें असल्यामुळें हिंदुस्थानांतील सर्व स्वराज्यवाद्यांनीं कृतज्ञतापूर्वक त्यांचें स्वागत करावें व त्यांनीं मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचें अभिनंदन करावें हें साहजिकच आहे. युरोपखंडावरोबर इंग्लंडांतील लोकमताची स्थिति गेल्या दोन वर्षांत फार बदलली आहे, आणि ह्या संक्रमणाचेच वेळीं इंग्लंडांत स्वराज्याचें काम बॅ. बॅप्टिस्टा करीत असल्यामुळें त्यांचा इंग्लंडांतला अनुभव हिंदुस्थानास ह्यावेळीं फार उपयोगी पडल्यावांचून राहणार नाहीं. युरोपखंडांत आजचा दिवस मजूर पक्षाच्या हातीं आहे. इंग्लंडांतहि आज मजूर पक्ष अधिकारारूढ झालेला नसला तरी उद्यांचा दिवस मजूर पक्षाच्या हातीं गेल्यावांचून राहणार नाहीं, असें बॅ. बॅप्टिस्टा ह्यांचें म्हणणें आहे. भांडवल व शरीरकष्ट ह्यांच्यामधील तंटयांत युरोपखंडांत भांडवलाची शेंडी कष्ट करणाऱ्यांच्या हातांत सांपडली आहे तशी स्थिति दोनचार वर्षांच्या अवधींत इंग्लंडांतहि दिसून आल्यावांचून राहणार नाहीं. महायुद्धांत इंग्लंडनें मिळवलेल्या अपूर्व विजयामुळें रशिया, जर्मनी, हंगेरी वगैरे ठिकाणीं जें किळसवाण्या निर्दयतेचें स्वरूप मजुरांच्या हालचालींना प्राप्त

---

* केसरी १ एप्रिल १९१९

झालें आहे तें हिडीस स्वरूप इंग्लंडच्या मुत्सद्यांना सहज टाळतां येईल. पण मजुरांच्या पक्षाची वर उसळत चाललेली लाट अजिबात मागें परतवून पूर्वीची स्थिति इंग्लंडांत पुन्हां सुरूं करणें कोणाहि मनुष्याला आतां शक्य नाहीं. मुख्य मंत्री मि. लॉईड जॉर्ज हे स्वतः मजूर पक्षाचेच पुढारी होण्यास सर्वतोपरी लायक असून कांहीं प्रसंगामुळें युनियनिस्ट पक्षाच्या गोटांत ते चुकून गेले आहेत. दोनचार वर्षांच्या अवधींत मि. लॉईड जॉर्ज, मि. माँटेग्यू ह्यांच्यासारखे आजचे सत्ताधारी युनियनिस्ट पक्षाला सोडून मजुरांच्या पक्षाचे पुरस्कर्ते म्हणून पार्लमेंट सभेंत त्या पक्षाचींच कामें करूं लागतील, अशी बॅ. बॅप्टिस्टा ह्यांची अटकळ आहे. मजुरांच्या पक्षांत हातापायांना राबावयाला लावून केवळ मोलमजुरी करणारांचाच तेवढा समावेश होतो असें नाहीं, तर भांडवलवाल्यांच्या आश्रयाखालीं असलेल्या व आश्रयाखालीं नसलेल्या सर्व बुद्धिमानांचाहि त्यांत समावेश होतो. मोठया भांडवलवाल्यांची आणि मोठे भांडवलवाले होऊं इच्छिणारांची स्वतःची बुद्धि एका बाजूस ठेविली असतां बाकी राहिलेली इंग्लंडांतील सर्व राष्ट्रीय बुद्धि आज मजुरांच्या पक्षाची इंग्लंडांत आहे. युरोपखंडांत किंवा इंग्लंडांत आज जे स्वतः मोठे भांडवलवाले, मोठया उद्योगधंद्याचे मालक, मोठे जमीनदार किंवा मोठे सरदार नाहींत किंवा त्या मोठयांच्या पदवीला चढूं इच्छितहि नाहींत, त्या बुद्धिवान लोकांचा, म्हणजे हिंदुस्थानांतील चातुर्वर्ण्याच्या भाषेनें बोलावयाचें असल्यास युरोपांतील सर्व ब्राम्हण वर्गाचा आजचा कल सोशियालिझमकडे आहे. राजकीय सत्तेलाच तेवढें सामाजिक रूप द्यावयाचें असें नाहीं, तर औद्योगिक व आर्थिक सत्तेलाहि सामाजिक मालकीचें स्वरूप दिलें पाहिजे हा सिद्धांत युरोपखंडांतील राजकारणांत प्रस्थापित होऊं लागला आहे. इंग्लंडहि त्याच मार्गाला लागलें असून इंग्लंडांतहि मि. लॉईड जॉर्ज ह्यांच्यासारखे बुद्धिमान कर्ते पुरुष आज अप्रत्यक्षपणें

च उद्यां प्रत्यक्षपणें मजूर पक्षाचीं मतें अंमलांत आलींच पाहिजेत असा हट्ट धरून बसल्यावांचून रहाणार नाहींत. काबाडकष्ट करणाऱ्यांच्या वर्गाबरोबरच युरोपखंडाप्रमाणें इंग्लंडांतील ज्याला आज इंटेलिजन्शिया असें म्हणतात तो बुद्धिवानांचा वर्गहि मजुरांच्या पक्षाचाच असल्यामुळें पार्लमेंट सभेंतील सांप्रतची युनियनिस्ट पक्षाची सरशी दोनचार वर्षांहून अधिक काळ टिकणार नाहीं, असा अंदाज आहे. तहावर सह्या झाल्यानंतर एक वर्षांहून अधिक काळ युनियनिस्ट पक्षाच्या हातीं सत्ता राहणें मुष्किलीचें आहे. संपत्तीच्या मोठ्या संचयांना सामाजिक मालकीचें स्वरूप देण्याच्या झगडयांत मि. लॉईड जॉर्ज, मि. मांटेग्यू ह्यांच्यासारख्या पुढाऱ्यांचें आणि युनियनिस्ट पक्षांतील भांडवलवाल्यांचें पटेनासें होऊन पार्लमेंटची नवी निवडणूक दोन तीन वर्षांत होईल; व त्यावेळीं पार्लमेंट सभेंत मि. लॉईड जॉर्ज यांच्या नेतृत्वाखालीं मजुरांचाच पक्ष अधिकारारूढ होईल, किंवा तसें न झाल्यास हल्लींहून चांगल्या प्रबल स्थितींत मजुरांचा पक्ष पार्लमेंट सभेंत दिसूं लागेल, असा भरंवसा बॅ. बॅप्टिस्टा ह्यांना वाटत आहे. ह्या दृष्टीनें विचार केला असतां इंग्लंडांतील हिंदुस्थानच्या स्वराज्याची चळवळ चांगल्या रीतीनें यशस्वी होण्याचा काळ दोन चार वर्षांहून अधिक दिवस पुढें ढकलला गेलेला नाहीं, हें कोणाच्याहि ध्यानांत येईल. तेव्हां इंग्लंडांत स्वराज्याच्या ज्या चळवळीवर बॅ. बॅप्टिस्टा ह्यांनीं राष्ट्रीय पक्षातर्फे ठराव करून ठेविलेला आहे ती चळवळ आणखी दोन चार वर्षें एकसारखी चालविल्या-वांचून राष्ट्रीय पक्षास गत्यंतर नाहीं. या कामीं दोन चार वर्षांच्या अवधींतच यश खात्रीनें मिळणार ह्याविषयीं बॅ. बॅप्टिस्टा ह्यांना बिलकूल शंका वाटत नाहीं, इतकेंच नव्हे तर

आजचें पार्लमेंट

देखील आमच्या स्वराज्याच्या विरुद्ध जाण्यास बिलकूल धजणार नाहीं,

असें त्यांचें म्हणणें आहे. युनियनिस्ट पक्षाच्या पुढाऱ्यांशीं संगनमत करून मि. लॉइड जॉर्ज ह्यांनीं महायुद्धांत यश मिळविलें, तेव्हां तहाच्या वेळींहि महायुद्धाचें काम पुरतें करण्याकरतां युनियनिस्ट पक्षालाच इंग्लंडनें निवडून दिलें. सोशियालिझमसंबंधाचा वाद कल्पनेपेक्षांहि अधिक वेगानें युरोपखंडाला ग्रासून इंग्लंडकडे आज धांव घेत आहे; आणि तहावर सह्या होण्यापूर्वीच्च तहाच्या प्रश्नापेक्षां सोशियालिझमचे प्रश्न इंग्रजी साम्राज्यालाहि अधिक महत्त्वाचे होऊं पहात आहेत. अशा वेळीं युनियनिस्ट पक्षांतील भांडवलवाले सोशियालिझमच्या विरुद्ध असले तरी हिंदुस्थानांतील स्वराज्याच्या चळवळीविरुद्ध राहणें शक्य नाहीं. कारण सोशियालिझमचीं म्हणजे मोठे मोठे उद्योगधंदे सामाजिक मालकीचे करण्याचीं तत्त्वें अंमलांत येऊं लागल्यास बोल्शेव्हिझमची भीति युरोपखंडाप्रमाणें इंग्लंडासहि वाटून इंग्लंड नवी रचना करण्यास जरी प्रतिकूल झालें, तरी देखील नव्या रचनेच्या सदराखालीं इंग्लंडांतील लोकांच्या दृष्टीनें हिंदुस्थानची मागणी येथील नोकरशाहीस नवी असली तरी इंग्लंडांतील लोकांना ही फार शिळी व मागासलेली वाव होय. इंग्लंडांतला युनियनिस्ट पक्षहि आमच्या स्वराज्याच्या फार पुढें गेलेला आहे. त्या पक्षाच्याहि दृष्टीनें हिंदी स्वराज्याच्या मार्गानें जावयाचें म्हणजे जुन्या व मळलेल्या रस्त्यानें डोळे मिटून डुलक्या घेत जाण्याइतकेंच विनधोक्याचें आहे. असल्या रस्यानें जात असतांना एखाद्या तत्त्वाच्या मोहक अंमलाखालीं सांपडून निशाबाजाप्रमाणें कांहीं झुकांड्या जरी गेल्या किंवा रस्त्याच्या बाजूला कांहीं काळ लोळत जरी पडावें लागलें तरी देखील त्यांत कांहीं विशेष नसून हिंदी स्वराज्याचा रस्ता बोल्शेव्हिझमच्या भीतीच्या दृष्टीनें सुखकरच समजला जाईल, अशी युनियनिस्ट पक्षाच्या मनाची स्थिति आज आहे. वॅ. बॅप्टिस्टा यांचें असें म्हणणें आहे कीं, पार्लमेंट सभेच्या निवडणुकींत युनियनिस्ट पक्षाची सरशी झाल्यामुळें हिंदुस्थानांतील स्वराज्य-

वाद्यांची निराशा होण्याचें कांहींच कारण नाहीं. लिबरल पक्षाची किंवा मजूर पक्षाची जर सरशी झाली असती तर माँटेग्यु–चेम्सफर्ड ह्यांच्या योजनेच्या फार पुढचें स्वरूप हिंदी स्वराज्यास आज प्राप्त झालें असतें. पण युनियनिस्ट पक्ष आल्यानें माँटेग्यू–चेम्सफर्ड ह्यांनीं देऊं केलेले हक्कहि मागें घेण्यांत येतील अशी कांहींना वाटणारी भीति अगदीं निराधार आहे. सिडनहॅम कंपू माँटेग्यू–चेम्सफर्ड ह्यांच्या योजनेच्याहि विरुद्ध आहे ही गोष्ट खरी, पण ह्या कंपूला विलायतेस विचारतो कोण ? सांप्रतच्या काल-माहात्म्यामुळें सिडनहॅमसाहेब कोणत्या झाडाचा पाला होऊन बसले आहेत. बिकानेरच्या महाराजांसारखे हिंदी संस्थानिक पूर्वीच्या व आजच्या स्टेट-सेक्रेटरीसाहेबांच्या देखत सिडनहॅमी कंपूचा असा खरपूस समाचार घेत आहेत कीं विकारवश झालेल्या एखाद्या राष्ट्रीय पक्षाच्या वक्त्याला देखील ह्याहून अधिक शिव्या सिडनहॅमी कंपूला देण्याचा मोह शिल्लक रहाणार नाहीं. इंग्लंडच्या सामान्य लोकांत सिडनहॅमसाहेबांना किंमत नाहीं. महा-युद्धाचे वेळीं इंग्लंडच्या बसाहती जर इंग्लंडच्या बरोबरीची स्वतंत्रता पर्यायानें उपभोगूं लागल्या आहेत तर हिंदुस्थानला तेवढें स्वराज्य कां नको ? अशी विचारसरणी इंग्लंडच्या सर्व पक्षांच्या लोकांनीं सहजगत्या स्वीकारिली असल्यामुळें सिडनहॅमसाहेबांचा चेलेपणा स्वीकारण्यास येथील पोलिस खातें व कोल्हापूर संस्थानचे नोकर ह्या ठिकाणांशिवाय कोणींहि पुढें येत नाहीं. हिंदुस्थानचे ग. ज. साहेब लॉर्ड चेम्सफर्ड, मुंबई इलाख्याचे हल्लींचे गव्हर्नर जॉर्ज लॉइड वगैरे मोठमोठे आधिकारीहि सिडनहॅमी कंपूच्या विरुद्ध आहेत. मुंबईच्या हल्लींच्या गव्हर्नरसाहेबांच्या विश्वासास पात्र झालेला मुंबईचा टाइम्सहि सिडनहॅमी कंपूवर नॅशनॅलिस्ट पक्षाप्रमाणें तोंडसुख घेत आहे. सिडनहॅमसाहेबांना हिंदुस्थानांत आतां जे थोडेसे अनुयायी उरले आहेत ते पोलिस खात्यांतच काय ते उरले आहेत. आणि या अनु-

बॅ. बॅप्टिस्टा यांचा अनुभव

ठा. ६७४७.

यायांना इंग्लंडांतील किंवा हिंदुस्थानांतील लोकांचा व मुत्सद्यांचा पाठिंबा नसून पोलिसच्या धोरणाची री ओढणाऱ्या एका संस्थानांतील कांहीं नोकरांचा तेवढा पाठिंबा आहे. अशा स्थितींत सिडनहॅमी कंपूच्या उद्गारांना भिऊन मॉंटेग्यु-चेम्सफर्ड ही जोडी देत असलेले हकहि पदरांत पडणार नाहींत, अशी भीति बाळगणें मूर्खपणाचें होय. असल्या भीतीला तुम्हीं बिलकूल थारा देऊं नका आणि आपल्या निरनिराळ्या चळवळींना त्या भीतीमुळें उगीच गांगरून जाऊन आंखडून धरूं नका, असें बॅ. बॅप्टिस्टा ह्यांनीं मुंबईच्या सभेंत निक्षून सांगितलें. हिंदुस्थानांतील सर्व पक्षांच्या लोकांनीं जाणून बुजून कट करून मॉंटेग्यु-चेम्सफर्ड यांच्या रिपोर्टाचें बिल मारावें म्हणून जरी मनांत आणलें तरी तें आज मरणार नाहीं; चेम्सफर्डसाहेबांनीं त्याला ढकलून दिलें तरी तें दूर होणार नाहीं; नोकरशाहीनें त्याच्या गळ्याला नख लावलें तरी त्याचा कोंडमारा होणार नाहीं; हिंदुस्थानांतल्या लोकांनीं नको नको म्हटलें तरी हिंदुस्थानच्या गळ्याला तें मिठी मारणारच ! वेळच आज अशी आली आहे कीं, हिंदुस्थानच्या स्वराज्याकडे दुर्लक्ष करण्यांत युनियनिस्ट पक्षालाहि कांहीं फायदा उरलेला नाहीं. चिरोलचे खटल्यांत लो. टिळक ह्यांना यश न मिळाल्यामुळें हिंदी स्वराज्यासंबंधानें बोलण्याचालण्यास व इतर कामें करण्यास अडचण पडले कीं काय अशी वाटत असलेली भीति अनुभवानें खोटी ठरण्याइतकें इंग्लंडच्या लोकमताचें स्थित्यंतर झालें आहे, असा बॅ. बॅप्टिस्टा ह्यांचा राष्ट्रीय पक्षाला निरोप आहे. पार्लमेंट सभेंत कमांडर वेजवुड ह्यांच्या अध्यक्षतेखालीं हिंदुस्थानास पूर्ण स्वराज्य दिलें पाहिजे असें म्हणणाऱ्या सभासदांची कमिटी स्थापिली गेली असून ह्या कमिटीच्या तर्फे पार्लमेंटच्या जागेंत भरलेल्या सभेंत 'एका प्रमुख हिंदी गृहस्थाचें भाषण' झाल्याची बातमी रूटरनें पाठविली आहे. इंग्लंडचे लोक नोकरशाही व प्रजाजन ह्यांमधील संबंधाच्या

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे

दृष्टीनें हिंदुस्थानकडे आज पहात.नसून महायुद्धाचे वेळीं वसाहतींहून अधिक उपयोगी इंग्लंडला पडलेलें राष्ट्र ह्या दृष्टीनें हिंदुस्थानाकडे पहात आहेत; आणि इंग्लंडचा व हिंदुस्थानचा हा संबंध पुढेंहि तसाच उपयोगीं कसा पडेल हें युरोप खंडांतील स्वसंमतीच्या आणि सोशियालिझमच्या नव्या कसोटीवर उगाळून पहाण्यास ते साहजिकपणें उत्सुक आहेत. हिंदुस्थानचा संबंध सलोख्याचा, प्रेमाचा व विश्वासाचा रहावा आणि तो तसा राहण्यास

पराष्ट्रीय कसोटे

पार्लमेंटनें जवळ बाळगून हिंदुस्थानच्या स्वराज्याचा प्रश्न सोडवावा, असें इंग्लंडांतील युनियनिस्ट पक्षासहि आज वाटत आहे. इंग्लंड ह्या राष्ट्राच्या व तेथील लोकांच्या हिताकडे पाहून आपलमोटेपणानें हिंदुस्थानांतील नोकरशाहीनें वागलें असतां त्यांचें कर्तव्य पार पडलें असें मानण्याचे दिवस निघून गेले आहेत. आपल्या राष्ट्राचें हित पाहणें हें तर प्रत्येकाचें कर्तव्य आहेच, पण हें कर्तव्य चांगल्या रीतीनें पार पाडण्यास राष्ट्राहून अधिक उच्च कोटींत असलेल्या सर्वसामान्य सत्याच्या तत्त्वाकडे अवश्य लक्ष पोंचवलें पाहिजे अशी भावना महायुद्धानें उत्पन्न केली आहे. पर-राष्ट्रीय (Super-National) तत्त्वाचे पुरस्कर्ते प्रे. वुड्रो्सन व मि. लॉइड जॉर्ज ह्यांच्या-सारखे अधिकारारूढ असलेले मुत्सद्दी आहेत. ह्या पर-राष्ट्रीय कसोटीला एका बाजूस झुगारून देण्यांत युनियनिस्ट पक्षाचेंहि हित नसल्यामुळें येथील पोलिसखात्यांतील कांहीं अरेराव्यांच्या मुर्वतीखातर युनियनिस्ट पक्ष हिंदी स्वराज्याच्या आड येईल याहि म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. प्रे. वुड्रो्सन, मि. लॉइड जॉर्ज ह्यांच्यासारखे मुत्सद्दी व त्यांच्या प्रभावळींतील लेखक हे सर्व हिंदी स्वराज्याच्या विरुद्ध नाहींत. राष्ट्रसंघास आधारभूत असलेल्या प्रमुख मुत्सद्यांच्या परिवारांत बॅ. बॅप्टिस्टा व लो. टिळक ह्यांनीं राष्ट्रीय पक्षाचें सोवळेंभांडें दुरून जुळवून फेंकून देण्याचा प्रयत्न करण्यास कमी

केलें नाहीं; आणि ह्या प्रयत्नांतील अनुभवावरून वॅ. वॅप्टिस्टा ह्यांनीं मुंबईच्या सभेंत सर्वांना असें सांगितलें कीं, हिंदुस्थान देश प्रे. वुड्रो‌ल्सन ह्यांच्या स्वसंमतीच्या तत्त्वाच्या बाहेरचा समजला जाणें शक्य नाहीं. स्वसंमतीचें तत्त्व हिंदुस्थानास लावावें अशा अर्थाचा ठराव राष्ट्रीय सभेनें केल्यामुळें कांहीं व्यवहारदक्ष नेमस्तांनीं राष्ट्रीय सभेची ढवाढवी केली. पण वॅ. वॅप्टिस्टा ह्यांचा असा अनुभव आहे कीं, ह्यासंबंधानें स्वराज्यवाद्यांनीं जर अधिक जोराची चळवळ केली तर आज जी गोष्ट प्रमुख सत्ताधाऱ्यांकडून व मुत्सद्यांकडून तत्त्वतः मान्य करण्यांत आली आहे तीच गोष्ट अमलबजा- घणीच्या दृष्टीनेंहि प्रत्यक्ष व्यवहारांत आल्यावांचून रहाणार नाहीं. प्रे. वुड्रो‌ल्सन व त्यांचा परिवार हे हिंदुस्थानची गणना सुधारलेल्या राष्ट्रांतच करतात. अर्थात् हिंदुस्थानास स्वसंमतीचा नियम लागू करण्यास तत्त्वतः कोणताच अडथळा राहिला नाहीं. राष्ट्रीय सभा ज्यावेळीं हिंदुस्थानास स्वसंमतीचें तत्त्व पाहिजे असें म्हणते त्यावेळींहि आयर्लंडांतील सिनफेन पक्षाप्रमाणें किंवा दक्षिण आफ्रिकेंतील रिपब्लिकन पक्षाप्रमाणें हिंदुस्थानचा व इंग्लंडचा संबंध नको असें बिलकूल म्हणत नाहीं. हा संबंध हिताचा झाला व पुढेंहि हिताचाच राहील, अशी राष्ट्रीय सभेची व लो. टिळक ह्यांची पूर्ण खात्री असून ह्या संबंधावर त्यांचा अढळ विश्वास आहे. स्वसंमतीच्या तत्त्वामुळें हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय संबंधांत किंवा लढाईच्या खात्यांत अल्पस्वल्पहि सत्ता हातीं घेण्याची महत्त्वाकांक्षा आजकालचें राजकारण म्हणून उत्पन्न होण्याची वेळहि अद्याप आलेली नाहीं, ही बाब राष्ट्रीय सभेनें आपल्या स्वराज्याच्या मसुद्यांत कबूल केलेली आहे. लो. टिळक ह्यांनीं विलायतेंतील एका भाषणांत सांगितल्याप्रमाणें मॉंटेग्यू–चेंम्सफर्ड ह्यांचा रिपोर्ट जे हक्क हिंदुस्थानास दिले पाहिजेत असें स्वच्छपणें आज कबूल करीत आहे तेच अंतस्थ कारभाराचे हक्क कोणच्या पायरीनें व किती कालांत मिळाले पाहिजेत, हें

ठरवितांना स्वसंमतीचें तत्व आजच्या आज हिंदुस्थानास लावण्यास कोणचीहि अडचण शिल्लक राहिलेली नाहीं. पहिली पायरी किती भरीव असावी व पुढच्या पायऱ्यांच्या कालमर्यादा कोणत्या असाव्यात हें ठरविण्याचें काम नोकरशाहीकडे, हिंदुस्थानसरकारकडे किंवा स्टेटसेक्रेटरीकडे पार्लमेंटनें न ठेवतां तें स्वसंमतीच्या तत्त्वाप्रमाणें हिंदुस्थानच्या लोकांवरच सोंपविलें पाहिजे. हिंदुस्थानचा इंग्लंडला होत असलेला उपयोग, राष्ट्रसंघांतील स्वसंमतीच्या तत्त्वाचा फायदा हिंदुस्थानला देण्यास प्रे. वुड्रो्सन व मि. लॉइड जॉर्ज ह्यांच्या कंपूची असलेली तयारी, आणि युरोपखंडांत व इंग्लंडांत रूढ होत चाललेलीं तत्त्वें, ह्या सर्वांचा विचार करतां होमरूल लीगनें व राष्ट्रीय सभेनें इंग्लंडांत चालविलेली स्वराज्याची चळवळ हल्लींहून अधिक्र नेटानें चालविणें हिंदुस्थानच्या फायद्याचें असून बॅ. बॅप्टिस्टा ह्यांच्या उपदेशाप्रमाणें ह्या कामाकडे सर्वांकडून योग्य लक्ष पुरविण्यांत येईल ह्यांत संशय नाहीं.

* मुंबई–दिल्लीचा हरताळ

महात्मा गांधी यांच्या सत्याग्रहाच्या चळवळीस गेल्या आठ दहा दिवसांत आस्ते आस्ते विराट रूप येऊं लागल्यामुळें रौलेटच्या नव्या कायद्याविरुद्ध सर्व हिंदुस्थान एकमतानें उठल्यासारखा दिसूं लागला आहे. रौलेटच्या बिलाला लाटसाहेबांची संमति मिळाल्यानंतर येणारा रविवार हा निषेधाचा दिवस चोंहोंकडे पाळण्यांत यावा अशी विनंति महात्मा गांधी यांनीं सर्व हिंदुस्थानास केली. गेल्याच्या मागील रविवारापूर्वी लाटसाहेबांची सदर संमति मिळाल्यामुळें ता. ३० मार्च रोजींचा रविवार कांहीं ठिकाणीं पाळला गेला, आणि कांहीं ठिकाणीं ता. ६ मार्चचा रविवार पाळला गेला. दिल्ली, अमृतसर, नागपूर, सातारा, बेळगांव वगैरे ठिकाणीं पहिला रविवार पाळला गेला. मुंबई, लाहोर, मद्रास, कलकत्ता, पुणें वगैरे शहरीं दुसरा रविवार पाळला गेला. रौलेटच्या कायद्याविरुद्ध निषेध प्रदर्शित करण्याकरितां. सभा भरवून स्टेट सेक्रेटरीसाहेबांनीं व बादशहांनीं आपली संमति या कायद्यास देऊं नये अशा आशयाचे ठराव चोहोंकडे पसार झाले. लाटसाहेबांनीं आपली संमति दिल्यानंतरहि असल्या निषेधाच्या ठरावांना मुंबईच्या गेल्या रविवारच्या जंगी जाहीर सभेंत ना. जिना, मि. पेटिट, ना. पटेल, बॅ.बॅप्टिस्टा, मि. नटराजन वगैरे सत्याग्रही नसलेल्या मंडळींनींहि आपला पूर्ण पाठिंबा देऊन सत्याग्रहाच्या चळवळीला लाख–पन्नास हजार लोकांच्या देखत महात्मा गांधी यांच्या शेजारीं उभे राहून एक तऱ्हेची मदत केली. मुंबईस गेल्या रविवारीं सायंकाळीं फ्रेंच पुलाजवळ जमलेल्या सभेच्या जागेंत तीस चाळीस हजार लोक होते आणि आसपासच्या रस्त्यावर लाखाहून अधिक

---

* केसरी–८ एप्रिल १९१९

मोठा जमाव जमलेला होता. सकाळीं समुद्रस्नानाच्या वेळींहि तेवढाच मोठा हिंदुमुसलमानांचा समुदाय चौपाटीवर हजर होता; आणि समुद्रापासून माधवबागेपर्यंत निघालेली प्रचंड मिरवणूक ज्यांनीं पाहिली त्यांच्या तोंडून धार्मिक उत्सवांच्या वेळींहि निघणाऱ्या मिरवणुकींना या मिरवणुकीनें मागें टाकलें असेच उद्गार निघाले! रविवारीं चोहोंकडे करण्यांत आलेला उपवास आणि तन्निमित्त देवदर्शनार्थ निघालेल्या मिरवणुकी या दुःखद प्रसंगासंबंधाच्या होत्या. अर्थात् त्यांचें स्वरूपहि दुःखदच होतें. आपल्या मनांतील हें दुःख प्रदर्शित करण्याकरितां सर्व दिवसभर मुंबईच्या लहान-थोर सर्व व्यापाऱ्यांनीं आपापले बाजार व दुकानें बंद ठेविलीं होतीं. मुंबई-प्रमाणें पुण्यासहि रेमार्केट, बुधवार, रविवार, नाना, भवानी, वेताळ व लष्कर या पेठांतील दुकानें बंद होतीं. प्रो. परांजपे यांच्या अध्यक्षतेखालीं सार्वजनिक दोन सभा होऊन गर्दीतील आकस्मिक अपघातामुळें दोन-तीन इसमांचे पाय मुरगळलेहि. मुंबईच्याहि सभेंत दोन चार इसमांना घेरी आली! मद्रास, कलकत्ता, लाहोर, सिंध, हैद्राबाद वगैरे ठिकाणची हकीकत सामान्यतः एकाच स्वरूपाची! आहे. रौलेटचें बिल पास झालें म्हणून सर्व व्यापारधंद्यावर व्यापाऱ्यांनीं व इतरांनीं महात्मा गांधी यांच्या विनंतीला अनुसरून स्वेच्छेनें व सद्बुद्धीनें हरताळ पाडला आणि महात्मा गांधी यांची

सत्याग्रहाची चळवळ

आपणांस पसंत आहे असें पर्यायानें महात्मा गांधी यांना उलट कळविलें. रौलेटचा कायदा लोकांना पसंत नाहीं इतकेंच नव्हे तर हा कायदा पास झाल्यामुळें होणारें दुःख इतक्या तीव्रतेचें आहे कीं, त्या दुःखानें व्याप्त होऊन आपण होऊन दुसऱ्या दुःखाची व तुरुंगवासाची आराधना करण्या-शिवाय दुसरा तिसरा मार्ग हताश झालेल्या निर्बल लोकांना आतां सुचत नाहीं, असें या सत्याग्रहाच्या चळवळीनें गेल्या आठ दहा दिवसांत सरकारास

कळविलें आहे. ता. ३० मार्च रोजीं दिल्लीस पडलेल्या हरताळामुळें दिल्लीच्या स्टेशनाजवळ आणि दिल्लीच्या चांदणी चौकांतील घडयाळाच्या टॉवरजवळ सोल्जरांनीं लोकांच्या समूहावर गोळया झाडल्यामुळें ८–१० असामी मेले व ५०–६० जखमी झाले, असें लोकांचें म्हणणें आहे. सरकारतर्फे प्रसिद्ध झालेल्या हकीकतींत मेलेले व जखमी मिळून २०–२१ चीच संख्या दिली आहे. ही संख्या २०–२१ आहे कीं, ५०–६० आहे, लोकांनीं सोल्जरांची कुरापत काढली का अधिकाऱ्यांनीं आपल्या मनाचा समतोलपणा सोडून देऊन गांगरल्यामुळें म्हणा किंवा चढेलपणानें म्हणा गोळीबारास हुकूम दिला, वगैरे मुद्यांची चर्चा एका बाजूस ठेविली तरी सत्याग्रहाच्या चळवळीमध्यें खुद्द राजधानीच्या भूमीवर पांचपंचवीस मुसलमानांचें व पांचपंचवीस हिंदूंचें रक्त सोल्जरांच्या गोळीबारामुळें शिंपडलें गेलें ही गोष्ट सर्व लोकांच्या डोळयांपुढें एकसारखी उभी राहिल्याशिवांचून राहणार नाहीं. मरणारे बिचारे मरून गेले, पण त्यांच्या रक्तानें मातृभूमि लाल झाली, या गोष्टीची आठवण केव्हांहि मरणार नाहीं; गोळीबारानें ही आठवण मारतां येत नाहीं; दडपशाहीच्या कायद्यांनीं ही आठवण दडपली जात नाहीं; आणि पुढें सोसाव्या लागणाऱ्या भयप्रद दुःखाच्या वर्णनानें ही आठवण मागें पडत नाहीं ! स्वतः जिवंत राहण्याचा जोर या आठवणींत आहे, इतकेंच नव्हे तर या आठवणीपासून निरनिराळ्या गोष्टी एकामागून एक उत्पन्न होऊन कालांतरानें आठवण जरी बुजाली तरी नवीन गोष्टींची परंपरा तुटत नाहीं. मेलेल्यांची स्मशानयात्रा दिल्लीस ज्या वेळीं निघाली त्यावेळीं ३०–४० हजार मुसलमानांबरोबरच ३०–४० हजार हिंदु स्मशानयात्रेस हजर राहिले. मुसलमानांच्या शवाला हिंदूंनीं खांदा दिला आणि हिंदूंच्या शवाला मुसलमानांनीं खांदा दिला. दिल्लीच्या जुम्मामशिदींत शुक्रवारच्या प्रार्थनेच्या वेळीं हिंदूना हजर राहण्याची परवानगी मिळून प्रार्थनेनंतर मुख्य

मौलवी साहेबांच्या व्यासपीठावर उभे राहून स्वामी श्रद्धानंद यांना उपदेश करण्याचा आग्रह करण्यांत आला. दिल्लीच्या हिंदू–मुसलमानांनीं महात्मा गांधी यांची सत्याग्रहाची चळवळ अशा रीतीनें उचलून धरल्यामुळें रौलेट बिलाचा पूर्ण निषेध झालाच, पण पंजाब व सं. प्रांत येथील हिंदु–मुसलमानांमधील विरोध पूर्णपणें लयास गेला. हिंदु–मुसलमानांमध्यें एकी चांगल्या प्रकारें झाली असें लखनौच्या काँग्रेसच्या वेळीं जाहीर करण्यांत आलें; आणि त्यानंतर एकीवर कळस गेल्या शुक्रवारच्या दिल्लीच्या जुम्मा मशिदींतील हिंदु–मुसलमानांच्या संमेलनानें चढविला. खुद्द अकबर बादशहाला स्वतःची बादशाही शक्ति खर्च करून जें संमेलन घडवून आणणें दुरापास्त झालें असतें तें संमेलन गेल्या शुक्रवारीं दिल्लीस घडून आलें. मुलतान, लाहोर, अमृतसर, मुंबई, पुणें वगैरे शहरांनीं सर्व बाजारांवर जो हरताळ पाडला तो कोणी पाडला ? महात्मा गांधी यांची विनंति या हरताळाला कारणीभूत झाली ही गोष्ट तर खरीच; पण वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या विनंतीमुळें असला सर्वव्यापी हरताळ चोहोंकडे दृष्टीस पडेल असें कोणास थोडया दिवसांपूर्वी वाटलें होतें काय ? उपवासाची व हरताळाची विनंति प्रथमच प्रसिद्ध झाली त्यावेळीं, कोण असले हरताळ पाळतो म्हणून काय कमी नांवें ठेवण्यांत आलीं ? पुण्या–मुंबईस तर दुकानें बंद न राहण्याबद्दल काय कमी खटपट झाली ? राहिलीं तर थोडींशीं दुकानें बंद राहतील असा खुद्द पोलिसांचाहि अंदाज आदल्या दिवशीं रात्रींपर्यंत नव्हता काय ? मग रविवारीं हा असला हरताळ एकाएकीं कसा दृष्टीस पडला ? हा हरताळ स्वयंस्फूर्तीनें पडला, दुकानदारांनीं आपण होऊन पाडला, कोणी कोणावर जुलूम केला नाहीं; इतरांचें नुकसान करण्याची द्वेषबुद्धि या हरताळाच्या बुडाशीं नव्हती. रौलेट बिलामुळें आपणांस दुःख होत आहे आणि या दुःखाचा प्रतिकार करण्यास हा योग्य मार्ग आहे या स्वाभाविक समजुतीनें

हा हरताळ पाडला गेला. प्रतिकाराचा मार्ग महात्मा गांधी यांनीं सुचविला पण दुःख अंतःकरणांत न माबून अंतःकरणाबाहेर कोणत्या तरी प्रत्यक्ष कृतीनें तें वाहून पडण्याहतके उत्पन्न कोणीं केलें ? महात्मा गांधींनीं उत्पन्न केलें नाहीं; व त्यांच्या भाषणांनीं किंवा लेखकांच्या लेखांनींहि उत्पन्न केलें नाहीं; रौलेट बिलानें तें उत्पन्न केलें. दिल्लीस झालेला रक्तस्राव गांधींच्या माथीं मारण्याचा उद्योग कांहीं अँग्लो-इंडियन पत्रें करीत आहेत आणि सत्याग्रहाच्या विरुद्ध असलेले आमच्यांतीलच कांहीं लोक या निंद्य उद्योगास दुजोरा देत आहेत ! महात्मा गांधी यांच्या मस्तकावर या रक्तस्रावाची जबाबदारी ठेवण्यापेक्षां रौलेट बिलें पास झालींच पाहिजेत म्हणून खोटया पक्षाचा ज्यांनीं आग्रह धरला त्यांच्याच डोक्यावर ही जबाबदारी केव्हांहि येऊन पडते. दिल्लीस झालेल्या शांततेच्या भंगाबद्दल जर कोणास जबाबदार धरावयाचें असेल तर कायदेकौन्सिलांतील सर्व नेटिव्ह सभासद व सर्व लोकमत विरुद्ध असतांहि, इंग्लंडचा व युरोपचा इतिहास विरुद्ध असतांहि, इंग्लंडचे उदारमतवादी मि. लॉइड जॉर्ज व मि. मॉंटेग्यू यांच्या-सारख्या मुत्सद्यांचीं सन्मान्य मतें विरुद्ध असतांहि, आमचे लाटसाहेब लॉर्ड चेम्सफर्ड व मुंबई इलाख्याचे कालचे व आजचे गव्हर्नर हे अंतःकरणाच्या आंतील गुप्त जागेंत या बिलाला शाप देत असले पाहिजेत असें सर्वांना वाटत असतांहि, ज्यांनीं हीं बिलें पुढें आणण्याचा आणि आणल्यानंतर पास करून घेण्याचा

दुराग्रह

धरला त्यांच्याच कपाळावर सांप्रतच्या क्षुब्ध परिस्थितीचें सर्व पातक मारलें पाहिजे. अशा रीतीनें मनाची क्षुब्धता झाली असतांना कठोर व उग्र मार्गाकडे जाण्याची प्रवृत्ति दाबांत ठेवून सत्याच्या प्रेमळ राजरस्त्यानें जावयास सांगणाऱ्या साधूला जबाबदार धरणें म्हणजे चोरांना सोडून

संन्याशाला सुळीं चढविणें होय. दिल्लीस अशा प्रकारचा हरताळ सर्व उद्योगधंद्यांवर पडला असतां शांततेचा भंग झालाच पाहिजे, तेव्हां बाजार बंद ठेवण्याची सूचना करणारालाच शांततेच्या भंगाबद्दल जबाबदार धरलें पाहिजे असें विरुद्ध पक्षाचें म्हणणें आहे. अशा बाबींत शांततेचा भंग झालाच पाहिजे, हा मुद्दाच मुळीं खरा नव्हे शांतता राखून शांत चित्तानें व प्रेमळ वृत्तीनें दुःखें भोगा आणि असल्या तपश्चर्येनें जाण्याची शक्ति वाढवा, असा महात्मा गांधी यांचा उपदेश आहे. उपदेशांत दांडगाई किंवा द्वेषबुद्धि कोठेंच नाहीं. बाजार बंद ठेवण्याची कृतीच अशी आहे कीं या कृतीमुळें कांहीं ना कांहीं तरी दांडगाई करावीच लागते, असें म्हणावें तर तेंहि खरें नाहीं. पुण्याचा बाजार बंद होता, पण कोणीहि कोणाशीं दांडगाई केली नाहीं. ज्या मुंबईच्या बाजारापुढें दिल्लीचा चांदणीचौक म्हणजे आज कांहींच नाहीं, तो सर्व हिंदुस्थानचें मुखनाक असलेला मुंबईचा बाजारहि बंद होता. पण कोठेंच दंगाधोपा नाहीं व रक्तस्रावहि नाहीं. दिल्लीस दंगाधोपा व रक्तस्राव झाला व मुंबईत दंगाधोपा व रक्तस्राव नाहीं, असा फरक कां? दिल्लीच्या बाजूस या चळवळींत मुसलमान जितके पडले तितकेच पुण्या-मुंबईसहि पडले. एका ठिकाणीं तेवढा दंगा झाला व दुसऱ्या ठिकाणीं झाला नाहीं, याचें कारण महात्मा गांधी यांच्या उपदेशांत सांपडावयाचें नाहीं किंवा सत्याग्रहाच्या चळवळीमुळें कृतीला जें वळण येत आहे त्या वळणांतहि दृष्टीस पडावयाचें नाहीं. हें कारण शोधून काढण्यास स्थानिक अधिकाऱ्यांच्या वृत्तीकडेच पाहिलें पाहिजे. पंजाब प्रांतांत, दिल्लीच्या प्रांतांत, व उदारबुद्धि लॉर्ड चेम्सफर्ड यांच्या परिवारांत सिडनहॅमी किंवा गिरविणारे जर अधिकारी नसते तर रौलेट-बिलें यापूर्वीच मागें गेलीं असतीं आणि दिल्लीसहि दंगा झाला नसता. मुंबईस दंगा झाला नाहीं, याचें कारण लॉर्ड विलिंग्डन यांच्या कारकीर्दीत सिडनहॅमी ग्रहणांतून मुंबई सुटली

आणि हल्लींचे गव्हर्नर जॉर्ज लॉईड यांच्या वेळीं तर सिडनहॅमी दृष्टीलाहि मुंबईस फारसा आधार नाहीं. दिल्ली येथील शांततेच्या भंगामुळें गांधी यांना आपली चळवळ मागें घेण्यास सांगण्यापेक्षां दिल्ली–पंजाब येथील अधिकारी बदलून लॉर्ड चेम्सफर्ड यांच्या सदबुद्धीचा तुरुंगवास नष्ट करणें अधिक शहाणपणाचें नाहीं काय ? हल्लींप्रमाणें लॉर्ड चेम्सफर्ड यांची सदबुद्धि जर शृंखलाबद्ध झाली नसती तर त्यांनीं रौलेट–बिलाचा उपद्व्याप केव्हांच केला नसता. नोकरशाहीच्या पाशांत सांपडल्यामुळें हिंदुस्थानांतील कांहीं सत्ताधारी चांगल्या मुत्सद्यांनाहि आपली सदबुद्धि लपवून ठेवावी लागत आहे. नोकरशाहींतील कांहीं रूढीमुळें आपले विचार आपल्या मनांतच कोंडून ठेवणें कांहीं गव्हर्नरांना भाग पडत असल्यामुळें रौलेट कायद्याच्या सांप्रतच्या प्रसंगाच्या वेळीं त्यांच्या मुत्सद्दीपणाचा फायदा प्रजाजनांना न मिळतां कांहीं

कायदे मोडणें

घ निमूटपणें तुरुंगवासाचीं दुःखें सोसण्याच्या तपश्चर्येचा मार्ग स्वीकारणें महात्मा गांधी व त्यांचे सत्याग्रही अनुयायी यांना भाग पडलें आहे. नाइलाज म्हणून ही गोष्ट करण्यास ते प्रवृत्त झाले आहेत. महात्मा गांधी यांच्या कायदे मोडण्याच्या कृतीस चालू आठवड्यांत सुरवात व्हावयाची आहे. कायदे मोडून दुःखाला कवटाळण्याची चळवळ सुरू करणें म्हणजे बदमाषांना व बोल्शेव्हिकांना उत्तेजन देण्यासारखेंच होय असा काळिमा या तपश्चर्येच्या तेजावर कांहीं मंदधी फासूं पहात आहेत. बदमाष व बोल्शेव्हिक हे कायदा मोडण्याच्या कृतीपुरते म. गांधी यांच्याशीं समानधर्म होऊं शकतात, ही गोष्ट आम्हांस कबूल आहे. पण एका क्षुल्लक उपांगांत समानधर्मत्व असल्यानें एकाची दुसऱ्यास उपमा देतां येत नाहीं, हेंहि विसरतां कामा नये. चोर, दरवडेखोर व बोल्शेव्हिक रोज खातात, पितात,

त्यांनाहि ब्युरोक्रॅटाप्रमाणें दोन हात, दोन पाय, दोन डोळे आहेत; एवढ्याच साम्यावरून जसा एखादा ब्युरोक्रॅट चोरहि होऊं शकत नाहीं किंवा दरवडेखोरहि होऊं शकत नाहीं, वदमाषहि होऊं शकत नाहीं किंवा बोल्शेव्हिकहि होऊं शकत नाहीं, त्याप्रमाणें महात्मा गांधी हेहि केवळ कायदे मोडण्यानें निंदेला किंवा तिरस्काराला पात्र होऊं शकत नाहींत. कायदा पाळणें ही बाबहि कांहीं प्रसंगीं निंदास्पद ठरली जाईल; आणि कायदा मोडणें ही गोष्टहि प्रसंगीं वीरांना, महात्म्यांना व तपस्व्यांना भूषणदायक होईल. सांप्रतचा प्रसंग कोणत्या स्वरूपाचा आहे हें महात्मा गांधींनीं ठरविलेंहि नाहीं व जाहीरहि केलेलें नाहीं. रौलेट बिलांची चर्चा कायदे कौन्सिलांत ज्यांनीं ज्यांनीं केली त्यांनीं आजच्या प्रसंगाची रूपरेषा आखलेली आहे. सत्य कोणत्या बाजूचें आहे हें ठरविण्याचा मक्ता महात्मा गांधी एकटे घेऊं इच्छित नाहींत. सांप्रतच्या वादांतील सत्य महात्मा गांधींच्या बाजूचें आहे, असा निकाल त्यांच्या स्वतःच्या अंतःकरणाच्या प्रवृत्तीनें तर दिलाच आहे; पण तेवढ्यावर ते थांबलेले नाहींत. कायदे कौन्सिलांत सर्व नेटिव्ह सभासदांनीं याच प्रवृत्तीला दुजोरा दिला आहे. सर्व हिंदुस्थानभर निरनिराळ्या प्रकारच्या संस्थांनीं व हरएक दर्जाच्या विचारी पुरुषांनीं रौलेटचा कायदा दुराग्रहाचा आहे इतकेंच नव्हे तर या कायद्याच्या वेळीं राजकीय हक्क मिळाले तरी ते न मिळाल्यासारखेच आहेत, अशीच आपल्या अंतःकरणाची ग्वाही दिली आहे. तेव्हां सत्पक्ष कोणता व असत्पक्ष कोणता याविषयीं हिंदु-मुसलमानांच्या दृष्टीनें तरी बिलकूल मतभेद राहिलेला नाहीं. तेव्हां महात्मा गांधी यांची कायदा मोडण्याची कृति कोणत्याहि दृष्टीनें, खुद्द अधिकाऱ्यांच्याहि दृष्टीनें, निंदास्पद होऊं शकत नाहीं. ते विदेही (Self-less) स्थितींत आहेत हें सर जेम्स मेस्टन यांनाहि मान्य आहे. प्रसंग सत्याचा आहे; आणि पुढारी आहे विदेही साधू; एवढ्या गोष्टी सर्वांना

मान्य आहेत. या गोष्टी मान्य करणारेहि सत्याग्रहाच्या चळवळीवर असा आरोप करतात कीं, अनुयायी कोठे साधू आहेत ? आणि साधू वृत्तीनेंच कायदे मोडले जातील म्हणून कशावरून ? सर्वच अनुयायी साधू नाहींत, यावद्दल वाईट वाटण्याचें कारण नाहीं. इतके साधू एका ठिकाणीं घेऊन तरी काय करावयाचे? त्यांना कोणत्या चळवळीचें काम तरी पुरणार ? तेव्हां अनुयायी साधू नाहींत आणि साधू वृत्ति टिकणार नाहीं, या मुद्यांवर चळवळीला शक्य तितका पाठिंवा देऊं नका, असा उपदेश करणें म्हणजे मातृभूमीचें जाणून बुजून नुकसान करणें होय. कोणते कायदे कोणी व कसे मोडावयाचे यासंबंधानें शंका कुशंका काढीत वसण्यापेक्षां आणि वृथा वादांत काळ घालविण्यापेक्षां निरनिराळ्या कमिटयांशीं असला वादविवाद करून निरनिराळीं मतें घेऊन महात्मा गांधी स्वतः जे कायदे मोडतील ते सर्व कायदे आपापल्या शक्तीप्रमाणें व बलाप्रमाणें सांप्रतच्या प्रसंगीं कोणाहि देशभक्तानें मोडल्यास त्याला पाप लागण्याची बिलकूल भीति नाहीं. यांत दोष बिलकुल नाहीं; प्रत्यवाय नाहीं; पूर्वीच्या कामाचा नाश नाहीं; शक्ति-नुसार थोडेसें झालें तरी तें कल्याणास्पदच होऊन निदान रौलेट कायद्याचें संकट टळेल. यशापयश सर्वांच्या जुटीवर व मदतीवर अवलंबून आहे. तथापि त्यावद्दल आज अनुकूल अटकळ बांधण्याइतकी मदत गेल्या आठ दहा दिवसांत महात्मा गांधी यांना मिळाली आहे. शिवाय एवढी मोठी गोष्ट मात्र आज निर्विवाद आहे कीं, यांत कोणच्याहि प्रकारचें पाप नसून आपण निंदास्पद गोष्ट केली अशी चुटपुट मनाला लागून राहण्याचा प्रसंग कोणावरहि या कामीं येणार नाहीं.

* धामधुमींचा आठवडा

रविवार ता. ६ एप्रिल रोजीं चोहोकडे हिंदुस्थानांत सत्याग्रहाच्या चळवळीसंबंधानें बाजार बंद होऊन उपवास, उपासना वगैरे स्वरूपाचें व्रत पाळलें गेल्यानंतर गेल्या मंगळवारीं म. गांधी यांनीं मुंबईस सत्याग्रहाच्या चळवळीस उघडपणें सुरवात केली. आदले दिवशीं म्हणजे सोमवारीं सत्याग्रहाची मुख्य कमिटी भरून म. गांधी यांनीं पूर्वी प्रसिद्ध केलेलीं पण सरकारनें प्रेस ॲक्टखालीं जप्त केलेलीं पुस्तकें उघडपणें विकण्याचें, आणि 'सत्याग्रही' या नांवाचें एक वर्तमानपत्र छापखाना वगैरे रजिस्टर न करतां छापून प्रसिद्ध करण्याचें ठरविण्यांत आलें.या ठरावाप्रमाणें मंगळवारीं म.गांधी यांनीं स्वतः आपल्या सरकारजमा झालेल्या ' हिंद स्वराज्य ' या गुजराथी पुस्तकाच्या प्रती उघडपणें विकण्यास सुरवात केली. शेट जमनादास द्वारकादास, मि. उमर सोबानी, मि. बंकर, श्री. सरोजिनी नायडू, श्री. अनसूयाबाई, अहमदाबादचे मि. चंदूलाल देसाई वगैरे सत्याग्रही पुढाऱ्यांनीं सदर पुस्तकाच्या प्रती उघडपणें बाजारांत विकल्या आणि पोलिसलाहि मुंबई व अहमदाबाद येथें दिल्या ! रविवार ता. ६ रोजीं सत्याग्रह चळवळीचें देवक बसलें व मंगळवारीं शुभ कार्यास सुरवात झाली. पण कार्याच्या देवकाचा रविवार व पुढील आठवडा शांततेनें पार न पडतां गुरुवार, शुक्रवार व शनिवार हे गेल्या आठवड्यांतील तीन दिवस पूर्वीच्या कोणत्याहि चळवळीला मागें टाकण्याइतक्या धामधुमीचे गेले. या संबंधाची सविस्तर हकीकत आजचे अंकांत दुसरीकडे दिलीच आहे. ती वाचली असतां गेल्या आठवड्यांत कोणतें

उग्र वातावरण

सर्व हिंदुस्थानभर फिरत होतें, याची कल्पना वाचकांस सहज होईल.

---

* केसरी ता. १५ एप्रिल १९१९

सत्याग्रहाची चळवळ म्हणजे अत्यंत निरुपद्रवी चळवळ; प्रेमळ वृत्तीनें आत्म्याची शक्ति जागी करून त्या शक्तीच्या जोरावर सात्विक रीतीनें इष्ट कार्यसिद्धि घडवून आणण्याची ही तपश्चर्या आणि या तपश्चर्येच्या अग्रस्थानीं म. गांधी यांच्यासारखा विदेही पुरुष बसलेला ! अशा स्थितींत देवकाच्या दिवशीं आणि कार्याच्या आठवड्यांत चोहोंकडे वावटळें उत्पन्न व्हावीं ही गोष्ट सत्याग्रही वसिष्ठाच्या धेनूच्या शेपटींतून उत्पन्न झालेल्या वादळा-इतकीच सर्वांना सखेदाश्चर्यकारक वाटली यांत संशय नाहीं. ता. ६ रविवारच्या देवकाच्या दिवसांत कायदे मोडण्याचा कोठेहि भाग नव्हता, पण त्याच्या अगोदरच्या रविवारीं दिल्लीस दुकानें बंद करण्याच्या कामीं बोलाचाली होऊन लष्करानें घातलेल्या गोळ्यांमुळें सात आठ इसम मरून दिल्लीच्या भूमीवर देशभक्तांचें रक्त शिंपडलें गेलें. सात्विक देवता जागृत करण्याच्या आत्मयज्ञाच्या प्रारंभींच अशा रीतीनें दिल्लीच्या सोल्जरांकडून तामस वृत्ती जागृत केल्या गेल्यामुळें प्रारंभाला देवकाचा समारंभ सर्व हिंदुस्थानांत चोहोंकडे शांततेनें पार पडला, आणि विघ्नें या शुभकार्यास येणार नाहींत असा सर्वांस विश्वास वाटला. या विश्वासानें प्रेरित होऊन आणि स्वतःच्या कार्यांतील प्रेमळ वृत्तीचा सात्विकपणा पूर्णपणें ओळखून म. गांधी यांनीं गेल्या मंगळवारीं आपल्या शुभकार्यास प्रारंभ केला. मुंबईस सत्याग्रहाचा हा पहिला दिवस योग्य रीतीनें पाळल्यावर आणि कायदे मोडण्याचें कर्म सर्व विधींना अनुसरून प्रेमळ वृत्तीनें केल्यावर म. गांधी गेले बुधवारीं तेथील इष्टमित्रांच्या आमंत्रणावरून दिल्लीस जावयास निघाले. गुरुवारीं संध्याकाळीं ते दिल्लीजवळ गेले. १०।१५ मिनिटांनीं त्यांची आगगाडी दिल्लीच्या प्रांतांत प्रवेश करणार तों कोसी स्टेशनवर सरकारी अधिकाऱ्यांनीं त्यांना दिल्ली व पंजाब येथील सरकारचे हुकूम आणून दाखविले. दिल्लीच्या प्रांतांत व पंजाबचे प्रांतांत जाण्याची

त्यांना मनाई करण्यांत आली आहे, अशा अर्थाचे हे हुकूम होते. हे अटकेचे हुकूम वाचून म. गांधी यांना आनंद झाला; आणि तुरुंगवासांतील ज्या तपश्चर्येंकरतां त्यांचें मन उतावीळ झालेलें होतें त्या तपश्चर्येंची घटका जवळ येत चाललेली पाहून ते सस्मित वदनानें अधिकाऱ्यांना म्हणाले कीं, मनाईचे हुकूम तोडण्यास मी तयार असून आपणहि मला अटकेंत ठेवण्याचें आपलें कर्तव्य एकमेकांविषयीं मनांत राग न बाळगतां अवश्य करावें. म. गांधी यांच्या व्रताचे वारस असलेले त्यांचे शिष्य मि. देसाई यांना त्यांनीं १०।१५ मिनिटांत अटकेच्या पूर्वीचा लोकांस सांगावयाचा निरोप सांगितला, आणि लगेच ते अधिकाऱ्यांच्या अटकेंत गेले. म. गांधी यांच्या सत्याग्रहाच्या व्रताला अनुसरूनच जी कृति त्यांच्या हातून या वेळीं व्हावयास पाहिजे होती ती कृति परमेश्वरकृपेनें त्यांच्या हातून घडून आली. 'बोले तैसा चाले' असेंच त्यांनीं केलें. मि. देसाई यांच्यामार्फत त्यांनीं पाठवलेला निरोप लोकांनीं अवश्य वाचावा आणि त्याचीं पारायणें करून देशभक्तीचे पहिले धडे शिकावे, अशी सर्वांना या निरोपासंबंधानें आमची शिफारस आहे. म. गांधी आनंदानें अटकेंत गेले खरे; पण त्यांना अटक करण्याच्या

तामसी कृत्यामुळें

गेला आठवडा फार धामधुमीचा गेला. गुरुवारीं रात्रीं अटकेची बातमी दिल्लीस पोचली आणि शुक्रवारीं सकाळीं व संध्याकाळीं सर्व हिंदुस्थानभर लोकांच्या तोंडीं तोच विषय होऊन बसला. म. गांधी यांना अटक कां करण्यांत आली याची चर्चा प्रत्येकजण आपल्या मनाशीं व इतरांशीं करूं लागला, पण कोणासच दिल्ली व पंजाब येथील अधिकाऱ्यांच्या या तामसी कृत्याचा उलगडा करतां येईना. खुद्द मुंबईच्या टाइम्सनेंहि दोन चार दिवस शांतपणें विचार करून या कृत्याचा उलगडा करतां येण्यासारखा नाहीं,

तेव्हां सरकारनें आपल्याजवळील माहिती लोकांपुढें मांडावी अशी सरकारास विनंति करून या तामसी कृत्यांतील अंधाराबद्दल आपली कबुली पर्यायानें दिली आहे. मुंबईच्या टाइम्सला जें कृत्य अंधाराचें वाटत आहे तेंच कृत्य हिंदुस्थानांतील सर्व लोकांना काळ्या कुट्ट जुलमाचें वाटल्यास आश्चर्य तें कोणतें ? आणि या तामसी कृत्याचे संसर्गदोषामुळें म. गांधी यांनीं उत्पन्न केलेल्या लोकांच्या प्रेमळ वृत्तीनें पांघरूण टाकून अत्याचारांच्या वावटळीस जर सुरवात झाली तर त्यांत सत्याग्रही चळवळीकडे दोष तरी कोणता ! म. गांधी यांना अटक झाली ही बातमी ऐकण्याबरोबर मुंबई, अहमदाबाद, दिल्ली, लाहोर, अमृतसर वगैरे ठिकाणीं पुनः हरताळास सुरवात होऊन उद्विग्न व त्रस्त झालेल्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी शुक्रवार, शनिवार दोन दिवस रस्तोरस्तीं फिरूं लागल्या. असल्या झुंडीमध्यें शांत वृत्ति कोठून दिसणार ? काय चाललें आहे याचें त्यांस भान नाहीं; म. गांधी यांना पकडलें असून आपण अंधकारानें वेष्टिले गेलों आहों एवढीच काय ती जाणीव शिल्लक;आणि सत्याग्रहासारखी निरुपद्रवी व सात्विक चळवळ करण्याच्या कामांतहि विलक्षण विघ्नें आहेत असा अनुभव येऊन सात्विक नाहीं तर नाहीं पण तामसी तरी त्यागा करण्याकडे निराश झालेल्या मनानें साहाजिकपणें घेतलेली उलट धांव; या सर्व गोष्टींचा मिलाफ होऊन अमृतसर, लाहोर, अहमदाबाद व मुंबई येथील खवळलेल्या लोकांच्या हातून अत्यंत शोचनीय व निंद्य अशीं अत्याचाराचीं कृत्यें घडून आलीं. अमृतसर येथें नॅशनल बँक व चार्टर बँक या दोन बँका जाळून उध्वस्त करण्यांत आल्या. त्या धुमाकुळींत बँकेचे अधिकारी असलेल्या चार युरोपियनांना लाठीखालीं मारण्याचें अत्यंत निंद्य पाप लोकांच्या हातून घडलें. अमृतसरच्या स्टेशनच्या कांहीं भागाला आग लावून देण्यांत आली; व तेथेंहि एका युरोपियनाला प्राणास मुकावें लागलें. लोकांनीं अमृतसरच्या तारायंत्राच्या

तारा तोडल्या आणि अमृतसर व लाहोर यांमधील आगगाडीचा संबंध बंद पाडण्याचा प्रयत्न रूळ वगैरे उपटून करण्यांत आला. अमृतसर इतक्या बेफाम रीतीनें संतप्त होऊन निंद्य अत्याचारांचें माहेरघर बनण्यास म. गांधी यांच्या अटकेची बातमी अंशतः कारणभूत झाली असेल यांत संशय नाहीं. पण म. गांधी यांना पंजाबांत जाण्याची अटक करण्याचा हुकूम ज्यावेळीं केला त्याचवेळीं अमृतसरचे व सर्व पंजाबचे सन्माननीय व प्रख्यात पुढारी डॉ. किश्चलू व डॉ. सत्यापाल यांनाहि एकाएकीं उचलून पंजाब सरकारनें अटकेंत ठेविलें आणि या अटकेमुळें पंजाबी लोकांच्या क्रोधाग्नीनें पेट घेतला! इतर प्रांतांतील लोकांना जितकें स्वातंत्र्य मिळालें आहे तितकें स्वातंत्र्य आपणांस मिळत नाहीं असें दिल्ली व पंजाब येथील प्रजाजनांना आज कित्येक दिवस वाटत आहे. दिल्लीच्या काँग्रेसच्या वेळीं या दोन प्रांतांतील लोकांचीं गाऱ्हाणीं सर्व हिंदुस्थानच्या वेशीवर टाकण्यांत आलीं, आणि सर मायकेल ओडवायरसारख्या अरेरावी अधिकाऱ्यांची काळी छाया जोंपर्यंत या दोन प्रांतांवर पसरलेली राहणार तोंपर्यंत तेथील हिंदुमुसलमानांच्या मनाची कुचंबणूक नित्य वाढतच जाणार असें दिल्लीच्या काँग्रेसच्या वेळींच सर्वांच्या निदर्शनास आलें. या कुचंबणुकीचीं गाऱ्हाणीं निरनिराळ्या सभांतून, अर्जांतून व कायदे कौन्सिलांतील भाषणांतून अधिकाऱ्यांच्यापुढें आज कित्येक महिने एकसारखीं मांडण्यांत आलीं आहेत. त्यांत कोणताहि गुप्तपणाचा मार्ग नाहीं, लपंडाव कोणी केलेला नाहीं; सरळ मार्ग कोणीं सोडला नाहीं. असें असतांहि या कुचंबणुकींतून पंजाबी मन बाहेर काढण्याचा कोणताच उद्योग अधिकाऱ्यांनीं केला नाहीं, उलट दिल्लीच्या काँग्रेसनंतर रौलेट बिलाचा

कांटेरी पिंजरा

तयार करून पंजाब्यांच्या त्रस्त मनास त्या पिंजऱ्यांत कोंबून, अत्यंत

अल्पस्वल्प हालचालहि पंजाबांतील हिंदु–मुसलमानांना रक्तबंबाळ करणारी होईल, असला औषधोपचार पंजाबच्या कुचंबणुकीवर योजण्यांत आला ! पंजाबच्या कुचंबणुकीचें व रौलेट बिलाच्या दाबाचे पूर्ण स्वरूप वाचकांनीं यावेळीं आपल्या डोळ्यांपुढें ठेविलें पाहिजे. एरवीं गेल्या आठवड्यांतील धामधुमीचें संगतवार आकलन त्यांस करतां यावयाचें नाहीं. सर मायकेल ओडवायर यांच्या अरेरावी मतांचा दाब पंजाबांतील हिंदु–मुसलमानांवर जाचक रीतीनें जर पडला नसता आणि रौलेट बिलांनीं सर मायकेल ओडवायर यांच्या कारकीर्दीनंतरहि कांहीं वर्षें या जाचांतून सुटण्याची आपणास आशा नाहीं अशी विषण्ण स्थिति पंजाबांतील हिंदु–मुसलमानांत जर उत्पन्न झाली नसती, तर गेल्या आठवड्यांतील निंद्य अत्याचार पंजाबांत दृष्टीसच पडले नसते. महात्मा गांधी यांना अटक करून पंजाबांतील त्रस्त स्थितीवर दुरून काडी ओढून टाकण्यांत आली; आणि अमृतसरच्या पुढाऱ्यांना उचलून नेण्याच्या मशालीनें तर पंजाबास जाणून बुजून पेटविलें. अमृतसरास पांच युरोपियनांचा निर्दयपणानें खून होत असतांना लाहोरासहि बाजारांत हरताळ पडून बऱ्याच उग्र स्वरूपाचे दंगे झाले. अमृतसर व लाहोर या दोनहि ठिकाणीं लोकांच्या झुंडींवर पोलिसांकडून व लष्कराकडून गोळ्या घालण्यांत येऊन कांहीं लोक मेले व जखमी झाले. लाहोर येथील बंगल्यांतून असलेल्या युरोपियनांच्या बायकामुलांना थोडा वेळ सरकारी वाड्यांत बंदोबस्ताच्या जागीं ठेवण्यांत आलें; आणि लाहोरच्या रस्त्यांतून मशीनगन्स व मोटारी किल्ले यांची लष्करी मिरवणूक निघून लष्करी विमानानेंहि रात्रीं व दिवसां लाहोरची टेहळणी केली. पंजाबप्रमाणें अहमदाबाद व मुंबई येथेंहि गेल्या शुक्रवारीं व शनिवारीं दंगे झाले. अहमदाबादेस एक खासगी पिठाची गिरणी व दोन सरकारी इमारती जाळण्यांत आल्या. तारायंत्राच्या तारा तोडल्यामुळें आणि अहमदाबाद व मुंबई यांच्या-

मध्यें आनंद स्टेशनजवळ आगगाडीचे रूळ काढून टाकल्यामुळें अहमदाबादेस मुंबईहून पाठवण्यांत आलेल्या सैन्याची कुमक वेळेवर पोंचली नाहीं. रविवारपासून अहमदाबादेस शांतता झाली आहे. अहमदाबादच्या सविस्तर बातम्या अद्याप प्रसिद्ध झालेल्या नाहींत. पण त्या अत्यंत शोकजनक आहेत असें म्हणतात. मुंबईस शुक्रवारीं संध्याकाळीं हरताळास सुरवात होऊन शनिवारीं सकाळीं हिंदु–मुसलमानांचीं सर्व दुकानें बंद झालीं. शनिवारीं दोनप्रहरीं पायधुणीच्या नाक्याजवळ ट्राम्वे बंद करण्याचा उपद्व्याप सुरू झाल्यामुळें पोलिसांच्या व लोकांच्या झटापटी दोन तीन वेळा झाल्या. मि. जमनादास द्वारकादास वगैरे सत्याग्रही पुढाऱ्यांनीं स्वतःच्या हातांनीं ट्राम्वेच्या रुळावरील दगड उचलून टाकून शांतता राखण्याचा आटोकाट प्रयत्न केला. मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज लॉईड यांनीं गोळीबार करावयाचा नाहीं आणि लोकांशीं सौम्यपणानेंच वागावयाचें असे सक्तीचे हुकूम पोलिसांना दिल्यामुळें आणि पोलिसचे अधिकारी व मॅजिस्ट्रेट यांनींहि लोकांचीं मनें न दुखविण्याचा उद्योग मनापासून केल्यामुळें किरकोळ मारामारीहून अधिक भयंकर स्वरूप मुंबईच्या दंग्यांना प्राप्त झालें नाहीं. पायधुणीच्या बाजूला अशा किरकोळ मारामाऱ्या होत असतांना शनिवारीं एक वाजण्याचें सुमारास मुंबईस

म. गांधी आले

आणि लगेच सर्व शहरभर फिरून अनुयायांच्या साहाय्यानें मुंबईच्या लोकांचीं मनें त्यांनीं शांत केलीं. म. गांधी यांना गुरुवारीं सायंकाळीं दिल्लीजवळ अटक करण्यांत आल्यानंतर मुंबईस परत येणाऱ्या एका गाडींत फर्स्टक्लास-मध्यें अधिकाऱ्यांच्या नजरेखालीं मुंबईस आणण्यांत आलें आणि मुंबईस आल्यावर मुंबई इलाख्याचे बाहेर जाण्यास मात्र आपणांस मनाई आहे, असा

मुंबई सरकारचा हुकूम त्यांना कळवून मुंबईस मोकळें सोडण्यांत आलें. मुंबईस आल्यावर मुंबईंतील मारामाऱ्यांची वातमी त्यांना कळली; अमृतसर, लाहोर, अहमदाबाद येथील अत्याचारांची काहाणी त्यांच्या कानीं आली. आपलीं सत्याग्रहाची सात्विक चळवळ सभोंवारच्या अंधःकारांत दडपून जात आहे असें पांहून त्यांनीं गेल्या शनिवारीं संध्याकाळीं चौपाटीचे वाळवंटावर मुंबईंतील हिंदुमुसलमानांची सभा बोलावली. या सभेला सर्व मुंबई शहर लोटलें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. दीड दोन लाखांच्या या सभेचे चार पांच विभाग करून प्रत्येक ठिकाणीं म. गांधी यांचा संदेश तेवढा वाचून दाखविण्यांत आला आणि सभेचें काम संपविण्यांत आलें. अटकेंतून सुटून परत आल्यावर अत्याचारांची हकीकत कानीं येऊन म. गांधी यांनीं समुद्रकिनारीं सर्वांना असें स्पष्ट सांगितलें कीं, मारामारी, अत्याचार, रक्तपात, खून वगैरे सर्व निंद्य प्रकार सत्याग्रहाच्या चळवळीला वावडे असून सत्याग्रहाची चळवळ त्यामुळें मरणारी आहे. सर्व वावडया गोष्टी टाळण्याचा निश्चय जर लोकांनीं केला नाहीं आणि सत्याग्रहाची चळवळ बंद पाडण्याचा प्रसंग जर त्यामुळें आपणांवर आला तर आपण अन्नपाणी वर्ज करून लोकांचा दुराग्रह नाहींसा करण्याच्या कामाला आपल्या शरीराचा बळी देण्यास कमी करणार नाहीं, असें म. गांधी यांनीं मुंबईच्या लोकांना निक्षून सांगितलें. सत्याच्या आसनावर स्थिरपणानें आरूढ होऊन असल्या वावटळीच्या वेळींहि अधिकाऱ्यांकडे प्रेमळ दृष्टीनें पाहण्यास जो महात्मा चुकत नाहीं त्या महात्म्याला अटक करण्यांत अधिकाऱ्यांनीं तामसीपणा तर दाखवलाच पण मुत्सद्दीपणालाहि रजा दिल्यासारखें केलें. असल्या गैरमुत्सद्दीपणामुळें गेल्या आठवडयांत चोहोंकडे धामधूम उत्पन्न झाली. अमृतसर, लाहोर व अहमदाबाद येथील अत्याचारांचा पूर्ण निषेध म. गांधी यांच्याप्रमाणें केल्यावांचून

आमच्यानें यावेळीं राहवत नाहीं; आणि आम्हांस खात्री आहे कीं, या निंद्य कृत्यांचा निषेध सर्व हिंदुस्थानांत यावेळीं झाल्यावांचून राहणार नाहीं. ही अत्याचारांची लाट शमून सत्याग्रहाची सात्विक चळवळ व्यवस्थित रीतीनें व मंगलदायक पद्धतीनें पुढें चालविण्यास म. गांधी एकटेच समर्थ आहेत. तेव्हां रौलेटच्या कायद्याविरुद्ध सर्व हिंदुस्थानानें सांप्रत केलेल्या हाकाटीस गेल्या आठवडयाच्या धामधुमीनंतर म. गांधी आपल्या सत्याग्रहाच्या चळवळीच्या उदाहरणानें कोणतें शुद्ध स्वरूप देतात हें नीट ध्यानीं घेऊन, यथाशक्ति व यथामति त्यांच्या पावलावर पावलें टाकून जाण्यास हिंदुस्थान यावेळीं कचरणार नाहीं अशी आम्हांस आशा आहे.

* सत्याग्रहाला सुळीं कां चढवितां ?

म. गांधी यांच्या उपदेशाप्रमाणें मुंबईच्या सत्याग्रही सभेनें सत्याग्रहाची चळवळ कांहीं काळ तहकूब ठेवावी असा ठराव पास केला असून सत्याग्रही लोकांनीं कायदे मोडण्याचें आपलें व्रत सांप्रत बंद ठेवलें आहे. सत्याग्रहाची चळवळ कांहीं काळ कां बंद ठेवली पाहिजे यासंबंधाची चर्चा करतांना म. गांधी यांनीं सत्याग्रहावरोबरच मारामाऱ्या व खून यांचा सुळसुळाट गुजराथ व पंजाब येथें माजून राहिल्याबद्दल दुःख प्रदर्शित केलें आहे. म. गांधी यांच्याप्रमाणें सर्व हिंदुस्थानास वरील चार्इट प्रकाराबद्दल अंतःकरणपूर्वक दुःख होत असून म. गांधी यांच्या उपदेशाप्रमाणें शांतता व व्यवस्था चोहोंकडे पुनः स्थापित करण्याकरितां सरकारास शक्य त्या रीतीनें मदत करावी अशीच सर्व लोकांची इच्छा आहे. रौलेटच्या कायद्याविरुद्ध चळवळ करणारांना लटालूट, खून, मारामाऱ्या व जाळपोळ यांपैकीं कांहींहि नको आहे. सनदशीर मार्गानें चळवळ करून रौलेटचा दुष्ट कायदा नष्ट करण्याचा त्यांचा इरादा आहे; तेव्हां सत्याग्रही सभेचे सभासद असोत, सर्व प्रकारचे लोक अत्याचारांना आळा घालण्याकरितां सरकारास आपापल्या परी मदत करण्यास तयार असून म. गांधी यांनीं सत्याग्रहाची चळवळ कांहीं काळपर्यंत सदर हेतूनेंच तहकूब केलेली आहे. म. गांधी यांनीं ही चळवळ ज्यावेळीं सुरू केली त्यावेळीं जाळपोळीच्या तत्त्वाशेजारीं इतक्या जवळ आपण उभें आहों हें त्यांच्या ध्यानीं आलें नाहीं. ही अटकळ चुकल्यामुळें सांप्रत सत्याग्रहाची चळवळ तहकूब करावी लागली असून जाळपोळीच्या मार्गांतून जाळपोळ विझवीत असतानांच आपणांस कशीं पाऊलें टाकतां येतील याचा पूर्णपणें विचार करण्याकरितां म. गांधी यांच्या चळवळीचीं तत्त्वें यावेळीं कोठून आलीं;

---

* केसरी, ता. २२ एप्रिल १९१९

यासंबंधाची चर्चा हिंदुस्थानांत आज चोहोंकडे सुरूं आहे. हिंदुस्थान सरकारचा यासंबंधाचा एक लांबलचक ठराव प्रसिद्ध झाला असून सिमला येथील अधिकाऱ्यांच्या मतांचें धोरणहि प्रसिद्ध झालें आहे. बंगालच्या गव्हर्नर-साहेबांनीं मारवाडी व्यापाऱ्यांना बोलावून बंगालसरकारचें मत प्रसिद्ध केलें आहे. शांततेनें व सनदशीर मार्गानें रौलेटच्या कायद्याविरुद्ध लागेल तितकी चळवळ करण्यास मुंबई सरकारची आडकाठी नाहीं. पण शांततेचा भंग होऊं लागल्यास आपलें उग्र स्वरूप प्रकट करून शांतता राखण्याकरितां पोलिसच्या व लष्करच्या शक्तीचा पूर्ण उपयोग करून घेण्यास सरकार चुकणार नाहीं हें उघड आहे. म. गांधी यांनीं सत्याग्रहाची चळवळ सुरू करून कायदे मोडण्याचें तत्त्व लोकांना शिकवल्यामुळें अनर्थ गुदरला असें अधिकाऱ्यांच्या तर्फेचें म्हणणें आहे. पंजाबच्या स्थितीची माहिती म. गांधी यांना नाहीं. पण अहमदाबाद व खेडा जिल्हा येथील उद्वेगजनक प्रकाराबद्दल त्यांचें असें म्हणणें आहे कीं, त्यांना करण्यांत आलेल्या अटकेमुळेंच

बेताल वातावरण

उत्पन्न होऊन लोकांच्या हातून उद्वेगजनक गोष्टी घडल्या. अहमदाबादच्या लोकांचीं मनें म. गांधी यांच्या अटकेमुळेंच प्रक्षुब्ध झालीं. खेडा जिल्ह्यांत गेल्या दुष्काळाच्या वेळीं सत्याग्रहाच्या चळवळीनेंच तेथील शेतकऱ्यांना म. गांधी यांनीं स्वावलंबनाचा यशस्वी मार्ग दाखविला होता. अहमदाबाद येथील गिरण्यांतील मजुरांच्या संपाचे वेळीं म. गांधी व अनसूयाबाई यांनीं मजुरांना मदत करून उपवासाच्या मार्गानेंच गिरणीच्या मालकांना जागे केले होते. अहमदाबाद व खेडा जिल्हा यांचा व म. गांधी यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध असल्यानें तेथील लोक बेताल झाले तर या बेतालपणाची जबाबदारी म. गांधींच्या अटकेशिवाय इतर ठिकाणीं शोधीत बसण्याची जरूरी तरी काय आहे? म. गांधी

यांना अटक केली असतां अहमदाबाद व खेडा जिल्ह्यांतील लोक प्रक्षुब्ध व्हावेत, प्रक्षुब्ध झालेले लोक बेताल व्हावेत, आणि बेताल झालेल्यांच्या वृत्तीची मजल प्रसंग विशेषीं जाळपोळीपर्यंत जाची ही सर्व अनर्थपरंपरा म. गांधी यांच्या अटकेंतून उत्पन्न होणारी आहे. या ठिकाणीं उलट पक्षाचें असें म्हणणें आहे कीं, आगगाडयांच्या स्टेशनांचा विध्वंस करणें, आगगाडीचे रूळ उखडून टाकणें, तारायंत्राच्या तारा तोडणें, पोस्ट ऑफिस, बँका व सरकारी कचेऱ्या जाळणें या गोष्टी लाहोर, अमृतसर, गुजरणवाला वगैरे पंजाबांतील चार पांच ठिकाणांप्रमाणेंच अहमदाबादेस कशा झाल्या ? प्रक्षुब्ध झालेलीं मनें वाटेल ते भयंकर कृत्य करण्यास तयार होतात, बुद्धिच्या ताब्यांत त्यावेळीं शरीर नसतें. अर्थात् अशा लोकांनीं केलेलीं जाळपोळीचीं कृत्यें बुद्धिहीन माथेफिरूंच्या सारखीं व्हावयास पाहिजेत, त्यांच्यांत सुसंबद्धता दिसतां कामा नये; पण पेटलेल्या पंजाबांत व अहमदाबादेंत तसा वेडगळपणा दिसत नाहीं. सरकारला नडवणारी तेवढीच जाळपोळीची कृत्यें करण्यांत आलीं व करण्यांत येत आहेत. ज्या पोलिस चौकीला लागून खासगी घरें होतीं त्या पोलिस चौकी अंतील सरकारी सामान तेवढें रस्त्यावर आणून जाळलें पण चौकीला आग लावून देण्यांत आली नाहीं. इतर ठिकाणच्या पोलिस चौक्या व सरकारी कचेऱ्या जाळण्यांत आल्या. हिंदुस्थानसारख्या अफाट व विस्तीर्ण प्रदेशावर मूठभर इंग्रजांनीं लष्करी सामर्थ्यामुळें सत्ता चालवावयाची असल्यास एका ठिकाणाहून लांबच्या दूरच्या ठिकाणास जावयाचे रस्ते स्वतःच्या पूर्ण हुकमतींत ठेवणें जरूर आहे. पोस्टाच्या कामांत अडथळा आला, तारायंत्राचें काम बिघडलें, आगगाडी थांबून राहिली, आणि सरकारी कचेऱ्यांतील चिटण्याचपाट्या नाहींशा झाल्या तर सरकारच्या लष्करी शक्तीला अर्धांग वायु झाल्यासारखा होतो. सरकारचें अर्धें मरण आगगाडया, तारायंत्रें, पोस्ट ऑफिसें व चिटण्याचपाट्या यांमध्यें आहे. या दोन मर्मस्थानांपैकीं पहिली

चलनाची शक्ति अहमदाबादेस व पंजाबांत अत्यंत निष्ठुरपणें दुखविली गेली. या मर्मस्थानांकडेच प्रक्षुब्ध झालेल्या लोकांचें लक्ष कसें गेलें ? तारा तोडण्याची युक्ति त्यांना कोणी सुचविली ? आगगाडयांचे रूळ उखडल्यानें अर्धांगवायु होतो, हें लोकांच्या ध्यानीं कोणी आणून दिलें ? पोस्टांना, बँकांना व सरकारी कचेऱ्यांना एक डबामर रॉकेल घेऊन लावलेली आग सरकारी शक्तीच्या मर्मस्थानापर्यंत पोंचते ही अक्कल अहमदाबादच्या व पंजाबच्या लोकांना कोणी शिकविली ? पंजाब व अहमदाबाद येथील कृत्यांमध्यें एक प्रकारचें साम्य कां दिसून यावें ? या गोष्टींचा उलगडा मुंबईच्या टाईम्सच्या मतानें असा आहे कीं, हिंदुस्थानांत

बोल्शेव्हिकांचा प्रेम

पाठविण्यांत आला असून रशियांतील बोल्शेव्हिकांनीं ३५।४० लाख रुपये या कामी खर्च केले असल्यामुळें अहमदाबाद व पंजाब येथें हा रोग दृष्टीस पडूं लागला आहे. म. गांधी यांनीं सत्याग्रहाची चळवळ सुरू केली नसती तरी देखील दुसरी एखादी संधि साधून हा रोग हिंदुस्थानांत प्रकट झाला असता. ईजिप्तमधील गेल्या पंधरवडयाचे दंगे आणि हिंदुस्थानांतील दंगे यांच्यामध्यें बरेंच साम्य असल्यामुळें रशियांतील बोल्शेव्हिकांच्या रोगाचा प्रतिकार करण्याच्या कामीं सर्व हिंदुस्थान सरकारास मदत करील यांत संशय नाहीं. हिंदुस्थानच्या पवित्र भूमींत बोल्शेव्हिकांचीं मतें रुजणें शक्य नाहीं. ज्या देशांत धर्मश्रद्धा नष्ट झालेली असतें, आणि ऐहिक सुखांची पराकाष्ठा हेंच संसाराचें मुख्य ध्येय होऊन बसलेलें असतें तेथें धनाच्या व ऐषआरामाच्या एकीकरणामुळें निर्धन व श्रीमंत यांच्यामधील भेद तीक्ष्ण होत जाऊन बोल्शेव्हिकांचा रोग समाजाला जडतो. हिंदुस्थानची धार्मिक श्रद्धा जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत धनिकांच्या राहणींतला साधेपणा नष्ट व्हावयाचा नाहीं आणि गोरगरिबांना धर्मसंस्थांतून मदत मिळून

धर्मकृत्यांस स्वतःला वाहून घेऊन पोळलेल्या हृदयांना शांत करून घेण्याचा मार्ग मोकळा राहणार आहे. युरोपांत धर्मश्रद्धा नाहींशी झाल्याचा परिणाम बोल्शेव्हिकांच्या प्लेगानें हल्टीस पडूं लागला आहे. बोल्शेव्हिकांचा रोग हें नास्तिक स्थितीचें एक अत्यंत कडू फळ होय. नास्तिक स्थितीला हें फळ यावयाचेंच. हिंदुस्थानांत ही नास्तिक स्थिति नसल्यामुळें हा रोग येथें घर करून बसेल अशी भीति नको. बोल्शेव्हिकांचीं तत्त्वें जरी यथारूढ झाली नाहींत तरी सरकारी सत्तेस अडवण्याचे व उलथून पाडण्याचे त्यांचें मार्ग येथील लोकांस शिकवण्यास ते कमी करणार नाहींत असें कांहींचें म्हणणें असून, या बोल्शेव्हिकांच्या विरुद्ध सरकारनें तीव्र उपाय योजले पाहिजेत असें मुंबईच्या टाईम्सचें मत आहे. रशियांतील बोल्शेव्हिकांच्या विरुद्ध सरकार जे उपाय योजील त्या उपायांस येथील प्रजाजनांची पूर्ण संमति मिळेल यांत संशय नाहीं. पण आतां यापुढें रशियांतील बोल्शेव्हिकांचा प्रसार हिंदुस्थानास होण्यासंबंधानें योजण्यांत यावयाचे उपाय, चोर घरांतून चोरी करून निघाल्यानंतर दाराला कडी घालून घेण्यासारखाच होणार आहे. हालचालींच्या मार्गांना अडथळा करण्याच्या उद्देशानें ज्यांचें कान फुंकून टाकणें इष्ट आहे असें रशियांतील बोल्शेव्हिकांना वाटलें त्यांचें कान त्यांनीं आज फुंकून टाकल्यासारखेंच आहेत; व आतां नवीन शिकवणूकच शिल्लक राहिलेली नाहीं. गुरूचें शिकवणें संपलें व शिष्याचा अभ्यास हि संपला. यापुढें या शाळा बंद करण्याचा हुकूम फोल होणार आहे. प्रत्येक लहान मोठ्या शहरांत लोकांचीं मनें प्रक्षुब्ध होऊन दंग्याधोप्यांचा समय जवळ आला असतांना हरएक प्रकारच्या दंग्यांचें पर्यवसान स्टेशनें, तारायंत्रें, पोस्ट ऑफिसें व सरकारी कचेऱ्या यांची जाळपोळ करण्यांत व्हावें म्हणून खटपट करणारे मूठभर तरी लोक हल्टीस पडणार आणि वरील निंद्य अनर्थांच्या गोष्टी इतक्या साध्या आहेत कीं, एखाद दुसऱ्यानें त्याक्षणीं

सुचविलें नाहीं तरी क्रोधाधीन स्थितींतहि दंगेखोरांच्या व्यवसायांत यापुढें स्या आल्यावांचून राहणार नाहींत. सरकारी हालचालीचें मर्मस्थान अशा रीतीनें वारंवार दुखविलें गेल्यास लोकांचेंहि अपरिमित नुकसान होणार अहें. नुकसान टाळण्याकरितां सरकारास अशा वेळीं मदत करणें हें सर्वांना इष्टच आहे. दंगेधोपे सुरू झाल्यानंतर पूर्वी सरकारचें कृत्य कसलेंहि असलें तरी शांतता राखण्याच्या कामीं सरकारास मदत करणें हें लोकांच्या फायद्याचेंच आहे. ही स्थिति ओळखूनच म. गांधी यांनीं सत्याग्रहाची चळवळ सांप्रत तहकूब ठेवली आहे. सत्याग्रहाची चळवळच खोटी आणि त्या चळवळीपासून बोल्शेव्हिकांचा रोग तेवढा व्हावयाचा अशीं या वेळीं कांहींनीं विधानें केलीं आहेत. आपल्या शहाणपणाचा फाजील ढेंभा मिरवण्याची ज्यांना चटक लागली आहे त्यांनीं असें करावें यांत नवल नाहीं. बोल्शेव्हिकांचा रोग प्रेमळ धर्मश्रद्धेनें व सत्याग्रहानेंच नेहमीं मर्यादेच्या आंत रहात असतो; तपस्वीच लोक त्या विषास आपल्या कंठाच्या अटकेंत ठेऊं शकतात. या तपस्व्यांना तुम्हीं समाजांतून काढून टाका म्हणजे बोल्शेव्हिकांचा रोग स्वतःच्या आज्ञेंतून बाहेर पडलाच असें समजा. धूर्त व ढोंगी बोल्शेव्हिक, सत्याग्रहाचीं भगवीं वस्त्रें पांघरून दंगेधोपे करूं लागले तर ज्या रौलेट-ॲक्टानें या ढोंग्यांच्या नाचाकरितां अंगण उत्पन्न करून दिलें त्या रौलेट ॲक्टालाच प्रथम रजा देणें इष्ट नाहीं काय? म. गांधी यांच्या सत्याग्रहाच्या चळवळीवर उगीच वोटें मोडून काय उपयोग? हा रौलेट ॲक्ट चांगला आहे असें कोणीहि विचारी मनुष्य म्हणत नाहीं. मग आतां त्या ॲक्टाची देशी भाषांतून भाषांतरें करून आणि खेडोपाडीं वाटून काय उपयोग होणार आहे? सरकारनें खुशाल हा उपाय योजावा; आमची ना नाहीं. सर्व मामलेदारांनीं, फौजदारांनीं, पाटील कुलकर्ण्यांनीं देशी भाषांतून या कायद्याच्या व त्यावरील खलाशाच्या एकादशण्या सरकारी चावडींत गांवच्या सर्व लोकांना अभि-

श्रवणाला बोलावून अवश्य कराव्यात; त्याबद्दल आमची हरकत नाहीं. आमची पक्की खात्री आहे कीं, खेड्यापाड्यांतील लोकहि हा कायदा जसा-जसा अधिक वाचूं लागतील तसतसे त्याचें हिडिस स्वरूप लोकांच्या दृष्टीस अधिकच पडूं लागेल. चोहींकडे अशा प्रकारचे दंगेधोपे चालले असतांनाहि मुंबई शहरांतील बॅरिस्टरांच्या व वकिलांच्या समाजानें या कायद्याची चर्चा करून या कायद्यांतून दुर्गंधीशिवाय कांहीं बाहेर पडूं शकत नाहीं असें ठरविलें आहे. मुंबईचे प्रमुख बॅरिस्टर व वकील एकें ठिकाणीं जमून अशी चर्चा करीत असतांना, या कायद्याचें समर्थन करणारा एकहि प्राणी त्या सभेस गेला नाहीं ही ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. मग देशी भाषांतून त्या कायद्याच्या चांगुलपणाचें प्रदर्शन कसें करावयाचें ? इंग्रजी भाषेंतून जाणणारांपुढें आणि त्यांतल्या त्यांत वकिलांच्या पुढें जर कोणालाहि या कायद्यांतील चांगुलपणा दाखवितां येत नाहीं तर नुसत्या भाषांतरानें काय व्हावयाचें आहे ? विहिरींत नाहीं तर पोहऱ्यांत कोठून येणार ? मुंबईतील कांहीं अँग्लो-इंडियन छापखान्यांच्या देशी भागांना वर्ण्या मिळविण्याची ही एक युक्ति दिसते, या पलिकडे त्यांत कांहीं तथ्य दिसत नाहीं. या ढोंगी लोकांच्या घरीं वर्णीच्या रूपानें मुंबई सरकारच्या तिजोरींतील हजारो रुपये जावयाचेच असले आणि तेवढ्यानें जर सरकारचें मन शांत होत असलें तर त्यास अडथळा तरी कां करावा ? पण सांप्रतच्या स्थितीचा विचार करतांना असल्या क्षुल्लक ढोंगांना फाजील महत्त्व देणें हें कोणाला केव्हांहि इष्ट नाहीं. मुंबईस व दिल्लीस जे मोठमोठें अधिकारी मोठमोठे पगार देऊन ठेवण्यांत आलेले आहेत ते अंधार दिसून बोल्शेव्हिकाचें भूत म्हणून टाईम्सनें किंकाळी फोटण्याबरोबर

रामरक्षेचा पाठ

म्हणणाऱ्या भटजींना दक्षणा देण्याकरितां नेमलेले नाहींत. मुत्सद्यांचें हें

काम नव्हे; गव्हर्नर जनरल व गव्हर्नर हे राजे आहेत व मुत्सद्दी आहेत. राजे या नात्यानें पोलिसची शक्ति, प्रेस ॲक्टची शक्ति, १८१८ च्या कायद्यानें लोकांना उचलून कैदेंत टाकण्याची शक्ति आणि लष्करची शक्ति या सर्व शक्तींचा उपयोग शांतता राखण्याकरितां त्यांनीं केला पाहिजे. हिंदुस्थान सरकारनें अमृतसर, लाहोर, गुजराणवाला वगैरे पंजाबांतील चार, पांच जिल्ह्यांत लष्करी कायदा सुरू केला आहे; सभाबंदीचाहि कायदा लागू केला आहे; अमृतसर येथील आणखी कित्येक पुढाऱ्यांना उचलून कैदेंत टाकलें आहे; लाला रामभुज दत्त चौधरी, लाला हरकिसनलाल वगैरे पुढारी आज कैदेंत आहेत; लाहोरची बादशाही मशीद सोल्जरांच्या हातांत आहे; कित्येक मुसलमान पुढाऱ्यांना गिरफदार करण्यांत आलें. ट्रायब्यून व पंजाबी ही पंजाबचीं मुख्य पत्रें तूर्त बंद पडलीं असून ट्रायब्यूनचे संपादकांस अटकेंत ठेवण्यांत आलें आहे; सरकारी भात्यांतील सर्व प्रकारचे नवे जुने बाण आज पंजाबावर सोडण्यांत आलेले आहेत, अमृतसर व लाहोर येथें बंडच सुरू आहे असें सरकारतर्फे जाहीर करण्यांत आलें असून पंजाबचे हें बंड शांत होत चालल्याचेंहि आतां प्रसिद्ध झालें आहे, दंग्याधोप्याच्या व बंडाच्या वेळीं हरएक प्रकारचा बाण योजून कशी बशी शांतता पुन्हां एकदां स्थापणें हें राजाचें काम आहे. राजे या नात्यानें करावयाच्या कृत्यां-बद्दल चर्चा करण्याची वेळ आजची नव्हे. पण राजे या नात्यानें अंगांत घालावयाच्या चिलखताच्या आंत मुत्सद्दीपणाच्या नालायकीची घाण जर कोणी झांकूं लागला तर त्याच्या त्या कृत्यास मान तुकवणें म्हणजें इंग्रज बादशहाचें घरीं अपराधी होणें होय. रौलेट ॲक्ट पास करण्यांत मुत्सद्दी-पणाचा जो अभाव दाखविण्यांत आला तो सर मायकेल ओडवायर यांच्या-सारख्या अदूरदर्शी व दुराग्रही कोठावळ्यांची छाप सिमल्यावर अधिक बसली म्हणून होय. मुंबई सरकारचें राजकीय वातावरण गेलीं चार पांच

यापैं जर पंजाबांत दिसलें असतें तर रौलेट ॲक्ट पासच झाला नसता-आणि दडपशाहीचा रोगहि सिमल्यास जडला नसता. सर मायकेल ओडवायर यांच्या जागीं लॉर्ड विलिंग्डन किंवा सर जॉर्ज लॉईड हे जर पंजाबचे गव्हर्नर असते तर रौलेट ॲक्ट पास होऊन महात्मा गांधींच्या सत्या-ग्रहाच्या चळवळीनंतर.दिल्ली, अमृतसर, लाहोर येथें बंडाच्या आरोळ्या ऐकूंच आल्या नसत्या; महात्मा गांधी यांना खुशाल दिल्लीस व पंजाबांत जाण्याची परवानगी मिळाली असती; लोकांनीं एक दोन दिवस उपास केले असते; व पुनः सत्याग्रहाचे ठराविक कायदे मोडण्यापलिकडे कोठेंहि कांहीं झालें नसतें. पण अति शहाण्याचा वैल रिकामा ह्या नात्यानें, सर मायकेल यांच्या अति शहाणपणामुळें अहमदाबाद, दिल्ली, अमृतसर, लाहोर येथील सरकारी वैलांच्या पाठीवरील गोण्या लुटून गेल्या, आणि रिकाम्या वैलांना प्रजेच्या पोटांत शिंगें खुपसण्याचें लष्करी काम करावें लागलें. आज कित्येक महिने बोल्शेव्हिकांच्या कथा सर्वांच्या कानीं, कपाळीं पडत असतांना, दुष्काळ, इन्फ्लुएंझा वगैरे आपत्तींना लोक त्रस्त झाले आहेत हें माहीत असतांना, तुर्कस्थानच्या विचित्र स्थितीमुळें मुसलमानांची मनोवृत्ती अस्थिर होण्या-सारखी आहे, याचें पूर्ण ज्ञान असतांना, लढाईच्या अखेरीस तहाच्या परिषदेमध्यें होत असलेल्या स्वसंमतीच्या तत्त्वाच्या खलानें हिंदुस्थानच्या राजकीय आकांक्षा सतेज होणें अपरिहार्य आहे असें स्वतः बोलून दाखवीत असतांनाहि ज्यांना रौलेट ॲक्ट कायदा पास झाला असतां लोकांचीं मनें प्रक्षुब्ध होणार नाहींत असें वाटलें ते सर मायकेल ओडवायरसारखे हिंदुस्थान सरकारचे सल्लागार, मुत्सद्दी या नात्यानें आज नालायक ठरले आहेत. गेल्या पंधरा दिवसांच्या धुमाकुळीनें त्यांच्या मस्तकावर नालायकीचा शिक्का ढळढळीत मारलेला आहे, हा पुसला जाणें शक्य नाहीं. सांप्रतचे दंगेधोपे नाहींसे करण्यास सरकारनें योजलेल्या उपायांच्या आड कोणीहि

येऊं इच्छित नाहीं, पण हे उपाय योजतांना वरील नालायकी घवून पुसून टाकण्याच्या हेतूनें जर सनदशील व सत्वशीर चळवळींचा छळ करण्यांत आला तर पहिल्या नालायकींत दुसऱ्या नालायकीची भर पडून एकीकडचें पाप जाळतांना दुसरें पाप पोसल्यासारखें होईल. तेव्हां यावेळीं राजे या नात्यानें शांतता राखण्याकरितां पोलिसची व लष्करची सत्ता योग्य काळ-पर्यंत सरकारनें उपयोगांत आणणें जरी अयोग्य होणार नाहीं तरी पण प्रेस ॲक्ट, सभाबंदीचे ॲक्ट, १८१८ चा कायदा असलीं नवीं जुनीं भुतें लष्करच्या मदतीस बोलावणें अयोग्यच होय. अशा स्थितींत अधिकाऱ्यांनीं सत्याग्रहाचे चळवळीवर दोषाचें खापर न फोडतां जर रौलेट अक्टाची चूक दुरुस्त केली, आणि दडपशाहीला उत्तेजन दिलें नाहीं, तर शांतता राखण्यास लष्कराला बोलावण्याची जरुरीच राहणार नाहीं.

* अकाळ विकाळ शिक्षा

पंजाबांतील लाहोरचे सन्माननीय पुढारी लाला हिरकिसनलाल, पं. राज-भुजदत्त चौधरी आणि लाला धुनीचंद यांना गेल्या आठवड्यांत जन्मठेप काळेपाणी व सर्व मालमत्तेची जप्ती अशा शिक्षा ठोठावण्यांत आल्या. अमृतसरचे डॉ. किश्चलू व डॉ. सत्यपाल यांना जन्मठेप काळेपाणी मिळून महमद बाशीर यांना फांशीची शिक्षा झाली. वरील शिक्षा सांगतांना पंजाबांतील मार्शल लॉ कोर्टानें जें अकाळ विकाळ स्वरूप धारण केलें त्यामुळें सर्व हिंदुस्थानांत पुन्हां गडबड सुरू झाली असून त्या शिक्षांची अंमलबजावणी लाटसाहेबांनीं करूं नये अशा आशयाच्या तारा हिंदुस्थानांतील सर्व भागांतून लाटसाहेबांकडे गेल्या आहेत. पंजाबांतील मार्शल लॉ कोर्टानें आतांपर्यंत शेकडों लोकांस अटक व शिक्षा दिल्या असून ७०।८० लोकांस फांशीच्याहि शिक्षा दिल्या आहेत. या शिक्षांतील कडकपणा कमी करण्याविषयींहि हिंदुस्थानांतून ठिकठिकाणांहून तारा गेल्या असून स्टेटसेक्रेटरीसाहेबांच्या हुकमानें दोन इसमांच्या फांशीच्या शिक्षा तहकूब करण्यांत आल्या आहेत. बाबू कालिनाथ राय यांचीहि दोन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा लाटसाहेबांच्या हुकमानें तीन महिन्यावर आणण्यांत आली आहे. पंजाबांतील सर्व प्रकारचा विचार करण्याकरितां हिंदुस्थान सरकारच्या संमतीनें स्टेट सेक्रेटरीसाहेब लवकरच एक कमिशन नेमणार आहेत. हें कमिशन नेमण्यांत येणार ही बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर पंजाबांतील शिक्षा–सत्राचें स्वरूप पूर्वीइतकें उग्र राहणार नाहीं अशी आशा वाटूं लागली होती. पण लाहोर व अमृतसर येथील कटांच्या खटल्यांत सन्माननीय पुढाऱ्यांना ज्या भयंकर शिक्षा देण्यांत आल्या आहेत त्यांजकडे लक्ष दिलें असतांना राजकीय चळवळ

---

* केसरी, ता. १५ जुलै १९१९

करणारांना शिक्षांचा वागुल्बोवा दाखवून पुढाऱ्यांना सोसाव्या लागणाऱ्या हालअपेष्टांच्या अकाळ विकाळ स्वरूपाचें प्रदर्शन सर्व लोकांपुढें एकसारखें करून राजकीय चळवळ जमिनदोस्त करण्याचे कट माजी ले. गव्हर्नर यांच्या कृपाछत्राखालीं मार्शल लॉच्या वेळीं पंजाबांत बराच माजून राहिला होता असें म्हणणें भाग पडतें. लाहोर व अमृतसर येथील कटांच्या खटल्यांत सरकारतर्फेचा मुख्य पुरावा काय तो रौलेट ॲक्टासंबंधानें निरनिराळ्या वेळीं वरील पुढाऱ्यांनीं केलेलीं भाषणें होत. कायदे कौन्सिलांत रौलेट बिल पास होऊं नये व बिल पास झाल्यावर सदर कायद्यास बादशाही संमति मिळूं नये म्हणून सर्व हिंदुस्थानभर जी चळवळ झाली ती चळवळ पंजाबनेंहि इतरांप्रमाणें केली. लाहोर व अमृतसर येथें कित्येक सभा झाल्या, या सभा बोलावण्याच्या आमंत्रणपत्रिका व तेथें झालेलीं भाषणें व ठराव हाच काय तो सरकारी मुख्य पुरावा; याशिवाय अमृतसरचे डॉ. किश्चलू यांच्याजवळ असलेलें व सत्याग्रहाची शपथ घेतलेले मि. हंसराज यांना माफीचा साक्षीदार म्हणून पुढें आणून सत्याग्रहाची शपथ म्हणजे नुसतें बाहेरचे पांघरूण होतें आणि दंगेधोपे करणें हाच मुख्य हेतु होता अशीं जीं मुक्ताफळें त्यांच्या तोंडून बाहेर निघालीं; त्याजवरहि कोर्टानें बराच जोर दिलेला आहे. तथापि वरील सन्माननीय पुढाऱ्यांना ज्या शिक्षा सांगण्यांत आल्या, त्या दंग्याधोप्यांत ते सामील होते म्हणून नव्हे तर रौलेट ॲक्ट यांच्या विरुद्ध सर्व हिंदुस्थानभर चळवळ चालली असतांना इतर ठिकाणाप्रमाणें त्यांनींहि भाषणें केलीं म्हणून ! पंजाबांत दंगेधोपे होण्याच्या पूर्वी यांनीं रौलेट ॲक्टचें निमित्त करून भाषणें केलीं आणि या भाषणांनीं लोक चिडून जाऊन दंगेधोपे करतील अशी त्यांनीं अटकळ बांधलेली होती, हा काय तो सरकारी पुराव्यांतील मतितार्थ आहे. मनांतले गुप्त हेतू बाहेर आणण्याकरितां माफीचा साक्षीदार हंसराज यांस पुढें आणलें आहे. माफीच्या

साक्षीदारावर अशा वेळीं विश्वास केव्हांहि ठेवणें योग्य नाहीं. बरें, आपण कल्पना करूं कीं, मनांत कांहीं गुप्त हेतु ठेवून लाला हरकिसनलाल वगैरे लाहोरच्या पुढाऱ्यांनीं भाषणें केलीं; तीं भाषणें तरी कोणत्या स्वरूपाचीं होतीं. या कटाच्या खटल्याचे आरोपीतर्फेचें बॅ. हसन इमाम यांनीं कोर्टापुढें पुरावा म्हणून हजर करण्यांत आलेल्या भाषणांची व वरिष्ठ कायदे–कौन्सिलांतील भाषणांचीं तुलना करून असें सिद्ध केलें कीं,

मवाळांचेंच प्रतिबिंब

लाहोरच्या पुढाऱ्यांच्या भाषणांत पूर्णपणें पडलेलें आहे. कायदे–कौन्सिलांत ना. शास्त्री व ना. सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं जशा प्रकारचीं भाषणें केलीं तशाच प्रकारचीं भाषणें लाहोर, अमृतसर येथील पुढाऱ्यांचीं आहेत, असें बॅ. हसन इमाम यांनी सिद्ध केलें. हा कटाचा खटला लाहोर व अमृतसर येथील पुढाऱ्यांवर नसून ना. शास्त्री व ना. सुरेंद्रनाथ बानर्जी वगैरे वरिष्ठ कौन्सिलांतील मवाळांवरच हा खटला आहे असें समजूनच चालले पाहिजे, असा बॅ. हसन इमाम यांचा मुख्य मुद्दा होता. नेमस्तांचीं भाषणें कायदे–कौन्सिलांत चालली असतांना त्या भाषणावर राजद्रोहाचे कटाचा किंवा बंडाचा लहानसाहि शिंतोडा सरकारतर्फें उडविण्यांत आला नाहीं, कटाच्या व बंडाच्या दृष्टीनें तीं भाषणें सोवळींच समजलीं गेलीं, कोणाच्या डोक्यांतच आलें नाहीं कीं, या भाषणांनीं कट उद्भवतील व बंडे होतील. सदर भाषणांविरुद्ध अशा प्रकारचा ब्रहि निघाला नाहीं. पण कायदे-कौन्सिलाबाहेर लाहोर येथें मवाळ पक्षाच्याच एका पुढाऱ्याच्या तोंडून तसलींच भाषणें बाहेर पडल्याबरोबर राजद्रोह, कट, फंदफितुरी वगैरे ओडवायरी–भुतावळ त्या भाषणांच्या सभोंवती जमून सन्माननीय पुढाऱ्यांना कोर्टांत खेचण्यांत येऊन जन्मठेप काळ्या पाण्याच्या शिक्षा ठोठावण्यांत आल्या, आणि लाला हरकिसनलाल यांची लाखो रुपयांची इस्टेट

सरकारजमा करण्यांत आलीं. बॅ. हसन इमाम यांनीं आपल्या आरोपींनीं केलेल्या भाषणांचीं तरफदारी फार चांगल्या रीतीनें केली. कायदे कौन्सि· लांतील मवाळांच्या भाषणांहूनहि तीं भाषणें अधिक सौम्य आहेत असें त्यांनीं सिद्ध करून दाखविलें. भाषणांचा सौम्यपणा कोर्टानें नाकबून केलेला नाहीं पण भेद काढलेला आहे कीं, कायदे–कौन्सिलांतील भाषणें लाटसाहेबांच्या पुढें झालीं आणि लाहोर व अमृतसर येथील रहिवाशी कायदे–कौन्सिलच्या सभासदांप्रमाणें विवेकी, शांत चित्ताचें व जबाबदारी ओळखणारे नसल्यामुळें लाला हरकिसनलाल वगैरेंचीं भाषणें फंदफतुरीची मानलीं पाहिजेत अशी कोर्टाची विचारसरणी पडून आरोपींना अकाल विकाळ शिक्षा देण्यांत आल्या. पंजाबातील मार्शल–लॉ–कोर्टाची वरील विचारसरणी बालिशतेची, मूर्ख-पणाची व मूर्तिमंत क्रूरपणासहि खालीं मान घालावयास लावणारी आहे यांत संशय नाहीं. कायदे–कौन्सिलांतील लाटसाहेबांपुढें केलेलीं भाषणें लाटसाहेबांना व इतरांना बंडखोर बनवूं शकत नाहींत, हा कोटिक्रम आमच्या लक्षांत आहे. पण रौलेट बिलाच्या वेळीं मवाळांनीं केलेलीं कायदे–कौन्सिलांतील भाषणें बाहेरच्या जगास आग लावणारीं बिलकूल नव्हतीं असा जो मुद्दा बॅ. हसन इमाम यांनीं कोर्टापुढें मांडला त्यांजकडे कोर्टानें पूर्णपणें दुर्लक्ष केलेलें आहे. रौलेट ॲक्टचा निषेध करणाऱ्या पक्षाला युक्तिवादांत हटविण्याकरितां सरकारी पक्ष कायदे–कौन्सि-लांत टपून बसलेला होता, पण बंड–फितूरीला उत्तेजक भाषणें मवाळांनीं केलीं असा दुरून दुरून संशयहि सरकारी पक्षाकडून दाखविण्यांत आला नाहीं. पण पंजाबांतील वातावरणांत मुळांतच कांहीं नाहीं अशा बंडफितुरीचा कट निर्माण करण्यांत आला आहे. बरे झाले, यावेळीं ना. शास्त्री व ना. सुरेंद्रनाथ बानर्जी विलायतेंत आहेत; नाहींतर लाला गोवर्धनदास यांच्या-प्रमाणें त्यांना मद्रासेंतून किंवा बंगाल्यांतून पंजाबांत खेचून नेण्यांत आलें

असते आणि या दोघांनाहि पंजाबच्या वातावरणांत फाशींची शिक्षा झाली असती. कायदे–कौसिलांतील रौलेट ॲक्टाच्या वेळच्या लोकांच्या पुढाऱ्यांच्या भाषणामुळें पंजाबांतील ओडवायरी वातावरण संतापानें चिडलें असून प्रख्यात पुढाऱ्यांचा बळी घेतल्याशिवाय मी शांत होणार नाहीं, असें या वातावरणानें खटल्यांतील निकालाच्या वाणीनें जाहीर केले आहे. कट-वाल्यांच्या यादींत म. गांधींचेंहि नांव इष्टीस पडतें. तिकडे विलायतेंत स्टेट सेक्रेटरी साहेब म. गांधींना साधू पुरुष समजतात आणि हिंदुस्थांत ओडवायरी वातावरण याच साधु पुरुषाच्या कृपाळावर बंड–फितुरी करणारा कटवाला म्हणून छाप मारते. लाहोर व अमृतसर येथील खटल्यांच्या निकालाकडे हिंदी राजकारणांतील लोकांनीं कोणत्या इष्टीनें पहावयाचे याचेहि धोरण पंजाबांतील अँग्लो–इंडियनांच्यातर्फे निकालावरोबरच प्रसिद्ध झालें आहे. सरकारी पक्षानें आपलें बगलबच्चे म्हणून जे मवाळ खाकेंत मारलें आहेत ते

मवाळच लबलबीत

आहेत असें या निकालांनीं ठाम सिद्ध झालें आहे. हें मवाळ इतकें लब-लबीत कसें झालें? राष्ट्रीय पक्षाची छाप त्यांच्यावर कायदे कौन्सिलांच्या वेळीं उमटविण्याइतके भिजलेल्या शाडूचे त्यांना कोणी केलें? नेमस्त पक्ष आम्हीं खाकेंत मारला आणि राष्ट्रीय पक्षानें त्यांना आमच्यावरच उलट भोंकावयास लावले हा चमत्कार कसा घडून आला? सिव्हिल अँड मिलटरी गॅझीटसारखे पंजाबांतील पत्रकार वरील शंकासंबंधानें स्वतःच्या मनाचें समाधान असें करून घेत आहेत कीं, मवाळांच्या अंगांत जोम नसल्यामुळें राष्ट्रीय पक्षाला स्वतःच्या अंगांतील कणखरपणाच्या जोरावर त्यास स्वतःकडे ओढून घेतां आले. राष्ट्रीय पक्ष काय करीत आहे? सरकारी अधिकाऱ्यांनींहि कणखरच झालें पाहिजे. लोखंडी सोटा आपल्या हातांत आहे

असें प्रजेच्या अनुभवास आणून दिलें पाहिजे; आणि नेमस्त पक्षाची बुद्धि जर राष्ट्रीय पक्षाशीं संलग्न होऊं लागली तर लाला हरकिसनलाल यांच्यासारख्या नेमस्तालाहि प्राणांतिक चोप देऊन राष्ट्रीय पक्षाकडे कोणाहि नेमस्ताची बुद्धि वळणार नाहीं, अशी दहशत उत्पन्न केली पाहिजे. अशी ह्या खटल्यांतील निकालाचें आधारावर सरकारास विनंति करण्यांत आली आहे. पंजाबांतील अकाळ विकाळ शिक्षांवर अशी टीका आहे कीं, सरकारी अधिकारी स्वतःच्या हातांतील राजसत्ता राष्ट्रीय पक्षाच्या हातांत बिलकूल देणार नाहींत, इतकेंच नव्हे तर स्वतःच्या मुठींत सर्व सत्ता दाबून ठेवणार आहेत, असें जर नेमस्तांच्या प्रत्ययास आणून देतील तर राष्ट्रीयांच्या चळवळींत कोणीहि नेमस्त रममाण झालेला दिसणार नाहीं. या असल्या आशयाच्या टीकेंत जीं तत्वें पुढें मांडण्यांत आलीं आहेत त्यांजकडे पाहिलें म्हणजे पंजाबांतील अकाळ विकाळ शिक्षांतील हेतु तेव्हांच ध्यानांत येतो. रौलेट बिलापासून नेमस्त व राष्ट्रीय पक्ष यांच्या विचारसरणींत जी एकी दृष्टीस पडत आहे ती एकी बुद्धिमत्तेच्या जोरावर नाहींशी करणें सरकारी पक्षाला अशक्य झालें आहे. आणि या एकीच्या विरुद्ध ओडवायरी—मंडळ तर मनापासून जळफळत राहिलें आहे. सर्व प्रांतांना व सर्व लोकांना जी एकी सुखाची वाटली व ज्या एकीपासून राष्ट्रकार्य कांहींना कांहीं तरी स्वराज्याच्या पार्लमेंटरी बिलाच्या रूपानेंच निष्पन्न होईल अशी आशा उत्पन्न झाली, त्या एकीवरच निष्ठुरतेनें व मदांधतेनें तीव्र बाण सोडून राष्ट्रीय पक्षाला नाहीं तर नेमस्त पक्षाला स्वतःचें भक्ष म्हणून खाऊन टाकून, दुसऱ्याला भयभीत करून आपल्या सभोंवती बिरट्या घालीत फिरावयास लावण्याच्या अक्कल-शून्य दंडुकेशाहीचा हा उद्योग आहे. लाला हरकिसनलाल यांची लाखो रुपयांची इस्टेट जरी जप्त झाली, ना. शास्त्री व ना. सुरेंद्रबाबू यांजवर लबलबीतपणाचे आरोप कितीहि करण्यांत आले तरी हल्लींचा नेमस्त पक्ष

राष्ट्रीय पक्षापासून स्वराज्यसंबंधाच्या एकंदर चळवळींत अगदीं अलग होणें शक्य नाहीं. मोर्ले–मिंटो यांच्या वेळेहून हल्लींची वेळ अगदीं निराळी आहे. राष्ट्र जागे झालेलें आहे व राष्ट्रकार्याकरितां राष्ट्रांतील निरनिराळ्या बुद्धींचा मिलाफ घडवून आणण्यांतच राष्ट्र सुख मानीत आहे. सर्व राष्ट्राची वृत्ती अशा प्रकारची असल्यामुळें व्यक्तिशः पुढाऱ्यांच्या हातीं भांडण करण्याचें थोडे उरले आहे. भांडण करूं म्हटलें तरी होणार नाहीं. अशा रीतीनें सर्व राष्ट्र राष्ट्रकार्याकरितां एकीचें सुख वृद्धिंगत करीत असतांना पंजाबांतील दंडुकेशाहीनें या एकीची बेकी करण्याचा जर प्रयत्न केला तर तो कधींहि सिद्धीस जाणार नाहीं. पंजाबांतील अकाळ विकाळ शिक्षांमुळें नेमस्तहि रागावतील, राष्ट्रीयांचाहि संताप दुणावून जाईल, आणि रौलेट बिलाच्या वेळची एकी या शिक्षांनीं अधिक दृढ होईल. या शिक्षेंतील रानटी क्रूरपणाची जी सत्ता कृपणपणानें मुठींत ठेवाची असें नोकरशाहींतील ओडवायरी पक्षास वाटत आहे, त्या सत्तेच्या प्रतिष्ठितपणासच उलट डळमळीत स्वरूप प्राप्त झाल्यावांचून राहणार नाहीं. कारण पंजाबांतील हें दोन निकाल जेव्हां हिंदुस्थानाबाहेर इंग्रजी साम्राज्यांत व दोस्त सरकारांच्या प्रदेशांत वाचले जातील तेव्हां तेथील सर्व उदार मतवादी सज्जन ओडवायरी कंपूला 'मा निषाद प्रतिष्टां त्वमगमः शाश्वतीः समाः' या वाल्मिकीच्या वाणीप्रमाणेंच शाप देण्यास चुकणार नाहींत.

---

* लुटुपुटीचें बंड व माफीचें बिल

पंजाबांत लष्करी कायदा चालू असतांना सरकारी अधिकाऱ्यांनीं जीं अनन्वित कृत्यें केलीं व ज्या कृत्यांबद्दल कायद्याचे कोर्टांत फिर्यादी झाल्या असतांना अधिकाऱ्यांचा बचाव होणें शक्य नाहीं, त्या कृत्यांबद्दल सर्व अधिकाऱ्यांना माफी देण्याचें सहा कलमी बिल हिंदुस्थान सरकारनें वरिष्ठ कायदे-कौन्सिलपुढें गेल्या आठवडयांत आणलें. गुरुवार व शुक्रवार दोन दिवस या बिलासंबंधानें सिमल्यास कडाक्याचा वादविवाद झाला, आणि पंजाबांतील दुष्कृत्यांची चौकशी करण्याकरितां नेमलेल्या कमिशनची चौकशी होऊन रिपोर्ट प्रसिद्ध होईपर्यंत या बिलाचा विचार लांबणीवर टाकण्यांत यावा अशी ना. चांदा यांची उपसूचना शुक्रवारीं सायंकाळीं नापास झाली. आज रोजीं या बिलासंबंधानें मतें घेऊन बिलास कायद्याचें स्वरूप येईल असा अंदाज आहे. गुरुवार व शुक्रवार हे दोन दिवस कायदे कौन्सिलमध्यें झालेला वादविवाद म्हणजे पंजाबच्या एकंदर स्थितीसंबंधाचा वादविवाद होय. बिलांतील कलमासंबंधानें वादविवाद झाला. पण तो गौण स्वरूपाचा होता. पं. मदनमोहन मालवीय एकंदर स्थितीसंबंधानें पाऊण तासच बोलले. सरकारतर्फेच्या झालेल्या भाषणांतहि असाच फरक दिसून आला. पंजाब-प्रकरणाची चौकशी करण्याकरितां नेमलेल्या कमिटीसंबंधाचा ठराव व माफीचें बिल या दोन बाबींसंबंधानें कायदे-कौन्सिलांत जो वादविवाद झाला त्यांत स्टेटसेक्रेटरींनीं या कमिटींत एक हिंदी व एक युरोपियन असे आणखी दोन सभासद दाखल करण्यास सांगितलें आहे. आणि शिक्षा झालेल्या

---

* केसरी ता. २३ सप्टेंबर १९१९

इसमांच्या खटल्यांची फेर तपासणी करण्याकरतां एक हिंदी व एक युरोपियन अशा दोन जज्जांची नेमणूक करण्याचें ठरविलें आहे असें कळलें. असो. कौन्सिलांत झालेल्या चर्चेकडे लक्ष दिलें असतां पंजाब प्रकरणाच्या बुडाशीं असलेली

बंड व दहशत

यांची जोडी प्राधान्येंकरून नजरेस पडते. सरकारला अशा माफीच्या बिलांची जरुरी काय होती ? आज पंजाबांत अधिकाऱ्यांवर एकसारख्या फिर्यादी लागणार होत्या आणि त्यांतून त्या अधिकाऱ्यांची सुटका झाली नसती तर सरकारी नोकर नाखुष झाले असते, असाहि प्रसंग ओढवलेला नव्हता. तसा प्रसंग प्रत्यक्ष ओढवला असता तर सरकारनें आपल्या अधिकाऱ्यांचा बचाव करण्याकरितां असलें माफीचें बिल घाईनें पुढें आणलें असतें तर गोष्ट निराळी होती. क्राफर्ड–कमिशनांतील मामलेदारांना माफी देण्याचा कायदा जसा सरकारनें मागाहून पास करून घेतला त्याप्रमाणें हें माफीचें बिलहि पंजाबच्या कमिशनच्या रिपोर्टानंतर पास करून घेण्यास कोणतीच हरकत नव्हती. सरकारजवळ सरकारी नामदारांच्या मताचा भक्कम भारा होताच; मग हें बिल आगाऊच आणण्याची इतकी घाई कां ? कमिशनचा रिपोर्ट होण्याच्या पूर्वीच असलें बिल आणलें पाहिजे असला पूर्वीच्या वहिवाटीचा कोठेंच निर्बंध नाहीं. वरील प्रकारचा स्पष्ट अभिप्राय सर नारायण चंदावरकर व बॅ. दास यांनीं प्रसिद्ध केला आहे. कमिशनच्या रिपोर्टानंतर माफीचें बिल आणलें तरी चालतें. अगोदरच आणलें पाहिजे हा मुद्दा सिद्ध करण्यास वरिष्ठ कायदे-कौन्सिलांतील कायदेकानूचे सरकारी नामदार सर लौंडिस यांनीं कोणतेंहि प्रमाण पुढें मांडलें नाहीं. मग इतकी घाई कां ? राजाच्या खुनाच्या तेराव्याच्या पोळ्या आणि राणीशीं पाट लावण्याबद्दलच्या पोळया एकाच दिवशीं झोडण्याच्या कामांत अत्यंत

तिरस्काराहं घाई दाखविल्याबद्दल हॅम्लेटला जशा प्रकारची चीड आली होती, तसल्या मासल्याची चीड हिंदुस्थानांत चोहोंकडे उत्पन्न करण्याइतकी घाई या माफीच्या बिलासंबंधानें दाखविण्याचें प्रयोजन काय ? या घाईनें हिंदुस्थान सरकारनें साधलें तें काय? हिंदुस्थानांत पंजाब-प्रकरण जसें उद्भवलें त्याप्रमाणें ईजिप्तांतहि त्याच सुमारास दंगेधोपे झाले; आणि जपानच्या ताब्यांत असलेल्या कोरिया प्रांतांतहि असल्याच दंग्याची साथ उद्भवली होती. पण कोरियांत बंड सुरू झालें असें कोणीं जाहीर केलें नाहीं. ईजिप्तमध्यें राष्ट्रीय पक्षाचे पुढारी तहाच्या परिषदेस हजर राहण्याची परवानगी मागत असतांना त्यांना ती परवानगी मिळाळी नाहीं, ही तक्रार इंग्लंडच्या नजरेस आणण्याकरितां ईजिप्तमध्यें दंगे झाले व लष्कराकडूनच दंगे मोडण्यांत आले विवक्षित कार्य, विवक्षित तक्रार व दंग्याचें ठराविक स्वरूप असा तेथें मेळ घातला. कोरियांतील लोकांनींहि आपणांत स्वसंमतीचें तत्त्व लावलें पाहिजे म्हणून हट्ट धरला व या हट्टांतूनच कोरियांतील दंग्याधोप्याचा उगम झाला. जपानी अधिकाऱ्यांनीं हे दंगेधोपे शांत केले आणि जगाच्या सांप्रतच्या राहटींकडे लक्ष देऊन कोरियन लोकांना जपानी लोकांइतके हरएक प्रकारचे हक्क आस्ते आस्ते देण्यांत येतील असा बादशाही जाहीरनामा लवकर प्रसिद्ध केला. कोरियांतील दंग्याधोप्यांमुळें हा बादशाही जाहीरनामा लवकर बाहेर पडला. हा जाहीरनामा प्रसिद्ध करतांना जपानच्या मुख्य मंत्र्यांनीं कोरियांतील दंगेधोपे शांत करण्यांत गुंतलेल्या अधिकाऱ्यांच्या दुष्कृत्यांवर पांघरूण घालण्याचें नाकारलें. इतकेंच नव्हे तर असल्या दुष्कृत्यांचीं जीं ठळक उदाहरणें पुढें आलीं होतीं, त्यांची चौकशी होऊन अधिकाऱ्यांना त्या त्या खात्यामार्फत योग्य शिक्षाहि करण्यांत आल्या आहेत, असेंहि जपानांत जाहीर करण्यांत आलें. कोरियांत स्वराज्याच्या हक्काकरितां दंगेधोपे झालें. हिंदुस्थानाप्रमाणें कोरियास स्वराज्य आस्ते–आस्ते मिळण्याचें

आश्वासन मिळालें आणि अधिकाऱ्यांच्या दुष्कृत्याबद्दल अधिकाऱ्यांवर टपकाहि ठेवण्यांत आला. कोरियांत जसें झालें तसेंच हिंदुस्थानांत कां झालें नाहीं ? वरील गोष्टीबरोबरच कोरियांत दुसरी एक गोष्ट घडून आली ती हिंदुस्थानांत न आल्यामुळें हिंदुस्थानांत हें माफीचें बिल निंद्यपणाच्या घाईघाईनें पुढें करण्यांत येत आहे. कोरियन लोकांना जपानी लोकांच्या बरोबरीनें हक्क मिळतां कामा नये असें जपानी नोकरशाहीचें कोरियांतल्या वादाच्यावेळीं म्हणणें होतें. हें म्हणणें कोरियाच्या गव्हर्नरजनरल साहेबांनीं उचलून धरलें होतें, आणि या म्हणण्याचें समर्थन करून कोरियन लोकांस दहशत बसवण्याकरितां सदर लाटसाहेबांचे ओडवायर साहेबांसारखे एक हस्तक दंग्याधोप्याच्या वेळीं कोरियन लोकांना झोडपून काढण्यांत प्रमुख होते. हा

कोरियन ओडवायर

व त्याला उचलून धरणारे कोरियन लाटसाहेब या दोघांनाहि जपानी मंत्रिमंडळानें कोरियांतील आपली नोकरी सोडून जाण्यास परवानगी दिली आणि नवीन लाटसाहेब आणि नवीन सेक्रेटरी नेमून कोरियांतील स्वराज्याच्या काळास सुरुवात केली. जिंकलेल्या लोकांना वागविण्यांत जपानच्या मंत्रिमंडळानें जें शहाणपणाचें व औदार्याचें धोरण स्वीकारलें तेंच धोरण तितक्याच ठामपणानें जर इंग्रजी मंत्रिमंडळानें या प्रसंगीं स्वीकारलें असतें आणि सर ओडवायर यांच्याबरोबरच इंग्लंडास सहगमन करण्याची परवानगी जर सिमल्याच्या लाटसाहेबांनाहि माँटेग्यू साहेबांनीं दिली असती तर कोरियन प्रकरणाशीं तुलना करतांना पंजाबप्रकरण खात्रीनें इतकें हिडिस दिसलें नसतें. औदर्याच्या तत्त्वांत जपानपेक्षां इंग्लंड मागें आहे अशांतला भाग मुळींच नाहीं. स्वराज्याचीं तत्त्वें व स्वसंमतीचीं तत्त्वें इंग्लंडनेंच अलिकडे

विशेष पुढें आणलीं व जपाननें नुसतें अनुकरण केलें. पण कोरियांतील नोकरशाही जपानच्या मुठींत असल्यासारखी आहे आणि हिंदुस्थानांतील नोकरशाही वेलगामी आहे. 'अरेरावीपणाचे पाठीराखे' असें दूषण देऊन अमेरिका आपल्या महत्त्वाकांक्षेच्या आड येईल ही भीति जपानला आज जितकी आहे तितकीच इंग्लंडलाहि आहे. शांटंग प्रांतासंबंधानें, चीनच्या गुप्त तहासंबंधानें व मांगोलियांतील चंचुप्रवेशासंबंधानें जपानला अमेरिकेंत नावें ठेवण्यांत येतात, पण इंग्लंडलाहि कोठें नावें ठेवण्यांत येत नाहींत ? आयर्लंड, ईजिप्त, हिंदुस्थान, इराण येथील इंग्लंडचीं अरेरावीपणाचीं कृत्यें पुढें मांडून अमेरिकेच्या सीनेट सभेंतील पुढारी जर्मन तहास संमति देऊं नका आणि इंग्लंडचें प्रस्थ माजवूं नका, असा उपदेश अमेरिकेस आज करीत आहेत. जगांतील शिष्टमंडळांत आपलें हंसें होईल ही भीति जपान व इंग्लंड या दोघांनांहि आज सारखीच आहे. या भीतीमुळें म्हणा किंवा मूळच्या औदार्यामुळें म्हणा, किंवा जिंकलेले लोकच महायुद्धानें वरच्या पायरीवर नेऊन ठेवले म्हणून म्हणा, दोघांनींहि जिंकलेल्या प्रजाजनांना स्वराज्य देऊं केलें. स्वराज्यदानाची क्रिया दोहीं ठिकाणीं एकाच नमुन्याची होत असतांना कोरियांतील लाटसाहेब परत स्वदेशास गेले आणि दंग्याच्या वेळीं प्रजाजनांवर नाहक जुलूम करणाऱ्या जपानी अधिकाऱ्यांना तिकडे कडक शिक्षा झाल्या. आणि इकडे हिंदुस्थानांत मात्र मॉंटेग्यू-चेम्सफर्ड रिपोर्टाचे पाय मागें ओढूं पाहणारे लाटसाहेब सिमल्याच्या कायदे कौन्सिलांत आपल्या सर्व हस्तकांना माफीची खैरात वाटण्याचें बिल मोठया डौलानें पास करून घेत आहेत. या बिलाला पं. मदनमोहन मालवीय व ना. चांदा यांनीं गेले गुरुवारीं व शुक्रवारीं आपल्याकडूनच शक्य तितका विरोध केला. पंडितजींचें पहिल्या चार तासांचें भाषण

'मुलें कुठार:'

अशा धर्तीचें सणसणीत झालें. पंडितजींनीं विचारलेल्या ९२ प्रश्नांपैकीं ७५ प्रश्नांना लाटसाहेबांनीं कायदे-कौन्सिलांत मज्जाव केला होता. पण पंडितजींनीं या माफीच्या बिलाची आज जरुरी कशी नाहीं हें सिद्ध करतांना पंजाबांत बंड झालें नव्हतें तर उगीच बंडाची ओरड करून पंजाबी लोकांना दहशत बसण्याकरितां ओडवायरी सांप्रदायानें नाहक झोडपून काढले, अशी आपली फिर्याद स्वच्छ भाषेंत कौन्सिलपुढें मांडली. लोकांची सत्याग्रहाची चळवळ दंग्याधोप्याशिवाय शांतपणें पंजाबांत चालली होती. अमृतसर येथें डॉ. किश्चलू व डॉ. सत्यपाल यांना जर अटकेंत ठेवण्यांत आले नसते आणि या बाबींत अमृतसरच्या कमिशनरसाहेबांकडे दाद मागण्याकरितां जाणाऱ्या लोकसमूहावर जर रेल्वेच्या पुलाजवळ गोळ्या घालण्यांत आल्या नसत्या तर पंजाबांतील आठ युरोपियनांचे खून, स्टेशनांची नासधूस व इतर दंगेधोपे बिलकूल झाले नसते, असा पंडितजींचा मुख्य मुद्दा आहे. लाहोर येथेंहि आगळिक प्रथम अधिकाऱ्यांकडून झाली. पंजाबांत आगगाडयांच्या व बँकांच्या मालमत्तेची बरीच जाळपोळ झाली व आठ युरोपियन नाहक मारले गेले, याबद्दल सर्व हिंदुस्थानाबरोबर पंडितजींनाहि अत्यंत वाईट वाटत आहे. पण हे दंगेधोपे रौलेट ॲक्टाच्या चळवळीनें उत्पन्न झाले नाहींत, सत्याग्रहाच्या चळवळीनें उत्पन्न झाले नाहींत, किंवा इंग्रजी राज्य हिंदुस्थानांतून काढून टाकावें असल्या प्रेरणेनेंहि उत्पन्न झाले नाहींत. पंडितजींची मुख्य फिर्याद अशी आहे कीं, बंड करण्याची इच्छा पंजाबी लोकांत रौलेट-ॲक्टाच्या किंवा सत्याग्रहाच्या चळवळीच्या वेळीं बिलकुल नव्हती, शांततेच्या सनदशीर मार्गानेंच रौलेट ॲक्टाची व सत्याग्रहाची चळवळ चाललेली होती. या चळवळीचें शांततेचें स्वरूप लोकांनीं मोडलें नाहीं, तर ओडवायरी सांप्रदायाच्या नोकरशाहीनें मोडलें. चळवळीचें शांततेचें स्वरूप नाहींसें करून

चळवळीला दंग्याधोप्याचें स्वरूप देण्यांत लोकांना कांहींच फायदा नव्हता. इंग्रजांच्या विरुद्ध बंड करण्याची जेथें मुळांतच इच्छाहि नाहीं व जरुरीहि नाहीं आणि बंड करण्यापासून हरएक प्रकारचें नुकसान आहे, अशी जेथें जाणीव आहे तेथें बंडाचें बीज असणार तरी कसें ? बंडे शब्दांनीं, व्याख्यानांनीं, कागदांनीं व लेखणींनीं होत नसतात, हें न समजण्याइतके पंजाबचे लोक खात्रीनें मूर्ख नाहींत. महायुद्धांत इंग्रजांचा पूर्ण विजय झाल्यानंतर अफगाणिस्थानांतील बोल्शेव्हिकांच्या नादीं लागणारा प्राणी पंजबांतील हिंदूंत काय, मुसलमानांत काय किंवा शिखांत काय सांपडणें कठीण होतें. रौलेट कमिशननें वर्णन केलेल्या मूठभर हिंदी बंडखोरांचें कागदी सरकार अफगाणिस्तानांतील एखाद्या खेडयांत कसेंबसें पोट भरत राहून अफगाण-लढाईच्या वेळीं सरहद्दीवरील थाल प्रदेशांत आगगाडया व तारायंत्रें तोडण्यास प्रोत्साहन देणारा जाहीरनामा लिहून काढावयास पुढें आलें नसेल असें नाहीं; पण तेवढया जाहीरनाम्यावरून किंवा पेशावर येथील अफगाणी पोस्टमास्तराच्या पत्रावरून पंजाबी लोकांची बंडखोर वृत्ति शाबीत होऊं शकत नाहीं. असलीं पत्रें व हे असले जाहीरनामे चार चटोर पोरांच्या खेळांतहि जन्मास येतात. पंजाबसारख्या प्रांताची बंडखोर वृत्ति असल्या चटोरपणाच्या खेळांनीं सिद्ध होऊं शकत नाहीं. अफगाणी पत्रव्यवहारांतील पडलेलें वरील प्रकारचे कागदपत्र दाखवून पंजाब प्रकरणाच्या भयंकर स्वरूपाबद्दल अनुकूल मत बेझंट बाई व ना. शास्त्री यांच्या तोंडून त्यावेळीं वदवण्यांत आलें होतें आणि 'उंदीर मांजरास साक्षी' या न्यायानें वरील दोन उंदरांनीं पंजाबच्या बोकोबांना जरी अनुमोदन दिलें होतें तरी त्याच अनुमोदनाचा उपयोग परवां सिमल्यास करण्यांत आला तसा करण्यांत येईल, असें आम्हास वाटलें नव्हतें. पंडितजींना अडविण्याकरितां पंजाबचें सेक्रेटरी मि. थॉमसन, दिल्लीचें दंग्याचे वेळचे कमिशनर

मि. हॅले, सर व्हिन्सेट वगैरे सरकारी अधिकाऱ्यांनीं जीं भाषणें केलीं त्या भाषणांत ना. शास्त्री व बेझंट बाई यांना पंडितजींच्या तोंडावर फेकण्यांत आलें. पंजाबांत बंड झालें असें कां म्हणतां? पंजाबी बंडखोर नसतांना बंडाची प्रवृत्ती पंजाब्यांच्या गळ्यांत कां बांधतां? सत्याग्रहासारखी सोज्वळ चळवळ सुरू असतांना तिला बंडाचें स्वरूप कां देतां? पंडितजींच्या या मुख्य मुद्यांवर उत्तर देण्यांत मि. थॉमसन व मि. हॅले यांनीं मुख्यतः असें सांगितलें कीं, सत्याग्रहाच्या मागें दुसऱ्या भयंकर चळवळी उभ्या होत्या असें ना. शास्त्री व बेझंटबाई यांचेंहि म्हणणें होतें. हा उलट पक्षाचा पहिला साक्षीपुरावा झाला. आठ युरोपियन मारले गेलें; बँकांच्या व अगगाडयांच्या मालमत्तेची कित्येक लाखांची खराबी झाली, हा दुसरा पुरावा बंडखोर वृत्ती शाबीत करण्यास पुढें मांडण्यांत आला. थॉमसनसाहेब व हॅलेसाहेब या जोडीनें पंडितजींवर येथेच्छ तोंडसुख घेऊन पंडितजींची माहिती अपूर्ण, भलत्याच दृष्टीची व गैरसमज करण्याकरितां पुढें मांडलेली आहे, असा उलट हल्ला पंडितजींवर चढविला. पण लोक शांतपणें रौलेट ॲक्टाच्या विरुद्ध सत्याग्रहाची चळवळ करीत होते, त्यांच्यावर जर गोळ्या घालण्यांत आल्या नसत्या तर पंजाबांत वरील प्रकारचे दंगेधोपे झाले नसते हा पंडितजींचा मुख्य मुद्दा कोणींच खोडून काढला नाहीं. अमक्या अधिकाऱ्याला अशी भीति वाटली, पंजाब सरकारनें सिमल्यास अशा अशा तारा पाठविल्या म्हणून बंड पुकारण्यांत आलें आणि लष्करी कायद्याच्या अंमलास सुरवात करण्यांत आली अशा प्रकारची काय ती कायदे-कौन्सिलपुढें सरकारी बाजू मांडण्यांत आली. सर दिनशा वाच्छा यांनीं ही सरकारी बाजू ऐकून माफीच्या बिलास उचलून धरण्याचें वचन दिलें आणि सिमल्याहून चोहोंकडे गुरुवार, शुक्रवारच्या वादविवादाच्या तारांनीं असें कळविण्यांत आलें कीं, बरिष्ट कायदे कौन्सिलांत मि. हॅले, मि. थॉमसन, मि. क्रॅप व सर जॉर्ज लौंडिस यांनीं पंडितजींना

चपराकीवर चपराकी

लगावून जेरीस आणलें आणि अखेरीस लोकपक्षाला अशा रीतीनें खच्ची केल्या-वर सर दिनशा वाच्छा यांची संमति माफीच्या बिलाला मिळवून ना. चांदा यांची उपसूचना नापास झाली. आज रोजीं हें बिल पास होतांना सरकारतर्फे आपला हात सर दीनशा वर करतील यांत संशय नाहीं; तथापि पं. मदनमोहन मालवीय व ना. चांदा यांनीं जी विचारचसरणी कायदे-कौन्सिलपुढें मांडली, ती विचारसरणी सरळ युक्तिप्रयुक्तीनें कायदे-कौन्सिलांत खोडून काढण्यांत आली नाहीं असेंच सर्व विचारी लोक म्हणतील. पंडीतजींना खाशी चपराक बसली अशा प्रकारची हलक्या दर्जाची भाषा परवां कायदे-कौन्सिलांत लाटसाहेबापासून थॉमससाहेबापर्यंत सर्व सरकारी वक्त्यांच्या मुखीं खेळत होती. बिचारे पंडितजी असल्या असभ्य मारामारीपुढें काय करणार? अप-मानकारक शब्द शांतपणें गिळून गप्प बसण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता, पंडितजींना चपराकी मारल्या, पंडितजींना खच्ची केलें, असल्या असल्या प्रकारचें असभ्य शब्द अधिकाऱ्यांनीं वापरले आहेत यावरूनच विचार-गांभीर्याचा भरीवपणा त्यांच्या बाजूला नव्हता हें सिद्ध होत आहे. पंजाबांत बंडाची प्रवृत्ति नव्हती, सत्याग्रहाची चळवळ लोक शांततेनें करीत असतांना लोकांस चांगली दहशत बसवली पाहिजे आणि स्वराज्याच्या चळवळीपासून लोकांना जबरदस्तीनें परावृत्त केलें पाहिजे असें म्हणणाऱ्या ओडवायरी सांप्रदायानें बंडाचा छाप दंग्याधोप्याच्या समयीं पंजाबावर मारतां यावा म्हणून लोकांना डंबचलें व दंग्याधोप्यास सुरवात झाली, असल्या फिर्यादी अर्जास कायदे-कौन्सिलांत सरकारतर्फेचें उत्तर नाहीं. बरें, दंगेधोपे झाल्या-वर पुढील लष्करी कायद्यांचीं कृत्यें तरी शांतता राखण्यापुरतींच कोठें होतीं? पंडितजींच्या फिर्यादींतील मुख्य मुद्दा असा आहे कीं, शांतता राखण्याकरितां म्हणून जीं कृत्यें करण्यांत आलीं तीं कृत्यें दहशत बसवून लोकांतील सजकीय

जीवनास मातींत मिसळून टाकण्याच्या इराद्यानें केलेली होतीं. अमृतसरची बिनपरवानगीची सभा मोडण्याकरितां, पंडितजी म्हणतात, इंग्रजी लष्करानें विनाकारण पांचशेंपासून हजार लोकांचे बळी घेतले. मि. थॉमसन म्हणतात २९१ लोकच मारलें गेले, पांचशेचा आकडा खरा, कां हजाराचा आंकडा खरा, कां दोनशें एक्याण्णवाचा आकडा खरा, हा वाद एका बाजूस ठेवून २९१ लोकच मारलें गेले असें आपण घटकाभर समजूं या. पण सभा स्थानांतून लोकांना घरीं जावयास सांगण्याकरितां निशस्त्र प्रजेपैकीं २९१ लोक ठार मारणें ही शांतता राखण्याची पद्धत कोठली ! ही इंग्रजी पद्धति कां प्रशियन पद्धति ? सायलेशियांतील पोलिश लोकांनीं संप केला या गोष्टीचा फायदा घेऊन शें कडो पोलंडचे लोक जर्मनीनें सायलेशियांत ठार करून जर्मन लोकसंख्या अधिक ठरवण्याचा उद्योग केला तसलाच पंजाबांतील मार्शल लॉचा दहशतीचा प्रकार नाहीं काय ! मार्शल लॉ खालीं झालेल्या हजिऱ्या व मार्शल लॉ खालील बिन वारंटी पकडापकडी यांचा जो कल्लोळ पंजाबांत माजून राहिला होता त्या अंदाधुंदीचें समर्थन दहशत बसवण्याच्या इराद्यानें होणार आहे, शांतता राखण्याच्या हेतूनें होणारें नाहीं, या दहशतीची लांबलचक कहाणी पंडितजींनीं कायदे–कौन्सिलला सांगितली. पण पंजाबांतील बंडखोरांना असेंच वागवून त्यांची तशीच खोड मोडली पाहिजे होती अशा चपराकी पंडितजींना उलट मारण्यांत आल्या. मुळांत बंड दृष्टीस न पडतां लहानशा दंग्याधोप्यांचा फायदा घेऊन दहशत बसवण्याचा सपाटा मात्र दृष्टीस पडतो. बंड झालेंच होतें असें सपाटून सरकारतर्फे कायदे–कौन्सिलांत प्रतिपादन करण्यांत आलें. बंड जर खरोखच झालें होतें आणि पंडितजींच्या किर्यादींत जर खरोखर अर्थ नाहीं तर कमिशननें तसा निकाल दिल्यावर मग माफीचा कायदा पास करण्यास कोणती हरकत होती ? मुख्य हरकत कांहींच नाहीं. मग घाई कां ? सरकारी

अधिकारी जरी आज कायदे-कौन्सिलांत तोऱ्यातोऱ्यानें बंड होतें असें म्हणत आहेत, तरी पंडितजींच्या फिर्यादीच्या अनुरोधानें कमिशनपुढें साक्षी-पुराव्यानिशीं लोकपक्षाचें म्हणणें साधार प्रसिद्ध झाल्यावर, पंजाबांत बंड नव्हतें असेंच सर्व जग म्हणेल हीं गोष्ट सिमल्याच्या मनाला खात असली पाहिजे. लष्करी कायदा व माफीचा कायदा यांची जोडी बंडाच्या मागून येत असते. बंडाचें स्वरूप नाहीं पण मोठा दंगाधोपा आहे, अशा प्रसंगीं लष्करी कायदा चुकीनें पुकारला जाण्याचा संभव असतो. पण तो फारच थोडा वेळ टिकणारा असतो लष्करी कायदा कित्येक आठवडे टिकला आणि माफीचा कायदा त्याच्या मागून आला म्हणजे मुळांत एखाद्या चळवळींशीं घरून असलेला नुसता दंगाधोपा इष्टीस पडावा लागतो. पण पंजाबांतील बंडच लुटु-पुटीचें असल्यामुळें या बंडाचें अस्तित्व कमिशनपुढें साक्षीपुराव्यानें शाबीत होईपर्यंत माफीचा कायदा पास करून घेण्याचें लांबणीवर टाकण्यास हिंदु-स्थान सरकार राजी न झाल्यास त्यांत नवल तें कोणतें ?

अनुक्रम १९६६५... दि: १९१९
क्लास २३२०२... बॉ: दि: २१२१९२.१०१

* राष्ट्रीय सभा व बादशाही जाहीरनामा

नाना प्रकारचीं विघ्नें येतां येतां गेल्या शनिवारीं अमृतसर येथें राष्ट्रीय सभेच्या कामास सुरवात झाली. गेल्यावर्षी दिल्लीस अमृतसरनें अमंत्रण दिलें, त्यावेळीं गेले बारा महिनें इतक्या महत्त्वाचे जातील असें कोणासहि वाटलें नाहीं. पण दिल्लीस जमलेलें प्रतिनिधी दिल्ली सोडून आपापल्या प्रांतांत जातात न जातात तोंच सरकारनें रौलेट बिलाचा ससेमिरा त्यांच्यामागें लावला, आणि सर्व हिंदुस्थानांत एकच गडबड उडून गेली. मांटेग्यू-चेम्सफर्ड रिपोर्टाच्या पाठीमागें पिछेहाट करण्याच्या सरकारचा हेतू असून राजकीय चळवळीची मुस्कटदाबी करण्याच्या हेतूनें हें बिल पुढें आणलेलें आहे, असें सर्वांच्या ध्यानीं आल्यावरोबर महायुद्धानें उत्पन्न केलेल्या सर्व आशा निष्फळ होणार असें सर्वांना वाटूं लागलें. रौलेट बिलाचा रौलेट कायदा पास झाला आणि निराशा झालेल्या लोकांना सत्याग्रहाशिवाय निराळा मार्गच शिल्लक राहिला नाहीं. सत्याग्रहाच्या चळवळीला हाणून पाडण्याचा प्रयत्न झाल्यामुळें अमृतसर येथें भयंकर कत्तल होऊन अमृतसरची

खुनी बाग

प्रसिद्धीस आली. या खुनी बागेंतील कत्तलीनंतर गेले चार सहा महिने लष्करी कायद्याची चर्चा एकसारखी सुरू झाली, आणि विलायतेंत जॉइंट कमिटीचें काम सुरू झालें. खुनी बागेशेजारीं राष्ट्रीय सभा भरूं देतील कीं नाहीं, याविषयीं सर्व राष्ट्रभक्तांना एकसारखी चिंता लागली होती. पण पंजाबनें धिटाईनें, चिकाटीनें व जिवंतपणानें हें काम तडीस नेण्याचा निश्चय केल्यामुळें हरएक प्रकारची काळजी दूर होऊन पूर्वीच्या सर्व राष्ट्रीय सभांना मागें

* केसरी, ता. ३० डिसेंबर १९१९

(६७४)

टाकणाऱ्या उत्साहानें व कळकळीनें अमृतसरच्या राष्ट्रीय सभेच्या कामास सुरवात झाली, याबद्दल सर्व राष्ट्रभक्तांना आनंद वाटल्यावांचून राहणार नाहीं. सत्याग्रहाच्या वेळीं आणि लष्करी कायद्याच्या यातना सोसण्याच्या वेळीं पंजाबनें खरा राष्ट्रीय जिवंतपणा दाखवला असल्यामुळें पंजाबच्या नवीन राष्ट्रीय जीवनास अनुसरून पंजाबनें राष्ट्रीय सभेची तयारी केली यांत संशय नाहीं. अमृतसरची खुनी बाग हें एक तीर्थस्थान होऊन बसलें आहे. आणि अशा क्षेत्रस्थानीं सात आठ हजारांहून अधिक प्रतिनिधी जमावें यांत कांहीं आश्चर्य नाहीं. शुक्रवारीं राष्ट्रीय सभा न भरल्यानें आणि रविवारीं सब्जेक्ट्स कमिटीशिवाय इतरांना फुरसद असल्यामुळें खुनी बागेचें दर्शन घेऊन सर्व प्रतिनिधींनीं आपणांस पुनीत करून घेतलें. आं. इं. कॉं. कमिटीच्या बैठकींत ही खुनी बाग मालकापासून विकत घेतली असून तेथें पंजाब प्रकरणाचें स्मारक उभारण्याची तयारी कॉं. कमिटीनें केली आहे, आणि जरूर त्या फंडापैकीं ७/८ रक्कमहि जमली आहे, असें जेव्हां पं. मदनमोहन मालवीय यांनीं जाहीर केलें, तेव्हां सर्वांस आपली तीर्थयात्रा सफळ झाली असेंच वाटलें. पंजाब, अमृतसर व खुनी बाग यांनीं हिंदुस्थानचें वातावरण अशा रीतीनें गेले कित्येक महिने दणदणून सोडलेलें असल्यामुळें स्वागत कमिटीचें अध्यक्ष स्वामी श्रद्धानंद आणि राष्ट्रीय सभेचें अध्यक्ष पं. मोतीलाल नेहरू यांच्या भाषणांत पंजाबच्या प्रश्नांना साहजिकपणें विशेष महत्त्व देण्यांत आलें आहे. रौलेट ॲक्ट, सत्याग्रहाची चळवळ, सर मायकेल ओडवायर यांची कारकीर्द, पंजाबांतील लष्करी धिंगाणा, आणि हंटर कमिटी यांच्यासंबंधानें ज्याला साधार, व्यवस्थेशीर व मुद्देसूद हकीकत वाचावयाची असेल त्यांनीं पं. मोतीलाल नेहरू यांचें सविस्तर भाषण अवश्य वाचावें, अशी आमची शिफारस आहे. पं. मोतीलाल नेहरू हे तीक्ष्ण बुद्धीचें बॅरिस्टर असून यांनीं आपल्या बुद्धीमत्तेचा, वजनाचा व

देशभक्तीचा पूर्ण फायदा गेले कित्येक महिने पंजाबला दिला आहे. पंजाब प्रकरणाबद्दल त्यांच्या मनांत डवचत असलेलें शल्य व पंजाबचें कल्याण व्हावें झणून त्यांना वाटत असलेली कळकळ त्यांच्या भाषणांत पदोपदीं दृष्टीस पडत आहे. स्वामी श्रद्धानंद यांचें भाषण सत्याग्रह चळवळींतील त्यांच्या पुढाकारास आणि त्यांच्या सन्यासीपणास साजेसेंच झालें यांत संशय नाहीं. पंजाबनें हालअपेष्टा सोसून जी राष्ट्रसेवा कित्येक महिने केली त्या सेवेच्या जोरावर नवीन जिवंतपणा हिंदुस्थानांत उत्पन्न करण्याचें श्रेय पंजाबास मिळालें आहे. या दृष्टीनें विचार केला असतां अमृतसरच्या जालियनवाला बागेस खुनी बाग असें नांव न देतां नवजीवनास आरंभ करणाऱ्या अमृताचें सिंचन करणारी ती बाग आहे, असें मानून 'अमरबाग' असेंच नांव त्या जागेस देणें उचित होय. राष्ट्रीय सभेच्या वेळीं तर बादशाही जाहीरनाम्यानें पंजाबचें पुढारी बंधमुक्त झाल्यामुळें

दुःखांतून सुख

बाहेर निघाल्यासारखें झालें. मांटेग्युच्या स्वराज्याचें बिल पार्लमेंट सभेनें पास करून बादशहाची संमति मिळून बादशाही जाहीरनामा राष्ट्रीय सभेच्या आधीं दोन दिवस प्रसिद्ध झाल्यामुळें अमृतसरची खुनी बाग नुसत्या दुःखसंवेदनाकरितांच नसून सुखस्मरणासाठींहि आहे, अशीं राष्ट्रीय सभा भरावयाच्या आदल्या दिवशीं चिन्हें दिसूं लागलीं. ता. २४ डिसेंबर रोजीं प्रसिद्ध झालेला बादशाही जाहीरनामा संतप्त झालेल्या हिंदुस्थानच्या हृदयांत शांतता उत्पन्न करणारा असल्यामुळें हिंदुस्थाननें गेले बारा महिने सोसलेल्या दुःखाचें पर्यवसान अंशतः तरी सुखांत करण्याचें सामर्थ्य त्या जाहीरनाम्यांत आहे यांत संशय नाहीं. सदर समग्र जाहीरनामा व त्यासंबंधाचें लोकमत आज दुसरीकडे दिलें आहे. ते वाचकांनीं अवश्य वाचावें व जाहीरनाम्याचें मनन करून लो. टिळक यांच्या मताप्रमाणें कृतज्ञतेच्या बुद्धीनें जाहीरनाम्याबद्दल

आभार प्रदर्शित करावे अशी आमची मनःपूर्वक इच्छा आहे. बादशहा पंचम जॉर्ज यांचा हा जाहीरनामा पूर्वीच्या बादशाही जाहीरनाम्याहून अगदीं निराळा आहे. बादशाही जाहीरनाम्यानें राजकीय कैद्यांना माफी मिळाली आणि त्याप्रमाणें पंजाबचें कैदेंत पडलेले पुढारी कैदेंतून सुटून अमृतसरच्या राष्ट्रीय सभेच्या मंडपांतील १५।१६ हजार इष्टमित्रांना आनंदानें भेटलें हें खरें आहे. या माफीमुळें पंजाब—प्रकरणांतील वितुष्ट बरेंच नाहींसें होईल यांत संशय नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांना माफी देण्याचा कायदा ज्यावेळीं पास झाला त्याचवेळीं राजकीय कैद्यांनाहि माफी मिळावयास पाहिजे होती. या माफीबद्दल त्यावेळीं विलायतेस लो. टिळक यांनीं फार आग्रह धरला पण आज जें केलें तें त्यावेळीं करण्याची बुद्धि मांटेग्यूसाहेबांना झाली नाहीं. थोड्या उशीरानें कां होईना पण तशी बुद्धि झाली ही संतोषाची गोष्ट होय. सर्वांना माफी देतांना सार्वजनिक सुरक्षितपणास ज्यांच्या सुटकेमुळें अडथळा येईल अशांना हिंदुस्थानसरकारनें वगळल्यास हरकत नाहीं असें एक गालबोट या माफीस लावण्यांत आलें आहे. अफगाणिस्तानच्या सरहद्दीच्या पलीकडे बोल्शेव्हिकांच्या छायेखालीं जाऊन बसलेल्या मूठभर हिंदी लोकांना वगळून सावरकरांपासून अल्लीबंधूपर्यंत सर्व राजकीय कैद्यांना या माफीचा पूर्ण फायदा हिंदुस्थान सरकार यावेळीं मिळूं देईल अशी आम्हांस आशा आहे. दया हीं पारमार्थिक धर्माचेंच तेवढें मूळ नसून ऐहिक व्यवहाराला दयेमुळेंच पवित्रपणा येत असतो. खऱ्या खोट्याचा कायद्याच्या दृष्टीचा न्याय निराळा आणि वस्तुस्थितीचा न्याय निराळा. खरें व खोटें यांच्यामधील हा विवेक पुष्कळ प्रसंगीं मानवी बुद्धीच्या अटोक्याच्या बाहेरचा असल्यामुळें सर्वांच्या हातून एकसारख्या चुका होतच असतात. या चुक्यांचे परिमार्जनहि चुक्या समजल्यावर कित्येक वेळां होणें शक्यच नसतें. असली अपरिहार्य पापें धुवून टाकण्याची शक्ति एकटया दयेच्या अंगीं आहे. अमृत-

सरच्या खुनी बागेसंबंधानें पंजाबचे लष्करी अधिकारी आणि हिंदुस्थान सरकार यांच्या हातून काय थोडें पाप झालें आहे ? इंग्रजी पार्लमेंटनें कितीहि चौकशी करण्याचें जरी मनांत आणलें तरी या पापाचा सर्व डाग पार्लमेंट सभेस धुतां येणें शक्य नाहीं. खुनी बागेंत मारलें गेलेल्यांना कोण जिवंत करूं शकणार ? अशा प्रसंगीं दयेचाच उपाय हा रामबाण इलाज होय. खुद्द बादशहांनीं मेहेरबानीनें हा इलाज जाहीर केला असल्यामुळें हिंदुस्थान सरकारनें या बाबतींत कंजूषपणा अल्पहि दाखवूं नये अशी आमची आग्रहाची सूचना आहे. मॉंटेग्यूसाहेबांच्या स्वराज्याच्या कायद्यास प्रारंभ करतांना अधिकारी व प्रजाजन यांच्यामधील वितुष्ट नष्ट करण्याकरितां दिलेल्या या माफीबद्दल हिंदुस्थानांत चोहोंकडे बादशहाच्या नांवाचा जयजयकार होईलच, पण त्याहूनहि जाहीरनाम्यांत नमूद केलेल्या जबाबदार राज्यपद्धतीच्या पूर्णत्वाचा उल्लेखाबद्दल सर्व राजकीय चळवळ करणारांना

जाहीरनाम्याची विशेष किंमत

वाटल्याशिवांचून राहणार नाहीं. मांटेग्यूसाहेबांचा स्वराज्याचा कायदा हा जबाबदार राज्यपद्धतीचा नुसता प्रारंभ आहे. या प्रारंभापुढील मार्ग या बादशाही जाहीरनाम्यानें सर्व राष्ट्रभक्तांना सुलभ होणार आहे. १८५८ सालचा राणीचा जाहीरनामा लोकशाहीच्या दृष्टीनें कांहींच नाहीं. १८५७ सालापूर्वी इंग्रजांनीं धार्मिक स्वातंत्र्याचें धोरण स्वीकारलें होतें. पण त्या धोरणास ठामपणा व निश्चितपणा आला नव्हता. प्रजाजनांना पटेल असें अभिवचनहि प्रजेपाशीं नव्हतें. धार्मिक बाबींतील इंग्रजी राज्याच्या तटस्थ वृत्तीच्या धोरणास ह्या जाहीरनाम्यानें निश्चयीपणा आला आणि लोकांचाहि तेवढया बाबींत विश्वास बसला. मोर्ले–मिंटो सुधारणांच्या वेळचा एडवर्ड बादशहांचा जाहीरनामा त्या वेळच्या सुधारणांप्रमाणेंच निष्फळ व पोकळ होता. मोर्ले–मिंटोच्या कायद्याविरुद्ध राष्ट्रीय पक्षानें हाकाटी करून लोकशाहीच्या

तत्त्वावद्दल जी एकसारखी झीज सोसली व चळवळ कायम ठेवली, त्या चळवळींतील १९०८ सालच्या प्रमुख मागण्या आज जवळजवळ एक तपानें मांटेग्युसाहेबांच्या कायद्यांत गोंवल्या गेल्या अहेत. पण गेल्या बारा वर्षांत या मागण्यांचा साहजिकपणें विकास झाला असून महायुद्धानें तर या विकासाला मुक्कर स्वरूप प्राप्त झालें आहे. या मागण्यांचा उदय, वाढ विकास आणि युद्धकालीन पूर्णावस्था या सर्वांचा सहानुभूतीपूर्वक उल्लेख बादशाही जाहीरनाम्यांत केलेला असून हिंदुस्थानांत जबाबदार राज्यपद्धति पूर्णत्वास गेलीच पाहिजे असें इंग्रजी राज्यकारभाराचें धोरण असल्याविषयीं बादशहांनीं जाहीर केलें आहे. आमच्या पुढच्या राजकीय चळवळीला या अभिवचनाचा फार मोठा उपयोग आहे. राष्ट्रसंघांत 'राष्ट्र' या नात्यानें हिंदुस्थानचा समावेश झाल्यामुळें राष्ट्रसंघांतील सर्व राष्ट्रांपुढें आमच्या सुख-दुःखांची कहाणी मांडून त्यांची सहानुभूति मिळवण्याचा हक्क जसा आम्हांस मिळाला आहे आणि त्यामुळें हिंदुस्थानांतील व इंग्लंडांतील आमच्या राजकीय चळवळीवर जसें एक नवीन अपील–कोर्ट उत्पन्न झालें आहे, त्याप्रमाणें मुत्सद्यांच्या अभिवचनांचें आतां यापुढें आधार दाखवीत न बसतां शेवटच्या अपील कोर्टाचें म्हणजे खुद्द बादशाही जाहीरनाम्याचे आधार आम्हांस प्रतिबंध करणाऱ्यांपुढें टाकतां येण्यासारखें आहेत. अशा दृष्टीनें विचार केला असतां बादशाही जाहीरनाम्यांत ग्रथित झालेल्या मोठ्या तत्त्वाचें महत्त्व सर्वांच्या ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं. इंग्रजी साम्राज्य म्हणजे निरनिराळ्या स्वतंत्र राष्ट्रांचा संघ होय, असें इंग्रजी मुत्सद्दी गेलीं दोन तीन वर्षें म्हणत आले आहेत. कानडांतून इंग्लंडास परत आल्यावर गिल्ड हॉलमध्यें युवराजांनीं केलेल्या भाषणांत वरील विचार विशेष विशद करण्यांत आलें आहेत. स्वतंत्र राष्ट्रांत इंग्रजी साम्राज्याच्या या संघांत राष्ट्र या नात्याचा हिंदुस्थानचा उल्लेख युवराजांनीं केला आहे. बादशाही

जामीरनामा या पायरीच्या पलीकडे गेला असून हिंदुस्थानचें हें राष्ट्र साम्राज्य-संघांतील इतर राष्ट्रांप्रमाणें राजकीय स्वातंत्र्याच्या पूर्ण विकासाचा लवकरच उपभोग घेवो अशा प्रकारच्या सहानुभूतीची भावना जाहीरनाम्याच्या आरंभापासून शेवटच्या प्रार्थनेपर्यंतच्या सर्व भागांत एकसारखी दिसत आहे. या जाहीरनाम्याबद्दल व माफीबद्दल बादशहाचे कृतज्ञतापूर्वक आभार मानून युवराजांचें स्वागत करण्याबद्दलचा ठराव सब्जेक्टस् कमिटीमध्यें रविवारीं पांच सहा तास मोठा वादविवाद होऊन पास झाला आहे. मद्रासचें कांहीं प्रतिनिधि असल्या आभारप्रदर्शनाविरुद्ध असल्यामुळें आणि चेम्सफोर्ड आभार मानतांना विशेष पुढें गेल्यामुळें या दोन पक्षांत खटका उडून रविवारच्या सब्जेक्टस् कमिटीचें काम बराच घेळ लांबलें. लो. टिळक यांनीं या आभारासचे व स्वागताचे ठरावास अनुकूलता दाखविली आणि अखेरीस स्वागत कमिटीचा मसुदा पास झाला. बादशाही जाहीरनाम्याप्रमाणें मांटेग्यू-साहेबांचें आभार मानण्याविषयींहि खटका उडण्याचा संभव आहे. पण स्वामी श्रद्धानंद व पंडित मोतीलाल नेहरू यांच्या भाषणाकडे पाहिलें असतां त्याहि प्रश्नाचा निकाल पहिल्या ठरावाप्रमाणेंच लागेल असें म्हणणें भाग आहे. आभाराचे हें ठराव झाल्यावर राष्ट्राच्या पुढील मागण्या मुक्रर ठरविणें, तदनुसार हिंदुस्थानांत व परदेशी करावयाच्या चळवळीची खर्चाची व्यवस्था लावणें, आणि पंजाबावर जुलूम करणारांना शासन होऊन पंजाबच्या दुःखाचें परिमार्जन करणाऱ्या पुढील मार्गाचें आक्रमण करणें यासंबंधाचें राष्ट्रीय सभेचे ठराव आजच्या व उद्यांच्या बैठकींत राष्ट्रीय सभेपुढें येतील असा अंदाज आहे.

* टिळक-पर्स-फंड

टिळक-पर्स-फंडाचे खजीनदार रा. नेने व रा. मराठे यांनीं आजचें अंकांत फंडाच्या रकमेचें शेंवटचें आंकडे प्रसिद्ध केलें असून चिरोळचा खटला लो. टिळक यांच्या विरुद्ध झाल्यादिवसापासून आजपर्यंत लोकांनीं तीन लाख पांच हजारांवर लोकमान्यांना द्रव्यदृष्ट्या मदत करून त्या खटल्याच्या त्रासांतून मुक्त केलें आहे, असें सदर हिशेबावरून दिसून येईल. चिरोळच्या खटल्यासंबंधानें लोकमान्यांना मदत करण्याकरितां विनंतिपत्रक प्रसिद्ध करण्यांत आलें त्यावेळीं तीन लाख रुपयांची जरुरी आहे असें विनंतीपत्रांत म्हटलें होतें. विरुद्ध बाजूचा खर्च किती द्यावयाचा यासंबंधाचा कोर्टाचा निकाल अद्याप झालेला नाहीं. कदाचित् आणखी महिना दीड महिनाहि हा निकाल होण्यास लागेल असा अंदाज आहे. या खर्चासंबंधानें सॉलिसिटरच्या-मार्फत चाललेल्या वाटाघाटीवरून अडीच लाखांहून अधिक फंडाची जरुरी नाहीं, असें जेव्हां रा. न. चिं. केळकर यांना विलायतेस समजून आलें, त्या वेळेला लोकमान्यांचा सल्ला घेऊन अडीच लाखांचें सुमारास फंड बंद करावा, असें पुण्यास त्यांनीं कळविलें व त्याप्रमाणें फंड जमविण्याचें काम बंद करण्यांत आलें. आतांपर्यंत पर्स फंडाची एकंदर जमा २७७९१५ रु. झाली असून वाढदिवसानिमित्त २५८२८ रु. रा. नेने यांजकडे जमा झालेले आहेत. वाढदिवसानिमित्त रुपये गोळा करणाऱ्या कमिटीकडून लोकमान्यांचें उत्तर प्रत्येक वर्गणीदारास पोंचून पहिल्या चित्रांचा व उत्तरांचा खर्च वजा जातां जमेंतून शिल्लक किती राहील हें कळण्यास अद्याप बराच अवकाश लागणार आहे. लो. टिळक विलायतेहून येथें परत आल्यावर जमाखर्चाच्या हिशेबासकट शिल्लक रक्कम त्यांच्या हवालीं करण्याचा समारंभ

---

* केसरी, ता. १८ नोव्हेंबर १९१९

करण्यांत येईल. फंड गोळा होऊं लागल्यापासून लो. टिळक यांजकरितां खजिनदारांनीं सदर रक्कम आपल्या ताब्यांत लो. टिळक यांना तसें कळवून ठेवलेली आहे व लो. टिळक यांनीं विलायतेहून जसजशा रकमा मागितल्या त्याप्रमाणें सदर रकमा फंडातून देण्यांत आल्या आहेत. या फंडाच्या प्रत्येक दिवसाची रक्कम खजिनदाराकडे कसकशी जमा होत गेली आणि ती रक्कम लगेच बँकेंत टाकून एक दिवसाच्याहि व्याजाचें नुकसान रा. नेने यांनीं कसें होऊं दिलें नाहीं ही गोष्ट फंडाच्या हिशेबाच्या वह्या पाहिल्या असतां प्रत्येकाच्या लक्षांत तत्काळ येण्यासारखी आहे. फंड जमविणारे स्वयंसेवक व फंडाची विनंतिपत्रें काढणारे लो. टिळकांचें इष्टमित्र या सर्वांना सदर वह्या दाखविण्यांत आल्या असून सरकारी सी. आय. डी. खात्याच्या अधिकाऱ्यांनाहि पर्स फंडाच्या हिशेबाची पद्धत दाखवण्यास रा. नेने यांनीं आळस केला नाहीं. पर्स फंड गोळा होत असतांना ज्या पद्धतीनें हे हिशेब ठेवण्यांत आलें त्या पद्धतीकडे पाहतां रा. नेने यांना रोज भरपूर काम हिशेबाच्या पायीं करावें लागलें असलें पाहिजे यांत संशय नाहीं. सार्वजनिक कामांतील फंडाच्या

हिशेबाचा चोखपणा

ठेवण्याच्या कामीं गेलीं दहापंधरा वर्षें महाराष्ट्रांत जर कोणी विशेष हट्ट दाखविला असेल आणि त्या हट्टाच्या पायीं स्वतःस दिडकीच्याहि फायद्याची अपेक्षा न करतां प्रतिपक्षाच्या शिव्यांचा भडिमार होत असतांहि स्वतःच्या शरीरास जर कोणी सामान्य कारकुनाप्रमाणें राबविलें असेल तर ते रा. अण्णासाहेब नेने यांनीं होय. पैसा–फंड, टिळक–पर्स–फंड व होमरूल लीग–फंड या फंडाचे ते खजिनदार असून हिशेबांतील चोखपणा ठेवण्यांत त्यांचा हातखंडा आहे. पैसा–फंडाचे पैसे असोत किंवा होमरूल लीगचे पैसे असोत, या दोनहि संस्थांतील पैसे खर्च करण्याचा अधिकार ज्या

कमिट्यांना आहे त्या कमिट्यांच्या मंजुरीशिवाय नुसत्या सेक्रेटरींना रा. नेने एक पैहि खर्च करूं देत नाहींत. या दोनहि संस्थांचें आजपर्यंत झालेले सर्व खर्च एक्झिक्युटिव्ह कमिट्यांना अधिकार किती यासंबंधाची वाटाघाट त्या त्या संस्थांच्या जनरल सभांतून होऊन सदर नियम त्या त्या संस्थांच्या वार्षिक रिपोर्टांतून प्रसिद्ध करण्यांत आलेले आहेत. लो. टिळक, बॅ. बॅप्टिस्टा, श्री. खापर्डे, रा. केळकर, रा. गोखले, प्रचारक, व इतर मंडळी यांच्यासंबंधानें डेप्युटेशनच्या कामावर विलायतेस असतांना किंवा हिंदुस्थानांत स्वराज्याच्या चळवळीसंबंधानें फिरत नसतांना झालेलें सर्व खर्च एक्झिक्युटिव्ह कमिट्यांनीं रीतसर मंजूर केलेले आहेत; आणि या खर्चाची मंजुरी त्या त्या गृहस्थांच्या विनंतीवरून करण्यांत आलेली नसून एक्झिक्युटिव्ह कमिटीनें प्रत्येक प्रश्न सामान्यतः त्या त्या व्यक्तींच्या गैरहजेरींत आपल्यापुढें घेऊन मंजुरीचें ठराव पास केलेले आहेत. पैसा-फंड, होमरूल लीग-फंड व टिळक-पर्स-फंड या तीनहि फंडासंबंधानें मंजुरीचा व हिशेबांचा सोंवळेपणा इतक्या कडक रीतीनें पाळण्यांत आला आहे कीं या तीनहि फंडांकरितां काम करणाऱ्या मंडळीस व सदर संस्थांतील इतर कमिट्यांस आपल्या इतका कर्मठपणा याबाबतींत इतर संस्थांत क्वचितच दृष्टीस पडतो अशी प्रौढी मारण्यास बिलकुल हरकत नाहीं. टिळक-पर्स-फंड तीन लाखांजवळ जाऊं नये अशी चिरोल-पक्षाच्या अभिमान्यांची इच्छा असणें साहजिक आहे. लाख सव्वा लाखापर्यंत हा फंड जाईतों या इच्छेला वाचा फुटली नव्हती. पण या खटल्याच्या त्रासांतून द्रव्यदृष्ट्या तरी लो. टिळक मुक्त होणार अशीं चिन्हें दिसूं लागल्याबरोबर एकाच्या कानाला चावा घेऊन दुसऱ्यासच मारून टाकणाऱ्या सर्पाहूनहि अतिजहाल विषाचें फुत्कारें सौंगाड्या अनुयायांच्या मुखांतून निघूं लागले ! पण या फूत्कारांचें विष फंडास न बाधतां फंड मूळच्या संकल्पाप्रमाणें सिद्ध झाला आहे. लो. टिळक यांचा खटला

विलायतेस बुडविण्यांत आला; पण त्या खटल्यांतील

निकालास उत्तर

हिंदुस्थाननें तीन लाख रुपये गोळा करून दिलें, असें येथील कांहीं अँग्लो–इंडियन पत्रांनीं उद्गार काढले आहेत. या उद्गारांवरून सांप्रतच्या राजकीय चळवळींत या फंडाची आवश्यकता किती होती हें कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे. लो. टिळक यांनीं ज्यावेळीं हा खटला विलायतेस भांडण्याचा संकल्प केला, त्यावेळीं स्वतःच्या पैशावरच हा खटला चालवावयाचा असें त्यांनीं ठरविलें होतें; आणि तेव्हांपासून त्यांनीं आपल्या पैशाची व्यवस्थाहि तशीच चालविली होती. ताईमहाराजांचा खटला प्रिव्ही कौन्सिलांत जर लो. टिळक यांच्या बाजूचा झाला नसता आणि त्या खटल्यापायीं गुंतलेले केसरीचे रुपये जर मोकळे झाले नसते तर हा खटला सुरूं करण्याची जबाबदारी लोकमान्यांनीं आपल्या शिरावर घेतली नसती. एका मोठ्या झुंजेंत यश आल्यामुळें शिल्लक राहिलेली सामुग्री संग्रहीं ठेवण्याची संवय लोकमान्यांना बिलकुल नाहीं. एका बाजूचें सैन्य घरीं बोलावण्यास हरकत नाहीं अशीं चिन्हें दिसतात न दिसतात तोंच दुसरी मोहीम सुरूं झालेली असते आणि कित्येक वेळां सामुग्रीला परस्परच दुसऱ्या तोंडावर हजर राहणें भाग पडतें. १८९७ व १९०८ सालचे केसरीवरील खटले, ताईमहाराजांचा खटला व चिरोलचा खटला हीं लढण्याची तीनहि तोंडें एकाच भांडणांतून उत्पन्न झालीं असून एकमेकांनीं एकमेकांस आतांपर्यंत निरनिराळ्या प्रकारांनीं सांवरून धरलें आहे. चिरोलचा खटला खर्चाच्या मानानें घरदार गहाण टाकलें असतां आपल्या आटोक्याच्या आंत आहे, असें लोकमान्यांना वाटल्यावरून त्यांनीं या खटल्यास सुरवात केली. खटला विरुद्ध गेला असतां अडीच तीन लाखापर्यंत खर्च होणार अशी जर अटकळ प्रथमपासून विलायतच्या सॉलिसिटर्सनीं व वकिलांनीं

दिलेल्या सल्ल्याअन्वयें बांधतां आली असती तर या खटल्याचा पायाच रचला गेला नसता. विलायतेंस व हिंदुस्थानास जेथून म्हणून सल्ला घ्यावयास पाहिजे होता तेथून सल्ला घेण्यांत आला आणि केसरीनें दिलेली शिदोरी शिंकाळीस चढण्याची जरुरी नाहीं असें प्रथमपासूनच लोकमान्यांचें व्रत असल्यामुळें खटल्यास सुरवात झाली. टिळक–पर्स–फंडाच्या विनंतिपत्रांत लो. टिळकांनीं आपली सर्व इस्टेट गहाण टाकून हा खटला चालविला असें जें विधान करण्यांत आलें आहे तें विधान शिदोरी उद्यांकरितां शिंकाळीला न ठेवण्याचा लोकमान्यांचा बाणा सदर प्रसंगीं त्यांच्या अनुयायांच्या व इष्टमित्रांच्या नजरेस आणणें योग्य वाटल्यावरून करण्यांत आलें. लो. टिळक यांनीं चालवलेल्या संस्था वरील व्रताला धरूनच चालविण्यांत येत असून त्या संस्थेंतील प्रमुखांना देण्यांत येणारे पगारहि वरील व्रत ध्यानांत ठेवूनच लो. टिळक मंजूर करीत असतात. शिदोरी कोणास नको आहे? आणि पोटापाण्याच्या शिदोरीशिवाय काम तरी कसें होणार? अत्यंत विरक्त वृत्तीनें सार्वजनिक कामास वाहून घेणाऱ्या महंतासहि समर्थांनीं म्हटल्याप्रमाणें मधुकरीच्या फडक्याच्या आंतील भाताची अपेक्षा असते. संग्रहाची इच्छा मनांत बलवत्तर ठेवून त्या इच्छेच्या प्रेरणेनें वरील नोकरी करीत आहे, का संस्थेंतील कामकाजावरील आदरामुळें काम करीत असून सभोंवारच्या स्थितीच्या मानानें कामाची ताकद राहण्यास जरूर तो पगार देण्यांत येत आहे; या गोष्टीचा नीट विचार करूनच लो. टिळक यांनीं चालवलेल्या किंवा त्यांचा पूर्वी किंवा आज संबंध असलेल्या सार्वजनिक संस्था उभारल्या गेल्या आहेत. संग्रही बुद्धीला देण्यांत आलेलें गौणत्व, कार्यतत्परता आणि तें तें काम पार पाडून नेण्याची लायकी या तीन सद्गुणांचा योग्य रीतीनें मिलाफ होत गेल्यानेंच होमरूल लीगसारख्या संस्था उत्पन्न झाल्या व नांवारूपास चढल्या. आपल्या आजच्या व पुढील पांच दहा

वर्षांच्या सामुग्रीवर चिरोळचा खटला चालवूं असें सर्व माहिती गोळा करून लोकमान्यांनीं ठरविलें खरें, पण अनुभवांतीं पूर्वीचें अंदाज खोटे ठरलें. विलायतेंतील खटल्याच्या खर्चाचा अनुभव लोकमान्यांना यापूर्वी नव्हता असें नाहीं; पण अधिकारीवर्ग या खटल्यांत इतक्या तत्परतेनें मन घालील व आखाडयांत स्वतः दंड थोपटून उभा राहिल्याप्रमाणें राहील असा अंदाज बांधतां आला नाहीं. केसरीवरील दोनहि खटल्यांत ही

सरकारी कुस्ती

आहे असें लोकमान्यांना पूर्णपणें वाटत होतें. आणि जयापजयाचीं दुःखें भोगण्याची तपश्चर्या आपण केली पाहिजे या भावानेंच ते आखाडयांत उभे होते. ताईमहाराजांच्या खटल्यांत अर्धवट राजकीय व अर्धवट खाजगी स्वरूपाचें हें भांडण आहे असा त्यांना अनुभव आला. हिंदुस्थानांतील वादांत सरकारी अंग पूर्णपणें व्यक्त झालें; पण विलायतेस ताईमहाराजांचा खटला जातांच खासगी खटल्याप्रमाणें न्याय मिळण्यास हरकत आली नाहीं; या अनुभवाला अनुसरूनच चिरोळच्या खटल्यांतहि खासगी खटल्याप्रमाणें न्याय मिळेल असें सर्वांना वाटलें व खटल्याची उभारणी करण्यांत आली. मुंबईस साक्षीपुरावा चालू असतांना सरकारी अधिकाऱ्यांचें दंड खाडयांत खणखण वाजत आहेत असें लक्षांत आलें खरें; पण विलायतेंस असलीं दंडुकेशाही चालणार नाहीं अशी आशा बाळगूनच अंगीकृत कार्य पुढें चालवावें लागलें. चिरोळच्या खटल्याचा निकाल विरुद्ध झाला त्यावेळीं खर्चाचा बोजा आपला आपण सोसला पाहिजे अशी लोकमान्यांची समजूत होती व तशा दृष्टीनेंच त्यांनीं निकालानंतर विलायतेहून पत्रें पुण्यास लिहिलीं. टिळक–पर्स–फंड येथें जो सुरू करण्यांत आला तो लो. टिळक यांच्या सूचनेवरून बिलकुल नव्हें. खासगी कुस्तीला .सरकारी कुस्तीचें स्वरूप येऊन हा खटला बुडवण्यांत आला अशी लोकमान्यांच्या अनुयायांची

व इष्टमित्रांची समजूत झाल्यामुळें या खटल्यांतील हरएक प्रकारच्या खर्चांकरतां फंड गोळा करणें हें राजकीय चळवळींतील आपलें पवित्र कर्तव्य आहे असें वाटल्यावरूनच फंडास सुरुवात झाली. फंड सार्वजनिकरीत्या गोळा करून केसरींत पोंच देऊन रा. नेने यांच्या हिशेबी पद्धतीनें तो गोळा करावा याविषयीं एकदोन आठवडे चालकांत बरीच भवती न भवती झाली. संकट समयीं द्रव्यदृष्टया लोकमान्यांना मदत करण्याच्या इच्छे-पुरताच या फंडांतील उद्देश असता तर सदर वादविवादाच्या वेळीं खासगी पद्धतीनें फंड गोळा करा म्हणणाऱ्यांची सरशी झाली असती. पण सरकारनें दंड थोपटल्यावरोबर लोकहि दंड थोपटण्यास कमी करीत नाहींत आणि आव्हानाला प्रतिआव्हान देण्यास तयार असतात, हें सिद्ध करून दाखवि-ण्याचा दुसरा उद्देश सदर फंडाच्या बुडाशीं असल्यामुळें फंडास मदत करणारांची संख्या जेवढी अधिक मोठी असेल तेवढी पाहिजे असें ठरलें व त्यामुळें सांप्रतचें स्वरूप फंडास देण्यांत आलें. आमच्यांतील कांहीं लोकांच्या ध्यानीं हा मुद्दा आला नाहीं आणि सदर लोकांना समजणारेहि नाहीं. पण प्रतिपक्षी असलेल्या अँग्लो–इंडियन पत्रकारांना हें महत्व समजलेलें आहे. टिळक–पर्स–फंड व वाढदिवसाचा फंड या दोहोंनी मिळून जमा झालेली रक्कम तीन लाखांवर गेली असल्यामुळें बंगाल, मद्रास व सिंध यांच्या साहाय्यानें नागपूर, वऱ्हाड व मुंबई इलाखा यांनीं चिरोलच्या खटल्यांतील निकालास चोख प्रत्युत्तर दिलें आहे असे छातीठोक म्हणण्याची आज वेळ आली आहे. राष्ट्रीय पक्षानें परदेशी सनदशीर रीतीनें चालविलेल्या राजकीय चळवळीच्या मार्गांत पहिला मोठा खड्डा म्हणून चिरोल–खटल्याचा निकाल आडवा पडला. हा खड्डा भरून काढल्याशिवाय परदेशच्या आमच्या राष्ट्रीय चळवळीचें पाऊल पुढें पडणें शक्यच नव्हतें; हें ओळखूनच टिळक–पर्स–फंडास सुरवात झाली. परदेशच्या राजकीय चळवळींस या

फंडाची जरूरी आहें हें ध्यानीं आमूनच लो. टिळक यानीं फंडास, फंड सुरू झाल्यावर चरेंच दिवसांनीं आपली संमति दिली; आणि परराष्ट्रीय सनदशीर राजकीय चळवळीच्या आखाडयांत राष्ट्रीय पक्ष उतरला असतांना पहिल्या सलामीसरशी मातींत पुरला न जातां पुनः वर उठून उलट पक्षास टांग मारण्यास या फंडानें तो तयार होणार हें पाहूनच या फंडाची नालस्ती प्रतिपक्षानें नाना प्रकारच्या तोंडांतून करविली. वरील सर्व अडथळयांतून फंड आज पार पडला असून चिरोल–खटल्यांत अधिकाऱ्यांनीं 'अरे' म्हटल्याबरोबर लोकांनींहि उलट 'कारे' म्हणण्यास कमी केलें नाहीं, हें या फंडानें आज सिद्ध केलें आहे. टिळक–पर्स–फंडाकडे वरील दृष्टीनें पाहिलें असतां ज्यांनीं फंडास सढळ हातानें रकमा दिल्या त्या सर्व लहान मोठया वर्गणीदारांचे, फंड गोळा करणाऱ्या स्वयंसेवकांचे व फंडाची चोख व्यवस्था ठेवणाऱ्या खजीनदारांचे मनःपूर्वक आभार मानल्याशिवाय कोणीहि राहणार नाहीं, अशी आमच्या मनाची खात्री आहे.

---

* स्वराज्य व शिष्टमंडळ

लो. टिळक, रा. केळकर, डॉ. वेलकर वगैरे काँग्रेसतर्फेच्या व होमरूल लीगच्या तर्फेनें विलायतेस लोकांच्यापुढें व पार्लमेंटरी कमिटीपुढें आमच्या स्वराज्याची बाजू मांडण्याकरतां गेलेले पुण्या-मुंबईचे प्रतिनिधि गेल्या गुरुवारीं तिसरे प्रहरीं ईजिप्त बोटीनें मुंबईस दाखल झाले, त्यावेळीं मुंबई शहरानें बंदरावर त्यांचें अपूर्व स्वागत केलें व रात्रौ मुंबईस शांतारामाचे चाळींत प्रचंड सभा करून त्यांचा सन्मान करण्यांत आला. सोमवारीं सकाळीं लो. टिळक व रा. केळकर पुण्यास पोचले त्यावेळीं पुण्यानेंहि आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें त्यांचें उत्तम स्वागत केलें. पुण्या-मुंबईच्या स्वागताची हकीकत आजचे अंकांत दुसरीकडे दिलीच आहे. आपण विलायतेस जाऊन स्वराज्याचें कोणतें गांठोडें आणलें तें दाखवा असा प्रश्न बंदरावर पाय ठेवतांच सर्वांनीं लोकमान्यांना मोठ्या उत्सुकतेनें विचारला; आणि लोकमान्य हिंदुस्थानांत येऊन पोंचण्यापूर्वीच दोन तीन दिवस हिंदुस्थानाकडे रवाना करण्यांत आलेलें स्वराज्याचें गांठोडें लोकमान्यांनीं शांतारामाच्या चाळींत सर्वांना सोडून दाखविलें स्वराज्याचें बिल प्रसिद्ध होण्यास व शिष्टमंडळी हिंदुस्थानास येऊन पोंचण्यास एकच गांठ पडल्यामुळें शिष्टमंडळाच्या कामगिरीकडे बहुजन समाजाचें लक्ष आपोआप वेधलें गेलें; आणि मुंबईस शांतारामाच्या चाळींतील विस्तृत पटांगणांत काय किंवा डॉ. वेलकर यांच्या लहानशा दिवाणखान्यांत काय, एल्फिन्स्टन स्टेशनाजवळील कामकऱ्यांच्या दहावीस हजार लोकांच्या टोलेजंग सभेंत काय, किंवा सरदारगृहाच्या गच्चीवरील संभाषणांत काय, लोकमान्यांनीं विलायतेंतील कामासंबंधानें व आपल्या धोरणासंबंधानें जें जें सांगितलें तें तें सर्व श्रोत्यांच्या मनाला

---

* केसरी, ता. २ डिसेंबर १९१९

उत्तम रीतीनें पटूनहि गेलें. होमरूल लीगचें काय किंवा काँग्रेसचें काय, शिष्टमंडळ विलायतेस गेलें होतें, तें काँग्रेसच्या मागण्या तेथील लोकांपुढें मांडण्याकरितां विलायतेस गेलें होतें. खुद्द विलायतेस निरनिराळ्या मतांचा आणि पक्षांचा जरी गलबला असला तरी पार्लमेंट सभेचें ठरावांना विलायतेंत लोकमत म्हणून जशी मोठी किंमत आहे, त्याप्रमाणें हिंदुस्थानांतहि काँग्रेसच्या ठरावांना सर्व हिंदुस्थानचें लोकमत म्हणून मोठी किंमत आहे. विलायतच्या पार्लमेंटच्या हुकुमानें हिंदुस्थानास पूर्ण स्वराज्य मिळून पुढील आठ दहा वर्षांत हिंदुस्थानचें पार्लमेंट केव्हां निर्माण व्हावयाचें असेल तें होवो, पण आज तर राष्ट्रीय सभा म्हणजेच

आमचें पार्लमेंट

होय यांत संशय नाहीं. हिंदुस्थानाला या आमच्या पार्लमेंटबद्दल पूर्ण अभिमान वाटत असून काँग्रेसच्या ठरावांना पार्लमेंटच्या ठरावाइतका मान आज हिंदुस्थान देत आहे. काँग्रेसची ही इभ्रत विलायतच्या लोकांना मान्य करावयास लावणें हें आमच्या शिष्टमंडळाचें मुख्य काम होतें. हें काम शिष्टमंडळानें उत्तम प्रकारें बजावलें आहें, असें गेल्या एक वर्षाच्या विलायतेंतील आमच्या चळवळीच्या हकिकतीवरून सहज ध्यानांत येईल. स्वयंनिर्णयाचें तत्त्व हिंदुस्थानास लावून घेण्याची कामगिरी शिष्टमंडळास काँग्रेसनें सांगितली होती; आणि स्वराज्यासंबंधाचे ठराव स्वराज्याच्या बिलांत गोंवलें जाण्याचा उद्योग विलायतेंत प्रामुख्यानें करण्याविषयींहि शिष्टमंडळास काँग्रेसची आज्ञा होती. विलायतच्या मुत्सद्यांनीं स्वयंनिर्णयाचें तत्त्व पूर्वीच कबूल केलें होतें. तहाच्या परिषदेच्या वेळीं प्रे. विल्सन यांच्या नजरेस काँग्रेसचें ठराव आणून स्वयंनिर्णयाचें तत्त्व हिंदुस्थानांतहि योग्य काळीं लावण्यांत येईल असें आश्वासन लो. टिळक यांनीं प्रे. विल्सन यांजकडून मिळविलें. राष्ट्रसंघांत हिंदुस्थानास प्रथमपासूनच बसण्याचा अधिकार

मिळाल्यामुळें स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाला अनुसरून राज्यकर्त्यांच्या निकालावरहि अंतस्थ स्वराज्यासंबंधानें राष्ट्रसंघाकडे अपील करण्याचा हक्क हिंदुस्थानांतील लोकांस आहे, असेंहि आश्वासन अमेरिकेंतील प्रमुख मुत्सद्यांकडून लाला लजपतरायांच्या चळवळीमुळें हिंदुस्थानास मिळालें आहे. तसेंच आश्वासन मुख्य मंत्री लॉईड जॉर्ज यांजकडून मिळवण्याची खटपट आमच्या शिष्ट मंडळानें विलायतेस सुरू केली असून त्या उद्योगास यश आल्यावांचून राहणार नाहीं, असा विश्वास शिष्टमंडळास वाटत आहे. स्वयंनिर्णयाचें तत्त्व व स्वराज्य यांसंबंधानें इंग्लंडांत शिष्टमंडळानें जी चळवळ केली त्या चळवळीमुळें पार्लमेंट सभेंतील मजूर पक्षाचे पुढारी मि. आर्थर हेंडरसन, मि. स्नूर व मि. वेजवूड यांनीं राष्ट्रीय सभेच्या मागण्या पूर्णपणें उचलून धरल्या असून मजूर पक्षाच्या टोलेजंग सभांतून हिंदुस्थानास स्वराज्य दिलेंच पाहिजे, व स्वयंनिर्णयाचें तत्त्व हिंदुस्थानास लावलेंच पाहिजे अशा आशयाचे ठराव पास झाले आहेत. मजूर पक्षाच्या पुढाऱ्यांनीं हिंदुस्थानच्या प्रश्नांत इतकें मन घातलें याचें कारण त्या पक्षाच्या दुःखाचें व आमच्या

दुःखाचें मूळ एकच

आहे, हें होय. इंग्लंडांतील भांडवलवाल्यांच्या पक्षाच्या लोभामुळें आणि द्रव्यतृष्णेबरोबरच फोफावणाऱ्या राज्यतृष्णेच्या वाढीमुळें इंग्लंडांतील बिन भांडवलवाले आज दुःखें भोगीत आहेत. इंग्लंडांतील भांडवलवाल्यांची द्रव्यतृष्णा व राज्यतृष्णा जर आज स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाला अनुसरून मर्यादित झाली तर हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या मार्गांतील मुख्य अडचण नाहींशी झाल्यासारखीच होईल, यात संशय नाहीं. दोघांच्याहि दुःखाचें कारण एकच असल्यामुळें दोघांचा स्नेह जुळावा यांत नवल नाहीं. मजूर पक्षाशीं हिंदुस्थानच्या राष्ट्रीय सभेच्या प्रतिनिधींचें इतके जुळू नये तर जुळावें तरी कोणाशीं ? भांडवलवाला पक्ष हा आमच्या मार्गांतील मोठी

अडचण ! त्या पक्षाशीं जुळलें म्हणजे पूर्ण स्वराज्य हातीं आलेंच. पण तें कार्य विलायतेंतील मजूर पक्षाशीं मिलाफ पावूनच सिद्ध होणारें आसल्यामुळें आमच्या शिष्टमंडळानें मजूर पक्षाच्या मार्फत विलायतेस चळवळ केली हें यथायोग्यच्च झालें. मजूर पक्ष विलायतेस आज पार्लमेंटच्या बाहेर अधिकारावर चढला आहे. आणि पार्लमेंट सभेंत पुढील आठ दहा वर्षांत अधिकारारूढ तोच पक्ष होईल, अशीं आज चिन्हें दिसत आहेत. मजूर पक्षाचे पुढारी मि. हेंडरसन यांनीं लो. टिळक यांच्यामार्फत हिंदुस्थानास आज लेखी निरोप कळविला आहे कीं; मांटेग्युसाहेबांच्या बिलानें चतकोर अर्धा चतकोर जेवढें स्वराज्य पदरांत पडेल तेवढें आज पदरांत घ्या आणि पुढें चळवळ चालवा, म्हणजे मजूर पक्ष अधिकारारूढ होण्याबरोबरच तुमच्या पदरांत स्वराज्याचें बाकी राहिलेलें सर्व चतकोर टाकल्याबांचून राहणार नाहीं; व आपल्या निरनिराळ्या सभांतून मजूर पक्षानें वरील प्रकारचें अभिवचनहि दिलें आहे. पालमेंट सभेंत देण्यांत आलेल्या मेजवानीच्या वेळींहि मजूर पक्षानें सदर अभिवचनाचा उल्लेख केलेला आहे. इतकेंच नव्हें तर मांटेग्युसाहेबांचें दुरुस्त झालेलें स्वराज्याचें बिल प्रसिद्ध झाल्यावरहि ' देत अहेत ते आज नाकारूं नका; आम्ही पुढें याहून अधिक देऊं ' असें आश्वासन मि. हेंडरसन वगैरे मजूर पक्षाच्या पुढाऱ्यांनीं दोनचार दिवसांपूर्वी पुनः दिलें आहे. मजूर पक्षाचा व आमच्या शिष्टमंडळाचा संबंध मिसेस बेझंट यांच्यामुळें विशेष आयास न पडतां जडला ही गोष्ट खरी आहे. पण तसा तो संबंध जडल्यानंतर बॅ. बॅप्टिस्टा, लो. टिळक, रा. केळकर वगैरेनीं राष्ट्रीय सभेकरितां जी चळवळ विलायतेस केली त्यामुळें राष्ट्रीय सभेचें मत म्हणजें हिंदुस्थानचें लोकमत होय, अशी खात्री मजूर पक्षाचीच नव्हे तर पार्लमेंटच्या सभासदांचीहि आज झाली आहे. इतर सभासदांतहि राष्ट्रीय सभेची ही इभ्रत आमच्या शिष्टमंडळानें राखली, आणि मजूर पक्षाला घरून

चालविलेल्या चळवळीमुळें ती राखली गेली असें म्हणण्यास दुसराहि पुरावा आहे. मांटेग्युसाहेबांचें दुरुस्त केलेलें बिल ता. २७ नव्हंबर रोजीं पार्लमेंट सभेपुढें मंजुरीकरतां यावयाचें होतें. पण सिडेनहॅम-कंपूच्या उपद्व्यापामुळें ता. ३ डिसेंबर पर्यंत पार्लमेंटची चर्चा लांबणीवर टाकण्यांत आली. लांबणीवर टाकण्यासंबंधाचा हा प्रश्न पार्लमेंट सभेंत सर एडवर्ड कार्सन, कर्नल येट वगैरेंनीं पुढें आणला असतांना पार्लमेंट सभेचें सूत्रचालक मंत्री मि. बोनर लॉ यांनीं असें सांगितलें कीं, नाताळच्या सुटींत भरणारी

हिंदुस्थानची जंगी सभा

ता. २६ डिसेंबर रोजीं भरण्यापूर्वी हिंदुस्थानचें हें स्वराज्याचें बिल पास करून घेणें सरकारास इष्ट वाटत आहे, आणि म्हणून सरकार सांप्रत घाई करीत आहे. राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाला मंत्रिमंडळाकडून इतके महत्व यापूर्वी कधींहि मिळालें नाहीं. राष्ट्रीय सभेचें मत काय पडेल या दृष्टीनेंच मांटेग्युसाहेबांनीं आपल्या दुरुस्त केलेल्या बिलाची रचना केलेली आहे. आणि राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाच्या तारखांना अनुलक्षूनच या बिलाच्या मंजुरीच्या तारखा आज ठरवण्यांत येत आहेत. बिल लवकर पास केलें पाहिजे किंवा कसें या वादासंबंधानें सिडेनहॅमी कंपूला आयर्लंडच्या होमरूलचे कट्टे द्वेष्टे सर एडवर्ड कार्सन यांचें पाठबळ मिळालें आहे. लंडन टाइम्स, डेली न्युज आदिकरून विलायतेंतील मुख्य पत्रें डिसेंबरांतच बिल पास करून घेतलें नाहीं तर नसते अनर्थ ओढवतील असें प्रतिपादन करीत असून माजी मुख्य मंत्री मि. ॲस्क्विथ यांचा लिबरल पक्षहि याच मताचा आहे. भांडवलवाल्या पक्षाचा अस्सल अर्क म्हणजे कार्सनसाहेब होत. या सर्वांत खालीं बसलेल्या अर्काच्या गाळांत रुतलेल्या सिडेनहॅमी कंपूस एका बाजूस टेवलें तर भांडवलवाल्या पक्षातीलहि उदारमतवादी सभासदांना राष्ट्रीय सभेस इतका मान द्यावयास कोणी लावलें? सांप्रतच्या युरोप खंडांतील काळाचा महिमाच असा

आहे कीं, बिन भांडवलवाल्या लोकांना व त्यांवरोवरच जिंकलेल्या लोकांनाहि संतुष्ट ठेवण्याकरितां भांडवलवाल्यांनीं आपली राज्यतृष्णा आणि द्रव्यतृष्णा जर मर्यादित करून घेतली नाहीं तर राज्य व द्रव्य दोन्हींहि भांडवलवाल्यांना पचायची नाहींत. हिंदुस्थानास आज मांटेग्युसाहेब स्वराज्याचा हप्ता म्हणून जे हक्क देत आहेत ते हक्क त्यांच्या उदार मताचें फळ म्हणून ते देत असोत वा नसोत; पण एवढी गोष्ट खरी आहे कीं, हल्लींच्या काळांत असलेले स्वराज्याचें हक्क स्वतःच्या देशांतील बिन भांडवलवाल्यांना आणि साम्राज्यांतील इतर देशांना दिल्याशिवाय साम्राज्याची पोटदुखी बंद पडावयाची नाहीं. भांडवलवाले व बिनभांडवलवाले यांच्यामधील झगडयामुळें युरोपांत गेल्या दोन तीनशे वर्षांतहि न झालेली भयंकर क्रांति घडून आलेली आहे. रशियांतील बोल्शेव्हिकांच्या या क्रांतिमुळें आणि युरोपखंडांत वाढत चाललेल्या सोशियालिस्टिक मताच्या प्रस्थामुळें इंग्रजी साम्राज्यासहि पोटदुखीचें दुखणें आज जडलें आहे. पोटदुखीच्या या दुखण्यामुळें अन्न न पचून हातापायास कमकुवतपणा येत चालला आहे. पोटदुखीच्या या दुखण्याच्या वेळीं सर्व साम्राज्यास उपयोगी पडणारे

पाचक औषध

म्हणून स्वराज्याच्या तत्त्वांचा खल आज इंग्लंडांत चालला आहे. भांडवलवाल्यांनीं व साम्राज्यवाद्यांनीं आजपर्यंत फार कुपथ्य केलें आहे. इजिप्त, इराण व टर्की असलें वातूळ व वावडे पदार्थ खाण्याची भर या कुपथ्यांत नुकतीच पडली आहे व पडतहि आहे. अशा रोगग्रस्त स्थितींत व्याधिहारक औषध म्हणून हिंदुस्थानच्या स्वराज्याचें बिल पार्लमेंटपुढें आलें आहे. हिंदुस्थानास जें पौष्टिक तेंच इंग्लंडास पाचक होणार, अशी आज स्थिति आहे. युरोपखंडाच्या सांप्रतच्या रोगाकडे लक्ष देऊन राष्ट्रीय सभेनें हिंदुस्थानास पौष्टिक म्हणून प्रांतिक पूर्ण स्वराज्य आणि वरिष्ठ सरकारांत

भागी मागितली, इंग्लंडनें हिंदुस्थानांत पाठवलेला नोकरशाहीचा रोग हें पाचक औषध घेतांना वांकडे तोंड करील म्हणून रोग्याला विचारून त्याच्या तंत्रानें औषध देण्याचा मांटेग्यूसाहेबानें उपक्रम केला. हिंदुस्थानांतील नोकरशाहीला किंवा विलायतेंतील त्यांच्या सांप्रदायांना विचारून औषधोपचार करणें ही पद्धतच मुळीं चुकीची. हिंदुस्थानांतील नोकरशाहीचा सल्ला घेऊन मग काय तें ठरवावयाचें हीच पद्धत मोडून टाकून उदात्त तत्त्वांना अनुसरून जी चिकित्सा होईल त्या चिकित्सेप्रमाणें वागण्याचा काळ आला आहे. या काळानें ज्या आशा व आकांक्षा हिंदुस्थानांत उत्पन्न केल्या त्या आशेला व आकांक्षेला धरून मांटेग्यू–चेम्सफर्ड रिपोर्ट न झाल्यामुळें दिल्लीच्या राष्ट्रीय सभेची निराशा झाली, आणि त्याच आशा हल्लींच्याहि दुरुस्त बिलांत सफल न झाल्यामुळें ना. पटेल, ना. खापर्डे वगैरे शिष्ट-मंडळींनाहि आपली निराशाच व्यक्त करावी लागत आहे. यथाकाल उद्भवलेल्या आशा सफल न झाल्यास कोणाची निराशा झाल्यावांचून राहील ? अशी निराशा झाली असतांहि मांटेग्यूसाहेबांच्या नव्या बिलानें दिलेला तुकडा खाऊन टाकून त्या अल्पस्वल्प बलाचा उपयोग हल्लींहूनहि दुप्पट जोरानें सगळी भाकरी मिळवण्याकडे केला पाहिजे असें लो. टिळक यांचें म्हणणें आहे. निराशा झाली म्हणून खट्टू होऊन बसण्याचें कारण नाहीं. कारण कालाचा ओघ रोजचे रोज अधिकाधिक अनुकूल होत चालला आहे. कालाच्या उदरांतून नवीन नवीन आशा निर्माण होऊं लागल्या आहेत. या आशांवर भिस्त ठेवून उत्तेजनार्थ मांटेग्यूच्या बिलाचें सेवन करून नेटानें चळवळ चालवल्यास पांच दहा वर्षांत यश आल्यावांचून राहणार नाहीं, असा अनुभव शिष्ट मंडळास विलायतेस आला आहे. कार्सनसाहेबांना आयर्लंडच्या होमरूलचें बिल हाणून पाडतां आलें, पण हिंदुस्थानच्या स्वराज्याचें लंगडेंहि बिल जागच्या जागीं डांबून ठेवतां यावयाचें नाहीं. कारण

इंग्लंडांतील बिन भांडवलवाला लोकसमूह हिंदी स्वराज्यासंबंधानें आज इतका जागृत झालेला आहे कीं, स्वराज्याचें हे चतकोर हक्क नाकारणाऱ्या भांडवलवाल्यांची निर्दय म्हणून छी–थूः करण्यास बिलयतेंतील बिन भांडवलवाला पक्ष आज बिलकुल कमी करणार नाहीं. या छी–थूः ला पार्लमेंट सभेंतील भांडवलवाला पक्ष आज भीत आहे आणि कार्सनसाहेब विरुद्ध गेलें तरी या भीतीच्या जोरावरच डिसेंबरांत बिल पास करून घेऊंच घेऊं असें बोनर लॉ म्हणत आहेत. सिडेनहॅमी कंपूला कार्सन साहेब जरी मिळाले असले तरी या छी–थूः च्या भीतीपुढें त्यांचें कांहींहि चालणार नाहीं. हें ओळखूनच स्टेटसमन, इंग्लिशमन वगैरे अँग्लो–इंडियन पत्रें सिडेनहॅम साहेबांची काम करण्याची दिशाच चुकली असा दोष त्यांना देत आहेत. लो. टिळक यांनीं योग्य दिशेनें काम केलें आणि भलत्याच दिशेकडे सिडेनहॅम वाहत गेलें! बिन भांडवलवाल्यांच्या मध्यें काम करून लो. टिळक व राष्ट्रीय सभेचें शिष्टमंडळ यांनीं इंग्लंडांत जें लोकमत आज उत्पन्न केलें आहे त्याची दहशत पार्लमेंट सभेलाहि वाटत असल्यामुळें कार्सनसाहेब निस्तेज होत आहेत. लो. टिळक यांचें उदाहरण पुढें ठेवून सिडेनहॅमी कंपूनें योग्य दिशेनें लोकमत बनवण्याची जरुरी आहे, अशा आशयाचें उद्गार स्टेट्समन व इंग्लिशमन यांच्यासारख्या अँग्लो–इंडियन पत्रांच्या तोंडून आज निघावेत याहून चांगलें सर्टिफिकीट शिष्टमंडळीच्या कामगिरीला दुसरें कोणतें मिळणार?

* जुन्नरची झटापट

वेंळगांवचें प्रसिद्ध पुढारी रा. गंगाधरराव देशपांडे यांच्या अध्यक्षतेखालीं जुन्नर येथें गेले बुधवारीं व गुरुवारीं भरलेली पुण्याची जिल्हा परिषद यशस्वी रीतीनें पार पडली, ह्या बद्दल जुन्नरकरांचें आम्हीं मनःपूर्वक अभिनंदन करतो. अध्यक्ष रा. देशपांडे यांजबरोबर लो. टिळक पुण्याहून जुन्नरास जात असतांना वाटेंत खेड, मंजर पेठ, नारायणगांव वगैरे ठिकाणीं त्यांचें थाटाचें स्वागत झालें. जुन्नरास तर त्यांच्या मिरवणुकीकरतां सर्व गांव वेशीजवळ लोटला होता आणि सर्व पेठा तोरणांनीं व कमानींनीं शृंगारलेल्या होत्या. अध्यक्ष व लोकमान्य जुन्नराहून परत येतांना धोडेगांव येथें लोकमान्यांस तेथील रहिवाशांकडून रौप्यकरंडकांतून मानपत्र समर्पण करण्यांत आलें. मंचर येथेंहि लो. टिळकांचें भाषण झालें. आणि मंचरच्या मुसलमानांनीं त्यांचें मनःपूर्वक स्वागत केलें. खुद्द जुन्नरच्या मुसलमानांनींहि आपल्या पेठेंत लोकमान्यांना व इतर प्रतिनिधींना बोलावून हिंदु–मुसलमानांची एकी झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला; आणि गोवध बंद करण्याच्या ठरावास आपली संमति दिली. मंचरचे मुसलमानांनींहि तशीच संमति दिली. आणि मशिदीपुढें वाद्यें वाजविण्याचा प्रश्न आपापसांत मिटला जाईल अशी जी आशा व्यक्त केली तीस टिळकांनीं पाठिंबा दिला. वरील प्रसंगाशिवाय जुन्नरास सार्वजनिक समारंभाच्या स्वरूपाचें दोन तीन प्रसंग घडून आले. जुन्नर म्युनिसिपालिटीनें एकमतानें लो. टिळक यांना मानपत्र देण्याचें ठरविलें होतें. तें मानपत्र देण्याचा समारंभ बुधवारीं रात्रीं झाला. त्यावेळीं लोकमान्यांचें भाषण ऐकण्यास हजारों लोक जमले होते. शिवाय शाळेच्या ज्या पटांगणांत

---

* केसरी, ता. ९ मार्च १९२०

जिल्हा परिषदेचा मंडप घातलेला होता, त्यांत लो. टिळक ह्यांचें रावबहादुर वैद्य यांच्या अध्यक्षतेखालीं जें भाषण झालें त्यास दोन तीन हजारांहून अधिक लोक हजर होते. दुसरें दिवशीं सायंकाळीं त्याच जागीं लो. टिळक यांचें अध्यक्षतेखालीं रा. खाडिलकर, प्रो. परांजपे, रावबहादूर वैद्य व रा. दादासाहेब करंदीकर यांचीं भाषणें झालीं. याहिं समारंभास आदल्या दिवसाइतकी गर्दी होती. मिरवणुकी, सार्वजनिक व्याख्यानें व पानसुपाऱ्या हें सर्व समारंभ सर्वांस सारखे खुले होते. आणि सर्व वेळीं शेतकऱ्यांचीच विशेष गर्दी होत होती. लोकमत कोणत्या बाजूचें आहे, हें अजमाविण्यास असल्या समारंभांचा चांगला उपयोग होतो. लो. टिळक व राष्ट्रीय पक्ष यांची नालस्ती करून जुन्नरची जिल्हा सभा उधळून देण्याकरितां जेधे झेंडयाखालीं जुन्नरासहि येथील फर्ग्युसन कॉलेजचा व नेमस्तांचा कंपू गेला होता. पण जुन्नरच्या समारंभांत जेव्यांचा कंपू वेडयांचा ठरला आणि

दर्यामें खसखस

अशी त्यांची स्थिति झाली. त्यानीं जुन्नरास झटापट करून जुन्नरच्या सभेचा बेरंग करण्याची शिकस्त आपल्याकडून शक्य तितकी केली, पण कांहींच साधलें नाहीं. तेव्हां जिल्हासभेची तिकिटें न काढलेल्या प्रत्येकास आपल्या सभोंवती गोळा करून राष्ट्रीय पक्षास मनसोक्त शिव्याशाप देण्याची आपली हौस पुण्याहून गेलेल्या तीस चाळीस मवाळांनीं भागवून घेतली. वडाखालील किंवा वडावरील या कावळ्यांच्या कलकलाटांनीं जिल्हासभेच्या कामांत यत्किंचित्हि व्यत्यय आला नाहीं; किंवा जिल्हापरिषदेच्या महत्त्वास थोडाहि कमीपणा आला नाहीं. आपले प्रयत्न व्यर्थ जात आहेत असें पाहिल्यावर ज्ञानप्रकाशांत ध्वनित केल्याप्रमाणें त्या 'बाहेर' वसलेल्यांच्या सभेस कोल्हापुरी तमाशाचें स्वरूप आलें असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं.

प्रो. कानिटकर, ना. कामत किंवा चिंचवड संस्थानचें सरकारी ट्रस्टी लक्ष्मण रघुनाथ गोखले वकील ब्राम्हणांना लांखोली वाहणाऱ्या कोल्हापुरी तमाशांत सामील व्हावे आणि शिमग्याचा सण प्रत्यक्ष हातातोंडांनीं साजरा करणारांचे म्होरके होऊन टिळकांच्या नांवाचा ज्ञानप्रकाशांत म्हटल्याप्रमाणें उद्धार केल्याबद्दल त्यांना धन्यता वाटावी हें त्यांच्या पराभवानें चिडलेल्या मनःस्थितीचें द्योतक होय. अशा रीतीनें चिडून ग्राम्यपणांत शिरण्यांत फर्ग्युसन कॉलेजचे प्रोफेसरांना किंवा मुंबई कायदे कौन्सिलच्या नामदारांना कोणतेंहि भूषण नाहीं, हें त्यांनीं ध्यानीं ठेवावें. नेमस्तांचें जुन्नरास कांहीं चाललें नाहीं, ही गोष्ट खरी आहे. त्यामुळें चिडून जाऊन नेमस्तांनीं जुन्नरास शिमग्याचा सण किंवा धुळवडीचा सण कसा साजरा केला ह्यासंबंधाची जी ग्राम्य वर्णनें त्यांच्या पत्रांतून प्रसिद्ध झालीं आहेत त्याजकडेहि आम्हांस लक्ष देण्याचें कारण नाहीं. जुन्नरची जिल्हासभा बेरंग करण्याचा

नेमस्तांचा कावा

सभेच्या पूर्वी थोडे दिवस उघडकीस आला. जुन्नरच्या स्वागत कमिटीनें ठरविलेले सभेचे दिवस आपणास सोयीचे नाहींत असा त्यांनीं प्रथम गिल्ला आरंभिला. आपणांप्रमाणें नारायणगांवच्या लोकांनाहि हे दिवस मान्य नाहींत आणि नारायणगांवच्या लोकांनीं सार्वजनिक सभा भरवून तसा ठरावहि पास केला, असें ज्ञानप्रकाशनेंहि प्रसिद्ध केलें! पण नारायणगांवचे रा. धुमाजी पाटील यांनीं आपल्या सहीचें पत्र जुन्नरकरांना पाठवून नारायणगांवास असली जाहीर सभा भरली नाहीं, असला ठराव पास झाला नाहीं, व सभेचें दिवसहि नारायणगांवास अमान्य नाहींत, असें स्वच्छ कळविलें, सभेच्या तारखा पुढें ढकला, वेळ मागें पुढें ध्या, असें झालें तर तसें करा घ तसें झालें तर असें करा, अशी एकसारखी कुरकुर करून सभेच्या

कामांत व्यत्यय आणावयाचा आणि धांदलींत सभा उधळून द्यावयाची, एवढा ज्यांचा हेतु त्यांनीं खोटया सभांची व तारांची हकीकत आपल्या वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करूं नये तर करावें तरी काय? सभेच्या वेळेंत ढवळाढवळ करतां येत नाहीं असें पाहिल्यावर शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींना सभेंत फुकट घेण्याच्या नांवाखालीं आपलें गुंड सभेंत घसडून सभेचा बेरंग करण्याचा उद्योग नेमस्तांनीं आरंभिला. स्वतःच्या दुष्ट कृत्यांवर सैतानांस बायबलाच्या वचनांचें पांघरूण घालावेसें जसें वाटतें तसेंच मवाळांनींहि ह्या प्रसंगीं केलें. मुंबईच्या स्पेशल काँग्रेसपासून मवाळांनीं आपली स्वतंत्र परिषद काढली व काँग्रेसमधून अंग काढून घेतलें. प्रामाणिकपणाच्या दृष्टीनें विचार करावयाचा असल्यास पुण्याच्या मवाळांनींहि काँग्रेसच्या कारभारांत ढवळाढवळ करणें अप्रशस्त होय, पण काँग्रेसच्या ठरावाच्या पांघरुणाखालीं काँग्रेस पक्षाची जिल्हा परिषद उधळून देतां आली तर कमी कां करावें? ह्या सैतानी विचारानें मवाळांना घेरल्यामुळें ते त्या उद्योगास लागले. दिल्लीच्या काँग्रेसमध्यें जसे शेतकऱ्यांचे प्रतिनिधी फुकट घेण्यांत आले होते; त्याप्रमाणें जुन्नरच्या जिल्हा सभेंसहि फुकट घेण्यांत यावें, असा त्यांनीं बूट काढला. जुन्नरच्या आसपासच्या शेतकऱ्यांना त्यांनीं कळविलें कीं, सभागृहांत बेलाशक शिरून पुढच्या जागा पटकावण्याचा अधिकार तुम्हांस आहे; तेव्हां तुम्ही बेलाशक आंत घुसा आणि कोणाचें कांहीं ऐकूं नका. असा उपदेश करण्यास कमी झालें नाहीं; पण उपदेश करणाराइतके जुन्नरचे शेतकरी वेडे नसल्यामुळें हा उपदेश मात्र कोणास पटला नाहीं. मारामारी करणारे गुंड अशा रीतीनें तयार झाले आहेत, तुम्ही सेनापती होण्यास धावून या असें पुण्यास कळविण्यांत आल्यावरून पुण्याचे पंचवीस तीस म्होरके जुन्नरास गेले, पण सैनिकांच्या ऐवजीं कोल्हापुरी तमासगीरच

त्यांच्या दृष्टीस पडल्यामुळें तमाशांत स्वतःच सोंगें घेण्यावरच सेनानायक होण्याची हांव त्यांना भागवून ध्यावी लागली. जुन्नरास येण्यावरोबर ना. कामत यांनीं जिल्हा सभेचे बुधवार सकाळचें काम सांगत असतांना रा. देशपांडे यांना लेखी कळवले कीं, शेतकऱ्यांना मोफत घेण्याचा प्रश्न जिल्हा सभेनें आतां हातीं ध्यावा. जिल्हा सभेपुढें लगेच प्रश्न न मांडतां सब्जेक्ट कमिटीपुढें सदर प्रश्न मांडण्याचें अध्यक्षांनीं ठरविल्यामुळें नेमस्तांपैकीं दहा इसमांना प्रतिनिधींची फी भरावी लागली. नेमस्तांची कुरकुर राहूं नये म्हणून दहाचे दहा नेमस्त सब्जेक्ट कमिटींत घेण्यांत आले होते. ८०।९० इसमांच्या सब्जेक्ट कमिटींत नेमस्तांना कोणीहि पाठिराख्या मिळाला नाहीं, ही ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट होय. जुन्नरच्या जिल्हासभेची हकीकत आज दुसरीकडे दिली आहे. तिजकडे पहातां पांच सहाशें प्रतिनिधींत निम्म्याहून अधिक शेतकरी होते, हें वाचकांच्या ध्यानीं येईल. शेतकऱ्यांचा एवढा मोठा भरणा सभेंत व सब्जेक्ट कमिटींत हजर असतांना नेमस्तांना त्यांत कोणीहि अनुयायी मिळूं नये याचा अर्थ काय? नेमस्तांचा कावा समजण्याइतकी व्यवहारदक्षता आमच्या शेतकरी वर्गांत आहे, हें त्यावरून सिद्ध होत नाहीं काय? दिल्लीच्या काँग्रेसनें शेतकऱ्यांना फुकट घेण्याचा जो ठराव केला आहे तो पाहिजे तितक्यांना व पाहिजे त्यांना आंत घुसण्यासाठीं नाहीं. प्रांतिक काँग्रेस कमिटीनें निवडल्यास आणि गरिबीमुळें फुकट ध्यावें अशी शिफारस केल्यास एक हजार पावेतों 'किसान' प्रतिनिधींना फी माफ करण्यांत यावी, असें काँग्रेसचें म्हणणें आहे. जिल्हा परिषदेची फी थोडी, आणि जिल्हा सभेस निम्याहून अधिक प्रतिनिधी शेतकरी वर्गाचे येतात ही स्थिती ध्यानांत घेऊन पन्नासांपेक्षां अधिक प्रतिनिधी फुकट घेण्याचें सब्जेक्ट कमिटीनें सहाजिक नाकारलें. या पन्नासांना निवडण्याचा

व शिफारस करण्याचा हक्क तालुका काँग्रेस कमिटयांकडे आला; आणि प्रत्येक तालुका काँग्रेस कमिटयांनीं योग्य अशा पांच पांच शेतकऱ्यांची शिफारस करावी असें ठरलें. काँग्रेसच्या ठरावांना अनुसरून ना. कामत यांच्या सूचनेचा अशा रीतीनें संग्रह करण्यांत आल्यामुळें कोणाहि काँग्रेस-भक्तास वाईट वाटण्यास बिलकुल कारण राहिलें नव्हतें. पण गुंड सभागृहांत घुसवून सभेंत व्यत्यय आणण्याच्या इराद्यानें जुन्नरास गेलेल्यांचें समाधान त्यामुळें कसें होणार? आपल्या हातचा हाहि बाण फुकट जातो असें पाहून पुण्याच्या मवाळांना राग आला, आणि नंतर सब्जेक्ट कमिटीशिवाय जिल्हासभेच्या बैठकींत त्यांनीं पाऊलहि ठेवलें नाहीं. मांटेग्यूच्या कायद्या-संबंधानें राष्ट्रीय सभेच्या ठरावांतील असमाधानकारक व निराशाजनक वगैरे शब्द काढून टाकून ना. सिंहाचेंहि आभार मानावें, मुलींचें सक्तीचें शिक्षण झालें नाहीं तर मुलांनाहि शिक्षण देऊं नये वगैरे वादाचें प्रश्न सब्जेक्ट कमिटींत मवाळांनीं आणले होते; पण त्यांच्या कोणत्याहि प्रश्नांचीं डाळ शिजली नाहीं. जुन्नरच्या जिल्हा परिषदेनें

राष्ट्रीय सभेचा कार्यक्रम

पसंत केला. आणि जिल्ह्यांतील प्रश्नांचा विचारहि राष्ट्रीय सभेच्या धोरणाला अनुसरूनच केला. मांटेग्यूसाहेबांचा कायदा पास झाल्यापासून राष्ट्रीय सभेचा पक्ष आणि मवाळांचा पक्ष असे दोन पक्ष चोहोंकडे झाले आहेत. नव्या कायद्याप्रमाणें मुंबईच्या व वरिष्ठ सरकारच्या कायदे-कौन्सिल-रांची निवडणूक येत्या सप्टेंबर-आक्टोबर महिन्यांत व्हावयाची असल्यामुळें राष्ट्रीय सभेस असलेली लोकमताची अनुकूलता बरी वाईट होईल त्या तऱ्हेनें कमी करण्याचा उद्योग मवाळांकडून सांप्रत होत आहे. जुन्नराच्या चेष्टाहि ह्या उद्योगांतीलच एक भाग होत. एखाद्या वडाखालीं थोडयाशा कावळयांचा

शिमगा करून लो. टिळक यांच्या नावांचा उद्धार केल्यानें राष्ट्रीय सभेची छाप कमी होईल असें ह्या मवाळांना वाटलें एवढीच त्यांत शोचनीय गोष्ट होय. पण एका दृष्टीनें नेमस्तांच्या पुढाऱ्यांना हें ग्राम्य प्रकार टाळतां येण्यासारखें नाहींत. सप्टेंबर–ऑक्टोबरमधील निवडणुकीकरतां उभे रहाण्यास मवाळांचें हातापायांत स्वतःचें बळ नाहीं, तेव्हां त्यांना कोल्हापुरी तमासगिरांची मदत घेणें भाग आहे. या तमासगिरांनीं स्वतःप्रमाणें त्यांना रंगविल्यास त्याबद्दल मवाळांनीं कुरकुर करून कसें चालेल. ज्याच्या जोरावर उभे रहावयाचें त्याचा रंग आपल्या चेहऱ्यावर उमटून घेतलाच पाहिजे. असली ग्राम्य सोंगें आणण्यांत जनलज्जेची जरी मवाळांना फिकीर नसली तरी अधिकारी काय म्हणतील याची काळजी मवाळांनीं नको कां बाळगावयाला ? पण मवाळांना तीहि धास्ती राहिलेली नाहीं. अमृतसरच्या राष्ट्रीय सभेची लोकमतावरील छाप कमी करण्याचा उद्योग नोकरशाहीच्या कांहीं अधिकाऱ्यांनीं चालविला असून मांटेग्यूसाहेबांच्या बहाल केलेल्या देणगीवर पूर्णपणें खूष न होणें म्हणजे उपद्व्यापीपणा करणें होय. आणि राष्ट्रीय सभेच्या असल्या उपद्व्यापी लोकांना निवडणुकींत निवडून देऊं नका अशा आशयाचें सरकारी छापखान्यांत इंग्रजी भाषेंत छापलेलें सरकारी चिटोरे जिल्हापरिषदेंत वाटण्यांत आलें. ग्राम्य नाच नाचण्यांत मवाळांना नाचवतो कोण याचा खुलासा या चिटोऱ्यानें केला. 'बोलवितां धनि वेगळाचि' हें या चिटोऱ्यांवरून ध्यानांत आलें. लोकांनीं संतुष्ट रहाण्यास आतां हरकत नाहीं आणि राष्ट्रीय सभा उपद्व्यापी आहे हें सिद्ध करण्यास मनरोसाहेबांच्या ११० वर्षांपूर्वीच्या उद्गाराबरोबरच कोल्हापुरांत पुष्कळ वर्षें राहिलेल्या एका बाईची साक्ष या पत्रकांत दिलेली आहे. सप्टेंबर–ऑक्टोबरच्या निवडणुकी होऊन जाईपर्यंत असली आणखीन

कित्येक चिटोरी सरकारी टांकसाळींतून बाहेर पडतील आणि ह्या पत्रकांचा उपयोग झाला अशी बोंब, शिमगा नसतांहि, मवाळ पक्ष पुढील पांच सहा महिनें मारीत सुटेल यांत संशय नाहीं. मवाळ, कोल्हापुरी तमासगीर व सरकारी पत्रकें या तिघांचा संगम जुन्नरास होऊन राष्ट्रीय पक्षास चीत करण्याकरतां जुन्नरास मोठी झटापट झाली. ह्या झटापटींत राष्ट्रीय सभेचा पक्ष विजयी झाला. आणि निवडणुकीच्या विषयाचा प्रारंभ श्री शिवछत्रपतींच्या जन्मस्थानींच झाला, हा राष्ट्रीय पक्षास निवडणुकीसंबंधानें शकुनच होय. राष्ट्रीय सभेची मातब्बरी कमी करण्याचा यत्न मवाळांकडून व सरकारी पत्रकांकडून करण्यांत येईल तर त्यासंबंधानें निवडणुकीच्या वेळीं जपा, असा सर्वांना उपदेश लो. टिळक व अध्यक्ष रा. गंगाधरराव देशपांड ह्यांनीं केला; आणि निरनिराळ्या समारंभांना जमलेल्या शेतकऱ्यांनाहि तो पूर्णांशानें पटला. राष्ट्रीय सभेचा कार्यक्रम शेतकरी वर्गाला पटण्यासारखा आहे किंवा कसें हें जुन्नरास ठरवावयाचें होते. सदर प्रश्नाचा निकाल राष्ट्रीय पक्षास उत्तेजन देणारा झाला ही संतोषाची गोष्ट होय. मांटेग्यू–साहेबांनीं जेवढें दिलें आहे तेवढेंहि आमच्या पदरांत न टाकण्यास नोकरशाही धडपड करील हें समजण्याइतका आमचा लोकसमूह चतुर आहे. बादशाही जाहीरनाम्यांतील बादशाही आज्ञेप्रमाणें नोकरशाहीस वागावयास लावल्याशिवाय स्वराज्याचें पूर्ण हक्क कधींहि लौकर मिळावयाचें नाहींत, हें समजण्याइतकी व्यवहारदक्षता सामान्य लोकांत खात्रीनें आहे. नांवाच्या ग्रामपंचायती निर्माण करून खेडयांतील घरांवर कर बसविण्याची संधी साधण्यापेक्षां ग्रामपंचायतींना घरपट्टी बसवण्याचा व आरोग्य राखण्याच्या हक्काबरोबरच गांवच्या जंगलाचें, गुरचराईचें, पीक पाण्याची पहाणी करून आणेवारी ठरविण्याचें आणि दिवाणी, फौजदारी लहान सहान खटले

चालविण्याचें हक्क असल्याशिवाय खेडयापाडयांतील पंचांना महत्व यावयाचें नाहीं, हें न समजण्याइतका भोळा शेतकरी महाराष्ट्रांत क्वचितच सांपडेल. लोकांना दारू नको आहे, आणि करांचाहि बोजा अधिक वाढवून घेण्याची लोकांची इच्छा नाहीं. अशा स्थितींत सरकारी खात्यांत काटकसर करवून ते पैसे लोककल्याणाकडे खर्च करणारा पक्ष सोडून देऊन नोकरशाहीला 'जो हुकूम' करणारा व शेतकऱ्यांकर नवे कर लादणारा मवाळ सामान्य जनसमूहाला कसा पसंत होईल, लोककल्याणाचे व नव्या करांचें प्रश्न जर समाधानकारक रीतीनें सोडवावयाचे असले तर हिंदुस्थान सरकारचें बजेट व जकातीचें खातें लोकांचें हातीं पाहिजे, असें म्हणाऱ्या पक्षाचीं सरशी जर या निवडणुकींत झाली नाहीं तर हक्कांच्याहि दृष्टीनें लोकांची फसवणूक होऊन शक्तिबाहेर नवें कर बसल्यानें पैशाच्याहि दृष्टीनें लोकांची नाडवणूक होईल, अशी जुन्नरच्या जिल्हामरिष्मदेची शिकवणूक आहे.

---

* लोकमान्यांची शिकवणूक

लोकमान्यांच्या चरित्राकडे गेल्या आठवडयांत सर्व हिंदुस्थानचें लक्ष वेधलें गेलें होतें आणि ठिकठिकाणच्या पुढाऱ्यांनीं लोकमान्यांच्या शिकवणी-संबंधानें आपापलीं मतें सभांतून व वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध केलीं आहेत. यापैकीं कांहीं मतें आजचे अंकांत दुसरीकडे दिलीं आहेत. चाळीस वर्षांपूर्वीचा हिंदुस्थान व आजचा हिंदुस्थान यांच्यांत मोठें अंतर पडलें असून राष्ट्रीय ज्योत उत्पन्न करण्याचा व तिला जोमांत आणण्याचा मान सर्व पुढाऱ्यांनीं मिळून लोकमान्यांना आज दिला आहे. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या अंतःकरणांत जी स्वदेशाभिमानाची, राष्ट्रीयत्वाची व आत्मविश्वासाची ज्योत जळत होती तीच ज्योत लोकमान्य टिळक यांच्याहि अंतःकरणांत अगदीं लहानपणापासून जळत होती. चाळीस वर्षांपूर्वी सरकारी नोकरी करून फावल्या वेळांत राज्यकर्त्यांनीं घालून दिलेल्या कित्त्याला अनुसरून देशहिताकडे लक्ष पुरविण्याचा प्रघात होता. ही रूढी कै. चिपळूणकर यांजबरोबर लो. टिळक यांनीं पार झुगारून दिली. दरमहा तीस रुपयांवर संसार चालवून त्यांनीं डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या शाळांची स्थापना त्यावेळीं केली. आपलें राष्ट्र एका काळीं मोठें होतें, तें तसेंच पुनः मोठें झाल्यावांचून रहाणार नाहीं, आणि तसें घडवून आणण्यास लागणारे गुणहि आज आमच्या अंगीं आहेत, हा मंत्र कै. चिपळूणकर यांनीं आपल्या सर्व लेखांत एकसारखा जपला आहे, हाच मंत्र लो. टिळक यांनीं आपल्या चाळीस वर्षांच्या सार्वजनिक आयुष्यांत एकसारखा लोकांच्या पुढें ठेवला, अनुभवानें खरा करून दाखविला आणि सर्व लोकांच्या दृष्टीस पडेल एवढें

---

* केसरी, ता. १० आगष्ट १९२०

प्रत्यक्ष फळहि लोकांपुढें मांडून ते स्वर्गवासी झालें. कै. चिंचळूणकर यांच्यावरोबर नवीन हिंदुस्थान निर्माण करण्याचें जें पुण्यकर्म त्यांनीं आरंभिलें तें स्वताःच्याच आयुष्यांत चाळीस वर्षांत त्यांनीं शेवटास नेलें. जुनी रूढी मोडली व नवी अंमलांत आली. देशकार्य करण्याची जुनी पद्धत नामशेष झाली, नवी जोरावली. ही नवी पद्धत जोरावत जाऊन तिचीं फळेंहि दूर अंतरावर कां होईनात प्रत्यक्ष दिसूं लागलीं. फळें दिसूं लागतांच लोकमान्यांचें आयुष्य संपलें. त्यांचा उपभोग घ्यावयाला ते राहिले नाहींत, किंबहुना त्याकरितां त्यांचें आयुष्य नव्हतेंच. जीं बीजें त्यांनीं चाळीस वर्षांपूर्वी हिंदुस्थान या भूमींत पेरलीं त्या बीजांचीं रोपें जोमानें वाढीस लावण्यापुरतेंच त्यांच्या आयुष्याचें कार्य विधात्यानें आखलें होतें. परमेश्वरानें त्यांजवर सोंपविलेलें काम त्यांनीं किती उत्तम रीतीनें पार पाडलें हें ज्यांना पहावयाचें असेल त्यांनीं लोकमान्यांसंबंधानें, सर्व हिंदुस्थानच्या सर्व पुढाऱ्यांनीं काढलेले उद्गार अवश्य वाचावे. आज पृथ्वीतलावरील भाग्यवान म्हणून समजल्या जाणाऱ्या राष्ट्रांच्या वैभवाइतकें मोठें वैभव हिंदुस्थानाला एक वेळ होतें आणि त्या वैभवांला आजचा हतभागी हिंदुस्थान पुनः गांठल्यावांचून राहणार नाहीं, अशी नुसती भावना असून काय उपयोग ? ह्या भावनेप्रमाणें प्रत्यक्ष गोष्टी घडून येण्यास हिंदुस्थानांत जर शक्ति उत्पन्न झाली नाहीं तर ही भावना निरर्थकच होय ! एकटयादुकटयाच्या किंवा शें-पन्नास लोकांच्या मनांत ही भावना उत्पन्न झाल्यानें शक्ति प्रादुर्भूत होत नसते. कुदशेच्या फेऱ्याला आणि परदेशाऱ्या सत्तेला जिच्या योगानें आळा बसेल एवढी मोठी शक्ति उत्पन्न झाली पाहिजे. ही शक्ति उत्पन्न करण्याकरितां नाना प्रकारचे उद्योग करण्यास चाळीस वर्षांपूर्वी ज्यांनीं आरंभ केला, गेलीं चाळीस वर्षें अशाच प्रकारच्या उद्योगांत ज्यांनीं घालविलीं व जे आजहि त्या उद्योगांत आयुष्य घालवीत आहेत, त्या सर्वांचे

पुढारी लो. टिळक हे होते. निद्रित देशास जागें करणें, आणि योग्य दिशेकडे त्यांचें तोंड फिरवून जरूर ती शिधासामग्री त्याजवरोवर देऊन त्याला मार्ग आक्रमण करावयास शिकविणें ही कामगिरी अत्यंत दुर्घट आहे. लोक जागेच होत नाहींत, जागे झाले तरी डोळे उघडीत नाहींत, डोळे उघडले तरी नीट पहात नाहींत, पाहिलें तरी हातपाय हालवीत नाहींत, उभे रहात नाहींत; या सर्व क्रिया करण्यास लहान मुलास अत्यंत ममताळूपणानें, एकनिष्ठेनें आणि पुढील थोरपणाच्या विश्वासानें आई ज्याप्रमाणें शिकविते त्याप्रमाणेंच पुढाऱ्यांनीं देशाला वाढीस लावावें लागतें. आपले पूर्वज मोठे होते आणि चिमुकलें अर्भकहि त्याच मोठेपणास चढणार आहे, अशी दृढनिष्ठा जशी वीरमातेच्या अंगीं असते, तशीच दृढनिष्ठा लोकमान्यांच्या अंगीं होती. आयुष्यभर त्यांनीं जें पाळलें तें या सत्याचें व्रत पाळलें ! आपल्यांतलाच पुढारी सतीचें व्रत रक्तांत भिनलेल्या वीरमातेप्रारखा असावा लागतो. लोकमान्य टिळक तसेच होते. नव्या नव्या जोमाचा हिंदुस्थान त्यांनीं जन्मास घातला आणि तो तारुण्याच्या कल्याणप्रद अवस्थेच्या जवळ आणून पोंचविला, असे जे त्यांच्याबद्दल उद्गार काढण्यांत आले आहेत ते अक्षरशः खरे आहेत. मातेचा स्वार्थत्याग त्यांच्या अंगीं पूर्णपणें बिंबलेला होता. ह्या स्वार्थत्यागाचा प्रवाह सर्व आयुष्यभर रोजच्याहि नित्यक्रमांत एकसारखा वाहत होता. आपलें शरीर जितकें देशकार्यार्थ झिजवितां येईल तितकें झिजविलें पाहिजे, आणि लहानथोर, खाजगी किंवा सार्वजनिक, हरएक प्रसंगीं तीच वृत्ति कायम ठेवली पाहिजे, एरवीं स्वार्थत्यागाचें बळ सर्व देशाकडून गिरविलें जावयाचें नाहीं, असें त्यांचें ठाम मत होतें आणि त्याप्रमाणें ते वागतहि होते.

निरंतर एकसारख्या वाहणाऱ्या या स्वार्थत्यागाच्या प्रवाहाला वीरवृत्तीची योग्य प्रसंगीं जोड देण्यास लोकमान्य कधींहि चुकले नाहींत. सरकारी नोकरी

करून फावल्या वेळांत देशकार्य करण्याची रूढी हिंदुस्थानच्या मनांतून खाडकन उतरून टाकण्याकरितां अत्यंत साधेपणानें आणि मूठभर वस्तूवरच उपजीविका करण्याचें तापसाचें व्रत त्यांनी ऐन तरुणपणी वीरवृत्तीनें स्वीकारलें. असल्या वीरवृत्तीमुळेंच स्वार्थत्यागी होण्याच्या धडयाकडे हिंदुस्थानचें लक्ष आपोआप लागलें. सरकारशीं झगडत असतांना अंगांत संचार झाल्या-सारखे ते उसळत असत; आणि सरकारच्या शक्तीमुळें त्यांना कारा-गृहवासाचे तीन प्रसंग आले असतांहि पुनः त्या त्या प्रसंगास कवटाळण्यास ते प्रेमानें धांवत जात असत. यांतलें इंगित झालें तरी त्यांच्या रक्तांत भिनलेली महाराष्ट्राची वीरवृत्तीच होय ! स्वतःच्या लोकांकडे बघण्याची त्यांची दृष्टि आईची होती. आणि राज्यकर्त्यांकडे पहाण्याची त्यांची नजर वीराची होती. तीन लेखांमुळें ते तीनदा तुरुंगांत गेले; सदर तीनहि प्रसंगांचे लेख त्याच्या हातचे नव्हते. आपल्या हातचे हे लेख नव्हते यावद्दल तक्रा-रीचा एकहि शब्द त्यांनी कधीं उच्चारलेला नाहीं. हुकूम होतांच शूर शिपायानें ज्याप्रमाणें लढाईच्या गर्दीत शिरावें आणि आपलें सर्वस्व स्वदे-शास अर्पण करण्यास तयार व्हावें, त्याप्रमाणें दुसऱ्याचें लेख असतांहि परमेश्वरी कार्य तडीस नेण्यास ही चांगली संधि आपणास मिळाली आहे असें समजून लोकमान्यांनीं जाणूनबूजून तुरुंगाचा रस्ता पत्करिला. रोजच्या नित्यक्रमांत, नेहमींच्या चळवळींत आणि राष्ट्रीयत्वाच्या वाढीला जरूर असणाऱ्या निरनिराळ्या संस्थांत आईप्रमाणें 'कुसुमाहुन मृदु' असणारे लोकमान्यांचें अंतःकरण सरकारशीं झगडनांना 'वज्रादपि कठोराणि' असल्या वर्णनाला शोभण्याइतकें वीरवृत्तीनें नटून जात असे. स्वदेशावर प्रेम आणि निरंतरच्या स्वार्थत्यागाच्या प्रेरणेनें अडथळ्याशीं झगडणारी वीरवृत्ति हे दोन गुण सर्व देशास खडबडून जागे करण्यास आणि बहुतेकांचीं अंतःकरणें

देशकार्याकडे वेधून घेण्यास पुरेसे झाले.

लोकमान्यांच्या अंगच्या या दोन मोठ्या सद्भावना होत. गजाननाचा व श्रीशिवाजी महाराजांचा महोत्सव व इतर राष्ट्रीय महोत्सव या सर्वांची सेवा ते सद्भावानें करीत असत. वरील दोन सद्भावना सर्व चळवळीच्या प्रसंगीं त्यांना पूर्णपणें चळवळींत पडण्यास लावीत असत. या दोन सद्भावनांमुळेंच खासगी संबंधांत त्यांचें चरित्र अत्यंत निष्कलंक झालें. सार्वत्रिक बाबींत लोकमान्यांचा द्वेष अत्यंत तीव्रपणें करणारांनाहि त्यांचें खासगी वर्तन पराकाष्ठेच्या निर्मलतेचें होतें अशीच कबुली द्यावी लागेल. खाजगी वर्तनास आणि सार्वजनिक चारित्र्यास असा नाहीं तसा डाग लावतां आला तर लावावा म्हणून ताईमहाराजांच्या खटल्याचें शुक्लकाष्ट बारापंधरा वर्षें त्यांच्यामागें एकसारखें लावण्यांत आलें होतें. मंडालेच्या तुरुंगांतील सहा वर्षांच्या शिक्षेहूनहि ताईमहाराजांच्या खटल्याचा ताप त्यांना अधिक झाला. वीर पुरुष झाला तरी तो नेहमींच धनुष्यावर दोरी चढवून बसलेला नसतो. पण ताईमहाराजांच्या खटल्यांत त्यांना एकसारखे रणांगणावर शत्रूचे घाव सोशीत उभे रहावें लागलें. १८९७ सालचा खटला आणि १९०८ सालचा खटला यांच्यांत जर ताईमहाराजांच्या आणि त्यांतूनच निघणाऱ्या चिरोलसाहेबांच्या खटल्यांच्या यातनांची भर घातली तर चाळीस वर्षांच्या सार्वजनिक स्वरूपाच्या आयुष्यांत शत्रूच्या बाणांनीं स्वतः जर्जर होत असतांना बाण लाव व सोड, अशी लढाई लढण्यांत वीस वर्षें बळवंतरावजींनीं घालविलीं असें म्हणणें भाग येतें. चाळीस वर्षांच्या हिशेबांत रात्री वजा केल्या, तर प्रत्यक्ष सूर्यालाहि वीस वर्षांहून अधिक काम पडत नाहीं. असला स्वार्थत्यागी लढवय्या सर्व हिंदुस्थानास जागृत करण्यास पुढें आला, हें हिंदुस्थानचें परम भाग्य होय!

हिंदुस्थानच्या अभ्युदयाकरितां गेल्या चाळीस वर्षांत सूर्यासारखी त्यांनीं मेहनत केली आहे, एवढेंच नव्हे तर "या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी" या न्यायानें निरनिराळ्या लढायांमधला. विसाव्याचा काळहि त्यांनीं देशकार्याकडेच खर्च केला. चाळीस वर्षांत वीस वर्षें लौकिक सूर्य निजतो; तो निजण्याची वेळहि लोकमान्यांनीं जागून काढली. रणभूमीपासून जबरदस्तीनें सरकारनें त्यांना नेऊन मंडालेंत सहा वर्षें कोंडून ठेवलें; तेथेंहि त्यांच्या अंतःकरणानें व बुद्धीनें विसावा घेतला नाहीं. गीतारहस्यासारखा अलौकिक ग्रंथ असल्या रात्रींच्या समयीं रात्रींचा दिवस करून त्यांनीं लिहून काढला. झगडण्याच्या उद्योगाला विसावा म्हणजे तत्त्वज्ञानाचें मनन होय, असें ते नेहमीं म्हणत असत. वेद, वेदांगें, इतिहास व पुराणें यांचा अभ्यास, अंगीकृत कार्यांत घ्यावयास लावणारा विसांवा म्हणून ते करीत असत. निम्मा काळ त्यांचा झगडण्यांत गेला आणि निम्मा काळ ज्ञानाच्या चिंतनांत गेला. त्यांना आळस माहीतच नव्हता. लहान मुलें खेळण्यांत जशीं गर्क असतात, तसे ते लढाई चालू असली म्हणजे एकसारखे उद्योगांत गर्क असत; आणि मध्यें मध्यें सृष्टिनियमाप्रमाणें लढाई थांबली म्हणजे तत्त्वचिंतनांत ते काळ घालवीत. त्यांचें लढणें त्या त्या वेळेपुरतें आणि त्यापुढच्या वेळेस योग्य तें वळण देण्यापुरतें होतें. असलें लढणें राष्ट्राच्या इतिहासांतल निरनिराळे दुवे होत ! हे दुवे मागच्या परंपरेला चिकटलेले असतात आणि पुढच्याहि परंपरेला प्रसवीत असतात. पण प्रत्येक दुवा, प्रत्येक लढाई, त्या त्या काळापुरतीच मुख्यत्वें असते. दुव्यांना मागच्या परंपरेशीं संलग्न होण्याचें जें सामर्थ्य येतें तें तत्त्वविचारांच्या चिंतनानें; या दुव्यांना पुढील अभ्युदय उत्पन्न करतां येतो तो परमेश्वरी स्वरूपाच्या मननानें ! लो. टिळक यांचें चरित्र भूतकालाला व्यापून पुढील इतिहासावर पसरलेलें दिसत आहे. ह्याचें कारण तत्त्वज्ञानाचा निदिध्यास लढत असतांनाहि करीत राहण्याइतकी

परमेश्वरी भक्ति त्यांच्या अंतःकरणांत अखंड वसत होती हेंच होय! गीतारहस्य हें पुस्तक त्या भक्तीचें फळ होय! हिंदुस्थानच्या अभ्युदयाचीं गोड फळें उपभोगण्याचा काळ आल्यावर त्यांच्या चरित्रांतील लढाया आजच्याइतक्या प्राधान्येंकरून लोकांच्या नजरेपुढें उभ्या रहाणार नाहींत!! कालाच्या ओघानें त्या लढाया विसरून जाण्याचेहि दिवस हिंदुस्थानास येतील; पण तशा त्या वेळीं देखील 'गीतारहस्य' कोणीहि विसरूं शकणार नाहीं! पिढयान्पिढयांना वळण देणाऱ्या लढायांत लोकमान्यांच्या राजकीय झगडयांची गणना होईल, पण चारचारशें, पांचपांचशें वर्षें ज्या तत्त्वज्ञानाची शिदोरी सर्व राष्ट्राला पुरते, तसलें कर्मयोगाचें तत्त्वज्ञान लोकमान्यांनीं गीता-रहस्यांत लोकांच्या पुढें मांडलें आहे. राष्ट्रीय जीवनाला, राष्ट्रीय सद्भावाला, राष्ट्रीय स्वार्थत्यागाला आणि राष्ट्रीय वीरवृत्तीला सर्व काळीं व सर्व स्थळीं पाठिराखें होणारें तत्त्वज्ञान नव्या हिंदुस्थानास पाहिजे होतें. स्वतः तसा अनुभव घेऊन आपल्या चरित्राची शिकवणूक लोकमान्यांनीं गीतारहस्यांत लिहून ठेवली आहे. गीतारहस्यांतील शिकवणुकीला उदाहरणादाखल त्यांचें चरित्र आहे. आधी केलें मग सांगितलें, असा त्या दोहोंचा परस्परनिकट संबंध असल्यानें त्यांचें चरित्र व शिकवणूक यांत बिलकूल अंतर नाहीं.

* स्वतः संबंधानें.

लोकमान्य टिळक पब्लिशिंग कंपनीचे हें रोजचें दैनिक पत्र आज वाचकांची प्रथम भेट घेत आहे. कै. बाळ गंगाधर टिळक यांना गुरुस्थानीं मानणाऱ्या मंडळींना मुंबईस टिळक पक्षाचें रोजचें वर्तमानपत्र असावें अशी उत्कट इच्छा झाल्यानुळें लोकमान्य टिळक पब्लिशिंग कंपनी स्थापण्यांत आली आणि आपल्या पुढाऱ्याचें नित्यस्मरण घडावें म्हणून या दैनिकास 'लोकमान्य' हें नांव ठेवण्यांत आलें. स्वराज्य हें ध्येय पुढें ठेवून कै. बाळ गंगाधर टिळक यांनीं आपल्या सर्व चळवळी चालविल्या होत्या. त्यांच्या राजकीय चळवळीचा आत्मा स्वराज्य होता. राजकीय चळवळ चालवीत असतांना त्यांच्या प्रत्येक शब्दांत व प्रत्येक पावलांत स्वराज्य दृष्टीस पडत होतें. राजकीय चळवळीशिवाय ऐतिहासिक, औद्योगिक, सामाजिक व धार्मिक ज्या ज्या बाबींत त्यांनीं मन घातलें त्या त्या बाबींकडे त्यांनीं स्वराज्याच्याच दृष्टीनें पाहिलें. पंचांग संशोधनाचें काम असो, महाभारताचा काळ ठरविण्याचें काम असो, किंवा वेदांतील ऋचांचा अर्थ लावण्याचें काम असो, सर्व लहान थोर नद्यांचे ओघ अखेर स्वराज्याच्या सागराला कसे जाऊन मिळतील याविषयींची काळजी ते रात्रंदिवस वहात असत. संसारांतील हरएक प्रकारच्या उद्योगांना व पराक्रमांना उचलून धरणारें तत्वज्ञान राष्ट्रामध्यें प्रचलित असल्याशिवाय स्वराज्याच्या उच्च पदवीला कोणतेंहि राष्ट्र चढूं शकत नाहीं. भारतभूमीच्या स्वराज्याची उभारणी व जोपासना नीट व्हावी म्हणून गीतारहस्यासारखें तत्वज्ञानाचें पुस्तक लोकमान्यांनीं लिहिलें. वाङ्मयाची सेवा असो, किंवा तात्विक सिद्धांत

---

* लोकमान्य, ता. ९ माहे एप्रिल १९२१

स्थापण्याचा उद्योग असो, स्वराज्याच्या अचल ताऱ्याकडे पाहून लोकमान्य टिळक नेहमीं आपल्या बुद्धीला चलन देत असत. जेथें स्वराज्याचा संबंध येत नसे तेथें त्यांची बुद्धि बिलकुल हालचाल करीत नसे. स्वराज्याशिवाय इतर सर्व बाबींसंबंधानें असहकारिता स्वीकारावयाची असा त्यांच्या बुद्धीचा स्वाभाविक बाणा होता. स्वराज्यासंबंधाच्या कामांत अडथळे आले म्हणजे त्यांना अधिक स्फुरण चढत असें; आणि तें अडथळे दूर करतांना नाना प्रकारचे जे क्लेश त्यांना सोसावे लागत ते क्लेश सुखविलासाप्रमाणें ते मोठया हौसेनें सोशीत, अशी त्यांच्या बुद्धीची ठेवण होती. बुद्धीच्या असल्या रचनेलाच अनन्यभक्ती असें म्हणतात. स्वराज्याविषयींची अनन्य भक्ति आमच्यासारख्या त्यांच्या शिष्यांच्या अंगीं जितकी असावयाला पाहिजे तितकी नाहीं हें आम्ही ओळखून आहों. तथापि लोकमान्यांचें नित्यस्मरण घडावें म्हणून जें नांव आम्ही धारण केलें आहे तें नांव आमच्यांतील न्यून भरून काढण्यास समर्थ आहे, असा आमचा पूर्ण भरंवसा आहे. प्रत्यक्ष सहवासानें जें घडून आलें नाहीं तें नामसंकीर्तनानें घडून येऊं शकतें असा जो भक्तिमार्गाचा सिद्धांत आहे, त्याच सिद्धांतावर भार टाकून कै. बाळ गंगाधर टिळक यांच्या स्वराज्याचे उद्योगास हातभार लावण्यास आम्ही प्रवृत्त झालों आहों.

कै. बाळ गंगाधर टिळक यांचें जें स्वभावसिद्ध आचरण होतें त्याच आचरणाचा उपदेश सांप्रतच्या स्वराज्याच्या चळवळीच्या वेळीं महात्मा गांधी आबालवृद्धांना करीत आहेत. महात्मा गांधी यांच्या असहकारितेच्या चळवळीचा उगम लार्ड चेम्सफर्ड यांच्या कारकीर्दीतील सैतानी कृत्यांपासून झाला आहे. सदर सैतानी कृत्यांचा डंका सर्व जगभर जोरजोरानें महात्मा गांधी यांनीं वाजविल्यामुळें लॉर्ड चेम्सफर्ड यांना काळें तोंड करून हिंदुस्थानचा किनारा सोडावा लागला. हिंदुस्थानच्या लोकांप्रमाणें इंग्लंडच्याहि लोकांना लॉर्ड चेम्सफर्ड यांची कारकीर्द एकदांची संपली म्हणून हायसें वाटलें

असेल यांत शंका नाहीं. मावळत्या लाटसाहेबांचें गुणानुवाद हिंदुस्थानांतील अँग्लो-इंडियन पत्रांनीं नीटसे गाईले नाहींत, आणि जे थोडे गाइले ते कचरत बेसूर आवाजानें खालीं मान घालून गाईलें. इंग्लंडच्याहि पत्रांनीं कशीबशी संभावना मावळत्या लाटसाहेबांची केली. या लाटसाहेबांचे अस्तास जाण्याचे दिवस जसजसे जवळ येत चालले तसतशी अधिक काळजी नवीन लाटसाहेब नेमण्यासंबंधानें विलायतच्या मंत्रिमंडळाला पडली. महात्मा गांधी ज्याच्या कारकीर्दीला सैतानी कारकीर्द म्हणूं शकणार नाहींत, असलाच नवा लाटसाहेब हिंदुस्थानकडे पाठविला पाहिजे असें महात्मा गांधी यांच्या असहकारितेच्या चळवळीनें विलायतेच्या मंत्रिमंडळाला पूर्ण-पणें पटविलें. लॉर्ड चेम्सफर्ड यांची परंपरा कशी तरी तोडली पाहिजे या एका बुद्धीनें निरनिराळ्या मुत्सद्यांची योजना मंत्रिमंडळानें मनांतल्या मनांत करून पाहिली. बऱ्याच मुत्सद्यांची परीक्षा जाहली, पण ते सर्व लॉर्ड चेम्सफर्ड यांच्या संप्रदायाचे-उघड किंवा प्रच्छन्न, जवळचे किंवा उद्यांचे-नातेवाईकच दिसून आले. हिंदुस्थानच्या लाटसाहेबांच्या जागीं लॉर्ड चेम्सफर्ड यांचे कूळ दृष्टीस पडतांच कामा नये या हट्टानें नवीन मनुष्य शोधून काढावा लागल्यामुळें लॉर्ड रीडिंग यांची नेमणूक होण्यास उशीर लागला. लॉर्ड चेम्सफर्ड यांच्या परंपरेला निपुत्रिक बनवून हिंदुस्थानांतून त्यांना बाहेर मंत्रिमंडळानें काढलें आहे, असा लॉर्ड रेडिंग यांच्या नेमणुकीचा खरा अर्थ आहे. निपुत्रिकाचा सांप्रदाय नरकांत जात असतो या म्हणीप्रमाणें महात्मा गांधी यांच्या चळवळीनें अकालीं जरी लॉर्ड चेम्सफर्ड यांना समुद्रांत ढकलिलें नाहीं तरी, त्यांचे पुरे दिवस भरल्यावर समुद्राऐवजीं नरकांत ढकललें असें म्हणणें भाग येतें. लॉर्ड चेम्सफर्ड यांची परंपरा विच्छिन्न करणारा नवा लाटसाहेब हिंदुस्थानच्या गादीवर बसण्याचे सुमारासच 'लोकमान्य' पत्र आपल्या जीवनक्रमास आरंभ करीत असल्यामुळें, लॉर्ड चेम्सफर्ड यांच्या कारकीर्दीच्या शेवटच्या दोन तीन महिन्यांत जातां जातांना ज्या लाथा स्वराज्य-

वाद्यांवर त्यांनीं झाडल्या त्या लाथांचा सुकाळ आपल्या जन्माचे प्रारंभीं 'लोकमान्यां' चे दृष्टीस पडणार नाहीं हें सुचिन्ह होय. लॉर्ड रीडिंग हे कायद्यांत सांगितलेला तेवढाच न्याय हिंदुस्थानांत पाहणार नसून, मनुष्याच्या अन्त:करणाला शुद्ध जाहल्यावर जो न्याय पटतो तो न्याय पाहाणार आहेत. एकाच्या अन्त:करणाला एक न्याय खरा वाटतो, दुसऱ्याच्या अन्त:करणाला दुसरा न्याय खरा वाटतो ! अशा वेळीं आपली बुद्धि कोणत्याहि प्रकारच्या लोभानें झाकली जाऊं नये म्हणून परिश्रमपूर्वक खबरदारी घ्यावी लागते. एवढ्यानेंच भागत नाहीं, तर दुसरा ज्या लोभानें व्याकुळ जाहला असेल त्या लोभातील रस स्वत: चाखून पाहून त्या लोभाच्या परिस्थितींत स्वत: मन नेऊन नंतर न्याय देण्यास प्रवृत्त झालें पाहिजे. ज्याला न्याय द्यावयाचा असेल त्याच्याविषयीं मनांत प्रेम पाहिजे. प्रेमाशिवाय करुणस्थिति किंवा कनवाळूपणा उत्पन्न होऊं शकत नाहीं. मन कनवाळू नसतांना दिलेला न्याय निष्ठुर स्वरूपाचा होत असल्यामुळें परमेश्वराच्या घरीं त्यास संमति मिळत नाहीं. लॉर्ड रेडिंग कितीहि न्यायप्रिय असले तरी हिंदुस्थानास ते आजपर्यंत पूर्ण अनोळखी असेच आहेत; आणि प्रेमळपणाचा न्याय त्यांच्या हातून मिळण्यास त्यांचें जें संघटण हिंदुस्थानाशीं व्हावयास पाहिजे होतें तें झालेलें नाहीं. लॉर्ड रेडिंग यांच्यामध्यें हा एक मोठा दोष आहे आणि या दोषाचा पूर्ण फायदा घेतां यावा म्हणून दडपशाहीची लाट नोकरशाहीनें सुरू केली आहे. पंजाबांत दडपशाही, संयुक्तप्रांतांत सभाबंदी, बिहारांत पकडापकडी आणि मध्यप्रांतांत डॉ. चोळकर व दे. भ. वामनराव जोशी यांजवर खटले, अशा प्रकारच्या स्वरूपांत नोकरशाही हिंदुस्थानची ओळख लॉर्ड रेडिंग यांना करून देत आहे. 'येथें या लोकांनीं मारामाऱ्या केल्या, तेथें गुऱ्यांतला माल फोडला, या ठिकाणीं असले शब्द वापरले, त्या ठिकाणीं तसले लोक गोळा केले, पाहा कसें आहे गांधींच्या स्वराज्याच्या चळवळीचें हिडिस स्वरूप' असें म्हणत नोकरशाही हिंदुस्थानांतील चळवळ्यांचीं चित्रें लॉर्ड

रेडिंग यांच्यापुढें मांडणार आहे. एकीकडे स्वतः १४४ अ व १२४ अ, हीं दोन शस्त्रें हातांत घेऊन नोकरशाही स्वराज्यावर हल्ला चढविणार आहे आणि त्याच वेळीं नव्या लाटसाहेबानें स्वतःची पाठ थोपटावी म्हणून स्वराज्याची चळवळ मारामारीच्या थरावर आली आहे अशा तऱ्हेच्या उलट्या बोंबा मारण्यांत येणार आहेत. लॉर्ड रेडिंग यांना पूर्वीची ओळख नाहीं, आणि बऱ्याच सहवासानें जी प्रेमदृष्टि उत्पन्न होऊं शकते तो सहवासहि नाहीं. उलट हिंदुस्थानाकडून स्वतःच्या उत्पन्नांपैकीं निम्म्याहून अधिक रक्कम म्हणजे दरलाल पन्नास साठ कोट रुपये लष्करी कामाकडे खर्च करविण्याची जबाबदारी डोक्यावर घेऊन ते आले आहेत. ही जबाबदारी म्हणजे एक प्रकारचा लोभ होय. हा लोभ ज्याला सुटला नाहीं त्याच्या हातून कनवाळूपणाच्या न्यायदृष्टीनें हिंदुस्थानचें हित होणार नाहीं. कोणाहि व्हाइसरॉयावर ही जबाबदारी राहणारच. पन्नास साठ कोट रुपये दरसाल गरीब हिंदुस्थानाकडून लष्करी खात्याकडे खर्च करावयास लावण्याची जबाबदारी म्हणजे एकप्रकारचें पापाचें गाठोडेंच होय. हा पापाचा घडा फोडण्यास नोकरशाही तयार नाहीं. मवाळांचा पक्षहि हे पापाचे घडे ज्या गुत्त्यांत ठेवलेले आहेत, त्या गुत्त्यांतील दारू यथेच्छ पिऊन स्वतःस धन्य मानण्यास तयार जाहला आहे. हे गुत्त्यांतील घडे फोडले जातात कीं काय अशी काळजी रात्रंदिवस मक्तेदारांना वाटत आहे, आणि हाच लष्करी खर्चाच्या पापाचा घडा शाबूद ठेवण्याची जबाबदारी लाट-साहेबांवर असल्यामुळें दडपशाहीची लाट लॉर्ड रेडिंग यांच्या कारकीर्दीत खात्रीनें मागें फिरेल, असें म्हणतां येत नाहीं. तथापि सर्व हिंदुस्थानची समक्ष ओळख करून घेतल्याशिवाय लॉर्ड रेडिंग आपलें धोरण मुक्रर ठरविणार नसल्यामुळें दोन तीन महिने दडपशाहीस विशेष हालचाल करतां येणार नाहीं हें उघड आहे. दडपशाहीनें महात्मा गांधी यांच्या चळवळीवर केलेली ही मोहीम कांहीं काल थबकून राहणार असल्यामुळें महात्मा गांधी

हेहि द्रव्यबळ, मनुष्यबळ व बुद्धिबळ आपल्या बाजूनें अधिक गोळा करण्यांत स्वराज्याच्या चळवळीचे पुढील दोन तीन महिने घालविणार आहेत.बेझवाडा येथें भरलेल्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनें 'टिळक स्वराज्य फंडास' एक कोट रुपये गोळा करण्याचा, राष्ट्रीय सभेच्या तत्त्वांना मान्यता देणाऱ्यांची संख्या एक कोटीपर्यंत वाढविण्याचा आणि स्वदेशीच्या व्रताची अखंड जागृति ठेवण्याकरितां सतत फिरत राहणाऱ्या वीस लाख सुताच्या चक्राचा फैलाव करण्याचा ठराव, एक आठवड्यापूर्वी पास केला. त्या ठरावाच्या अम्मल बजावणीस, सत्याग्रहाच्या सांप्रतच्या आठवड्यांत मुंबई शहरांत गेल्या बुधवारपासून सुरवात झाली असून, या पर्वणीच्या मध्यकालाचे पूर्णावस्थेचे वेळीं पाडव्याचे मुहूर्तावर आम्ही आमच्या वाचकांस लोकमान्य टिळकांचा स्वराज्याचा मंत्र सांगत आहों. द्रव्यबळ व मनुष्यबळ गोळा करून स्वदेशीच्या व्रताची वारंवार आठवण करून देणें हें तर आमचें जन्मसिद्ध काम आहेच. पण लार्ड रीडिंग हे नोकरशाहीच्या जाळ्यांत सांपडून कनवाळूपणानें न्याय देण्याच्या आपल्या व्रतापासून जर भ्रष्ट झाले तर दोन चार महिन्यांनीं ऑल इंडिया काँग्रेस कमेटीच्या ठरावाला अनुसरून दडपशाहीच्या मोहिमेस अधिक नेटानें व दृढनिश्चयानें तोंड देणें स्वराज्यवाद्यांना भाग पडणार आहे. द्रव्यबळ, मनुष्यबळ व बुद्धिबळ एक गठ्ठा करण्याचें काम असो किंवा नोकरशाहीशीं झगडण्याचें काम असो, गुरुस्थानीं असलेल्या लोकमान्य टिळकांचें चरित्र डोळ्यापुढें ठेवून, लोकांचा संसार नेटका व्हावा म्हणून त्यांनीं सोसलेल्या कारागृहवासासारख्या तपश्चर्येनें उद्दीप्त होणारी राष्ट्रभक्ति नीट जागीं ठेवून, आणि त्यांच्या परिपक्व उपदेशांतील समबुद्धीला आमचें पाऊल वांकडे न पडण्याबद्दल नमन करून, त्यांनीं दाखविलेला स्वराज्याचा मार्ग त्यांच्या सांप्रदायास शोभेल अशा रीतीनें चोखाळण्यास त्यांच्याच नांवाचें हे दैनिक पत्र कधींहि कमी करणार नाहीं.

---

* खुद्द टिळकांचेच उद्गार

टिळक जिवंत असते तर त्यांनीं महात्मा गांधीं यांच्या असहकारितेच्या चळवळीस सर्वतोपरीं उचलून धरलें नसतें, असें म्हणणारा एक पक्ष आहे, व या पक्षाची मदार एका गोष्टीवर मुख्यपणें अवलंबून आहे. ती गोष्ट म्हणजे नव्या कायदेकौन्सिलांत राष्ट्रीय पक्षाचे पुढारी निवडून जाण्याकरितां टिळकांनीं मरणापूर्वी दोन तीन महिने चालविलेली तयारी ही होय. ज्याअर्थी टिळकांनीं अशी तयारी केली होती त्याअर्थी टिळकांच्या राष्ट्रीय पक्षानें, कलकत्त्याच्या काँग्रेसच्या ठरावानंतरहि आपण काँग्रेसमधील अल्पसंख्यांक पक्ष असें समजून, काँग्रेस न सोडतां, कायदेकौन्सिलच्या जागांकरितां उमेदवार म्हणून चिकाटीनें व दृढ निश्चयानें पुढें जावयास पाहिजे होतें; तसें ज्याअर्थी या पक्षानें केलें नाहीं त्याअर्थी टिळकांच्या अनुयायांत टिळकांचा दृढ निश्चय, टिळकांची धडाडी व टिळकांचें कर्तृत्व नाहीं असें सिद्ध होतें, आणि नालायकांनीं भरलेला टिळकांच्या अनुयायांचा पक्ष कमकुवत ठरून लोकांच्या विश्वासास अपात्र होतो. पूर्वपक्ष हा असा झाला. आमच्या मतें हा दोषारोप खोटा आहे; केवळ मत्सरबुद्धीनें केलेला आहे; आणि टिळकांच्या अनुयायांनीं महात्मा गांधी यांना मदत न करून राष्ट्रीय कार्यास विघ्वा घालावा असला नीचपणाचा हेतु या दोषारोपाच्या बुडाशीं आहे. टिळकांनीं निवडणुकीच्या वेळच्या मोठया उद्योगाची उभारणी मृत्यूपूर्वी दोन तीन महिने एकसारखी चालविली होती, यांत संशय नाहीं. जुन्नर येथें भरलेल्या पुण्याच्या जिल्हा सभेच्या वेळीं आणि सोलापूरच्या प्रांतिक सभेच्या वेळीं

---

* लोकमान्य, २३ जुलै १९२२

मवाळपक्षानें निर्लज्जपणानें जो बखेडा केला तो बखेडा टिळकांच्या सदर उद्योगामुळें चिडून जाऊनच केला, हें महाराष्ट्रांत सर्वांना माहीतच आहे. टिळकांनीं राष्ट्रीय पक्षाचें वर्चस्व नव्या कायदेकौन्सिलांत मताधिक्यानें व्हावें याबद्दल जारीनें तयारी चालविली होती, हें खरें आहे. पण तेवढयावरून कलकत्त्याच्या काँग्रेसच्या ठरावानंतर टिळक स्वतः कायदेकौन्सिलच्या निवडणुकीच्या खटपटींतच निमग्न राहिले असते, असें जें अनुमान काढण्यांत येतें तें मात्र खोटें आहे. टिळकांच्या खुद्द तयारींत, त्यांच्या विचारसरणींत आणि पूर्वचरित्रांत असलें अनुमान काढण्यास आधार नाहीं. तर्कशास्त्राच्या दृष्टीनें ही गोष्ट शाबीत करण्यापूर्वी खुद्द टिळकांच्या उद्गारांचा असें म्हणणारांस कितपत आधार आहे, हें पाहिलें पाहिजे. असहकारितेच्या चळवळीसंबंधानें बनारसच्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या वेळीं बोलतांना व इतर प्रसंगीं अभिप्राय देतांना, माझें सर्व आयुष्य असहकारितेच्या तत्त्वानें व्यापलेलें आहे, अशा तऱ्हेचे स्पष्ट उद्गार टिळकांनीं काढलेले आहेत. महात्मा गांधी टिळकांच्या मृत्यूपूर्वी पंधरा दिवस टिळकांशीं बोलत असतांना टिळकांनीं स्वच्छपणानें व मोकळ्या मनानें महात्माजींना सुचविलें होतें कीं, तुमच्या चळवळीचीं तत्त्वें मला पूर्णपणें मान्य असून या चळवळीनें हिंदुस्थानचें खरेंखुरें कल्याण होईल हेंहि मला कबूल आहे. पण लोकांकडून या तत्त्वाचें आचरण होणें अवघड असल्यामुळें आपण जर तसें करूं शकलां तरच यशाचे वाटेकरी व्हाल. असहकारितेची तपश्चर्या अल्पावकाशांत लोकांच्या हातून पार पडेल किंवा नाहीं याविषयीं टिळकांच्या मनांत संदेह होता, हें वरील उद्गारांवरून स्पष्ट होतें. पण संदेह होता एवढयामुळें त्यांनीं लोकांना असहकारितेचीं तत्त्वें उचलण्यास सांगितलें नसतें, असें मुळींच म्हणतां येत नाहीं. अपेश येईल म्हणून खबरदारी घेणें व सतत उद्योग करणें हा भाग निराळा, आणि अपेशाचा संभव आहे म्हणून उद्योगाची दिशा फिरविणें हा भाग

* खुद्द टिळकांचेच उद्गार

टिळक जिवंत असते तर त्यांनीं महात्मा गांधीं यांच्या असहकारितेच्या चळवळीस सर्वतोपरीं उचलून धरलें नसतें, असें म्हणणारा एक पक्ष आहे, व या पक्षाची मदार एका गोष्टीवर मुख्यपणें अवलंबून आहे. ती गोष्ट म्हणजे नव्या कायदेकौन्सिलांत राष्ट्रीय पक्षाचे पुढारी निवडून जाण्याकरितां टिळकांनीं मरणापूर्वी दोन तीन महिने चालविलेली तयारी ही होय. ज्याअर्थी टिळकांनीं अशी तयारी केली होती त्याअर्थी टिळकांच्या राष्ट्रीय पक्षानें, कलकत्त्याच्या कॉंग्रेसच्या ठरावानंतरहि आपण कॉंग्रेसमधील अल्पसंख्यांक पक्ष असें समजून, कॉंग्रेस न सोडतां, कायदेकौन्सिलच्या जागांकरितां उमेदवार म्हणून चिकाटीनें व दृढ निश्चयानें पुढें जावयास पाहिजे होतें; तसें ज्याअर्थी या पक्षानें केलें नाहीं त्याअर्थी टिळकांच्या अनुयायांत टिळकांचा दृढ निश्चय, टिळकांची धडाडी व टिळकांचें कर्तृत्व नाहीं असें सिद्ध होतें, आणि नालायकांनीं भरलेला टिळकांच्या अनुयायांचा पक्ष कमकुवत ठरून लोकांच्या विश्वासास अपात्र होतो. पूर्वपक्ष हा असा झाला. आमच्या मतें हा दोषारोप खोटा आहे; केवळ मत्सरबुद्धीनें केलेला आहे; आणि टिळकांच्या अनुयायांनीं महात्मा गांधी यांना मदत न करून राष्ट्रीय कार्यास विन्वा घालावा असला नीचपणाचा हेतु या दोषारोपाच्या बुडाशीं आहे. टिळकांनीं निवडणुकीच्या वेळच्या मोठया उद्योगाची उभारणी मृत्यूपूर्वी दोन तीन महिने एकसारखी चालविली होती, यांत संशय नाहीं. जुन्नर येथें भरलेल्या पुण्याच्या जिल्हा सभेच्या वेळीं आणि सोलापूरच्या प्रांतिक सभेच्या वेळीं

---

* लोकमान्य, २३ जुलै १९२२

मवाळपक्षानें निर्लज्जपणानें जो बखेडा केला तो बखेडा टिळकांच्या सदर उद्योगामुळें चिडून जाऊनच केला, हें महाराष्ट्रांत सर्वांना माहीतच आहे. टिळकांनीं राष्ट्रीय पक्षाचें वर्चस्व नव्या कायदेकौन्सिलांत मताधिक्यानें व्हावें याबद्दल जारीनें तयारी चालविली होती, हें खरें आहे. पण तेवढयावरून कलकत्त्याच्या काँग्रेसच्या ठरावानंतर टिळक स्वतः कायदेकौन्सिलच्या निवडणुकीच्या खटपटींतच निमग्न राहिले असते, असें जें अनुमान काढण्यांत येतें तें मात्र खोटें आहे. टिळकांच्या खुद्द तयारींत, त्यांच्या विचारसरणींत आणि पूर्वचरित्रांत असलें अनुमान काढण्यास आधार नाहीं. तर्कशास्त्राच्या दृष्टीनें ही गोष्ट शाबीत करण्यापूर्वी खुद्द टिळकांच्या उद्गारांचा असें म्हणणारांस कितपत आधार आहे, हें पाहिलें पाहिजे. असहकारितेच्या चळवळीसंबंधानें बनारसच्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या वेळीं बोलतांना व इतर प्रसंगीं अभिप्राय देतांना, माझें सर्व आयुष्य असहकारितेच्या तत्त्वानें व्यापलेलें आहे, अशा तऱ्हेचे स्पष्ट उद्गार टिळकांनीं काढलेले आहेत. महात्मा गांधी टिळकांच्या मृत्यूपूर्वी पंधरा दिवस टिळकांशीं बोलत असतांना टिळकांनीं स्वच्छपणानें व मोकळ्या मनानें महात्माजींना सुचविलें होतें कीं, तुमच्या चळवळीचीं तत्त्वें मला पूर्णपणें मान्य असून या चळवळीनें हिंदुस्थानचें खरेंखुरें कल्याण होईल हेंहि मला कबूल आहे, पण लोकांकडून या तत्त्वाचें आचरण होणें अवघड असल्यामुळें आपण जर तसें करूं शकलां तरच यशाचे वाटेकरी व्हाल. असहकारितेची तपश्चर्या अल्पावकाशांत लोकांच्या हातून पार पडेल किंवा नाहीं याविषयीं टिळकांच्या मनांत संदेह होता, हें वरील उद्गारांवरून स्पष्ट होतें. पण संदेह होता एवढयामुळें त्यांनीं लोकांना असहकारितेचीं तत्त्वें उचलण्यास सांगितलें नसतें, असें मुळींच म्हणतां येत नाहीं. अपेश येईल म्हणून खबरदारी घेणें व सतत उद्योग करणें हा भाग निराळा, आणि अपेशाचा संभव आहे म्हणून उद्योगाची दिशा फिरविणें हा भाग

निराळा. यश किंवा अपयश याविषयीं आसक्ति न ठेवतां आज नाहीं उद्यां, एक वर्षांत नाहीं दोन वर्षांत, एका पिढींत नाहीं दोन चार पिढयांत यश येईलच्च येईल, अशा दृढ भावनेनें व श्रद्धेनें करीत असलेल्या उद्योगाच्या मनोवृत्तीस 'चिकाटी असें म्हणतात, आणि टिळक तर असल्या चिकाटीचे मूर्तिमंत पुतळाच होते. तेव्हां महात्मा गांधींच्या असहकारितेच्या चळवळींत पूर्ण स्वराज्याच्या प्राप्तीसाठीं जितक्या देशभक्तांनीं मनोभावानें पडावयास पाहिजे, तितक्या देशभक्तांची संख्या वर्ष दोन वर्षांच्या अवधींत भरणार नाहीं या शंकेमुळें टिळकांनीं माघार घेतली असती, असें मुळींच संभवत नाहीं. असें म्हणणें म्हणजे टिळक टिळक नव्हते, अशा तऱ्हेची टिळकांची निंदाच करणें होय. वर्तन, उद्धार व त्यापासून निघणारीं अनुमानें या बाबी एका बाजूस ठेविल्या तरी शेवटच्या २।४ आठवडयांतील टिळकांचें वर्तन व उद्धार हे विशेष महत्त्वाचे आहेत. महात्मा गांधी यांजपाशीं मृत्यूपूर्वी, दोन आठवडेच आधीं, टिळकांनीं काढलेले उद्धार वर दिलेच आहेत. याच सुमारास कलकत्त्याच्या जादा राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान आपण स्वीकाराल का, अशा प्रकारचा प्रश्न खासगी पत्रानें बंगालचे बॅ. दास यांनीं टिळकांना केला होता. दोन्हीं बाजूंनीं २।४ दिवस बरीच चर्चा होऊन टिळकांनीं अखेरीस कलकत्त्याच्या जादा काँग्रेसचें अध्यक्षपद आपणास नको, असें बंगाल्यास कळविलें होतें. हा निकाल बंगाल्यांत कळविल्यानंतर पुणें सोडून मुंबईस यावयाच्या शेवटल्या दिवशीं सकाळीं प्रस्तुत लेखकाची व टिळकांची गांठ तास दोन तास पडली होती. त्यावेळीं झालेली चर्चा दोघांच्या आयुष्यांतील शेवटचीच चर्चा होय, असें कोणासहि वाटलें नव्हतें. "मी आज मुंबईस जात आहें आणि तुम्हांस सांगलीस जावयाचें आहे, तेव्हां घटकाभर कांहीं गोष्टींचा खल करूं या," असें म्हणून टिळकांनीं या भाषणास सुरवात केली होती. कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान न

स्वीकारण्यांत आपण कोणचें राजकीय धोरण नजरेपुढें ठेविलें आहे, हें त्यांनी त्या प्रसंगीं विशद करून सांगितलें. " महात्मा गांधी यांचीं असहकारितेचीं तत्त्वें कोणाहि विचारी पुरुषास अमान्य होण्यासारखीं नाहींत. तथापि निरनिराळ्या व्यवसायांच्या आणि दर्जाच्या लोकांत तीं निरनिराळ्या प्रमाणांत अंमलांत येण्याचा संभव असल्यामुळें या प्रमाणाच्या भेदाला अनुसरून कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेंत २।४ तट इष्टीस पडल्यावांचून राहणार नाहींत; आणि कदाचित् या तटांमुळें कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेचे २।३ तुकडे होण्याचा संभव आहे. हे तुकडे होऊं नयेत म्हणून त्यावेळीं मोठ्या जोराची खटपट करावी लागेल आणि निरनिराळ्या पक्षांना राष्ट्रीयसभेच्या ४।५ वर्षें संघटित झालेल्या राजकीय शक्तींत कमीपणा आणूं नका, असें आग्रहपूर्वक सांगून राष्ट्रीय सभेची शक्ति या नात्याची जूट कायम ठेवण्याचा उद्योग मला करावा लागेल. निरनिराळ्या तटांची ही तोंडमिळवणी तडजोडीनें व मोकळेपणानें मला करतां यावी म्हणून मीं अध्यक्षपद स्वीकारलें नाहीं. मवाळ निघून गेल्यानंतर राष्ट्रीय सभेंत पुन्हां दुसरा भंग होण्याची ही वेळ असल्यामुळें राष्ट्रीय सभेची शक्ति कमी न होऊं देण्याचें काम अध्यक्षांच्या मानाहून मला अधिक महत्त्वाचें वाटत आहे. राष्ट्रीय सभेंत मतभेद असले तरी राष्ट्रीय सभेच्या हल्लींच्या अनुयायांनीं एकोप्यानें वागूनच नोकरशाहीशीं झुंजलें पाहिजे. एरवीं स्वराज्याचें पाऊल पुढें पडणार नाहीं. मी कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारीत नाहीं याचें कारण हा असला एकोपा राखण्यास माझा उपयोग अधिक होईल, असेंच मला वाटत आहे. कोणत्याहि एका मताचा अभिमान मी या वेळीं धरतां कामा नये; आणि राष्ट्रीय सभेचे सर्व अनुयायी एका मार्गानें वागतील, अशी खबरदारी घेणें या प्रसंगीं मला अधिक कल्याणप्रद वाटत आहे." अध्यक्षस्थान नको म्हणण्याच्या वेळचे टिळकांचे वरील विचार ज्यांना ज्यांना माहीत आहेत

त्यांना त्यांना कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेनंतर राष्ट्रीयपक्षानें कायदेकौन्सिलांत जाण्याचें नाकारलें तें टिळकांच्या तोंडच्या खुद्द आज्ञेमुळेंच नाकारलें, याविषयीं बिलकुल संशय नाहीं. कलकत्त्याच्या काँग्रेसनंतर महात्मा गांधी यांची चळवळ फार जोरावर येईल आणि या चळवळींत आपणास महात्मा गांधीप्रमाणें जोरानें पडावें लागेल, हें टिळकांना पूर्णपणें मान्य होतें. सदर संभाषणाच्या वेळीं त्यांनीं तसें बोलून दाखविलें होतें. अशा रीतीनें चळवळ एक दोन महिन्यांतच जोरावर आल्यावर महात्मा गांधी व टिळक या दोघांनाहि नोकरशाही अटकेंत ठेवील, असा खुद्द टिळकांचा अंदाज होता; आणि या अंदाजाच्या दृष्टीनें स्वत:च्या वर्तनासंबंधानें विचार त्यांनीं प्रस्तुत लेखकापुढें त्यावेळीं मांडले होते. अशा रीतीनें नोकरशाहीच्या अटकेंत पडण्यापेक्षां विलायतेस वर्ष सहा महिने जाऊन रहाणें बरें, असें मला वाटत असल्यामुळें मुंबईस गेल्यावर तशा व्यवस्थेला अंशत: मी सुरवात करणार आहें असें टिळकांनीं बोलून दाखविलें. युरोप खंडांत किंवा विलायतेस राहण्यापेक्षां येथें अटकेंत पडलां म्हणून काय बिघडलें, अशी शंका विचारली असतां टिळक म्हणाले कीं, " अटकेंत शरीराचे हाल होतील किंवा एकांतवासानें त्रास होईल म्हणून मी अटक टाळूं पहातों,असें नाहीं. कारण अटकेंत ठेवण्यांत शारीरिक दु:खें सोसावयास लावण्याचा नोकरशाहीचा हेतूच नाहीं. या हेतूनें अटक करण्यांत येईल असें मला वाटत नाहीं. महात्मा गांधी यांच्या इच्छेप्रमाणें जर खिलाफतीची व असहकारितेची चळवळ चांगली जोरावर आली तर पूर्ण स्वराज्याच्या हक्कासंबंधानें लोकांशीं बोलणें लावणें नोकरशाहीला भाग पडेल, आणि अशा बोलण्याच्या वेळीं काँग्रेसनें तडजोडीला यावें म्हणून, अटकेंत ठेवलेल्या पुढाऱ्यांना सोडून देण्याच्या मधाचें बोट जसें नेहमीं पुढें करण्यांत येतें तसें मधाचें बोट तयार करण्याकरितां आम्हांस अटकेंत ठेवण्यांत येईल, असें मला वाटतें. आणि मग या मधाच्या

बोटाला भुलून पूर्ण स्वराज्याची मागणी न करतां अर्धवट तडजोडीला पुढाऱ्यांवरील प्रेमामुळें अनुयायी तयार होतील अशी मला भीति वाटत आहे. कांहीं कमकुवत लोक तर असल्या बोलण्याचालण्याच्या वेळीं अगदीं थोडक्यावरच खूष होतील, आणि पुढाऱ्यांना सोडविण्याकरितां आम्हीं असें केलें असा बहाणा करून आपल्या बुद्धीचा दुर्बलपणा झाकूं लागतील. तसें होऊं नये अशी माझी उत्कट इच्छा आहे. दुर्बलपणानें बिलकुल कमी माप घेतां कामा नये. पुरें माप पदरांत न पडण्यास माझी अटक कदाचित् कारणीभूत होण्याचा संभव मला दिसत असल्यामुळें ती मी टाळूं पहात आहें."

तशा प्रसंगीं हिंदुस्थानांत अटकेंतच आपण असल्यावर आपणाशीच तडजोडीचीं बोलणें चालणें करण्यास नोकरशाहीला ठीक पडणार नाहीं काय, असा प्रश्न विचारला असतां टिळकांनीं स्वच्छ सांगितलें कीं, "माझ्याशीं सलोख्याचें बोलणें नोकरशाही कधींहि बोलणार नाहीं. माझें पूर्वचरित्र असेंच आहे कीं, असलें बोलणें नोकरशाही माझ्याशीं कधीं काळीं बोलेल असें कोणीहि मनांत आणूं नये. ज्याच्या मनांत असें येईल त्याला मनुष्यस्वभाव समजत नाहीं असें मी म्हणेन. असल्या कामास माझा हा देह पूर्वचरित्रामुळें आतां निरुपयोगीं झाला आहे. किंबहुना मी सल्लामसलतींत आहे असें पाहून हट्टाहट्टानें नोकरशाही प्रसंग आला असतांहि असल्या बोलण्या चालण्यापासून पराङ्मुख होईल. तेव्हां तें काम आपल्या नशींबी असणें शक्य नाहीं असें समजूनच, अटकेंतून सोडविण्याच्या मोहास अनुयायी बळी पडूं नयेत म्हणून, महात्मा गाधी यांची चळवळ जोरावर आल्यावर मला हिंदुस्थान सोडून बाहेर जाणें भाग आहे. ही चळवळ जोरावर येईल आणि नोकरशाहीला स्वराज्याचें बोलणें लोकांशीं बोलण्यास भाग पाडील, असें मला स्पष्ट दिसत आहे. तसला तो प्रसंग समीप आल्यानंतर सलोख्याच्या वाटाघाटीचे वेळीं हिंदुस्थानास माझा उपयोग कांहींहि नाहीं, हें मी ओळखून

आहें. येथें काम नाहीं तर येथें रहा तरी कशाला ? उलट अटकेंत पडून अपुरें माप हिंदुस्थानच्या पदरांत पडण्यास पर्यायानें मी कारणीभूत होण्याची मला भीति वाटत आहे. म्हणून कांहीं महिन्यांनीं हिंदुस्थानांतून बाहेर जाण्याच्या विचारांत मी आहे." तास दोन तास चाललेल्या संभाषणांतील वरील महत्त्वाचे मुद्दे आज आम्हीं वाचकांपुढें मांडले अहेत. टिळक जिवंत असते तर कसे वागले असते; यासंबंधाचें खुद्द टिळकांचें मनोगत वरील उद्गारांत असल्यामुळें त्याचा विचार आमचे वाचक शांतपणें करून महात्मा गांधी यांना पूर्ण मदत करतील, व हल्लींच्या चळवळींत टिळकांना दिसलेल्या स्वराज्याचें पूर्ण माप हिंदुस्थानच्या पदरांत टाकतील, अशी आम्हांस आशा आहे.

* टिळक आणि मुसलमान

पूर्वीचा जुना श्रीगणपति–महोत्सव पुण्यांत व महाराष्ट्रांत चोहोंकडे मोठया प्रमाणावर करण्यास सुरवात झाल्यावर टिळकांच्याकडे त्या उत्सवाचें नेतृत्व साहजिकपणें आलें. त्यामुळें टिळकांवर त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांनीं असा आरोप ठेवला कीं, टिळक हे मुसलमानांचे द्वेष्टे असून मुसलमानांच्या विषयींचा द्वेष समाजांत नेहमीं जागृत ठेवण्यासाठीं टिळकांनीं हा हिंदूंचा महोत्सव सुरू केला. हा आरोप मूर्खपणाचा आहे, असें मुसलमानांच्या ध्यानांत लवकरच आलें; आणि तेव्हांपासून टिळकांचा व मुसलमानी पुढाऱ्यांचा स्नेह जुळत चालला. वरील आरोप मुसलमानांच्या पुढाऱ्यांकडून करण्यांत आलेला नव्हता, हिंदी स्वराज्याच्या आड येणाऱ्या नोकरशाहीच्या कांहीं अँग्लो–इंडियन पत्रांनीं हा आरोप केलेला होता. संमतिविलाच्या कायद्याच्या वेळीं टिळकांनीं हिंदु समाजाचा पक्ष उचलला होता, आणि पुढें श्रीगणपतिमहोत्सव सुरू झाल्यावर त्या उत्सवासंबंधानें जें ज्ञानसत्र सुरू झालें, त्या ज्ञानसत्रांत पुढारीपणा घेऊन टिळकांनीं नेहमीं भारतीय धर्मांचीं उच्च तत्वें समाजापुढें मांडण्यास केव्हांहि आळस केला नाहीं. सुशिक्षित वर्गाचें लक्ष प्राचीन तत्त्वज्ञानाकडे आणि हिंदुधर्माच्या श्रेष्ठत्वाकडे वळण्यास श्रीगणपतिमहोत्सव टिळकांच्या नेतृत्वाखालीं पुष्कळ अंशानें कारणीभूत झाला. टिळकांच्या या उद्योगाची फलश्रुति गीतारहस्यासारखा ग्रंथ त्यांच्याकडून निर्माण होण्यांत झाली. यासंबंधाचा सविस्तर विचार चालू मालेंतील पुढील एका लेखांत आम्ही करणार असल्यामुळें आज टिळकांवर मुसलमानांचे द्वेष्टे या नात्यानें आलेल्या आरोपाबद्दलच विचार कर्तव्य आहे. हा आरोप अँग्लो–इंडियन समाजाकडून करण्यांत आला.

---

* लोकमान्य, २१ जुलै १९२१

आहें. येथें काम नाहीं तर येथें रहा तरी कशाला ? उलट अटकेंत पडून अपुरें माप हिंदुस्थानच्या पदरांत पडण्यास पर्यायानें मी कारणीभूत होण्याची मला भीति वाटत आहे, म्हणून कांहीं महिन्यांनीं हिंदुस्थानांतून बाहेर जाण्याच्या विचारांत मी आहे." तास दोन तास चाललेल्या संभाषणांतील वरील महत्त्वाचे मुद्दे आज आम्हीं वाचकांपुढें मांडले आहेत. टिळक जिवंत असते तर कसे वागले असते; यासंबंधाचें खुद्द टिळकांचें मनोगत वरील उद्गारांत असल्यामुळें त्याचा विचार आमचे वाचक शांतपणें करून महात्मा गांधी यांना पूर्ण मदत करतील, व हल्लींच्या चळवळींत टिळकांना दिसलेल्या स्वराज्याचें पूर्ण माप हिंदुस्थानच्या पदरांत टाकतील, अशी आम्हांस आशा आहे.

* टिळक आणि मुसलमान

पूर्वीचा जुना श्रीगणपति–महोत्सव पुण्यांत व महाराष्ट्रांत चोहोंकडे मोठ्या प्रमाणावर करण्यास सुरवात झाल्यावर टिळकांच्याकडे त्या उत्सवाचें नेतृत्व साहजिकपणें आलें. त्यामुळें टिळकांवर त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांनीं असा आरोप ठेवला कीं, टिळक हे मुसलमानांचे द्वेष्टे असून मुसलमानांच्या विषयींचा द्वेष समाजांत नेहमीं जागृत ठेवण्यासाठीं टिळकांनीं हा हिंदूंचा महोत्सव सुरू केला. हा आरोप मूर्खपणाचा आहे, असें मुसलमानांच्या ध्यानांत लवकरच आलें; आणि तेव्हांपासून टिळकांचा व मुसलमानी पुढाऱ्यांचा स्नेह जुळत चालला. वरील आरोप मुसलमानांच्या पुढाऱ्यांकडून करण्यांत आलेला नव्हता, हिंदी स्वराज्याच्या आड येणाऱ्या नोकरशाहीच्या कांहीं अँग्लो–इंडियन पत्रांनीं हा आरोप केलेला होता. संमतिविलाच्या कायद्याच्या वेळीं टिळकांनीं हिंदु समाजाचा पक्ष उचलला होता, आणि पुढें श्रीगणपतिमहोत्सव सुरू झाल्यावर त्या उत्सवासंबंधानें जें ज्ञानसत्र सुरू झालें, त्या ज्ञानसत्रांत पुढारीपणा घेऊन टिळकांनीं नेहमीं भारतीय धर्माचीं उच्च तत्वें समाजापुढें मांडण्यास केव्हांहि आळस केला नाहीं. सुशिक्षित वर्गाचें लक्ष प्राचीन तत्त्वज्ञानाकडे आणि हिंदुधर्माच्या श्रेष्ठत्वाकडे वळण्यास श्रीगणपतिमहोत्सव टिळकांच्या नेतृत्वाखालीं पुष्कळ अंशानें कारणीभूत झाला. टिळकांच्या या उद्योगाची फलश्रुति गीतारहस्यासारखा ग्रंथ त्यांच्याकडून निर्माण होण्यांत झाली. यासंबंधाचा सविस्तर विचार चालू मालेंतील पुढील एका लेखांत आम्ही करणार असल्यामुळें आज टिळकांवर मुसलमानांचे द्वेष्टे या नात्यानें आलेल्या आरोपाबद्दलच विचार कर्तव्य आहे. हा आरोप अँग्लो–इंडियन समाजाकडून करण्यांत आला.

---

* लोकमान्य, २१ जुलै १९२१

मुसलमानांना पुढें करून त्यांच्या आड उभें राहून टिळकांना गोळी घालण्याचा हा प्रयत्न झाला. पण पुढें मुसलमान सावध झाल्यामुळें तीहि युक्ति फसली, आणि पाश्चिमात्य सुधारणेचे द्वेष्टे म्हणून टिळकांना नांवें ठेवण्यांत आलीं. महात्मा गांधी यांना आज असेंच दूषण लावण्यांत येत आहे. राष्ट्रोद्धार ज्याला करावयाचा असेल त्यानें राष्ट्राची पूर्वपरंपरा कायम ठेवून, नव्या-जुन्यांचा योग्य मेळ घालून, जीर्णोद्धाराची भव्य इमारत उभारली पाहिजे. नोकरशाहीच्या मनांत शेंदोनशें वर्षांनंतर स्वतंत्र झालेल्या हिंदुस्थानचें भव्य राष्ट्र दृष्टीस पडावें असें आहे, नाहीं असें नाहीं. पाश्चिमात्य संस्कृतीच्या नव्या पायावर नव्या मालमसाल्यानें, परदेशी जिनसांनीं, परदेशी कारागिरांनीं, आणि परदेशी रक्त लग्नसंबंधानें हिंदुस्थानच्या रक्तांत पूर्णपणें मिसळलें जाऊन नंतर हा हिंदुस्थानच्या नवीन वैभवाचा डोलारा जगाच्या दृष्टीस पडावा, अशी नोकरशाहीची महत्वाकांक्षा आहे. ही महत्वाकांक्षा सफल होऊं नये म्हणून टिळकांच्या आत्म्याला एकसारखी तळमळ लागून राहिली होती. महात्मा गांधी यांच्या आत्म्याला हीच तळमळ आज लागून राहिली आहे. महात्मा गांधी हे पाश्चिमात्य सुधारणेचे द्वेष्टे आहेत, असा आरोप अँग्लो-इंडियन पत्रें महात्माजींवर करीत आहेत. याचें कारण असें आहे कीं, महात्माजींना ज्या आर्थिक व औद्योगिक पायावर युरोपियन समाजाची रचना झालेली आहे तो पायाच बिलकुल पसंत नसून नव्यांतलें चांगलें तेवढें घेऊन जुन्या पायावरच नवीन स्वराज्याची इमारत उभारणें अत्यंत जरुरीचें वाटत आहे. दोघांचीहि विचारसरणी पुष्कळ अंशीं एकच आहे. भारतीय तत्त्वज्ञानाचा सांगोपांग विचार व खल टिळकांनीं केलेला होता; आणि त्यामुळें विद्वत्तापूर्ण दृष्टीनें साधक बाधक प्रमाणें पुढें मांडून पूर्वीच्याच उच्च तत्त्वांचें उद्घाटन नवीन धर्तीनें ते करीत असत. दक्षिण आफ्रिकेंत असतांना मजूर व भांडवलवाले यांच्यामधील भांडणांत

महात्माजींना पडावें लागलें आणि त्या कर्माला अनुसरून 'बुद्धिःकर्मानुसारिणी' या न्यायानें असहकारितेच्या तत्त्वाकडे आणि टॉलस्टॉयच्या तत्त्वज्ञानाकडे त्यांचें लक्ष साहजिकपणें वेधलें. महात्माजींच्या सांप्रतच्या असहकारितेच्या विचारसरणीचा उगम दक्षिण आफ्रिकेंत त्यांनीं केलेल्या चळवळींतून झालेला आहे. स्वधर्माविषयींच्या अभिमानानें प्रेरित होऊन जुन्या नव्या तत्त्वज्ञानाचें आणि हिंदुधर्माच्या प्रमुख धर्मग्रंथांचें जें कित्येक वर्षें परिशीलन टिळकांनीं केलें त्या सततच्या अभ्यासांतूनच टिळकांच्या संप्रदायाचा उगम झालेला आहे. दोन्ही नद्यांचा उगम भिन्न भिन्न ठिकाणीं झालेला असला तरी आज संगम होऊन प्रवाहास दुप्पट शोभा व दुप्पट जोर प्राप्त झालेला आहे. युरोपियन समाजाचा पायाच चुकीचा आहे, हें रशियांत टॉलस्टॉयनें फार मार्मिक रीतीनें व चित्ताकर्षक भाषेनें जनतेस शिकविलें. टॉलस्टॉयचीं तत्त्वें आज युरोपखंडांत नुसतीं पुस्तकांत राहिलेलीं नसून रशियांतील राज्यक्रांतीमुळें युरोपखंडाच्या रोजच्या आचरणांत निरनिराळ्या देशांत कमी जास्ती प्रमाणानें उतरलेलीं आहेत. पूर्वेकडून उजेड येऊन युरोपखंडाचा उद्धार होईल, असें स्वप्न टॉलस्टायना नेहमीं पडत असे. म. गांधी यांनीं आपलें तत्त्वज्ञान टॉलस्टॉयपासून घेण्यास सुरवात केली आणि हिंदी परंपरेला धरून त्यांनीं आपलें असहकारितेचें शास्त्र बनविलें. टॉलस्टॉय यांना पडलेल्या स्वप्नांचा खरा अर्थ असा आहे कीं, पूर्वेकडील प्राचीन राष्ट्रांच्या व तत्त्वज्ञानांच्या धर्मग्रंथांतून टॉलस्टॉयच्या मतांना पुष्टि मिळेल, आणि नंतरच युरोपखंड खऱ्या कल्याणाच्या मार्गाला लागेल. या स्वप्नांतील एक अंश तरी टिळक व गांधी या दोन नद्यांच्या मिलाफानें आज खरा झालेला दिसत आहे. टिळकांचे मार्ग निराळे व गांधींचे मार्ग निराळे; कारण दोनहि प्रवाह निरनिराळ्या ठिकाणीं उगम पावून निरनिराळ्या भूमींतून वहात आलेले

अहेत. निरनिराळ्या भूमींतून वहात आले तरी आज संगम झालेला आहे. गंगायमुनांच्या संगमाच्या ठिकाणीं कांहीं पावलें गंगेचें पाणी निराळें व यमुनेचें पाणी निराळें असें दृष्टीस पडतें; पण पुढें हा पृथक्पणा दृष्टीस पडेनासा होतो. आज पूर्वीच्या वैभवाच्या अभिमानासंबंधानें महात्माजी इतके टिळकरूप झाले आहेत कीं, टिळकांना दिलेल्या शिव्या आज जशाच्या-तशा महात्माजींना मुंबईचा 'टाइम्स' देत आहे. प्राचीन संस्कृतीचे अभिमानी आणि युरोपियन संस्कृतीचे द्वेष्टे, अशी नांवें ठेवून टिळकांवर जसा भडिमार करण्यांत आला होता, तसाच भडिमार सांप्रत महात्माजींवर करण्यांत येत आहे. टिळकांच्या कारकीर्दीत मुसलमानांचें कल्याण इंग्रजांच्या हातून अधिक होणारें असल्यानुळें मुसलमानांनीं हिंदूंचें व आपलें एक ध्येय ठेवूं नये, असें मुसलमानांना अँग्लो-इंडियनांकडून सांगण्यांत येत असे. प्रारंभीं या भुरळीला मुसलमान बळी पडले; पण टिळकांचें सोज्वळ चरित्र १९०६-७ सालच्या स्वदेशी चळवळीपासून जसजसें मुसलमानांच्या अवलोकनांत अधिक येऊं लागलें, तशी टिळकांविषयींची मुसलमानांची बुद्धि पालटत चालली; आणि मंडालेच्या तुरुंगांतून सुटून आल्यावर टिळकांच्या विषयीं मुसलमानांच्या मनांत पूर्ण पूज्यभाव उत्पन्न झाला. हिंदू व मुसलमान या दोघांनीं मिळून एकोप्यानें हिंदुस्थानांत राहून हिंदुस्थानचें स्वराज्य कमावलें पाहिजे आणि हिंदुस्थानला पूर्वीच्या वैभवाच्या शिखरावर नेऊन बसविलें पाहिजे, अशा तऱ्हेचा टिळकांचा उपदेश १९१४ सालापासून मुसलमानांच्या समाजाला पटूं लागला. आणि लखनौच्या काँग्रेसच्या वेळीं मुस्लिम लीग व काँग्रेस यांचा पूर्ण मिलाफ करून सोडण्यास टिळकांचेच उद्योग कारणीभूत झाले. लखनौ येथें टिळकांनीं हिंदु-मुसलमानांची पूर्ण एकी करून दिली आणि त्यानंतर मुसलमानांच्या पुढाऱ्यांचा विश्वास टिळ-कांच्यावर पूर्णपणें बसला. आज महात्मा गांधी यांजवर टीका करतांना जसें

टीकाकार म्हणतात कीं, महात्माजींना अल्लीबंधू खाऊन टाकीत आहेत आणि अल्लीबंधूंना महात्माजी खाऊन टाकीत आहेत, तशाच प्रकारची टीका टिळकांवरहि लखनौच्या काँग्रेसनंतर करण्यांत आलेली होती. टिळक मुसलमानांना फसवीत आहेत, अशा तऱ्हेची ती टीका होती. दोघांमध्यें कलागती लावून स्वतःचा फायदा करून घेण्याची अँग्लो–इंडियन पत्रकारांची ही नेहमींचीच रीत आहे. पण या काव्याला कोणी आज बळी पडत नाहीं. मुसलमानांनीं स्वतःच्या धर्माची मर्यादा न सोडतां हिंदूंशीं शेजारधर्मानें यागावें, हिंदूंनींहि स्वतःचा धर्म कायम राखून मुसलमानांच्या शेजारीं गुण्यागोविंदानें राहावें, आणि दोघांनीं मिळून राष्ट्रप्रेमानें प्रेरित होऊन हिंदी स्वराज्याची सेवा करावी, या टिळकांनीं आंखून दिलेल्या मार्गानेंच आज अल्लीबंधू व महात्मा गांधी जात आहेत; महात्मा गांधी यांच्या मतांकरितां अल्लीबंधूंनीं कुराणाची आज्ञा मोडण्यास राजी व्हावें, अशी महात्माजींची बिलकूल इच्छा नाहीं. प्रत्येकाचा प्राचीनधर्म स्वराज्याहूनहि त्याला अधिकच प्रिय असला पाहिजे, हें तत्त्व अल्लीबंधु व महात्माजी या दोघांनाहि सारखेंच प्रिय झालेलें असल्यामुळें लखनौ येथें टिळकांनीं केलेली हिंदु मुसलमानांची एकी सुविचाराच्या गांठीनीं दृढ झाली आहे. हें दृढीकरण टिळकांनीं स्वतःच्याच आयुष्यांत पाहिलें, हें त्यांचें महद्भाग्य होय. या दृढीकरणामुळेंच खिलाफत कमिटयांनीं सुरू केलेला असहकारितेचा कार्यक्रम कलकत्त्याच्या काँग्रेसनें स्वीकृत केला, आणि नागपूरच्या राष्ट्रीय सभेंत त्या कार्यक्रमास उज्ज्वल स्वरूप देण्यांत आलें. खिलाफतीच्या चळवळीमागून जाऊन मुसलमानांना दुजोरा देण्यास टिळकांनीं सांप्रतच्या प्रसंगीं नाकारलें असतें, असें म्हणणारे लोक केवळ दुष्ट बुद्धीनें तसें म्हणत आहेत, हें वरील विवेचनावरून वाचकांच्या ध्यानीं येईल. या वेळीं हिंदूंनीं आणि मुसलमानांनीं दोघांनीं मिळून मिळवावयाच्या संपूर्ण स्वराज्याच्या सांप्रतच्या उद्योगास आमचे वाचक स्वार्थत्यागपूर्वक मदत करतील अशी आम्हांस आशा आहे.

---

* टिळक आणि खिलाफत

खिलाफतीचा प्रश्न मुसलमानांच्या इच्छेप्रमाणें सुटावा, असें हिंदुस्थानांतील प्रमुख अधिकाऱ्यांचेंहि मत आहे. गेले लाटसाहेब लॉर्ड चेम्सफर्ड यांनीं, सेव्हरीसच्या तहाचीं कलमें हिंदुस्थानास कळवितांना टर्कीचा प्रश्न मुसलमानांच्या इच्छेप्रमाणें सुटत नाहीं, याबद्दल दुःखाश्रु गाळले होते. हल्लींचे लाटसाहेब लॉर्ड रीडिंग यांचेंहि अंतःकरण टर्कीच्या प्रश्नासंबंधानें दुःखी कष्टी आहे. हिंदुस्थानांतील अँग्लो-इंडियन मुत्सद्दी असो किंवा मवाळ पक्षाचा मुत्सद्दी असो, टर्कीसंबंधानें सहानुभूति दाखविण्यास बिलकूल चुकत नाहीं. दुःखाश्रु गाळल्यानंतर आणि सहानुभूति दाखविल्यानंतर या मुत्सद्दीवर्गाचा महात्मा गांधी यांना असा सवाल आहे की, टर्कीचें नशीब हिंदुस्थानाच्या हातांत नसतां आणि इंग्रजी मुत्सद्यांच्याहि हातांत नसतां खिलाफतीच्या प्रश्नांशीं हिंदी राजकारणाचें एक तऱ्हेचें लग्न लावून तुम्हीं कां बसला आहां? जी गोष्ट अपरिहार्य आहे त्या अपरिहार्य बाबींचें लोढणें कोणत्याहि राजकीय धोरणाच्या गळ्यांत बांधणें म्हणजे व्यवहारदक्षतेला सोडून वागणें होय. जी गोष्ट टळत नाहीं त्या गोष्टीवर पूर्ण भिस्त ठेवून राजकारणाचे डाव खेळणारा मुत्सद्दी चतुर कसा म्हणावा? अपरिहार्य अर्थासंबंधानें शोक करीत बसणें बाजवी नाहीं, असें खुद्द भगवंतानीं भगवद्गीतेंत सांगितलें आहे. तेव्हां खिलाफतीसंबंधानें सहानुभूति दाखविण्याच्या दृष्टीनेंहि हिंदी राजकारणाशीं खिलाफतीचा संबंध इतक्या दृढपणानें जोडणें चांगलें नाहीं. खिलाफतीची व गांधींची मैत्री हिंदूंच्या व मुसलमानांच्या कल्याणास अपायकारक असून टिळक जर आज जिवंत असते तर व्यवहार-

---

* लोकमान्य, ता. २२ जुलई १९२१

दक्षतेमुळें त्यांनीं असली मैत्री तोडून टाकण्याबद्दल चिकाटीनें व निश्चयानें प्रयत्न करण्यास बिलकूल कमी केलें नसतें. टिळक असते तर खिलाफतीचा प्रश्न त्यांच्या वजनामुळें व कर्तृत्वामुळें एव्हांना मागें पडून हिंदी राजकारण आजच्याप्रमाणें गढूळ न दिसतां स्वच्छ झालें असतें. टिळक असते तर खिलाफतीचें काय झालें असतें, या प्रश्नासंबंधींचा पूर्वपक्ष येथवर झाला. अशा तऱ्हेचा पूर्वपक्ष करून टिळकांच्या अनुयायांनीं खिलाफतीच्या चळवळींतून आपलें अंग काढून घ्यावें असा उपदेश अनुयायांना हा पूर्वपक्ष करीत असता त्या पूर्वपक्षास आमचें असें उत्तर आहे कीं, टिळक जर आज असते तर खिलाफतीचा व महात्मा गांधींचा संबंध आजच्याहूनहि अधिक दृढच झाला असता. कारण, टिळक हिंदु मुसलमानांतील सहानुभूतीच्याच दृष्टीनें या प्रश्नाकडे पहात नव्हते. मुसलमानांचें जें दुःख तेंच हिंदूंचें दुःख एवढ्या एका तत्वावरच त्यांची भिस्त नव्हती, मुसलमानांवर आलेल्या प्रसंगामुळें त्यांचें हृदय अत्यंत विव्हळ झालेलें होतें; शोकामुळें व स्नेहामुळें ते मुसलमानांच्या खांद्याला खादा लावून झुंजण्यास तयार होते; इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानाबाहेरील मुसलमानी प्रदेशांच्या नशिबाशीं हिंदुस्थानाचेंहि नशीब जखडलें गेलें असून मुसलमानी प्रदेशांचें दुर्दैव तेंच हिंदुस्थानचें दुर्दैवहि ठरल्यावांचून राहणार नाहीं, अशी बालंबाळ खात्री त्यांच्या सूक्ष्म बुद्धीची झालेली होती. टर्की निःसत्व होऊन मुसलमानी प्रदेश जर हिंदुस्थानाप्रमाणेंच युरोपियन राष्ट्रांना चरण्याचीं कुरणें होऊन बसले तर हिंदुस्थानचें स्वराज्य अधिक अधिकच लांबणीवर पडल्यावांचून कधींहि राहणार नाहीं असें त्यांना वाटत होतें. मनुष्याच्या प्रयत्नावर यश अवलंबून असतें, हें जितकें खरें आहे तितकेंच प्रयत्नावरोबर दैवहि अनुकूल असावें लागतें हें म्हणणें खरें आहे. महायुद्धानें उत्पन्न केलेल्या हिंदुस्थानाबाहेरच्या जगाच्या परिस्थितीमुळें

हिंदुस्थानांत अल्प प्रमाणांत स्वराज्यास प्रारंभ झाला आहे. हें अल्पप्रमाणाचें स्वराज्य हिंदुस्थाननें स्वतःच्या मेहनतीनें मिळविलें या म्हणण्यांत जितका तथ्यांश आहे, तितकाच तथ्यांश बाहेरच्या परिस्थितीमुळें किंवा अनुकूल दैवामुळें तें मिळालें, असें म्हणण्यांतहि आहे. हिंदुस्थानलगतच्या मुसलमानी प्रदेशाचा हितसंबंध हिंदुस्थानास इंग्लंडच्या हितसंबंधाहूनहि हिंदुस्थानांतील नोकरशाहीशीं झगडतांना अधिक महत्वाचा आहे. इंग्रजी साम्राज्य हिंदुस्थानावर होण्यापूर्वी इस्तंबूलकडे पाहून हिंदुस्थानांतील सर्व प्रकारचे मुत्सद्दी आपापल्या तऱ्हेचें राजकीय ध्येय ठरवीत असत. पानिपतच्या मोहिमेंत सदाशिवराव भाऊंनीं दिल्ली काबीज केल्यानंतर तह करणार नाहीं, असें सांगितलें आणि इस्तंबूल पाहिल्याशिवाय मागें फिरणार नाहीं, अशी प्रतिज्ञा केली. वरील प्रकारचें वर्णन पानिपतच्या पोवाडयांत शाहीरांनीं त्या वेळच्या राजकीय ध्येयाकडे लक्ष ठेवून केलेलें आहे. आज जसें लंडन तसें त्या वेळीं हिंदुस्थानास इस्तंबूल होतें. इंग्रजी साम्राज्याचा व हिंदुस्थानचा जितका निकट संबंध आज आहे तितकाच निकट संबंध टर्कीचा व हिंदुस्थानचा आहे. एकाचें दैव दुसऱ्याच्या दैवाशीं मिसळून गेलेलें आहे. तें एकमेकांपासून सोडवून अलग करणें भूगोलाच्या रचनेमुळें अगदीं अशक्य आहे. लंडनचें दैव व हिंदुस्थानचें दैव हीं एकमेकांपासून अलग करतां येतील आणि कदाचित् कांहीं शतकांनीं इतक्या दूरवरच्या लहानशा बेटानें हिंदुस्थानासारख्या पूर्वेकडील राष्ट्रास आपल्या हितसंबंधाच्या रज्जूनीं इतकें कसें ग्रासून टाकलें याबद्दल इतिहासकार आश्चर्य प्रदर्शितहि करतील; पण तुर्कस्थान, इराण, अफगाणिस्थान, बुखारा, समरकंद वगैरे मुसलमानी राष्ट्रें सृष्टीनें हिंदुस्थानचे शेजारी म्हणून उत्पन्न केलेलीं आहेत. या शेजाऱ्यांचा व हिंदुस्थानचा हितसंबंध बिलकूल नाहीं, अशा प्रकारची भावना सृष्टीच्या रचनेविरुद्ध हिंदुस्थानांतील हिंदूंमध्यें व मुसलमानांमध्यें कृत्रिम उपायांनीं

आज युरोपियन राष्ट्रांनीं कशी उत्पन्न केली आहे व त्यांत त्यांना कसें यश मिळवितां आलें आहे, याबद्दल टिळकांना राहून राहून आश्चर्य वाटत असे. हिंदूलोकांच्या मनांतील ही भावना काढून टाकणें त्यांना सोपें वाटत असे. आणि ती भावना हिंदूंपुरती तरी नष्ट करण्याचा प्रयत्न फार यशस्वी रितीनें त्यांनीं आपल्या स्वराज्याच्या मोहिमेंत केला, हें सर्वांना माहीतच आहे. स्वराज्याच्या मोहिमेंत लखनौच्या काँग्रेसच्या पूर्वी आणि लखनौच्या काँग्रेसनंतरहि हिंदी स्वराज्याच्या ध्येयाकडे सर्व हिंदी मुसलमानांचें लक्ष पूर्णपणें खेंचून घेणें फार अवघड आहे, असें त्यांना वाटत होतें. काँग्रेसच्या चळवळीपासून मुसलमानांना अलग ठेवण्याचा इंग्रजी मुत्सद्यांनीं लखनौच्या काँग्रेसच्यापूर्वी तीस चाळीस वर्षें जो आटोकाट प्रयत्न केला तो प्रयत्न एक दोन वर्षांच्या अवधींतं समूळ नष्ट कसा करतां येईल, याविषयीं टिळकांना एकसारखी विवंचना लागून राहिली होती. खिलाफतीच्या प्रश्नसंबंधानें मुसलमान जर जागे झाले तर वरील प्रश्न आपोआप सुटेल आणि हिंदी स्वराज्यावर मुसलमानांच्या हिंदुस्थानाबाहेरील प्रदेशांचें आजचें व भावी कल्याण कसें अवलंबून आहे हें मुसलमानांच्या मनाला बरोबर पटेल, असें टिळकांना वाटत होतें. खिलाफतीचा प्रश्न आणि स्वराज्याचा प्रश्न यांची सांगड हिंदू मुत्सद्यांनीं घालणें, हिंदी स्वराज्याचें स्पष्ट स्वरूप हिंदुस्थानांतील सात कोट मुसलमानांच्या हृदयावर उमटविण्याकरितां, अत्यंत जरुरीचें आहे; इतकेंच नव्हे तर त्यामुळें हिंदूंचें आज कितीहि नुकसान झालें तरी तें नुकसान मुसलमानांच्या जागृतीपासून होणाऱ्या फायद्यानें सहज भरून निघणारें आहे, असें टिळकांचें ठाम मत होतें. बनारसची ऑल इंडिया काँग्रेस कमिटी झाल्यानंतर महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखालीं अलाहाबादेस खिलाफतच्या परिषदेनें असहकारितेच्या चळवळीस सुरवात केली. त्यावेळीं टिळक बनारसहून अलाहाबादेस गेले नाहींत. पण अल्लीबंधूंना खिलाफतच्या

चळवळीकरितां मुसलमानांचा समाज जे जे उपाय योजण्यास तयार होईल त्या त्या उपायास मी पूर्ण पाठिंबा देईन आणि मुसलमानांवर पुढाऱ्यांच्या सर्व संकटाचा भागीदार मी होईन, असें आश्वासन टिळकांनीं दिलेलें होतें. महात्मा गांधी यांच्याप्रमाणें खिलाफतीच्या चळवळीचा पुढारीपणा स्वीकारण्याचें टिळकांनीं त्यावेळीं नाकारलें ही गोष्ट खरी आहे; पण तसें करण्याचा हेतुहि त्यांनीं मुसलमानांच्या पुढाऱ्यांपुढें स्पष्टपणें मांडला होता. महात्मा गांधी यांच्या शेजारीं खिलाफतीच्या प्रश्नाचे पुढारी म्हणून जर टिळक उभे राहिले असते तर मुसलमानांवर तेव्हांपासूनच नोकरशाहीची अधिक वक्रदृष्टि झाली असती. लोकांना चवताळून सोडून प्रतिस्पर्ध्यावर तुटून पडावयास उद्दीप्त करणारा हा वीर पुरुष आहे आणि असला पुरुष कोणत्या वेळीं कोणतें साहस करण्यास प्रवृत्त होईल याचा नेम नाहीं; अशी टिळकांविषयींची गैरसमजूत टिळक मरेपर्यंत नोकरशाहीच्या मनांत कायम ठाणें देऊन बसलेली होती. नोकरशाही आपल्याकडे कोणत्या दृष्टीनें पहाते हें टिळक पूर्णपणें ओळखून होते. तेव्हां खिलाफतीच्या चळवळींत महात्मा गांधी यांच्याबरोबर जर नेतृत्वाची भागी आपण उचलली तर आपल्या सान्निध्यामुळें शांततेच्या असहकारितेच्या चळवळीवर निष्कारण फाजील संकटें ओढवतील, अशी टिळकांना भीति वाटत होती; या चळवळींत महाराष्ट्राला पुढारीपणाचा मान मिळण्यापेक्षां महाराष्ट्र या चळवळीचा नुसता खंबीर अनुयायी झाल्यानें पुढारी होण्यापेक्षांहि मुसलमानांचें व हिंदुस्थानचें अधिक कल्याण होईल, असें टिळकांना साधकबाधक प्रमाणांचा शांतपणें विचार करून ठरविलें होतें. सव्हरीसच्या तहाची कलमें जशीच्या तशी टिकतां कामा नयेत आणि तीं कलमें बदलून टर्की पुन्हां लष्करी दृष्ट्या जिवंत व धट्टाकट्टा झाला पाहिजे; एरवीं एशियाखंडाचें हित होणार नाहीं, असा त्यांचा ठाम सिद्धांत होता. हा तह टिकणार नाहीं असें जें वारंवार म्हणत

असत; पण टर्कीच्या, मुसलमानांच्या व हिंदुस्थानच्या दुर्दैवानें, जरी तो तह तसाच टिकला तरी देखील अपरिहार्य अर्थ म्हणून शोक करण्याचें सोडून दिल्यावरहि सर्व मुसलमानी प्रदेश व हिंदुस्थान यांच्या निकटसंबंधाची जागृति हिंदूंमधील व मुसलमानांमधील कायम राखणें हें हिंदी मुत्सद्याचें मुख्य कर्तव्यांपैकीं एक कर्तव्य होय, असें तें मानीत असत. आणि खिलाफतच्या चळवळीकडे या दृष्टीनें पहावयास टिळक कधींहि विसरत नसत. सात कोटी मुसलमानांत व सर्व हिंदूंत वरील भावनेची ज्योत जर कायम ठेवतां आली तर त्या ज्योतीपासून कामधेनूप्रमाणें हिंदुस्थानास पाहिजे तितकें कल्याण करून घेतां येईल, आणि नोकरशाहीच्या तोंडाकडे दीनाप्रमाणें पहात बसण्याची जरुरीहि राहणार नाहीं. खिलाफत आणि स्वराज्य यांची सांगड घातल्यापासून होणारा हा फायदा, दहा दहा वर्षांच्या हप्त्यानें एक एक पोकळ पायरी पुढें ठेवणाऱ्या मॉंटेग्यू चेम्सफर्ड यांच्या योजनेहून, टिळकांना कितीतरी पटीनें अधिक हितावह वाटत होता. ग्रीसमधील राज्यक्रांतीनें, फ्रान्स व इंग्लंड यांच्या दृष्टींतील भेदानें, आणि केमालपाशा यांच्या अंगच्या विलक्षण कर्तृत्वानें सेव्हरीसच्या तहांत फेरबदल होण्याच्या सांप्रतच्या प्रसंगीं टिळकांनीं खिलाफतचा प्रश्न एका बाजूस ठेवला असता, हें बिलकुल संभवनीय नाहीं. युरोपखंडांतील कारस्थानांमुळें टर्कीची दाद आज परमेश्वराच्या घरीं लागली नाहीं तरी देखील हिंदुस्थानांतील व हिंदुस्थानच्या बाहेरील सर्व मुसलमानांना आशियाखंडाच्या राजकीय धोरणासंबंधानें आणि शेजाऱ्या पाजाऱ्यांच्या कर्तव्यासंबंधानें जागृत करणारी खिलाफतीची चळवळ हिंदूंनीं शिरसावंद्यच मानिली पाहिजे, असें म्हणणारा दूरदर्शी मुत्सद्दी आज जर असता तर टर्कीचें दुर्दैव संपून उदयाचें किरण दिसूं लागण्याच्या आजच्या वेळीं खिलाफतीशीं फारकत करून मोकळा झाला असता, असें म्हणणें वेडगळपणाचें नाहीं काय !

* टिळक आणि कौन्सिलांतील टक्कर

टिळक जर जिवंत असते तर कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेनंतरहि नव्या कायदेकौन्सिलांच्या निवडणुकींत भाग घेण्यास त्यांनीं आपल्या अनुयायांस सांगितलें असतें, अशा तऱ्हेचें मत मवाळपक्षानें व अँग्लो–इंडियन पत्रकारांनीं प्रसिद्ध केलें आहे. असें मत प्रसिद्ध करण्यास टिळकांनीं चालवलेली निवडणुकीची तयारी हें एक कारण होऊन बसलें आहे. अमृतसर येथील काँग्रेसमध्यें प्रतियोगी सहकारितेचें जें तत्त्व टिळकांनीं प्रतिपादन केलें त्या तत्त्वालाहि पूर्वपक्ष आपलें मत स्थापित करण्याकरितां पुढें आणीत आहे. नवीन कायदे कौन्सिलांच्या योजनेनें जो लहानसा भाकरीचा तुकडा खिशांत टाकण्यांत आला आहे तो खाऊन टाका आणि पुरी भाकर मागा, अशा तऱ्हेचा उपदेश विलायतेहून येण्याबरोबर टिळकांनीं केला होता; त्याहि उपदेशाची या प्रसंगीं आठवण देण्यांत येत आहे. शिवाय खुद्द अमृतसरच्या राष्ट्रीय सभेनें नवीन योजनेला अपुरी, असमाधानकारक व निराशाजनक, अशीं दूषणें दिलीं असलीं तरी नव्या कायदे कौन्सिलांचा उपयोग करून घेण्यास हरकत नाहीं, असाच ठराव पास केलेला आहे. या सर्व गोष्टी पुढें मांडून पूर्वपक्ष असें म्हणत आहे कीं, कायदेकौन्सिलवर बहिष्कार घालण्यांत आपल्या गुरूच्याविरुद्ध टिळकांच्या अनुयायांनीं वर्तन केलें आहे. अमृतसरच्या राष्ट्रीय सभेच्या ठरावावर या वादाच्या वेळीं विशेष भर देणें योग्य नाहीं, असें आमचें म्हणणें आहे. अमृतसर येथील काँग्रेस व कलकत्त्याची जादा काँग्रेस यांच्यामधल्या वेळांत पंजाब प्रकरण व खिलाफत प्रकरण या दोनहि चळवळींना अगदीं निराळें स्वरूप प्राप्त झालें होतें. लॉर्डांच्या सभेंत व

---

* लोकमान्य, २३ जुलै १९२१

कामन्स सभेंत हिंदी लोकमताला बेमुर्वतपणानें धिःकारण्यांत आल्यावर प्रतियोगी सहकारितेला कोठें वाव शिल्लक राहतो, हेंच आम्हांस समजत नाहीं. दुसऱ्यानें जर स्नेहबुद्धीनें आपणास जवळ केलें तर दुसऱ्यांनाहि आपण स्नेहबुद्धीनें जवळ केलें पाहिजे, असें 'जशास तसें' या न्यायानें सिद्ध होतें. पण दुसऱ्यानें जर धिःक्कारलें तर आपणहि धिःक्कारलेंच पाहिजे, असाच जबाब 'जशास तसें' हा न्याय देतो. तेव्हां प्रतियोगी सहकारितेवर विसंबून राहून प्रतिपक्षानें उभारलेली इमारत कलकत्त्याच्या वेळीं ढासळूनच गेली होती, असें म्हणावें लागतें. अमृतसरच्या राष्ट्रीय सभेच्या ठरावाला मान देणें जरूर आहे, हें कारणहि लेचेंपेचेंच होय. अमृतसरच्या राष्ट्रीय सभेला जर मान पाहिजे तर कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेला मान कां नको? नागपूरच्या राष्ट्रीय सभेच्या ठरावांना कां मान नको? नव्या कायदेकौन्सिलचा उपयोग करून घ्या, असें अमृतसर येथें टिळकांनीं सांगितलें त्यावेळीं टिळकांच्याहि पुढें महात्मा गांधी होते. नव्या योजनेला अमृतसरच्या राष्ट्रीय सभेनें जीं दूषणें दिलीं आहेत तीं दूषणें नसतीं तर बरें झालें असतें, असें म्हणणारांत महात्मा गांधींची त्या वेळीं गणना होती. असें असतांहि खिलाफतच्या प्रश्नाला व पंजाब प्रकरणाला जें नवें स्वरूप प्राप्त झालें त्या स्वरूपामुळें जर महात्मा गांधी यांचीं मतें बदलली गेलीं तर टिळकांचींहि मतें बदलली गेलीं नसतीं, असें कां म्हणावें? नव्या योजनेचे कैवारी महात्मा गांधीइतके टिळक केव्हांहि नव्हते. नव्या योजनेचा महात्माजींना विशेष मोह पडला होता. त्यांना जर राष्ट्रकार्याकडे लक्ष देऊन आपला मोह आवरतां आला, तर ज्यांनीं नव्या योजनेला निराशाजनक असें म्हटलें ते टिळक कायदे कौन्सिलला मिठी मारूनच बसले असते असें कसें म्हणावें? प्रतियोगी सहकारिता व अमृतसरच्या काँग्रेसचे ठराव या दोन मुद्यांची विल्हेवाट अशा रीतीनें लागल्यावर, कायदे कौन्सिलांतील निवडणुकीकरितां

टिळकांनीं चालविलेल्या तयारीकडे आपण वळूं या. टिळकांनीं जी तयारी चालविली होती ती तयारी दिल्लीच्या व प्रांताप्रांताच्या कौन्सिलांत आपल्या पक्षाचें मताधिक्य स्थापित करण्याकरितां होती. हें मताधिक्य प्रस्थापित व्हावें म्हणून अमृतसरच्या ठरावाला विरोध करणाऱ्या विक्षांटबाई व इतर मवाळ पुढारी यांना निवडून देऊं नका, असें सर्वांना टिळक त्या वेळीं सांगत असत. खिलाफतीचा प्रश्न किंवा अमृतसरचा प्रश्न सोडविण्याचे दोन मार्ग टिळकांना दिसत होते. एक मार्ग महात्मा गांधी यांनीं सांप्रत स्वीकारलेला मार्ग होय. दुसरा मार्ग नव्या कायदेकौन्सिलांत आपल्या पक्षाचें मताधिक्य करून तेथें नोकरशाहीला नडवून कायदेकौन्सिलांतील टक्करीचा उठाव घेऊन नंतर लोकांमध्यें पुन्हां चळवळ करण्यास तयार होणें हा मार्ग होय. बनारसच्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या वेळीं या दुसऱ्या मार्गाचें समर्थन टिळक करीत होते. टिळक जर जिवंत असते तर कलकत्त्याच्या काँग्रेसवर त्यांनीं आपल्या दुसऱ्या मार्गाचाच कार्यक्रम लादला असता आणि हिंदी राजकारणाला आजच्याहून निराळें वळण लागलें असतें, असें कांहींचें म्हणणें आहे. तडजोडीनें वागून आपल्या कार्यक्रमापैकीं बराचसा भाग इतर पुढाऱ्यांच्या गळ्यांत बांधण्याचा हट्ट टिळकांनीं कलकत्त्याच्या काँग्रेसच्या वेळीं धरला असता किंवा करतें, हाच मुख्य प्रश्न आहे. या प्रश्नास आमचें असें उत्तर आहे कीं, खिलाफतच्या प्रश्नाचें महत्त्व जाणून आणि खिलाफतच्या पुढाऱ्यांच्या मनोविकारांना योग्य मान देऊन टिळकांनीं आपला कार्यक्रम त्यांच्या नेहमींच्या धडाडीनें कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेपुढें मांडला नसता. याचीं कारणें टिळकांच्या कार्यक्रमांतच दृष्टीस पडणारीं आहेत. टिळकांच्या कार्यक्रमाचे तीन भाग आहेत. पहिला भाग कायदेकौन्सिलांत मताधिक्य मिळविणें हा होय. दुसरा भाग या मताधिक्याच्या जोरावर खिलाफत व अमृतसर या प्रकरणासंबंधानें

नोकरशाहीशीं टक्कर (deadlocks) देणें हा होय; आणि तिसरा भाग या टक्करीच्या जोरावर लोकांना हलवून सोडून लोकांची शक्ति वाढविणें हा होय. सांप्रतचा महात्मा गांधी यांचा कार्यक्रम आणि टिळकांचा बनारसच्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या वेळचा कार्यक्रम, यांच्यामध्यें अलेरीस लोकांची शक्ति वाढविणें हा भाग सारखाच आहे. खिलाफतचा कार्यक्रम आजच लोकांची शक्ति वाढविण्याच्या स्वावलंबनाच्या मार्गाला लागा, असा कलकत्त्याच्या काँग्रेसच्या वेळीं होता व अजूनहि तो जशाचा तसाच आहे. टिळकांच्या कार्यक्रमांत कायदेकौन्सिलांत मताधिक्य करणें व टक्कर (deadlocks) देणें हे प्रारंभीचे दोन वळसे बनारसच्या वेळीं अधिक होतें; टिळकांना कायदेकौन्सिलांत मताधिक्य पाहिजे होतें तें टक्कर देण्याकरिता पाहिजे होतें. कायदेकौन्सिलांत जाऊन टक्कर देऊन खिलाफतच्या व पंजाबच्या प्रकरणांत नोकरशाहीशीं आपण दोन हात करूं, असें टिळक म्हणत होते. या टक्करीमुळें नोकरशाही आपलीं मतें सोडणार नाहीं, हेंहि ते ओळखून होते. अशल्या टक्करीचा उपयोग लोकांत नवी जागृति उत्पन्न करण्यास नेहमीं चांगला होत असतो हें टिळक जाणून असल्यामुळें टक्करीनंतर लोकसमाज स्वावलंबनाच्या मार्गाला लावण्यास सोयीचें पडेल, असा टिळकांचा अंदाज होता. टिळक टक्करीकरितां कायदे-कौन्सिलांत जाणार होते, ह्याबद्दल वाद नाहीं, टिळकांची तयारी त्या दृष्टीनें चालली होती. नोकरशाहीनें व मवाळांनीं देखील उलट तयारी या टक्करींच्या (deadlocks) दृष्टीनें चालविली होती. त्यावेळीं टिळकांवर अँग्लो-इंडियन पत्रांनीं नानाप्रकारच्या शिव्यांच्या भडिमामार केला होता, आणि टक्कर देण्याच्या या तयारीला मवाळांनीं हाणून पाडलें पाहिजे,अशी इशारत मवाळ पक्षास देण्यांत आली होती. खुद्द मवाळ पक्षानेंहि हें टक्करीचें (deadlocks) तत्त्व नव्या कायदेकौन्सिलाच्या आत्म्यास विघातक असल्यामुळें लोकांनीं या

टक्करीच्या दृष्टीनें आपलें प्रतिनिधी निवडून देऊं नयेत, असाच गहजब टिळकांवर त्यावेळीं केला होता. यावरून असें सिद्ध होतें कीं, मताधिक्य, टक्कर, व नंतर पुन्हां लोकांत चळवळ असा तीन भागांचा टिळकांचा कार्यक्रम बनारसच्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या वेळीं होता. बनारसच्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनंतर खिलफतीचा असहकारितेचा कार्यक्रम पुढें आला, आणि नंतर कांहीं दिवसांनीं कायदे–कौन्सिलांवर बहिष्कार घालण्याची चळवळ महात्मा गांधी व खिलाफतीचे पुढारी यांनीं हातीं धरली. खिलाफतीनें कायदेकौन्सिलांवर बहिष्कार घालण्याचा निश्चय केल्यानंतर कलकत्त्याच्या काँग्रेसच्या वेळीं आपला बनारसचाच कार्यक्रम टिळकांनीं कायम ठेवला असता काय, याचा वाचकांनींच विचार करावा. मुसलमानांनीं कायदेकौन्सिलवर बहिष्कार घातल्यानंतर कायदे–कौन्सिलांत मताधिक्य मिळविणें हा भागच आपोआप नाहींसा होतो. खिलाफतचे पुढारी व काँग्रेसला येऊन मिळालेले मुसलमान यांच्या मदतीशिवाय टिळकांच्या अनुयायांना कायदेकौन्सिलांत मताधिक्य मिळणें केव्हांहि शक्य नाहीं. व्यवहारदक्ष टिळक यांच्या ही गोष्ट लक्षांत आली नसती, असें म्हणणारांनीं टिळकांना व्यवहारदक्ष तरी कां म्हणावें हें आम्हांस समजत नाहीं. कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं राष्ट्रीयपक्षाच्या खाजगी सभा झाल्या होत्या; आणि त्या वेळच्या चर्चेंत बॅ. दास वगैरे पुढाऱ्यांना जर कायदेकौन्सिलांतील टक्करीचा मार्ग पसंत पडला नाहीं तर कायदे–कौन्सिलच्या निवडणुकीच्या वेळीं राष्ट्रीय पक्षानें उभें राहणें चुकीचे होईल, असेंच ठरविलें होतें. कायदेकौन्सिलांत मुसलमानांना जवळ जवळ एक तृतीयांश मतें आहेत. खिलाफतच्या पुढाऱ्यांनीं निवडणुकींतून अंग काढलें म्हणून या एक तृतीयांश जागा हल्लींच्याप्रमाणें नोकरशाहीचे बगलबच्चे अडविणार हें कलकत्त्यास बॅ. दास वगैरे पुढाऱ्यांना स्पष्टपणें दिसून चुकलें होतें.

मुसलमानांच्या एक तृतीयांश जागा वगळल्यानंतर बाकीच्या दोन तृतीयांशांत सरकारच्या वर्णीदाराकरितां राखून ठेवलेल्या कांहीं जागा अहित: इतक्या जागा अडल्या गेल्यावर टिळक असते तरी राष्ट्रीय पक्षास मताधिक्य मिळणें शक्यच नव्हतें. जर मताधिक्य नाहीं तर टक्कर (deadlock) नाहीं; आणि टक्कर नाहीं तर पुढें लोकजागृतीहि नाहीं. खिलाफतीच्या मदतीशिवाय टिळकांचा कार्यक्रम पार पडण्यासारखा बिलकूल नव्हता, हें वरील विवेचनावरून वाचकांच्या ध्यानीं येईल. लोकजागृती करून लोकांची शक्ति वाढल्याशिवाय गत्यंतर नाहीं, हें स्वावलंबनाचें तत्त्व महात्मा गांधी यांच्याप्रमाणें टिळकांनाहि मान्य होतें पण कायदे-कौन्सिलांतील टक्करीच्या नव्या प्रकारामुळें जुन्या कार्यासच नवीनपणा येऊन लोकांना सामर्थ्यवान करण्याचें काम अधिक सुलभ झालें असतें एवढेंच कायतें टिळकांना बनारसच्या कमिटीच्या वेळीं वाटत होतें. चळवळ नेहमींच्या चाकोरींतून न चालवितां कायदेकौन्सिलांतील टक्करीच्या नव्या चाकोरींतून जर चालविली तर नवीन स्फूर्ति उत्पन्न होऊं शकते, हें मुसलमानांच्या पुढाऱ्यांना मान्य नव्हतें, असें बिलकूल नाहीं. नव्या चाकोरीचा फायदा जुन्याच चळवळींनीं कां घेऊं नये, या प्रश्नांतील जोर अल्लीबंधू पूर्णपणें ओळखतात. पण खिलाफतीचा प्रश्न झाला तरी शें दोनशें वर्षांनीं केव्हांतरी येणाऱ्या योगापैकीं एक योग होय. कायदेकौन्सिलांतील टक्करीची तयारी करण्याची संधि दर तीन तीन वर्षांनीं येणारी आहे. तीन तीन वर्षांनीं येणारा पर्वकाळ आणि तीनशें तीनशें वर्षांनीं येणारा पर्वकाळ, यांमध्यें पूजा प्रथम कोणाची केली पाहिजे आणि विशेष महत्त्व कोणाला दिलें पाहिजे, हें टिळकांनीं कलकत्त्यास ओळखलें नसतें, असें म्हणणें म्हणजे टिळकांच्या बुद्धिमत्तेबद्दल अत्यंत वाईट मत प्रदर्शित करणें होय. कायदेकौन्सिलांतील टक्करींचा कार्यक्रम पुढें मांडून सात कोट मुसलमान हिंदी

स्वराज्याच्या ध्येयाकडे अधिक वळले असते. का खिलाफतीच्या प्रश्नामुळें स्वावलंबनाचा आजच मार्ग पुढें मांडून हिंदी स्वराज्याचें महत्त्व सात कोट मुसलमानांना अधिक पटवितां आलें असतें, असा प्रश्न पुढें येतांच खिलाफतवाले जर कायदे-कौन्सिलांत नाहींत तर आपणहि कायदे-कौन्सिलांत नाहीं, असेंच टिळकांनीं स्पष्ट उत्तर दिलें असते. मुसलमानांची एकी व खिलाफतीचा प्रश्न यांजकडे टिळक कोणत्या दृष्टीनें पाहात होते हें गेल्या अंकांत आम्हीं वाचकांपुढें मांडलेंच आहे. कायदे-कौन्सिलांत जावयाचें नाहीं असा खिलाफतवाल्यांनीं दृढ निश्चय केल्यावर टिळकांच्या खिलाफती-संबंधाच्या त्या दृष्टीनें, खिलाफतवाल्यांनाच उचलून धरण्यास टिळकांच्या अनुयायांना कलकत्त्याच्या काँग्रेसच्या वेळीं सांगितलें नसतें काय ?

* टिळक आणि स्वावलंबन

कौन्सिलमध्यें मताधिक्य मिळवावयाचें तें टक्कर देण्याकरितां, आणि टक्कर द्यावयाची ती लोकांमध्यें पुन्हां जागृति उत्पन्न करावयास सांपडावी म्हणून ! या टिळकांच्या कार्यक्रमांतील तत्त्वांचा विचार अधिक खुलासेवार करणें जरूर आहे. कौन्सिलांत टक्कर मताधिक्य हातीं असल्याशिवाय देतां येत नाहीं. नुसता विरोध करणें निराळें आणि टक्कर देणें निराळें ! विरोध करण्यापासून उपयोग होत नाहीं असें आमचें म्हणणें नाहीं. पं. मदन मोहन मालवीय यांनीं जुन्या कौन्सिलांत अमृतसर प्रकरणासंबंधानें फार योग्य रीतीनें नोकरशाहीला विरोध केला. नोकरशाहीनें कौन्सिलमध्यें त्यांना तुच्छतेनें झिडकारलें; पण नोकरशाहीवर अगदींच परिणाम झाला नाहीं, असें नाहीं. कौन्सिलाबाहेर सामान्य जनतेवर पंडितजींच्या विरोधाचा फारच चांगला परिणाम झाला, आणि महात्मा गांधी यांच्या सांप्रतच्या चळवळीला पंडितजींच्या विरोधामुळें एक तऱ्हेची आगाऊ पुष्टि त्या वेळीं मिळाली. पण असल्या विरोधानें टक्करीचें पुण्य मिळत नाहीं. टक्करीमध्यें नोकरशाहीच्या डोक्यावर आपल्या पक्षाचें डोकें हापटून नोकरशाहीला आणि नोकरशाहीच्या कायदेकौन्सिलच्या यंत्राला जागच्याजागीं डांबून निश्चल उभें करतां येतें. नोकरशाहीचें यंत्र हालत नाहीं व नोकरशाही हालत नाहीं; अशी नोकरशाहीची कायदेकौन्सिलांत होणारी जी अडवणूक त्या अडवणुकीला टक्कर असें म्हणतात. प्रजेच्या कायदेकौन्सिलांतील शक्तीनें नोकरशाहीचे हात धरून नोकरशाहीला एखाद्या निर्जीव पदार्थाप्रमाणें स्तब्ध उभी केली असतां नोकरशाही कौन्सिलच्याहि वरची आपली सत्ता उपयोगांत आणून तें कायदेकौन्सिल मोडून तरी टाकते किंवा कायदेकौन्सिलांच्या ठरावांना

---

* लोकमान्य, २४ जुलई १९२१

घाव्यावर बसवून वरच्या सत्तेच्या जोरावर कौन्सिलच्या मार्फत चालावयाचा राज्यकारभार स्वतःच चालवूं लागते, अशा थरावर कौन्सिलांतील टक्कर गेल्यानंतर ही टक्कर पाहात राहणाऱ्या प्रेक्षकांना म्हणजे खुद्द राष्ट्राला कुस्तींत पडावें लागतें. नोकरशाही जशी कौन्सिलच्या वरची आपली सत्ता उपयोगांत आणते त्याप्रमाणें टक्कर पाहणारे लोकहि कुस्तींत स्वतः पडूं लागले म्हणजे स्वतःच्या अंगची नैसर्गिक शक्ति उपयोगांत आणूं लागतात. आपल्या बाजूच्या पहिलवानाला न्याय मिळत नाहीं अशि कुस्तीच्या आखाड्याबाहेरचें बल उपयोगांत आणून आपल्या बाजूच्या पहिलवानावर ताण करण्यांत येत आहे, असें जेव्हां प्रेक्षक स्वतःच्या डोळ्यांनीं पाहतात तेव्हां कुस्तीच्या आखाड्यांत स्वतः उतरून स्वतःच्या पक्षाच्या बाजूनें स्वतःचें बल खर्च करण्याची प्रवृत्ति प्रेक्षकांमध्यें आपोआप उत्पन्न होते. प्रेक्षकांपुढें जर कुस्ती चाललेली नसेल आणि टक्करीचा प्रत्यक्ष देखावा जर प्रेक्षकांच्या नजरेस येणारा नसेल, तर स्वतःचें बल खर्च करण्याची प्रवृत्ति उत्पन्न होत नाहीं. टक्करीच्या प्रत्यक्ष दर्शनामुळें मनुष्याच्या अंगचें आत्मबल आपोआप उचंबळूं लागतें. जागृति करावी लागत नाहीं, जागृति होते! जागृति करण्याचें काम टक्कर स्वतः करीत असते. कौन्सिलामधील अडवणुकीनें किंवा टक्करीनें लोकांत जागृति झाल्यावर लोक स्वतःच्या बाजूच्या पहिलवानाच्या मदतीकरितां आखाड्यांत आपोआप उतरूं लागतात. अशा रीतीनें आपोआप लोक आखाड्यांत उतरूं लागल्यानंतर झुंजेंत आपली बाजू कमकुवत आहे, असें लोकांच्या ध्यानीं येऊं लागतें; आणि त्यावेळीं पुढाऱ्यांच्या कामास पुन्हां सुरवात होते. लोकांची आत्मशक्ति जागी झाली खरी, पण ती प्रतिपक्षावर ताण करण्यास कशी समर्थ होईल याचा विचार पुढाऱ्यांना करावा लागतो. या कृतीलाच स्वावलंबनाची चळवळ असें म्हणतात. महात्मा गांधी यांची असहकारितेची चळवळ, किंवा मद्यपान प्रतिबंधाची चळवळ या सर्व

चळवळी स्वावलंबनाच्या सदराखालीं येतात. खिलाफतीमुळें सात कोट मुसलमान आयते जागृत झाले असतांना, आणि पंजाब प्रकरणामुळें सर्व हिंदी राष्ट्र आमच्या बाजूच्या पहिलवानांच्या तर्फेनें स्वतः आखाड्यांत उतरण्यास तयार झालें असतांना कायदेकौन्सिलांतील टक्करीचे वळसे घेण्यांत व्यर्थ वेळ कां घालवा असा प्रश्न कोण विचारणार नाहीं ? टक्करीनें जें कार्य व्हावयाचें तें कार्य खिलाफतीनें व पंजाब प्रकरणानें केल्यानंतर स्वावलंबनाच्या मार्गाला सुरुवात करण्याची वेळ येत नाहीं काय ? खिलाफतीमुळें हें कार्य मुसलमानांत झालें आहे कीं नाहीं, हें ठरविण्याचा बोजा अलीबंधूंवर होता; आणि जागृतीचें कार्य झालें आहे, असा निकाल कलकत्त्यास अलीबंधूंनीं दिल्यावर इतर पुढाऱ्यांना पुन्हां टक्करीचा मार्ग केव्हांहि स्वीकारतां आला नसता. लोक आखाड्यांत उतरण्यास उत्सुक झाल्यानंतर त्यांचें आत्मबल ज्यायोगानें बाहेर अधिक खेंचलें जाईल, लोकांची शक्ति ज्या योगानें अधिक व्यवस्थित स्वरूपाची होईल, आणि लोकांची तपश्चर्या ज्या योगानें अधिक कार्यक्षम होईल, आणि लोकांच्या आत्मतेजानें आज नाहीं उद्यां लवकरच अखेर विजय मिळविण्याचें सामर्थ्य प्राप्त होईल, अराच कार्यक्रम अशा प्रसंगीं पुढाऱ्यांनीं आखला पाहिजे. लोकांनीं स्वतःच्याच हातांनीं स्वतःचीच शक्ति उत्पन्न करून ती स्वतःच्याच हातीं कृपणाप्रमाणें ठेवल्याशिवाय अखेर यश मिळवून देणारें बल केव्हांहि वृद्धिंगत होत नाहीं. आपल्या हातांनीं दुसऱ्याच्या शक्तीला मदत करून ती वाढलेली शक्ति पेटींत कोंडून ठेवणें, असला मार्ग स्वावलंबनाच्या विरुद्ध असतो हें सांगणें नकोच. दुसऱ्याच्या किंवा प्रतिपक्षाच्या मदतीशिवाय केवळ स्वतःवर अवलंबून राहून स्वतःचें कर्म रोजच्या रोज स्वतः करून त्यापासून मिळणारें फलहि किंवा बलहि स्वतःच्या हातांत ठेवतां येईल आणि स्वतःच्या इच्छेप्रमाणें पाहिजे तेव्हां त्याचा उपयोग करून घेतां येईल, असल्या

तालमींला तपश्चर्येंला किंवा, चळवळींला स्वावलंबन असें म्हणतात. स्वावलंबन म्हणजे स्वतःची, स्वतःच्या बलावर प्रत्यक्ष केलेली कृति होय. नोकरशाहीपुढें आपलें चालत नाहीं, तर आपली आपण, आपल्या पुरती, आपल्या शक्तीच्या जोरावर, आपल्या स्वतःच्याच आवारांत चालावयाची चाल चालली पाहिजे. ती चालतां चालतां नोकरशाहीची मदत कमी होऊन नोकरशाही रोडावत चालली म्हणजे आणि रोजच्या तालमीमुळें आपलें स्वतःचें चालणें 'धीरोद्धता नमयतीव गतिर्धरित्रीम्' अशा तऱ्हेचें जोरकस झालें म्हणजे स्वावलंबनामुळें नोकरशाहीवर मात करण्याची वेळ आपोआप प्राप्त होते. असल्या तालमीला व तपश्चर्येला सांप्रतच्या राजकीय वादांत स्वतःपुरती प्रत्यक्ष कृति (Direct Action) असेंहि नांव आहे. महात्मा गांधींचें ध्येय बहुतेक सर्व विचारी मवाळांना मान्य आहे. ध्येयासंबंधानें तंटा नाहीं; मार्गासंबंधानें तंटा आहे. महात्मा गांधींच्या 'डायरेक्ट ॲक्शन'चा किंवा स्वावलंबनाच्या प्रत्यक्ष कृतीचा मार्ग मवाळांना पसंत नाहीं. स्वावलंबनाची किंवा 'डायरेक्ट ॲक्शन'ची तालीम मवाळांना नकोशी वाटते. दुसऱ्याच्या आखाड्यांत दुसरा सांगेल तेवढी आणि दुसऱ्याच्या हातांत शेंडी राहील अशा तऱ्हेची 'इनडायरेक्ट अँनेशन' ची ऊर्फ परावलंबनाची तालीम हिंदुस्थाननें आणखी कांहीं पिढ्या केल्याशिवाय स्वतःचा आखाडा स्थापून स्वतःच्या स्वावलंबनाची किंवा 'डायरेक्ट ॲक्शन' ची तालीम हिंदुस्थानास झेपणार नाहीं, असें मवाळ पक्षाचें म्हणणें आहे. 'डायरेक्ट ॲक्शन' किंवा 'इनडायरेक्ट ॲक्शन' म्हणजे स्वावलंबन किंवा परावलंबन यांच्या संबंधाच्या वादांत टिळक जिवंत असते तर कोणत्या बाजूचे झाले असते, या प्रश्नाचें उत्तर टिळकांचें चाळीस वर्षांचें चरित्र सर्वांच्या कानीं कपाळीं ओरडून सर्वांना देत आहे. टिळकांची बुद्धीची रचना स्वयंभू स्वावलंबनाची! स्वतःच्या बुद्धींतच स्वतः

गढून जाऊन स्वतःच्या कब्जांतलें जग स्वतः निर्माण करून तेथें निष्कंटक सत्ता चालविण्याची हौस टिळकांच्या बुद्धीला जन्मसिद्ध होती. ही असली हौस असल्यामुळेंच अध्ययन व अध्यापन असल्या कर्मांतच सर्व जन्म घालवावा, असें त्यांना कॉलेजांत शिकत असतांना व पुढें 'न्यू इंग्लिश स्कूल' काढल्यावरहि स्वभावतः वाटत होतें. या त्यांच्या मूळच्या स्वभावाला सभोंवारच्या स्थितीनें जे वेळोवेळीं अडथळे केले त्या अडथळ्याशीं झुंजतां झुंजतां टिळक आपल्या आयुष्याच्या अखेरच्या कालांत जन्मसिद्ध स्वराज्याकडे वळले. पण या अडथळ्याशीं झुंजण्याचें काम त्यांनीं ३०-४० वर्षें कसें केलें? अडथळ्याला टक्कर द्यावयाची, टक्करींत कमकुवतपणा अनुभवास येण्यावरोवर स्वावलंबनाची तपश्चर्या करून पहिल्या अडथळ्याच्या छातीवर पाय देऊन दुसऱ्या अडथळ्याच्या सन्मुख टक्करीकरितां पुन्हां उभें राहावयाचें, असा एकसारखा चाळीस वर्षें टिळकांच्या चरित्राचा प्रवाह अखेरपर्यंत वहात होता. स्वावलंबन हा तर त्यांचा मुख्य मंत्र होता. दुसऱ्याच्या हातांत शेंडी राहील असली चळवळ टक्करींच्या केवळ देखाव्यापुरती ते करीत असत. त्यांच्या प्रत्येक श्वासांत स्वावलंबन भरलेलें होतें. त्यांच्या शरीराची, मनाची, बुद्धीची व आत्म्याची ठेवणच स्वावलंबनाची होती. अमक्या तमक्या ठिकाणीं व अमक्या तमक्यापुढें आपलें चालत नाहीं, असें टिळकांना समजल्यावरोवर दुसऱ्या क्षणापासून स्वतःच्या कृतीवरच भिस्त ठेवण्यास लहानसहान वाबींतहि टिळक एकदम प्रारंभ करीत असत. आपल्या सोबत्यांशीं आपलें जमत नाहीं, असें एकदां मनास पटल्यावरोवर त्या सोबत्यांचें पुन्हां तोंडहि न पाहतां स्वतःच्या पुरत्या स्वतःच्या तपश्चर्येस हालअपेष्टा सोसूनहि टिळकांनीं एकदां नाहीं दोनदां, कित्येक वेळां प्रारंभ केला आहे. खाजगी किंवा लहान सहान गोष्टींत असल्या मनोवृत्तीस स्वाभिमान असें म्हणतात असतांत, आणि सार्वजनिक

कामांत याच वृत्तीस असहकारितेची चळवळ हें नांव प्राप्त होतें. स्वाभिमानानें स्वावलंबनाची तपश्चर्या करणारे टिळक जर नव्हते तर होते तरी काय ? टिळकांचा खाजगी किंवा सार्वजनिक, कोणताहि उद्योग स्वाभिमानाच्या व स्वावलंबनाच्या तपश्चर्येच्या पायावर उभारलेला नव्हता, असें त्यांच्या चरित्रांत बिलकूल सांपडावयाचें नाहीं. ' डायरेक्ट ॲक्शन 'चा उपजत चहाता जर गेल्या शंपन्नास वर्षांत हिंदुस्थानांत कोणी जन्मास आला असेल तर तो एकटा टिळकच होय. महात्मा गांधी विचार करतां करतां ' डायरेक्ट ॲक्शन 'च्या मार्गावर पोंचलेले आहेत. टिळक जन्मापासून उपजतच ' डायरेक्ट ॲक्शन 'चे कैवारी आहेत. प्रतिस्पर्ध्यांच्या तोंडाकडे पाहून त्याच्या मेहरबानीनें जगण्याचा कंटाळा टिळकांच्या इतका आजच्या कोणत्याहि पुढाऱ्यांत सांपडावयाचा नाहीं. या त्यांच्या उपजत गुणामुळें गोखले, मेथा वगैरे मंडळींशीं आपोआपच त्यांचें पटत नसे. जें कांहीं थोडें पटे, तें विचार करकरून पटवून घ्यावें लागे. मनाचा व बुद्धीचा कल असें न पटण्याकडे अधिक होता. असला ' डायरेक्ट ॲक्शन 'चा किंवा स्वावलंबनाचा मूर्तिमंत पुतळा महात्मा गांधी यांच्या सांप्रतच्या ' डायरेक्ट ॲक्शन 'च्या चळवळींत उपजत प्रेमानें, उल्हासानें आणि अंगांत वारें संचारण्याच्या वेळच्या धडाडीनें पडला नसता, असें कोण व कसें म्हणूं शकेल ?

* टिळक आणि तडजोड

महात्मा गांधी यांजवर मुंबईच्या 'टाइम्स'नें असा आरोप केला आहे कीं, महात्माजी केव्हां आणि कशी टोपी फिरवतील याचा नेम नसल्यामुळें त्यांच्या अनुयायांचा संघ चांगला मजबूत होईल असें म्हणतां येत नाहीं. मुंबईतील पारशी गुत्तेवाल्यांच्या नुकसानीकडे लक्ष देऊन महात्माजींनीं मुंबई शहरापुरतेंच पिकेटिंग बंद ठेवलें, ही गोष्ट वरील विधानास पोषक म्हणून पुढें करण्यांत आलेली आहे. असहकारितेच्या चळवळीचे हे मुख्य प्रवर्तक, पं. मदनमोहन मालवीय यांनीं आग्रह केला म्हणून सिमल्याला लाटसाहेबांच्या दर्शनास जातात, खिलाफतच्या शिष्टांना सरकारी आमंत्रण स्वीकारून विलायतेस जाण्याचा सल्ला देतात, आणि गार्डन पार्टीला असहकारितावाद्यांनीं हजर राहणें गैरशिस्त असतांहि तसल्या मेजवानीला जा म्हणून आपल्या अनुयायांना सुचवितात; तेव्हां धरसोडीचें वर्तन करणाऱ्या या असल्या पुढाऱ्यांच्या शब्दाला कांहीं वेळानें मान राहणार नाहीं, असा मुंबईच्या 'टाइम्स' चा कयास आहे. सत्याग्रहाची चळवळ महात्माजींनीं सुरू केली आणि लगेच हिमालयाएवढी चूक झाली असें कबूल करून अहमदाबादच्या दंग्यानंतर ती त्यांनीं बंद केली. त्या वेळीं देखील हा धरसोडीचा आरोप महात्माजींवर करण्यांत आला होता. तसला धरसोडीचा आरोप झाल्यानंतरहि सांप्रतच्या असहकारितेच्या चळवळीच्या वेळीं सर्व हिंदुस्थान महात्माजींच्या मागें लागलेलें आहे, याचें इंगित काय? महात्माजी सिमल्यास गेले म्हणून त्यांचें वर्चस्व कमी झालें नाहीं, याचें कारण काय? महात्माजीनीं आज मुंबईपुरतें पिकेटिंग बंद ठेवलें तरी उद्यां दुप्पट जोरानें पिकेटिंगची वावटळ सुरू होईल, अशी भीति गुत्तेवाल्यांना वाटत आहे; हें

---

* लोकमान्य, २५ जुलै १९२१

असें कसें होतें? महात्माजी अशा प्रकारें धरसोडीनें वागतात तरी देखील अनुयायी एकनिष्ठेनें त्यांच्या मागून जातात, हा चमत्कार कसा उलगडावयाचा? या अशा गोष्टी कशा घडून येतात, याचें कोडें जर समजून घ्यावयाचें असेल तर टिळकांच्या चरित्राकडे पाहिलें पाहिजे. टिळक प्रतिस्पर्ध्यांशीं धडाडीनें लढणारे वीर पुरुष तर खरेच, पण लढतांना अविचारानें ते कधींहि वागलेले नाहींत. कोणच्या ना कोणच्या तरी ठरीव विचारसरणीला अनुसरून ते नेहमीं टक्कर देत असत. पण नुसत्या टक्करीचा किंवा लढण्याचा अभिनिवेश अंगांत संचारल्यामुळें भक्कम विचाराच्या पायावरून ते ढांसळून पडले असें केव्हांहि झालेलें नाहीं. विचार आणि बुद्धि एका बाजूला ठेवून मनोविकारांचा वारा जिकडे नेईल तिकडे आपल्या चळवळीची नाव त्यांनीं पाहिजे तशी भडकूं दिली नाहीं. शक्तीचा उपयोग लढतांना करावयाचा, धोरण ठरवितांना शक्तीला साधनापेक्षां अधिक मान द्यावयाचा नाहीं; हें तत्त्व त्यांच्या बुद्धीनें कधींहि सोडलें नाहीं. कोणत्याहि चळवळींत ते निर्भयपणें पडत असत. वरच्या पायरीस चढलेल्या बुद्धीच्या लक्षणांपैकीं निर्भयता हें एक लक्षण आहे. मृत्यूपर्यंतचें भय आपणांस अमक्या तमक्या चळवळींत येणारें आहे, हें आधीं ओळखून तें भय प्रथमच आपण होऊन आपल्या मस्तकीं धारण करून नंतर टिळक चळवळींत पडत असत. चळवळींतील आपला मृत्यु आपल्या डोळ्यांनीं आपण देखणें, आणि तो मृत्यु आला तरी स्वीकारला पाहिजे अशा ठाम सिद्धांताचें अचल आसन घालून बसणें, यालाच निर्भयता असें म्हणतात. ही निर्भयता टिळकांच्या अंगीं जितकी होती तितकीच लालाजी किंवा महात्माजी यांच्याहि अंगीं आहे. चळवळीची विचारसरणी आणि पुढाऱ्यांच्या मनाची ही निर्भय स्थिति या दोघांचा उत्तम मेळ पडल्यावर अनुयायांना कधींहि वाण पडत नाहीं. असल्या दोन गुणांवर [illegible] हा मनुष्याचा स्वभाव उपजत आहे. जोंपर्यंत पुढाऱ्यांच्या मनाची

निर्भय स्थिति भंग पावलेली नाहीं. आणि त्यांच्या विचारसरणींत स्वतःच्या लोभाचा गढूळपणा दिसत नाहीं, तोंपर्यंत त्यांचीं पावलें मागें पुढें पडतात एवढयाचमुळें, अनुयायांचींहि मनें चलबिचल होत नाहींत. १८९७ सालच्या खटल्यांत, १९०८ सालच्या केसरीवरील दुसऱ्या खटल्यांत, ताईमहाराजांच्या किंवा शेवटीं चिरोलच्या खटल्यांत, टिळक धडाडीनें लढले; कारण शांतपणानें ठरविलेल्या विचारसरणीचा उद्दिष्ट हेतु अढळ रीतीनें मनापुढें ठेवून कोर्टानें दिलेली शिक्षा आगाऊच मनानें ओळखून मानसिक परिस्थितींत ती कैद आगाऊ उपभोगूनच टिळकांनीं झुंजेस सुरवात केली. कोल्हापूर प्रकरणांतील शिक्षेमुळें डोंगरीच्या किल्ल्यावर १०१ दिवस टिळकांनीं आगरकरांच्या बरोबर तुरुंगांत काढले; ज्या लेखामुळें हा तुरुंगवास त्यांना सोसावा लागला ते लेख टिळकांच्या हातचे नव्हते. १८९७ आणि १९०८ या दोन सालांतील केसरींतील खटल्याच्या वेळीं ज्या संपादकीय लेखामुळें टिळकांना जबर शिक्षा भोगाव्या लागल्या ते संपादकीय लेख प्रस्तुत लेखकाच्या हातचे होते; आणि त्या वेळींहि संपादन करण्याचा बोजा टिळकांच्या शिरावर नव्हता. सदर लेखांच्या वेळीं मुख्य संपादक या नात्यानें रा. खाडिलकरच केसरी ऑफिसांत काम करीत होते. केवळ मुद्रक व प्रकाशक एवढयाच नात्यानें टिळकांनीं त्या शिक्षा भोगलेल्या अहित! पण चळवळींतील विचारसरणी आपण जी आंखली ती बरोबर आहे असें ध्यानीं घेऊन, शांतपणानें इतर कोणासहि आपल्या दुःखाचे वाटेकरी करणें हितावह होणार नाहीं असें समजून उमजून, व इतरांना तसें समजून देऊन टिळक निर्भय स्थितींत तुरुंगाचा रस्ता धरते झाले! जामिनावर सोडविण्याची खटपट करतांना रात्रीच्या वेळीं पोलिसच्या कोठडींत कै. दाजीसाहेब खरे, वकील या नात्यानें टिळकांना भेटावयास गेले असतांना गाढ झोपेंत घोरत असलेले टिळक त्यांच्या दृष्टीस पडले. अशा स्थितींत इतक्या लवकर तुम्हांला झोंप लागते

तरी कशी ! असा प्रश्न दाजीसाहेबांनीं साश्चर्य विचारला असतां तुम्हांला ज्या भयाची विवंचना वाटते त्या भयाला विचारानें मीं मागें ढाकलें असल्यामुळें माझ्या झोंपेच्या आड कसलीहि विवंचना येऊं शकत नाहीं, अशा आशयाच्या शब्दांनीं टिळकांनीं दाजीसाहेबांचें समाधान केलें. चळवळींतील भीतीबद्दल अशी निर्भय स्थिति बुद्धीच्या जोरावर मनाची करून टाकल्यानंतर अनुयायांसंबंधानें, मार्गासंबंधानें, व साधनासंबंधानें, सभोवारच्या लोकांच्या कुवतीकडे लक्ष देऊन, तडजोड करण्यास टिळक केव्हांहि मागें पुढें पहात नसत. पिकेटिंगच्या वेळीं मिशनऱ्यांचें, डॉ. मॅनसारख्या सरकारी अधिकाऱ्याचें व मवाळांचें टिळकांशीं चांगलें पटे, कारण टिळक नेहमीं पटवूनच घेत. धोरणांत निश्चयीपणा आणि स्वतःच्या कृतींत निर्भयपणा, हे दोन गुण असल्यावर इतरांशीं तडनोडीनें वागून त्यांच्या अंगच्या गुणांचा आपल्या कार्यास जितका उपयोग करून घेतां येईल तितका उपयोग करून घेण्यास टिळक कधींहि मागेंपुढें पहात नसत. आज महात्मा गांधी झाले तरी तसेच वागत आहेत. वकिलांची बदनामी करण्यास चळवळीच्या ध्येयाकडे लक्ष देऊन महात्माजींनीं बिलकूल कमी केलेलें नाहीं. पण ज्यांची बदनामी केली त्याच वकिलांच्याच धंद्यांतील आपल्या प्राप्तीपैकीं शेंकडा दहा, तीस, चाळीस, पाऊणशें टक्के टिळक स्वराज्य फंडास द्यावे, असें म्हणण्यास महात्माजी तयार आहेतच ! दारूच्या गुत्तेवाल्यांनीं आपल्या नुकसानीचे पैसे सरकारी तिजोरींतून मागून घ्यावेत, असा उपदेश महात्माजी गुत्तेवाल्यांना करीत आहेत. ज्या शासनपद्धतीला 'सैतानी शासनपद्धति' असें महात्माजी म्हणतात, त्याच शासनपद्धतीच्या तिजोरींतून पैसे घेण्यास गुत्तेवाल्यांना महात्माजी कसें सांगतात, असा मवाळांचा प्रश्न आहे. नोकरशाही सैतान आणि दारूचा गुत्ताहि सैतानच ! तेव्हां एका सैतानाला दुसऱ्या सैतानाच्या घरीं जेवावयास जा म्हणणें यांत कोणतें गैर

आहे ! दारूच्या गुत्त्याच्या सैतानाला महात्माजींनीं टिळक स्वराज्य फंडाच्या कोट सव्वाकोटी रुपयांतून कां जेवूं घालावें ? या दारूच्या सैतानाचें पोट किंमें पडतें हें खरें आहे; आणि असल्या उपासमारीच्या सामान्य क्रियेबद्दल महात्म्याचें अंतःकरण कळवळावें, हेंहि रास्त आहे. असल्या कळवळ्याच्या वेळीं महात्माजींनीं स्वतःच्या घरांत जर या सैतानांना जेवावयास बोलाविलें असतें तर कार्यकर्ता पुढारी या नात्यानें त्यांना कमीपणा आला असता. दारूच्या सैतानी खिल्लाराला दोन प्रहरच्या भुकेच्या वेळीं बड्या सैतानाचें स्वयंपाकघर महात्माजींनीं दाखवून दिलें, यांत कोणची चूक केली ? ना चळवळीचें धोरण चुकलें, ना महात्माजींची निर्भयता ढांसळली; मग तडजोडीनें दारूचा धंदा करणारांचीहि थोडीशी सोय लावण्यास कोणती हरकत ? मुख्य तत्त्वाचें स्वरूप सांगोपांग ज्याच्यापुढें उभें राहिलेलें असतें आणि निर्भयता रोमरंध्रांत पूर्णपणें बाणलेली असते, चळवळींतील तसल्या स्थितप्रज्ञाला, स्वतःच्या पुरत्या स्वतःच्या आचरणांत बिलकुल फरक पडूं न देतां लोकसंग्रहाकरितां लोकांशीं सहानुभूतीनें वागणें श्रेयस्कर आहे. तुसडेपणानें विशेष फायदा नाहीं; असा श्रीमद्भगवद्गीतेला अनुसरून टिळकांच्या वर्तनाचा नियम होता. महात्मा गांधीहि आज तसेंच वर्तन करीत आहेत. लखनौच्या काँग्रेसच्या वेळीं, कलकत्त्याच्या काँग्रेसच्या वेळीं, मुंबईच्या जादा काँग्रेसचे वेळीं, विलायतेंत चळवळ करतांना, आणि अमृतसरच्या काँग्रेसच्या वेळीं, टिळक तडजोडीनेंच वागले आहेत; आणि बॅ. जीना सारख्यांनींहि त्यांजवर धरसोडीचाच आरोप केलेला आहे. लढतांना किंवा टक्कर देतांना टिळक अत्यंत आवेशानें व धडाडीनें पुढें जात असत. या कर्मठ व कोपी ब्राह्मणाला एखादा शब्द इकडे तिकडे केलेलाहि खपावयाचा नाहीं तेव्हां याच्याशीं कोणाचें कसें पटावयाचें, असा टिळकांचा उपहास त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांनीं आणि कांहीं कांहीं प्रसंगीं खुद्द अनुयायांनींहि केलेला आहे. अमृतसरच्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं बॅ. दास वगैरे मंडळींच्या एका टोकाला

कित्येक वेळां मदत केली व कित्येक वेळां तेंच टोंक तडजोडीला टिळकांनीं आणलें. विचारसरणीचें धोरण न सोडतां टिळकांनीं अशा तडजोडी कित्येक केलेल्या आहेत. कांहीं प्रसंगीं तर खुद्द अनुयायीच टिळकांना अरेरावीपणाचा दोष देतील, इतक्या थरापर्यंत टिळकांनीं एकट्यानींच तडजोडी केल्या आहेत. महात्मा गांधी हा एक अरेरावी व एकतंत्री राजा बनला आहे, असाच आरोप मुंबईच्या 'टाइम्स'नें व मवाळांनीं आज महात्माजींवर केलेला आहे. टिळकांवरहि हा असाच आरोप याच शब्दांनीं करण्यांत आला होता. तडजोड नेहमीं प्रसंग पाहून चटदिशीं करावी लागते. अनुयायांशीं चर्चा करीत बसण्याला फुरसतच नसते. तेव्हां जो पुढारी चळवळींत स्थितप्रज्ञ म्हणून गणला गेला त्या पुढाऱ्याला लोकसंग्रहाकरितां करावयाच्या तडजोडीची अख्त्यारी अनुयायांनीं देणें जरूर आहे, असेंच टिळकांच्या चरित्रावरून सिद्ध होतें. महात्मा गांधी प्रतिस्पर्ध्यासंबंधानेंहि दयाशील आहेत. तेव्हां अनुयायांना पराक्रम करावयास लावण्याकरितां उत्तेजित करण्या पलीकडच्या दुःखांत ते त्यांना घालतील हें बिलकूल संभवत नाहीं. उत्तेजित करण्याच्या सीमा कोणत्या, संकट ओळखून अनुयायांना आवरून धरण्याच्या सीमा कोणत्या, आणि अनुयायापैकीं अर्धवट्यांचा उपयोग करून घेण्याचे मार्ग कोणते, हें पुढाऱ्यानें स्वतःच्या मनाशीं स्वतः ठरविलें पाहिजे टिळक असल्या तडजोडींची वाच्यता ऐन वेळेच्या अगोदर कधीहि करीत नसत. कारण ती वाच्यता झुंजेंतील दम उखडून टाकणारी असते. तडजोड मनांत असली तरी तशी वेळ येऊन पोंचेपर्यंत कार्यकर्त्या पुरुषाला कृतींत निष्ठुरपणा ठेवावा लागतो. महात्मा गांधीहि या तडजोडीच्या मार्गासंबंधानें टिळकांसारखेच वागत असल्यामुळें उगीच शंका कुशंका काढून चळवळीचा जोर कमी करूं पाहणारांना मदत करणें टिळकांच्या अनुयायांना केव्हांहि श्रेयस्कर वाटणार नाहीं.

———

* टिळक आणि राष्ट्रीय सैन्य

राष्ट्रीय सैन्य आणि देशी सैन्य या दोहोंमध्यें फरक आहे. इंग्रजसरकारच्या हिंदुस्थानांतील लष्करांत आज एका गोऱ्यास अडीच काळे असें प्रमाण आहे. हें सर्व काळें सैन्य देशी सैन्य होय. पण तें राष्ट्रीय सैन्य नव्हे. लष्करी नोकरीच्या अभिलाषानें, पोटापाण्याची सोय लागावी म्हणून, देशी सैन्यांत भरती होत असते. नोकरी हा मुख्य हेतु असतो. आणि आपल्या अंगच्या गुणांना आणि प्रकृतीला साजेसा धंदा हा दुय्यम हेतु असतो. शीख, गुरखे, पठाण, रजपूत वगैरे लोक प्रकृतीनेंच लष्करी बाण्याचे असल्यामुळें सन्मानानें पोट भरण्याचा धंदा लष्करांत मिळाला तर त्यांना अधिक बरें वाटतें, आणि त्यामुळें इतर धंद्यांपेक्षां ते हौसेनें लष्करी नोकरी पत्करतात. लष्करी पेशाविषयीं हौस व वीरवृत्ति युरोपियनांच्या बरोबरीची त्यांच्या अंगीं असते, आणि त्यामुळें हिंदुस्थानांतील इंग्रज सरकारचें काळें सैन्य युरोपच्या रणभूमीवरहि युरोपियन्नांच्या बरोबरीनें शौर्य गाजवूं शकतें. पण या देशी सैन्यांत राष्ट्रीय भावना नसतें राष्ट्राच्या कल्याणाकरितां आपण लढत आहों, रणांगणावरील आपल्या आत्मयज्ञानें देशोद्धारास आपण मदत करीत आहों, आणि आपल्या पराक्रमामुळें आपल्या देशाच्या पूर्वीच्या, आजच्या व पुढच्या लौकिकास आपण संभाळून ठेवीत आहों, अशाप्रकारचे विचार या देशी सैन्यामध्यें नसतात. असल्या विचारांमुळें ते लष्करी नोकरींत शिरलेलेच नसतात. राष्ट्रीय सैन्यांत राष्ट्रीय विचारांना प्राधान्य असतें. तनखा, मानमरातब आणि धंद्याचा नांवलौकिक या सर्वांच्या वरची राष्ट्रीय सैन्याची पायरी असते. रोजच्या उपजीविकेकरितां राष्ट्रीय सैन्य लष्करी तनख्यावर अवलंबून नसतें. संसार चालविण्याचा त्यांचा धंदा लष्करी

---

* लोकमान्य, २९ जुलै १९२१

पेशाहून निराळा असतो. या दुसऱ्या धंद्यांत त्यांनीं एकप्रकारचा लौकिकहि मिळविलेला असतो, आणि राष्ट्रावरील संकट टाळण्याकरितां राष्ट्राची लष्करी सेवा करण्यास स्वयंसेवक या नात्यानें राष्ट्रीय लष्करचे लोक पुढें आलेले असतात. लष्करी शिक्षण घेत असतांना, त्याची उजळणी करीत असतांना, किंवा संकटाच्या वेळीं प्रत्यक्ष लष्करी सेवा करीत असतांना, खड्या लष्करा प्रमाणें तनखा व शिधासामग्रीची सवलत राष्ट्रीय लष्करालाहि द्यावी लागते. पण तेवढ्यामुळें तें लष्कर नोकरवजा होत नाहीं. स्वयंसेवकांचेंच लष्कर असल्याशिवाय त्याला राष्ट्रीय लष्कर असें नांव मिळत नाहीं. हिंदुस्थानांत राष्ट्रीय लष्कर उभारलें जावें, या प्रश्नाला लॉर्ड किचनेर यांच्या कारकीर्दीत वरिष्ठ कायदे—कौन्सिलांत ना. गोखले यांनीं वरेंच पुढें ढकललें. पण महायुद्ध सुरू होईतों चर्चेपलीकडचें मूर्त स्वरूप या प्रश्नाला बिलकूल प्राप्त झालें नाहीं. महायुद्ध सुरू झाल्यावर साहजिकपणें हा प्रश्न पुढें आला, आणि त्या वेळीं मुंबईत शांतारामाच्या चाळींत भरलेल्या जंगी जाहीर सभेंत टिळकांनीं या प्रश्नास उचलून धरलें. स्वयंसेवकांचें राष्ट्रीय सैन्य उत्पन्न करणें, वाढीस लावणें आणि कार्यक्षम बनविणाऱ्या गोष्टी कांहीं विशिष्ट राजकीय परिस्थितीवर अवलंबून असतात. ती परिस्थिति जर नसेल तर असले प्रयत्न निष्फळ झाल्यावांचून राहात नाहींत. हिंदुस्थानांत इंग्रज सरकारचें गोरें व काळें मिळून नोकरवजा तीन लाख खडें सैन्य आहे. हें सैन्य म्हणजे नोकरशाहीचें मनगट होय. या मनगटाच्या शेजारीं लोकांनीं जर आपलें मनगट स्वयंस्फूर्तीनें धरावयाचें असेल तर लोकांचा व नोकर-शाहीचा दर्जा पैशाच्या दृष्टीनें व सत्तेच्या दृष्टीनें सारखा असला पाहिजे. आज जर्मन युद्ध सुरू झालें आणि सैन्याचा तुटवडा पडेल अशी भीति पडली म्हणून राष्ट्रीय सैन्याची उभारणी तुम्ही करूं लागला; पण या उभारणीची जरूरी भासली एवढ्यानेंच काम भागत नाहीं. टिळक असें म्हणत असत

कीं, आर्थिक दृष्ट्या व राजकीय दृष्ट्या बरोबरीची भागी लोकांना देण्यास आपण तयार आहों, असें नोकरशाहीनें मोकळ्या मनानें आश्वासन दिल्याशिवाय म्हणजे स्वराज्य दिल्याशिवाय स्वयंसेवकांचें जरूर तेवढें मोठें सैन्य हिंदुस्थानांत कधींहि दृष्टीस पडणार नाहीं. महायुद्धामुळें स्वयंसेवकांच्या धर्तीचें सैन्य सर्व युरोपियन राष्ट्रांत उत्पन्न झालें तेव्हां तसा प्रकारचें एकादें सोंग हिंदुस्थानांतहि असावें, असल्या बाह्य देखाव्याच्या प्रेरणेनें जोंपर्यंत राष्ट्रीय सैन्याची उभारणी करण्यांत येत आहे, तोंपर्यंत तसल्या उभारणीच्या चळवळीस राष्ट्रीय पुढाऱ्यांनीं मदत करूं नये, असें टिळकांनीं ठरवून ठेवलें होतें. श्रीशिवाजी महोत्सवांत एके प्रसंगीं त्यांनीं वरील तऱ्हेचेच उद्गार काढल्यामुळें सामान्य रिक्रूटिंगला टिळकांचीं मतें अडथळा करतात या सबबीवर विलायतेस जाण्यापूर्वी कांहीं महिने त्यांची मुस्कुटदाबी करण्यांत आली होती. महायुद्धाच्या वेळीं वसाहतींपेक्षांहि इंग्लंडाला हिंदुस्थानानें लष्करी मदत अधिक केली आणि या मदतीचे उपकार स्मरून हिंदुस्थानास स्वराज्याचे हक्क अंशतः देण्यांत येत आहेत, असें सांगण्यांत येतें. पण वरील विधानाच्या खऱ्या अर्थाकडे टिळक नेहमीं राष्ट्रीय पक्षाचें लक्ष वेधीत असत. मजूर व लढवय्ये या नात्यानें दहा लाखांहून अधिक लोक हिंदुस्थानानें रणभूमीकडे पाठविले ही गोष्ट खरी आहे, पण हिंदुस्थानानें पाठविले म्हणजे काय? राष्ट्रीय भावनेनें लोक या उद्योगांत पडले, किंवा पोटापाण्यासाठीं जरी पडले असले तरी राष्ट्रीय भावनेचा व पोटापाण्याचा प्रश्न एकच होऊन बसल्यामुळें राष्ट्रीय भावनेनें तसली नोकरी पवित्र होते म्हणून लोक या धंद्यांत पडले, असें बिलकूल नाहीं. नोकरशाहीला असल्या संकटसमयीं दहा लाखापर्यंत मजूर व लढवय्ये मिळवितां आले, आणि परदेशी पाठवितां आले, असा या मदतीचा अर्थ आहे. नोकरशाहीनें राजसत्तेचें जें यंत्र हिंदुस्थानांत तयार केलें त्या यंत्राच्या जोरावर दहा

लाखांचें मनुष्यबळ आणि कित्येक अब्जांचें द्रव्यबल नोकरशाहीला इंग्लंडच्या मदतीला पाठवितां आलें. महायुद्धाचे दिवस म्हणजे नोकरशाहीच्या पद्धतीच्या परीक्षेचीच वेळ होती. सर क्लाड हिल यांनीं 'नाइन्टींथ सेंचरी' मध्यें लेख लिहून नोकरशाहीला वरील पराक्रमाबद्दल योग्य शाबासकी इंग्लंडांत मिळत नाहीं, म्हणून तक्रार केली आहे. या तक्रारीकडे पाहतां दहा लाखांच्या मनुष्यबलाच्या मदतीकडे नोकरशाही कोणत्या दृष्टीनें पाहते, हें कोणाच्याहि ध्यानांत येईल. रिक्रूटिंगसंबंधानें दिल्लींत लाटसाहेबांनीं जो दरबार भरविला होता त्या वेळच्या खाजगी चर्चेंतहि, लोकांच्या पुढाऱ्यांनीं खरी मदत केली नाहीं तरी, नोकरशाही आपल्या हातांतील यंत्र फिरवून जरूर तेवढें मनुष्यबल हिंदुस्थानांतून बाहेर खेंचून घेण्यास समर्थ आहे, अशी नोकर-शाहीच्यातर्फे कांहीं पुढाऱ्यांना समज देण्यांत आली होती. नोकरशाहीच्या हिंदी मनुष्यबलाचें मनगट जर दहा लाखांपर्यंत नोकरशाही फुगवूं शकते तर स्वराज्याचा अल्पस्वल्प तरी प्रारंभ कां करण्यांत आला, अशी साहजिक शंका या ठिकाणीं येणारी आहे. नोकरशाहीनें आपल्या नोकरींत ठेवलेलें मनुष्यबल महायुद्धाच्या वावटळींत सांपडलेलें होतें. त्या वावटळींतील स्वयंनिर्णयाचीं व स्वराज्याचीं तत्त्वें नोकरशाहीच्यान्न नोकरांच्या अंगाशीं एकसारखी लगट करून राहिलेलीं होतीं. ही संगत नोकरशाहीला तोडतां येईना, आणि नोकरशाहीच्यान्न अनुयायांना व नोकरांना घडलेल्या या अयाचित सत्संगतीच्याबद्दल नोकरशाहीला स्वराज्याच्या अल्प स्वल्प प्रारंभाला संमत्ति देणें भाग पडलें. पण ही संगत तोडण्यास महायुद्धानंतर नोकरशाही बिलकूल कमी करणार नाहीं, असा टिळकांचा अंदाज होता, आणि नोकरशाहीनें सुरू केलेल्या सांप्रतच्या दडपशाहीकडे पाहिलें म्हणजे टिळकांचा अंदाज किती खरा होता हें चटदिशीं लक्षांत येतें. राष्ट्रीय सैन्याच्या प्रश्नाकडे टिळक कोणत्या दृष्टीनें पहात

असत हें वर सांगितलेंच आहे. महायुद्धाचा प्रसंग निघून गेल्यानंतर आज मुसलमानी गड्डी व बोल्शेविक यांच्या पांच दहा वर्षांत केव्हांना केव्हां तरी होणाऱ्या हिंदुस्थानावरील स्वारीचा प्रश्न पुढें आलेला आहे. वाढता लष्करी खर्च व असल्या स्वारीच्या वेळीं हिंदुस्थानाचें करावयाचें संरक्षण या दोन बाबींमुळें राष्ट्रीय सैन्य पुन्हां उभारण्याची खटपट नोकरशाही लवकरच करणार आहे. राष्ट्रीय सैन्याच्या उभारणीच्या या चळवळीच्या वेळीं लोकांनीं कसें वागावें, म्हणून प्रश्न विचारला असतां टिळक महायुद्धाच्या वेळीं जसे वागले तसेंच टिळकांच्या अनुयायांनींहि आज वागावें असेंच उत्तर द्यावें लागतें. आर्थिक दृष्टीनें व राजकीय सत्तेच्या दृष्टीनें युरोपियनांशीं बरोबरीची भागी हिंदुस्थानास मिळाल्याशिवाय म्हणजे निदान वसाहतीच्या धर्तीचें स्वराज्य हिंदुस्थानास मिळाल्याशिवाय हिंदुस्थानानें राष्ट्रीय सैन्याच्या पंचायतींत पडूं नये, असेंच उत्तर टिळक आज जर जिवंत असते तर त्यांनीं दिलें असतें यांत संशय नाहीं. स्वराज्यावरोवर स्वराज्याचें संरक्षण करण्याची जवाबदारी लोकांवर येऊन पडते, हें तत्त्व टिळकांना कबूल होतें. पण स्वराज्य मिळण्याच्या अगोदरच हें ओझें उचलावयास धांवणें म्हणजे एक प्रकारचें लांगूलचालनच होय, असें ते म्हणत असत. स्वयंसेवकांच्या लष्कराच्या मनुष्यबलाची आवश्यकताच जर नोकरशाहीला वाटत नाहीं, तर तसलें मनुष्यबल उत्पन्न करा म्हणून नोकरशाहीच्या पाठीमागें तगादा लावणें म्हणजे नोकरशाहीची भलतीं आर्जवें करण्यासारखें होय. असल्या खुशामतीनें कार्य यशस्वी न होतां कार्यनाशच अधिक होतो. लोकांना स्वराज्याचे हक्क देणाऱ्या नोकरशाहींतील कांहीं उदारमतवादी पुढाऱ्यांचें असल्या खुशामतीमुळें नोकरशाहीपुढें चालेनासें होतें. आपण समर्थ आहों, आपण सशक्त आहों आणि आपणांस मनुष्यबलाची किंवा द्रव्यबलाची वाण पडणार नाहीं, ही नोकरशाहीची घमेंड असल्या खुशामतीनें अधिकाधिकच

लाखांचें मनुष्यबळ आणि कित्येक अब्जांचें द्रव्यबल नोकरशाहीला इंग्लंडच्या मदतीला पाठवितां आलें. महायुद्धाचे दिवस म्हणजे नोकरशाहीच्या पद्धतीच्या परीक्षेचीच वेळ होती. सर क्लाड हिल यांनीं 'नाइन्टींथ सेंचरी' मध्यें लेख लिहून नोकरशाहीला वरील पराक्रमाबद्दल योग्य शाबासकी इंग्लंडांत मिळत नाहीं, म्हणून तक्रार केली आहे. या तक्रारीकडे पाहतां दहा लाखांच्या मनुष्यबलाच्या मदतीकडे नोकरशाही कोणत्या दृष्टीनें पाहते, हें कोणाच्याहि ध्यानांत येईल. रिक्रूटिंगसंबंधानें दिल्लींत लाटसाहेबांनीं जो दरबार भरविला होता त्या वेळच्या खाजगी चर्चेंतहि, लोकांच्या पुढाऱ्यांनीं खरी मदत केली नाहीं तरी, नोकरशाही आपल्या हातांतील यंत्र फिरवून जरूर तेवढें मनुष्यबल हिंदुस्थानांतून बाहेर खेंचून घेण्यास समर्थ आहे, अशी नोकर-शाहीच्यातर्फे कांहीं पुढाऱ्यांना समज देण्यांत आली होती. नोकरशाहीच्या हिंदी मनुष्यबलाचें मनगट जर दहा लाखांपर्यंत नोकरशाही फुगवूं शकते तर स्वराज्याचा अल्पस्वल्प तरी प्रारंभ कां करण्यांत आला, अशी साहजिक शंका या ठिकाणीं येणारी आहे. नोकरशाहीनें आपल्या नोकरींत ठेवलेलें मनुष्यबल महायुद्धाच्या वावटळींत सांपडलेलें होतें. त्या वावटळींतील स्वयंनिर्णयाचीं व स्वराज्याचीं तत्त्वें नोकरशाहीच्याच्च नोकरांच्या अंगाशीं एकसारखी लगट करून राहिलेलीं होतीं. ही संगत नोकरशाहीला तोडतां येईना, आणि नोकरशाहीच्याच्च अनुयायांना व नोकरांना घडलेल्या या अयाचित सत्संगतीच्याबद्दल नोकरशाहीला स्वराज्याच्या अल्प स्वल्प प्रारंभाला संमत्ति देणें भाग पडलें. पण ही संगत तोडण्यास महायुद्धानंतर नोकरशाही बिलकूल कमी करणार नाहीं, असा टिळकांचा अंदाज होता, आणि नोकरशाहीनें सुरू केलेल्या सांप्रतच्या दडपशाहीकडे पाहिलें म्हणजे टिळकांचा अंदाज किती खरा होता हें चटदिशीं लक्षांत येतें. राष्ट्रीय सैन्याच्या शाश्वाकडे टिळक कोणत्या दृष्टीनें पहात

असत हें वर सांगितलेंच आहे. महायुद्धाचा प्रसंग निघून गेल्यानंतर आज मुसलमानी गड्डी व बोल्शेविक यांच्या पांच दहा वर्षांत केव्हांना केव्हां तरी होणाऱ्या हिंदुस्थानावरील स्वारीचा प्रश्न पुढें आलेला आहे. वाढता लष्करी खर्च व असल्या स्वारीच्या वेळीं हिंदुस्थानाचें करावयाचें संरक्षण या दोन बाबींमुळें राष्ट्रीय सैन्य पुन्हां उभारण्याची खटपट नोकरशाही लवकरच करणार आहे. राष्ट्रीय सैन्याच्या उभारणीच्या या चळवळीच्या वेळीं लोकांनीं कसें वागावें, म्हणून प्रश्न विचारला असतां टिळक महायुद्धाच्या वेळीं जसे वागले तसेंच टिळकांच्या अनुयायांनींहि आज वागावें असेंच उत्तर द्यावें लागतें. आर्थिक दृष्टीनें व राजकीय सत्तेच्या दृष्टीनें युरोपियनांशीं बरोबरीची भागी हिंदुस्थानास मिळाल्याशिवाय म्हणजे निदान वसाहतीच्या धर्तीचें स्वराज्य हिंदुस्थानास मिळाल्याशिवाय हिंदुस्थानानें राष्ट्रीय सैन्याच्या पंचायतींत पडूं नये, असेंच उत्तर टिळक आज जर जिवंत असते तर त्यांनीं दिलें असतें यांत संशय नाहीं. स्वराज्यावरोवर स्वराज्याचें संरक्षण करण्याची जवाबदारी लोकांवर येऊन पडते, हें तत्त्व टिळकांना कबूल होतें. पण स्वराज्य मिळण्याच्या अगोदरच हें ओझें उचलावयास धांवणें म्हणजे एक प्रकारचें लांगूलचालनच होय, असें ते म्हणत असत. स्वयंसेवकांच्या लष्कराच्या मनुष्यबलाची आवश्यकताच जर नोकरशाहीला वाटत नाहीं, तर तसलें मनुष्यबल उत्पन्न करा म्हणून नोकरशाहीच्या पाठीमागें तगादा लावणें म्हणजे नोकरशाहीची भलतीं आर्जवें करण्यासारखें होय. असल्या खुशामतीनें कार्य यशस्वी न होतां कार्यनाशच अधिक होतो. लोकांना स्वराज्याचे हक्क देणाऱ्या नोकरशाहींतील कांहीं उदारमतवादी पुढाऱ्यांचें असल्या खुशामतीमुळें नोकरशाहीपुढें चालेनासें होतें. आपण समर्थ आहों, आपण सशक्त आहों आणि आपणांस मनुष्यबलाची किंवा द्रव्यबलाची वाण पडणार नाहीं, ही नोकरशाहीची घमेंड असल्या खुशामतीनें अधिकाधिकच

वाढत जाऊन नोकरशाहीला स्वराज्यापासून पराङ्मुख करण्याचें पातक असल्या आर्जवांना लागतें. नोकरशाही पूर्ण स्वराज्यहि देत नाहीं, अर्थिक स्वातंत्र्यहि देत नाहीं, आमि लष्करी सेवेच्या मार्फत मनुष्यबळ सतेज करण्याचा मार्गहि खुला करीत नाहीं; अशा वेळीं हापापल्यासारखें लोकांनीं स्वराज्याच्या अल्पस्वल्प तुकडयावर संतुष्ट होऊन राष्ट्रीय सैन्याकरितां नोकरशाहीची खुशामत कां करूं नये ? या प्रश्नास टिळकांचें असें उत्तर होतें कीं, पूर्ण स्वराज्य संपादन करतांना स्वावलंबनाचा जसा मार्ग स्वीकारीत आहां तसाच आर्थिक बाबींतहि आणि राष्ट्रीय सैन्याच्या बाबींतहि स्वावलंबनाचाच मार्ग लोकांनीं स्वीकारल्याशिवाय हिंदुस्थानचें खरें कल्याण कधींहि होणार नाहीं. संपूर्ण स्वराज्याच्या दृष्टीनें स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारणें म्हणजे महात्मा गांधी यांच्या असहकारितेच्या चळवळींत पडणें होय; आर्थिक स्वातंत्र्याच्या दृष्टीनें स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारणें म्हणजे स्वदेशी व बहिष्कार या चळवळींत पडणें होय; आणि राष्ट्रीय सैन्याच्या दृष्टीनें स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारणें म्हणजे राजकीय चळवळ करीत असतांना जाणून बुजून तुरुंगाचा रस्ता धरून नोकरशाही देईल तितकी शिक्षा भोगण्याची मनाची तयारी ठेवणें होय. या सर्व स्वावलंबनाच्या निरनिराळ्या मार्गांत कमी जास्ती प्रमाणानें आत्मछेद सोसावयास लावणाऱ्या वीरवृत्तीची जरूरी असते. ही वीरवृत्ति महाराष्ट्रांत जागृत करण्याकरितां टिळकांचा गीतारहस्यासारखा ग्रंथ कसा उपयोगी पडणारा आहे हें वाचकांना पुढील अंकांत सांगून स्वदेशी व बहिष्कार यांच्या संबंधानें महात्मा गांधी यांच्या मताशीं टिळकांचीं मतें कशीं तंतोतंत जुळतात हें रविवारच्या व सोमवारच्या लेखांत वाचकांपुढें मांडून आम्ही लेखमाला संपविणार आहों.

———

* टिळक आणि गीतारहस्य

टिळकांच्या आयुष्यांतील सर्वांत मोठी कामगिरी म्हणजे त्यांनीं लिहिलेला गीतारहस्य ग्रंथ होय. शंभर शंभर दोन दोनशें वर्षांनीं राष्ट्राच्या आयुष्यांत असला एखादा ग्रंथ सुदैवानें दृष्टीस पडत असतो. ज्ञानेश्वरीनंतर कित्येक शतकांनीं गीतारहस्यासारखा ग्रंथ मराठी भाषेमध्यें उत्पन्न झाला असून मराठीच्या संस्कृतीवर ज्ञानेश्वरीचे जे उपकार झाले आहेत, तितकेच किंवा त्याहून अधिक उपकार टिळकांच्या गीतारहस्याचें महाराष्ट्रावरच केवळ नव्हे तर सर्व हिंदुस्थानावर यापुढें व्हावयाचे आहेत. शें दीडशें वर्षांनीं टिळकांच्या स्वराज्याच्या उद्योगाबद्दल लोकांना आठवण करून द्यावी लागेल. राष्टीय शिक्षण, स्वदेशी, गोरक्षण, शिवाजी महोत्सव, गणपति महोत्सव, पंचांग संशोधन, केसरीवरील खटले वगैरे टिळकांच्या आयुष्यांतील ठळक ठळक चळवळी लोकांच्या आठवणींतून नाहींशा होण्याची वेळ आली तरी, आणि हिंदुस्थान देश संपूर्ण वैभवाच्या शिखरावर चढून आजच्या अवनतीच्या दिवसांची पुढील पिढ्यांना आठवणहि नाहींशी झाली तरी गीतारहस्याचें पाठांतर हिंदुस्थानांत एकसारखें सुरू राहील. शारीरिक गोष्टी ज्याच्या त्याच्या आयुष्यानंतर आपोआप कालवश होत जातात. सर्व शरीरांना हा मृत्यु कायमचा आहे. शरीर गेल्यानंतर शरीराला धरून असणाऱ्या गोष्टी व चळवळी २।४ पिढ्यांच्या पलीकडे फारशा टिकत नाहींत. सामान्य संसारी लोक शारीरिक मृत्यूनंतर २।४ पिढ्या तरी पुत्रपौत्रांच्या स्वरूपानें, घरादारांच्या रूपानें किंवा एखाद्या देवालयाच्या किंवा सार्वजनिक इमारतीच्या उभारणीनें जगण्याची धडपड करीत असतात. असली धडपड

---

* लोकमान्य, ता. ३० जुलई १९२१

करणें हा मनुष्याच्या रक्ताचा स्वभाव आहे. या स्वभावाला अनुसरून घराण्यांची व समाजाची रचना करण्यांत येत असते. या लौकिक मार्गाच्या पलीकडच्या कोटींतले जे लोक असतात त्यांना अलौकिक पुरुष असें म्हणतात. टिळक अलौकिक पुरुष होते हें गीतारहस्यानें सर्वांच्या निदर्शनास आणून दिलेलें आहे. बालवयांतच वडील आजारी असतांना गीतेचा पाठ त्यांना करावा लागला. आजारी मनुष्याला मृत्यूच्या भयापासून सोडविणारी आणि मृत्युसमयीं वाटत असलेल्या विवंचनेंतून मुक्त करणारी गीता आहे, असा संस्कार टिळकांच्या मनावर बालपणींच झाला. त्यानंतर भक्तिभावानें गीतेचें पठण करण्याची पद्धत टिळकांनीं एकसारखी ठेवली होती. गीता-रहस्य लिहून झाल्यावर अंतःकरणास विशेष त्रास झाला असतां गीतेतील श्लोक वाचण्याचा किंवा त्या श्लोकाच्या अर्थाचें मनन करीत पडण्याचा आपला परिपाठ त्यांनीं सोडलेला नव्हता. कॉलेजांत असतांना गीतेच्या पाठामुळेंच स्वार्थत्याग करून शिक्षणकार्याला स्वतःला वाहून घेण्याची प्रेरणा टिळकांच्या मनांत आपोआप उद्भवली. अध्ययन व अध्यापन या दोन कार्यांस स्वतःस वाहून घेत असतांना तंटयाबखेडयांत प्रमुखपणानें पडण्याची वेळ येणार नाहीं असें टिळकांना वाटत होतें. त्यांचा स्वभावहि अध्ययनांत गढून राहण्याला अनुकूल असाच होता. पण अर्जुनाला स्वकीयांवरहि बाण सोडावयास लावणारी गीता टिळकांना अशा रीतीनें स्वतःच्याच घरकुल्यांत स्वतःस कोंडून घेतल्यासारखें स्वस्थ कशी बसूं देईल? स्वतःच्या मनाशींच झुंजण्यास कॉलेजांत असतांनाच गीतेनें टिळकांना बळ दिलें. कॉलेजांतून बाहेर पडून स्वतः निर्माण केलेल्या झोपडींत स्वतःस टिळकांनीं कोंडून घेतलें असतां, किंवा एकांतवासांत संन्यासवृत्तीकडे ते वहातं गेले असतां त्या ठिकाणींहि गीतेनें स्वस्थ बसूं दिलें नाहीं. स्वकीयांशीं झगडा करण्यास गीतेनें न्यू

इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेज येथें असतांना टिळकांना प्रवृत्त केलें. हा झगडा चालू असतांना अर्जुनाच्या विषादयोगासारखाच विषाद टिळकांच्या मनामध्यें उत्पन्न झाला होता, आणि केवळ भगवद्गीतेच्या जोरावर स्वकीयांशीं झगडण्यास त्यांनीं सुरवात केली. न्यू इंग्लिश स्कूल किंवा फर्ग्युसन कॉलेज यांच्याहूनहि अधिक महत्त्वाच्या गोष्टी महाराष्ट्रांत व हिंदुस्थानांत आहेत आणि त्या महत्त्वाच्या गोष्टींच्या दृष्टीनें न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेज येथील आपल्या सोबत्यांशींच झगडणें जरुरीचें आहे, असें गीतेच्या पठणामुळें टिळकांच्या ध्यानीं येऊन, कर्मण्येवाऽधिकारस्ते मा फलेषु कदाचन । मा कर्मफलहेतुर्भूं मा ते संगोऽस्त्वकर्मणि ' या गीताशास्त्राच्या चतुःसूत्रीवर त्यांचें मन कायमचेंच वसलें. आपत्तीशीं झगडणें आणि त्या झगडण्यांतील यशाचें फल स्वतःच्या शारीरिक व सांसारिक सुखाकडे खर्च न करतां दुसऱ्या आपत्तीशीं झगडण्याच्या तयारींत खर्च करून टाकणें, ही टिळकांच्या सार्वजनिक चरित्रांतील मुख्य गुरुकिल्ली आहे. न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेज येथें मिळविलेलें यश त्यांनीं स्वतःच्या सांसारिक सुखाकडे बिलकुल खर्च केलें नाहीं. श्रीशिवाजी महोत्सव, श्रीगणपति महोत्सव, कायदे-कौन्सिलची चळवळ, आणि प्लेगाच्या वेळचा झगडा या सर्व बाबींत तें पुण्य गीताशास्त्राला अनुसरून भगवद्गीतेनें त्यांच्याकडून खर्च करविलें; आणि १८९७ साली च्या खटल्याच्या वेळीं सोसावयास लागणाऱ्या आपत्तीला गीतापठणानें त्यांना लायक केलें. या आपत्तींतूनहि ते यशस्वी रीतीनें पार पडले असतांना ताईमहाराजांच्या खटल्याची आपत्ति त्यांच्यामागें लागली. ही खाजगी खटल्याची आपत्ति त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या दिवसांपर्यंत त्यांच्या मागोंवती एकसारखी चिरटया घालीत उभी होती; आणि या आपत्तींतील हायकोर्टापुढील दाव्याचा शेवटचा हुवा ज्या वेळीं संपला, त्याचवेळीं टिळकांच्या शरीराचें पोषण करणाऱ्या बलाचा शेवटहि झाला, असें म्हणण्यास

हरकत नाहीं. आयुष्यांतील कर्तृत्वाच्या शेवटच्या वीस वर्षांत ताईंमहाराजांच्या खटल्याची विवंचना टिळकांच्या मागें नव्हती असें केव्हांहि झालें नाहीं. ही सर्व विवंचना संभाळून याच वीस वर्षांत टिळकांनीं हिंदुस्थानला स्वराज्याचा मार्ग दाखवून दिला, आणि स्वराज्याचे मुख्य प्रवर्तक म्हणून मोठें यश संपादन केलें. अशा रीतीनें चारी बाजूंनीं गराडा पडला असतां चारीहि तोंडांवर एकसारखें झगडत राहण्याची शक्ति भगवद्गीतेच्या पठणामुळें टिळकांच्या अंगीं उत्पन्न झाली. भगवद्गीतेचे ते भक्त होते; ही गीताच मला तारील, असा त्यांचा दृढ विश्वास होता; आणि या भक्तिभावाच्या जोरावरच त्यांनीं आपलें आयुष्य पूर्णपणें यशस्वी करून सोडलें. 'न मे भक्तः प्रणश्यति' या भगवद्वचनावर त्यांचा पूर्ण विश्वास असल्यामुळें हरएक प्रसंगांतून पार पडून जाऊं व शेवटीं यशच मिळवूं, असें त्यांना वाटत होतें आणि अखेर तसें घडलेंहि! ताईंमहाराजांच्या खटल्यासारख्या अर्धवट खाजगी आपत्तीच्या अखेरचा टिळकांच्या तर्फेंचा निकाल मागाहूनच्या लहान सहान तक्रारींसकट टिळकांच्या हयातींतच झाला. सार्वजनिक कामांत तर स्वराज्याच्या शिरोमणीच्या पदवीला टिळक आयुष्याच्या अखेरीस सर्व अडथळे दूर होऊन आपोआप चढले. संसारासंबंधाच्या किंवा खाजगी स्वरूपाच्या आपत्तींशीं झगडतांना उत्तम प्रकारचें बळ भगवद्गीतेनें टिळकांना दिलें आणि अखेर यशहि गीतेनेंच त्यांच्या पदरांत टाकलें. सार्वजनिक किंवा ऐहिक अभ्युदयाच्या दृष्टीनें विचार केला असतां, संपूर्ण स्वराज्याच्या वैभवाचा शास्ता या दृष्टीचा अभ्युदय कोणाच्याच नशिबीं लिहिला जाण्याचा सांप्रतचा हिंदुस्थानचा काळ नसल्यामुळें, भगवद्गीतेनें स्वराज्याचा आद्य प्रवर्तक या पदवीला टिळकांना नेऊन चढविलें आणि स्वराज्याचें मानसिक व बौद्धिक यश टिळकांच्या हयातींतच टिळकांच्या पदरीं गीतेनें टाकलें! या दोन यशाहूनहि पारमार्थिक

दृष्टीचें अत्यंत मोठें कल्याण भगवद्गीतेंच्या भक्तीनें टिळकांचे केलेलें आहे. ताईमहाराजांचा खटला आणि बंगभंगाच्या वेळची राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी, बहिष्कार व स्वराज्य, या चतुःसूत्रीची चळवळ चालली असतांना भक्ति-पुरःसर ह्या भगवद्गीतेचें मनन व पठण टिळक एकसारखे करीत असत, आणि ज्या भगवद्गीतेच्या अंतर्यामांत भक्तीच्या जोरावर पाहिजे तसे घुसून पाहिजे तितकें मानसिक व बौद्धिक बल स्वतःच्या लढ्याकरितां भराभर बाहेर आणीत असत, ती भगवद्गीता आपणास तेवढी कां उपयोगी पडावी आणि आपणाप्रमाणें सर्व महाराष्ट्राला किंबहुना सर्व हिंदुस्थानाला या भगवद्गीतेचा उपयोग कां होऊं नये, अशा तऱ्हेचा विचार टिळकांच्या विश्वकुटुंबी मनांत नेहमीं खेळत राहात असे. ज्ञानेश्वर एक का दोन यासंबंधाचा वादविवाद त्या वेळीं वर्तमानपत्रांतून चालला होता आणि महाराष्ट्रांतील भक्तिपंथाच्या पुढाऱ्यांची व विशेषतः कै. भिंगारकरबुवा यांची व टिळकांची भगवद्गीता व ज्ञानेश्वरी यांच्यासंबंधानें नेहमीं संभाषणें होत असत. मनुष्याचें पारमार्थिक कल्याण करून ऐहिक अभ्युदयासंबंधाचे योग्य विचार व्यक्तीपुढें व समाजापुढें ठेवण्यास महाभारत व भगवद्गीता हे दोन ग्रंथ अत्यंत तत्पर असतांना आणि खुद्द टिळकांना पावलोपावलीं तसा अनुभव येत असतांना, या दोन्ही ग्रंथांचा अभिमान बाळगणाऱ्या आजच्या हिंदुस्थानची ऐहिक अभ्युदयासंबंधानें दिशाभूल कां व्हावी? तसेंच पारमार्थिक कल्याण आणि अभ्युदय यांचा जणूंकाय संबंध नाहीं, अशा तटस्थवृत्तीनें महाभारत व गीता यांजकडे पाहून, संसारांतील किंवा सार्वजनिक कामांतील झगडयांशीं तोंड देतांना कच खाल्ल्यासारखें होऊन डळमळीत व लेच्यापेच्या पावलानें हिंदुस्थानानें कां चालावें? याबद्दलचें कोडें टिळकांच्यापुढें येऊन पडलें होतें. भक्तिमार्ग व अद्वैत सिद्धांत यांचा मेळ बसत नाहीं असा सर्वांचा समज असल्यामुळें

आणि अद्वैत सिद्धांताचा स्वीकार करणारांनीं संन्यासमार्गाचाच अवलंब केला पाहिजे अशी अनेक कारणांनीं समजूत झाल्यामुळें, महाभारत व भगवद्गीता हिंदुस्थानावर ज्या मनुष्यबलाचा, द्रव्यबलाचा व बुद्धिबलाचा वर्षाव करूं इच्छित आहेत त्या सर्व बलांना हिंदुस्थान आज मुकलें आहे, असें टिळकांच्या ध्यानीं तेव्हांच आलें. टिळक स्वतः भगवद्गीतेचे भक्त होते आणि त्यामुळें महाराष्ट्रांतील भक्तिपंथाविषयीं त्यांच्या मनांत अत्यंत प्रेम होतें. ते स्वतः एकतत्त्वेनें भक्तिपंथांतलेच असल्यामुळें अद्वैत सिद्धांताचा व भक्तिपंथांचा बिलकूल विरोध नाहीं, असें त्यांच्या भक्तिपूर्ण अंतःकरणाला आणि अद्वैत सिद्धांतामध्यें गढून गेलेल्या सूक्ष्म बुद्धीला पूर्णपणें अनुभवास आलें. अद्वैत सिद्धांताची उभारणी ज्या विचारसरणीवर केलेली आहे ती विचारसरणी टिळकांच्या सूक्ष्म बुद्धीनें आकलन केल्यावरहि स्वकीयांशीं, आप्तइष्टांशीं व बाहेरच्या सर्व अडथळ्यांशीं झगडण्याची स्फूर्ति व बल टिळकांना भगवद्गीतेनें दिल्यामुळें, संसारांत व सार्वजनिक कामांत झगड-ल्यानें पारमार्थिक हिताला बाध येत नाहीं, इतकेंच नव्हे तर हा प्रवृत्तीचा मार्ग अधिक श्रेयस्कर आहे, असेंच भगवद्गीतेनें टिळकांच्या निदर्शनास आणून दिलें. भगवद्गीतेची ही शिकवणूक अंतःकरणांत पूर्ण बिंबल्यामुळें १९०८ सालच्या खटल्याच्या वेळीं स्थितप्रज्ञाच्या वर्तनासारखें वर्तन त्यांच्या हातून सहज घडून गेलें. असल्या मोठ्या पदवीला चढल्यावर मंडालेच्या तुरुंगांत सहा वर्षांची शिक्षा भोगीत असतांना भगवद्गीतेच्या भक्तीच्या आनंदांत त्यांनीं दिवस घालविण्यास सुरवात केली. भगवद्गीतेच्या सेवेंत अशा रीतीनें टिळक गुंग असतांना 'आपणासारिखे करिती तात्काळ' या न्यायानें, किंवा तसला भक्त हाणजे मीच आहें 'अहमेव सः' या भगवद्व-चनाला अनुसरून भगवद्गीतेनें टिळकांना गीता बनविलें आणि त्यांच्या ऐहिक व पारमार्थिक कल्याणाची पराकाष्ठा करून सोडली. भगवद्गीतेच्या

भक्तीमुळें टिळक अखेरीस स्वतः भगवद्गीता झाल्यावर टिळकांनीं गीतारहस्य हा ग्रंथ लिहिला आहे. अर्जुनाचा पराक्रम उद्दीप्त करण्यास आणि अखेरचें यश अर्जुनाच्या पदरांत टाकण्यास जशी गीता कारणीभूत झाली, त्याप्रमाणें स्वराज्याचे आद्यप्रवर्तक टिळक स्वतः गीता होऊन स्वराज्यवाद्यांचा पराक्रम उद्दीप्त करण्यास व स्वराज्यवाद्यांच्या पदरांत अखेरीस यश टाकण्यास कारणीभूत व्हावयाचें निश्चित ठरलेलें असल्यामुळें गीतारहस्य हा ग्रंथ महाराष्ट्रापुढें व हिंदुस्थानापुढें अवतीर्ण झालेला आहे! हिंदुस्थानचा अभ्युदय व्यवस्थित रीतीनें व्हावयाचा असल्यास आमच्या सर्व चळवळीच्या मागें अत्यंत श्रेष्ठ अशा तत्त्वज्ञानाचा जोर असला पाहिजे, असें गेलीं वीस पंचवीस वर्षें परकी लोक हिंदुस्थानास सांगत आले आहेत. जगांतील अत्यंत श्रेष्ठ असें तत्त्वज्ञान हिंदुस्थानाच्या मागें कायमचें उभें आहे, पण त्या तत्त्वज्ञानाच्या जोराचा व आमच्या चळवळीचा सांधा मात्र इतक्या दिवस जोडला गेला नव्हता. तो सांधा जोडण्याचें काम टिळकांनीं केलेलें असल्यामुळें आमची स्वराज्याची चळवळ परमेश्वरी कृपेच्या दृष्टीनेंहि आतां अगदीं निर्धास्त झाली आहे.

बडोदा ग्रंथ संग्रहालय, बडोदे. स्थलांक
अनुक्रम ६९६५ दि: ..१९.८.६८
क्लांक २३०२ दो: दि: २५.१२

* टिळक आणि बहिष्कार

आज ता. १ आगस्ट रोजीं विदेशी कापडावरील बहिष्काराच्या तपश्चर्येस, टिळकांचें वर्षश्राद्ध म्हणून सर्व हिंदुस्थान ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या आज्ञेनें सुरवात करीत आहे. काल सायंकाळीं मुंबईस एल्फिन्स्टन मिलच्या जवळील मैदानांत महात्मा गांधी यांच्या अध्यक्षतेखालीं आणि प्रमुख राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या अनुज्ञेनें विदेशी कापडाची होळी करण्यांत आली. अग्निनारायणाला समर्पण केलेल्या या आहुतीनें राष्ट्राची औद्योगिक पापें भस्म होऊन पवित्र अंतःकरणानें व पवित्र बुद्धीनें स्वदेशी व बहिष्कार या योगांचें व्रत सर्व हिंदुस्थान आज घेत आहे. टिळकांच्या पुण्यस्मरणार्थ हें व्रत घेण्यांत येत असल्यामुळें टिळकांची सर्व पुण्याई आणि टिळकांनीं प्रसन्न करून घेतलेली भगवद्गीता या व्रताच्या मागें उभी राहून, हरएक संकटापासून व्रतस्थांचें संरक्षण करण्याकरितां श्रीकृष्णाचें सुदर्शन चक्र या व्रताच्या सभोंवतीं फिरवीत राहील यांत संशय नाहीं. स्वदेशी व बहिष्कार या चळवळीइतकी दुसरी कोणतीहि चळवळ टिळकांना प्रिय नव्हती. महात्मा गांधी यांनीं स्वराज्य फंडाला टिळकांचें नांव दिलें, आणि स्वतःची सर्व पुण्याई खर्च करून एक कोट रुपये टिळक स्वराज्य फंडास जमवून राष्ट्रीय सभेच्या राजकीय इतिहासांत टिळकांचें नांव अजरामर करून सोडलें. महाराष्ट्रावर व टिळकांच्या सर्व अनुयायांवर महात्माजींचे हे अगणित उपकार झाले असत, आणि त्याबद्दल सर्व महाराष्ट्र आज महात्माजींचे गुणानुवाद गात आहे. स्मारकाच्या दृष्टीनें टिळकांच्या ऋणांतून हिंदुस्थानास महात्माजींनीं मुक्त केलें आहे. आजपर्यंत दुसऱ्या कोणत्याहि पुढाऱ्यांचें

---

* लोकमान्य, १ ऑगस्ट १९२१

एवढें मोठें सार्वजनिक स्मारक त्याच्या वर्षश्राद्धापूर्वी झालेलें हिंदुस्थानच्या इतिहासांत नमूद नाहीं. महात्माजींनीं कोट रुपये गोळा करून टिळकांच्या नांवानें एक चमत्कारच करून दाखविला हें खरें आहे. या स्मारकाहूनहि टिळकांना अधिक प्रिय असलेली अशी बहिष्काराची चळवळ जोरानें सुरू करण्यास आज महात्माजी प्रवृत्त झाले असल्यामुळें, आणि २।३ महिन्यांच्या अवधींतच ही चळवळ पूर्णतेस नेण्याचा त्यांनीं निश्चय केलेला असल्यामुळें, टिळकांच्या मागें असलेल्या महाराष्ट्रांतील सर्व साधुसंतांच्या व थोर विभूतींच्या तपश्चर्येचें बल महात्माजींच्या चळवळींत आज स्वयंस्फूर्तीनें संचार केल्यावांचून राहणार नाहीं. हिंदुस्थानच्या पूर्वीच्या सर्व पुण्याईची पुढील दोन तीन महिन्यांत हिंदुस्थानाला अत्यंत जरूर आहे. स्वदेशी आणि बहिष्कार या जोडीचें व्रत दिसावयाला सोपें आहे; पण आचरणास फार कठीण आहे. संकटें या मार्गांत अतिशय आहेत. बहिष्कार म्हणजे द्वेषाचें माहेरघर होय, असें सांगून कित्येक हिंदी बुद्धिमंतांना या चळवळीपासून पराङ्मुख करण्यांत येईल. प्रतिस्पर्ध्याचा हा पहिला धांगडधिंगा टाळण्याकरितां परदेशी कापडावरील बहिष्कार म्हणजे द्वेषाची प्रवृत्ति नव्हे हें प्रत्येक व्रतस्थानें या वेळीं पूर्णपणें ध्यानांत ठेवलें पाहिजे. परदेशी कापड आपण जाळतों, आपण दुसऱ्यास देऊन टाकतों किंवा वापरण्याचें टाळतों, तें दुसऱ्याचा द्वेष करण्याच्या बुद्धीनें मिळकूल नव्हे. महात्मा गांधी यांच्याप्रमाणेंच टिळकांनीं इंग्रजांचा द्वेष कधींहि केला नाहीं. टिळक नेहमीं साश्चर्य इंग्रजी साम्राज्याकडे पहात होते, आणि एवढें मोठें साम्राज्य पृथ्वीतलावर स्थापणारांच्या अंगीं तसेच विशेष गुण असले पाहिजेत हें त्यांना पूर्णपणें मान्य होतें. फ्रान्सच्याप्रमाणें इंग्लंडची बादशाही दिलदार स्वरूपाची नाहीं. जर्मनीची शास्त्रीय बुद्धिमत्ताहि इंग्रजांच्या अंगीं नाहीं. क्लेश सोसण्याची रशियाची पराकाष्ठाहि इंग्लंडांत दिसत नाहीं. या तीनहि राष्ट्रांशीं तुलना करतां इंग्लंड

एक दृष्टीनें भाग्यवान होय, असेंच म्हणावें लागतें. वरील तीन राष्ट्रांत जो एक एक दैदिप्यमान गुण दिसून येतो तसला दैदिप्यमान गुण इंग्रजांच्या अंगीं बिलकूल नसतांहि वैभवाच्या शिखरावर मात्र हे चढलेले आहेत, असें दृष्टीस पडतें. तेव्हां इंग्रज दैववान आहेत असें कां म्हणूं नये? टिळक इंग्रजांच्या वैभवाकडे साश्चर्य पहात होते हें खरें; पण दैदिप्यमान व एक-सारख्या झळकणाऱ्या गुणांशिवाय इतक्या वैभवास इंग्लंड कसें चढलें याचा विचार करतांना टिळकांच्या ध्यानीं असें आलें होतें कीं, इंग्रजांच्या अंगाचा चिकाटीचा गुण त्यांच्या वैभवाचें मुख्य कारण होय. चिकाटीचा गुण झळकणारा नाहीं, किंवा तडाकाफडकीचाहि नाहीं. हातीं आलेला फायदा पकडून बसण्याचा धीमेपणा लोकांच्या डोळ्यांना झुलवीत जरी नसला तरी एकंदरीनें मनुष्यास चिकाटी अधिक कल्याणप्रद होते. इंग्रजी वैभवाची गुरुकिल्ली या चिकाटींत आहे. या चिकाटीच्या गुणाचें पूर्ण स्वरूप महा-युद्धाच्या वेळीं जसजसें टिळकांच्या लक्षांत येऊं लागलें तसतसें हिंदुस्थानाला स्वराज्याकरितां सोसाव्या लागणाऱ्या क्लेशांची कल्पनाहि सांगोपांग त्यांच्या-पुढें उभी राहात गेली. नोकरशाही अमक्या प्रसंगीं अमक्या तऱ्हेनें वागेल असा एक अंदाज टिळकांनीं करावा आणि त्याच प्रसंगासंबंधानें भलताच अंदाज इतर पुढाऱ्यांनीं करावा, व शेवटीं टिळकांचा अंदाज खरा ठरावा असें कित्येक वेळीं स्वराज्याच्या चळवळीच्या वेळीं अनुभवास आलेलें आहे. नोकरशाही चिकाटी सोडणार नाहीं या दृष्टीनें नोकरशाहीचीं पावलें पुढें कशीं पडतील याचा विचार टिळक नेहमीं करीत असत. नोकरशाहीला थकवा येईल, नोकरशाही बादशाही दिलदारपणानें वागेल, नोकशाही स्वतःच घालून दिलेल्या सिद्धांतांच्या वळणानें वहात जाऊन अखेरीस न्याय देईल, अशा प्रकारची भावना टिळकांच्या अन्तःकरणाला कधीहि शिवली नाहीं. आपल्या हातांत आलेला फायदा आपल्या हातांतच कायमचा ठेवणारा

चिकाटीचा गुण नोकरशाहीला जसा नाचवील तशी ती नाचेल, अशी टिळकांच्या मनाची बालंबाल खात्री झाली होती; आणि या चिकाटीच्या गुणाला प्रत्युत्तर जर द्यावयाचें असेल तर हिंदुस्थानचें राष्ट्रहि चिकाटीचे झालें पाहिजे, अशी टिळकांची कायमच्या ठशाची शिकवणूक होती. स्वदेशीचें व बहिष्काराचें व्रत चिकाटीशिवाय जर पाळलें गेलें तर नोकरशाही बिलकूल हार जाणार नाहीं. नोकरशाही सतराशें ठिकाणीं हल्लींच्या कायद्यांना मुरडून बगलेंत मारील, अठराशें नवीन नवीन युक्त्या उपयोगांत आणील, आणि चौसष्ट कलांवरतीहि पासस्टावी कला लोकांपुढें नाचवून आपला फायदा आपल्या हातांतच ठेवील! चिकाटी पापपुण्य पहात नाहीं; उपकार किंवा परोपकार याची जाणीव चिकाटीला नाहीं; औदार्य चिकाटीला माहीत नाहीं; सर्व जगाच्या हंसण्याची पर्वा ती करीत नसते; आणि निर्लज्जपणाला खालीं मान घालावयास लावते. असल्या चिकाटीशीं स्वदेशी व बहिष्कार या जोडीला झुंजावयाचें आहे. स्वार्थत्याग व आत्मक्लेश यांची अखंड सांखळी राष्ट्रीय पक्षाच्या प्रत्येक व्यक्तीनें एकसारखी निर्माण केल्याशिवाय स्वराज्याचा दरवाजा स्वदेशी व बहिष्कार या चळवळीनें उघडला जाणार नाहीं. स्वदेशावरील प्रेमामुळें, आणि औद्योगिक झगडयांत क्रोडो लोकांची हिंदुस्थानांत आज जी उपासमार होत आहे त्या उपासमारीचा विचार करून होणाऱ्या दयार्द्र अंतःकरणानें, जर प्रत्येक देशभक्त या चळवळींत पडला तरच त्याच्या हातून रोजच्या रोज सोसावयास लागणाऱ्या हालअपेष्टा सोसल्या जातील. हालअपेष्टा सोसण्याची ताकद प्रेमाच्या अंगीं असते; द्वेषाच्या अंगीं नसते. नोकरशाहीच्या दुर्गुणांचा विचार आपण करण्याचें कारणहि नाहीं. दुसऱ्याच्या दुर्गुणांच्या विचारानें आपण आपलें मन तरी कां बाटवावें? स्वदेशावरील पवित्र प्रेमानें या चळवळींत आपण उडी टाकली पाहिजे. ही चळवळ जसजशी जोरावर येईल तसतशी दडपशाहीहि

जोरावर येईल. नामांकित पुढाऱ्यांच्या बंदिवासामुळें त्यांच्या सद्गुणांचें संकीर्तन चोहोंकडे होईल, पण लहानसहान लाखों व्यक्तींवर नोकरशाही जो वरवंटा फिरवील त्या वरवंट्याखालीं चिरडल्या जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचें नामसंकीर्तन कोण करणार? अंधारांतच ती व्यक्ति जन्माला आली, अंधारांतच त्या व्यक्तीनें स्वदेशावर प्रेम केलें, अंधारांतच त्या व्यक्तीनें स्वार्थत्याग केला, आणि देशाच्या अभ्युदयाची वार्ता कानीं पडण्यापूर्वीच अंधारांतच ती व्यक्ति इहलोक सोडून निघून गेली! स्वदेशी आणि बहिष्कार या चळ. वळींत वरील प्रकारचें जन्मवृत्त लाखों लोकांचें झाल्याशिवाय हिंदुस्थान संपूर्ण स्वराज्याच्या वैभवास चढणार नाहीं. कोठें विकसलें, कोठें सुगंध पसरविला आणि कोठें नोकरशाहीनें चुरडून टाकलें, याविषयीं ज्यांचा पत्ताहि लागणार नाहीं, अशीं हजारों सुमनें नोकरशाहीच्या चिकाटीला बळी द्यावीं लागतील. असला आत्मयज्ञ कोणत्याहि राष्ट्राला अत्यंत कठीण जातो. पण हा अंधारांतील आत्मयज्ञ परमेश्वराच्या नजरेस पडल्यावांचून केव्हांहि रहात नाहीं. कारण अंधारांत पाहण्याची शक्ति त्याला एकट्यालाच असते. उजेडांतल्या गोष्टींकडे क्षीरसागरांत डुलकी घेत पडल्यामुळें एखादे वेळेला काना डोळा करतो; पण अंधाराच्या वेळीं परमेश्वर अत्यंत जागा असतो. परमेश्वरावर, पुढाऱ्यावर आणि अंगीकृत कार्यावर पूर्ण निष्ठा असल्याशिवाय, कोणी पाहिला नाहीं, कोणी ओळखला नाहीं, कोणी जाणिला नाहीं, किंवा कोणी उच्चारहि केला नाहीं, अशा तऱ्हेचा स्वार्थत्याग देशभक्तांच्या हातून होऊं शकत नाहीं. नोकरशाहीच्या चिकाटीशीं झुंजावयाचें असल्यामुळें वरील तऱ्हेच्या भक्तिभावानें केलेल्या व फलाविषयीं आसक्ति सोडलेल्या स्वार्थत्यागी चिकाटीचीच हिंदुस्थानास आज जरूर आहे. टिळकांचें चरित्र म्हणजे असल्या चिकाटीचें चरित्र होय. भगवद्गीतेनें वरील भक्तीमुळें फलाची आसक्ति सोडून निष्काम बुद्धीनें

कर्मे करण्याचें कौशल्य टिळकांच्या अंगीं दिसून आलें. निष्काम वृत्तीनें कोणतेंहि मत कोणताहि मनुष्य आचरूं लागला म्हणजे अल्प तपश्चर्या होत्नून घडली तरी नोकरशाहीसारख्या प्रचंड शक्तीच्या चिकाटीशीं टक्कर देणारी चिकाटी दुबळ्या दिसणाऱ्या हातापायांतहि उत्पन्न होते. अशी साक्ष टिळकांचें चरित्र हिंदी लोकांना आज पटवीत आहे. महात्मा गांधी यांचें दुबळें शरीर ही ह्या चिकाटीची प्रत्यक्ष मूर्ति आहे. टिळकांच्या चरित्रांतील चिकाटी आठवा; आणि महात्मा गांधींच्या चिकाटीवर विश्वास ठेवून परदेशी कापडावर बहिष्कार घालण्याच्या शपथा, आज टिळकांच्या श्राद्धाच्या दिवशीं स्वदेशावरील प्रेमानें घ्या म्हणजे नोकरशाहीच्या चिकाटी-मुळें कितीहि हालअपेष्टा सोसाव्या लागल्या तरी आत्मक्लेशांतच बुद्धीच्या प्रसन्नतेचा आनंद उत्पन्न होऊन नोकरशाहीच्या चिकाटीला तुम्हीं पुरून उराल आणि स्वराज्याच्या संस्थापकांच्या यशाची भागी तुमच्या पदरांत परमेश्वर टाकील.

---

* स्वतः संबंधानें

संतांचीं उच्छिष्टें बोलतो उत्तरें ।
काय म्यां पामरें जाणावें हें ॥

तुकाराम.

वाचकांचा व रा. खाडिलकर यांच्यां लेखाचा आज नव्या स्वरूपांत पुनः परिचय होत आहे. हा परिचय जरी नवा असला तरी १८९६ सालापासून रा. खाडिलकर यांच्या लेखांचें धोरण वाचकांस माहीत असल्यामुळें धोरणासंबंधानें नवी ओळख करून देण्याची जरुरी नाहीं. लो. बाळ गंगाधर टिळक यांचें शिष्यत्व स्वेच्छेनें व आनंदानें स्वीकारून ज्या मतांचा अंगिकार रा. खाडिलकर यांनीं केला, तीं मतें आज जशीच्या तशीं कायम आहेत. लो. टिळक यांनीं आपल्या विचारसरणीला जें वळण लावलें, तें वळण म्हणजे सद्गुरूचा मोठा प्रसाद होय, असा रा. खाडिलकर यांचा दृढ विश्वास असून, गेलीं दोन वर्षें 'लोकमान्य' पत्राचे संपादक या नात्यानें सांप्रतच्या नव्या काळांत त्यांनीं जें धोरण स्वीकारलें होतें, तेंच धोरण नव्या पत्राच्या रूपानें आजपासून वाचकांपुढें मांडण्यात येत आहे. म. गांधी यांनीं सुरू केलेली असहकारितेची चळवळ म्हणजे लो. टिळक यांच्या धोरणाचें परिपक्व फळ होय, याविषयीं सर्व विचारी लोकांची एकवाक्यता झालेली आहे. ज्या वृक्षाचें बीजारोपण लो. टिळक यांनीं केलें, जो वृक्ष लो. टिळक यांच्या हयातींतच वाढीस लागून फलोन्मुख झाला व ज्या वृक्षाचें पूर्ण स्वरूप महात्मा गांधी यांच्या चळवळींमुळें जनतेच्या दृष्टीस पडलें, त्या वृक्षाच्या सावलीखालीं

---

* नवाकाळ, ता. ७ मार्च १९२३

नसून 'नवाकाळ' पत्र आपलें रोजचें काम करणार आहे. 'नवाकाळ' पत्राचें धोरणासंबंधानें वाचकांस इतकें सांगितल्यानंतर 'लोकमान्य' पत्राशीं आपला असलेला संबंध रा. खाडिलकर यांना कां सोडावा लागला; याविषयीं थोडासा खुलासा करणें जरूर आहे. दोन वर्षांपूर्वी डॉ. भडकमकर यांनीं लोकमान्य पत्र काढण्यासंबंधाचा पुढारीपणा स्वत:कडे घेऊन जेव्हां जुळवाजुळव केली, त्यावेळीं 'लोकमान्य' पत्राचे मॅनेजिंग एजंटस्, रा. खाडिलकर व डायरेक्टर मंडळींतील प्रमुख चालक यांची एकजूट होती. काँग्रेसचा पक्ष व कौन्सिलचा पक्ष असे मतभेद होऊं लागल्यानंतर मूळची जूट कायम राहिली नाहीं. मॅनेजिंग एजन्टमधील डॉ. भडकमकर यांचा पुढारीपणा नाहींसा होऊन कौन्सिलवाल्या पक्षाचे रा. मंडलीक मॅनेजिंग एजंन्टच्या तर्फेचें एक्स ऑफिशिओ डायरेक्टर झाले आणि खुद्द डायरेक्टरांचे बोर्डात आपल्या बाजूचें मताधिक्य नाहीं, असा अनुभव रा. खाडिलकर यांना आला. मॅनेजिंग एजन्टस म्हणजे रोजचें कामकाज पहाणारे एक तऱ्हेचे मालकच होत. मालक भिन्न मताचा व नोकर असलेला संपादक भिन्न मताचा, ही स्थिति रोजच्या कामकाजांत अडचणीची होते; इतकेंच नव्हे, तर उभयतांसहि अत्यंत त्रास च मानसिक क्लेश देणारी झाल्यावांचून रहात नाहीं. मॅनेजिंग एजन्टच्या तर्फेंचा कारभार डॉ. भडकमकर यांचें हातून निघून गेल्यामुळें डळमळीत झालेलें रा. खाडिलकर यांचें आसन, डायरेक्टरांच्या बोर्डातहि आपल्या बाजूनेंच नेहमीं मताधिक्य होईल, असा अनुभव रा. खाडिलकर यांना न आल्यामुळें, नेहमींच डळमळीत राहणार असें रा. खाडिलकर यांना वाटलें व त्यांनीं लगेंच 'लोकमान्य' पत्राशीं आपला असलेला संबंध सोडून दिला. अशाच प्रकारच्या परिस्थितीमुळें संपादक या नात्याच्या काळांत पुण्यास रा. खाडिलकर यांना पूर्वी दोन वेळां खो मिळालेला होता. तो खो

पुण्याहून मुंबईस आल्यावरहि तिसऱ्यांदा आपल्या सभोंवतीं घिरट्या घालीत आहे असें पाहून, असल्या स्त्री च्या डावांतील मानसिक क्लेश टाळण्याकरितां स्वतःचें स्वतंत्र आसन 'नवाकाळ' पत्राच्या रूपानें घालण्याचा निश्चय रा. खाडिलकर यांनीं केला; आणि इष्टमित्रांच्या मदतीमुळें 'नवाकाळ' पत्राचे द्वारें आपले विचार वाचकांपुढें मांडण्याची संधी रा. खाडिलकर यांना मिळाली. संपादक व लेखक या नात्यानें आपल्या आयुष्यांतील श्वेवटच्या पायरीवर उभे राहून आजपासून आम्ही लो. टिळक व म. गांधी यांचेच विचार आपल्या वेडयावाकड्या पद्धतीनें बोलून दाखविणार आहोंत. तें बोल म्हणजे सद्गुरूची व संतांचीं उच्छिष्टें होत, हें आमच्या वाचकांस माहीत असल्यामुळें पूर्वीच्या स्वरूपांतील आमचे लेख ज्याप्रमाणें महाराष्ट्रांतील वाचकांनीं गोड करून घेतले, तसेच 'नवाकाळां'तील लेख वाचक गोड करून घेतील, असा 'नवाकाळ' पत्रास भरंवसा वाटत आहे.

* मिठावरील कर नापास झाला

दिल्लीच्या असेंब्लीनें मिठावरील करविरुद्ध आपलें मत दिलें. मंगळवारी सायंकाळीं मतें घेतां सरकारच्या बतीचीं ४४ मतें पडलीं व विरुद्ध ५९ मतें पडलीं. गेल्या वर्षीं मिठावरील करास असेंब्लीनें संमति दिली नाहीं हें योग्य झालें, पण यंदा तसें करूं नये, अशी विनंति सरकारतर्फे सभासदांना करण्यांत आली. धान्याच्या किंमती उतरत आहेत, तेव्हां मिठावरील कर अधिक वाढला तरी लोकांना सहज सोसेल, असें सरकारतर्फे म्हणणें पडलें. धान्याच्या किंमती उतरत आहेत, तेव्हां लोकांचें पगार कमी करा, धान्याच्या किंमती उतरत आहेत तेव्हां मिठावर कर अधिक वाढवा, धान्याच्या किंमती उतरत आहेत तेव्हां लष्करी खर्च कमी करूं नका; अशा तऱ्हेची ही विचारसरणी आहे. दुष्काळांत जर लोक कसाबसा आपला जीव वांचवूं शकतात, तर सुकाळांतहि झाडपाला खाऊनच त्यांनीं कां राहूं नये ? व शिल्लक राहिलेले पैसे सरकारच्या तिजोरींत कां भरूं नयेत ? कसेबसे जिवंत राहून सरकारच्या तिजोरीची भर करणें, म्हणजेच इहलोकींचें सर्व सुख होय किंवा परलोकचा मोक्ष होय, अशी तर सरकारची कल्पना नाहीं ना ? अडचणीच्या वेळीं लोक अर्धपोटी राहूं शकतात, किंवा वस्त्रप्रावरणाशिवाय दिवस कंठूं शकतात, म्हणून त्यांनीं नेहमींच तसें राहण्यास राजी व्हावें हा न्याय कोठला ? लोकांनीं आपल्या लग्नकार्याचा खर्च कमी करावा आणि सरकारच्या तिजोरीची भरती करावी, अशी विचारसरणी पूर्वी एका काळीं नोकरशाहीनें प्रचलित केली होती. आज धान्यांचे भाव उतरल्याबरोबर रोजच्या खर्चांत होणारी बचत सामान्य लोकांनीं सरकारास दिली पाहिजे व गिरण्यांतील मजु-

---

* नवाकाळ, ता. २२ मार्च १९२३

रांनीं गिरणीवाल्यांना दिली पाहिजे,अशी मागणी पुढें आली आहे.एक आफ्त्ति टळूं लागली म्हणजे दुसरे क्लेश सोसलेच पाहिजेत, असें लोकांना सांगण्याचा नोकरशाहीचा कटाक्ष आहे. चुलींतून बाहेर निघाला तर वैलांत पडण्यास कां भितोस, म्हणून नोकरशाही लोकांना विचारीत आहे. इंफ्लुएंझामध्यें जिवंत राहणारांनीं प्लेगला बळी पडण्यास कसूर करूं नये, असा नोकर-शाहीचा हा उपदेश आहे. अन्नवस्त्राशिवाय कसेंबसें जिवंत रहाणें एवढेंच काय तें आयुष्यांतील मुख्य काम आहे, अशी नोकरशाहीची समजूत झालेली दिसते ! नोकरशाहीचे बडे अधिकारी मोटारीशिवाय, बगीच्यांच्या बंगल्याशिवाय, नोकराचाकरांच्या तांडयाशिवाय, पक्कानांच्या रेलचेलीशिवाय, शिक्षणाच्या व करमणुकीच्या सोयींशिवाय सहज जिवंत राहूं शकतील. तडफडून मरतील अशा-तला भाग मुळींच नाहीं. मग त्यांना तरी एवढाले मोठे मोठे पगार कशाला पाहिजेत ? धान्याच्या किंमती थोडयाशा कमी होत चालल्या आहेत, ह्यामुळें सामान्य लोकांचें दुःख थोडेसें हलकें होऊं लागलें आहे, एवढेंच कायतें. संसार सुखाचा करण्यास पैसे उरूं लागले आहेत आणि लोकांची राहाणी चैनीची होण्याला यापुढें सुरवात व्हावयाची आहे, अशांतील भाग मुळींच नाहीं. ना. सर मालकम हेले यांनीं असेंब्लीमध्यें असें सांगितलें कीं, मिठावरील कर बसविल्याशिवाय सरकारला गत्यंतरच नाहीं. म्हणून सरकार असला कर बसविण्यास उद्युक्त झालें आहे. गत्यंतर नसायला काय झालें ? लष्करावरील खर्च निम्याहून कमी करा म्हणजे आपोआप जबर करांना फांटा देण्यास सवड सांपडेल. फाजील लष्करी खर्चाची हौस, आणि बायकांची दागिन्यांची हौस, या दोनहि गोष्टी समाजाचें स्वास्थ्य बिघडविण्यास सारख्याच कारणीभूत होत असतात. शांतता व व्यवस्था राहावी, एवढयाकरितां लष्कराची जरुरी आहे. त्याचप्रमाणें संसार सौंदर्याच्या सुखानें आच्छादलेला असावा, एवढयाकरितां दागिन्यांची

व सजावटीची जरुरी आहे. पण सर्वांत आपणच वरिष्ठ आहों, असें दाखविण्याची महत्त्वाकांक्षा ज्या वेळीं सत्ताधारी पुरुषांत उत्पन्न होते, त्या वेळीं लष्करी सत्तेच्या डामडौलावर व फाजील वाढीवर अतोनात पैसा खर्च करून उधळ्या नटवीच्या पायरीला सत्ताधारी लोक पोंचतात. जरुरी आणि फाजीलपणा ह्यांतील भेद त्यांना समजेनासा होतो. म्हणतील तेथें लष्करी लोक, पाहिजे तेव्हां पाहिजे तितके, सदा उभे राहिले पाहिजेत अशी महत्त्वाकांक्षा धरण्यांत, आणि इच्छेस येईल तितक्यांदां रोज नवे नवे शालू नेसून आपल्या सौंदर्यावर इतकी श्रीमंती आपण मिळवूं शकतों म्हणून प्रदर्शन करणाऱ्या नटवीच्या चंचल लहरींत फरक तो कोणता आहे? इंग्लंडांतील न्यायमूर्ति मॅकार्डी ह्यांनीं इंग्लंडांतील बायकांच्या फाजील पोषाखाची किंमत दुकानदारांना नवऱ्यांनीं देण्याची जरुरी नाहीं, असें जसें ठरविलें आहे, तसेंच दिल्लीच्या असेंब्लींतील मवाळांनीं देखील लष्करी शक्तीच्या फाजील थाटामाटाकरितां आपलें मीठ अधिक तोडून घेण्याचें नाकारलें आहे हें चांगलें झालें. इंग्लंडांतील कॅ. नॅश हे बाईलवेडे होऊन बायकोच्या पोषाखाचें पायीं लाखों रुपयांची आपली इस्टेट घुळीस मिळविण्यास तयार झाले, पण अखेर त्यांना देखील बायकांचा नाद सोडून द्यावा लागला. इंग्लंडांतील हौशी नवऱ्यांच्या बाईलवेडेपणास जशी सीमा आहे, तशीच सीमा नोकरशाहीच्या नादीं लागलेल्या मवाळांच्या आळणीपणासहि आहे. नखशिखांत आळणी झाल्यावर नोकरशाहीच्या नादांत तरी सुख कोठलें रहाणार? असेंब्लीनें मिठावरील कर नापास केला आहे; पण लाटसाहेब स्वतःच्या हिंमतीवर हा कर बसवितात किंवा कसे, हें आतां पहाणें आहे.

* वेश्येखातर मिठावर कर

बायबलांत अशी गोष्ट आहे कीं, हेरॉड राजानें जॉन बॅप्टिस्टा ह्याचा जो खून केला तो खून एका वेश्येला खूष करण्याकरितां केला. आपल्या बाईच्या चैनीकरितां साधू पुरुषांचें डोकें उडविण्याचें जें भयंकर पातक राजा हेरॉड ह्यानें केलें, त्या पातकाहून अधिक भयंकर पातक हिंदुस्थान सरकार मिठावरचा कर दुप्पट करून सांप्रत करीत आहे, असें सर मॉंटेग्यू वेब यांनीं सोमवारच्या असेंब्लीच्या बैठकींत नोकरशाहीस कळविलें ! मिठावर कर बसविणें म्हणजे गोरगरिबांना कालांतरानें फांसावर चढविणें होय. सर वेब ह्यांचें असें म्हणणें आहे कीं, मिठावर कर बसविण्यास कांहीं कारणच नाहीं. जेथें हिंदुस्थानच्या राष्ट्राकरितां दोन अब्ज रुपयांचें कर्ज चार पांच वर्षांत काढण्यांत आलें आहे, तेथें तीन कोटींचें अधिक कर्ज काढणें म्हणजे शेकडा एक टक्क्यानें कर्ज वांढविणें होय. शेंकडा एक टक्क्यानें कर्ज वाढलें म्हणून किंवा कमी झालें म्हणून व्याजाचे दर लंडनच्या किंवा मुंबईच्या सराफ कट्ट्यावर वाढतील असें मानण्यास मुळींच कारण नाहीं. सर मॉंटेग्यू वेब ह्यांना व्यापारी ह्या नात्यानें, रेल्वे मॅनेजर ह्या नात्यानें व जहाजांचे मालक ह्या नात्यानें हिंदुस्थानांतील पैशाच्या हालचालीची पूर्ण माहिती असून मिठावरील कर वाढविल्यानें हिंदुस्थान सरकारची पत बाजारांत वाढेल असें मुळींच वाटत नाहीं. इंचकेप कमिटीच्या सूचनेप्रमाणें इतर खात्यांत आणखी काटकसर केली म्हणजे तीन चार कोटीची तूट सहज भरून निघणारी आहे. सांप्रतची तूट जमाखर्चांत अडचण आल्यामुळें दिसत नसून फडणविसांच्या हेक्यामुळें दिसत आहे,' असें मि. वेब

---

* नवाकाळ, ता. २८ मार्च १९२३

यांचे म्हणणें आहे, ही तूट फडणविसानीं उत्पन्न केलेली आहे, तिजोरीच्या जमाखर्चानें उत्पन्न केलेली नाहीं. जमाखर्चाकडे पहाण्याच्या दृष्टीला ही तूट दिसत नसून हिंदुस्थान सरकारच्या राजकीय मुत्सद्दीपणांत ही तूट दृष्टीस पडत आहे. मिठावर जो कर दुप्पट करण्यांत आला आहे तो जमाखर्चाची तोंडमिळवणी करतां येत नाहीं म्हणून नव्हे; तर असला कर बसविण्याची ही संधी व्यर्थ दवडतां कामा नये म्हणून हिंदुस्थान सरकारनें स्वतःच्या धोरणाच्या दृष्टीनें हा कर बसविला आहे. जमाखर्च हा कर मागत नाहीं मग कोणाला खूष करण्याकरितां हा कर बसविला आहे? लष्करी शक्तीच्या नादीं हिंदुस्थान सरकार फाजील लागलें आहे. ह्या वेश्येचा खर्च मनमुराद ह्यापुढें देखील करतां यावा म्हणून मिठावर दुप्पट कर करण्यांत आला आहे. लष्कराचे चोचले पुरविण्याकरितां मिठावर दुप्पट कर बसविणें म्हणजे लाखों गोरगरिबांच्या संसाराच्या यातना असह्य करून त्यांना आस्ते आस्ते मृत्यूच्या मुखीं फेंकून देणें होय. हेरॉड राजानें एका वेश्येच्या नादीं लागून एका साधूचा शिरच्छेद केला; हिंदुस्थान सरकार लष्करी महत्त्वाकांक्षेच्या नादीं लागून लाखों लोकांचे खून पर्यायानें करण्यास तयार झालें आहे. मि. वेब ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें हेरॉड राजावर ताण करणारें हें दुष्कृत्य नव्हे काय? गेल्या सोमवारच्या असेंब्लींतील वादविवादांत सर मॉंटेग्यू वेब ह्यांनीं नोकरशाहीच्या डोळ्यांत अंजन घालण्याचा प्रयत्न वरीलप्रमाणें केला. पण सर्व वाया गेला. हिंदुस्थान सरकारच्या अधिकाऱ्यावर कांहीं एक परिणाम झाला नाहीं. शेट जम्नादास द्वारकादास ह्यांनीं सरकारास असें बजावलें कीं, मिठावर कर बसवून तुम्हीं लोकांपासून चार कोट रुपये हिरावून घ्याल हें खरें; पण ह्या दुष्कृत्यामुळें जो असंतोष चोहोंकडे माजून राहील आणि जे दंगेधोपे चोहोंकडे उद्भवतील त्या असंतोषाच्या व दंग्याधोप्यांच्या पायीं चार कोटीहून अधिक खर्च नोकर-

शाहीला करावा लागेल. शेट जम्नादास द्वारकादास ह्यांनीं अशा प्रकारचा सदुपदेश नोकरशाहीला करण्याचें धाष्टर्य दाखविल्याबद्दल उलट त्यांचीच थट्टा करण्यांत आली ! मिठावरचा कर म्हणजे राज्यक्रांतीचें पूर्व चिन्ह होय, असें शेटजींनीं कांहीं दिवसांपूर्वी बोलून दाखविलें होतें. पण अधिकाऱ्यांनीं शेटजींना कुचेष्टेनें असें विचारलें कीं, मिठावरचा कर बसवून एक महिना झाला अद्याप दंगेधोपे दिसत नाहींत आणि राज्यक्रांतीचीं चिन्हेंहि दिसत नाहींत याचा अर्थ काय ? तुमचा असंतोष कोठें आहे ? तुमचें दंगेधोपे कोठें आहेत ? तुमचीं राज्यक्रान्ति कोठें आहे ? सरकारचें कल्याण चिंतून सरकारास अंतःकरणपूर्वक उपदेश करणाऱ्या शेटजींची टर वरीलप्रमाणें कौन्सिलांत करण्यांत आली ! बिचारे शेटजी काय उत्तर देणार ? एक वर्ष झालें तरी तुझें स्वराज्य अद्याप कां दिसत नाहीं, म्हणून महात्माजींना हिणविण्याकरितां जसे प्रश्न चारगटपणानें विचारण्यांत येतात, तसाच चारगटपणा शेट जम्नादास द्वारकादास ह्यांचा असेंब्लीमध्यें करण्यांत आला. असला पाणउतारा करून आपल्या हलक्या मनाचें प्रदर्शन करण्यापर्यंत नोकरशाही आज नादान झाली आहे. शेठ जम्नादास द्वारकादास ह्यांनीं असल्या चारगटपणाला काय उत्तर द्यावें ? लोक निमूटपणानें जुलूम सोसत आहेत, तेव्हां अधिकाऱ्यांनीं तरी शेफारून कां जाऊं नये ? प्रल्हादाला हिरण्यकश्यपूनें तुझा देव कोठें आहे म्हणून विचारून जसें वारंवार हिणविलें, तसेंच आजहि असेंब्लींतील तडफदार पुरुषांना हिणविण्यांत येत आहे. त्यांनीं आज सरकारला देव कोठून दाखवावा ? म. गांधींच्या तपश्चर्येला जो देव तत्काळ पावला नाहीं आणि आणखी सहा वर्षांची कारागृहवासाची तपश्चर्या कर म्हणून ज्या देवाचा हुकूम झाला तो देव आज उद्यां प्रकट होईल म्हणून कसें म्हणावें ? देव प्रकट होण्यास जो अनुकूल काल पाहिजे, तो अनुकूल काल

कोणता आहे, हें देवासच पूर्ण ज्ञात आहे. त्यावेळीं तो प्रकट होईल. तोंपर्यंत शेट जम्नादास द्वारकादास ह्यांनीं म. गांधींचें अनुकरण करून स्वतःची हुर्यो करून घेण्यास तयार झालें पाहिजे. असेंब्लींतील वादविवादानें नोकरशाही मिठावरील कराच्या कामीं शुद्धीवर येईल अशी आशाच करावयास नको. लष्करी सत्तेचा वाजवीहून फाजील नाद इंग्लंडांतील व हिंदुस्थानांतील मुत्सद्यांना आजकाल लागला आहे. हा नाद पुरविण्यास पैसे पाहिजेत. इंग्लंडांत नवीन कर बसविण्याची सोय राहिली नाहीं. तेव्हां मढ्यावरील लोणी चाटण्यास ह्यावेळीं नोकरशाही कमी करणार नाहीं. व्यसन तें व्यसन, मागेंपुढें कोण पहातो ? गरीब लोक पिळले जातील, म्हणून कोण विचार करतो ? गरिबांचा छळ झाला असतां देव जागा होतो, म्हणून साधुसंतांनीं भाराभर लिहून ठेविलें आहे; पण त्या साखरेच्या गोण्याची चव नोकरशाहीला काय ? व्यसनानें नोकरशाही अंध झाली आहे, आणि आपल्या वेश्येचें लाड कसे पुरवावे ह्यापलीकडे नोकरशाहीला दुसरें तिसरें कांहीं दिसत नाहीं. सोमवारीं असेंब्लींत ५८ मतें देऊन मिठावरील कर नापास केला. सरकारच्या बतीचीं ४७ मतें पडलीं. असेंब्लीनें हा कर तिसऱ्यांदा नापास केला. गेल्या वर्षीं एकदां आणि यंदा गेल्या आठ दिवसांत दोनदां. इजा, बिजा, तिजा झालें तरी सरकारचें येळकोट अद्याप कायम आहेच. असेंब्लीनें अशा रीतीनें कर बसविण्याचें नाकारल्यानंतर लाटसाहेबांना स्वतःच्या अखत्यारींत कर बसवितां येईल. पण तो कर हिंदुस्थान सरकारनें बसविला नसून लाटसाहेबांनीं स्वतः बसविला असें समजलें जाऊन बादशाहीची म्हणजे पार्लमेंटची मंजुरी ध्यावी लागेल. पार्लमेंट सभेंतील वादविवाद टाळतां आला तर पहावा म्हणून नोकरशाही सांप्रत धडपड करीत आहे. पार्लमेंट सभेंत वादविवाद झाल्यानें मंजुरी मिळणार नाहीं अशी भीति हिंदुस्थान सरकारास मुळींच नाहीं. कारण इंग्लंडचें मंत्रिमंडळ, पार्लमेंटमधील कॉंझव्हेंटिव्ह पक्ष व लिबरल पक्ष

आणि इंग्लंडचा बहुजन समाज, ही सर्व मंडळी हिंदुस्थान सरकारच्या व्यसनांत पूर्णपणें रंगलेली आहे. हे सर्व एकाच वेश्येचे दास झालेले आहेत. सर्वांना एकच नाद लागला आहे. तेव्हां कोणी कोणास हंसतील, अशी भीति नाहीं. तथापि इंग्लंडांतील मजूरपक्षापुढें म्हणजे घरांतील चाकरमाणसांपुढें तरी इष्टमित्रांनीं मिळून हा नंगा नाच कशास नाचा, अशी थोडीशी लाजलज्जा हिंदुस्थानच्या नोकरशाहीस अद्याप वाटत आहे. हिंदुस्थानांतील मवाळांची त्यांना पर्वा नाहीं. त्यांचे पुढें उघडे नागडे होऊन उलट मवाळांचीच टर करण्यास नोकरशाही तयार आहे. पण मजूर पक्ष असल्या प्रसंगीं हजर नसला तर बरें असें हिंदुस्थान सरकारला वाटत असल्यामुळें मिठावरील कराची चर्चा पार्लमेंट सभेपुढें न जाण्याचा एक तोडगा हिंदुस्थान सरकारनें सांप्रत योजिला आहे. कौन्सिल ऑफ स्टेट व असेंब्ली ह्या दोघांची मिळून बैठक लाटसाहेब स्वतः बोलावणार आहेत, आणि आपलें हुद्दत त्यांना कळविणार आहेत. असेंब्लीमध्यें दहा अकरा मतांनीं सरकारची सूचना नापास झाली. स्टेट कौन्सिलमध्यें सरकारी मताधिक्य दहा अकरा मतांहून बरेंच्च अधिक आहे. तेव्हां दोघांची मिळून जर मिश्र बैठक बोलावली, तर त्या मिश्र बैठकींत सरकारला सहज मताधिक्य मिळणार आहे. असली मिश्र बैठक बोलाविण्याचा व्हाइसरॉयांना अधिकार आहे आणि ह्या अधिकाराप्रमाणें मिश्र बैठक बोलावण्यांत येणार आहे, असेंहि जाहीर झालें आहे. ह्या बैठकींत मिठावरील कर जर पास झाला तर लाटसाहेबांनीं व्यक्तिशः आपल्या अधिकाराचा उपयोग करण्याची कांहींच जरुरी नाहीं. लाटसाहेब व त्यांचें मंत्रिमंडळ म्हणजे हिंदुस्थान सरकार या मिश्र बैठकीच्या ठरावास संमति देईल आणि मग पार्लमेंट सभेपुढें मिठावरील कर जाण्याचें कारण उरणार नाहीं. हिंदुस्थान सरकार असेंब्लीला बिलकूल भीत नाहीं. उलट असेंब्लीनें नोकरशाहीच्या नंग्या नाचाची तारीफच

करीत राहिलें पाहिजे असें असेंब्लीला दटावून सांगण्यांत येत आहे. स्टेट कौन्सिल जसें दास्य पत्करतें तसलाच दासीपणा असेंब्लीनेंहि स्वीकारला पाहिजे, असें असेंब्लीला शिकविण्याकरितां शेठ जम्नादास द्वारकादास सारख्यांनाहि स्टेट कौन्सिलांतील दासांच्या शेजारी मिश्र बैठकींत बसविण्यांत येणार आहे. शेठ जम्नादास द्वारकादास ह्यांच्यासारखे तडफदार पुरुष असेंब्लीच्या अब्रूचें काढण्यांत येत असलेले हे धिंडवडे ह्यापुढें निमूटपणें सोसतील काय? इतर नाखूष होण्याचें बाजूला राहो, पण शेटजी जरी स्वतः नाखूष झाले आहेत, असें डायरेक्ट ॲक्शननें उर्फ प्रत्यक्ष कृतीनें नोकरशाहीच्या निदर्शनास आणण्यास शेटजी ह्या वेळीं तरी पुढें येतील काय?

* मिठावर कर दुप्पट झालाच

लाटसाहेबांनीं स्वतःच्या अखत्यारींत मिठावरचा कर दुप्पट केला आहे. मिठावरचा कर दुप्पट केल्याचें जाहीर करतांना लाटसाहेबांनीं तसें करण्याचीं कारणें दिलीं आहेत. एकसारखें कर्ज वाढत गेल्यामुळें जमाखर्चाची तोंडमिळवणी करणें सरकारास भाग पडलें; आणि मिठावरील कराशिवाय दुसरा मार्गच सरकारला दिसला नाहीं व कायदे कौन्सिलांत सुचवितां आला नाहीं. व्यापार उद्योगधंद्यावर कर वाढवावा, तर अधिक रक्कम उत्पन्न होईल अशी स्थिति राहिलेली नाहीं. मिठावर कर इंग्रजी अंमलापूर्वीपासूनचाच आहे. आणि पूर्वी देखील तो लोकप्रिय नव्हता. लोकांना हा कर सोसणार नाहीं, ह्या म्हणण्यांत लाटसाहेबांना तथ्यांश दिसत नाहीं. यंदा धान्याच्या किंमती उतरल्या असल्यामुळें असला कर सोसण्यास लायक असलेलें यंदाच्या सालासारखें साल ह्यापूर्वी कधींच आलें नव्हतें, असें लाटसाहेबांचें ह्मणणें आहे. माँटेग्यु–चेम्सफर्ड सुधारणांना हा कर बसविल्यानें धक्का पोंचतो असें म्हणण्यांत अर्थ नाहीं, असें लाटसाहेब आपल्या जाहीरनाम्यांत म्हणत आहेत. जमाखर्चांत तूट पडून जर कर्ज वाढत गेलें, तर त्या योगानें शिक्षण, आरोग्य, व उद्योगधंदे ह्यांचें जें भयंकर नुकसान होणार आहे, त्या नुकसानीपुढें राजकीय सत्तेच्या वादाचे प्रश्न कांहींच नाहींत. माँटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणांतील हक्कांना सोडून लाटसाहेब वागत नसल्यामुळें कोणत्याहि हक्कांचें उल्लंघन सरकारनें केलें असें म्हणतां येणार नाहीं. मिठावरील कर दुप्पट वाढविण्यास सर्टिफिकिट देतांना सरकारच्या वर्तनाचें समर्थन लाटसाहेबांनीं वरीलप्रमाणें केलें आहे. तें समर्थन अगदीं पोकळ

---

* नवाकाळ, ता. ३१ मार्च १९२३

व टाकाऊ आहे. मिठावरील कर इंग्रजी राज्यापूर्वी होता, असें म्हणण्यांत अर्थ काय? इंग्रजी राज्यापूर्वी जे कर नव्हते ते सोडून देण्यास सरकार तयार आहे काय? पेशवाईंत मद्यपानाची मनाई होती, आज अबकारी खात्याच्या उत्पन्नावर उदक सोडण्यास सरकार तयार आहे काय? खाण्या-पिण्याच्या वस्तू पूर्वी लोकांना जितक्या मुबलक मिळत होत्या तितक्या मुबलक आजहि मिळण्याइतके निरनिराळे कर कमी करण्यास सरकार कबूल आहे काय? मिठावरील कर लोकांना पसंत नाहीं हें जर सरकारास मान्य आहे, तर हा कर दुप्पट करण्याची आज जरुरी काय? राजकीय चळवळ लोकांच्या असंतोषामुळें वाढेल या गोष्टीची पर्वा आपण करीत नाहीं, असें लाटसाहेब पर्यायानें म्हणत आहेत. नेमस्तांच्या गालांवर लाटसाहेबांनीं ही चांगली थप्पड मारली आहे. दोन चार कोटींचें अधिक कर्ज काढलें असतें म्हणून काय बिघडलें होतें? हिंदुस्थान सरकारच्या जमाखर्चाची तोंडमिळवणी होऊं शकत नाहीं, ह्या गोष्टीचा बोभाटा दोन चार कोटींच्या कर्जानें कितीसा झाला असता? पैसा जवळ नसला म्हणजे शिक्षण, आरोग्य व उद्योगधंदे ह्यांना मदत करतां येत नाहीं आणि त्यामुळें समाजाचें अपरिमित नुकसान होतें असा लोककल्याणाचा आव लाटसाहेबांनीं आणला आहे, हें निव्वळ ढोंग आहे. लष्करी खात्यावर रुपयांतील आठ दहा आणे खर्च करून दिवाळखोर बनलेल्या सरकारनें शिक्षण व आरोग्य यांच्या विषयींची कळकळ दाखविणें म्हणजे लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकणें होय. सर्टिफिकिट देण्याचा मला हक्क आहे आणि तो हक्क मी बजावीत असल्यामुळें मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांचेंहि उल्लंघन होत नाहीं, ह्या लाटसाहेबांच्या म्हणण्याचा विचार नेमस्तांनीं अवश्य करावा. सुधारणा भरीव नाहीं, पोकळ आहेत आणि सर्व सत्ता तुमच्या हातीं नसून आमच्या हातीं आहे, असें लाटसाहेबांनीं चक्क सांगितलें आहे. सुधारणांचा पोकळपणा

सरकारास कबूल करावयास आम्ही भाग पाडूं हाच कौन्सिलें मोडण्याचा अर्थ होय, असें कौन्सिलवाल्या पक्षानें आजपर्यंत प्रतिपादन केलें आहे. कौन्सिलवाल्या पक्षास जी कबुली पाहिजे होती, तीच कबुली मिठावरील कर दुप्पट करून सरकारनें दिली आहे. कौन्सिलें निर्मल्यवत् आहेत, हें सिद्ध झालें आहे. मिठावरील करानें कौन्सिलांचा निःसत्वपणा चव्हाट्यावर आला असून कौन्सिलांत जीव उरलेला नाहीं, हें सरकारच्याप्रमाणें नेमस्तांनींहि आतां कबूल केलें आहे. मिठावरील कर दुप्पट करणें म्हणजे मॉंटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणांचा विध्वंस करणें होय; हें तत्त्व असेंब्लींत वादविवादाच्या वेळीं नेमस्तांनीं स्पष्टपणें बोलून दाखविलें आहे. अलाहाबादच्या लीडर पत्रानें अशीच कबुली दिलेली आहे. कौन्सिलें मोडण्यास सरकार तयार झालें आहे, असा लीडरचा अभिप्राय आहे. कलकत्त्याच्या बंगाली पत्रानें हेंच मत दिलें आहे. पुण्याचा सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटीचें मत त्यांच्या पत्रांतून अशा धर्तीनें प्रसिद्ध झालें आहे कीं, सरकारनें कायदे–कौन्सिलांचा चक्काचूर केला, असें म्हणण्यास आतां हरकत नाहीं. बंगाली लीडर व सर्व्हंट ऑफ इंडिया हीं पत्रें म्हणजे नेमस्तांच्या मताचा गड्डाच होय. आमचीं कौन्सिलें मेलीं, सुधारणांचा चक्काचूर झाला, आमचें नाक कापलें गेलें, असा टाहो फोडून हीं पत्रें सांप्रत रडत आहेत. कौन्सिलांच्या मृत्यूबद्दल अशा रीतीनें नेमस्त ऊर बडवून घेत असतांना कौन्सिलांत अद्याप धुगधुगी उरली आहे आणि कौन्सिलांच्या शवाच्या छातीवर गुद्दा रोंवून आम्ही त्यांना पुरतेपणीं मारणार, असें म्हणत मेलेल्याला पुन्हां मारण्याचा हास्यास्पद खेळ खेळण्यास राष्ट्रीय सभेंतील कौन्सिलवाला पक्ष मिठावरील कर दुप्पट झाल्यानंतर आतां पुढें कसा येईल?

---

* राष्ट्रीय निशाणाचा झगडा

राष्ट्रीय निशाणाच्या अब्रूसाठीं नागपूरचे देशभक्त आजपासून सत्याग्रहास सुरवात करणार अहेत. जबलपूर व नागपूर येथें आतांपर्यंत राष्ट्रीय निशाणाच्या मिरवणुकीचे पायीं बरेच स्वयंसेवक तुरुंगांत गेले आहेत. राष्ट्रीय निशाण उभारणें किंवा राष्ट्रीय निशाणाची मिरवणूक काढणें या गोष्टी राजद्रोहाच्या ठरत नाहींत. राष्ट्रीय निशाण हें स्वराज्याच्या चळवळीचें चिन्ह आहे. राष्ट्रीय निशाणाची मिरवणूक म्हणजे एक प्रकारची स्वराज्याची चळवळ होय. ह्या चळवळीमुळें एका ध्येयावर लोकांची दृष्टि एकवटली जाते. प्रत्यक्ष निशाण डोळ्यापुढें उभें असल्यामुळें चळवळ केवळ बुद्धीच्या टापूंत न रहातां चळवळीला एक तऱ्हेचा प्रत्यक्षपणा येतो. मूर्तीची उपासना आणि ध्यान ह्यांच्यामध्यें जें अंतर आहे तेंच अंतर निशाणाची मिरवणूक आणि राजकीय परिस्थितीसंबंधींचें व्याख्यान यांच्यामध्यें आहे. राष्ट्रीय निशाणानें राजकीय चळवळ मूर्तिमंत होते. कोणतीहि चळवळ देहधारी उर्फ ऑर्गनाइझ्ड होण्यास बाह्य स्वरूपाची जरुरी असते. राष्ट्रीय गीतें, राष्ट्रीय सभागृहें, त्या त्या चळवळीस वाहिलेले सेक्रेटरी च अध्यक्ष यांचे ठिकठिकाणचे जमाव व वक्त्यांची जुळणी, चळवळीच्या धोरणानें लोकमतास वळण देणारीं वर्तमानपत्रें, ध्येयाचे उपासनेला उन्नति देणाऱ्या पुढाऱ्यांचीं चित्रें आणि, राष्ट्रीय निशाणासारखें सर्व चळवळीचें सार दाखविणारें एखादें प्रतीक, या सर्वांचा जेव्हां योग्य रीतीनें मेळ बसतो तेव्हां चळवळ देहधारी होऊन प्रत्यक्षपणें लोकांना दिसूं लागते. अशा दृष्टीनें विचार केला असतां राष्ट्रीय निशाणासंबंधानें जबलपूर व नागपूर येथील देशभक्तांनीं राष्ट्रीय निशाणाच्या अब्रूकरितां सुरू केलेला सत्याग्रह केवढया मोठया

---

* नवाकाळ, ता. १ मे १९२३

योग्यतेचा आहे हें कोणच्याहि ध्यानीं येईल. राष्ट्रीय निशाणाची चळवळ राजद्रोहाची नाहीं किंवा दंगाधोप्याचीहि नाहीं. असें असतांहि या चळवळीला जबलपूर व नागपूर येथील पोलिसनें अडथळा केला, देशभक्तांना निर्दयपणानें मार दिला, आणि कित्येकांना तुरुंगांत टाकलें. मध्यप्रांताच्या पोलिसांची ही कृति मुत्सद्दीपणास धरून बिलकूल झाली नाहीं. कारण स्वराज्याच्या चळवळींत अशा रीतीनें चळवळीच्या उत्पत्तीचे प्रारंभाचें तंतु निर्दयपणें तोडून टाकण्याचे दिवस केव्हांच निघून गेले आहेत. होमरूलची चळवळ ज्यावेळीं बिझांटबाईनीं सुरू केली त्यावेळीं त्यांनीं राष्ट्रीय निशाण उभारलें. राष्ट्रीय निशाणाचें हें पुष्प आपल्या मुठींत धरून चुरडून टाकण्याचा प्रयत्न त्यावेळीं नोकरशाहीनें केला, पण तो सफल झाला नाहीं. वंदेमातरम् हें गीत व वंदेमातरम् हे शब्द अशाच रीतीनें नाहींसें करण्याचा प्रयत्न बंगालचे स्वदेशी चळवळींत करण्यांत आला होता, पण तोहि सफल झाला नाहीं. आज वंदेमातरम् जयघोष मोठा राष्ट्रीय मंत्र होऊन बसला आहे. या शब्दांचा ध्वनि कानीं पडण्याबरोबर स्वराज्याच्या ध्येयाची एकदम आठवण आजकाल सर्वांना होत आहे. वंदेमातरम् या शब्दाचा जो उपयोग कान पवित्र करण्याकडे होतो, तोच उपयोग डोळे पवित्र करण्याकडे राष्ट्रीय निशाणाचा होतो. महात्मा गांधी यांची खादीची टोपी राष्ट्रीय आचरणाचें बाहेरचें प्रमुख चिन्ह आजकाल समजलें जात आहे. राष्ट्रीय निशाण ही देवता आहे, वंदेमातरम् हा मंत्र आहे, आणि खादी ही पूजाअर्चा आहे. तीनहि चळवळींकडे पाहिलें असतां वंदेमातरम् व खादीची टोपी ह्यांचा नायनाट करण्याचा प्रयत्न केल्यानंतर राष्ट्रीय निशाणाच्या मागें आजकाल नोकरशाही लागली आहे असें दिसून येतें. राष्ट्रीय निशाणाची चळवळ कोमल अर्भकाच्या स्थितींत असतांनाच त्या अर्भकाला मारून टाकून स्वराज्याचें ध्येय निर्बल करण्याचा हा प्रयत्न आहे चिमुकल्यांना मारून टाकण्याकडे ओढा सर्व अरेरावी सत्तेचा नेहमींच असतो. अरेरावी सत्तेचा हा स्वभाव आहे. श्रीकृष्ण

काय किंवा खाइस्ट काय, यांच्या वेळेच्या पूर्वीपासूनच अरेरावी सत्तेचा हा क्रम चालू आहे. अरेरावी सत्तेनें चिमुकल्यांना मारून टाकावें आणि आपलें वैभव निर्धास्त करावें, हें साहाजिक आहे. अशा कत्तलींतून जी चळवळ बाहेर पडूं शकते तीच आस्ते आस्ते सशक्त होऊन अखेरीस यशस्वी होते. सभाबंदीचे कायदे किंवा संस्थांचा नाश करणारे कायदे ही सर्व अर्भकांची कत्तल करण्याकरतां अरेरावी सत्तेनें हातीं घेतलेलीं शस्त्रास्त्रें होत. युवराजांचा दौरा हिंदुस्थानांत चालू असतांना सभाबंदीचें हत्यार नोकरशाहीनें पूर्ण जोरानें उपसलें आणि आपल्या नवीन संस्थांचा जीव जाऊं नये म्हणून पंचवीस हजार देशभक्त त्यावेळीं तुरुंगांत गेले. अरेरावी सत्ता अर्भकांना कशी मारूं पहाते आणि तुरुंगवास पत्करणारी नवी शक्ति स्वतः हालअपेष्टा सोसून आपल्या कोवळ्या चळवळीची नीट जोपासना कशी करते, हें युवराजांच्या दौऱ्याच्या वेळेच्या हकीकतीनें सर्वांच्या निदर्शनास आलेंच आहे. राष्ट्रीय निशाणाची चळवळ व त्यासंबंधाचा सत्याग्रह म्हणजे स्वराज्याच्या वाढत चाललेल्या कोंवळ्या देहाची जोपासनाच होय. तुरुंगाच्या हालअपेष्टा सोसूनच किंवा हद्दपारीचें दुःख स्वतःच्या अंगावर ओढून घेऊनच या कोंवळ्या अर्भकांचें संरक्षण करावें लागतें. सभाबंदीचा कायदा काय किंवा निशाणाच्या मिरवणुकीला केलेला अडथळा काय, दोन्हींचें स्वरूप एकच आहे. राष्ट्रीय निशाणासंबंधाचा सत्याग्रह म्हणजे सभाबंदीच्या कायद्याशीं झुंजण्याचाच एक भाग आहे. वर्ष दीड वर्षापूर्वीची चळवळ युवराजांच्या दौऱ्यामुळें उत्कट हालचालीची झाली राष्ट्रीय निशाणाच्या चळवळींत तो उत्कटपणा नाहीं. प्रसंगामुळें आलेली उत्कट खळबळ जरी नसली तरी शांतता, गंभीरता, आणि निश्चयाची श्रद्धा राष्ट्रीय झेंडयाच्या झगडयांत अधिक आहे. नागपूरच्या चळवळीची योग्यता अशा तऱ्हेची असल्यामुळें सर्व हिंदुस्थानचें लक्ष नागपूरकडे आजकाल लागून राहिलें असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं.

---

* समेट संपला

मे महिना सुरू झाल्यापासून काँग्रेसचा पक्ष व कौन्सिलवाला पक्ष यांच्यामधील वादविवादाचा समेट संपला आहे. प्रत्येक पक्षास आपापल्या मर्जीप्रमाणें वागण्यास आतां पूर्ण मोकळीक आहे. समेट आणखी कांहीं महिने असाच पुढें चालावा म्हणून मध्यंतरीं प्रयत्न करण्यांत आला, पण या समेटापासून कोणत्याहि पक्षास विशेष फायदा नसल्यामुळें आणि कौन्सिलवाल्या पक्षानें कौन्सिलांत शिरण्याची आपली तयारी अधिक जोरानें करणें जरूर असल्यामुळें समेटाची मुदत पुढें वाढली नाहीं. काँग्रेसच्या पक्षाचें फंड गोळा करण्याचें व स्वयंसेवक जमविण्याचें काम समेटाच्या बोलण्यानें विनाकारण थंड पडतें, असा अनुभव आल्यानें श्री. राजगोपाळाचार्य, श्री. वल्लभभाई पटेल आणि बाबू राजेन्द्रप्रसाद यांनीं समेटाच्या भानगडींत न पडतां आपलें काम अधिक नेटानें करण्यास राष्ट्रीय सभेच्या अनुयायांनीं यापुढें लागावें असें ठरविलें हें योग्यच झालें. राष्ट्रीय सभेच्या वर्किंग कमिटीची बैठक ता. २३ मे रोजीं व ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची बैठक ता. २५ मे रोजीं मुंबईस भरावयाची आहे, या दोन तीन आठवड्यांत राष्ट्रीय सभेच्या कैवाऱ्यांनीं जर मनापासून खटपट केली तर बरेंच कार्य होणार आहे. ३० एप्रिल अखेरपर्यंतच्या कामाकडे लक्ष देतां एकंदर हिंदुस्थानच्या फंडासंबंधानें गयेच्या काँग्रेसनें जो कार्यक्रम ठरविला त्यापैकी एक तृतीयांश कार्यक्रम पार पडल्यासारखा झाला आहे असें दिसून येतें. कांहीं प्रांतांनीं आपला कार्यक्रम पार पाडला आहे व कांहींचा कार्यक्रम २३ मे पर्यंत पार पडण्यासारखा आहे. बरेच प्रांत या कामीं मागासलेले

---

* नवाकाळ, ता. ५ मे १९२३

आहेत. तेव्हां ता. २५ मे रोजीं भरणाऱ्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीला कार्यक्रम पार पाडण्यासंबंधानें एक तृतीयांशापासून एक द्वितियांशापर्यंत काम झालें आहे किंवा होण्यासारखें आहे, असें दृष्टीस पडेल. या स्थिति-संबंधानें श्री. राजगोपाळाचार्य ह्यांनीं प्रसिद्ध केलेल्या धोरणाकडे पाहिलें असतां, ऑल इंडिया काँग्रेस कमिटी कायदेभंगाच्या राष्ट्रीय कार्यासंबंधानें निरुत्साही न होतां ह्या दिशेनें सतत उद्योग पुढें चालविण्याचा ठराव पास करील असा अंदाज आहे. कौन्सिलवाला पक्ष व काँग्रेसचा पक्ष अशी फूट झाल्यानें कार्याची हानि झाली आहे.पण अपरिहार्य अडचणींना उगीच उगाळीत बसण्यांत कांहीं अर्थ नसतो, हें ध्यानांत ठेवूनच राष्ट्रीय सभेच्या कैवाऱ्यांनीं आपल्या कार्यास पुढें लागणें जरूर आहे. राष्ट्रांत अशा प्रकारची फूट असतांहि आपल्या संस्था मजबूत करण्यास लागणारा पैसा व निरुत्साह न होण्याइतके स्वयंसेवक राष्ट्रीय सभेला मिळत आहेत. कोणत्याहि ठिकाणीं राष्ट्रकार्यासाठीं तुरुंगांत जाण्याची योग्य संधी मिळाली असतां स्वयंसेवकांची वाण पडत नाहीं, असा अनुभव मध्यप्रांतांतील राष्ट्रीय निशाणाच्या झगडयानें आणून दिला आहे. खुद्द नागपूर शहरांत राष्ट्रीय निशाणाच्या अब्रूसाठीं रोज दहा पंधरा स्वयंसेवक तुरुंगांत जात आहेत, आणि सांप्रतचा नागपूरचा उत्साह येवढा जबरदस्त आहे कीं, राष्ट्रीय निशाणाच्या झगडयाचें काम दोन तीन महिने एकसारखें चालविलें तरी स्वयंसेवकांची वाण पडेल असें कोणासच वाटत नाहीं. मध्यप्रांत व नागपूर म्हणजे कौन्सिलवाल्या पक्षाचें माहेरघर; असें असतांहि तेथें मोठया उत्साहानें तुरुंगांत जाण्यास स्वयंसेवक पुढें येत असतात, यावरून काय सिद्ध होतें? स्वार्थत्याग करण्यास व आत्मक्लेश सोसण्यास लोक तयार आहेत असें सिद्ध होत नाहीं काय? कौन्सिलवाल्या पक्षाची जर आज फूट नसती तर पंजाबांत हिंदु-मुसलमानांची बेकी दृष्टीस पडली नसती, असे उद्गार देशबंधु दास यांनीं स्वत:च काढले

आहेत. कौन्सिलमध्यें शिरण्याचें नेमस्तांचें ध्येय राष्ट्रीय सभेंतील कौन्सिलवाल्या पक्षानें आपल्यापुढें ठेवल्यामुळें राजाश्रयासंबंधींच्या बारीक सारीक गोष्टींना राष्ट्रीय महत्व येतें आणि हिंदु, मुसलमान, खिश्चन, ब्राम्हण, लिंगायत, ब्राम्हणेतर, अस्पृश्य असल्या तंट्यांच्या बाबी वर डोकें काढूं लागतात. ह्या तंट्याच्या बाबींहूनहि अधिक श्रेष्ठ असलेलें आणि राजाश्रयाशीं यत्किंचित्हि संबंध नसलेलें ध्येय ज्या वेळीं राष्ट्रापुढें जोरानें मांडलें जातें आणि त्याच ध्येयाकडे राष्ट्रांतील कर्त्या, तेजस्वी, व विद्वान पुरुषांचीं अंतःकरणें एकसारखीं लागून राहतात, त्या वेळीं राजाश्रयाचा भपका फिका पडतो; आणि धार्मिक किंवा जातिविषयक भेदांना कसें कह्यांत ठेवावयाचें ह्याचा धडा राष्ट्र शिकत असतें. लगामाच्या इषाऱ्याप्रमाणें चालण्याचें शिक्षण घोड्यांना जें मिळतें तें सारथी आपल्या स्थानावर बसला असतांनाच मिळतें. सारथी जाग्यावर बसला नाहीं, रथ कोठें न्यावयाचा हें सारथ्यानें ठरविलें नाहीं, आणि अशा स्थितींत जर घोडे चालू लागले तर ते आपापल्या घरकुल्याकडे किंवा तबेल्याकडेच जाणार हें उघड आहे. लगाम नुसता तोंडांत धरून कह्यांत वागण्याचें शिक्षण घोडे आपण होऊन कधीच शिकत नसतात. राष्ट्रामध्यें मोठ्या राष्ट्रीय ध्येयाची चळवळ जर एकसारखी चाललेली नसेल, त्या ध्येयाकरितां राष्ट्रीय पुढारी एकसारखे क्लेश जर सोशीत नसतील, तर राष्ट्राचे अवयव व राष्ट्राचीं इंद्रियें विस्कळित होऊन प्रत्येकजण आपापल्या प्रवृत्तीप्रमाणेंच धडपड करूं लागतो आणि राष्ट्राच्या संघटित कार्याचा अखेर नाश होतो. कौन्सिलवाल्या पक्षाच्या फुटीमुळें असा नाश होण्यास सुरवात झालेली आहे. यावेळीं राष्ट्रीय सभेच्या कैवाऱ्यांनीं आपलें आत्मयज्ञाचें ध्येय एकसारखें राष्ट्राच्या डोळ्यांपुढें कायम राहील असा उद्योग जोरानें करणें जरुरीचें आहे. श्री. राजगोपाळाचार्य यांनीं देखील प्रत्येक व्यक्तीनें व प्रत्येक काँग्रेस कमिटीनें आपापल्या दृष्टीनें

आत्मयज्ञ सुरू करून त्या आत्मयज्ञाच्या जोरावर राष्ट्राला एकीचें वळण लावलें पाहिजे, आणि राष्ट्राची झगडण्याची शक्ति रोजच्या रोज वाढवीत गेलें पाहिजे, असें धोरण लोकांपुढें मांडलें आहे. मवाळ कौन्सिलांत जातात, त्या प्रमाणें पुण्याचा रा. केळकरांचा पक्षहि कौन्सिलांत जाईल; त्या बद्दल विषद मानण्याचें कारण नाहीं. कौन्सिलांचा उपयोग कितपत आहे, आणि कौन्सिलांना अधिकार काय आहे, यासंबंधानें सर्वांचे डोळे मिठावरील कराच्या प्रसंगानें आतां उघडले आहेत. हिंदुस्थानांतील नोकरशाहीच्या प्रचंड लष्करी शक्तींशीं झगडतांना या कौन्सिलांचा उपयोग होण्यासारखा नाहीं हें आतां सिद्ध झालें आहे. हिंदुस्थानचें राष्ट्रीय लष्कर निर्माण करण्याचे कामीं सरकारी उपायांचा उपयोग ज्या प्रमाणें २५ वर्षांनीं सहा पथकें पूर्ण हिंदी करण्यापुरताच होणार आहे, त्याप्रमाणें स्वराज्याच्या स्थापनेसहि कौन्सिलांचा उपयोग यथातथाच होणार आहे. ह्या मार्गानें गेल्यास महात्मा गांधी यांनीं पूर्वी एकदां म्हटल्याप्रमाणें स्वराज्यप्राप्तीस शंभर वर्षांहून एकहि दिवस कमी लागणार नाहीं. या काळांत शाहाणे लोक कौन्सिलांत गेले काय, कर्ते लोक कौन्सिलांत गेले काय, किंवा नुसते मवाळ आणि बगलबच्चे कौन्सिलांत गेले काय, स्वराज्यप्राप्तीच्या दृष्टीनें कांहींच फरक होणार नाहीं. तेव्हां असाच फसव्या कौन्सिलांचा नाद राष्ट्राला जितका कमी लागेल आणि या मोहापासून राष्ट्र जितकें अलिप्त राहील तितकें आज राष्ट्राचें कल्याण होणार आहे. कौन्सिलच्या नादीं लागूं नका, कौन्सिलच्या पूर्वतयारींत भाग घेऊं नका, आणि कोणताहि उमेदवार उभा राहिला तरि मतें देण्यास जाऊं नका, असा उपदेश लोकांना करीत राहणें हेंच राष्ट्रीय सभेच्या कैवाऱ्यांचें एक पवित्र काम आहे. मिठावरील कराच्या वादविवादानें कॉंग्रेसच्या पक्षाचें हें काम सोपें झालें आहे, आणि निवडणुकीची तयारी चालली असतां राष्ट्रास योग्य

दिशा दाखविण्यांत राष्ट्रीय सभेनें आळस करतां कामा नये, असें श्री. राजगोपाळाचार्य यांचें म्हणणें आहे. फोल ठरलेल्या कौन्सिलांच्या निवडणुकीच्या धडपडींत राष्ट्राचें कर्तृत्व गुंतून न रहावें अशी खबरदारी घ्यावयाची असल्यास, मध्यप्रांतांतील जबलपूर व नागपूर येथील लोक राष्ट्रीय निशाणाच्या अब्रूकरितां आत्मयज्ञाचा जो धडा सर्व राष्ट्राला घालून देत आहेत, त्या धडयाचें अनुकरण करण्यास ह्या वेळीं सर्व प्रांतांनीं झटलें पाहिजे. राष्ट्राचें पाऊल याच मार्गानें पुढें पडणार आहे. कौन्सिलच्या मार्गानें गेलें असतां राजाश्रयासंबंधानें राष्ट्रांत दुही माजल्यावांचून राहणार नाहीं, आणि कौन्सिलांत अखेर हातीं कांहीं न लागतां दुही माजविण्याचें पाप मात्र पदरीं पडणार आहे. ध्येय फोल, मोह दुहीचा, आणि मार्ग स्वास्थ्याचा; अशी कौन्सिलवाल्या पक्षाची स्थिति आहे. ध्येय भरीव, आवड एकीची आणि उद्योग आत्मयज्ञाचा, अशी राष्ट्रीय सभेची शिकवणूक आहे. या दुसऱ्या शिकवणुकी अंगिकार न करण्याइतकें राष्ट्र नाउमेद झालेलें नाहीं, असें नागपूरच्या राष्ट्रीय निशाणाच्या झगडयावरून सिद्ध होत आहे. यावेळीं सर्व लोकांनीं नागपुरास शक्य ती मदत केली आणि आपापल्या प्रांतांत दोन तीन आठवडे कसून खटपट केली, तर ता. २५ मे रोजीं मुंबईस ऑल इंडिया काँग्रेस कमिटी भरली असतां राष्ट्रांत नवा जोम उत्पन्न करण्यास ऑल इंडिया काँग्रेस कमिटी समर्थ होईल, यांत संशय नाहीं.

---

* कौन्सिलांवर बहिष्कार कां घातला ?

अमृतसरच्या काँग्रेसच्या वेळीं कौन्सिलांत शिरून कौन्सिलांचा उपयोग करून घेण्याचा ठराव पास झाला असतांना, कलकत्त्याच्या स्पेशल काँग्रेसमध्यें व त्यानंतरच्या काँग्रेसच्या तीन बैठकींमध्यें तीन वर्षें काँग्रेसनें बहिष्काराचा ठराव पास केला. आतां हा ठराव अधांतरी ठेवण्याची सूचना पुढें येत आहे. कौन्सिलवर बहिष्कार ज्या कारणांकरितां घालण्यांत आला तीं कारणें नष्ट झालीं अहेत का ? पंजाब प्रकरण, स्वराज्य व खिलापत या तीन प्रसंगीं नोकरशाहीच्या धोरणाचा जो अनुभव आला, त्या अनुभवामुळें कौन्सिलवरील बहिष्काराचा मार्ग राष्ट्राच्या कल्याणाचा आहे असें काँग्रेसनें ठरविलें. नोकरशाहीं बेताल वागते आणि या बेताल वागण्यास आळा घालण्याचें सामर्थ्य कौन्सिलांच्या अंगीं नसल्यामुळें तेथें काम करून व्यर्थ वेळ दवडण्यापेक्षां ज्या योगानें नोकरशाहीस आळा बसूं शकेल असलें सामर्थ्य स्वार्थत्यागाच्या जोरावर राष्ट्रांत उत्पन्न करण्याची चळवळ करतां यावी, हें ध्येय पुढें ठेवून कौन्सिलांवर बहिष्कार घालण्यांत आला त्यानंतरच्या तीन वर्षांचा अनुभव आज राष्ट्रापुढें आहे. बहिष्कार घालूं नका, म्हणून म्हणणारा पक्ष राष्ट्रीय सभेंत त्यावेळीं लहान सहान नव्हता. ना. शास्त्री, ना. चिंतामणी, सुरेंद्रबाबू, ना. जिना वगैरे राष्ट्रीय सभेचे कट्टे अभिमानी या कौन्सिलवरील बहिष्कारामुळें राष्ट्रीय सभेला त्यावेळीं सोडून गेले. कौन्सिलांत शिरून नोकरशाहीच्या नाकांत आपण वेसण घालूं व स्वराज्याच्या प्राप्तीला कौन्सिलांचा मार्ग हाच खरा मार्ग आहे असें दाखवूं हें त्यावेळीं त्यांचें म्हणणें होतें व त्या म्हणण्यास अनुसरून हे पुढारी

---

* 'नवाकाळ' ता. १७ मे १९२३

दिशा दाखविण्यांत राष्ट्रीय सभेनें आळस करतां कामा नये, असें श्री. राजगोपाळाचार्य यांचें म्हणणें आहे. फोल ठरलेल्या कौन्सिलांच्या निवडणुकीच्या धडपडींत राष्ट्राचें कर्तृत्व गुंतून न रहावें अशी खबरदारी घ्यावयाची असल्यास, मध्यप्रांतांतील जबलपूर व नागपूर येथील लोक राष्ट्रीय निशाणाच्या अब्रूकरितां आत्मयज्ञाचा जो धडा सर्व राष्ट्राला घालून देत आहेत, त्या धडयाचें अनुकरण करण्यास ह्या वेळीं सर्व प्रांतांनीं झटलें पाहिजे. राष्ट्राचें पाऊल याच मार्गानें पुढें पडणार आहे. कौन्सिलच्या मार्गानें गेलें असतां राजाश्रयासंबंधानें राष्ट्रांत दुही माजल्याबांचून राहणार नाहीं, आणि कौन्सिलांत अखेर हातीं कांहीं न लागतां दुही माजविण्याचें पाप मात्र पदरीं पडणार आहे. ध्येय फोल, मोह दुहीचा, आणि मार्ग स्वास्थ्याचा; अशी कौन्सिलवाल्या पक्षाची स्थिति आहे. ध्येय भरीव, आवड एकीची आणि उद्योग आत्मयज्ञाचा, अशी राष्ट्रीय सभेची शिकवणूक आहे. या दुसऱ्या शिकवणुकी अंगिकार न करण्याइतकें राष्ट्र नाउमेद झालेलें नाहीं, असें नागपूरच्या राष्ट्रीय निशाणाच्या झगडयावरून सिद्ध होत आहे. यावेळीं सर्व लोकांनीं नागपुरास शक्य ती मदत केली आणि आपापल्या प्रांतांत दोन तीन आठवडे करून खटपट केली, तर ता. २५ मे रोजीं मुंबईस ऑल इंडिया काँग्रेस कमिटी भरली असतां राष्ट्रांत नवा जोम उत्पन्न करण्यास ऑल इंडिया काँग्रेस कमिटी समर्थ होईल, यांत संशय नाहीं.

---

* कौन्सिलांवर बहिष्कार कां घातला ?

अमृतसरच्या काँग्रेसच्या वेळीं कौन्सिलांत शिरून कौन्सिलांचा उपयोग करून घेण्याचा ठराव पास झाला असतांना, कलकत्त्याच्या स्पेशल काँग्रेसमध्यें व त्यानंतरच्या काँग्रेसच्या तीन बैठकींमध्यें तीन वर्षें काँग्रेसनें बहिष्काराचा ठराव पास केला. आतां हा ठराव अधांत्री ठेवण्याची सूचना पुढें येत आहे. कौन्सिलवर बहिष्कार ज्या कारणांकरितां घालण्यांत आला तीं कारणें नष्ट झालीं अहेत का ? पंजाब प्रकरण, स्वराज्य व खिलापत या तीन प्रसंगीं नोकरशाहीच्या धोरणाचा जो अनुभव आला, त्या अनुभवामुळें कौन्सिलवरील बहिष्काराचा मार्ग राष्ट्राच्या कल्याणाचा आहे असें काँग्रेसनें ठरविलें. नोकरशाहीं बेताल वागते आणि या बेताल वागण्यास आळा घालण्याचें सामर्थ्य कौन्सिलांच्या अंगीं नसल्यामुळें तेथें काम करून व्यर्थ वेळ दवडण्यापेक्षां ज्या योगानें नोकरशाहीस आळा बसूं शकेल असलें सामर्थ्य स्वार्थत्यागाच्या जोरावर राष्ट्रांत उत्पन्न करण्याची चळवळ करतां यावी, हें ध्येय पुढें ठेवून कौन्सिलांवर बहिष्कार घालण्यांत आला त्यानंतरच्या तीन वर्षांचा अनुभव आज राष्ट्रापुढें आहे. बहिष्कार घालूं नका, म्हणून म्हणणारा पक्ष राष्ट्रीय सभेंत त्यावेळीं लहान सहान नव्हता. ना. शास्त्री, ना. चिंतामणी, सुरेंद्रबाबू, ना. जिना वगैरे राष्ट्रीय सभेचे कट्टे अभिमानी या कौन्सिलवरील बहिष्कारामुळें राष्ट्रीय सभेला त्यावेळीं सोडून गेले. कौन्सिलांत शिरून नोकरशाहीच्या नाकांत आपण वेसण घालूं व स्वराज्याच्या प्राप्तीला कौन्सिलांचा मार्ग हाच खरा मार्ग आहे असें दाखवूं हें त्यावेळीं त्यांचें म्हणणें होतें व त्या म्हणण्यास अनुसरून हे पुढारी

---

* 'नवाकाळ' ता. १७ मे १९२३

कौन्सिलांत गेलेहि. तीन वर्षांत काय अनुभव आला ? जुनीं कौन्सिलें व नवीं कौन्सिलें यांत सत्तेच्या दृष्टीनें फारसा फरक नाहीं, असाच अनुभव आला. लाटसाहेबांचा सर्टिफिकेटाचा अधिकार म्हणजे पूर्वीची अरेरावी सत्ताच होय. या अरेरावी सत्तेला कह्यांत ठेवण्याचा अधिकार पूर्वीप्रमाणेंच लंडनच्या पार्लमेंटाच्या हातांत जसाच्या तसा कायम आहे. हिंदुस्थानांतील कौन्सिलकडे या अधिकाराचा भाग देण्यांत आलेला नाहीं. म्हणजे खऱ्या सत्तेचीं वाटणी झालेली नाहीं. राजसत्तेंत हिंदुस्थानाला भागीदार म्हणून घेतलेलें नाहीं. मिठावरील कराच्या वादविवादानें ही गोष्ट आतां सिद्ध झालेली आहे. नवीनपणामुळें अमृतसरच्या वेळीं नव्या कायदेकौन्सिलांत जो किंचित् मोहकपणा दिसत होता तो मोहकपणा भ्रामक आहे असें आतां सिद्ध झालें आहे. हा भ्रम दूर झाल्यानंतर कौन्सिलांत शिरण्याचा कौन्सिल-वाल्या पक्षाचा हट्ट कां ? या प्रश्नाचें उत्तर कौन्सिलवाला पक्ष असें देतो कीं , कौसिलवर बहिष्कार घालून बाहेर स्वार्थत्यागाची चळवळ करून नोकरशाहीचें धोरण बदलूं म्हणून जी अपेक्षा धरण्यांत आली होती ती सफल झालेली नाहीं; तेव्हां आत्मक्लेशास कंटाळून आम्ही कौन्सिलांत शिरून कौन्सिलच्या कामकाजाच्या पद्धतीच्या गाडयाला खीळ घालून कांहीं निष्पन्न होतें किंवा कसें हें पाहणार आहोंत. आत्मक्लेशाच्या चळवळीला कंटाळलों आहों, तेव्हां कमी दगदगीच्या या मार्गानें तरी आम्हीं उद्योग कां करूं नये? कंटाळ्यामुळें म्हणा, किंवा तितकी श्रद्धा अंगीं नसल्यामुळें म्हणा, ज्यांना दगदगीचा मार्ग नको आहे त्यांनीं खुशाल आरामाच्या मार्गानें जावें. पण राष्ट्राच्या कल्याणाचाच हा आरामाचा मार्ग आहे अशीं विधानें करून लोकांचा बुद्धिभेद करूं नये. आरामाची लालूच स्वयंसिद्ध आहे. ह्या लालुचीला बळी पडूं नका म्हणून कोणी कितीहि सांगितलें तरी ज्यांना दगदग सोसत नाहीं, ते आरामाचा मार्ग स्वीकरणार. पण हा आरामचा मार्ग

म्हणजेच सत्पक्ष होय, अशी दिशाभूल करणें प्रामाणिकपणाचें लक्षण नव्हे. आरामाच्या कौन्सिलाच्या मार्गानें जाऊन नेमस्तांपेक्षां तुम्ही अधिक काय करणार ? बऱ्या वाईट सर्व गोष्टींना अडथळा करून कौन्सिलच्या गाडयाला खीळ घालणार, असें गयेच्या काँग्रेसच्या पूर्वी कौन्सिलवाल्या पक्षानें आपलें ध्येय जाहीर केलें. पण गेल्या चार पांच महिन्यांत हें ध्येय देखील टिकलेलें नाहीं. देशबंधू दास या ध्येयावर आतां जोर देत नाहींत. देशबंधु दास यांचें ध्येय घ बिझांटबाईचें ध्येय आतां जवळ जवळ आलें आहे. प्रतियोगी सहकारिता, प्रतियोगी असहकारिता किंवा कौन्सिलें मोडणें अशा प्रकारचें वर्णन आपल्या ध्येयासंबंधानें कौन्सिलवाल्या पक्षानें केलें आहे. या पक्षाचे मुंबईचे अध्यर्यू मि. नटराजन हे आहेत. कौन्सिलें मोडण्याचें ध्येय यांना बिलकूल पसंत नाहीं. कौन्सिलांत अडथळा आणून कौन्सिलांच्या गाडयाला खीळ घालण्यांत अर्थ नाहीं, तर उलट कौन्सिलांचा जितका उपयोग करून घेतां येईल तितका करावा, अशा प्रकारचा ताजा उपदेश इंडियन सोशल रिफार्मरमध्यें मि. नटराजन यांनीं कौन्सिलवाल्या पक्षाच्या अनुयायांना केला आहे. केळकर खीळ घालतों म्हणून धाक घालणार, जरा थांबा म्हणून जयकर म्हणणार, आणि पटेल साहेबांनीं खीळ घातलीच तर नटराजन ती काढून टाकणार, अशी चौघांची चार दिशेला चार तोंडे कौन्सिलवाल्या पक्षाचीं झालीं आहेत. असला हा पक्ष कौन्सिलांत करणार तरी काय ! मिठाबरील्ल करासंबंधानें जसे आज कांहीं सभासदांनीं राजीनामे दिले आहेत, व जसे कांहीं सभासद लाटसाहेबांच्या सूचना हाणून पाडण्याकरितां अस्तन्या सारीत आहेत, त्याप्रमाणें बागण्यापलीकडे कौसिलवाल्या पक्षाच्या हातून कांहीं होईल असें कोणी म्हणत नाहीं. मग कौन्सिलवाल्या पक्षाचें कौन्सिलांत शिरण्याचें कारण कोणतें शिल्लक राहिलें ? नोकरशाहीला चेसण घालण्याचें धोरण जर कौन्सिलांत साधण्यासारखें नाहीं तर कौन्सिलांत

जा कशाला ? इतर चळवळींतील दगदग सोसवत नाहीं तेव्हां आरामाच्या मार्गानें आपणांस जाऊं द्या, या पलिकडे कौन्सिलवाल्या पक्षाच्या चळवळींत कांहीं तथ्यांशच रहात नाहीं. दगदगीची चळवळ निर्फळ झाली आहे तेव्हां थोडा वेळ विसावा घेण्यास कोणती हरकत ? विसावा घ्यावयाचा असेल तर कार्यहानि जेथें वसण्यानें होते तेथें वसून विसांवा घेणें चांगलें नाहीं. विसावा घेण्याकरितां किंवा झोप घेण्याकरितां उद्योगाच्या मार्गांत हातपाय पसरणें शहाणपणाचें नव्हे. विसावा घ्यावयाचा तर सरळ विसावा घ्या ! इतरांच्या मार्गांत आडवे पडूं नका. इतरांचा मार्ग दगदगीचा व आत्मक्लेशाचा आहे, खांच खळग्यांनीं भरलेला आहे. ठेचा खातखात हा मार्ग धोपट मार्ग बनावयाचा आहे. नोकरशाहीचे दगड मार्गांत ठिकठिकाणीं आहेत. या फत्तरावर आपटल्यामुळें कित्येकांचें हातपाय मोडले आहेत, तर कित्येकांचें मस्तक रक्तबंबाळ झालें आहे. अशा प्रकारच्या हालअपेष्टा जाणून बुजून सोसून जे स्वार्थत्यागी लोक अंधारांत राष्ट्राचा नवा मार्ग साफसूफ करीत आहेत, त्यांच्याच मार्गांत आरामासाठीं बडया धेंडांनीं हातपाय पसरून पडावें, व आमच्या ठेंचाहि तुम्हांला लागून आणखी हातपाय मोडले तरी हरकत नाहीं असा धाक घालण्यास प्रवृत्त व्हावें, हें आरामाच्या लालुचीनें मूढ बनण्याचें लक्षण होय ! असहकारितेचा मार्ग धोक्याचा आहे. ह्या मार्गांत कोणास आराम मिळावयाचा नाहीं. दुःख व कष्ट सोसणें हेंच या मार्गांतील जीवित होय ! केवळ श्रद्धेमुळें असला दुःखाचा मार्ग राष्ट्रांतील कर्ते पुरुष पत्करीत असतात, श्रद्धेमुळें असल्या दुःखांत सुख उत्पन्न होतें, आणि श्रद्धेच्या जोरावरच या दिशेनें जाणाऱ्या मार्गाचा टिकाव लागून अखेर यश येतें. ही श्रद्धा टळमळीत होण्याइतकें गेल्या तीन वर्षांत कांहीं झालें आहे काय ? खिलाफतच्या प्रश्नाकडे जर पाहिलें तर काय दिसून येतें ? अल्लीबंधु व महात्मा गांधी यांनीं श्रद्धेनें ही चळवळ सुरू केली

नसती तर गेल्या वर्षी ग्रीसला बेशरमपणानें उघड उघड मदत करण्यास इंग्लंड पुढें सरसावलें नसतें का ? लॉर्ड कर्झन ह्यांच्या धोरणास एक प्रकारचा आळा खिलाफतच्या चळवळीनें घातला आहे. अकालींच्या चळवळीला यश आलें ते कशामुळें ? असहकारितेच्या कायदेभंगाच्या चळवळीमुळेंच ना ? ज्या नागपूर प्रांतांत आपखुशीनें तुरुंगांत जाण्यास पांच दहा म्हणजे हाताच्या बोटावर मोजण्याइतकी मंडळी मिळणें मुष्कील होतें, तेथें तुरुंगांत जाणारांचीं संख्या शेकडयांनीं मोजण्याइतका उत्साह असहकारितेनें उत्पन्न केलेला नाहीं कांय ? हिंदुस्थानचे नवे सेक्रेटरी लॉर्ड पील किंवा अंडर सेक्रेटरी अर्ल विंटरटन हे हिंदुस्थानची नाडी पाहून हिंदुस्थानची प्रकृति पार्लमेंट सभेला कळवितांना असहकारितेच्या चळवळीचा इतका जोर कमी झाला किंवा वाढला असा हिशोब नेहमीं देत असतात. कौन्सिलवाला पक्ष उत्पन्न झाला आहे हें आपल्या पथ्यावरचेंच आहे असें स्टेट सेक्रेटरी साहेबांना वाटतें. ह्यावरून नोकरशाहीला वेसण घालणारा कोणता पक्ष असेल तर तो असहकारवाद्यांचाच होय, अशी प्रतिपक्षानें कबुली दिली आहे हें सिद्ध होत नाहीं काय ? पंडित मोतीलाल नेहरू यांनीं परवां असे उद्गार काढले आहेत कीं, जर संयुक्त प्रांतांतील पुढाऱ्यांनीं त्यांना शिक्षा झाल्या होत्या या सबबीवर कायदे कौन्सिलांना उमेदवार म्हणून उभे राहण्यास मनाई करण्यांत आली तर असहकारितेच्या इतर मार्गांत पडून नोकरशाहीची खोड मोडण्यास पंडितजी व त्यांचे अनुयायी कमी करणार नाहींत. पंडितजींनीं घातलेल्या या धाक्याचा अर्थ काय ? शांततेच्या कायदेभंगाच्या चळवळीला आज नाहीं उद्यां यश आलेंच पाहिजे, आणि नोकरशाहीच्या नाकांत वेसण घातली गेलीच पाहिजे, अशा तऱ्हेचा विश्वास ह्या धाक्याच्या बुडाशीं नाहीं काय ? रत्नागिरीस कौन्सिलवाल्यांचें सम्मेलन झालें, त्या सम्मेलनांतहि मुळशी सत्याग्रहास मदत करून स्वयंसेवकांनीं

तुरुंगांत जावें असा ठराव पास झाला. राष्ट्राला तुरुंगाच्या खड्ड्यांत पाडूं नका म्हणून उपदेश करणारांनीं हा ठराव पास कसा होऊं दिला ? कायदेभंगाच्या चळवळीवर अंतःकरणाच्या उमाळ्यांत विश्वास आहे, पण आरामाच्या लालुचीमुळें कौन्सिलांत शिरावेंसें वाटतें, असा दोन मतांचा झगडा रत्नागिरीच्या ठरावांत किंवा पंडितजींच्या उद्गारांत दिसून येत नाहीं काय ? लाहोरचें ट्रिब्यून पत्र कौन्सिलवाल्या पक्षाचें आहे; पण या पत्रानें देखील नागपूरच्या व मुळशीच्या सत्याग्रहाची पाठ थोपटण्यास कमी केलेलें नाहीं. ह्यावरून असें सिद्ध होतें कीं, महात्मा गांधी यांचा आत्मयज्ञाचा मार्ग संकटाचा जरी असला तरी खरा मार्ग व सत्पक्ष या नात्यानें त्या मार्गाची बरोबरी सांप्रतच्या राजकीय परिस्थितींत दुसरा कोणताहि मार्ग करूं शकणार नाहीं. सर्व मार्गाची तुलना करतां असहकारितेच्या मार्गाचे वजन सर्वांत अधिक भरतें. मग निवडणुकीच्या वेळीं आपल्या बहिष्काराचीं तत्त्वें लोकांच्या मनावर बिंबविण्याकरतां राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांनीं चळवळ करूं नये, असा उलट हट्ट धरण्यास कौन्सिलवाल्या पक्षास कोणता अधिकार पोचतो ?

---

* कौन्सिलांच्यां बहिष्काराची चळवळ बंद ठेवण्याचा ठराव

ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या शनिवार सकाळच्या बैठकींत शुक्रवारचा वादविवाद पुढें चालविण्यांत आला, आणि सकाळीं ८॥ वाजतां सुरू झालेला वादविवाद १॥ वाजण्याचे सुमारास संपून २ वाजतां मतें घेण्यांत येऊन कौन्सिलांच्या बहिष्काराची चळवळ बंद ठेवण्याचा ठराव ९६ मतें अनुकूल पडून पास झाला. या ठरावास ७१ मतें विरुद्ध पडली, व १०–१२ असामींनीं मतें दिलीं नाहींत. चळवळ बंद ठेवण्याचा ठराव संयुक्त प्रांतातर्फे श्री. पुरुषोत्तमदास टंडन यांनीं पुढें आणलेला होता व या मताचें समर्थन श्री. टंडन व पंडित जवाहिरलाल नेहरू यांनीं केलें होतें. हे दोघेहि पूर्ण असहकारवादी असून काँग्रेसच्या इतर कामकाजास सांप्रतच्या दुहीमुळें फार हरकत येते तेव्हां कौन्सिलवाल्या पक्षाशीं तेढ उत्पन्न होऊं नये म्हणून बहिष्काराची चळवळ बंद ठेवावी, असें या दोघांचें मत पडलें. बहिष्काराची चळवळ बंद ठेवणें म्हणजे गयेच्या काँग्रेसचा बहिष्काराचा ठराव अजिबात न मानणें नव्हें; मतदारांनीं मतें देऊं नयेत, आणि उमेदवार उभे राहूं नयेत असा गयेच्या काँग्रेसचा ठराव आहे. मते देऊं नयेत हें तत्व कायम आहे मात्र मतदारांनीं मतें देऊं नयेत किंवा उमेदवार म्हणून उभे राहूं नये म्हणून काँग्रेसतर्फे जी चळवळ करावयाची ती चळवळ तेवढी बंद ठेवावी, असा ऑल इंडिया काँग्रेस कमेटीनें कालच्या आपल्या बैठकींत बहुमतानें ठराव पास केला. बहिष्काराचा संबंध ठराव अधांत्री ठेवण्यांत आला नाहीं हे खरें आहे, तथापि या ठरावाला अनुसरून जी चळवळ करावयाची

---

* नवाकाळ, ता. २७ मे १९२३

ती करूं नये असा ठराव ऑल इंडियानें केल्यामुळें कौन्सिलवाल्या पक्षाचा कालच्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटींत एक तऱ्हेचा विजय झाला, असें म्हणण्यास हरकत नाहीं. कौन्सिलवाल्या पक्षाचीं अधिक मतें पडलीं तीं पंजाब, दिल्ली, संयुक्तप्रांत, व बंगाल येथून पडलीं. बिहार प्रांताशिवाय उत्तर हिंदुस्थानांतील बंगालसकट सर्व प्रांतांतील प्रतिनिधि कौन्सिलचा बहिष्कार अधांत्री ठेवण्यास तयार होते. बंगाल्यांत या बाबीसंबंधानें ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या सभासदांत दोन्ही बाजूचे सभासद सामान्यतः सारखे आहेत. पण देशबंधु दास यांचें अनुयायी सर्वच आले होते व बाबू शामसुंदर चक्रवर्ती यांचे अनुयायी थोडे आले होते. संयुक्त प्रांताचा मुख्य भरणा पंडित पुरुषोत्तमदास टंडन यांच्याच बाजूचा होता; विरुद्ध असलेले दोन तीनच सभासद होते. नागपूर, वऱ्हाड व महाराष्ट्र यांची स्थिति गयेच्या काँग्रेसचे सब्जेक्ट कमिटीसारखीच होती. गुजराथ, मुंबई कर्नाटक व मद्रास इलाखा येथील प्रतिनिधींत बहुमत बहिष्कारास अधांत्री ठेवण्याच्या ठरावाविरुद्ध होतें. देवी सरोजिनी नायडू आणि टी. प्रकाशम् यांच्या दर्जाचे पुढारी अधांत्री ठेवण्याच्या बाजूला गेल्यामुळें दक्षिण हिंदुस्थानांतीलहि कांहीं प्रतिनिधि गयेच्या वेळच्या स्थितींतून फुटले. डॉ. अन्सारी यांचीं मतें बदललेलीं नाहींत आणि बहिष्काराची चळवळ करणें उचित आहे असेंहि त्यांना वाटतें. पण हिंदु-मुसलमानांची बेकी होऊन ती बेकी हटविण्याचें सामर्थ्य काँग्रेसमधील दुहीमुळें काँग्रेसच्या हातून निघून जात आहे, आणि हें सामर्थ्य गमावण्यापेक्षां बहिष्काराची चळवळ करून उत्पन्न होणारें सामर्थ्य गमावलें तरी पत्करलें, असें डॉ. अनसारी यांचें मत पडलें आणि याच मताचा अनुवाद देवी सरोजिनी नायडू यांनीं केला. हिंदुमुसलमानांच्या बेकीसंबंधाच्या वरील विचारास डॉ. अन्सारी व देवी सरोजिनी नायडू यांनीं वरील प्रकारें उचलून धरल्याकारणाने मुसलमानांच्या मतीनें वजन कौन्सिलवाल्यांच्याच

पारड्यांत पडलें, आणि कालच्या ऑल इंडिया काँग्रस कमिटीमध्यें २४ चें मताधिक्य त्यांना मिळालें. कालच्या बैठकींत मि. जॉर्ज जोसेफ, रा. अणे, रा. केळकर, श्री. पुरुषोत्तमदास, डॉ. अनसारी, श्री. वल्लभभाई पटेल, श्री. पट्टाभि सीतारामय्या, बाबू घोष, बाबू राजेंद्रप्रसाद, श्री. राजगोपाळाचारियर, टी. प्रकाशम्, देवी सरोजिनी नायडू, शेवटी अध्यक्ष देशबंधु दास यांची आपापल्या पक्षातर्फे भाषणें झालीं. जादा काँग्रेस भरवून राजकीय परिस्थितीचा विचार करण्यांस कौन्सिवाला पक्ष बिलकूल तयार न झाल्यामुळें जादा काँग्रेसचा प्रश्न वादविवादांत सामान्यतः मागेंच पडल्यासारखा होता. हिंदुमुसलमानांची एकी आणि कौन्सिलवाला पक्ष व काँग्रस पक्ष यांच्यांतील तेढ मिटविणें, हे दोन मुद्दे वादविवादाकरितां पुढें आलेले होतें. याशिवाय महात्मा गांधी यांच्या असहकारितेची चळवळ निरुपयोगी झाली किंवा कसें हाहि मुद्दा प्राधान्येंकरून पुढें आणण्यांत येत होता. रा. अभ्यंकर, रा. केळकर वगैरे मंडळींच्यातर्फे असहकारितेची चळवळ फोल झाली आहे, असें सांगण्यांत आलें. रा. केळकर, रा. अभ्यंकर यांनीं या चळवळीसंबंधानें शक्य तेवढें बोलून टाकलें. शाळा व कोर्टें यांच्यासंबंधानें बहिष्काराची चळवळ जशी अस्तास गेली आहे, तशी कौन्सिलांच्या संबंधानें देखील चळवळ अस्तास जाणार, असें रा. केळकर यांनीं आपलें ठाम मत दिलें. मि. जोसेफ यांनीं असहकारितेच्या चळवळीस उचलून धरतांना सांप्रत या चळवळींत जोम कमी दिसत आहे, त्यांचें कारण वर्किंग कमिटींतील असहकारितेच्या चळवळीच्या पुरस्कर्त्यांची भीतभीत काम करण्याची पद्धत होती, असें आपलें स्पष्ट मत दिलें. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनें कौन्सिलवरील बहिष्काराची चळवळ बंद ठेवल्यानें दोन्ही पक्षांची तेढ नाहींशी होणें शक्य नाहीं, हाहि मुद्दा ऑल इंडिया काँग्रेस कमिटीपुढें मांडण्यांत आला. प्रामाणिक मतभेदांमुळें दोन पक्षांची चळवळ निरनिराळ्या स्वरूपाची

होणार आंणि तेवढ्यापुरता दुजाभाव दिसून येणारच. भिन्न मतें प्रदर्शित करीत असतांना, किंवा त्या मतांना अनुसरून चळवळ करीत असतांना एकमेकांचीं मनें विनाकारण दुखवूं नयेत असें श्री. राजगोपाळाचारीयर याचें म्हणणें पडलें. तेढ नाहींशी करण्याकरितां मनामध्यें दुष्टभाव ठेवूं नये म्हणजे झालें. पण यापलीकडे जाऊन आपली चळवळ बंद ठेवणें प्रामाणिकपणाचें नव्हे. अशा रीतीनें चळवळ बंद ठेवणें म्हणजे विरुद्ध पक्षाच्या चळवळीकडे एक प्रकारें कानाडोळा करणें होय. असा कानाडोळा करण्यापासून कोणत्याच पक्षास खरा फायदा होत नाहीं. ऑल इंडिया काँग्रेस कमिटींत चळवळ बंद ठेवण्याचा ठराव केला तरी हा ठराव कोणत्या पक्षाच्या हिताकरितां अंमलांत आणावयाचा हें पहावयास नको काय? कौन्सिलवाल्या पक्षाच्या हिताकरितां अंमलांत आणावयाचा, म्हणजे असहकारवाद्यांनीं आपलीं मतें निष्कारण सोडून देणें होय. शिवाय जो कौन्सिलवाला पक्ष गयेच्या काँग्रेसचा ठराव धाब्यावर ठेवण्यास तयार झाला आहे, त्याच कौन्सिलवाल्यांकरितां तुम्हीं आपली चळवळ बंद ठेवा म्हणून ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनें जो ठराव केला आहे त्या ठरावाची अंमलबजावणी काँग्रेसच्या अनुयायांनीं तरी कां करावी? काँग्रेसच्या ठरावाकडे दुर्लक्ष करण्यास आज ऑल इंडिया काँग्रेस कमेटीनें सांगितलें आहे. काँग्रेसचे अनुयायी असें म्हणणार कीं, ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचा हा ठराव न मानतां गयेच्या काँग्रेसचा ठरावच कां मानूं नये? श्री. वल्लभभाई पटेल वगैरे मंडळींनीं ऑल इंडिया काँग्रेस कमिटीमध्यें अधांत्री ठेवण्याच्या या ठरावाची अम्मलबजावणी होणार नाहीं, असें ऑल इंडिया काँग्रेस कमिटीस कळविण्यास कमी केलें नाहीं. वर्किंग कमिटींतील असहकारवाद्यांचे आजचे पुरस्कर्ते श्री. राजगोपाळाचारियर, श्री. वल्लभभाई पटेल, दे. गंगाधरराव देशपांडे, बाबू राजेंद्रप्रसाद, बाबू ब्रजकिशोर प्रसाद, शेठ जम्नालाल बजाज

वगैरे मंडळी बहिष्काराची चळवळ अधांत्री न ठेवतां, कौन्सिलवरील बहिष्काराची चळवळ जोरानें चालविण्याचा निश्चय करण्याचा संभव असल्याबद्दल ऑल इंडिया काँग्रेस कमिटींत पर्यायानें सांगण्यांत आलें. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनें जरी हा ठराव पास केला तरी कौन्सिलवरील बहिष्काराची चळवळ निरनिराळ्या प्रांतांत चालू ठेवण्यास या ठरावामुळें कोणतीच हरकत येणारी नाहीं. पंजाब, दिल्ली व संयुक्त प्रांत ह्या प्रांतांत मात्र कौन्सिलवरील बहिष्काराची चळवळ जोरानें होणार नाहीं. तेथील पुढाऱ्यांत प्रमुख असलेले लोक कौन्सिलवाले बनले आहेत. डॉ. अन्सारी, श्री. संतानम् वगैरे असहकारितावादी पंजाब–दिल्लीचे पुढारी अधांत्री पक्षाचेझाले आहेत. कौन्सिलांविरुद्ध बहिष्काराची चळवळ जोरानें करण्यास लायक असलेला पुढारी पंजाब, दिल्ली व संयुक्तप्रांत येथें उरलेला नाहीं. पंडित पुरुषोत्तमदास टंडन व पंडित जवाहरलाल नेहरू हे असहकारवादी असले तरी अधांत्री पक्षाचे झाले आहेत. तेव्हां पंजाब, दिल्ली, व संयुक्तप्रांत येथें लायक पुढाऱ्यांच्या अभावामुळें अधांत्री ठरावाची अंमलबजावणी बऱ्या रीतीनें होईल हें खरें आहे. इतर प्रांतांत या ठरावाची अंमलबजावणी होईल, असें आम्हास वाटत नाहीं, उलट या ठरावामुळें कौन्सिलवरील बहिष्काराचे चळवळीस अधिक जोर येण्याचा संभव आहे. बहार प्रांतांत या ठरावाचा कांहीं उपयोग नाहीं; उलट या ठरावामुळें तेढ मात्र अधिक वाढत जाणार आहे. बंगाल्यांत तेढ मिटविण्यास या ठरावापासून कांहीं फायदा होणार नाहीं. बाबू शामसुंदर चक्रवर्ती यांनीं बारिसाल येथें प्रांतिक काँग्रेस कमिटीमध्यें काँग्रेसच्या इतर संस्थांना काँग्रेसविरुद्ध जाण्याचा अधिकार नाहीं असें आपलें स्पष्ट मत दिलें असल्यामुळें बंगालच्या दृष्टीनें विचार करतांना कालच्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीमध्यें झालेला ठराव पोकळ मानला पाहिजे. कालच्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटींत बारिसालचा वादविवाद

दोन तीन वेळ निघाला होता. पण देशबंधु दास यांनीं अध्यक्ष या नात्यानें या वादविवादास दाबूनच टाकलें. कौन्सिलवाला पक्ष हा बंडखोर पक्ष आहे, असें मि. जॉर्ज जोसेफ यांनीं स्पष्ट सांगितलें. या बंडखोर पक्षास मदत देऊं नये म्हणून व काँग्रेससंबंधाचें आपलें कर्तव्यकर्म नीट रीतीनें पार पडून देशसेवा घडावी, म्हणून ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या कालच्या ठरावासंबंधानें काँग्रेसच्या पक्षानें कौन्सिलवाल्या पक्षाचें अनुकरण करून बंड कां करू नये? या विचासरणीस अनुसरून श्री. वल्लभभाई पटेल वगैरे तीन चार पुढाऱ्यांचीं स्पष्ट भाषणें झालीं. बंगाल, गुजराथ, कर्नाटक, मद्रास, वगैरे प्रांतांत कालच्या ठरावाची अंमलबजावणी होणार नाहीं व कौन्सिलावरील बहिष्काराची चळवळ पंजाब, दिल्ली, व संयुक्तप्रांत याशिवाय इतर ठिकाणीं चालूच राहील, असें कालच्या वादविवादानें स्पष्ट केलें आहे. देशबंधु दास यांनीं आपल्या शेवटच्या भाषणांत काँग्रेस-विरुद्ध आपण बंड केलें नाहीं व करणार नाहीं असें सांगितलें. मानसिक वृत्ति पालटण्यासंबंधानें असहकारितेची चळवळ यशस्वी झाली आहे, हें देशबंधु दास यांनीं कबूल केलें. पण प्रत्यक्ष व्यवहाराचे दृष्टीनें असह-कारितेची अंमलबजावणी होत नसल्यामुळें, कौन्सिलांत शिरून तेथें असह-कारितेचा मार्ग स्वीकारण्यास आपण प्रवृत्त झालों आहों, असें त्यांनीं जाहीर केलें. कोणी काणाडोळा करून होणारी मदत आपणाला नको आहे व काँग्रेसवाल्या पक्षास स्वतःच्या तत्त्वांना अनुसरून काँग्रेससाठीं जेवढी मदत करणें इष्ट वाटेल, तेवढीच मदत देशबंधु दास यांना पाहिजे आहे, असें त्यांनीं सांगितलें. तेढ उत्पन्न होऊं नये म्हणून बहिष्काराचा ठराव अधांत्री ठेवणें हें कितपत जरूरीचें आहे? देशबंधु दास यांना जशी कोणाच्या काणाडोळ्यांची मदत नको आहे, त्याच प्रमाणें श्री. वल्लभभाई पटेल वगैरे मंडळींनाहि कौन्सिलवाल्या पक्षाच्या काणा डोळ्याची मदत नको आहे.

कौन्सिलांच्या मार्फत किंवा कौन्सिलांमध्यें बसून असहकारितेच्या चळवळीस डोळेझाकीच्या मदतीहून अधिक मदत होणें शक्य नाहीं. स्वतःच्या पक्षाचें हित होतें असें वृथा समजून आपली चळवळ तरी कौन्सिलच्या निवडणुकीच्या वेळीं असहकारवाद्यांनीं बंद कां ठेवावी ? कौन्सिलवाला पक्ष स्थापल्यानें देशबंधु दास हे जर राष्ट्रीय सभेविरुद्ध बंडखोर ठरत नाहींत तर ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचा कालचा ठराव न मानल्यानें कोणीहि काँग्रेसचा अनुयायी बंडखोर ठरणार नाहीं, हें उघड आहे. हिंदु–मुसलमानांची बेकी मोडतांना तुम्हां काँग्रेसच्या अनुयायांचे आपापसांत जर तट आहेत तर तुम्ही तरी आमची बेकी कशाला मोडतां, असेंच पंजाबांत काँग्रेसच्या पुढाऱ्यांना सांगण्यांत येतें हें खरें आहे. पण पंजाब व संयुक्तप्रांत यांच्याबाहेर हिंदु–मुसलमानांच्या तंटयाला फारसें महत्त्व नसल्यामुळें हिंदु–मुसलमानांची बेकी मोडण्याकरितां स्वतःचीं मतें सोडून देण्यास कोणी तयार होईल असें आम्हांस वाटत नाहीं. कौन्सिलांमध्यें शिरण्याच्या लोभामुळेंच हिंदु–मुसलमान, ब्राम्हण–ब्राम्हणेतर या बेक्या उत्पन्न झाल्या आहेत. या बेक्यांचीं भूतें असहकारवाद्यांच्या चळवळीनें गेलीं तीन वर्षें गाडल्यासारखी केलीं होतीं. कौन्सिलवाला पक्ष पुढें येण्याबरोबर हीं भूतें पुन्हां नाचूं लागलीं आहेत. या भुतांचे नाच ज्यांना कमी करावयाचे असतील, आणि खऱ्या ऐकीच्या जोरावर काँग्रेसचें पाऊल ज्यांना पुढें पाडावयाचें असेल, त्यांनीं निदान मि. जोसेफ यांनीं कालच्या बैठकींत सांगितल्याप्रमाणें डळमळीतपणा सोडून देऊन जोरकसपणानें बहिष्काराची चळवळ पुढें चालवून काँग्रेसची सेवा करण्यास तयार झालें पाहिजे, यांत संशय नाहीं.

* महाराष्ट्र काँग्रेस कमिटी

ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनें गेल्या सोमवारीं महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटी आणि नागपूर मराठी प्रांतिक काँग्रेस कमिटी यांच्यासंबंधाच्या वादाचा निकाल लावला, आणि दे. शिवरामपंत परांजपे यांच्या प्रांतिक काँग्रेस कमिटीस कायदेशीर ठरविलें व नागपूरचे डॉ. मुंजे यांच्या तक्रारी फोल ठरविल्या. पुण्याचा व नागपुरचा हा वाद गेल्या डिसेंबरपासून सुरूं झाला. या वादाचा अखेरचा निकाल लागण्यास पुरे सहा महिने लागले. कोणत्याहि प्रांतिक काँग्रेस कमिटीचें आयुष्य अवघें बारा महिन्याचें असतें. या बारा महिन्यांपैकीं सहा महिने नागपूरच्या व पुण्याच्या कौन्सिलवाल्या पक्षानें शाब्दिक हरकती घेऊन खाऊन टाकलें ! महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटी-संबंधानें गेल्या नव्हेम्बरमध्यें उत्पन्न झालेल्या वादाचा निकाल करण्याकरितां बॅ. सेनगुप्ता व दे. गंगाधरराव देशपांडे यांची कमेटी नेमली होती. ह्या कमिटीनें दोन्ही पक्षांत तडजोड करून, व तडजोडीवर दोन्ही पक्षांच्या सह्या घेऊन दोन्ही पक्षांच्या कबुलीनें निकाल दिला. गयेच्या राष्ट्रीय सभेमध्यें जर कौन्सिलवाल्या पक्षाचे ठराव बहुमतानें पास झाले नाहींत, तर पुण्याच्या कौंसिलवाल्या पक्षानें प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या हुद्यांच्या जागा जानेवारी, अखेर सोडून मोकळें झालें पाहिजे, असा ठराव स्पष्ट होता. या ठरावास स्वतः सह्या करून कौन्सिलवाल्या पक्षानें कबुली दिली होती; पण बॅ. जम्नादास मेथा हे गेले सहा महिने महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणून मिरवतच होते ! अशा मिरविण्याची त्यांची त्यांनाच खंत आल्यामुळें म्हणा अथवा इतर कारणामुळें म्हणा, रत्नागिरीच्या सम्मेलनाच्या पूर्वी त्यांनीं

---

* नवाकाळ, ता. ३० मे १९२३

आपल्या मिरविण्याचा राजीनामा दिला, आणि विनदिक्कतपणांत त्यांच्यावर वरचढ करूं पाहणारे रा. भोपटकर रत्नागिरींत अध्यक्ष म्हणून मिरवूं लागले ! वर्किंग कमिटीनें ह्या दुहीच्यावेळीं निकाल दिला, पण वर्किंग कमिटीसच अधिकार नाहीं असा मुद्दा काढून ऑल इंडिया काँग्रेस कमिटीकडे अपील केलें गेलें. बॅ. सेनगुप्ता व दे. गंगाधरराव देशपांडे यांना ज्या मुद्यांचा निकाल लावावयास सांगितलें होतें, त्या मुद्यांचा निकाल त्यांनीं लावला. त्यानंतर झालेल्या निवडणुकीसंबंधाच्या वादाचा निकाल प्रांतिक काँग्रेस कमिटीनें लावावयाचा नाहीं, किंवा वर्किंग कमिटीनें लावावयाचा नाहीं तर कोणी लावावयाचा ? मुंबईंत भरलेल्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनें चार निवडक सभासदांची कमिटी नेमून त्यांजकडे बॅ. जमनादास मेथा यांचें अपील निकालाकरितां दिलें. ह्या कमिटीनें सेनगुप्ता व देशपांडे यांना ज्या मुद्यांचा निकाल लावण्यास सांगितलें होतें त्या मुद्यांपुरताच त्यांना अधिकार होता; आणि त्यानंतर उपस्थितींत झालेल्या सर्व मुद्यांचा निकाल लावण्याचा अधिकार वर्किंग कमिटीस होता, व दे. शिवरामपंत परांजपे यांच्या कमिटीस तोतया म्हणण्याची कौन्सिलवाल्या पक्षाची संवय अत्यंत गर्हणीय आहे, असें आपलें मत दिलें आणि ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनें हें मत मान्य केलें. अखेरीस निकाल योग्यच झाला, ही संतोषाची गोष्ट होय. पण गेले सहा महिने पुण्याच्या कौन्सिलवाल्या पक्षानें महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या बोकांडीं बसून एखाद्या भुतानें जसें पछाडावें त्याप्रमाणें सज्जनांचा छळ केला त्याची वाट काय ? सहा महिन्यांच्या या तंट्यावरून बॅ. जमनादास मेथा किंवा रा. भोपटकर यांच्या सारखीं भुतें पुण्याच्या वेताळाच्या आज्ञेवरून जर दिवसाढवळ्या सज्जनांचे पाय ओढूं लागलीं तर लोकांनीं कसें वागावें ? प्रांतिक काँग्रेस कमिटी, वर्किंग कमिटी, किंवा ऑल इंडिया काँग्रेस कमिटी, किंवहुना काँग्रेस यांच्यापाशीं सरकारी पोलिसांसारखें, असल्या भुतांना

मिरच्यांचा धूर देऊन नाकधुऱ्या काढावयास लावणारें हत्यार नाहीं, हत्यार असलें तरी या हत्याराचा हे कधींहि उपयोग करणार नाहींत, ही गोष्ट येथें विसरतां कामा नये. मग असल्या भुतांना समाजांत स्वैरसंचार करण्यास पूर्ण मोकळीक आहे असेंच समजावयाचें किंवा कसें ? जर पूर्ण मोकळीक मिळाली तर सार्वजनिक फंड व सार्वजनिक कामें, यांचें मातेरें करण्यास हीं भुतें कधीहि कमी करणार नाहींत. सहा महिने अध्यक्ष नसतांना अध्यक्ष म्हणून मिरवावयाचें, दुसऱ्या प्रांतिक कमिटीचें येळकोट उभें करावयाचें, आपल्या संम्मेलनावर परिषद म्हणून शिक्का मारावयाचा, असला या भुतांचा धिंगाणा बंद पडणें सार्वजनिक कामकाजाच्या दृष्टीनें अत्यंत जरूरीचें आहे. हा धिंगाणा बंद पडण्यास एकच मार्ग आहे, आणि तो केवळ लोकांच्या हातीं आहे. एखाद्या शब्दाचा आधार घेऊन पाहिजे तसा धिंगाणा घालावयास मोठीशी बुद्धि लागते अशांतला भाग नाहीं; उद्दाम अरेरावीपणा अंगीं असला म्हणजे एखादा महाजन, एखादा भोपटकर, किंवा एखादा जमनादास हें काम सहज करूं शकतो. सार्वजनिक चारित्र्यांतील वर्तनाचे कांहीं सामान्य नियम जर अशा रीतीनें धाब्यावर बसविण्यांत आले तर लोकांनींच मनुष्यबळ व द्रव्यबळ या दोन्हीं दृष्टीनें असल्या भुतांना मदत करण्याचें बंद केल्याशिवाय या भुतांच्या चेष्टांना आळा बसणार नाहीं. कौन्सिलवाल्या पक्षास असें वाटत आहे कीं, लोकाश्रयाचा झरा आपल्या बाजूनें एकसारखा वहात राहणार आहे, आणि या लोकाश्रयाच्या जोरावर पाहिजे त्या सार्वजनिक कामांत वितुष्ट घालण्यास आपणांस हरकत नाहीं. सहा महिनेपर्यंत या मंडळीनें धिंगाणा घालून त्यांच्या म्हणण्यांत कांहीं अर्थ नव्हता असा निकाल ऑल इंडिया काँग्रेस कमिटीकडून या मंडळीनें करून घेतला ! तेव्हां यापुढें कोणत्याहि सार्वजनिक संस्थेंत पुण्याच्या कौन्सिलवाल्या पक्षाच्या भुतांना व वेताळांना सार्वजनिक दृष्टया मदत करण्याच्या वेळीं

पूर्ण विचार करूनच लोकांनीं मदत करावी लागेल, हें उघड आहे. एखादा फंड, किंवा एखादी संस्था यांच्या हातीं गेल्यावरोबर सार्वजनिक चारित्र्यांतील सज्जनांचें वर्तनाच्या नियमांना धाब्यावर बसवून सदर फंड व सदर संस्था आपल्या काटेरी लगामांत कायमची कशी राहील व आपल्या सभोंवारच्या भुतांना सदर फंडाचे जोरावर सार्वजनिक संस्थांतून पाहिजे तसा धिंगाणा घालण्यास कसें सांपडेल याच विचारांत पुण्याचा कौन्सिलवाला पक्ष नेहमीं निमग्न असतो, हें ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या सोमवारच्या निकालानें सिद्ध केलें आहे. सार्वजनिक चारित्र्यास एक प्रकारचा हिडिस रोग महराष्ट्रांत लागला आहे; आणि एकदां खुर्चीवर बसलें म्हणजे आपला अधिकार असो किंवा संपो, कांहीं केल्या खुर्ची सोडावयाची नाहीं; असलें दुष्ट उदाहरण पुण्याच्या कौन्सिलवाल्या पक्षानें सर्व महाराष्ट्रास घालून दिलें आहे. या रोगावर बाहेरून जें औषध द्यावयाचें तें ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनें दिलें आहे. पण बाहेरून ध्यावयाच्या औषधानें रोग पक्का बरा व्हावयाचा नाहीं. या रोगाचीं जीं बीजें सार्वजनिक चारित्र्यांत घुसून बसलीं आहेत, त्या बीजांवरहि लोकांनीं नजर पोंचविणें आतां भाग झालें आहे. एखाद्या जुन्या राजवाडयाच्या शिखरावर बसलेला पक्षी कावळा आहे का गरूड आहे हें लोकांनीं नीट न्याहळून पाहिलें पाहिजे आणि नीट तपासणी करून आपल्या आश्रयाला योग्य तें वळण त्यावेळीं दिलें पाहिजे. सार्वजनिक चारित्र्य शुद्ध ठेवण्याची खबरदारी घेतली नाहीं, तर एखाद्या राजवाडयाचें शिखर गांठण्यावरोबर कोणताहि कावळा गरुडाप्रमाणें मिरवूं शकतो आणि इतर कावळे जमवून कावकाव करून सार्वजनिक कामांत घोंटाळा घालूं शकतो, याची चांगली अद्दल गेले सहा महिने महाराष्ट्राच्या अनुभवास आली आहे. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनें दिलेल्या निकालाकडे पाहून महाराष्ट्रांतील सार्वजनिक चारित्र्यास असल्या ठेचा वारंवार न लागतील अशी खबरदारी लोकांनीं यापुढें घेणें जरूर नाहीं का ?

* विद्वान नाहींत

नागपूरच्या राष्ट्रीय निशाणाच्या अब्रूकरितां तुरुंगांत गेलेले लोक विद्वान नाहींत, हा नागपूरच्या चळवळीवर मोठा आक्षेप आहे. नागपुरास सत्याग्रह करणारे लोक निरनिराळ्या उद्योगधंद्यांत कामकाज करणारे आहेत; कॉलेजांतून शिकून विद्वान झालेले नाहींत; ही गोष्ट खरी आहे. ह्या पैकीं कांहींना राष्ट्रीय निशाण कसें असावें व राष्ट्राला या निशाणाचा काय उपयोग होतो, हें विनचूक सांगतां येत नाहीं; यापैकीं कांहींना स्वराज्याची व्याख्या देतां येत नाहीं; ह्या पैकीं कांहींना महात्मा गांधी यांची असहकारितेची चळवळ कोणत्या स्वरूपाची आहे, हें बरोबर समजत नाहीं; ह्या पैकीं कांहींना शांततेच्या कायदेभंगाची मीमांसा करण्याचें सामर्थ्य नाहीं; ह्या सर्व गोष्टी खऱ्या आहेत. ह्यांच्यापाशीं जें कांहीं आहे तें भक्तीभावाच्या स्वरूपाचें आहे; महात्मा गांधी यांच्या चळवळीवर एक प्रकारची त्यांची श्रद्धा आहे! नोकरशाहीमुळें दुनिया त्रस्त झाली असून सांप्रतच्या दुःखांतून सोडविण्याचें सामर्थ्य आत्मयज्ञांत आहे असा त्यांचा विश्वास आहे; जे पुढारी या आत्मयज्ञाची चळवळ करीत आहेत, त्या पुढाऱ्यांच्या संबंधानें यांच्याजवळ पूज्यबुद्धि आहे; त्यांचीं अंतःकरणें प्रामाणिक आहेत; आत्मयज्ञ करतांना शरीरक्लेश सोसण्याची उत्कट इच्छा त्यांच्या पाशीं आहे; पण विद्वान मात्र ते नाहींत. विद्वत्तेचें हें न्यून चव्हाटयावर आणण्याचा सपाटा सांप्रत नोकरशाहीनें चालविला आहे. नोकरशाहीच्या कच्छपीं असलेल्या पत्रकारांच्या बातमीदारांकडून ज्या बातम्या प्रसिद्ध होतात, त्या बातम्यांत नागपुरास तुरुंगांत जाणारे लोक विद्वान नाहींत, त्यांना काय चाललें आहे

---

* नवाकाळ, ता. २ जून १९२३

तें धड समजत नाहीं, दुसऱ्यांनीं सांगितल्यावरून ते तुरुंगांत जाण्यास तयार झाले आहेत, असे नानाप्रकारचे टोमणे नेहमीं दृष्टीस पडतात. अशा वेळीं आत्मयज्ञ करणाऱ्या लोकांच्या अंगीं असलेले सद्गुण किती योग्यतेचे आहेत, आणि विद्वान नाहींत हा दोष किती किंमतीचा आहे, याचा विचार करणें जरुरीचें झाले आहे. महायुद्धाशीं तुलना केली असतां नागपूरच्या सत्याग्रहाचा आत्मयज्ञ अगदी लहान आहे; पण त्या तेवढ्या मोठ्या महायुद्धाच्या वेळीं तरी इंग्लंडांत किती लोकांना हें महायुद्ध कोणत्या उच्च तत्त्वाकरितां सुरू झालें हें समजलें होतें? त्या वेळचे मुख्य मंत्री मि. ॲस्क्वीथ यांनीं महायुद्धाच्या प्रारंभीं कित्येक महिने इंग्लंड कशासाठीं लढत आहे हें शोधून काढण्याची खटपट केली. कित्येक महिन्यांची धडपड झाल्यानंतर इंग्लंडची संस्कृती नर्मन संस्कृतीहून अधिक चांगली आहे, असें कॉलेजांतील एका प्रोफेसरानें सांगितलें, आणि मि. ॲस्क्वीथ यांनीं तेंच तुणतुणें पार्लमेंटमध्यें चालू ठेविलें! आज तरी महायुद्ध संपून चार वर्षें झाल्यानंतर महायुद्धाच्या बुडाशीं असलेल्या उच्च तत्त्वांची ओळख कोणाला आहे? अमेरिकेचे त्यावेळचे विद्वान प्रेसिडेंट डॉ. विल्सन यांच्या लेखांना व उद्गारांना इंग्लंडच्या मुत्सद्यांनीं फाटक्या कागदांच्या टोपलींत टाकलें नाहीं काय? असें असतां इंग्लंडनें महायुद्ध कसें जिंकलें? इंग्लंडला महायुद्धाच्या तत्त्वांची व्याख्या देता येत नाहीं! कशासाठीं आपण लढत आहोंत, हें इंग्लंडच्या वीरांना समजलें नाहीं; या युद्धापासून जगाचें हित आहे किंवा कसें याची मीमांसा या वीरांना करतां आली नाहीं; मध्य प्रांतांतील एखाद्या मॉजिस्टेटपुढें जर इंग्लंडच्या सेनानायकांना आरोपी म्हणून उभे केलें, आणखी त्या मॅजिस्टेटनें महायुद्धाच्या बुडाशीं असलेल्या तत्त्वज्ञानासंबंधानें त्यांची फेरतपासणी केली, तर इंग्लंडच्या सर्व फील्ड-मार्शलांची फें फें झाल्यावांचून रहाणार नाहीं. मध्यप्रांतांतील जे मॅजिस्ट्रेट

व त्यांच्या हाताखालील वकील आज सत्याग्रहाच्या तत्त्वज्ञानासंबंधानें तुरुंगांत जाणारांची फेरतपासणी करीत आहेत, त्यांच्यावर उद्यां जर कोर्टापुढें उभे रहाण्याची पाळी आली, आणि सरकारी नोकरी करून गोरगरिबांचे गळे कापण्यास तुम्हीं कां उद्युक्त झालांत म्हणून जर त्यांना विचारण्यांत आलें, तर रस्त्यांतील पोरेंहि त्यांची हूर्यो करतील असली बाष्कळपणाचीं उत्तरें त्यांच्या तोंडून निघाल्यावांचून रहाणार नाहींत! आज मॅजिस्ट्रेटी घोडयावर ते बसले आहेत आणि त्यांच्या चाबकांच्या कक्षेंत त्यांच्या शेजारी पायीं चालण्याची पाळी प्रामाणिक सत्याग्रही वीरांवर आलेली आहे. अशा वेळीं एखाद्या अविद्वान सत्याग्रही आरोपीला तुला स्वराज्य म्हणजे काय हें समजतें काय, म्हणून प्रश्न विचारण्याचा हलकट उद्दामपणा जर मॅजिस्ट्रेटटनें दाखविला, आणि नोकरशाहीच्या बगलबच्च्यानीं मॅजिस्ट्रेटनें आरोपीची कशी टर उडविली म्हणून जर चोहोंकडे तारा पाठविल्या, तर त्यांत कांहीं नवल नाहीं. मॅजिस्ट्रेटी अधिकाराची धुंदी डोक्यावर चढली असतांना दुसऱ्याला कस्पटा-प्रमाणें लेखून त्याची हुर्यो करण्याकडे कल साहजिकपणेंच उत्पन्न होतो! असल्या धुंदींत हा दोष जर एखाद्यानें दाखविला नाहीं तर तें नवल होय. दारू पिणारा बरळणारच व त्या दारू पिण्याची बाटली धरणारा बातमीदार या बरळण्याचें कौदुक करणारच! अधिकाराच्या नशेचा हा सहाजिक परिणाम आहे. आपणास या दोषांशीं कांहीं कर्तव्य नाहीं. तुरुंगांत जाणारे लोक विद्वान नाहींत या आरोपामुळें कोणाचा बद्धिभेद होऊं नये एवढीच खबरदारी घेणे जरुरीनें आहे. महात्मा गांधीं यांच्या असहकारितेच्या चळ-वळीच्या अंगी सर्वांना तीं तत्वें सांगोपांग समजून देऊन त्या विद्वान बनविण्याचें आज सामर्थ्य नाहीं हे खरें आहे. पण या सामर्थ्याची आज जरूरी नाहीं. यश मिळविण्यास हें विद्वत्तेचें सामर्थ्य चोहोंकडे पसरलेलें

असावें लागतें असें नाहीं. कांहींना समजतें, कांहींना समजत नाहीं; अशी स्थिति नेहमीं असावयाचीच ! यशाचें सामर्थ्य तर्कटपणांत नसून विद्वत्ता लढण्याच्या वेळीं उपयोगीं पडत नाहीं. कर्त्या पुरुषाची बुद्धि स्थिर होण्यास विद्वत्तेची जरुरी असते, पण स्थितधि झालेल्या मुनींच्या सांप्रदायाची अम्मलबजाणी संसारांत घडण्यास सत्याची चाड, प्रामाणिकपणा, श्रद्धा, व आत्मयज्ञ करण्याची तयारी या सद्गुणांचीच अधिक जरुरी असते. पराक्रम म्हणजे विद्वत्ता नव्हे ! सांप्रदायानें ठरविलेल्या तत्त्वाकरितां निश्चयानें श्रद्धापूर्वक केलेल्या आत्मयज्ञाला पराक्रम असें म्हणत असतात. पराक्रम दाखविण्यास ज्या सद्गुणांचा समुच्चय जरूर असतो, तो सद्गुणांचा समुच्चय आज नागपूरच्या वीरांच्या अंगी प्राधान्यें करून दिसत आहे. विद्वत्तेच्या जोरावर फ्रान्सनें महायुद्ध जिंकलें नाहीं, तर पराक्रमाच्या सद्गुणांच्या जोरावर महायुद्ध जिंकलें, हे विसरतां कामा नये. हिंदुस्थानांत आज उणीव आहे ती विद्वानांची नाहीं, पराक्रमी वीरांची आहे. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या सभेंत तास दोन तास जरी हजर राहिलें तरी फाजील विद्वत्तेस ऊत आला आहे, असें तेव्हांच ध्यानांत येतें. शब्दाचे कीस काढण्यांत आमचे लोक प्रवीण झाले आहेत; पार्लमेंटरी वादविवादांत आमचे लोक कोठेंहि मागे हटणार नाहींत, नेमस्तांनीं भरलेली दिल्लीतील असेम्ली देखील इंग्लंडच्या पार्लमेंट सभेवर आज शब्दच्छलांत ताण करील ! पण ही विद्वत्ता आज राष्ट्राच्या उपयोगीं पडत नाहीं, कारण पराक्रमाची व विद्वत्तेची फारकत झाली आहे. महात्मा गांधी यांची असहकारितेची चळवळ ही फारकत काढून टाकण्यासाठींच आहे. विद्वत्तेला आजहि हिंदुस्थानांत आरामाची गुलामगिरी आवडते. विद्वत्तेचीं ही वेश्यावृत्ति नष्ट झाल्याशिवाय हिंदुस्थानचें कल्याण होणार नाहीं. अशा वेळीं पराक्रमी पुरुषांमध्यें ते विद्वान नाहींत म्हणून दोष काढणें म्हणजे राष्ट्राच्या हितावर कुऱ्हाड मारणें होय. ह्या

वेळीं राष्ट्रामध्यें पराक्रमाचेच सद्गुण वाढीस लावले पाहिजेत. आज सर्व दर्जाच्या व सर्व स्थितींतल्या लोकांत आत्मयज्ञाचें जें वारें नागपुरांत खेळत आहे त्या वाऱ्याची जर तुम्ही थट्टा करूं लागलां, तर विद्वानांचीं वेशयवृत्ति कधी संपणार नाहीं. पराक्रमाची टर करणाऱ्या विद्वत्तेला विद्वत्ता तरी कसें म्हणावें? पराक्रमाच्या सद्गुणांचें स्वरूप ज्या बुद्धीला समजत नाहीं त्या बुद्धीवर व्यापकपणाचे संस्कार झाले आहेत असें कसें मानावें? पराक्रमाचें प्रतिबिंब ज्या बुद्धींत पडत नाहीं तीं बुद्धि शिकल्यासवरल्यानें निर्मल झाली आहे असें मानण्यास आधार काय? सद्गुणांचें, सत्याचें व परमेश्वराचें स्वरूप ग्रहण करण्याची शक्ति जेथें नाहीं, तेथें विद्वत्ता आहे असें कसें म्हणावें? ही विद्वत्ता नव्हे, नुसती घोकंपट्टी आहे! विद्वत्तेनें अंतःकरण शुद्ध व्हावें लागतें आणि परमेश्वरी तेजाचें किरण ग्रहण करण्याइतकीं निर्मलता उत्पन्न व्हावी लागते. ज्या विद्वत्तेमुळें मनुष्याची बुद्धि परमेश्वराचें अधिष्ठन होऊं शकत नाहीं, त्या विद्वत्तेस विद्वत्ता म्हणण्याऐवजी विद्वत्तेचें सोंग म्हटलें पाहिजे! नागपूरच्या राष्ट्रीय निशाणाच्या चळवळीनें हीं विद्वत्तेचीं सोंगें आतांच चव्हाठ्यावर आलीं आहेत, हें एक प्रकारें बरें झालें आहे. या सोंगांच्या नादीं लागून राष्ट्रास पराक्रमहीन करण्याचा जो प्रयत्न सांप्रत करण्यांत येत आहे, त्या प्रयत्नास हाणून पाडण्यांत ह्या वेळीं खऱ्या देशभक्तांनीं मुळींच आळस करतां कामा नये. श्रद्धेनें, निश्चयानें व आत्मयज्ञाच्या भावनेनें जे पराक्रमी वीर आज रणमैदानावर उभे आहेत त्या वीरांतील सर्वांकडूनच रणमैदानाचें अखेरचें टोक गांठले जाईल असें बिलकूल नाहीं. कांहीं रणमैदानावर उभे राहण्यापुरते पुढें येतील, कांहीं दहा पावलें पुढें गेल्यावर मागें सरकतील, कांहीं अर्ध्या वाटेवरच युद्ध सोडून देतील; व कांहीं अखेरपर्यंत टिकतील. कोणत्याहि लढाईंत रणमैदानावर हा प्रकार दृष्टीस

पडावयाचाच. हा दोष अपरिहार्य आहे. तेंव्हां त्याबद्दल विषाद मानण्याचें बिलकूल कारण नाहीं. विद्वत्तेच्या ज्या सोंगांना असले दोष दाखवून आपल्या वेश्यावृत्तीवर पांघरूण घालावयाचें असेल त्यांनीं खुशाल असल्या दोषारोपांचीं पारायणें करीत बसावें. पराक्रमाच्या सद्गुणांचें ग्रहण करण्यास उन्मुख झालेलें राष्ट्र असलीं पारायणें ऐकतच नाहीं. तेव्हां नागपूरच्या वीरवृत्तीच्या लोकांनीं निंदकांच्या शिव्याशापामुळें आपला तेजोभंग होऊं न देतां, आपल्या कामास श्रद्धेनें व तत्परतेनें स्वतःस वाहून घ्यावें हेंच योग्य. श्रद्धा व तत्परता असल्यावर निंदकांचा उलट उपयोग करून घेतां येतो. नागपूरचा सत्याग्रह पराक्रमी वीरांचा असल्यामुळें विद्वत्तेचें सोंग घेतलेल्या निंदकांचा ते उपयोग करून घेतील यांत संशय नाहीं.

* महात्मा गांधी चुकले काय ?

मद्रासेस असहकारितेच्या चळवळीचें निरीक्षण करतांना महात्मा गांधी यांच्या पदरांत एक ढोबळ चूक बांधण्याचा प्रयत्न दे. बं. दास यांनीं केला आहे. महात्मा गांधी यांनीं लॉर्ड रीडींग यांची तडजोड नाकबूल करण्यांत ढोबळ चूक केली, अडाण्यासारखा गडबडगुंडा केला, वाकबगार नसलेल्या मुत्सद्याप्रमाणें कांहींतरी 'बंगलिंग' केलें, असा दे. बं. दास यांचा आरोप आहे. युवराज कलकत्त्यास पोंचण्यापूर्वी युवराजांचा कलकत्त्यांतील बहिष्कार उठविण्यांत यावा म्हणून लॉर्ड रीडिंग स्वतः कलकत्त्यास गेले, आणि सभाबंदीच्या कायद्याखालीं पकडण्यांत आलेल्या कैद्यांना सोडून देतों, युवराजांवरील बहिष्कार तेवढा उठवा, अशी तडजोड बडे लाट व बंगालचे छोटे लाट या दोघांनीं दे. बं. दास यांच्या पुढें तुरुंगात ठेवली. दे. बं दास यांनीं ही तडजोड स्वतः मान्य केली, पण आपण तुरुंगांत असल्यामुळें आपल्याकडे पुढारीपणा न घेतां सदर तडजोड महात्मा गांधी यांजकडे पाठविली. महात्मा गांधी यांनीं ही तडजोड पसंत केली नाहीं. सभाबंदीच्या कायद्याखालचे तेवढेच कैदी सोडून उपयोगाचें नाहीं, तर अल्लीबंधूंसारखे खिलाफतीच्या चळवळींतील मुसलमान कैदीहि सोडले पाहिजेत, असा हट्ट महात्मा गांधी यांनीं धरला आणि यामुळें तडजोड फिसकटली. महात्मा गांधी यांचें हें धोरण चुकीचें झालें असें दे. बं. दास यांचें म्हणणें आहे. हें 'बंगलिंग' झालें. कांहींतरी अडाण्यासारखें अव्यवस्थितपणाचें हें कृत्य झालें. राजकारण माहीत नसलेल्या पुरुषाच्या हातून ही ढोबळ चूक झाली. भलताच मनुष्य पुढारी नेमला गेल्याकारणानें कांहीं तरी तिरपागडें झालें. राजकारणांत दाखवावयाची

---

* नवाकाळ, ता. ८ जून १९२३

दक्षता महात्मा गांधी यांनीं दाखविली नाहीं. आपलेंच येळकोट घेऊन बसल्यानें राजकारण कसें बिनसतें, किंवा 'बंगलिंग' होतें, याचें हें उदाहरण आहे. महात्मा गांधी चुकले असें म्हणण्यास दे. बं. दास आज तयार आहेत, ह्याचें कारण तुरुंगांतून सुटण्याची संधी वाया गेली हें नव्हे. तुरुंगवासाच्या दुःखाची फिकीर दे. बं. दास यांना नाहीं; पण राजकारण बिघडलें या बद्दल त्यांना वाईट वाटत आहे. राजकारण बिघडलें तें कसें ? 'बंगलिंग' झालें ते कोठें ? आडमुठेपणा झाला तो कोणता ? दे. बं. दास यांचें असें म्हणणें आहे कीं, अत्यंत प्रबळ असलेल्या नोकरशाहीचे पुरस्कर्ते दोघे लाट आपण होऊन तडजोड करण्यास पुढें आले असतांना तडजोडी-मुळें जें यश लोकांच्या डोळ्यांत शिरलें असतें त्या यशाला आपण मुकलों आहोंत. थोडेसें यश मिळत असलें तरी तें यश हस्तगत करून घेण्यास राजकारणी पुरुषानें चुकूं नये. यश मिळालें म्हणून मिरवावयास सांपडलें असतां जें काम आपोआप होतें तें दुसऱ्या कशानें होत नाहीं Nothing Succeeds Like Success बडे लाट व छोटे लाट शरण आले म्हणून टिमकी वाजवावयास सांपडली असती, शेकडो कैदी तुरुंगांतून बाहेर येऊन त्यांच्या बंधुमुक्ततेमुळें आपल्या यशाचा नगारा चोहोंकडे वाजत राहिला असता; लाट साहेबांना गांधींनीं शरण आणलें म्हणून जो तो म्हणत राहिला असता आणि लोकांचा विश्वास त्यामुळें दुणावून पुढचें कार्य सुकर झालें असतें. पुढें चालून आलेलें हें यशाचें ताट दूर लोटण्यांत महात्मा गांधी यांनीं अडाणीपणाची चूक केली, तेव्हां महात्मा गांधी यांच्या धोरणांत कांहीं हंशील नाहीं, असा हा आरोप आहे. थोड़ीतरी यशाची चुणुक मधून मधून दाखवितां आली पाहिजे. लहान सहान चमत्कार दृष्टीस पडल्यामुळें नमस्कार झडत राहिले पहिजेत; येरवी राजकारण सुकर व्हावयाचें नाहीं; अशा धोरणाचा व मताचा अंगिकार दे. बं. दास यांनीं केला आहे.

अल्ली बंधूंना सोडलें नाहीं तर तडजोड नको, असा हट्ट महात्माजींनीं कलकत्त्यास लाटसाहेब गेले असतांना धरला, इतकेंच नव्हे, तर अहमदाबादच्या काँग्रेसच्या वेळींहि हाच हट्ट धरला आणि मुंबईस समेटाची सभा अहमदाबादच्या काँग्रेसनंतर एक महिन्यानें झाली असतां पुन्हां तोच हट्ट धरला ! तीन वेळां एकसारखा एकच हट्ट दाखविला. अल्लीबंधूंच्या स्नेहामुळें व प्रेमामुळें महात्मा गांधी यांनीं हा हट्ट दाखविला कीं राजकीय धोरणामुळें हा हट्ट दाखविला ? बडे लाटसाहेब सिमला सोडून कलकत्त्यास गेले व तडजोड करण्यास तयार झाले याचें कारण काय ? नोकरशाहीला हजारों कैद्यांना कोणत्या तुरुंगांत ठेवूं म्हणून काळजी पडली होती व त्या काळजीमुळें तडजोड पुढें आली, असें म्हणतां येतें काय ? कैदेंत टाकण्याच्या त्रासामुळें तडजोड जर पुढें आली असती तर अल्लीबंधूंना सोडून देण्यांस लॉर्ड रीडिंग यांनीं का मागें घेतले असतें ? दहा पांच हजार कैदी सुटावयाचे होते त्यांत दोन चारशें जास्त कैदी किंवा अवघे दोन अल्लीबंधू सोडून दिले असते, म्हणून लाटसाहेबांचें तरी कोणतें बिघडणार होतें ? लाटसाहेब लॉर्ड रीडिंग यांनीं अल्लीबंधूंना सोडून द्यावयाचें नाहीं म्हणून एवढा हट्ट कां धरला ? दोनच इसमांची बाब, पण त्याकरितां लॉर्ड रीडिंग यांनीं तडजोड कां मोडली ? आपण होऊन तडजोड त्यांनीं पुढें आणली होती; आपण होऊन हजारो कैद्यांना सोडून देण्यास ते तयार झाले होते; आपण होऊन शरणागतीचीं लोटांगणें घालीत कलकत्त्यास धरणें धरून ते बसले होते; मग दोनच अल्लीबंधूसंबंधानें येवढा दीर्घद्वेष लाटसाहेबांनीं कां दाखवावा ? लॉर्ड रीडिंग यांच्यासारखा चतुर व न्यायनिपुण पुरुष अवघ्या दोन मुसलमान कैद्यांसाठीं आपली तडजोड फुकट जाऊं देण्यास कसा तयार होतो ? ह्या प्रश्नाचा विचार करतांना लॉर्ड रीडिंग यांनीं दीर्घद्वेषामुळें तडजोड वायां जाऊं दिली, असें म्हणणें कधींहि सयुक्तिक होणार नाहीं.

अलीबंधूसंबंधाच्या आपल्या स्नेहामुळें महात्मा गांधी यांनीं ही-तडजोड वायां जाऊ दिली हें म्हणणें जसें खोटें आहे तसेंच दीर्घद्वेषामुळें लॅर्ड रीडिंग घसरले हेंहि म्हणणें खोटें आहे. गाजकारणाचा ओघ न समजल्यामुळें अशी भलतीच टीका करण्यांत येते.. तुर्की प्रश्न मिटला नसल्यामुळें व तुर्कीच्याविरुद्ध इंग्रजाचें धोरण दृष्टीस पडत असल्यामुळें युवराजांनीं हिंदुस्थानांत जाऊं नये, कारण हिंदुस्थानचे मुसलमान फार खवळले आहेत, ते युवराजांवर बहिष्कार घालण्यास चुकणार नाहींत असें युवराजांच्या प्रवासाच्यापूर्वी बजाविण्यांत आलें होतें. हिंदुमुसलमानांच्यातर्फे असें बजाविण्यांत आलें होतें, इतकेंच नव्हे तर ग्रीसचा पक्ष उचलून धरण्यांत इंग्रज मुत्सद्यांनीं चूक केली आहे असे म्हणणाऱ्या व त्यावेळचे मुख्य मंत्री मि. लॉईड जॉर्ज याच्या विरुद्ध असलेल्या इंग्लंडांतील पक्षाचें हेंच मत होतें. इंग्रजी साम्राज्यांतील मुसल्मानांचीं मनें दुःखानें होरपळलीं असून टर्कीच्या विरुद्ध धोरण स्वीकारण्यांत ग्रीसचें जरी कल्याण झालें तरी हिंदु–मुसलमान दुःखी कष्टी झाल्यामुळें इंग्रज साम्राज्याचें एकंदर अकल्याणच होणार असें म्हणणारा त्यावेळीं इंग्लंडांत विरोधी पक्ष होता. या विरोधी पक्षाचे म्हणण्यांत बिलकूल अर्थ नाहीं, हिंदु–मुसलमान कांहीं तितकेसे खवळलेले नाहींत; आणि युवराज हिंदुस्थानांत गेले असतां त्यांचा चोहोंकडे सन्मान होऊन मुसलमानांच्या खवळण्याचा बुडबुडा फुटून जाईल; अशा मतलबानें युवराजांना हिंदुस्थानांत पाठविण्यांत आलें. इंग्रजी मुत्सद्यांच्या व मि. लॉइड जॉर्ज यांच्या धोरणाचा हा मतलब सिद्धीस नेण्याचा बोजा लॉर्ड रीडिंग यांच्या मस्तकावर होता. हा मतलब सिद्धीस न जाणें हें टर्कीच्या कल्याणांचें होतें. तुर्की राज्यानें स्वतंत्र प्रभुत्व उपभोगीत राहिलें पाहिजे, आणि टर्कीच्या या स्वतंत्र प्रभुत्वामुळें सर्व मुसलमानी प्रदेशांचें व हिंदुस्थानसकट अर्ध्या अधिक आशिया खंडाचें जगाच्या कार-

अलीबंधूंना सोडलें नाहीं तर तडजोड नको, असा हट्ट महात्माजींनीं कलकत्त्यास लाटसाहेब गेले असतांना धरला, इतकेंच नव्हे, तर अहमदाबादच्या काँग्रेसच्या वेळींहि हाच हट्ट धरला आणि मुंबईस समेटाची सभा अहमदाबादच्या काँग्रेसनंतर एक महिन्यानें झाली असतां पुन्हां तोच हट्ट धरला! तीन वेळां एकसारखा एकच हट्ट दाखविला. अलीबंधूंच्या स्नेहामुळें व प्रेमामुळें महात्मा गांधी यांनीं हा हट्ट दाखविला कीं राजकीय धोरणामुळें हा हट्ट दाखविला? बडे लाटसाहेब सिमला सोडून कलकत्त्यास गेले व तडजोड करण्यास तयार झाले याचें कारण काय? नोकरशाहीला हजारों कैद्यांना कोणत्या तुरुंगांत ठेवूं म्हणून काळजी पडली होती व त्या काळजीमुळें तडजोड पुढें आली, असें म्हणतां येतें काय? कैदेंत टाकण्याच्या त्रासामुळें तडजोड जर पुढें आली असती तर अलीबंधूंना सोडून देण्यांस लॉर्ड रीडिंग यांनीं का मागें घेतले असतें? दहा पांच हजार कैदी सुटावयाचे होते त्यांत दोन चारशें जास्त कैदी किंवा अवघे दोन अलीबंधू सोडून दिले असते, म्हणून लाटसाहेबांचें तरी कोणतें बिघडणार होतें? लाटसाहेब लॉर्ड रीडिंग यांनीं अलीबंधूंना सोडून द्यावयाचें नाहीं म्हणून एवढा हट्ट कां धरला? दोनच इसमांची बाब, पण त्याकरितां लॉर्ड रीडिंग यांनीं तडजोड कां मोडली? आपण होऊन तडजोड त्यांनीं पुढें आणली होती; आपण होऊन हजारो कैद्यांना सोडून देण्यास ते तयार झाले होते; आपण होऊन शरणागतीचीं लोटांगणें घालीत कलकत्त्यास धरणें धरून ते बसले होते; मग दोनच अलीबंधूसंबंधानें येवढा दीर्घद्वेष लाटसाहेबांनीं कां दाखवावा? लॉर्ड रीडिंग यांच्यासारखा चतुर व न्यायनिपुण पुरुष अवघ्या दोन मुसलमान कैद्यांसाठीं आपली तडजोड फुकट जाऊं देण्यास कसा तयार होतो? ह्या प्रश्नाचा विचार करतांना लॉर्ड रीडिंग यांनीं दीर्घद्वेषामुळें तडजोड वाया जाऊं दिली, असें म्हणणें कधींहि सयुक्तिक होणार नाहीं.

अलीबंधूसंबंधाच्या आपल्या स्नेहामुळें महात्मा गांधी यांनीं ही-तडजोड वायां जाऊ दिली हें म्हणणें जसें खोटें आहे तसेंच दीर्घद्वेषामुळें लॅर्ड रीडिंग घसरले हेंहि म्हणणें खोटें आहे. गजकारणाचा ओघ न समजल्यामुळें अशी भलतीच टीका करण्यांत येते. तुर्की प्रश्न मिटला नसल्यामुळें व तुर्कांच्याविरुद्ध इंग्रजाचें धोरण दृष्टीस पडत असल्यामुळें युवराजांनीं हिंदुस्थानांत जाऊं नये, कारण हिंदुस्थानचे मुसलमान फार खवळले अहेत, ते युवराजांवर बहिष्कार घालण्यास चुकणार नाहींत असें युवराजांच्या प्रवासाच्यापूर्वी बजाविण्यांत आलें होतें. हिंदुमुसलमानांच्यातर्फे असें बजाविण्यांत आलें होतें, इतकेंच नव्हे तर ग्रीसचा पक्ष उचलून धरण्यांत इंग्रज मुत्सद्यांनीं चूक केली आहे असे म्हणणाऱ्या व त्यावेळचे मुख्य मंत्री मि. लॉईड जॉर्ज याच्या विरुद्ध असलेल्या इंग्लंडांतील पक्षाचें हेंच मत होतें. इंग्रजी साम्राज्यांतील मुसलमानांचीं मनें दुःखानें होरपळलीं असून टर्कीच्या विरुद्ध धोरण स्वीकारण्यांत ग्रीसचें जरी कल्याण झालें तरी हिंदु-मुसलमान दुःखी कष्टी झाल्यामुळें इंग्रज साम्राज्याचें एकंदर अकल्याणच होणार असें म्हणणारा त्यावेळीं इंग्लंडांत विरोधी पक्ष होता. या विरोधी पक्षाचे म्हणण्यांत बिलकूल अर्थ नाहीं, हिंदु-मुसलमान कांहीं तितकेसे खवळलेले नाहींत; आणि युवराज हिंदुस्थानांत गेले असतां त्यांचा चोहोंकडे सन्मान होऊन मुसलमानांच्या खवळण्याचा बुडबुडा फुटून जाईल; अशा मतलबानें युवराजांना हिंदुस्थानांत पाठविण्यांत आलें. इंग्रजी मुत्सद्यांच्या व मि. लॉइड जॉर्ज यांच्या धोरणाचा हा मतलब सिद्धीस नेण्याचा बोजा लॉर्ड रीडिंग यांच्या मस्तकावर होता. हा मतलब सिद्धीस न जाणें हें टर्कीच्या कल्याणांचें होतें. तुर्की राज्यानें स्वतंत्र प्रभुत्व उपभोगीत राहिलें पाहिजे, आणि टर्कीच्या या स्वतंत्र प्रभुत्वामुळें सर्व मुसलमानी प्रदेशांचें व हिंदुस्थानसकट अर्ध्या अधिक आशिया खंडाचें जगाच्या कार-

स्थानांत कल्याण होणार आहे, हें धोरण महात्मा गांधी व अल्लीबंधु यांनीं स्वीकारलें होतें. हें धोरण मि. लॉइड जॉर्ज यांच्या धोरणाच्या अगदीं विरुद्ध होतें. मि. लॉइड जॉर्ज यांचें धोरण चुकीचें ठरलें आहे; पण त्यावेळीं सदर धोरण चुकीचें ठरणार म्हणून जे म्हणत होते, त्यांच्या दृष्टीनें व खुद्द मि. लॉइड जॉर्ज यांच्याहि दृष्टीनें, हिंदु-मुसलमानांच्या मनाची स्थिति फार खवळलेली आहे किंवा कसें ही गोष्टच धोरण चुकीचें किंवा बरोबर ठरण्यास एक कारण साहाजिक समजली जात होती. हिंदुस्थानांतील लोक खवळलेले असले तर मि. लॉइड जॉर्ज यांचें धोरण चुकलें; खवळलेले नसले तर मि. लॉइड जॉर्ज यांचें धोरण बरोबर ठरलें, अशा तऱ्हेचा तो प्रसंग होता. झुंजेचें स्वरूप या प्रकारचें होतें. सभाबंदीच्या कायद्याला लोक जुमानतात किंवा नाहीं, याचा अनुभव घेऊन निकाल देण्याचा तो मुख्य प्रसंग नव्हता. मि. लाइड जॉर्ज यांच्या इच्छेप्रमाणें हिंदु-मुसलमान खरे खवळलेले नाहींत असा अनुभव येऊं नये म्हणून महात्मा गांधीं त्यावेळीं युवराजांवरील बहिष्काराच्या राजकारणाचा डाव खेळत होते. या धोरणांत सभाबंदीचा कायदा हें उपांग होतें. युवराजांवर कडकडीत बहिष्कार पडून हिंदु-मुसलमानांची मनोवृत्ति खरोखर क्षुब्ध झाली आहे, असें इंग्लंडच्या अनुभवास येऊन त्या अनुभवाच्या जोरावर लॉइड जॉर्ज यांचें टर्कीविषयीचें धोरण बदलविणें, हें महात्मा गांधी व अल्लीबंधू यांच्या कारस्थानाचें मुख्य अंग होतें. सभाबंदीचे कैदी सोडून देण्यास लाटसाहेब तयार झाले, आणि अल्लीबंधूचें नांव निघाल्याबरोबर त्यांच्या तळपायाचीं आग मस्तकाला पोहोंचली, हा भेद लक्षांत ठेवला पाहिजे. राजकारणांतील धोरणामुळें उत्पन्न झालेला हा भेद आहे, व्यक्तिप्रेमामुळें किंवा व्यक्तिद्वेषामुळें हा भेद उत्पन्न झालेला नाहीं. अल्लीबंधूंना सोडून देऊन जर तडजोड झाली असती तर मि. लॉइड जॉर्ज यांच्या ज्या धोरणाची जोपासना करण्याकरितां

युवराजांना हिंदुस्थानांत पाठवून देण्यांत आलें होतें, त्या धोरणावरच्च नालायकीचा छाप लाटसाहेबांनीं स्वतःच आपण होऊन मारल्यासारखें झालें असतें. लाटसाहेबांना तसें करतां येईना ! त्यांत त्यांचा दोष नाहीं. मंत्रिमंडळाच्या धोरणाचे ते ताबेदार आहेत. महात्मा गांधी यांना तर मि. लाइड जॉर्ज यांच्या धोरणावर, सदर धोरण हिंदु-मुसलमानांच्या मनोवृत्ति खवळून सोडणारें आहे, असा नालायकीचा छाप प्रत्यक्ष मारला गेलेला युवराजांच्या प्रवासाच्या वेळीं दाखवावयाचा होता. हा छाप मारून घेण्यास लाटसाहेब आपण होऊन तयार होईनात. हा छाप मारला जाणें त्यावेळीं अत्यंत जरुरीचें होतें. लाटसाहेबांनीं स्वतः जो छाप मारून घेतला नाहीं तो छाप प्रत्यक्ष अनुभवामुळें मारला गेला, व मि. लॉइड जॉर्ज यांच्या धोरणाला इंग्लंडांत मिळत असलेला पाठिंबा हा छाप मारला गेल्यानंतर हलके हलके डळमळूं लागला, आणि अखेरीस मि. लाइड जॉर्ज यांचें मंत्रिमंडळ उलथून पडून टर्कीशी गुण्यागोविंदाचा सलोखा होण्याची वेळ आज आली ! गुण्यागोविंदाचा सलोखा होण्याची वेळ येण्याचें जें यश आज दृष्टीस पडत आहे त्या यशाचे कारणांत मि. लॉइड जॉर्ज यांच्या धोरणाचा पाठिंबा, युवराजांच्या प्रवासाच्या वेळच्या कटु अनुभवानें डळमळीत होणें हें एक कारण आहे. हिंदू-मुसलमान स्वतःच्या स्वार्थत्यागानें हें कारण उत्पन्न केलें असल्यामुळें हिंदी राजकारणांत या कारणास अग्रस्थानच दिलें पाहिजे. युरोपियन राजकारणांत हें कारण दुय्यम प्रतीचें ठरेल यांत संशय नाहीं; पण इतर कारणांशीं हिंदी लोकांच्या स्वतःच्या कृतीचा संबंध येत नसल्यामुळें हिंदी लोकांच्या दृष्टीनें तीं कारणें दैवाधीनच समजलीं पाहिजेत. हिंदी लोकांच्या पराक्रमाचे आटोक्यांत तुर्की यशाचें एकच कारण होतें; आणि तें कारण म्हणजे हिंदी लोकांची प्रक्षुब्ध मनोवृत्ति इंग्रजी मुत्सद्यांच्या अनुभवास आणून देणें हें होय ! हा डाव साधावा

म्हणून महात्मा गांधीं यांनीं लॉर्ड रीडिंग यांची तडजोड नाकारली; हा डाव साधावा म्हणून मुंबईच्या तडजोडीच्या सभेंत महात्मा गाधी यांनीं सर शंकर नाय्यर यांच्या सारख्यांना पूर्णपणें नाखूष केलें; हा डाव साधावा म्हणून महात्मा गांधीं यांनीं तुरुंगांत जाण्याचा आत्मयज्ञ केला ! आज कर्मधर्मसंयोगानें दैवधीन असलेल्या गोष्टीचाहि पूर्ण पाठिंबा मिळून म. गांधी यांचा डाव साधलेला आहे. लॉर्ड रीडिंग यांच्या तडजोडीला जर म. गांधी वळी पडले असते, तर लॉइड जॉर्ज यांच्या धोरणाला इंग्लंडचा पाठिंबा मिळाला असता, आणि प्रतिकूल दैवालाहि एका वाजून सारून मि. लाइड जॉर्ज यांनीं इंग्रजी साम्राज्याची सर्व शक्ति तुर्कीवर फेकण्यास कांकूं केलें नसतें ! त्यांनीं कांकूं केलें; कारण महात्मा गांधीं यांनीं हिंदुस्थानची प्रक्षुब्ध स्थिति इंग्रजी मुत्सद्यांच्या अनुभवास युवराजांचे प्रवासाच्या वेळीं आणून दिली. हें मोठें यश महात्मा गांधी यांच्या धोरणाला मिळालें असतां, दे. बं. दास ह्यांच्या प्रमाणें, कोंडण्याचा खाऊ खाण्याच्या आमिषानें लहान मुलाप्रमाणें ते फसले नाहींत हें योग्य झालें कीं अयोग्य झालें ? थोडासा खाऊ खावयास मिळावा म्हणून हिंदी राजकारणाच्या संसाराचें किती एक पिढयांचें मातेरें करून घेण्यास महात्मा गांधीं तयार झाले नाहींत हें 'बंगलिंग' झालें काय ? मुख्य धोरण न सोडतां उपांगाच्या लोभामुळें महात्मा गांधी फसले नाहींत, हा आठमुठया मुत्सद्यांचा गुडबडगुंडा ठरतो काय ?

* लो. टिळक व समूहाचा आत्मयज्ञ

न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेज यांचा संबंध सुटून लो. टिळक राजकारणांत पूर्णपणें पडल्यानंतर, त्यांचें सर्व आयुष्य, त्यांनीं एकट्यानीं केलेल्या आत्मयज्ञाची एक लांबलचक मालिकाच होऊन बसलें. अखेर पर्यंत हें आत्मयज्ञाचें व्रत त्यांनीं एकसारखें चालविलें, व फलाची अपेक्षा न करतां कर्तव्यकर्म म्हणून सतत लढत राहणाऱ्या व आत्मयज्ञांतच सुख मानणाऱ्या तेजस्वी लढवय्याचें उदाहरण राष्ट्रास घालून दिलें. विभूतीनें स्वतःच्या एकट्याच्या बुद्धीनें निश्चित केलेल्या कर्तव्याच्या जोरावर केलेल्या आत्मयज्ञापासून समूहाच्या आत्मयज्ञाला कोणत्याहि राष्ट्रांत प्रारंभ झाला पाहिजे. तेव्हां लो. टिळक यांचें चरित्र संपतें न संपतें तोंच हिंदुस्थानांत समूहाच्या आत्मयज्ञास प्रारंभ व्हावा, हें अगदीं साहजिक आहे. महात्मा गांधी यांनीं जी असहकारितेची चळवळ सुरू केली आहे, ती जंगी चळवळ म्हणजे समूहाचा आत्मयज्ञच होय. दक्षिण आफ्रिकेंत असतांना समूहाच्या आत्मयज्ञाची महति महात्मा गांधी यांच्या मनावर बिंबली होती, आणि हिंदुस्थानांतहि खरी संधी येण्याबरोबर समूहाच्या आत्मयज्ञाच्या चळवळीस त्यांनीं प्रारंभ केला. व्यक्तीच्या आत्मयज्ञाचा मार्ग व समूहाच्या आत्मयज्ञाचा मार्ग, हे दोनहि एकाच स्वरूपाचे असतात. व्यक्तीला जी निंदा सोसावी लागते, किंवा ज्या हालअपेष्टांतून जावें लागतें, तीच निंदा व त्याच हालअपेष्टा समूहाच्याहि आत्मयज्ञाच्या कपाळीं लिहिलेल्या असतात. व्यक्तीचा आत्मयज्ञ समूहाकरितां असतो; आणि समूहाचा आत्मयज्ञ मागें पुढें हालत राहून अखेरीस यशाच्या पायरीला चढतो. समूहाच्या आत्मयज्ञास जन्म दिला, म्हणजे व्यक्तीच्या आत्मयज्ञाचें कार्य संपतें. ज्या विभूतींनीं

---

* नवाकाळ, ता. २ आगस्ट १९२३

असल्या समूहाच्या आत्मयज्ञास जन्म दिलेला असतो, त्या विभूतींच्या चरित्राकडे पाहून समूहाचा आत्मयज्ञ नेहमीं आपला मार्ग आक्रमीत असतो. समूहाच्या आत्मयज्ञास मार्गदर्शक होण्याकरितांच ऊर्फ लोकसंग्रह करण्याकरितांच मुक्त झालेल्या पुरुषांनींहि कर्मे आचरलीं पाहिजेत, हें गीतारहस्यांतील तत्त्व ध्यानांत ठेविलें असतां लोकमान्य टिळक यांच्यासारख्या विभूतींच्या चरित्राचा व सांप्रतच्या समूहाच्या आत्मयज्ञाचा कोणता संबंध आहे, हें तेव्हांच ध्यानांत येतें. १८९७ सालीं लो. टिळक तुरुंगांत गेल्यानंतर लोकांकडून टाळ्या वाजवून घेण्याकरितां हा तुरुंगांत गेला आहे, अशा प्रकारचे आरोप त्यांच्यावर काय कमी झाले? सांप्रतच्या राष्ट्रीय निशाणाच्या चळवळीवर हेच आरोप सुरू आहेत. असहकारितेची चळवळ लोकप्रिय व्हावी म्हणून राष्ट्रीय निशाणाच्या समूहाचा आत्मयज्ञ करण्यांत येत आहे; अशी निंदा आजकाल काय थोडी ऐकावयास मिळते? लो. टिळक यांनीं या निंदेची पर्वा केली नाहीं; आणि त्यांच्या आयुष्याचे अखेरीस त्यांचे निंदकच स्तुतिपाठक होऊन बसले. फलासंबंधानें अपेक्षा मनांत न धरतां आत्मयज्ञ करण्याचा लो. टिळक यांचा स्वभाव पडल्यामुळें त्यांना अशा निंदेची पर्वा करण्याची जरूरी राहिली नाहीं. आज समूहाच्या आत्मयज्ञाच्या वेळीं व्यक्तिशः निंदा किंवा स्तुति जी होते ती पुढाऱ्यांची होते, पण बाकीच्या लोकांना आपल्या कृतींत फलाविषयीची पूर्ण उदासीनताच ठेवावी लागतें. आज ७५ लोक पकडले, काल सुरतचे ४० पकडले अशा प्रकारच्या बातम्या प्रसिद्ध होण्यापलीकडे अधिक गवगवा समूहाच्या आत्मयज्ञाचा होऊंच शकत नाहीं. तत्काळ स्तुति किंवा निंदा याची पर्वा न करतां गंभीर व शांत वृत्तीनें आत्मयज्ञ करण्यास तयार होणें, हा सद्गुण राष्ट्रांत चोहोंकडे पसरलेला असल्याशिवाय कोणतेंहि राष्ट्र वैभवसंपन्न व सदाचाराचें माहेरघर होऊंच

शकत नाहीं, आज अशा प्रकारच्या समूहाच्या आत्मयज्ञाचीं उदाहरणें हिंदुस्थानांत एकसारखीं दृष्टीस पडत आहेत, हें हिंदुस्थानचें सद्भाग्यच समजलें पाहिजे. युवराजांच्या प्रवासाच्या वेळच्या आत्मयज्ञाची समाप्ति होते न होते, तोंच अकालींचा आत्मयज्ञ सुरू झाला; आणि अकालींचा आत्मयज्ञ संपतो तोंच राष्ट्रीय निशाणाचा आत्मयज्ञ पुढें आला. या सर्व आत्मयज्ञांवर मूर्खासारखें कांहीं तरी करीत आहेत, अशी टीका विरुद्ध पक्षाकडून करण्यांत येत आहे. हा मूर्खपणाचा छाप टिळकांवर मारण्यास त्यांच्या प्रतिस्पर्ध्यानीं कोठें कमी केलें ? आपलें सामर्थ्य न ओळखतां टिळक या टिकाणीं घसरला, म्हणून आनंद मानणाऱ्या प्रतिस्पर्ध्यांचें उद्गार टिळकांच्या वेळीं काय कमी ऐकण्यांत येत होते ? ९७ सालच्या कारागृह-वासानंतर टिळकांचें सार्वजनिक आयुष्य संपलें, आणि पोरकटपणानें यानें आपल्या बुद्धिमत्तेची खराबी करून घेतली, म्हणून म्हणणारे काय थोडे लोक होते ? ताईमहाराजांच्या खटल्यांत टिळक सांपडल्या बरोबर याच्या सार्वजनिक चारित्र्यावर पडदा पडला असें म्हणून मुंबईस व पुण्यास काय थोडया लोकांनीं आनंद मानला ? सुरतेची काँग्रेस मोडल्यानंतर ' टिळक मावळला ' म्हणून टाहो फोडण्यास काय थोडया लोकांनीं कसूर केली ? आज याच गोष्टी समूहाच्या आत्मयज्ञासंबंधानें ऐकूं येत आहेत. राष्ट्रांत कुवतच नाहीं, मग समूहाच्या आत्मयज्ञाच्या गोष्टी बोलतां कशाला, अशी टीका एकसारखी चालली आहे. नागपुरास एखाद्या दिवशीं दोन तीन असामीच तुरुंगांत गेले आणि यांतील एखाद्यानें माफी मागितली म्हणजे, चालली मरत ही समूहाच्या आत्मयज्ञाची,चळवळ, अशी टीका आजकालहि वारंवार वाचावयास मिळत आहे ! असल्या टीकेनें लोकमान्य टिळक कधीहि निरुत्साह झाले नाहींत; असल्या टीकेमुळें त्यांनीं कधींहि मागें पाऊल घेतलें नाहीं. व्यक्तीच्या काय किंवा राष्ट्राच्या काय, आत्मयज्ञाच्या चळवळीस

भरती ओहोटी असावयाचीच. भरतीनें फुगूं नये व ओहोटीनें अटूं नये, असा त्यांनीं क्रम ठेविला होता. तोच क्रम समूहाच्या आत्मयज्ञानेंहि आज पुढें चालविला पाहिजे. लो. टिळक हे स्वतः इतरांना आत्मयज्ञ करा म्हणून सांगण्याच्या, उर्फ त्या संबंधानें संघटित प्रयत्न करण्याच्या उद्योगांत पडले नाहींत. स्वतःच्या एकट्याच्या आत्मयज्ञानें असला उद्योग करण्याची स्फूर्ति राष्ट्रांत आपोआप उत्पन्न होईल, अशी त्यांची श्रद्धा होती, आणि राष्ट्रभर असला उद्योग सुरू झाला असतां त्या उद्योगाचें नीट संग्रहण व्हावें म्हणून, उर्फ लोकसंग्रहाकरितां ते स्वतःच्या एकट्याच्या आत्ययज्ञाचें उदाहरण लोकांपुढें ठेवीत असत. पुण्यास पिकेटिंगची चळवळ प्रथम त्यांनीं सुरू केली; पण समूहाच्या आत्मयज्ञाचें स्वरूप या चळवळीस येणार असें पहाण्याबरोबर ती चळवळ पुढें चालविणें किंवा कसें हें त्यांनीं स्वयंसेवकांवरच सोपविलें. पुण्याच्या पहिल्या पिकेटिंगच्या वेळीं दंगाधोपा होऊं न देतां शांतता राखण्याची जबाबदारी आपल्यावर आहे असें लो. टिळक यांना कळवून, पिकेटिंगच्या कार्यांत अडथळा करण्यास पोलिसनें सुरवात केली. पिकेटिंग चालूं असतांना रस्त्यांत पूर्ण शांतता ठेवण्याचा बोजा मी माझ्या शिरावर घेतों, असें आश्वासन लोकमान्य टिळक यांनीं पोलिसला दिलें. त्यावेळीं पोलिस सुपरिंटेंडेंट यांनीं टिळकांना असें उत्तर दिलें कीं, रस्त्यांत शांतता राखण्याचें काम बादशहाच्या सरकारचें आहे, व हें काम स्वतःच्या हातून सोडण्यास बादशहाचें सरकार बिलकूल तयार नाहीं. पोलिस सुपरिंटेंडेंडच्या या उत्तरामुळें मॅजिस्ट्रेटच्या हुकुमानें ही पिकेटिंगची चळवळ निष्कारण बंद पाडण्यांत येणार, हें टिळकांनीं त्यावेळीं तेव्हांच ओळखलें; आणि मॅजिस्ट्रेटी जुलमाचे पायीं आत्मयज्ञ करण्यास जे तयार असतील त्यांनीं या चळवळींत पुढें यावें, असें स्वयंसेवकांना त्यांनीं बजावलें. त्यावेळीं एक

दिवस स्वयंसेवकांनीं मॅजिस्ट्रेटी हुकूम तोडला, व पुढें पिकेटिंगचें काम बंद पडलें. पुण्याच्या पहिल्या पिकेटिंगच्या वेळीं दंडाची बहुतेक सर्व रक्कम 'केसरी' ऑफिसांतून भरणा करण्यास त्यावेळीं लो. टिळक यांनीं कमी केलें नाहीं; पण चळवळ पुढें चालत नाहीं याबद्दल त्यांच्या मनास अत्यंत वाईट वाटलें, व इतरांच्या मदतीची अपेक्षा न करतां केवळ फकिरी वृत्तीनें आत्मयज्ञ करण्यास प्रवृत्त होणाऱ्या स्वयंसेवकांचा समूह उत्पन्न झाल्याशिवाय हा मॅजिस्ट्रेटी जांच संपावयाचा नाहीं, असें त्यांच्या मनानें पक्कें घेतलें. आज पंधरा वर्षांनंतर लो. टिळक यांना पाहिजे होती ती समूहाच्या आत्मयज्ञाची स्थिति प्राप्त झाली आहे. शांतता राखण्याचा बोजा आपल्या शिरावर घेणें, आणि दुसऱ्यावर अवलंबून न राहतां आत्मयज्ञ करूं पाहणाऱ्या स्वयंसेवकांचा भरणा भरपूर असणें, या गोष्टीची वाण त्यावेळीं लोकमान्य टिळकांना भासली होती, व तशी वाण पुढें भासूं नये म्हणून त्यांचे एकसारखे प्रयत्न चालू होते. अत्याचारांचा दोष आपल्या माथीं मारून आपल्या मार्गांत नसते अडथळे उभे करण्यांत येतील हें लोकमान्यांना माहीत होतें, आणि कुशल सेनानायक या नात्यानें आत्मयज्ञाच्या लढाईंत हे अडथळे टाळण्यास जपलें पाहिजे, असें त्यांचें मत होतें. होमरूलची किंवा स्वराज्याची चळवळ त्यांनीं सुरू केल्यानंतर, चिरोलसाहेबांवर फिर्याद करण्यांत लो. टिळक यांचें धोरण कोणतें होतें ? आत्मयज्ञाच्या लढाईंत मॅजिस्ट्रेटी जुलमांची बाब एका बाजूस ठेवून व अत्याचाराची बाब पुढें आणून भलत्याच दिशेनें लढाईच्या ओघास वाहत जाण्यास भाग पाडणें, हा नोकरशाहीचा नेहमींचा कावा आहे, हें लो. टिळक ओळखत होते; आणि असल्या पेंचांतून आपणांस मुक्त होतां यावें म्हणून चिरोल साहेबांच्या खटल्याची त्यांनीं उभारणी केली. धारवाडच्या पिकेटिंगची हकीकत, मदुरेच्या पिकेटिंगची हकीकत किंवा इतर दंग्याधोप्याची हकीकत वाचली असतां समूहाच्या आत्मयज्ञाच्या लढाईच्या

वेळीं लढाईची मुख्य जागा सोडून व आडरानांत लढवय्यांना फसगतीनें नेऊन, अत्याचाराच्या क्षेत्रावर उभी राहून नोकरशाही लढाई कशी खेळते, हें सर्वांच्या ध्यानीं आल्यावांचून राहणार नाहीं! रणक्षेत्र नोकरशाहीला बदलतां येऊं नये म्हणून लोकमान्यांनीं चिरोलसाहेबांवरील खटल्याचा एवढा अट्टाहास केला. व्यक्तीची निंदा चिरोलसाहेबांनीं कितीहि केली तरी त्याची पर्वा त्यांना नव्हती; करावयाचें एक व बाहेरून सोंग आणावयाचे निराळें, असल्या धूर्तपणाचा किंवा कपटवृत्तीचाहि हा डाव नव्हता. स्वराज्याच्या राजकारणांत व्यक्तीच्या किंवा समूहाच्या आत्मयज्ञावर जेथें यश मिळवावयाचें असतें तेथें आत्मयज्ञाच्या भूमीशिवाय इतर आखाडयांत पळून जाण्यास प्रतिस्पर्ध्याला वावच ठेवतां कामा नये, असा झुंजेचा मुख्य नियम आहे. हा नियम आपल्या एकटया व्यक्तीच्या आत्मयज्ञाकरितां लो. टिळक पाळीत असत. प्रतिस्पर्ध्याला आसन बदलतां येतां कामा नये, या पद्धतीचें महत्त्व त्यांना पूर्णपणें कळून चुकलें होतें; आणि हें महत्त्व ओळखूनच, चिरोल-साहेबांच्या खटल्याचे पायीं लाखो रुपये खर्च करण्यास त्यांनीं मागें पुढें पाहिलें नाहीं. असल्या प्रसंगीं हिंदी लोकांच्या पदरीं यश बांधण्यास नोकर-शाही कसची तयार होणार? विलायतेंतील चिरोल साहेबांच्या खटल्यांत नोकरशाहीनें टिळकांना यश येऊं दिलें नाहीं; आणि आज महात्मा गांधी यांनीं शांततेच्या व्रताच्या नियमांनीं सर्व कार्यक्रम गुरफटून टाकला असला तरी महात्मा गांधी यांच्यामुळेंच पूर्वीहून अधिक अत्याचार व दंगेधोपे होत आहेत, असें निःशंकपणें असेंब्लीमध्यें प्रसिद्ध करून, नोकरशाही मॅजिस्ट्रेटी जुलमाच्या जोरावर, समूहाच्या आत्मयज्ञाच्या लढाईंत रणक्षेत्रांतून पळ काढून अत्याचाराच्या भूमीवर तलवार उपसून उभी राहूं पहात आहे! लो. टिळक यांच्या एकटयाच्या आत्मयज्ञाच्या चरित्रांत जे अडथळे आले आणि त्या अडथळ्यांना दूर करण्याकरितां त्यांनीं आपल्या स्थिर बुद्धीनें जें

धोरण आखलें, त्या अडथळ्यांचा व धोरणांचा नीट विचार करून, समूहाच्या आत्मयज्ञाकरितां लोकांना मार्गदर्शक असे नियम घालून देण्याकरितां जर कमिशन नेमण्यांत आलें, तर सांप्रतच्या राष्ट्रीय निशाणाच्या चळवळीमध्यें काँग्रेसच्या पुढाऱ्यांनीं जे नियम घालून दिले आहेत तेच नियम बरोबर आहेत असें म्हटल्यावांचून सदर कमिशनला गत्यंतर राहणार नाहीं. समूहाच्या आत्मयज्ञाचा कार्यक्रम कोणत्या नियमांना अनुसरून चालला पाहिजे, हें ठरविण्याचें लोकसंग्रहाचें काम म्हणजे लो. टिळक यांचें राजकीय चरित्र होय. हें ध्यानीं ठेवून व त्यांच्या चरित्राचा वारंवार विचार करून सांप्रतच्या समूहाच्या आत्मयज्ञास निरनिराळ्या प्रकारें मदत करणें इष्ट आहे, असेंच त्यांची पुण्यतिथि त्यांच्या सर्व अनुयायांनीं निक्षून सांगत आहे.

* राष्ट्रीय निशाणाचा विजय

गेले शनिवारीं म. गांधी पर्वाचे दिवशीं नागपुरास दे. वल्लभभाई पटेल व बाबू राजेंद्रप्रसाद यांनीं काँग्रेसच्या वर्किंग कमिटीच्यातर्फे राष्ट्रीय निशाणाच्या अब्रूकरितां चाललेली सत्याग्रहाची चळवळ यशस्वी रीतीनें परिसमाप्त केली. सत्याग्रहाच्या चळवळींत अशा प्रकारें यश मिळविण्याचें भाग्य फार थोडयांच्याच कपाळीं लिहिलेलें असतें ! अकालींच्या चळवळीनंतर राष्ट्रीय निशाणाच्या चळवळीनें हें उत्तम यश मिळविलें आहे. ता. १७ रोजीं मॅजिस्ट्रेटी हुकमाची मुदत संपलेली होती. पुन्हां मॅजिस्ट्रेटी हुकूम पुढील दोन महिन्यांकरितांकाढण्यांत येणार नाहीं, असें नागपूरच्या सरकारनें जाहीर केलें होतें. तेव्हां ता. १७ पासून राष्ट्रीय निशाणाच्या चळवळीला नवें वळण तरी लागणार, किंवा चळवळ यशस्वी तरी होणार, असें गेल्या आठवडयांतच सिद्ध झालें होतें. श्री. वल्लभभाई पटेल यांनीं वर्किंग कमि. टीच्यातर्फे परिसमाप्तीच्या वेळेचें जें जाहीर पत्रक प्रसिद्ध केलें आहे त्यांत असें म्हटलें आहे कीं, गांधी–पर्वाची १८ वी तारीख शनिवारी पडल्यामुळें नेहमींची शनिवारची सुट्टी सत्याग्रहाला न घेतां शुक्रवारीं सुट्टी घेऊन शनिवारीं राष्ट्रीय निशाणाची मिरवणूक काढण्यांत यावी, असें वर्किंग कमिटीच्या मंडळींनीं ता. १६ रोजींच ठरवून टाकलें. मनाईचा मॅजिस्ट्रेटी हुकूम जर नाहीं, तर कोण कोणास अडथळा करूं शकणार ? गर्दीच्या निमित्तानें पोलिस त्रास देऊं शकतें; पण गर्दी करणें हा राष्ट्रीय निशाणाच्या चळवळींतील हेतूच होऊं शकत नाहीं. तेव्हां १८ तारखेच्या मिरवणुकींत ठराविकच शेंसवाशे इसमांनीं जावयाचें, इतरांनीं जाण्याची

---

* नवाकाळ, ता. २१ आगस्ट १९२३

जरूरी नाहीं असा निर्बंध मिरवणुकीसंबंधाच्या जाहीर पत्रकांत दे. वल्लभभाई पटेल यांनीं घातला. कोणाचें मन दुखविलें जाईल, कोणाला खिजविल्यासारखें होईल, अशा तऱ्हेचे दोष देण्यास जागा राहूं नये म्हणून सिव्हिल लाइन्समधून ही मिरवणूक जातांना होईल तितकी निमूटपणें मिरवणूक जावी, असेंहि स्वयंसेवकांना कळविण्यांत आलें. आपण कांहीं चोरून मारून करीत आहों किंवा फसगमतीनें डाव साधीत आहोंत, असें म्हणण्यास कोणासहि जागा राहूं नये म्हणून अमक्याच वेळीं अमक्याच रस्त्यानें सिव्हिल लाईन्समधून ही मिरवणूक जाईल, असें जाहीर पत्रकांत स्पष्टपणें जाहीर करण्यांत आलें. सिव्हिल लाइन्समधील जे रस्ते मिरवणुकीसाठीं पसंत करण्यांत आले ते रस्ते दे. वल्लभभाई पटेल यांनीं पसंत केलेले होते. पोलिस अधिकारी किंवा मॅजिस्ट्रेट यांच्या मर्जीचा या पसंतीशीं कांहीं संबंध नव्हता. ता. १८ रोजीं निघालेल्या मिरवणुकीचें वरील तऱ्हेचें जाहीर पत्रक ता. १७ रोजींच नागपुरांत चोहोंकडे वाटून प्रसिद्ध करण्यांत आलें होतें. पोलिस, मॅजिस्ट्रेट व सरकार यांच्या माहितीकरितां सदर हस्तपत्रकें त्यांनाहि देण्यांत आलीं होतीं. मॅजिस्ट्रेटी हुकूम पुढें न काढतां जर १८ तारखेच्या मिरवणुकीस पोलिसानें हरकत घेतली, तर तसली हरकत दूर होण्याकरितां सत्याग्रहाचा रोजचा आत्मयज्ञ पुढें चालविण्यांत येईल असें आव्हानपूर्वक अधिकाऱ्यांना कळविण्यांत आलें होतें. दे. वल्लभभाई पटेल यांचा हा जाहीरनामा प्रसिद्ध होण्याला आणि पोलिस ॲक्टच्या ३० कलमाखाली १५ दिवसपर्यंत आम्हीं मिरवणुकीस मनाई करणार आहों असें पोलिसाकडून जाहीर होण्याला एकच गाठ पडली. गर्दी, दंगाधोपा, लोकांना खिजविणें असल्या प्रकारासंबंधानें नागपुरास गेले तीन चार महिने सत्याग्रह मंडळाकडून अत्यंत खबरदारी घेण्यांत येत असल्यामुळें दंग्याधोप्याच्या किंवा तसल्या इतर कारणानें मिरवणुकीस पोलिसनें अडथळा करण्यास मुळीं सवडच नव्हती.

ता. १८ रोजीं निघालेल्या मिरवणुकीनें पोलिसची अगाऊ परवानगी घेतलेली नव्हती. आपला कार्यक्रम व्यवस्थित रीतीनें छापून ता. १७ रोजीं दे. वल्लभभाई पटेल यांनीं प्रसिद्ध केला होता. अगाऊ परवानगी घेतली नाहीं या मुद्यावर पोलिस मनाई करील असें वाटलें होतें, पण आपला मूर्ख पणा आणखी १५ दिवस लांबविण्यांत अर्थ नाहीं, असें नागपूरच्या नोकरशाहीला वाटलें, आणि ता. १८ रोजींची राष्ट्रीय निशाणाची मिरवणूक सिव्हिल लाईन्समधून दे. वल्लभभाई पटेल व बाबू राजेंद्रप्रसाद यांनीं पसंत केलेल्या रस्त्यानें निर्विघ्नपणें पोलिसनें जाऊं दिली. सत्याग्रहाचें काम संपलें, नागपूरास ता. १८ रोजीं मोठें यश मिळालें! १६००–१७०० सद्गृहस्थ आपखुषीनें वर्ष सहा महिन्यांच्या कैदेंत जाण्याची किंमत भरून नागपूरचें हें यश खरेदी केलें आहे. शेट जम्नालाल बजाज यांच्या एकट्याच्या स्फुरणामुळें या चळवळीस एकदम राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झालें. शेट जम्मालाल बजाज हे स्वतःचा आत्मयज्ञ करण्यास तयार झाल्यामुळेंच राष्ट्रीय निशाणाचें महत्त्व, त्याच्या अब्रूसंरक्षणापासून राजकीय एकीच्या दृष्टीनें राष्ट्राचे होणारे फायदे, आणि आत्मयज्ञाच्या बंधनानें बांधण्यांत येणारी निरनिराळ्या प्रांतांतील निरनिराळ्या राष्ट्रभक्तांची जूट या गोष्टी आज प्रत्यक्षपणें सर्वांच्या अनुभवास आल्या आहेत. अनुमानानें व तर्कानें या गोष्टी लोकांपुढें मांडणें निराळें, आणि लोकांनीं स्वतः तसे वागून या गोष्टींचा अनुभव स्वतः घेऊन लोकांना प्रत्यक्ष गुण येणें निराळें! अकालींच्या सत्याग्रहानें प्रत्यक्ष सिद्धि लोकांपुढें उभी केली. पण अकालींच्या सत्याग्रहाला राजकीय स्वरूप कोणी दिलें नाहीं. धार्मिक हेतूनें व धार्मिक कारणाकरितां सदर सत्याग्रह महात्मा गांधी यांच्या असहकारितेच्या चळवळींतील धोरणाला अनुसरून करण्यांत आला. नागपूरच्या राष्ट्रीय निशाणाच्या सत्याग्रहाची गोष्ट तशी नाहीं. राष्ट्रप्रेम व राजकीय एकी, या दोन बाबींना धरून राष्ट्रीय निशाणाची

उभारणी करण्यांत आलेली आहे.राष्ट्रप्रेम व्यक्त करण्याचें एक बाह्य चिन्ह याच दृष्टीनें सर्व लोक राष्ट्रीय निशाणाकडे आज पहात आहेत. राष्ट्रशक्ति लोकांत उत्पन्न करण्याचें सामर्थ्य या निशाणांत आहे, अशी खात्री दीड दोन हजार लोकांच्या कारागृहवासानें आतां सर्वांना पटविली आहे. राजकीय एकीच्या दृष्टीनें निरनिराळ्या प्रांतांतील स्वयंसेवक धर्मक्षेत्राला जसे जावे त्याप्रमाणें आज नागपुराच्या तुरुंगांत स्वेच्छेनें जाऊन पडले आहेत. राष्ट्रीय निशाणाला सिव्हिल लाईन्समधून नागपूरच्या सरकारनें जाऊ दिलें तरी शेट जम्नालाल बजाज वगैरे मंडळींना तावडतोब तुरुंगांतून सोडून देण्याइतकी दिलसफाई नागपूरचें सरकार दाखवील, असें आम्हांस वाटत नाहीं. चूक कबूल करण्याची आतां कोठें थोडीशी संवय सरकारला लागूं पहात आहे. सत्याग्रहाचें औषध असेंच आहे कीं, योग्य पथ्य संभाळून जर तें औषध देण्यांत आलें, तर हट्टी रोगावरहि तें लागूं पडल्याशिवाय रहात नाहीं. पथ्य न संभाळतां जर औषध पुढें करण्यांत आलें, तर तसाहि उलट गुण दिसून आल्यावांचून रहात नाहीं. सत्याग्रहाचें पथ्य कसें संभाळावयास पाहिजे व त्या संबंधाचे नियम कोणते आहेत, हें राष्ट्रीय सभेच्या पुरस्कर्त्यांना अकालींच्या चळवळींतील व राष्ट्रीय निशाणाच्या चळवळींतील अनुभवानें आतां नीट समजलें आहे. प्रसंग आल्यास पंधरा वीस हजार स्वयंसेवक केंद्रस्थानीं आत्मयज्ञासाठीं गोळा करण्याइतकी राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांत नवी शक्ति आहे, हेंहि प्रत्यक्ष अनुभवानें नागपुरास ठरलेलें आहे. गयेच्या काँग्रेसमध्यें कायदेभंगाच्या पूर्व तयारीस राष्ट्रानें लागावें, असें ठरविण्यांत आलें; ही तयारी कोठें आहे, व गेले आठ दहा महिने या पूर्वतयारीच्या दृष्टीनें राष्ट्रानें काय केलें, असा कुत्सित प्रश्न कित्येक लोक विचारतात. वीस पंचवीस हजार आत्मयज्ञ करणारे स्वयंसेवक राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांना राष्ट्रीय सभेनें हांक मारली असतां, मिळण्यास कमी पडणार नाहीं, असें

नागपूरच्या राष्ट्रीय निशाणाच्या चळवळीनें आज सिद्ध केलें आहे. राष्ट्रीय निशाणाचीच अब्रू राखली गेली आहे असें नव्हे तर राष्ट्रीय सभेचीहि अब्रू आज राखली गेली आहे. राष्ट्रीय सभेची वाताहत लवकरच लागेल म्हणून आनंद मानणारे कांहीं कौन्सिलवाले आहेत; पण त्यांच्या आनंदावर राष्ट्रीय सभेला मिळालेल्या या विजयानें विरजण पडल्यावांचून राहणार नाहीं. सत्याग्रहाचें औषध लागू पडलें आहे, गुण येऊं लागला आहे, या मार्गानें एकेक गांठ तोडत व सोडत गेलें पाहिजे. शेट जम्नालाल बजाज वगैरे मंडळींना कांहीं दिवस कारागृहवासाचें दुःख नाहक या पुढें सोसावें लागणार, अशीं चिन्हें दिसत आहेत. पण या असल्या कारागृहवासामुळेंच राष्ट्रीय निशाणाची व राष्ट्रीय सभेची अब्रू आज सांभाळण्यांत आली असल्यामुळें, तुरुंगांतील त्यांच्ची या पुढील तपश्चर्या राष्ट्रास अधिक तेजस्वी करण्यास उपयोगी पडेल, यांत तिळमात्र संशय नाहीं.

---

* दिल्लीच्या काँग्रेसची तडजोड

प्रतिनिधींच्या संख्येच्या दृष्टीनें आणि लोकांच्या उत्साहाच्या दृष्टीनें दिल्लीची जादा काँग्रेस अगदी रोडकी झाली. हजार पंधराशे प्रतिनिधी आणि हजार पंधराशें प्रेक्षक एवढाच समुदाय काँग्रेस मंडपांत जुळत होता. दिल्ली शहरांत तर काँग्रेसविषयीं एक प्रकारची अनास्थाच दिसून येत होती. उत्साह उत्पन्न करण्याच्या दृष्टीनें दिल्लीची जादा काँग्रेस जरी फारशी उपयोगी पडली नाहीं, तरी तडजोड घडवून आणण्याच्या दृष्टीनें या जादा काँग्रेसनें विशेष महत्त्वाचें काम केलें आहे. कांहीं तरी तडजोड घडून आली पाहिजे अशा बुद्धीनेंच प्रत्येकजण दिल्लीस गेलेला होता. मौ. महंमद अल्ली सुटून आलेले होते, आणि महात्मा गांधी यांच्या काँग्रेसच्या पक्षाचा पुढारीपणा त्यांजकडे गेलेला होता. कौन्सिलांवर बहिष्कार घालण्यासंबंधानें मौ. महंमदअल्ली व डॉ. किश्चलू हे दोघेहि दोन वर्षांपूर्वीप्रमाणेंच आजहि कौन्सिलें नकोत असेंच म्हणणारे दिल्लीस होते. आपण जी थुंकी तोंडांतून बाहेर थुंकून टाकली त्याच थुंकीला पुन्हां चाटत बसण्याचें काम जितकें निंद्य आहे तितकेंच सरकारनें आपल्या मागणीचा विचार केला नसतांना पुन्हां कौन्सिलांत जाण्याचा उद्योग करणें निंद्य होय, असें दिल्लींत मौ. महंमदअल्ली यांनीं बऱ्याच प्रसंगीं बोलून दाखविलें ! तडजोडीचा ठराव काय किंवा कायदेभंगाचा ठराव काय, दोन्ही ठरावांच्या प्रसंगीं मौ. महंमद अल्ली किंवा डॉ. किश्चलू यांनीं कौन्सिलांवर बहिष्कार घालण्यास उद्युक्त करणारीं अशींच भाषणें केलीं. कौन्सिलवाल्या पक्षाकडून कौन्सिलांत जाण्याची तरफदारी राष्ट्रीय सभेच्या मंडपांत बहुतेक करण्यांत आली नाहीं असें म्हटलें तरी चालेल. आमचा मार्ग तुम्हाला चुकीचा

---

* नवाकाळ, ता. २० सप्टेंबर १९२३

वाटत असला तरी थोडे दिवस आम्हाला संभाळून घ्या, असे म्हणण्यावरच कौन्सिलवाल्या पक्षाचा कटाक्ष विशेष होता ! कौन्सिलांच्या बहिष्काराची छाया काँग्रेस मंडपांत पडून राहिली होती. सामान्यतः सर्वांचा कल कौन्सिलवरील बहिष्काराच्या बाजूचाच होता. मग कौन्सिलांच्या बहिष्कारासंबंधानें करावयाची चळवळ अधांत्री ठेवण्याच्या तडजोडीला मौ. महंमदअल्ली वगैरे मंडळींनीं कशी संमति दिली ? अधांत्री ठेवण्याचा ठराव मुंबईस भरलेल्या ऑल इंडिया काँग्रेस कमेटीनें पास केला होता, आणि सदर ठरावाच्या बाहेर दिल्लीच्या जादा काँग्रेसनें कांहींहि तडजोड केलेली नाहीं. कौन्सिलांत जाण्याची चळवळ कौन्सिलवाल्या पक्षानें स्वतःच्याच जबाबदारीवर करावयाची आहे; काँग्रेसच्या कमिटयांनीं या कामीं पैसाहि खर्च करावयाचा नाहीं, वेळहि खर्च करावयाचा नाहीं, आणि चळवळहि करावयाचीं नाहीं; काँग्रेसच्या तर्फे म्हणून कांहींहि व्हावयाचें नाहीं ! व्यक्तिशः ज्याला जसें बरें वाटेल तसें त्यानें वागावें अशा धर्तीची ही तडजोड आहे. कौन्सिलांत जाण्याचा मार्ग ज्यांना पसंत वाटत असेल त्यांनीं खुशाल स्वीकारावा, पण ज्यांना तो पसंत वाटत नसेल त्यांनीं काँग्रेसच्या कार्याकरितां म्हणूनहि मतें देण्यास जाण्याची बिलकूल जरुरी नाहीं. काँग्रेसचें काम कौन्सिलबाहेरचें आहे. कौन्सिलांशीं संबंध काँग्रेस ठेवूं इच्छित नाहीं किंवा कौन्सिलांमार्फत कामहि करूं इच्छित नाहीं; पण कौन्सिलांत जाण्याची ज्यांना इच्छा आहे त्यांना काँग्रेसच्या मुख्य चळवळींत कामकाज करण्यास हरकत येऊं नये म्हणून, आणि काँग्रेसला झुगारून ही मंडळी कौन्सिलांत गेली असा त्यांचे कपाळींचा लोकापवाद टळावा म्हणून व्यक्तिशः स्वतःच्या जबाबदारीवर कौन्सिलांत जाण्याची त्यांना मुभा देण्यांत आली आहे ! काँग्रेसच्या विरुद्ध वागतात हा लोकापवाद टळला असतां कायदेभंगाच्या चळवळींत सामील होण्यास दे. बं. दास वगैरे पुढाऱ्यांना सोयीचें होणारें असल्यामुळें, लोकापवादाचा

त्यांच्या कपाळींचा टिळा पुसून टाकण्यांत आला आहे. मुंबईस झालेल्या तडजोडीबाहेर ही तडजोड अधिक गेलेली नाहीं; पण कौन्सिलांवरील बहिष्कारासंबंधानें इतपत तरी तडजोड कां मान्य झाली? मौ. महंमद अल्ली, डॉ. किश्चल्, बाबू राजेंद्रप्रसाद, दे. वल्लभभाई पटेल, दे. गिडवानी वगैरे मंडळींनीं कौन्सिलबहिष्कारासंबंधाचा एक प्रकारचा आपला पराभव होत आहे, असें काँग्रेसच्या मंडपांत स्पष्टपणें जाहीर केलें, आणि एकी व्हावी म्हणून हा पराभव आम्ही खाली माना घालून गिळतों आहों असेंहि त्यांनीं सर्वांना निवेदन केलें! कौन्सिलबरील बहिष्कारासंबंधानें अशी विल्हेवाट कबूल करण्याचें काय प्रयोजन होतें? दिल्लीच्या जादा काँग्रेसमध्यें मौ. महंमद अल्ली यांनीं जरी गयेच्या काँग्रेसप्रमाणें कौन्सिल बहिष्काराचा ठराव पुढें आणला असता तरी तो बहुमतानें पास झाला नसता म्हणून त्यांनीं तडजोड केली, असें कांहींचें म्हणणें आहे. प्रतिनिधींचीं मतेंच जर मोजलीं असतीं तर मौ. महंमद अल्ली यांना दिल्लीस मताधिक्य मिळालेंच असतें असें नाहीं. मताधिक्याचा कांटा दे. बं. दास यांच्या बाजूला झुकल्यासारखा होता; पण या झुकण्यांत विशेष अर्थ नव्हता. पंधराशें सोळाशें प्रतिनिधींत बंगालचेच सातशें प्रतिनिधी हजर होते! बंगालच्या निवडणुकीसंबंधानें तंटा उपस्थित होऊन अखेर निकाल दे. बं. दास यांच्या बाजूचा झाल्यामुळें बंगालचे कौन्सिलवाले तेवढे पांच सहाशें काँग्रेस मंडपांत हजर होते, आणि बाबू शामसुंदर चक्रवर्ती यांच्या बाजूच्या प्रतिनिधींना मज्जाव करण्यांत आला होता. अशा तऱ्हेची एकतर्फेची निवडणूक राष्ट्रीय सभेच्या कामांत अधिक फाटाफूट उत्पन्न करण्यास कारणीभूत झाल्यावांचून राहणार नाहीं, व त्यामुळें बाबू शामसुंदर चक्रवर्ती यांच्या बाजूच्या प्रख्यात पुढाऱ्यांनाहि दिल्लीच्या काँग्रेसच्या मंडपांत येतां आलें नाहीं, अशा तऱ्हेचे दुःखोद्गार या निवडणुकीचा निकाल

देतांना पंचांनीं काढलेले आहेत. बंगाल्यांत दे. बं. दास यांच्या पक्षाचें खरें वर्चस्व नाहीं आणि दिल्लीच्या काँग्रेसमध्यें हजर राहिलेल्या बंगालच्या प्रतिनिधींत बंगालपेक्षां बनारसचा भरणा विशेष होता, अशीहि तक्रार आहे. अशा स्थितींत खरा विचार करण्याला बंगालचीं हीं पांचसहाशें मतें एकावाजूस काढून ठेवणें जरूर होतें. बंगालचीं हीं पांचसहाशें मतें एका बाजूस काढून ठेवून बाकीच्या हजारबाराशें प्रतिनिधींचीं मतें जर घेण्यांत आलीं असतीं तर दोन तृतियांश मतें कौन्सिलच्या बहिष्काराच्या बाजूचीं व एक तृतियांश मतें कौन्सिलवाल्यांच्या बाजूचीं दृष्टीस पडलीं असतीं. गयेच्या राष्ट्रीय सभेनंतर पुढाऱ्यांत जरी चलबिचल झालेली असली, तरी सामान्य लोकमतांत चलबिचल झालेली नाहीं, असेंच वरील आंकडयांवरून सिद्ध होतें. दिल्लीच्या जादा काँग्रेसच्या मंडपांत कौन्सिल संबंधानें तडजोड न होतां दोन तट होऊन गयेप्रमाणें मतें घेण्यावर जर पाळी आली असती, तर पांच सहाशें मतांचा एक गठ्ठा दे. बं. दास यांच्या हाती सांपडल्यामुळें मताधिक्य कदाचित् त्यांच्या बाजूचें थोडेसें झुकलें असतें, हें खरें आहे. मताधिक्यानें दे. बं. दास यांच्या बाजूचा जरी निकाल लागला असता, तरी आपल्या मताला चिकटून राहून आपल्या मतांची चळवळ काँग्रेसच्या कमिटयांच्या मार्फत जरी नाहीं तरी स्वतःच्या संस्थांच्या मार्फत करण्यास मौ. महंमद अल्ली वगैरेंना कोणती हरकत होती ? मुंबईचा अधांत्री ठेवण्याचा ठराव पास झाल्यानंतर स्वतःचीं मतें सोडून देण्यास दे. वल्लभभाई पटेल वगैरे मंडळी जशी तयार झाली नव्हती तशी आजहि कां तयार झाली नाहींत ? दे. बं दास यांच्या हातांतील पांच सहाशें बंगाल्यांच्या गठ्ठयाला भिऊन त्यांनीं तडजोडीचा मार्ग स्वीकारला असें मुळींच नाहीं. कायदेभंगाच्या चळवळीसंबंधानें तडजोड अधिक उपयोगी पडणारी आहे, असें मौ. महंमद अल्ली व डॉ. किश्चलू यांच्या

दृष्टोत्पत्तीस आल्यामुळें तडजोडीचा मार्ग स्वीकारणें त्यांना श्रेयस्कर वाटलें. मुंबईच्या ऑल इंडिया काँग्रेसच्या वेळेपेक्षां आज नवी स्थिति ती कोणती झाली ? मुंबईच्या ऑल इंडिया काँग्रेसच्या वेळीं जर तडजोड या पुढाऱ्यांनी मान्य केली असती तर कायदेभंगाच्या चळवळीला अधिक मदत झाली असती का ? या प्रश्नास असें उत्तर आहे कीं, पुढील वर्षसहा महिन्यांत लहान मोठया कायदेभंगाच्या चळवळींना उत्तेजन देऊन होईल तितक्या लवकर कायदेभंगाची मोठी चळवळ सुरू करण्याचा जो बेत मौ. अहंमद अल्ली व डॉ. किश्चलू यानीं सुटून आल्यानंतर केलेला आहे, तो बेत मुंबईच्या तडजोडीच्या वेळीं पुढाऱ्यांपुढें नव्हता. स्वराज्य मिळविल्यासारखें करून महात्मा गांधी यांना आंम्ही आमच्या उद्योगानें सोडविलें, अशा प्रकारची मोठी उमेद मौ. महंमदअल्ली व डॉ. किश्चलू यांनीं धरलेली आहे. येरवडयाच्या तुरुंगाची किल्ली हुडकून काढून स्वराज्यामार्फत महात्मा गांधी यांना सोडविण्याच्या कार्यक्रमाला मौ. महमदअल्ली यांनीं स्वतःस वाहून घेतलें आहे. लहान सहान कायदेभंगाचें शिक्षण प्रत्येक प्रांतांत सर्व लोकांना देत राहून दोन तीन वर्षांचे आंत स्वराज्याची तयारी गाठण्याइतक्या मोठया प्रमाणावर कायदेभंग सुरू करण्याचा हा कार्यक्रम आहे. मौ. महंमद अल्ली व डॉ. किश्चलू यांच्या या कार्यक्रमाला पूर्णपणें उचलून धरण्यास दे. बं. दास, पंडित मोतिलाल नेहरू, डॉ. अनसारी वगैरे मंडळी अनुकूल आहेत. प्रांतिक कायदे–कौन्सिलांत मताधिक्य होऊन तेथील टक्करीचा उपयोग करून घेण्याची आशा कौन्सिलवाल्या पक्षानें आतां सोडल्यासारखीच आहे ! असेंब्लीमध्यें कांहीं नेमस्तांच्या सहाय्यानें चांगल्या टक्करी देतां येतील एवढीच आशा दे. बं. दास यांना उरलेली आहे. असेंब्ली मोडतां आली तर पहावी, एवढयाकरितां हा उद्योग नवंबरपर्यंत दे. बं. दास करणार आहेत. असेंब्लीत मताधिक्य मिळून असेंब्ली मोडल्याचें पुण्य आपणास

मिळेल, अशी खात्री दे. बं. दास यांना आज नाहीं. कौन्सिलवाल्या पक्षांतील बरेच लोक कौन्सिलें मोडण्याच्या ध्येयाच्या विरुद्ध आहेत ! अशा स्थितींत नवंबरांत निवडणुकी झाल्यानंतर दे. बं दास यांची कौन्सिलमार्फत काम करण्याच्याबाबींत चांगली निराशा होईल, अशीं आज स्पष्ट चिन्हें दिसत अहेत. अशी निराशा होण्याची स्पष्ट चिन्हें दिसत असतांना नवंबरनंतर दे. बं. दास यांनीं कोणत्या मार्गाला लागावयाचें याचा विचार करणें कौन्सिलवाल्या पक्षाच्या पुढाऱ्यांना भाग नाहीं काय ? कौन्सिलवाल्या पक्षाच्या पुढाऱ्यांनीं या संबंधाचा विचार दिल्लीस केला, आणि लहान सहान कायदेभंग कोठेहि सुरू झाले असतां त्यांना उत्तेजन देऊन मोठ्या कायदेभंगाला राष्ट्राला तयार करण्याच्या मार्गाला लावणें अत्यंत जरूरीचें आहे, असें दे. बं. दास यांनीं मनानें दिल्लीस पक्कें घेतलें. कौन्सिलांच्या मार्फतच आपण हें सर्व घडवून आणूं अशी आशा उरलेली नसल्यामुळें नवंबरनंतर मौ. अहंमद अल्ली व डॉ. किश्चल् यांच्या मार्गानें जाण्याची जरुरी दे. बं. दास यांना विशेष वाटली. कायदेभंगाच्या ठरावाची जरूरी दे. बं. दास यांच्या मनाला पूर्णपणें पटल्यामुळें या कामीं त्यांची पक्की मदत मिळवी म्हणून मौ. महंमद अल्ली व डॉ. किश्चल् हे कौन्सिलांत शिरण्याच्या प्रश्नासंबंधानें मुंबईच्या तडजोडीस राजी झाले. कौन्सिलांत शिरण्याच्या बाबींत पांचशें बंगाली मतांचा गट्टा दे. दास यांच्या हातीं असतांना स्वत:ला पाहिजे होता तसाच ठराव दे. बं. दास यांनीं कां करून घेतला नाहीं ? देशबंधूंना तसा ठराव करून घेतां आला असता, नाहीं असें नाहीं; पण काय बिघडतें म्हणून त्यांनीं तसा ठराव करून घेतला नाहीं. कोणतें कार्य बिघडतें ? असेंब्ली जर मोडतां आली नाहीं, किंवा असेंब्लींतील टक्करीच्या मार्फत जर देशांत प्रचंड कायदेभंगाची चळवळ सुरू करतां आली नाहीं तर आपलें कार्य बिघडून जातें, असेंच दे. बं. दास यांचें स्पष्ट मत अहे.

नोकरशाहीशीं केव्हां सहकारिता तर केव्हां असहकारिता करण्याचें पुण्याचें मत दे. बं. दास यांना बिलकूल मान्य नाहीं ! प्रचंड कायदेभंगाशिवाय कांहीं होणार नाहीं, असेंच त्यांचें ठाम मत आहे; व दिल्लीच्या काँग्रेसच्या मंडपांत हें मत शक्य तितक्या स्पष्ट शब्दांत बोलून दाखविण्यास त्यांनीं बिलकूल कमी केलें नाहीं. नवंबरनंतर मौ. महंमद अल्ली यांच्या कायदे-भंगाच्या चळवळींत सामील होण्याचें वचन दे. बं. दास यांनीं उघडपणें दिल्यामुळें ज्या कारणाकरितां देशबंधूंनीं आपल्या हातांतील पांचशें बंगाली मतांचा गट्ठा उपयोगांत आणण्याचें नाकारलें, त्याच कारणाकरितां मौ. महंमद अल्ली यांनीं कौन्सिलांवरील बहिष्कारासंबंधानें थोडें पडतें घेण्याची कबुली दिली ! या तडजोडीमुळें कायदेभंगाच्या चळवळीस जोर येणार असून हिंदु–मुसलमानांतील तेढ आपोआप नष्ट होण्याच्या मार्गाला लागणारी आहे. इतकेंच पैसे जुळविल्यावर, इतक्याच स्वयंसेवकांनीं नांवें नोंदविल्यावर, इतरांची तयारी झाली आहे किंवा नाहीं तें पाहून, अशा प्रकारच्या आडकाठ्या कायदेभंगाच्या चळवळीच्या मार्गांत दिल्लीच्या ठरावानें ठेविलेल्या नाहींत. उद्यां करा, नाहीं तर तीन महिन्यांनीं करा, शांततेच्या कायदेभंगाची चळवळ एकसारखी चालू ठेवण्याची जबाबदारी मौ. महंमद अल्ली यांच्या शिरावर दिल्लीच्या जादा काँग्रेसनें ठेविली आहे. आणि या कामीं पूर्णपणें मदत करण्याचें अभिवचन दे. बं. दास वगैरे पुढाऱ्यांनीं मौलाना महंमद अल्ली यांना दिलें आहे. अशा स्थितींत आपले बारीक सारीक मतभेद एका बाजूस ठेवून सर्व हिंदी राष्ट्रानें एकमतानें व एकदिलानें मौ. महंमद अल्ली यांच्या चळवळीस उचलून धरण्यास पुढें येणें आज अत्यंत जरुरीचें आहे.

---

* सन्मान कोणाचा करावयाचा ?

मुंबईच्या कार्पोरेशनमध्यें मावळत्या गव्हर्नर साहेबांना मानपत्र देण्याचा प्रश्न थोडासा मागें पडला आहे. मुंबईचें लोकमत असल्या सन्मानास विरुद्ध आहे म्हणून हा प्रश्न पुढें आणणें गव्हर्नरसाहेबांच्या स्तुतिपाठकांसहि बरेंच कठीण झालें आहे. मुंबईचें लोकमत कोणत्या बाजूचें आहे, हें गेल्या चारपांच दिवसांत स्पष्ट झालेलें असल्यामुळें आणखी एक दोन आठवडे तरी मुंबईच्या कॉर्पोरेशनमध्यें हा प्रश्न पुढें येईलसें वाटत नाहीं. तथापि ऑक्टोबरच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवडयांत या प्रश्नाची चर्चा पुन्हां सुरू होईल असें दिसतें. मुंबईच्या कॉर्पोरेशनमध्यें निरनिराळे वशिले लावून मताधिक्याची मोट कशीतरी जर बांधली गेली तर लोकमत इतकें खवळलें असतांना मावळत्या गव्हर्नर साहेबांनीं तरी हें असलें मानपत्र कसें स्वीकारावें ? मानपत्र काय कोणीहि देऊं शकतो ! गणेश खिंडींतील किंवा मलबार हिलवरील बटलरहि एखादा सोन्यारुप्याचा करंडक मानपत्रासह मावळत्या गव्हर्नर साहेबांना अर्पण करूं शकेल, नाहीं असें नाहीं; पण हा आपला सन्मान प्रजाजनांच्यातर्फे होत आहे, असें सदर मानपत्र स्वीकारतांना गव्हर्नर साहेबांनीं कसें मानावयाचें ? सार्वजनिक रीतीनें सन्मान करण्याची पद्धत अंतःकरणाचा ओलावा असल्याशिवाय हास्यास्पद ठरत असते. मुंबई शहराच्या अंतःकरणांत ओलावा नाहीं, हें गेल्या दोन आठवड्यांतील गडबडीवरून सिद्ध झालें आहे. मानपत्र देऊं नये असें म्हणणारांनीं आपलें मत मुंबई शहरास मान्य आहे, असें सिद्ध करून दाखविलें आहे. निरनिराळ्या प्रकारांनीं मुंबई शहराचें

---

* नवाकाळ, ता. २९ सप्टेंबर १९२३

लोकमत मावळत्या गव्हर्नर साहेबांना द्यावयाच्या मानपत्राविरुद्ध प्रकट होत असतांना गव्हर्नर साहेबांचा कैवार घेऊन कोणीहि अनुकूल मत प्रकट केलें नाहीं, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. गव्हर्नरसाहेबांच्या मानपत्राविरुद्ध गवगवा चालला असतांना, गव्हर्नरसाहेबांना मानपत्र दिलेंच पाहिजे अशा प्रकारच्या आग्रहांचा एकहि लेख मुंबईच्या टाइम्सनें देखील लिहिलेला नाहीं. गव्हर्नरसाहेबांच्या सन्मानाकरतां अमुक करा तमुक करा, म्हणून अंतःकरणपूर्वक खटपट करणारांचें मत लोकांना ग्राह्य होण्यासारखें जरी नसलें तरी सदर उद्योग करणारांच्या अंतःकरणांत ओलावा असावयास नको काय ? मानपत्राचा ठराव आला तर आला पुढें, नाहीं तर नाहीं; झाला पास तर झाला पास; अशी अनास्था मानपत्रवाल्यांत दृष्टीस पडत आहे. आपला ठराव फेटाळला गेला काय, किंवा पास झाला काय, दोहोंबद्दलं बेफिकिरी दाखविण्यांत एकप्रकारची फुशारकी मारण्यांत येत आहे. कळकळ म्हणून मानपत्रवाल्यांत कोठेंच दृष्टीस पडत नाहीं. वेठीला पकडलेला मनुष्य जसें ओझें वहात असतो, आणि आपल्या पाठीवरील माल वाटेंत धक्का लागून पडला असतां इतरांबरोबरच बेफिकीरपणानें जसा हासत उभा रहातो, याप्रमाणेंच मानपत्राचें ओझें शिरावर घेणारांचीं आज स्थिति आहे. हें ओझें खाली पडून त्याचीं बंधनें जर तुटलीं तर कशी गंमत झाली म्हणून इतरांबरोबरहि हासण्यांत हे सामील होत आहेत ! खेळाडू ज्या प्रमाणें जयापजयाविषयीं तितकासा तत्पर नसतो, व सर्वांबरोबर हासण्या-खेळण्यास नेहमीं उत्सुक असतो, तशाच वृत्तीनें मानपत्र देण्याचा खेळ खेळण्यात येत आहे. खेळाच्या पलीकडे अतःकरणाची कळकळ यांत नाहीं. बऱ्या रीतीनें आपण खेळले, आपण व्यवस्थेशीर उडी मारून दाखविली, मग या बाजूचा जय झाला काय किंवा त्या बाजूचा जय झाला काय, दोनहि प्रसंगीं

स्मितहास्य करण्यास हे तयारच ! असा वृत्तीच्या लोकांनीं उद्यां मुंबईच्या कॉर्पोरेशनमध्यें मताधिक्य करून जर मानपत्र देण्याचा ठराव पास करून घेतला तर तें मानपत्र कोणीहि स्वाभिमानी गव्हर्नर कधीहि स्वीकारणार नाहीं. अशा जुलमाच्या रामरामांत गव्हर्नरसाहेबांना आनंद तरी कोठून होणार ? लॉर्ड सिडनहॅम यांच्या कारकीर्दीचे अखेरीस त्यांच्या भक्तांनीं पुतळा तयार करण्याकरितां वर्गणी केली आणि पुतळाहि तयार झाला. पण त्या पुतळ्याकडे कोणीहि ढुंकून पहात नाहीं. असल्या अशुभ पुतळ्याचें दर्शन घेण्याची कोणास इच्छा होणार ? जरीमाईचें देऊळहि बांधण्यांत येतें, तशांतलाच लॉर्ड सिडनहॅम यांचा हा पुतळा आहे. कोणत्याहि पिशाच्चाला दहींभात व लिंबलोणी अर्पण करण्यांत येतें, तशातलींच ही गव्हर्नर साहेबांचीं मानपत्रें आहेत. पिसाच्चाचा सन्मान करण्यासारखी वृत्ति मानपत्र देणाराची आहे किंवा कसें, हें नीट तपासून घेतल्याशिवाय हल्लींच्या काळीं कोणाहि अधिकाऱ्यानें कोठेंहि मानपत्र घेऊं नये. कारण असल्या मानपत्रांमुळें अधिकाऱ्यांच्या अधिकाराला उजाळा येण्याऐवजीं काळीमाच अधिक लागत असतो. स्वतःच्या अधिकाराची दुष्कीर्ति कायमची पुढें चालणार नाहीं, येवढया गोष्टीला तरी जुलमी अधिकाऱ्यांनीं जपणें जरुरीचें नाहीं काय ? जेथें अंतःकरणांत कळकळ नाहीं; तेथें मानपत्राचें सोंग उभारण्यांत आलें तर त्या सोंगामुळें दुष्कीर्ति अधिक पुढें चालते; आणि आपल्या मागून येणाऱ्या अधिकाऱ्यांचा बोज आपोआप कमी होऊं लागतो. मुंबईच्या कार्पोरेशननें उद्यां जर मानपत्र देण्याचें ठरविलेंच तर तें मुंबईच्या गव्हर्नर साहेबांनी साफ घेऊं नये. मानपत्र देणाऱ्यांत कळकळ असती, तर ती कळकळ गेल्या पांच दहा दिवसांच्या हालचालींत कोठेंतरी दृष्टीस पडावयास पाहिजे होती ना ? मानपत्र दिलेंच पाहिजे; चांगलें कृत्य आहे; असल्या गव्हर्नरसाहेबांचा असला सन्मान

करावयाचा नाहीं तर सन्मान करण्याच्या पद्धतीचा जगांत उपयोग तरी काय, अशा प्रकारच्या विचारांनीं एकाचें तरी अंतःकरण गेल्या पांच दहा दिवसांत पेटलेलें दिसून आलें काय ? गव्हर्नर साहेबांचा कैवार घेण्यासंबंधानें आतांपर्यंत एकसारखा थंडावाच दृष्टीस पडत आहे. कसें बोलूं, काय बोलूं कसा ठराव पुढें आणूं, अशी कुचराई चाललेली आहे. गव्हर्नर साहेबांच्या व त्यांच्या भक्तांच्या कानांवर ही कुचराई आलेली नाहीं काय ? खरा विचार केला असतां असला थंडावा दृष्टीला पडणें अगदीं सहाजिक आहे, असे कोणाच्याहि ध्यानीं आल्यावांचून राहणार नाहीं. भक्त म्हणविणारामध्यें तरी उत्सुकता कोठून दृष्टीस पडावी ? महात्मा गांधीं यांना सहा वर्षांची शिक्षा ज्या गव्हर्नराचे कारकीर्दीत झाली, त्या गव्हर्नरचा सन्मान करा म्हणून लोकांना कोणच्या तोंडानें कोण सांगणार ? सिडनहॅम व हल्लीचें गव्हर्नर या जोडीच्या नांवाचा उच्चार करणेंहि पाप समजलें जाईल, अशी स्थिति असतांना सन्मान करण्यास कोण पुढें येणार ? मुसलमानांनीं कोणाचा सन्मान करावयाचा ? अल्लीबंधू व इतर मुसलमान पुढारी यांच्यावरील कराचीच्या खटल्याची हकीकत लोक विसरलें आहेत काय ? महात्मा गांधी यांचा कार्यक्रम लोकांच्या हातून पूर्णपणें पार पडत नसेल, पण ज्यांना आपण श्रेष्ठ साधूपुरुष समजतो त्यालाच गव्हर्नर साहेबांनीं तुरुंगांत टाकलेलें आहे; याची आठवणहि बुजून जाण्याइतकें बुद्धिमांद्य लोकांत आहे, असें गव्हर्नरसाहेब समजतात काय ? धारवाड प्रकरणाचें स्मरण कर्नाटकला होण्याचे दिवस निघून गेले, असें अधिकाऱ्यांना वाटत आहे काय ? मुळशीच्या सत्याग्रही कैद्यांपैकीं दे. देव यांच्या पाठीवर ओढलेल्या फटक्यांचे वण अदृश्य होण्याच्या पूर्वीच महाराष्ट्रांतील लोक गव्हर्नरसाहेबांना मानपत्र कोणत्या करंडकांत द्यावयाचें याचा विचार करण्यास निमग्न होतील, असें अधिकाऱ्यांना कसें वाटेल ? तुरुंगाची शिक्षा भोगून बाहेर येणारांचा

सन्मान करण्याचा सांप्रतचा काल आहे. लाल लजपतराय, दे. बं. दास, पं. मोतीलाल नेहरू, अकालींचे पुढारी, व राष्ट्रीय निशाणाच्या चळवळीचे आधारस्तंभ जम्नालाल बंजाज यांचा सन्मान सांप्रत लोक करीत आहेत. सन्मानांचा व मानपत्रांचा प्रवाह अशा रीतीनें वहात असतांना या पवित्र प्रवाहांत आपणहि स्नान करून घेण्याची इच्छा जुलुमी व पापी अधिकाऱ्यांनीं कां धरावी.? अंतःकरणांत पश्चात्ताप उत्पन्न होऊन पापक्षालन करण्याकरितां असल्या गंगेंत स्नान करण्याचा अधिकार पतितांनाहि प्राप्त होतो हें खरें आहे. पण नोकरशाहीच्या अंतःकरणाची वृत्ति तशा रीतीनें बदलून जाईतों, नोकरशाहीनें असल्या मानपत्रांच्या उलाढालींत कशास पडावे?

* करणी आणि शिष्टाई

प्रांतिक कौन्सिलें व दिल्लीची असेंब्ली यांच्या निवडणुकी नोव्हेंबरचे प्रारंभाला व्हावयाच्या असून, निवडणुकीकरितां उभे राहिलेल्या उमेदवारांच्या याद्या आतां तयार झाल्या आहेत. या याद्यांकडे पाहतां कोणत्याहि प्रांतिक कौन्सिलांत कौन्सिलवाल्या पक्षास बहुमत मिळण्याची मुळींच आशा नाहीं, असें दिसून येतें. दिल्लीच्या जादा काँग्रेसच्या वेळीं कौन्सिलवाल्या पक्षानें प्रांतिक कौन्सिलांत बहुमत करण्याची आशा सोडून दिली, व हें करणें वस्तुस्थितीस धरून होतें असें आतां स्वच्छ दिसत आहे. असेंब्लीमध्येंहि कौन्सिलवाल्या पक्षाचें बहुमत होऊं शकत नाहीं, असेंच उमेदवारांची यादी सांगत आहे. नव्या कौन्सिलांत व असेंब्लीमध्यें एकंदर चार प्रकारचे सभासद दिसून येणार आहेत. पहिला प्रकार म्हणजे बगलबच्यांचा होय ! हे बगलबच्चे केवळ स्वतःच्याच फायद्यासाठीं कौन्सिलांत किंवा असेंब्लींत निवडून येण्याचा प्रयत्न करणार हें उघड आहे. नोकरशाहीच्या तंत्रानें वागावयाचें; नोकरशाहीची मर्जी संपादन करून घेऊन होईल तितका आपला फायदा करून घ्यावयाचा; आणि आपल्या इच्छेप्रमाणें घडून न आल्यास नोकरशाहीवर रुसल्यासारखें करून, केव्हां केव्हां मतें देण्याचें टाळून किंवा विरुद्ध पक्षाच्या बाजूनेहि मत देऊन आपल्या तोंडावरहि भाकरीचा एखादा तुकडा टाकावयास नोकरशाहीस सुचवावयाचें; हा बगलबच्यांचा क्रम आहे. बगलबच्यांचें स्वरूप अशा प्रकारचें असल्यामुळें निवडणुकीच्या वेळीं या बगलबच्यांना निरनिराळ्या प्रकारची अप्रत्यक्ष मदत करण्यास व त्यांच्या प्रीत्यर्थ स्वतःचें वजन पर्यायानें खर्च करण्यास

---

* नवाकाळ, ता. १३ आक्टोबर १९२३

नोकरशाही चुकणार नाहीं, हें उघड आहे. सरकारी वजन पर्यायानें कोणासाठीं किती खर्च करण्यांत येतें हें पाहिलें असतां, बगलबच्चा कोण हें समजण्यास अडचण पडत नाहीं. बडे श्रीमंत व स्वार्थी पण उपद्व्यापी गरीब मिळून बगलबच्यांचा वर्ग बनत असतो. दुसरा पक्ष नेमस्तांचा होय. या नेमस्तांना नोकरशाहीची मर्जी संपादन करावयाची असते, पण ती आढ्यतेनें संपादन करावयाची असतें. लोकांनीं प्रत्यक्ष करणी करून स्वराज्य संपादन करण्यापेक्षां शिष्टाईच्या मार्गानें स्वराज्य मिळवितां येण्यासारखें आहे असें या नेमस्तांचें धोरण असल्यामुळें, शिष्टाईच्या कामीं लोकांना व नोकरशाहीला उपयोगी पडणारे आम्ही आहोंत असें भासवून आपल्या वकिलीची फी म्हणून कायदे–कौन्सिलांत आम्हास निवडून द्या असें लोकांना ते सांगतात; आणि दिवाणगिरीचीं कामें आम्हाला सांगून राज्यकारभारांत शिष्टाईकरितां आम्हास हिस्सा द्या, अशी मागणी ते नोकरशाहीकडे करतात. बगलबच्यांची दृष्टि लोकांकडे बिलकूल नसते, नोकरशाहीच्या नेत्रसंकेतावर यांची दृष्टि खिळून गेलेली असते. वकिलीचें गिऱ्हाईक मिळविण्यापुरते नेमस्त लोकांकडे पाहतात; आणि अधिकाराकरितां व वैभवाकरितां नोकरशाहीच्या आर्जवानें नेमस्त वागतात. नेमस्तांच्या या शिष्टाईच्या सांप्रदायाविरुद्ध नॉन व्हायओलंट नॉन को-आपरेशनचा किंवा प्रत्यक्ष करणीचा उर्फ डायरेक्ट ॲक्शनचा स्वतंत्र सांप्रदाय महात्मा गांधी यांनीं सुरू केला असून, राष्ट्रीय सभेनें प्रत्यक्ष करणीचें च व्रत स्वीकारलें आहे. या प्रत्यक्ष करणीच्या मताला कायदे–कौन्सिलांत बसणारे नेमस्त अनुकूल नसल्यामुळें, कायदेकौन्सिलांत बसणाऱ्या नेमस्तांच्या जागा आपण पटकावून कायदे–कौन्सिलें एकदांची मोडून टाकलीं म्हणजे प्रत्यक्ष करणीच्या मार्गाला राष्ट्रांत जे अडथळे येतात ते अडथळे नाहींसे होतील, आणि सर्व लोकांकडून प्रत्यक्ष करणीचें संग्रहण चांगलें करण्यांत येईल, अशा आशेनें पं. मोतीलाल नेहरू

व दे. बं. दास यांनीं कौन्सिलें मोडण्याकरितां कौन्सिलवाला पक्ष निर्माण केला आहे. कौन्सिलें मोडण्याकरितां जी तयारी करावी लागते तितक्या तयारीनें प्रत्यक्ष करणीचा मार्ग लोकांना चांगल्या रीतीनें चोखाळावयास येणें अधिक खात्रीचें व अधिक यश देणारें असल्यामुळें, कौन्सिलें मोडण्याच्या पहिल्या उपद्व्यापांत व्यर्थ वेळ दवडूं नये, असें म्हणणारा काँग्रेसचा पक्ष आहे. राष्ट्राच्या उभारणीला व संवर्धनाला प्रत्यक्ष करणीशिवाय दुसरा मार्गच नाहीं; खादी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, अंत्यजोद्धार, व राजकीय दृष्टया सर्व धर्माच्या व समजुतीच्या लोकांचें संमेलन, हा एवढाच काय तो प्रत्यक्ष करणीचा मार्ग आहे. हा प्रत्यक्ष करणीचा मार्ग चोखाळीत असतांना प्रतिस्पर्ध्याला दोन रट्टे देण्यासहि हरकत नाहीं, अशी व्हायलन्सची उर्फ मारामारीची जोड या प्रत्यक्ष करणीच्या मार्गाला देऊन आयर्लंडनें स्वराज्य संपादिलें आहे. हिंदुस्थानच्या सांप्रतच्या राजकीय स्थितींत ही मारामारीची जोड या करणीला प्रत्यक्ष देणें शक्य नसल्यामुळें हें कुपथ्य राष्ट्रीय सभेनें समजून उमजून टाळलेलें आहे. शिष्टाईचा मार्ग निरुपयोगी ठरून प्रत्यक्ष करणीच्या मार्गाला आयर्लंड लागण्यापूर्वी पार्नेलनें पार्लमेंट-मधील अडथळ्याचा मार्ग स्वीकारला होता; तसा हिंदुस्थाननेंहि अडथळ्यांचा मार्ग कांहीं काळ स्वीकारावा, व मग या अडथळ्यांच्या मार्गामुळेंच लोकांत जागृति उत्पन्न होऊन लोक प्रत्यक्ष करणीच्या मार्गास लागतील असें समजून, प्रत्यक्ष करणीच्या मार्गांतील पूर्वतयारी म्हणून कौन्सिलवाल्या पक्षानें आपला कार्यक्रम आखला आहे. पार्नेलचे अडथळे संपल्यानंतर प्रत्यक्ष करणीच्या मार्गाला आयर्लंड लागलें हें खरें आहे. पण हा नुकता काळाचा क्रम आहे; कार्य-कारण-भाव संबंध यांत नाहीं. तेव्हां हिंदुस्थाननेंहि तितकाच मधला वेळ व्यर्थ दवडला पाहिजे असे म्हणण्यांत अर्थ नाहीं. हा मधला वेळ व्यर्थ दवडावयाचा नाहीं, तर काय करावयाचें ? प्रत्यक्ष करणीच्या

मार्गाचा संग्रह लोकांनीं जितक्या तत्परतेनें करावयास पाहिजे होता तितक्या तत्परतेनें गेल्या तीन वर्षांत काम न झाल्यामुळें; लोकांत तितकी तत्परता उत्पन्न होईतों कौन्सिलांत अडथळ्यांचा उपयोग करून कां पाहूं नये असें कौन्सिलवाल्या पक्षाचें म्हणणें आहे. या म्हणण्यावर उत्तर असें आहे कीं, प्रत्यक्ष करणीचा मार्ग यशस्वी होऊन स्वराज्य मिळण्यास लोकांची जितकी तत्परता दिसावयास पाहिजे होती तितकी तत्परता दिसत नाहीं हें जरी खरें असलें, तरी प्रत्यक्ष करणीचा प्रभाव लोकांच्या मनावर पडत नाहीं असें म्हणणें मात्र खोटें आहे. खादी चळवळीनें कांहीं काम कमी केलेलें नाहीं. पंजाबांत व संयुक्तप्रांतांत आज जरी नोकरशाहीला हिंदु-मुसलमानांत तंटे लावतां येत असले, तरी मुसलमानांची दृष्टि हिंदी स्वराज्याकडे महात्माजींनीं कायम वळवून टाकली आहे, यांत शंका नाहीं. अस्पृश्यतेचें निवारण गेल्या तीन वर्षांत जितकें झालें आहे, तितकें पूर्वीच्या ३० वर्षांतहि झालेलें नाहीं, हें सर्वांना कबूल केलेंच पाहिजे. बहिष्काराची चळवळ आज नेमस्तांच्याहि डोक्यांत शिरली आहे. अकालींची चळवळ व नागपूरच्या राष्ट्रीय निशाणाची चळवळ, या चळवळी तर आत्मयज्ञाची प्रेरणा दिली असतां प्रत्यक्ष करणीचा मार्ग लोकांस रूढ होण्यास कशी चांगली मदत मिळते, याचीं मूर्तिमंत उदाहरणें आहेत. करणीच्या मार्गाला लोकांना जर लावावयाचें असेल तर आत्मयज्ञाचीच प्रत्यक्ष कृति लोकांपुढें ठेवून आपल्या स्वतःच्या संगतीच्या जोरावर लोकांना आपल्याप्रमाणें वागावयास लाविलें पाहिजे. उपदेशापेक्षां कृतीला अधिक महत्त्व आहे! हजारो लोकांनीं केलेला उपदेश वाया जातो, पण मूठभर निश्चयी लोकांची कृति एकदम फलद्रूप होऊं शकते. कृतीचा परिणाम लोकांच्या मनावर फार होतो, व कोरडा उपदेश ऐकून जी अनास्था टाकून देण्यास लोक तयार होत नाहींत ती अनास्था कृतीमुळें आपोआप नष्ट होते. महात्मा गांधी यांचा कार्यक्रम फलद्रूप होत नाहीं,

याचें कारण आत्मयज्ञाची जोड जितकी मिळावयास पाहिजे तितकी ती मिळत नाहीं हें होय! आत्मयज्ञानेंच प्रत्यक्ष करणीचा मार्ग यशस्वी होणार आहे असें दिल्लीच्या जादा काँग्रेसनेंहि ठरविलें असल्यामुळें, कौन्सिलांतील अडवणुकीच्या पायीं व्यर्थ वेळ दवडण्याची जरूरी काँग्रेसच्या अनुयायांना बिलकूल नाहीं. अर्थात् करणीच्या मार्गावर ज्यांची श्रद्धा आहे, त्यांनीं सांप्रतच्या निवडणुकीच्या वेळीं मतें देण्यास जाणें बिलकूल उचित नाहीं. असल्या लोकांपाशीं मतें मागणेंहि बरोबर नाहीं व त्यांनीं मतें देणेंहि बरोबर नाहीं. मतदारांमध्यें जे बगलबच्चे असतील ते बगलबच्च्यांना मतें देतील, हें सरळ आहे. मतदारांमध्यें जे नेमस्तांच्या शिष्टाईच्या मार्गाचे असतील, त्यांनीं शिष्टाईच्या मार्गाला बहिष्काराची जोड ना. शास्त्री यांनीं यावेळीं दिली असल्यामुळें नेमस्तांत जे बहिष्कारवादी असतील त्यांनाच मतें द्यावीं हें संयुक्तिक होय. नेमस्त बहिष्कारवादी झाला असतां काँग्रेसच्या पक्षाकडे अधिक झुकतो, आणि सर्व राष्ट्राच्या एकीच्या दृष्टीनें नेमस्त पक्षाच्या मतदारांनींहि नेमस्तांतील बहिष्कारवाद्यांना उचलून धरणें अधिक श्रेयस्कर आहे. दिवाण ना. परांजपे किंवा सर चिमणलाल सेटलवाड यांच्यासारख्या नेमस्तांना तुम्ही बहिष्कारवादी आहात किंवा कसें, हें हडसून खडसून विचारून मग नेमस्तांनीं मतें द्यावींत. ही सावधगिरी न घेतल्यास नेमस्तांपैकीं कांहीं पुढारी ना. शास्त्री यांच्यासारख्यांना तोंडघशीं पाडतील, हें नेमस्त पक्षानें निवडणुकीच्या वेळीं ध्यानांत ठेवलें पाहिजे. राष्ट्रीय सभेच्या अनुयायांपैकीं ज्यांचीं मनें शिष्टाईच्या मार्गाविषयीं अगदीं विटलेलीं आहेत व प्रत्यक्ष करणीचा मार्ग ज्यांना पसंत आहे, त्यांनीं स्वतः मतें देण्यास जाऊं नये, इतकेंच नव्हे, तर कोणी विचारल्यास मतें देणें पाप होय, अशीच सल्ला मतदारांना दिली पाहिजे. प्रत्यक्ष करणीच्या अनुयायांपैकीं कांहींचा पदर शिष्टाईच्या मार्गाशीं लागतो; कांहींना अडथळे पसंत पडतात, तेव्हां

तेवढ्यांस मतें देण्यास हरकत कोणती? असें म्हणणारे जे राष्ट्रीय सभापैकीं मतदार असतील, त्यांना मतें देण्याची मुभा दिल्लीच्या जादा काँग्रेसनें दिली आहे. कौन्सिलच्या वादाची ही कटकट नको, अशा अनास्थेनें मतें देणारांचाहि शिष्टाईच्या पदरवाल्यांत व अडथळ्याच्या भक्तांत बराच मोठा जमाव आहे. या असल्या मतदारांनीं कोणास मतें द्यावीं असा या ठिकाणीं साहजिकच प्रश्न उत्पन्न होतो. कौन्सिलें किंवा असेंब्ली मोडण्याच्या इराद्याकडे जर पाहिलें तर उभे राहिलेल्या उमेदवारांत तसल्या इराद्याचे फारच थोडें लोक आहेत, असें दिसून येतें. कौन्सिलवाल्या पक्षाची म्हणून जी यादी प्रसिद्ध झाली आहे, तींत शिष्टाईशीं पदर लागलेले लोक फार! मद्रास पुणें, नागपूर, पंजाब वगैरे बहुतेक ठिकाणीं बहिष्कारवादी व शिष्टाईशी पदर लागलेले असेच उमेदवार उभे राहिले आहेत. दे. बं. दास यांना उचलून धरणारे हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच आहेत. दे. पटेल यांची गणना कौन्सिलें मोडणारांत केली पाहिजे, तर दे. केळकर यांची गणना शिष्टाईचा पदर लागलेल्यांत केली पाहिजे. शिष्टाईचा पदर असलेली ही मंडळी व नेमस्तांतील बहिष्कारवादी मंडळी ह्यांच्यामध्यें विशेष अंतर नाहीं. शिवाय आम्ही कोणत्याच पक्षाचे नाहीं असें म्हणणारे बिनपंखाचे पंडित मदन मोहन मालवीय, बॅ. बॅप्टिस्टा, बॅ. जिना, बॅ. जयकर वगैरे पक्षी कौन्सिलांत व असेंब्लींत शिरूं पहात आहेत. या बिन पंखाच्या मंडळींचा पदर शिष्टाईशीं येतो, बहिष्काराशीं येतो, कौन्सिल मोडण्याशीं येतो, प्रत्यक्ष करणीशीं येतो, व प्रसंग विशेषीं बॅ. बॅप्टिस्टांसारखी निस्पृह मंडळी व्हाओलन्समधील उर्फ मारामारीमधील सद्गुणांचाहि योग्य प्रसंगीं नीरक्षीरन्यायानें सन्मान करण्यास धजणारी आहे; हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. काँग्रेसच्या अनुयायांपैकीं मतें देणें जेवढ्यांना इष्ट वाटत असेल त्यांनीं कौन्सिलें मोडणारांचा प्रथम सन्मान

करावा हें अगदीं बरोबर आहे. हें काम झाल्यानंतर एक पदराचा काय, दोन पदरांचा काय, किंवा पांच पदरांचा काय, सर्व पदरांच्या उमेदवारांना आपापल्या आवडीप्रमाणें मदत करण्यास कोणतीच हरकत नाहीं. दे. केळकर उद्यां दिवाण झाले तर प्रत्यक्ष करणीच्या मार्गाला ते मुकतील हें खरें; पण नुसत्या दिवाणगिरीच्या कामाचाच जर विचार केला, तर डॉ. परांजपे यांच्या जागीं बॅ. जयकर आले काय, बॅ. बॅप्टिस्टा आले काय, किंवा बॅ. जिना आले काय, राष्ट्राला वाईट वाटण्याजोगे काय आहे? प्रत्यक्ष करणीच्या मार्गाला हे लोक लागले असतां देशाचें अधिक कल्याण होईल यांत बिलकूल संशय नाहीं. पण हे ऐकत नाहींत. पूर्वग्रहामुळें किंवा संवयीमुळें प्रत्यक्ष करणीच्या मार्गांत निश्चयानें व उत्सुकतेनें पडण्याचें धाडस बॅ. बॅप्टिस्टा, किंवा बॅ. जयकर यांच्यांत आज उत्पन्न होऊं शकत नाहीं, हे आमचें दुर्दैव होय ! तथापि बॅ. जयकर किंवा बॅ. बॅप्टिस्टा यांनीं या हिय्येच्या अभावीं दिवाणांच्या जागेवर बसूं नये, असें मुळींच आम्ही म्हणत नाहीं. तेव्हां निवडणुकीच्या वेळीं काँग्रेसच्या अनुयायांपैकीं ज्यांना मतें देणें इष्ट वाटत असेल त्यांनीं एक शेमल्याचा सरदार आहे का दहा शेमल्यांचा सरदार आहे, या भानगडींत न पडतां ज्याच्या त्याच्या लायकीप्रमाणें व आपापल्या आवडीप्रमाणें मतें देण्यास हरकत नाहीं. हीं मतें देतांना जे प्रत्यक्ष करणीच्या पक्षाचे आहेत, त्यांना मात्र विनाकारण आग्रह करून खोट्या मार्गाला फूस लावून नेण्यांत येऊं नये, व काँग्रेसच्या नांवाचा खोटा उपयोग करण्यांत येऊं नये, अशी आमची विनंति आहे.

---

* कोकोनाडाची काँग्रेस

कोकोनाडा काँग्रेसच्या कामास गेले शुक्रवारीं (ता. २८ डिसेंबर १९२३) सुरवात होऊन मंगळवारीं काँग्रेसचें काम यशस्वी रीतीनें पार पडलें. आंध्र व तामीळ नाड ह्या दोन प्रदेशांतील लोकांमध्यें ह्या काँग्रेससंबंधानें विशेष उत्साह दिसून येत होता; व बेझवाडयापासून कोकोनाडापर्यंत चार पांच स्पेशल गाडयाहि सोडणें भाग पडण्याइतका समुदाय कोकोनाडाच्या गांधीनगरामध्यें जमला होता. काँग्रेसच्या तंबूंत १५ हजार लोकांना बसण्याइतकी सोय होती; पण प्रेक्षक व प्रतिनिधी मिळून १५ हजारांहून अधिक लोक मंडपांत हजर होते, शिवाय मंडपाबाहेर यात्रेप्रमाणें जुळलेल्या आसपासच्या लोकांची एवढी गर्दी होती कीं, कोकोनाडाच्या गांधी–नगरांत एक दोन दिवस एक लाख लोक एकसारखे फिरत होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. लोकांच्या उत्साहाच्या दृष्टीनें विचार केला असतां नागपूर, अहमदाबाद व गया ह्या काँग्रेसच्या तोडीचीच कोकोनाडा काँग्रेस झाली असें म्हणावें लागतें. एवढा मोठा समुदाय लोटला असतांहि आंध्र प्रदेशाच्या कार्यक्षम पुढाऱ्यांनीं व उत्साही स्वयंसेवकांनीं सर्व व्यवस्था उत्तम प्रकारें ठेवली व कोठेंहि न्यून पडूं दिलें नाहीं, ही संतोषाची गोष्ट होय. शंभर एकर जमिनीवर खादीच्या कापडाचें व ताडपत्र्यांचें गांधी–नगर व्यवस्थित रीतीने वसविण्यांत आलें होतें; जमलेला प्रचंड समुदायहि खादीशिवाय दुसरें कांहीं वापरीत नव्हता. खादीसंबंधानें आंध्र देशाचें महत्त्व कोकोनाडा काँग्रेसच्या वेळीं उघडण्यांत आलेल्या खादीच्या प्रदर्शनावरून सर्वांच्या मनास पटलें, इतकेंच नव्हे तर काँग्रेसच्या भव्य तंबूंत असलेल्या व गांधीनगरांत

---

* नवाकाळ, ता. २ जानेवारी १९२४

फिरणाऱ्या लोकसमुदायानेंहि खादीचा प्रसार आंध्र देशांत इतर प्रांतांहून अधिक झाला आहे हीच गोष्ट सर्वांच्या मनावर विशेशेंकरून बिंबविली. मौलाना महमद अल्ली व मौलाना शौकत अल्ली ह्यांचें स्वागत सर्व लोकांनीं अत्यंत मनःपूर्वक केलें. मुसलमानांचें लक्ष स्वराज्याकडे विशेष लागून राहील अशा प्रकारची जी खटपट अल्ली बंधूंनीं तुरुंगांतून सुटल्यानंतर एकसारखी चालविली आहे, त्या खटपटीला चांगलें यश कोकोनाडा येथें आलें, यांत संशय नाहीं. हिंदु–मुसलमानांची एकी आणि कौन्सिलच्या मृगजळापासून अलग राहून कायदेभंगाच्या दृष्टीनें बहिष्कार कार्याला जोर देण्याकरितां अंमलांत आणावयाचा विधायक कार्यक्रम ह्याच गोष्टी कोकोनाड्याच्या काँग्रेसमध्यें प्रधान्येंकरून पुढें आल्या होत्या; आणि हा गोष्टींसंबंधानें काँग्रेसचे ठराव सर्व राष्ट्राला मार्गदर्शक असेच झाले याबद्दल वाद नाहीं. मौ. महमद अल्ली ह्यांनीं आपल्या भाषणांत हिंदु–मुसलमानांच्या एकीचा इतिहास सविस्तर देऊन एकोप्यानें विधायक कार्यक्रम अंमलांत आणण्याची जरूरी सर्व राष्ट्राला चांगल्या रीतीनें पटवली, आणि अध्यक्षांचे भाषणाला अनुसरूनच राष्ट्रीय सभेचे ठराव करण्यांत आले. हिंदु–मुसलमानांच्या एकीसंबंधानें मुळींच वादविवाद नव्हता. ह्या एकीला अनुसरून बंगालमध्यें जो नवा करार दे. बं. दास ह्यांनीं तयार केला त्या करारासंबंधानें फार मतभेद दिसून आला. हा करार बंगाल्यांत घाईघाईनें तयार करण्यांत आला, आणि सदर करार घाईघाईनें लोकांवर लादण्याचा प्रयत्न कोकोनाडा येथें झाला. लाला लजपतराय, पंडित मदनमोहन मालवीय वगैरे पुढारी ह्या घाईच्या विरुद्ध असल्यामुळें बंगालच्या करारास महत्त्व देऊं नये, असेंच कोकोनाडा येथें जमलेल्या प्रतिनिधींचें मत पडलें. काँग्रेसनें हिंदुमुसलमानांमधील करारा-संबंधानें कोणताच मुक्रर असा ठराव पास केला नाहीं. राष्ट्रामध्यें सांप्रत ह्या करारासंबंधानें जी चर्चा चालली आहे त्या चर्चेंतील गुणदोषांचा नीट

विचार करून आणखी दोन महिन्यांत डॉ. अनसारी ह्यांच्या कमिटीनें ऑल इंडिया काँग्रेस कमिटीकडे दुसरा रिपोर्ट पाठवावा असें काँग्रेसनें ठरवलें, ही गोष्ट योग्यच झाली. दुसरा रिपोर्ट मागतांना बंगालच्या कराराचाहि उल्लेख ठरावांत करावा किंवा कसें ह्यासंबंधानें मात्र तंटा उपस्थित झाला. डॉ. अनसारी यांच्या कराराइतकें महत्त्व बंगालच्या करारास देण्याची जरूरी नाहीं, बंगालचा करार काँग्रेसपुढें अशा रीतीनें न येतां डॉ. अनसारी यांच्या कमिटीमार्फतच यावा; अशा तऱ्हेचें प्रतिनिधींचें बहुमत कोकोनाडा येथें होतें. काँग्रेसच्या ठरावांत बंगालच्या कराराचा जर उल्लेख झाला नाहीं तर त्या योगानें बंगालचा अपमान होईल, अशा तऱ्हेचे उद्‌गार दे. बं. दास यांनी स्वतः काढल्यामुळें सब्जेक्टस् कमिटीमध्यें बंगालच्या कराराचा उल्लेख ठरावांत बहुमतानें करण्यांत आला. दे. बं. दास किंवा बंगाल ह्यांचा अपमान करण्याची बुद्धि कोणामध्येंहि नसल्याळें श्रीयुत राजगोपाळ-चारियर ह्यांनींहि काँग्रेसच्या मंडपांत ह्या उल्लेखास विरोध केला नाहीं. पण या उल्लेखाविरुद्ध बंगालचे नागबाबू व शामसुंदर चक्रवर्ती ह्यांनीं आपलीं मतें बंगालतर्फे उघडपणें दिल्यामुळें आणि बंगाल्याहून आलेल्या प्रतिनिधींचें मताधिक्यहि दे. बं. दास ह्यांच्या विरुद्ध दिसून आल्यामुळें व्यक्तिशः कोणाचा अपमान करण्याचा संबंध ह्या बाबींत येऊं शकत नाहीं असें आपोआप स्पष्ट झालें. बंगालला अशा रीतीनें बाहेर धुडकावून लावून बंगालचा अपमान करूं नका म्हणून दे. बं. दास यांनीं सब्जेक्टस कमिटी-प्रमाणेंच काँग्रेसच्या मंडपांतहि पुन्हां जोरानें आपलें म्हणणें सर्व प्रतिनिधींपुढें मांडलें. व्यक्तिमाहात्म्याला एका बाजूस ठेवून आपलें मत स्पष्टपणें देण्याचा कल कोकोनाडामध्यें यंदा विशेष दिसून येत होता; आणि या कलाला अनुसरून बंगालचा उल्लेख करूं नये असें म्हणण्याला मतें मोजतांना प्रचंड बहुमत अनुकूल आहे असें दिसून आलें. मतेंघेण्याचा हा प्रसंग कोकोनाडाच्या

काँग्रेसमध्यें महत्त्वाचा झाला. चाव क्षुल्लक होती ही गोष्ट खरी आहे; पण गयेच्या काँग्रेसच्या वेळीं कौन्सिलवाल्या पक्षाच्या विरुद्ध जितक्या जोरानें मताधिक्य दिसून आलें जितक्या जोरानेंच मताधिक्य कोकोनाडा काँग्रेसमध्यें सदर प्रसंगीं दिसून आल्यामुळें, वारा कोणत्या बाजूनें वहात आहे हें अजमावण्याच्या दृष्टीनें मतें मोजण्याचा सदर प्रसंग महत्त्वाचा ठरला. दे. बं. दास ह्यांच्या पक्षाच्या बाजूला जर एक मत तर सदर पक्षाच्या विरुद्ध दोन मतें असें जें प्रमाण गयेच्या बैठकीच्या वेळीं दिसून आलें, तेंच प्रमाण कोकोनाडा येथेंहि कायम ठरलें. दिल्लीच्या काँग्रेसनें कौन्सिलवाल्या पक्षास दिलेली सवलत तात्पुरती होती, ह्या विषयींचाहि निर्णय कोकोनाडा येथें दे. भ. राजगोपाळचारियर यांच्या ठरावानें झाला. दिल्लीच्या काँग्रेसमध्यें कौन्सिलवाल्या पक्षास ज्या ठरावानें तात्पुरती सवलत मिळाली, त्या ठरावासहि असहकारितेचा ठराव अशीच संज्ञा दिल्लीस देण्यांत आली होती; पण ही सवलत तात्पुरती आहे का कायमची आहे, आणि कौन्सिलवरील बहिष्कारासंबंधानें काँग्रेसचें मत व धोरण बदललें आहे किंवा काय, अशी शंका उपस्थित झाल्यामुळें श्री. राजगोपाळाचारियर ह्यांनीं गयेप्रमाणें दिल्लीचाहि काँग्रेसचा असहकारितेचा ठराव कायम ठेवून सदर शंकांना वाव राहूं नये म्हणून, बहिष्कारत्रयीसंबंधानें काँग्रेसचें मत व धोरण बिलकूल बदललें नसून कायदेभंगाच्या दृष्टीनें बहिष्कारत्रयीस जोर यावा म्हणून विधायक कार्यक्रम सर्व राष्ट्रानें अमलांत आणावा, अशा आशयाचा ठराव सब्जेक्टस् कमिटीपुढें मांडला. बंगालच्या कराराचा नामनिर्देशहि ठरावांत नको असें ज्याप्रमाणें काँग्रेसनें ठरवलें, त्याप्रमाणेंच दिल्लीच्या ठरावाचाहि उल्लेख श्रीयुत राजगोपाळाचारियर ह्यांच्या ठरावांत नको असें म्हणणारा एक पक्ष कोकोनाडाच्या काँग्रेसमध्यें होता, आणि पंडित सुंदरलाल ह्या पक्षाचे पुढारी होते. बंगालच्या करारासंबंधीच्या ठरावानें वारा कोणत्या

बाजूला वहात आहे हें स्पष्ट झाल्यामुळें, कोकोनाडाच्या काँग्रेसच्या ठरावांत दिल्लीच्या तडजोडीचाहि उल्लेख नको असा आग्रह धरण्यांत अर्थ नव्हता ही गोष्ट बाबु शामसुंदर चक्रवर्ती वगैरेंच्या मनाला पटली होती, हेंहि खरें; व अध्यक्षांनीं सर्वांची समजूत घालण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न केला होता, हेहि खरें; तथापि बाबू शामसुंदर यांनीं दिल्लीच्या नांवाचाहि नामनिर्देश नको अशा आशयाचा आग्रह धरल्यामुळें काँग्रेसमध्यें दे. राजगोपाळाचारियर यांच्या ठरावावर मतें घेण्याचा प्रसंग आला. दे. राजगोपाळाचारियर यांच्या ठरावाला मतें ७०३ अनुकूल पडली व बाबू शामसुंदर यांच्या बाजूची ४१३ मतें पडलीं आणि दे. राजगोपाळाचारियर यांचा ठराव पास झाला. कायदेभंग, बहिष्कारत्रयी, व विधायक कार्यक्रम यांची साखळी काँग्रेसनें योग्य तऱ्हेनें जुळविली असून, कौन्सिलवाल्या पक्षाचीं मनें न दुखवितां असहकारितेचीं तत्वें कोकोनाडा मुक्कामीं कायम करण्यांत आलीं आहेत, ही संतोषाची गोष्ट होय. असा योग जुळवून आणण्याचे श्रेय मौ. महंमद अल्ली ह्यांना जितकें दिलें पाहिजे तितकेंच दे. बं. दास व दे. राजगोपाळाचारियर ह्यांनाहि दिलें पाहिजे. कायदेभंग, बहिष्कारत्रयी व विधायक कार्यक्रम ह्या संबंधाची चळवळ पुढील वर्षांत एकसारखी सुरू राहील अशा प्रकारची सर्व व्यवस्था मौ. महंमद अल्ली ह्यांनीं कोकोनाडा येथें करून घेतली आहे; त्यांना पाहिजे ते सेक्रेटरी व त्यांना पाहिजे ती वर्किंग कमिटीहि कोकोनाडा येथें नेमण्यांत आलेली असल्यामुळें, काँग्रेसच्या कामकाजांत नवा जोम मौ. महंमद अल्ली लवकरच उत्पन्न करतील, असा भरंवसा सर्वांस वाटत आहे.

---

* महात्मा गांधी यांचा संदेश

तुरुंगांतून सुटल्या बरोबर म. गांधी ह्यांनीं राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष मौ. महंमद अली ह्यांना पत्र लिहून हिंदी राष्ट्राला जो संदेश कळविला आहे, त्या संदेशांत महात्माजींच्या असहकारितेच्या चळवळींतील मुख्य तत्त्वें प्राधान्येंकरून नोंदण्यांत आलीं असून महात्माजींची पूर्वीची श्रद्धा जशीच्या तशी कायम आहे, असें स्पष्टपणें त्यांतम्हटलें आहे. लो. टिळक ह्यांना सहा वर्षांच्या कारागृहवासाच्या यातना सोसाव्या लागल्या तरी जसा त्यांच्या मतांत फेरबदल झाला नाहीं, उलट स्वतःच्याच कार्यक्रमावर त्यांची श्रद्धा जशी अधिक दृढावली; तशीच महात्माजींची स्थिति आहे. शांततेची असहकारिता, विधायक कार्यक्रम व कायदेभंग, ह्या संबंधानें दोन वर्षें एकांतांत मनन करून आपली विचारसरणी बिनचूक आहे असेंच महात्माजींना अखेरीस आढळून आलें आहे. शांततेच्या कायदेभंगाचा इलाज हा लढाईहून अधिक चांगला मार्ग आहे असें महात्माजींचें ठाम मत बनलें आहे. अमेरिकेंतील लेखक ह्या शांततेच्या कायदेभंगास व असहकारितेच्या चळवळीस 'नॉन व्हाओलंट कोअर्शन' उर्फ शांततेचें दडपण असें नांव देत असतात. प्राचीन इतिहासांत व अर्वाचीन इतिहासांतहि शांततेच्या दडपणाच्या ह्या मार्गाचें अवलंबन थोर विभूतींनीं राष्ट्राच्या व साम्राज्याच्या निरनिराळ्या संकटांच्या वेळीं केलेलें दृष्टीस पडतें. दक्षिण आफ्रिकेंतील लढ्यापासून म. गांधी सत्याग्रहाच्या उर्फ शांततेच्या दडपणाच्या मार्गाला लागले आहेत. दक्षिण आफ्रिका, चंपारण्य, रौलेट ॲक्टच्या वेळचा सत्याग्रह, आणि युवराजांच्या प्रवासाच्या वेळची चळवळ, या सर्व प्रसंगीं शांततेच्या

---

* नवाकाळ, ता. ९ फेब्रुवारी १९२४

बाजूला वहात आहे हें स्पष्ट झाल्यामुळें, कोकोनाडाच्या काँग्रेसच्या ठरावांत दिल्लीच्या तडजोडीचाहि उल्लेख नको असा आग्रह धरण्यांत अर्थ नव्हता ही गोष्ट बाबु शामसुंदर चक्रवर्ती वगैरेंच्या मनाला पटली होती, हेंहि खरें; व अध्यक्षांनीं सर्वांची समजूत घालण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न केला होता, हेहि खरें; तथापि बाबू शामसुंदर यांनीं दिल्लीच्या नांवाचाहि नामनिर्देश नको अशा आशयाचा आग्रह धरल्यामुळें काँग्रेसमध्यें दे. राजगोपाळाचारियर यांच्या ठरावावर मतें घेण्याचा प्रसंग आला. दे. राजगोपाळाचारियर यांच्या ठरावाला मतें ७०३ अनुकूल पडली व बाबू शामसुंदर यांच्या बाजूची ४१३ मतें पडलीं आणि दे. राजगोपाळाचारियर यांचा ठराव पास झाला. कायदेभंग, बहिष्कारत्रयी, व विधायक कार्यक्रम यांची साखळी काँग्रेसनें योग्य तऱ्हेनें जुळविली असून, कौन्सिलवाल्या पक्षाचीं मनें न दुखवितां असहकारितेचीं तत्वें कोकोनाडा मुक्कामीं कायम करण्यांत आलीं आहेत, ही संतोषाची गोष्ट होय. असा योग जुळवून आणण्याचे श्रेय मौ. महंमद अल्ली ह्यांना जितकें दिलें पाहिजे तितकेंच दे. बं. दास व दे. राजगोपाळाचारियर ह्यांनाहि दिलें पाहिजे. कायदेभंग, बहिष्कारत्रयी व विधायक कार्यक्रम ह्या संबंधाची चळवळ पुढील वर्षांत एकसारखी सुरू राहील अशा प्रकारची सर्व व्यवस्था मौ. महंमद अल्ली ह्यांनीं कोकोनाडा येथें करून घेतली आहे; त्यांना पाहिजे ते सेक्रेटरी व त्यांना पाहिजे ती वर्किंग कमिटीहि कोकोनाडा येथें नेमण्यांत आलेली असल्यामुळें, काँग्रेसच्या कामकाजांत नवा जोम मौ. महंमद अल्ली लवकरच उत्पन्न करतील, असा भरंवसा सर्वांस वाटत आहे.

* महात्मा गांधी यांचा संदेश

तुरुंगांतून सुटल्या बरोबर म. गांधी ह्यांनीं राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष मौ. महंमद अल्ली ह्यांना पत्र लिहून हिंदी राष्ट्राला जो संदेश कळविला आहे, त्या संदेशांत महात्माजींच्या असहकारितेच्या चळवळींतील मुख्य तत्त्वें प्राधान्येंकरून नोंदण्यांत आलीं असून महात्माजींची पूर्वीची श्रद्धा जशीच्या तशी कायम आहे, असें स्पष्टपणें त्यांतम्हटलें आहे. लो. टिळक ह्यांना सहा वर्षांच्या कारागृहवासाच्या यातना सोसाव्या लागल्या तरी जसा त्यांच्या मतांत फेरबदल झाला नाहीं, उलट स्वतःच्याच कार्यक्रमावर त्यांची श्रद्धा जशी अधिक दृढावली; तशीच महात्माजींची स्थिति आहे. शांततेची असहकारिता, विधायक कार्यक्रम व कायदेभंग, ह्या संबंधानें दोन वर्षें एकांतांत मनन करून आपली विचारसरणी बिनचूक आहे असेंच महात्माजींना अखेरीस आढळून आलें आहे. शांततेच्या कायदेभंगाचा इलाज हा लढाईहून अधिक चांगला मार्ग आहे असें महात्माजींचें ठाम मत बनलें आहे. अमेरिकेंतील लेखक ह्या शांततेच्या कायदेभंगास व असहकारितेच्या चळवळीस 'नॉन व्हाओलंट कोअर्शन' उर्फ शांततेचें दडपण असें नांव देत असतात. प्राचीन इतिहासांत व अर्वाचीन इतिहासांतहि शांततेच्या दडपणाच्या ह्या मार्गाचें अवलंबन थोर विभूतींनीं राष्ट्राच्या व साम्राज्याच्या निरनिराळ्या संकटांच्या वेळीं केलेलें दृष्टीस पडतें. दक्षिण आफ्रिकेंतील लढ्यापासून म. गांधी सत्याग्रहाच्या उर्फ शांततेच्या दडपणाच्या मार्गाला लागले आहेत. दक्षिण आफ्रिका, चंपारण्य, रौलेट ॲक्टच्या वेळचा सत्याग्रह, आणि युवराजांच्या प्रवासाच्या वेळची चळवळ, या सर्व प्रसंगीं शांततेच्या

---

* नवाकाळ, ता. ९ फेब्रुवारी १९२४

दडपणाचेंच अस्त्राचा त्यांनीं चांगला उपयोग करून घेतला, आणि प्रसंगामुळें ह्या मार्गांतील पथ्यापथ्याचा विचार आपोआपच त्यांच्यापुढें उभा राहिला. कायदेभंगाची चळवळ सुरू करावयाची असल्यास राष्ट्रीय सभेसारख्या सभेची प्रथम मान्यता घेऊन चळवळींत पडणाऱ्यांनीं कोणत्या शर्ती पाळल्या पाहिजेत, ह्या संबंधाचे नियम म. गांधी ह्यांनीं अहमदाबादच्या काँग्रेसच्या वेळीं तयार केले, आणि त्यानंतर ज्या अडचणी आल्या त्या अडचणी दूर करण्याकरितां विधायक कार्यक्रमाचें पथ्य महात्माजींनीं कायदेभंगाच्या चळवळीस लावून दिलें. पथ्यापथ्याचा विचार, आचरणाच्या नियमांची सांखळी, आणि स्थल व प्रसंग ह्या संबंधाचा निर्णय इत्यादि बाबींसंबंधानें शांततेच्या दडपणाच्या मार्गाचें शास्त्रच महात्माजींनीं बनविलें आहे. ह्या शास्त्राच्या मुख्य अंगाचा व उपांगांचा शांतपणें दोन वर्षें तुरुंगांत विचार करून हें नवें शास्त्र हिंदुस्थानास कल्याणप्रद झाल्यावांचून राहणार नाहीं, असा सिद्धांत. महात्माजी आपल्या संदेशांत हिंदी राष्ट्रापुढें ठेवीत आहेत. हिंदु–मुसलमानांच्या एकीशिवाय असहकारितेची चळवळ यशस्वी होणें शक्य नाहीं, असेंच महात्माजी दोन वर्षांनंतर आज पुन्हां सर्व राष्ट्रास बजावीत असून, हिंदु–मुसलमानांतील सांप्रतच्या वेकीच्या प्रकारामुळें महात्माजींचें मन साहजिकच खिन्न झालें आहे. महात्माजींच्या अंगांत शक्ति आल्यावर हिंद–मुसलमानांच्या वेकीचीं कारणें दूर करण्याच्या मार्गाला ते तावडतोब लागतील ह्यांत संशय नाहीं. हिंदुस्थानचें दारिद्र्य लक्षांत घेतां त्या दारिद्र्यांतून सुटण्याचा मार्ग म्हणजे खादीचीच चळवळ होय, हा महात्माजींचा सिद्धांत जसाच्या तसा कायम आहे. कायदेभंगाच्या मोठ्या चळवळीसाठीं राष्ट्र तयार करावयाचें असल्यास विधायक कार्यक्रमाची जशी जरूरी आहे, तशीच जरूरी सरकारी शाळा, कोर्टें व कौन्सिलें यांजवरील

बहिष्काराचीहि आहे. कौन्सिलांवरील बहिष्कारासंबंधानें दिल्ली व कोकोनाडा येथें जी तडजोड झाली, त्या तडजोडीसंबंधाची सविस्तर हकीकत निरनिराळ्या पुढाऱ्यांच्या तोंडून प्रत्यक्ष ऐकण्याच्या आधीं महात्माजी कांहीं मत देऊं इच्छित नाहींत. ह्या तडजोडीच्या विरुद्ध मत आतां देऊन तरी काय करावयाचें आहे ? पुढील कार्यास जुन्या वादाच्य निर्णयांत पडण्याची फार जरुरी नाहीं. हिंदी स्वराज्य संपादन करण्याचे कामीं शांततेच्या असहकारितेचाच मार्ग यशस्वी होणार असून, त्या मार्गानेंच पुढें पाऊल महात्माजी टाकणार आहेत. शांततेचें नुसतें ढोंग असून इतर अत्याचारांवर पांघरूण घालण्याकरितां व प्रतिस्पर्ध्याच्या डोळ्यांत धूळ फेकण्याकरितां शांततेचें सोंग महात्माजीनी आणलें आहे, असा आरोप अँग्लो-इंडियन पत्रें महात्माजींवर करीत असतात. शांततेचें ढोंग नसून कायदेभंगाच्या चळवळीच्या विचारसरणीचा पाया शांततेच्या तत्त्वांवर उभारलेला आहे असें महात्माजींचें म्हणणें आहे ! शांततेचें तत्व सुटलें म्हणजे कायदेभंगाची सर्व इमारत ढासळून पडते एवढी गोष्ट जर लोकांच्या व अधिकाऱ्यांच्या मनावर बिंबली तर आपलें कार्य बरेंच होईल, असें महात्माजींना वाटत आहे. महात्माजींनीं जो अपूर्व आत्मयज्ञ केला, आणि निरनिराळ्या बिकट प्रसंगीं आपली बुद्धि यत्किंचितहि ढळूं न देण्याची सावधगिरी घेतली, त्या आत्मयज्ञाकडे व सावधगिरीकडे पाहिलें असतां शांततेच्या तत्त्वाचें नुसतें पांघरूण महात्माजींनीं घेतलें आहे असें कोणीहि म्हणणार नाहीं. नॉन व्हायोलेलंट कोअर्शनचा उर्फ शांततेच्या दडपणाच्या मार्गाचा अभ्यास व अनुभव कित्येक वर्षें घेऊन दोन वर्षें एकांतांत त्या मार्गाची नीट तपासणी करून महात्माजी आपलें असहकारितेचें शास्त्र लोकांपुढें पुन्हां जोरानें मांडण्यास सुरवात करणार आहेत. असहकारितेच्या चळवळीचा पूर्वार्ध आज संपला असून महात्माजींच्या बंधमुक्ततेपासून उत्तरार्धास आरंभ होत आहे. एका भागावर

परमेश्वरानें पडदा पाडला आहे. गेल्या चार वर्षांच्या झटापटीचें जर निरीक्षण केलें तर प्रत्यक्ष यशासंबंधानें महात्माजी विजयी झाले असेंहि म्हणतां येत नाहीं. आणि महात्माजी पराभूत झाले असेंहि म्हणतां येत नाहीं. महात्माजींच्या सुटकेसंबंधाची वातमी ऐकून सांप्रतच्या परिस्थितीसंबंधाने न्यूयॉर्कच्या टाइम्सनें असे उद्‌गार काढले आहेत कीं, बोअर युद्धाच्या अखेरीस ज. स्मटस व ज. बोथा यांनीं ज्याप्रमाणें इंग्लंडशीं तह करण्यास संमति दिली त्याप्रमाणें महात्माजींनीं देखील आतां शांततेच्या असहकारितेच्या चालू लढाईंत इंग्लंडशीं तह करण्यास पुढें यावें. इंग्लंडांतील मजुरांच्या मंत्रिमंडळानें या बाबीसंबंधानें दोन पावलें पुढें येऊन तहाच्या गोष्टी बोलण्यास जर प्रारंभ केला तर चार पावलें पुढें जाऊन त्या गोष्टी ऐकण्यास महात्माजी कधीहि कमी करणार नाहींत. बोअर युद्धाच्या अखेरीस इंग्लंडांत लिबरल पक्ष अधिकारारूढ झाला व त्यावेळचे मुख्य मंत्री सर हेन्री बॅनरमन ह्यांनीं लढाईपेक्षां शांततेची तडजोड इंग्लंडला अधिक श्रेयस्कर अहे असें ठरवून ज. बोथा यांजबरोबर तहाचें बोलणें सुरू केलें. बोअर लोकांच्या दर्जास व राष्ट्रीय अभिमानास बिलकूल धक्का लावतां कामा नये, त्यांचा पराभव झाला असला तरी बरोबरीच्या नात्याची तलवार त्यांनीं गाजविली अहे, व आणखीहि तसा पराक्रम पुढें करून दाखविण्याचें सामर्थ्य बोअर लोकांचे अंगी आहे, अशी कबुली सर हेन्री बॅनरमन ह्यांच्या मंत्रिमंडळानें त्यावेळीं दिली, आणि मगच दक्षिण आफ्रिकेचा तह झाला. दक्षिण अफ्रिकेच्या लढाईंत ज. बोथा ह्यानीं जशा प्रकारचा पराक्रम गाजविला, तशाच प्रकारचा पराक्रम शांततेच्या असहकारितेच्या गेल्या चार वर्षांच्या युद्धांतहि महात्मा गांधीं ह्यांनीं गाजविला आहे, अशी कबुली अमेरिकेंतील प्रमुख पत्रेंहि आजच्या प्रसंगीं पर्यायानें देत आहेत, हें शुभ चिन्हच समजलें पाहिजे. बोअर लोकांशीं इंग्लंडनें जसा तह केला तशा प्रकाराचा तह हिंदुस्थानशीं

करण्यास मजुरांचें मंत्रिमंडळ जर ह्यावेळीं पुढें आलें, तर म. गांधी तशा प्रसंगीं ज. बोथा यांच्याप्रमाणेंच वागतील ह्यांत संशय नाहीं. म. गांधी ह्यांना ज. बोथा ह्यांच्याप्रमाणें वागण्यास योग्य सामर्थ्य यावें म्हणून हिंदु-मुसलमानांची एकी दृढ करून पुढील दोन तीन महिन्यांत सर्व राष्ट्र खादीमय करून टाकणें आज सर्व देशभक्तांचें कर्तव्य आहे; आणि म. गांधी ह्यांच्या प्रोत्साहनानें राष्ट्राची आत्मयज्ञाची शक्ति एक दोन महिन्यांत दुपटीतिपटीने वाढविण्यास सर्व लोक मनःपूर्वक झटतील, असा आम्हास भरंवसा वाटत आहे.

---

* असेंब्लीला धाब्यावर बसविलें

दिल्लीच्या असेंब्लीनें सोमवारीं (ता. १७ मार्च रोजीं) सर्व कर नामंजूर केले, पण मंगळवारीं लाटसाहेब लॉर्ड रीडिंग ह्यांनीं असेंब्लीला उलट धाब्यावर बसविलें ! असेंब्लीनें मारून टाकलेलें बिल जिवंत करण्याचा अधिकार सर्टिफिकेटाच्या मार्फत लाटसाहेबांना मिळालेला आहे. ह्या सर्टिफिकिटाचा उपयोग करण्यासंबंधाचे नियम गेल्या आठवड्यांत स्टेट सेक्रेटरीसाहेबांच्या संमतीनें दुरुस्त केले असून नव्या नियमांप्रमाणें सर्टिफिकिटाची सही करण्यापूर्वी आपणास पाहिजे त्याप्रमाणें बिलांत फेरफार करून मारून टाकलेलें बिल स्वतःच्या शिफारशीसह असेंब्लीकडे पुन्हां एकदां संमतीकरितां पाठवावें अशी नवी पद्धत लाटसाहेबांनीं अंमलांत आणली आहे. मारून टाकलेल्या बिलांत दुरुस्ती करून सदर बिल पास करा, अशी लाटसाहेबांनीं शिफारस असेंब्लीला मंगळवारीं केली. अशी शिफारस करणें म्हणजे पं. मोतीलाल नेहरू ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें असेंब्लीच्या मस्तकावर पिस्तुल रोखणेंच होय. तुम्ही संमति द्या नाहींतर सर्टिफिकिटानें हें बिल पुन्हां मी जीवंत करतों, अशा धर्तीचें पिस्तुल गेले मंगळवारीं असेंब्लीवर रोखण्यांत आलें, आणि असा धाक घातला असतांहि असेंब्लीनें लाटसाहेबांनीं दुरुस्त केलेलें बिल आपल्या पुढें येऊं न देण्याचेंच नाकारलें ! लाटसाहेबांची ही शिफारस म्हणजे असेंब्लीला धाब्यावर बसविणें होय. करांच्या बिलाला सर्टिफिकिट देऊन लाटसाहेब राष्ट्रीय पक्षाची पर्वा न करतां राज्यकारभार चालवूं पहात आहेत. तुम्हांला आमची पर्वा नाहीं तर आम्हांलाहि तुमची पर्वा नाहीं, उलट तुम्हांस आम्ही धाब्यावर

---

* नवाकाळ, ता. २० मार्च १९२४

बसवितों, असे लाटसाहेबांनीं सर्व कौन्सिलवाल्यांना बजावलें आहे. मध्यप्रांतांत नागपूर येथें जी स्थिति उत्पन्न झाली आहे, तीच स्थिति दिल्लीसहि उत्पन्न झाली आहे. नागपूरच्या कौन्सिलशिवाय व दिवाणाशिवाय राज्यकारभार चालविण्यास मध्यप्रांताचें सरकार तयार झालें आहे. डॉ. मुंजे वगैरे मंडळींना नागपुरास जसें धाब्यावर बसविण्यांत आलें आहे, त्याप्रमाणें दिल्लीलाहि पं. मदन मोहन मालवीय, पं मोतीलाल नेहरू, दे. पटेल वगैरे मंडळींना धाब्यावर बसविण्यात आलें आहे. पं मदन मोहन मालवीय ह्यांनीं सर्व कर नामंजूर करितांना स्वराज्यासंबंधाची मागणी अत्यंत अल्प-प्रमाणावर आणून ठेवली आहे, एवढाच काय तो नागपूर व दिल्ली ह्यांच्या मध्यें फरक आहे. माँटेग्यू-चेम्सफर्ड ॲक्टामध्यें पुन्हां फेरबदल आतां झाला पाहिजे व दुसऱ्या हप्त्याची चौकशी झाली पाहिजे, येवढेंच काय तें पं. मदन मोहन मालवीय यांचें मागणें आहे. संपूर्ण स्वराज्यहि त्यांनीं मागितलें नाहीं, किंवा वसाहतीचें राज्यहि त्यांनीं मागितलें नाहीं. कांही तरी फेरफार करा व एखादें तरी पाऊल पुढें सरका, एवढी अगदी अल्प मागणी पं. मदन मोहन मालवीय ह्यांनीं केली आहे. पंडितजींची ही मागणी ना. शास्त्री किंवा सर तेजबहादूर सप्रू, ह्यांच्या सारख्या नेमस्तांच्या मागणी-हून निराळी नाहीं. ह्या अल्पस्वल्प मागणीला मान देण्यांत यावा म्हणून करांचें बिल पं. मदन मोहन मालवीय ह्यांनीं नामंजूर केलें असून, लाट-साहेबांनीं पंडितजींना व त्यांच्या दोस्तांना दिल्लीच्या उन्हाळ्यांत धाब्यावर भर उन्हांत तडफडत ठेवलें आहे! ह्या ठिकाणीं ना. शास्त्री व तेज बहादूर सप्रू ह्यांनीं देखील पंडितजींच्या मदतीकरितां धावून जाऊन धाब्यावरील रखरखलेल्या उन्हाचा मारा स्वतःच्या अंगावर घेणें जरुरीचें नाहीं काय? पं. मदन मोहन मालवीय हे राउंड टेबलाचे भोक्ते आहेत; म. गांधी व लाटसाहेब ह्यांचें राउंड टेबल बनविण्याचा प्रयत्न पंडितजींनीं पूर्वी बराच

केला; पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. त्यांचा राउंड टेबलचा कैवार पूर्वीप्रमाणेंच जाज्वल्य असतांहि माँटेग्यू–चेम्सफर्ड ॲक्टाची रिव्हिजन करतों म्हणा म्हणजे आम्ही संतुष्ट आहोंत, अशी कबुली देण्यासहि ते तयार झाले अहेत. पांच पांडवांना पांच गांव द्या, असलीहि शिष्टाई करण्यास पं. मदन मोहन मालवीय आज तयार आहेत. पण ऐकतो कोण ? सुईच्या अग्रावरीलहि भूमि मिळूं द्यावयाची नाहीं असा जेथें हट्ट आहे, तेथें पंडितजींच्या शिष्टाईचा उपयोग काय ? शिष्टाईच्याच दृष्टीनें जर विचार केला तर ना. शास्त्री किंवा तेज बहादूर सप्रू ह्यांना देखील पंडित-जींच्या मागणीविरुद्ध ब्रह्मि काढतां येण्याजोगा नाहीं. नेमस्तांच्या मागणी पलिकडे न जातां तडजोड करण्यास पं. मदन मोहन मालवीय तयार असतांना त्यांना धाब्यावर बसविण्यांत आलें आहे. असेंब्लीला अशा रीतीनें धाब्यावर बसविण्यांत आल्यानंतर पुढें मार्ग कोणता, असा साहजिकच प्रश्न उत्पन्न होतो. सरकारचें आज कांहीं आडत नाहीं; लाट साहेबांनीं सर्टिफिकिट दिलेले कर निमूटपणें लोक भरतील; आणि सरकारी खातीं पूर्वीप्रमाणें जशींच्या तशीं चालतील. कांहीं वेळ धाब्यावर बसविल्यानें पं. मदन मोहन मालवीय ह्यांच्यासारख्यांचेंहि व्यक्तिशः कांहीं अडणारें नाहीं. कारण धाब्याच्या खालीं बसण्याची जशी त्यांना संवय आहे, तशीच धाब्यावर बसण्याचीहि त्यांना संवय आहे. उन्हांत, पावसांत, व थंडींत ते धाब्याच्या खालींहि बसूं शकतात, व धाब्याच्या बरहि बसूं शकतात. कर नामंजूर करण्यानें जसें सरकारचें कांहीं नडत नाहीं, त्याप्रमाणेंच धाब्यावर बसविल्यानें पुढाऱ्यांचेंहि व्यक्तिशः कांहीं नडत नाहीं. व्यक्तिशः जरी नडलें नसलें, तरी नुसतें धाब्यावर सहनशीलतेनें बसणें म्हणजे स्वराज्याच्या मार्गाला लागणें नव्हे, हा फरक ध्यानांत ठेवला पाहिजे. सांवलींतून उन्हांत हाकून देण्यांत आलें आहे.

ह्या उन्हांतच स्वतःचें घर स्वतः बांधण्यास तयार झाल्याशिवाय व तसें बांधून दाखविल्याशिवाय स्वराज्याचें दर्शन कधींहि व्हावयाचें नाहीं. मागणीसंबंधानें नेमस्तांना कुरकुर करण्याचें कारण जरी पं. मदन मोहन मालवीय ह्यांनीं ठेवलेलें नाहीं, तरी ना. शास्त्री किंवा सर तेज बहादर सप्रू ह्यांच्यासारखे नेमस्त उन्हांत राहण्यास, राबण्यास व स्वतःचें घर बांधण्याची खटपट करण्यास राजी होतील असा रंग दिसत नाहीं. ख्रिसांट्याईच्या झेंड्याखालीं विलायतची यात्रा करण्यास ही मंडळी तयार होतील, पण हिंदुस्थानच्या उन्हांतच स्वतःच्या स्वराज्याचें देवालय बांधण्याकरितां उन्हांत राबून स्वतःच्या मस्तकावर दगडमातीचें ओझें घेण्यास ही मंडळी तयार होणार नाहीं. दगडमाती स्वतःच्या हातानें हालवून नवीन देवालय बांधण्यास किंवा जुन्या देवालयाचा उद्धार करण्यास सर्व साधुसंतांनीं शिकलें पाहिजे व तसा अभ्यास केला पाहिजे, असा जो तुकाराम महाराजांचा उपदेश आहे तोच उपदेश ह्याहि प्रसंगीं स्वराज्याच्या अभिमान्यांनीं ध्यानांत ठेवला पाहिजे. सर्टिफिकिटाला मजुरांचें मंत्रिमंडळ हरकत घेऊं शकणार नाहीं येवढ्यापुरता मिठावरचा कर लाटसाहेबांनीं कमी केलेला आहे. मजुरांच्या मंत्रिमंडळाला चुचकारून त्याच्या नाकांतील आपली वेसण कायम ठेवण्याचा नोकरशाहीचा हा कावा आहे. अशा स्थितींत विलायतची यात्रा केल्यानें स्वराज्याचें पाऊल जोरानें पुढें पडेल म्हणून अपेक्षा करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. धाव्यावर बसविण्यांत आलें आहे, तेव्हां नोकरशाही कांहीं तडजोडीचें बोलणें सुरू करील म्हणूनहि अपेक्षा करण्यांत अर्थ उरलेला नाहीं. आमच्या नावेंत बसा आणि पलिकडच्या तीरावरील देवालयांतील स्वराज्याचें दर्शन घ्या, अशा तऱ्हेचें नव्या स्टेट सेक्रेटरीसाहेबांच्या तोंडून नोकरशाहीनें वदविलें आहे ! नोकरशाहीच्या नावेंत आराम आहे ; वल्ही वल्हविण्याचे कष्ट फारसे करावे लागणार नाहींत; पैलतीराला जाण्याचें अनुष्ठानहि कष्टाचें

नाहीं. अनुष्ठान जरी कष्टाचें नसलें तरी तें स्वतःचें स्वराज्य नव्हे, दुसऱ्याच्या तंत्रांनें वल्हीं वल्हवून आरामानें कोठें स्वराज्याची प्राप्ती होत असते ? आमच्या तंत्राने जर काम करणार नसलां तर आमच्या नावेंतच तुम्हास घेत नाहीं; असें असेंब्लीला लाट साहेबांनीं बजाविलें आहे. हिंदी स्वराज्याला खरोखर पाहूं गेलें असतां इंग्रजांच्या नावेची जरुरी काय आहे ? इंग्लंडांत जाऊन स्वराज्य आणावयाचें, दुसरा मार्गच नाहीं; असें म्हणणा-रांना इंग्रजी नाव पाहिजे हें बरोबर आहे. पण येथेंच बसून स्वराज्याची प्राप्ति कां होऊं नये ? नावेंत पाऊल कशाला ठेवावयास पाहिजे ? नावेंत पाऊल ठेवणारांनाहि लाटसाहेबांनीं बाहेर हांकलून दिलें आहे, पैलतीरावर स्वराज्याचें मंदिर कां असावें ? आम्ही ज्या तीरावर उभें आहों, ज्या घाव्यावर आम्हास बसविण्यांत आलें आहे, रखरखलेल्या उन्हांत जेथें आम्हांस सोडून देण्यांत आलें आहे, तेथें स्वराज्याचें सुंदर मंदिर कां बांधण्यांत येऊं नये ? म. गांधी असलें मंदिर बांधण्याची खटपट करीत आहेत. घाव्यावर स्वस्थ न बसतां महात्माजींचीच खटपट अधिक जोरानें पुढें चालविणें पं. मदन मोहन मालवीय वगैरे असेंब्लीच्या पुढाऱ्यांना आतां इष्ट नाहीं काय ?

———

* श्रीशिवाजी-महोत्सव

'इंग्रजी राज्य बुडालें' ह्या नांवाचें जें एक चोपडें विलायतेस प्रसिद्ध झालें आहे, त्या चोपडयांत पुण्याच्या ब्राम्हणांनीं पूर्वजांच्याबद्दल अभिमान उत्पन्न करून नोकरशाहीच्या विरुद्ध चळवळीस २५-३० वर्षांपूर्वी सुरवात केली असा उल्लेख केला असून इंग्रज राज्याच्या नाशाचा प्रारंभ तेथून धरला आहे. लो. टिळक ह्यांनीं उंर्जितास्थेस आणलेल्या श्रीशिवाजी-महोत्सव, श्री गणपती महोत्सव, व इतर राष्ट्रीय महोत्सव ह्यांना उद्देशून सदर पुस्तकांत वरील उल्लेख आहे. लो. टिळक ह्यांचें प्रत्यक्ष नांव सदर पुस्तकांत कोठेंच नमूद केलेलें नाहीं. श्रीशिवाजीमहाराजांच्या स्मारकाची चळवळ प्रथम लोकांपुढें आणणारे म्या. रानडे वगैरे पुण्याच्या ब्राम्हणांचा उल्लेख सदर पुस्तकांत कोठें नाहीं. पुण्यांतील सामान्य चळवळींचें दिग्दर्शन व्हावें एवढयापुरतेच 'पुण्यांतील ब्राम्हण' असे शब्द वापरलेले आहेत. श्रीशिवाजीमहाराजांचा सांप्रदाय उर्फ शिवाजी-कल्ट या नांवानें अँग्लो-इंडियन पत्रें वीस वर्षांपूर्वी महाराष्ट्राच्या पुढाऱ्यांना संबोधून महाराष्ट्रांतील चळवळीस शिव्याशाप देत असत. ही शिव्याशापाची पद्धत पुढें हलके हलके बदलून टिळकांचा सांप्रदाय उर्फ टिळक कल्ट ह्या नांवानें महाराष्ट्रांतील चळवळींना संबोधण्याचा प्रघात पाडण्यांत आला आहे. ह्या टिळकांच्या सांप्रदायानें नोकरशाहीच्या सत्तेचा पाया पोखरला, आणि म. गांधी ह्यांच्या सांप्रदायांतील पंडितजींनीं नोकरशाहीचा डोलारा कोसळून पाडला, अशी इंग्रजी राज्य बुडालें ह्या पुस्तकांतील विचारसरणी आहे. हिंदी राष्ट्राच्या विरुद्ध असलेले लेखक श्रीशिवाजी महोत्सव, श्रीगणपति महोत्सव, टिळक-

---

* नवाकाळ, ता. ६ मे १९२४

चरित्र, व गांधींची चळवळ ह्या सर्वांकडे कोणत्या दृष्टीनें पहातात हें वरील विचारसरणीवरून ध्यानीं येणारें आहे. श्रीशिवाजी-महोत्सव किंवा श्रीगणपति-महोत्सव ह्यांच्यासारख्या ऐतिहासिक व धार्मिक चळवळींचा संबंध म. गांधी ह्यांच्या असहकारितेच्या चळवळीशीं कसा जोडण्यांत येतो हें विचार करण्यासारखें आहे. शिवाजीसांप्रदायानेंहि इंग्रजांचें राज्य गेलें नाहीं आणि आज गांधींच्या सांप्रदायानें इंग्रजी राज्य गेलें नाहीं, मग ह्यांच्या विरुद्ध ओरड कशाला? इंग्रजी राज्य जावो किंवा राहो, त्या प्रश्नाशीं श्रीशिवाजीमहाराजांच्या उत्सवासंबंधानें विचार करतांना आम्हांस कांहीं कर्तव्य नाहीं. श्रीशिवाजी महाराजांच्या काळांत, त्यांच्या उत्सवाच्या काळांत आणि हल्लींच्या म. गांधी ह्यांच्या चळवळींचे काळांत तिघांचाहि उल्लेख एके जागीं व एक प्रसंगीं प्रतिस्पर्ध्यानीं करण्याइतका कोणता धागा आहे, येवढें मात्र नीट रीतीने पाहून घेणें जरूर आहे. स्वराज्याची स्थापना करण्याचें कार्य शहाजी महाराजांच्या वेळेपासूनच सुरू झालें होतें. डेक्कनमधील मुसलमानी राज्यांच्या आपापसांतील कलहांचा व बाहेरील उलाढालींचा सहजगत्या जेवढा फायदा शहाजी महाराजांच्या पदरीं पडावयास पाहिजे होता, तेवढा पडला नाहीं, पण श्रीशिवाजी महाराजांनीं जें केले तें करण्यास शहाजीचें मन कधींहि धजलें नाहीं. बुद्धिमत्ता व साधनाची अनुकूलता कमी होती अशांतला भाग नाहीं. न्यून होतें तें श्रद्धेसंबंधानें होतें. हें कार्य आपल्या हातून पार पडणार अशी श्रद्धाच नव्हती. मुसलमानांना चिकटून राहण्यांत आपलें कल्याण अधिक होईल, अशी खुद्द शहाजींची श्रद्धा होती व मुसलमानी धर्म स्वीकारणाऱ्या त्यांच्या कांहीं मेहुण्यांचीहि श्रद्धा तशीच होती. मुसलमानांशीं फटकून राहिल्यानें आपलें, आपल्या देशाचें व धर्माचें कल्याण अधिक होईल अशी जिजाबाईंची व तिच्या मुलाची श्रद्धा होती. शिवाजी महाराजांच्या

वडिलांची श्रद्धा निराळी, मामांची श्रद्धा निराळी, व खुद्द मातोश्रींची श्रद्धा निराळी, असा त्यावेळीं फरक होता. राष्ट्रामध्यें धर्मसेवेनें श्रद्धेची जोपासना साधुसंत ईश्वरी प्रेरणेनें करूं लागले होते, आणि धार्मिक श्रद्धा श्रीशहाजी महाराजांमध्येंहि होती. पण ह्या धार्मिक श्रद्धेच्या जोरावर कल्पनातीत हालअपेष्टा सोसण्यास राष्ट्रांतील कर्ते पुरुष व बहुजन समाज पुढें येईल अशी मनाची खात्री पटण्याइतकी शहाजी महाराजांची स्वतःची श्रद्धा जाज्वल्य नव्हती. राष्ट्रांत ही श्रद्धा पसरत चालली होती, आणि खुद्द श्रीशिवाजी महाराजांनीं स्वराज्यस्थापनेचा उद्योग शेवटास नेईपर्यंत महाराष्ट्राचा स्वतःचा विश्वास स्वतःच्या श्रद्धेवर बसलेला नव्हता. औरंगजेबाशीं पुढें जें स्वातंत्र्याचें युद्ध महाराष्ट्रास वीस वर्षें एकसारखें करावें लागलें, त्या युद्धाच्या वेळीं मात्र केवळ श्रद्धेच्या जोरावरच लढण्याचा प्रसंग आल्यामुळें साधुसंतांनीं उत्पन्न केलेल्या श्रद्धेचें पुण्य मूर्तिमंत राष्ट्रापुढें उभें राहिले. आत्मयज्ञ श्रद्धेशिवाय शक्यच नाहीं; आणि बहुजन समाजाच्या आत्मयज्ञाशिवाय केवळ व्यक्तीच्या आत्मयज्ञानें राष्ट्राचें संवर्धन व संगोपन होत नाहीं. ही श्रद्धेची शक्ति लोकांच्या प्रत्ययास आणून देण्यास श्रीशिवाजी महाराजांचें चरित्र व तदनंतरचें महाराष्ट्रांतील स्वातंत्र्याचें युद्ध ह्या दोन गोष्टी फार उपयोगी पडणाऱ्या आहेत. लोकांमध्यें श्रद्धा वाढविण्यास श्रीशिवाजी महोत्सवचा फार उपयोग होत असल्यामुळें महाराष्ट्रांतील कर्त्या पुरुषांनीं ह्या उत्सवाचीं सेवाचाकरी करण्यांत मोठी धन्यता मानली आहे. औरंगजेबाच्या कारकीर्दीच्या वेळीं मुसलमानांच्या धार्मिक श्रद्धेंतील धर्मवेडेपणाशीं झुंजावयाचें असल्यामुळें साधुसंतांनाहि तितक्याच जोमानें उलट दिशेला ताणून धरणें भाग पडलें, तो काळ धार्मिक श्रद्धेच्या झगडयाचा होता. इंग्रजी सत्तेचा असल्या श्रद्धेशीं कांहीं संबंध नाहीं. दुसऱ्याचें रक्त शोषण करून स्वतःचें राष्ट्र सुसंपन्न करें करावयाचें, अशा प्रकारच्या राष्ट्रीय

सेवेंतील वेडेपणामुळें जीं साहसाचीं, तत्परतेचीं व आत्मयज्ञाचीं कृत्यें इंग्रजांच्या हातून हिंदुस्थानांत पाय ठेवल्यानंतर घडलीं आहेत, त्या कर्मावर इंग्रजी राज्याची उभारणी झाली आहे. श्रद्धा आणि तदनुषंगिक एकतानता उर्फ वेडेपणा इंग्रजी सत्तेच्या बुडाशीं हिंदुस्थानांत आहे, पण ती श्रद्धा धर्मबुद्धीपासून उत्पन्न झालेली नसून राष्ट्रवैभवाच्या सेवेपासून उत्पन्न झालेली आहे. ह्या श्रद्धेशीं जर टक्कर द्यावयाची असेल, तर राष्ट्रांत श्रीशिवाजी महाराजांच्या वेळेप्रमाणें उलट दिशेनें जाणाऱ्या श्रद्धेला उत्पन्न करणें जरुरीचें आहे. राष्ट्रप्रेम व धर्म ह्यांना संलग्न करून राष्ट्राला सुसंपन्न करण्याच्या सेवेपासून उत्पन्न होणारी श्रद्धा स्वदेशीच्या चळवळीच्या वेळीं लो. टिळक ह्यांनीं महाराष्ट्रापुढें ठेविली. श्रीशिवाजी महोत्सव दरसाल साजरा केला, श्रीगणपति महोत्सवांत अत्यंत परिश्रम केले, आणि तीस वर्षांच्या तपश्चर्येनें नव्या धर्तीची श्रद्धा राष्ट्रांत उत्पन्न करून, त्या श्रद्धेला पूर्वजांच्या सर्व तत्त्वज्ञानाचें पूर्ण पाठबळ आहे हें सिद्ध करण्याकरितां लो. टिळक ह्यांनीं गीतारहस्य लिहिलें. रक्त-शोषण किंवा एक्सप्लॅयटेशनच्या तत्त्वांवर उभारलेल्या सत्तेला तोंड द्यावयाचें असल्यास इंग्रजांच्या श्रद्धेला आपली श्रद्धा तितक्याच जोरानें भिडविल्यावांचून सोय नाहीं. बंगालच्या फाळणीच्या वेळीं व त्यानंतरच्या स्वदेशीच्या चळवळीच्या वेळीं नव्या श्रद्धेचा पाया रचला गेला. पण बहुजन समाजाच्या अंगवळणीं पडून ही श्रद्धा फलद्रूप होण्यास अनन्य भक्ति किंवा एकतानता, उर्फ विरुद्ध पक्ष म्हणतो तसला वेडेपणा ह्या श्रद्धेमध्यें उत्पन्न करण्याचें म. गांधी यांच्या वाटयास आलेलें आहे. एकतानता असल्याशिवाय स्वदेशींतून निघणाऱ्या स्वराज्याची चळवळ कधींहि फलद्रूप म्हणावयाची नाहीं; आणि ही एकतानता खादीच्या चळवळीच्या रूपानें आजकाल प्रकट होत आहे. श्रद्धेचें हें तीव्र स्वरूप

आहे. ह्या स्वरूपास हसणारे हसोत, वेडे म्हणणारे नांवें ठेवोत, किंवा प्रतिपक्षी धिःकारोत; श्रीशिवाजी महाराजांच्या महाराष्ट्राकडे जर पाहिलें, तर असल्या श्रद्धेच्या एकतानतेनें महाराष्ट्र एकेकाळीं अलौकिक आत्मयज्ञ करण्यास समर्थ झाला होता असें दिसून येईल. धार्मिक लढ्याचे ते दिवस होते, आज तशी स्थिति बिलकूल नाहीं. हिंदु व मुसलमान ह्यांनीं एकोप्यानें वागूनच रक्त शोषणाऱ्या उर्फ एक्सप्लॉयटेशनच्या कचाट्यांतून सर्व हिंदी राष्ट्रास सोडवावयाचें आहे. ख्रिस्ती धर्माशीं किंवा दुसऱ्या कोणत्याहि धर्माशीं हा झगडा मुळींच नाहीं. तथापि ह्या झगड्यांत देखील श्रद्धेची एकतानता अत्यंत जरुरीची आहे. खादीच्या चळवळीच्या रूपानें हल्लीं राष्ट्राला जरूर असलेली श्रद्धा प्रकट होत असून श्रद्धेच्या जोरावर एकसारखें स्वराज्याच्या मार्गें लागा आणि ह्या श्रद्धेमुळें संयमेंद्रिय होऊन स्वसुखाचा त्याग करण्याची प्रवृत्ति वाढवा; म्हणजे आत्मयज्ञ कसा करावा हें आपोआप राष्ट्राच्या ध्यानीं येईल, आणि त्यानंतर श्रद्धावान, तत्पर व संयमेंद्रिय झालेलें राष्ट्र स्वराज्याच्या शिखरास पोहोंचल्या वांचून राहणार नाहीं; अशी ग्वाही श्रीशिवाजी महाराजांचा काळ सर्व महाराष्ट्रास देत आहे.

---

* महात्माजींचें मत

काँग्रेसच्या अनुयायांनीं कौन्सिलांत शिरावें किंवा कसें ह्या संबंधाचा वाद गेल्या वर्षी ज्या वेळीं जोरांत होता, त्यावेळीं कौन्सिलवरील बहिष्कार कायम ठेवणाऱ्या पक्षाला असें सांगण्यांत येत होतें कीं, आपल्या सहा वर्षांच्या शिक्षेनंतर महात्मा गांधी सुटून आल्यावर कौन्सिलवाल्या पक्षास आशीर्वाद दिल्यावांचून राहणार नाहींत. लाला लजपतराय, पं. मोतीलाल नेहरू, व देशबंधु दास ह्या तिघांचीं मतें ज्याप्रमाणें असहकारितेच्या चळवळींतील एक दोन वर्षांच्या अनुभवानें बदललीं, त्याप्रमाणें महात्मा गांधी ह्यांचेंहि मत कैदेंतून सुटल्यानंतर बदललेलें दिसल्यावांचून राहणार नाहीं, असा कौन्सिलवाल्यांचा कयास होता. पण ज्याप्रमाणें लोकमान्य टिळक १९१४ सालीं कैदेंतून सुटून आल्यावर कारागृहवासानें किंवा त्यांच्या पश्चात पसरलेल्या शिथिलतेमुळें आपल्या पूर्वीच्या मतांत फेरबदल करण्यास तयार झाले नाहींत, त्या प्रमाणें महात्मा गांधी ह्यांनीं देखील कारागृहवासानंतर आपलें पूर्वीचें धोरण बदललेलें नाहीं. जुहूच्या मुक्कामीं महिना दोन महिने एकसारखा खल करून महात्मा गांधी ह्यांनीं आपलीं पूर्वीचीं मतें जशींच्या तशींच कायम आहेत, आणि आपण कौन्सिलांत जाण्याविरुद्ध पूर्वीप्रमाणें आतांहि आहों, असें जाहीर केलें आहे. महात्मा गांधी ह्यांच्या या जाहीर-पत्रकानें कौन्सिलांत शिरलेल्यांवर कांहीं परिणाम होईल अशांतला भाग नाहीं; पण इतर लोकांना स्वतःचीं मतें बनवितांना या जाहीरपत्रकाचा फार उपयोग झाल्यावांचून राहणार नाहीं. पूर्वीच्या सन्माननीय ग्रंथांचा आधार, पूर्वीच्या थोर ऋषींचीं व पुरुषांचीं मतें व चरित्रें, हल्लींच्या परिस्थितीचें

---

* नवाकाळ, ता. २४ मे १९२४

पर्यालोचन, आणि ह्यान नामांकित पुढाऱ्यांचीं मतें व चरित्रें, या चार विभागांना अनुसरून स्वतःचें अंतःकरण व स्वतःची बुद्धि ज्या मार्गाकडे ओढा घेत असेल, त्या मार्गाचीं मतें प्रत्येकानें स्वीकारावयाचीं असतात. ह्यांत थोर पुरुषांच्या मतांना, स्वतःचीं मनें बनवितांना, प्रत्येक व्यक्तीकडून विशेष मान देण्यांत येतो. स्वतःचीं मतें बनविण्याचाच हा प्रकार आहे. व्यक्तिपूजा किंवा अंधश्रद्ध म्हणून ह्या प्रकाराला दोष देण्यांत हंशील नाहीं. लहान थोर सर्व व्यक्तींना आपलें स्वतःचें 'मनः पूत' कोणतें हें ठरवितांना, थोर पुढाऱ्यांच्या मतावर एक चतुर्थांश इतकें तरी अवलंबून राहणें भाग पडतें. पूर्वीच्या ऋषींचीं मतें विभिन्न दिसतात, शास्त्राधार निरनिराळे सांपडतात, मतामतांचा गलबला ऐकूं येतो; स्वतःच्या भावना, स्वतःची स्फूर्ति किंवा स्वतःच कार्यावेश ह्या विषयीं स्वतःचीच बुद्धि साशंक होऊन तर्क अप्रतिष्ठित होतो; अशा प्रसंगीं मतें बनवितांना माझ्यापेक्षां अधिक पूज्य मानल्या गेलेल्या व्यक्तीची भावना व स्फूर्ति विशेष आदरणीय असली पाहिजे असा बुद्धीचा निश्चय करून, मतामतांच्या गलबल्यांतून बाहेर पडावें लागतें. नेता आणि अनुयायी, गुरु आणि शिष्य, वगैरे प्रकारचीं नातीं वरील कारणानेंच उत्पन्न होत असतात. कौन्सिल-संबंधाच्या वादांत दे. बं. दास व पं. मोतीलाल नेहरू ह्यांच्या स्वार्थत्यागाला व बुद्धिमत्तेला तोडीस तोड देणारा पुढारी बहिष्कारत्रयीस धरून चालणाऱ्यांमध्यें गेली दोन वर्षें प्रत्यक्षपणें वावरत नसल्यामुळें पुष्कळांचा निश्चय डळमळीत होऊं लागला होता. असहकारवाद्यांतील ही न्यूनता महात्मा गांधी ह्यांच्या जाहीरपत्रकानें आतां भरून निघाली आहे. बहिष्कारत्रयी जरी प्रत्यक्षपणें विजयी झालेली दिसत नाहीं, तरी नोकरशाहीशीं अलिप्तपणें वागण्याचा जो सामान्य क्रम बहुजनसमाजांत उत्पन्न झाला आहे, त्या क्रमाकडे पाहिलें असतां असहकारवाद्यांची तीन वर्षांची चळवळ निष्फळ

झाली असें म्हणतां येत नाहीं. लोकांच्या विचारसरणींतच तीन वर्षांत मोठा फरक पडला आहे. हा फरक म्हणजे असहकारवाद्यांना मिळालेलें मोठें यश होय. कौन्सिलांत प्रवेश केल्यानें हेंहि यश तुम्ही गमवाल, आणि हजारों लोकांनीं तुरुंगांत जाऊन जी नवी विचारसरणी लोकांच्या आंगवळणीं पाडली आहे त्या विचारसरणीलाहि तुम्ही मातींत लोळवाल, अशी कौन्सिल-वांल्यावद्दल सर्वांना साहजिकच भीति वाटत आहे. ह्या भीतीसंबंधानें दे. बं. दास ह्यांचें असें म्हणणें आहे कीं, कौन्सिलवाले सरकारशीं टक्कर देत असल्यामुळें लोकांच्या नव्या विचारसरणीस धक्का लागण्याचें कारण नाहीं. कौन्सिलबाहेरच्या कामानें वाढीस लागलेली नवी विचारसरणी बाहेरचें काम सोडून दिल्यास आपोआप खुजट होणार हें कोणीहि कबूल करील. कौन्सिलांतील पार्लमेंटरी टक्करीच्या जोरावर नव्या विचारसरणींत जोम उत्पन्न करतां येणेंच शक्य नाहीं. कौन्सिलांतील कामकाजानें नव्या विचारसरणीलाच जर दुजोरा द्यावयाचा असला तर विधायक कार्यक्रमांतील गोष्टीच कौन्सिलांत पास करून नोकरशाही आडवी आल्यास कौन्सिलें सोडून पुनः लोकांच्या विचारसरणींत बाहेरून जोम उत्पन्न करण्याच्या मार्गास लागणें भाग आहे. कौन्सिलांत बसून तेथून असला जोम उत्पन्न करणें मुष्किलीचें आहे, असें ठरल्यानंतरच कौन्सिलवर बहिष्कार घालण्यांत आलेला होता; मग पुन्हां पुन्हां त्यांना त्याच गोष्टीची पूर्वीप्रमाणें आणखी एकदां परीक्षा पहात बसण्यात कोणतें हंशील ? जें पूर्वी झालें तेंच पुनः होणार, गलबला काय तो पदरांत पडणार, हा गलबला पदरांत काय म्हणून घ्यावयाचा ? आजच दे. बं दास व पं. मोतीलाल हे आपल्या कौन्सिलांतील टक्करीच्या कार्यक्रमांत फेरबदल करीत आहेत ना ? नोकरशाहीनें कौन्सिलांत अडथळा केलाच तर तेवढ्यापुरती टक्कर द्यावयाची आणि इतर सर्व वेळीं कौन्सिलांच्या कमिट्यांतून नोकरशाहीशीं खुशाल सहकार्य करावयाचें,

असें आपलें प्रतियोगी सहकारतेंचें उर्फ रिस्पॉन्सिव्ह कोऑपरेशनचें धोरण थोडया निराळ्या शब्दांनीं महात्मा गांधी ह्यांच्या जाहीरपत्रकावरोबरच दे. बं. दास व पं. मोतिलाल नेहरू यांनीं लोकांपुढें ठेवलें आहे ना ? पाव कामांत आज सहकार्य , अर्ध्यामुर्ध्या कामांत उद्यां सहकार्य, दिवाणांची जागा पत्करून दिवाणगिरीमार्फत परवां सहकार्य अशा रीतीनें तीन पावलांत तीन रंग झाल्यावर कौन्सिलांतील कामकाजामुळें नव्या विचारसरणीस कोठून जोम मिळणार ? असहकारितेची नवी विचारसरणी जर कर्त्या पुरुषांच्या चरित्रामुळें बुडावयची असेल, तर तीं कौन्सिलवाल्यांच्या कृत्यांनींच बुडणारी आहेत, यांत संशय नाहीं ही नवी विचारसरणी, अशा रीतीनें बुडावी अशी कौन्सिलवाल्यांची बिलकूल इच्छा नाहीं, पण त्यांची कृति मात्र या विचार-सरणीला मारणारी आहे, असा प्रत्यक्ष अनुभव आहे ! कारण, राष्ट्रांतील कांहीं पुढाऱ्यांचें चरित्र व कर्त्या पुढाऱ्यांनीं स्वीकारलेलें धोरण ह्यावर राष्ट्राची विचारसरणी निम्याहून अधिक अंशानें अवलंबून असते. विचार-सरणीच्या खांबापैकीं पुढाऱ्यांचें चरित्र व धोरण हे दोन खांब आहेत. ज्या खांबांवर नेहमींच विचारसरणीची इमारत उभारलेली असते असें स्मृति-कारांनीं सांगितलें आहे, त्या चार खांबांपैकीं दोन खांब अशा रीतीनें कौन्सिलवाल्यांच्या कृतीनें ढासळले जात असतां महात्मा गांधीं ह्यांनीं स्वतःच्या चरित्रानें व धोरणानें असहकारितेच्या नव्या विचारसरणीस पुनः सांवरून धरलें आहे, ही संतोषाची गोष्ट होय. कौन्सिलवाल्यांच्या चरित्रा-कडे किंवा धोरणाकडे विशेष लक्ष देऊन त्यांतच आपल्या विचारसरणीला गुंतवून न ठेवतां स्वतःच्या मार्गानें पुढें पाऊल टाकण्याची तयारी आतां असहकारवाद्यांनीं करण्यास हरकत उरलेली नाहीं. कौन्सिलांत गेले ते गेले, त्यांच्याबद्दल विनाकारण शोक करीत बसण्यांत किंवा त्यांचा उद्धार व्हावा म्हणून प्रयत्न करण्यात हंशील नाहीं, अशी मनाची खूणागांठ बांधून,

असहकारवाद्यांनीं कौन्सिलवाल्यांचें नांव सोडून देऊन आपला मार्ग अव्यभिचारी श्रद्धेनें ह्यापुढें चोखाळावा अशा तऱ्हेचा जो उपदेश महात्मा गांधी ह्यांनीं आपल्या जाहीर पत्रकांत सूचना केला आहे, त्या उपदेशाला अनुसरून कौन्सिलवाल्यांना दोष देण्याच्या काथ्याकुटांत निष्कारण वेळ असहकारवादी घालविणार नाहींत, असा आम्हांस भरंवसा आहे.

* पराभव व फाजिती

'पराभूत व फजित झालेला' ह्या मथळ्याखालीं म. गांधी ह्यांनीं अहमदाबादच्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या बैठकीसंबंधानें लिहिलेला लेख फार महत्वाचा आहे. मथळ्यांतील पराभव झाला व फजिती झाली हे शब्द वाचून, म. गांधी काँग्रेसच्या राजकारणांत चारीं मुडे चीत झाले आहेत आणि कौन्सिलवाल्या पक्षाच्या तंत्रानें वागण्याशिवाय त्यांना आतां मार्ग उरलेला नाहीं, असा अर्थ कांहींनीं त्यांच्या लेखाचा केला आहे. असा अर्थ सदर लेखाचा करणाऱ्यांविषयी 'अरसिकेषु कवित्व निवेनम् शिरसि मा लिख मा लिख मा लिख' म्हणून उद्गार कोणाहि सद्गृहस्थाच्या तोंडून निघाल्यावांचून रहाणार नाहींत. अहमदाबादच्या ऑलइंडिया काँग्रेस कमिटीमध्यें म. गांधी ह्यांच्या बाजूचेंच मताधिक्य एकसारखें होतें, ह्या विषयीं बिलकूल संशय नाहीं. आंकडे मोजण्याच्या मताधिक्याच्या दृष्टीनें आपला पराभव झाला असें म. गांधी मुळींच मानीत नाहींत. सूत काढणें व बहिष्कार-पंचक अंमलांत आणणें ह्या तत्त्वांना महात्माजींना मताधिक्य मिळालें, पण सदर तत्त्वें न पाळणारांना दंड करण्याच्या कामांत राष्ट्रांत राजकीय वातावरणांत जो जबर पाठिंबा असावयास पाहिजे तो जबर पाठिंबा ऑलइंडिया काँग्रेस कमिटीच्या मार्फत म. गांधी ह्यांना मिळाला नाहीं. हा पाठिंबा नसतांना महात्माजींनीं दंडाच्या कलमासंबंधानें आग्रह धरला नाहीं, एवढीच काय ती पराभवाची बाब आहे. मताधिक्यानें दंडाचाहि भाग पास झाला असतांना महात्माजी सदर बाब सोडून देण्यास आपणाहून तयार झाले. ह्याला स्वराज्यपक्षाचें दटावणेंहि कारणीभूत नव्हे, किंवा स्वतःच्या

---

* नवाकाळ, ता. ४ जुलै १९२४

मताविषयीं शंका उत्पन्न झाली म्हणून महात्माजींनीं तसें केलें, असेंहि नव्हे. काँग्रेसचें अधिकारी मंडळ एकजुटीचें व एकमताचें असलें पाहिजे, एरव्हीं कार्यकर्ती संस्था ह्या नात्यानें काँग्रेसचें महत्व वाढणार नाहीं; हें महात्माजींचें मत अद्याप जसेंच्या तसेंच कायम आहे. महात्माजी सेनानायकहि आहेत, आणि सेनाकर्तेहि आहेत. सरकारी अधिकाऱ्यांना सेनानायक व्हावयाचें असतें; सेनाकर्ते किंवा सैन्याला उत्पन्न करणारे ह्या नात्याचें काम प्रस्थापित झालेली सत्ता आपोआप करीत असते. कौन्सिलांत एकदां शिरल्यानंतर तेथें काम सेनानायकाचें करावयाचें असतें, सैन्य उत्पन्न करण्याचें काम करावयाचें नसतें. काँग्रेसच्या पुढाऱ्यांना सेनानायक ह्या नात्यानें लढावें लागतें, सैन्यांत शिस्त ठेवावी लागते, आणि लढत असतांना व शिस्त ठेवीत असतांना सैन्यहि उत्पन्न करण्याचें काम करावें लागतें. लढण्याच्या पद्धती-संबंधानें म. गांधी ह्यांचा पराभव ऑलइंडिया काँग्रेस कमिटीमध्यें झालेला नाहीं. तसा आपला पराभव झाला असें ते स्वतः मानीत नाहींत. पण दंडाची शर्त अंमलांत आणण्याकरितां जितक्या सैनिकांची भरती व्हावयास पाहिजे तितक्या सैनिकांची भरती अद्याप झालेली नाहीं एवढ्या बाबीपुरताच महात्माजींचा पराभव झालेला आहे. ह्याहि बाबीसंबंधानें साधें मताधिक्य महात्माजींना मिळालें खरें, पण तेवढें मताधिक्य दंडाचीं कलमें अंमलांत आणण्यास केव्हांहि उपयोगी पडत नाहीं. जगांतील साधा व्यवहार ह्याच पद्धतीनें चाललेला आहे. डोळे मिटून अंतःस्थ दृष्टीनें पहाण्याची ह्या कामीं कांहीं जरुरी नाहीं. हा धोपट मार्ग आहे, आणि उघड उघड व्यवहार आहे. आपल्या कार्याला जरूर तितकीं शहाजोग माणसें जर मिळत नसतील, तर तशीं माणसें मिळेपर्यंत कांहीं शर्तीं तंतोतंत पाळूं नयेत हा जगांतील सामान्य नियम आहे. ह्या नियमाला अनुसरून आपणाला जरूर तितकीं शहाजोग व बावनकशी माणसें मिळण्याइतकी भरपूर संख्या नाहीं,

एवढेंच काय तें ऑलइंडिया काँग्रेस कमिटीच्या ठरावांनीं सुचविलें आहे. हा आपला पराभव होतो असें महात्माजींनीं कबूल करण्यापासून कौन्सिलवाल्या पक्षाच्या नादीं महात्माजींना लागल्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं, असा अर्थ कसा काढावयाचा हेंच आम्हांस समजत नाहीं. सेनानायक ह्या नात्याच्या जबाबदारीबरोबरच सेनाकर्ते ह्या नात्याची जबाबदारी महात्माजींवर आहे, हें इतरांप्रमाणें महात्माजी ओळखून आहेत. आज जरूर तेवढी संख्या जर मिळत नाहीं, तर ती मिळविण्याच्या मार्गाला म्हणजे सैन्य उत्पन्न करण्याच्या मार्गाला महात्माजींनीं लागलें पाहिजे. हें कर्तव्यकर्म पुढील चार सहा महिने तत्परतेनें बजावण्यास महात्माजी तयार आहेत, हें त्यांच्या लेखाचा महत्त्वाचा उत्तरार्ध आज जो प्रसिद्ध करण्यांत आला आहे त्यावरून स्पष्ट होत आहे. कौन्सिलवाल्या पक्षाच्या तंत्रानें वागून काँग्रेसचा गाडा पुढें ढकलण्यांत अर्थ नाहीं, हें त्यांचें मत कायम असून काँग्रेसचें अधिकारी मंडळ एकमताचें व एकजुटीचें करण्याचा आपला कार्यक्रम महात्माजींनीं बिलकूल सोडून दिलेला नाहीं. हिंदु-मुसलमानांच्या एकीच्या व खादीच्या चळवळीच्या मार्फत हा कार्यक्रम आपोआप अमलांत येईल, आणि नंतर खादीच्या स्वराज्याकडे राष्ट्राचें पाऊल जोरानें पडेल अशीच उमेद महात्माजींना वाटत आहे. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीमध्यें महात्माजींची फजिती झाली, महात्माजींना आपल्या पक्षाची लाजहि राखतां आली नाहीं व दुसऱ्या पक्षाला हाणूनहि पाडतां आलें नाहीं इतकी महात्माजींची छी-थू उडाली, मानखंडणा होऊन महात्माजींना व अल्लीबंधूंना अश्रू ढाळतां ढाळतां पुरेवाट झाली, ह्याहून आणखी महात्माजींच्या पक्षाची रेवडी उडण्याची ती काय शिल्लक आहे; अशी कांहींनीं महात्माजींच्या लेखांतील "हंबल्ड" उर्फ फजीत झालेला ह्या मथळ्यावरून टीका केलेली आहे. अशी टीका होण्यापर्यंत

लेखाचा साधा अर्थ आमच्यांतील कांहीं लोकांना समजूं नये ही दुर्दैवाची गोष्ट होय. बार्डोलीच्या ठरावानंतर दिल्लीस भरलेल्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीमध्यें कांहीं सभासदांनीं महात्माजीच्या शांततेच्या व्रतावर भरभक्कम तोंडसुख घेतलें होतें. तसलेंच्च तोंडसुख वऱ्हाडच्या कांहीं सभासदांनीं अहमदाबादेस घेण्यास कमी केलें नाहीं. खुद्द दे. बं. दास ह्यांना महात्माजींची जी विचारसणी कबूल करावी लागली, त्या विचारसरणीलाहि पायाखाली तुडवून उद्दामपणाने महात्माजींवर तोंडसुख घेण्याचा देखावा अहमदाबादेस दृष्टीस पडावा, ही स्थिति महात्माजींना खालीं मान घालण्यासारखी वाटत आहे. आपल्या मताचा कोणी अनुयायी नसला तरी त्याबद्दल महात्माजींना स्वतः बाईट वाटून घेण्याचें कारण नाहीं. मतभेद असणें निराळें, तुच्छतेनें दुसऱ्यांचीं मतें धिक्कारणें निराळें. आपलीं मतें कांहीं व्यक्तींकडून अत्यंत तुच्छतेनें धिक्कारलीं जाण्यांत कांहीं लोक नकळत प्रौढी मिरवीत आहेत असा देखावा जेव्हां महात्माजींनीं पाहिला तेव्हां स्वतःचीं मतें इतक्या तरी थोडया व्यक्तींकडून कां धिक्कारलीं जावींत, ह्यासंबंधाचा विचार त्यांच्या अंतःकरणांत आंतल्या आंत आपोआप उत्पन्न झाला, आणि ह्या मानखंडनेपुढें शांत वृत्तीनें मान वाकविण्यास ते तयार झाले. हा खालीं मान घालण्याचा प्रसंग उद्धटांच्या वरचढपणामुळें थोर विभूतींवर नेहमीं येत असतो. अशा प्रसंगीं खालीं मान घालून परमेश्वराला शरण जाण्याचा व धावा करण्याचाच्च मार्ग सर्व थोर विभूतींनीं आजपर्यंत स्वीकारलेला आहे. गंगेवर स्नान करून शुचिभूंत स्थितींत धर्मसेवा करण्याकरतां निघालेल्या एकनाथ महाराजांवर नास्तिक उद्धटानें ज्याप्रमाणें पांच सात वेळा चूळ टाकली, त्याप्रमाणेंच दिल्लीच्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या वेळीं व अहमदाबादच्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या वेळीं महात्माजी डोळ्यापुढें न खपणाऱ्या एका घमेंडानंदनानें महात्माजींवर भरसभेंत एक तऱ्हेनें

थुंकण्यास कमी केलें नाहीं. एकनाथ महाराजांनीं चूळ अंगावर टाकणाराला किंमपिहि उलट शब्द न बोलतां खालीं मान घालून गंगेंत स्नान करण्याचा जसा क्रम स्वीकारला, तसाच खालीं मान घालण्याचा व आपल्या कार्यास लागण्याचा क्रम महात्माजींनीं स्वीकारला आहे. एकनाथ महाराजांना पांच सात चुळा अंगावर टाकून घ्याव्या लागल्या; तेव्हां महात्माजींना देखील आणखी कांहीं प्रसंगीं अशीच खालीं मान घालावी लागेल, ह्यांत संशय नाहीं. अशी खालीं मान महात्माजींनीं घातली तरी उद्धट उद्दामपणाचा विजय झाला असें इतर तसल्याच निर्लज्जांशिवाय इतर कोणीहि मानणार नाहीं. असले उद्धट व असले निर्लज्ज सर्व काळीं व सर्व प्रसंगीं नकळत साधुसंतांचा छळ करीत आले आहेत. ह्यांच्या दर्शनानें व संगतीनें मान खालीं घालण्याचा प्रसंग कोणत्या मोठ्या पुरुषावर आजपर्यंत आलेला नाहीं ? डोळे मिटून नीट आपले विचार तपासण्याची ज्यांना जरुरी वाटत नाहीं व जगांतील व्यवहाराचा साधा धोपट मार्ग पहाण्यापलीकडे जे जाऊं इच्छित नाहींत, त्यांनीं देखील, "दुर्जनं प्रथमं वंदे" ह्या म्हणीच्या सत्यतेचा अनुभव येऊन महात्माजींचें कोमल मन ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या बैठकींत अत्यंत हळहळलें, असा सरळ अर्थ ह्या फजितीचा कां करूं नये ?

---

* हिंदु-मुसलमानांची पायधरणी

ता. १८सप्टेंबरपासून ता. ८ आक्टोबरपर्यंत २१ दिवसांचा उपवास महात्माजीनीं सुरू केला आहे. तपश्चर्या ह्या नात्यानें ह्या उपवासाला महत्त्व आहेच, पण हिंदु-मुसलमानांमध्यें सांप्रत जी द्वेषबुद्धि पसरत चालली आहे, त्या द्वेषबुद्धीला आळा घालण्यांत यावा म्हणून दोनहि समाजांची मुख्यत्त्वेंकरून पायधरणी करण्याकरितां हा उपवास महात्माजींनीं सुरू केला आहे. सात्विक बुद्धीनें पूर्णपणें उपाशी राहून, हिंदु-मुसलमानांच्या तंट्याचा तुम्ही आपसांत गोडीगुलाबीनें निकाल लावा म्हणून महात्माजींनीं सर्वांचे पाय धरले आहेत. कोहाट, दिल्ली, लखनौ, नागपूर आणि गुलबर्गा येथील हिंदु-मुसलमानांच्या दंग्यांमुळें महात्माजींचें अंतःकरण विदीर्ण झालें असून, लोकांचें पाय धरून दोनहि समाजांतील विचारी पुरुषांच्या चरणीं एकी व्हावी म्हणून आपले प्राण अर्पण करण्याचा महात्माजीचा हा यज्ञ आहे. हिंदु-मुसलमानांचे दंगे सुरू झाल्यानंतर प्रत्येक समाजांतील गुंडांच्या हातीं लाठीची सत्ता जाते, आणि नाना प्रकारचे जुलूम बायकांवर व दुर्बलांवर करण्यांत येतात. महात्माजी हे अहिंसेच्या तत्त्वाचे जरी पूर्णपणें अभिमानी असले तरी असल्या जुलमाच्या वेळीं घरच्या बायकांची अब्रू वांचविण्याकरितां आणि आपल्या देवांच्या मूर्ति फोडल्या जाऊं नयेत म्हणून प्रत्येकानें प्राण जाईतों बायकांचें व देवतांच्या मूर्तींचें संरक्षण केलें पाहिजे, असेंच महात्माजींचें मत आहे. मनाचा दुबळेपणा महात्माजींना बिलकूल पसंत नाहीं. एकमेकांनीं एकमेकांचा प्राण घेतल्याशिवाय तंटा मिटत नाहीं अशी वस्तुस्थिति दृष्टीस पडल्यावर, महात्माजी स्वतः शौकत अल्लींशी द्वंद्वयुद्ध करण्यास उभे ठाकल्यावांचून रहाणार नाहींत. ता. १८ सप्टेंबरच्या 'यंग

---

* नवाकाळ, ता. २० सप्टेंबर १९२४

इंडिया'मध्यें "प्रश्नांतला प्रश्न" ह्या मथळ्याखालीं लिहिलेल्या अग्रलेखांत महात्माजींनीं वरील तऱ्हेचें विधान केलें आहे. शौकत अल्लींच्या बोटांच्या तडाख्यानें माझ्या देहाचा गोळा होऊन पडला तर स्वतःचें संरक्षण करण्याची शक्ति हिंदूंमध्यें उत्पन्न झाली म्हणून समाजावें, आणि जर शौकत अल्लींच्या धिप्पाड शरीरास मी जमिनीवर लोळविलें तर मुसलमानांचें दरडावणें संपलें म्हणून समजावें, असा तऱ्हेचें स्वसंरक्षणाकरितां पूर्ण प्राणत्याग करण्याच्या मनाच्या निश्चयाचें चित्र महात्माजींनीं रेखाटलें आहे. मनाचा हा निश्चय म्हणजेच खरें शौर्य होय. हें शौर्य आज हिंदूंमध्यें नसल्यामुळें, आणि मुसलमानांतील विचारी पुढारीहि एकीकरितां असलें शौर्य दाखवीत नसल्यामुळें दोनहि समाजांतील गुंडांच्या हातांत एक प्रकारची सत्ता जाऊन स्त्रियांच्या पातिव्रत्याची व मालमत्तेची मालकीहि गुंडांच्याकडे आजकाल जात आहे. हिंदु पुढारी काय किंवा मुसलमान पुढारी काय, दोघेंहि आपापल्या मालमत्तेचे व बायकांच्या अब्रूचे मालक राहिले नसून, सोटा हातांत घेऊन घरापुढें उभा राहणारा गुंडच घरांतील बायकांचा व चीजवस्तूंचा मालक होऊन बसला आहे. ही समाजाची स्थिति दोघांच्याहि धर्मांना अत्यंत लांछनास्पद आहे. गुंडशाही माजली आहे, आणि ही गुंडशाही समाजांतील विचारी पुरुषांच्या एक तऱ्हेच्या संमतीनेंच जन्मास आली असून विचारी पुरुषांच्या पाठिंब्यामुळेंच ह्या गुंडशाहीचा फैलाव होत आहे. ह्या स्थितीला आळा घालणें दोनहि समाजांतीस विचारी पुरुषांच्या हातीं अद्याप आहे. विचारी पुरुषांनीं मनांत आणलें तर ही स्थिति हां हां म्हणतां पालटल्यावांचून राहणार नाहीं. पण दंग्याधोप्यांसंबंधानें जे नानाप्रकारचे तर्ककुतर्क आणि विलक्षण अफवा समाजांत पसरत असतात, त्यामुळें मनोविकार क्षुब्ध होऊन विचारी लोकांनाहि एकीच्या मार्गाकडे दुर्लक्ष करावेंसें वाटूं लागलें आहे. हें दुर्लक्ष आत्मघात केल्यावांचून रहाणार नाहीं. ह्या दुर्लक्षामुळें दोनहि समाजाचा नाश होत आहे. हा नाश स्वराज्यालाहि मारून टाक-

णारा आहे. स्वराज्य गेलेलें पत्करलें असें म्हणण्यापर्यंत कांहीं विचारी लोकांच्या बुद्धीला भ्रंश होऊं लागला आहे. हा बुद्धिभ्रंश टाळण्याकरितां महात्माजींनीं २१ दिवसांच्या उपवासाचें व्रत स्वीकारून दोनहि समाजांतील पुढाऱ्यांचे पाय घट्ट धरले अहेत. दोनहि समाजांतील पुढाऱ्यांनीं योग्य वेळींच शुद्धीवर यावें, आणि आपलें कर्तव्य ओळखून दोनहि समाजांना लागलेलें लांछन धुवून टाकावें, म्हणून महात्माजी हिंदु-मुसलमानांची प्रार्थना करीत अहेत. अशी प्रार्थना तुरुंगांतून सुटल्यापासून सर्व खासगी भाषणांत महात्माजींनीं सर्वांची केली आहे. सभांतून बोलतांना ह्याच प्रार्थनेवर महात्माजींनीं एकसारखा जोर दिला आहे, आणि हिंदु-मुसलमानांची एकी हाच मुख्य विषय आपल्या लेखांचा करून ठेवला आहे. इतकें केलें तरी दोनहि समाजांतील विचारी लोक ह्या प्रश्नाकडे दुर्लक्षच करीत आहेत, कांहीं केल्या ऐकतच नाहींत. बुद्धिभ्रंशाच्या तडाख्यांतून सुटून बाहेर पडणेंच विचारी लोकांच्या जिवावर येऊं लागलें आहे ! बुद्धिभ्रंश म्हणजेच आपला प्राण अशी माया विचारी लोकांत पसरली आहे. विचारी लोकांच्या डोळ्यावरील अंधःकाराचें हें पटल दूर करण्याकरितां आणि एकीच्या स्वराज्यांतील खऱ्या प्राणाकडे विचारी लोकांचें लक्ष लागावें म्हणून प्राण जाईतों मी दोन्ही समाजाचे पाय धरून बसतों, असा हट्ट महात्माजींनीं धरला आहे. महात्माजींसारखा पुरुष आपले प्राणहि वेंचून ज्या अर्थी ह्या प्रश्नाकडे विचारी लोकांचें लक्ष वेधण्यास निश्चयात्मक बुद्धीनें धरणें धरून बसला आहे, त्या अर्थी हिंदु-मुसलमानांच्या एकीचा प्रश्न तितक्याच महत्त्वाचा आहे, असें पहिल्या झटक्यासरशीं प्रत्येकास वाटल्याघांचून रहाणार नाहीं. असें वाटावयास लावण्याकरितांच हा उपवास आहे. कारागृहवासामुळें आणि त्यानंतरच्या दुखण्यामुळें महात्माजींची प्रकृति अधिक क्षीण झाली आहे, तेव्हां २१ दिवसांच्या उपवासांत त्यांच्या देहाचें काय होईल हे कोणी सांगावें ? पण प्राणत्यागापर्यंत पाळी आली तरी प्राणत्याग

करून हिंदु–मुसलमानांच्या एकीकडे सर्व राष्ट्राचें लक्ष वेधण्याचा महात्माजींनीं निश्चय केलेला दिसत आहे. शौकत अल्लीशीं द्वंद्व-युद्ध करण्यांत शौकत अल्लीच्या बोटांनीं जर माझ्या शरीराचा चेंदामेंदा केला, तर तो चेंदामेंदा हिंदु समाजांत खरें शौर्य उत्पन्न करील असे जे उद्गार महात्माजींनीं आपल्या लेखांत काढले आहेत, त्या उद्गारांकडे पहातां, उपवासानें प्राणत्याग करून असल्या सात्विक पायधरणीनेंच सर्व राष्ट्राला शुद्धीवर आणण्याचा मार्ग महात्माजींच्या बुद्धीनें सांप्रत स्वीकारला आहे, असेंच म्हणावें लागतें. राष्ट्राची बुद्धि शुद्ध करण्याकरितां आपल्या प्राणांची आहुति देण्यास महात्माजी तयार झाले आहेत, ह्या वेळीं आपलें कर्तव्यकर्म करण्यास हिंदूंचे व मुसलमानांचे पुढारी कसे मागें घेतील ? महात्माजींच्या उपवासास सुरवात होण्याबरोबर हकीम अजमल खान, स्वामी श्रद्धानंद, व मौ. महंमद अल्ली ह्या तिघांनीं तावडतोब हिंदूंच्या व मुसलमानांच्या पुढाऱ्यांना दिल्लीस येण्याविषयीं निमंत्रणें पाठविलीं असून, ता. २३ सप्टेंबर रोजीं हिंदु-मुसलमानांच्या सर्व पुढाऱ्यांची परिषद सदर निमंत्रणावरून दिल्ली येथें भरणार आहे. ह्या परिषदेस हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांतील पुढारी हजर रहातील, आणि विशेशतः पंजाब, दिल्ली, लखनौ, प्रयाग व काशी येथील हिंदु-मुसलमानांचे पुरस्कर्ते मोठया संख्येनें हजर रहातील, ह्यांत संशय नाहीं. २१ दिवसांचे अंत हिंदु-मुसलमानांचे पुढारी मनःपूर्वक प्रयत्न करूं लागले आहेत, आणि हिंदु-मुसलमानांच्या एकीकडे कोणाहि विचारी पुरुषांचें दुर्लक्ष शिल्लक राहिलेलें नाहीं, असा अनुभव महात्माजींना आणून देणें सर्व राष्ट्रभक्तांचें पवित्र कर्तव्य आहे. हकीम अजमलखान व स्वामी श्रद्धानंद ह्यांनीं वेळ न गमावतां परिषद बोलावण्याचें ठरविल्याबद्दल त्यांचें आभार मानून हिंदु-मुसलमानांच्या प्रश्नाचा विचार करणाऱ्या सर्व राष्ट्रभक्तांनीं ता. २३ सप्टेंबर रोजीं दिल्लीस हजर राहण्यास चुकूं नये, अशी सर्व पुढाऱ्यांना आमची विनंति आहे.

——

* प्राण असेतों सूत काढणार

म. गांधी ह्यांचा २१ दिवसांचा उपवास उदईक बुधवारीं सायंकाळीं सोडण्यांत येणार आहे. १४ व्या दिवसांनंतर महात्माजींची प्रकृती क्षीण झाली, तथापि त्यांच्या शरीरावर सात्विक तेज अधिक चमकूं लागल्यामुळें २१ दिवसांचा उपवास त्यांच्या हातून पूर्णपणें पार पडणार ह्याबद्दल डॉ. अनसारी ह्यांना कांहीं काळजी उरली नाहीं. शेवटचे चार-पांच दिवस रोज अर्धा तास सूत काढण्याचें श्रम महात्माजींनीं सोडून द्यावे अशी महात्माजींना सर्व डॉक्टरांनीं विनंति केली; पण माझ्या अंगांत रतिभरहि शक्ति शिल्लक असेतों मी सूत काढणार, असें महात्माजींनीं उत्तर दिलें. प्राण असेतों सूत काढण्याचा महात्माजींचा नियम आहे आणि हें सूत काढण्याचें त्यांचें व्रत पूर्णपणें पाळलें जाऊनच बुधवारीं त्यांचा उपवास सुटेल, ह्यांत संशय नाहीं. सत्यसंकल्पाचा योगक्षेम परमेश्वर चालवितो, तेव्हां बुधवारीं उपवास सुटेपर्यंत अर्धातास सूत कातण्याच्या त्यांच्या व्रताला अडथळा होणें शक्य नाहीं. देशसेवा आपल्या हातून अधिक चांगली घडावी, ह्या हेतूनें महात्माजींनीं हा २१ दिवसांचा उपवास चालविला आहे. अन्नमय प्राण असतांहि अन्न त्यांनीं वर्ज केलें आहे, आणि हा आत्मयज्ञ चालू असतांच सूत काढण्याचें व्रत त्यांनीं सोडलें नाहीं. ह्या २१ दिवसांच्या उपवासाचे चमत्कारामुळें आत्मयज्ञाला धरून सूत काढण्याची राष्ट्रसेवा परमेश्वराच्या घरीं रूजूं झालेली आहे, असें सर्वांच्या अंतःकरणांवर बिंबल्यावांचून राहणार नाहीं. उपवास म्हणजे आत्मयज्ञाचा मुख्य पाया होय. साधी राहणी उपवासामुळें अंगवळणीं पडते, आणि

---

* नवाकाळ, ता. ७ ऑक्टोबर १९२४

शरीराच्या, मनाच्या, व बुद्धीच्या सर्व चोंचल्यांना आपोआप आळा बसतो. सर्व चोचले सोडून द्या आणि सूत काढून राष्ट्रसेवा करा, हा महात्माजींच्या उपवासाचे बुडाशीं बीजमंत्र आहे. २१ दिवसांच्या उपवासाच्या चमत्कारामुळें ह्या मंत्रावर लोकांची श्रद्धा बसेल ह्यांत संशय नाहीं. महात्माजींच्या आत्मयज्ञाचा पाठीराखा परमेश्वर आहे, हें गेल्या दोन तीन आठवड्यांत सर्वांच्या अनुभवास आलेंच आहे. दिल्लीची एकीची परिषद म्हणजे महात्माजींच्या उपवासाला लागलेलें गोड फळ होय. परिषदेच्या वेळीं हिंदुमुसलमानांच्या पुढाऱ्यांच्यामध्यें पुन्हां बेकी होते कीं काय अशी भीति दोन तीन प्रसंगीं वाटूं लागली होती; पण महात्माजी उपवास करीत आहेत ह्या गोष्टीकडे सर्वांचें लक्ष वेधलें जाऊन सहिष्णुतेनें व गोडीगुलाबीनें एकी घडवून आणण्याच्या संकल्पाचा जोर अखेर यशस्वी झाला. मुसलमानांकडून आतां तोडलें जाणार असें परिषदेच्या वेळीं दिसतांच मौ. अबुल कलम आझाद आणि महंमद अली ह्यांनीं मुसलमानांना आवरून धरलें, आणि हिंदुंच्याकडून फाजील ताणलें जात आहे असें आढळून येतांच पं. मदन मोहन मालवीय, स्वामी श्रद्धानंद, लाला लजपतराय, आणि बाबू भगवानदास ह्यांनीं आपलें सर्व वजन एकीच्या पारड्यांत टाकण्यास कसूर केली नाहीं. परिषदेमध्यें आपापल्या अंत:करणांतील रुखरुख दोनहि पक्षांनीं स्पष्टपणें बोलून दाखविली; पण प्रमुख पुढाऱ्यांनीं योग्य धोरण स्वीकारल्यानें आणि एकी करण्याचा निश्चय केल्यामुळें दोनहि समाजांतील सर्व विचारी पुरुषांना संमत होणारे ठराव परिषदेला सर्वानुमतें पास करतां आले. परिषदेंतील ही एकी कांहीं मुसलमानी पत्रांना मान्य नाहीं, आणि ह्या एकींत अर्थ नाहीं असें कांहीं हिंदूंचें म्हणणें आहे. तथापि परिषदेच्या कार्यासंबंधानें सर्व हिंदुस्थानभर वर्तमानपत्रांतून व पुढाऱ्यांच्या तोंडून जे उद्गार निघत आहेत त्यांजकडे पाहिलें असतां, परिषदेच्या कार्यासंबंधानें

कांहींनीं काढलेल्या शंकांना गालबोटाहून अधिक महत्त्व देण्याची जरुरी नाहीं, असेंच म्हणावें लागतें. दक्षिण हिंदुस्थानपेक्षां उत्तर हिंदुस्थानाला हिंदु-मुसलमानांच्या ह्या एकीची किंमत विशेष आहे; आणि म. गांधी ह्यांच्या उपवासाचा चमत्कार दिल्ली शहरांतच घडून आलेला असल्यामुळें लाहोर, दिल्ली, लखनौ ह्या शहरांवर हिंदु मुसलमानांच्या एकीसंबंधानें आज चांगला परिणाम झालेला दिसत आहे. लाहोरास चालू असलेल्या रामलीलेच्या उत्सवासंबंधानें हिंदु-मुसलमानांत वैवनाव होणार नाहीं असें सर्वांना आज पटलें असून, दिल्ली व लाहोर येथील हिंदूंनीं व मुसलमानांनीं मिळून भांडण तंटयासंबंधानें म. गांधी ह्यांनाच आपण होऊन पंच निवडले आहेत. दिल्लीच्या परिषदेंत पास झालेले ठराव जसजसे लोकांना नीट रीतीनें समजून देण्यांत येतील तसतशी लोकांमधील तेढ नाहींशी होईल, ह्यांत संशय नाही. "खा हळद आणि हो गोरी" असा तत्काळ परिणाम कसा दिसेल ? तथापि एकीचा पाया नीट रचला गेला आहे, ह्याविषयी आतां वाद राहिलेला नाहीं. आत्मयज्ञाचा हा प्रभाव आहे. आत्मयज्ञामुळें बेकी टाळतां येते, हें जसें महात्माजीच्या उपवासानें सिद्ध केलें आहे, तसेंच आत्मयज्ञाच्या जोरावर राष्ट्रसेवा प्रत्येकास करतां येते, हें देखील उपवासाच्या काळांत सूत काढण्याचें व्रत रोज पूर्णपणें पाळून महात्माजींनीं सर्व लोकांच्या निदर्शनास आणिलें आहे. अर्धा तास सर्वांनीं रोज सूत काढलें पाहिजे, हा नियम हिंदु-मुसलमानांच्या एकीप्रमाणेंच सर्व पुढाऱ्यांना स्वीकारावयास लावण्याचा महात्माजींचा उद्योग चालू आहे. प्राण असेतों मी सूत काढणार ह्या महात्माजींच्या प्रतिज्ञेला योग्य फळ लवकरच मिळाल्यावांचून राहणार नाहीं. अर्धातास सूत काढण्याच्या नियमाचा प्रसार करावयात महात्माजी लागल्यापासून बंगाल्यांत व इतर ठिकाणीं चांगले परिणाम दिसूं लागले आहेत. कलकत्त्यास खादी

प्रतिष्ठानाचें दुकानांत आगस्ट महिन्याची खादी विक्री पांच सहा हजारावर होती, पण सप्टेंबर महिन्यांत तीच विक्री १८-२० हजारांपर्यंत गेली. कलकत्त्याचें लक्ष खादीकडे अधिक लागलें असून नवरात्रांच्या महोत्सवांत परदेशी कापडाला यंदा अत्यंत तुटपुंजी मागणी आली, अशी कबुली कॅपिटल पत्रानें देखील दिली आहे. सूत काढण्याच्या कामांत बंगाल गुजराथच्याहि पुढें जाणार कीं काय अशी चढाओढ लागली असून, गुजराथनें मागें पडतां कामा नये म्हणून महात्माजींनीं गुजराथला इषारा दिला आहे. अर्धा तास सूत काढलेंच पाहिजे असा नियम ज्यावेळेला महात्माजींनी घातला, त्यावेळेला बंगाल्यांत हा नियम कोणीच पाळणार नाहीं अशी ह्या नियमाची हेटाळणी करण्यांत आली होती. पण २१ दिवसांच्या ह्या उपवासाच्या वेळीं कलकत्ता, बारिसाल वगैरे बंगाल्यांतीलच शहरांनीं कडक हरताळ पाडला आणि खादीकडे विशेश लक्ष पुरविलें, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. २१ दिवसांच्या उपवासांत शेवटीं शेवटीं सर्व शक्ति नष्ट होत असतांनाहि रोज अर्धातास सूत काढण्याचा निश्चय महात्माजी तडीस नेत आहेत. हा निश्चय म्हणजे मोठा पराक्रम होय. परमेश्वर पाठीराखा असल्याशिवाय असल्या कडव्या पराक्रमाचे दिवस पार पडणें शक्य नाहीं. उपवास म्हणजे साध्या राहणीचा आत्मयज्ञ आणि सूत काढणें म्हणजे देशसेवेच्या पराक्रमाची तालीम, असाच महात्माजींच्या सांप्रतच्या आचरणाचा अर्थ आहे. आपल्या आचरणानें आत्मयज्ञाच्या राष्ट्रसेवेचा जो धडा ह्या २१ दिवसांच्या उपवासांत महात्माजीनीं राष्ट्रापुढें ठेविला आहे, तो धडा गिरविण्याचा निश्चय उद्देशुन बुधवारीं महात्माजींच्या आरोग्याबद्दल परमेश्वराची प्रार्थना करीत असतांना सर्व देशभक्तांकडून करण्यांत येईल, असा आम्हांस पूर्ण भरंवसा वाटत आहे.

* वरवंटा फिरूं लागला

इंग्लंडांत कॉंझर्व्हेटिव्ह पक्षाच्या हातीं अधिकार जाण्याच्या पूर्वीच हिंदुस्थानांतील नोकरशाहीनें घाई करून बंगाल्यांत वरवंटा जोरानें फिरविण्यास प्रारंभ केला असून ७२ पुढाऱ्यांना एकदम अटकेंत ठेवण्यांत आलें आहे! १८१८ च्या रेग्युलेशनखालीं कलकत्ता म्युनिसिपालिटीचे चीफ ऑफिसर बाबू सुभाषचंद्र बोस व आणखी १५-१६ पुढारी ह्यांना कैदेंत ठेवण्यांत आलें असून लाटसाहेबांनीं काढलेल्या नव्या ऑर्डिनन्सच्या हुकुमाखालीं इतर पुढाऱ्यांना पकडून आतांपर्यंत ७२ बळी नोकरशाहीनें घेतले आहेत. कॉंझर्व्हेटिव्ह पक्ष उद्यां अधिकारारूढ झाल्यावर आणखी शेपन्नास इसमांना कैदेंत टाकण्यांत येईल, असा अंदाज आहे. १८१८ च्या रेग्युलेशनखालीं कैदेंत टाकण्यांत आलेल्यांची चौकशीहि करावी लागत नाहीं व आरोपीनें कोणता गुन्हा केला हें खुद्द आरोपींनाहि कळविण्याची जरुरी नाहीं. १८१८ सालच्या रेग्युलेशनच्या दोरीनें तुला फांसावर चढविण्यांत येत आहे एवढा मंत्र उच्चारला म्हणजे काम भागतें. ही असली बेबंदशाही करण्यास पुरेसा पुरावा आहे असें सर्टिफिकिट लार्ड रीडिंग ह्यांनीं दिलें असून लॉर्ड रीडिंग हे इंग्लंडचे मुख्य न्यायाधीश होतें, तेव्हां त्यांच्या सर्टिफिकिटानें चौकशींत कांहीं न्यून उरलेलें नाहीं, असा नोकरशाहीतर्फे गवगवा करण्यांत येत आहे. लाटसाहेबांचे अर्डिनन्सखालीं पकडलेल्या पन्नास साठ इसमांची स्थितीहि १८१८ च्या रेग्युलेशनखालीं कैदेंत टाकलेल्यांच्या सारखींच आहे. रौलेट ॲक्टमुळें चौकशी न करतां तुरुंगांत टाकण्याचे जे अधिकार सरकार घेऊं पहात होतें, तेच अधिकार सहा महिन्यांच्या

---

* नवाकाळ, ता. ३१ आक्टोबर १९२४

मुदतीपुरते कोणत्याहि प्रांतिक सरकारास, ऑर्डिनन्स काढून लाटसाहेबांना देतां येतात. लाटसाहेबांनीं ऑर्डिनन्स काढून असे अधिकार दिल्याबरोबर पाहिजे त्याला वारंटाशिवाय एकदम पकडून स्वतः निर्माण केलेल्या व झटपट चौकशी करणाऱ्या कोर्टांचे मार्फत पाहिजे तेवढी मोठी शिक्षा देऊन प्रांतिक सरकारांना पाहिजे तितक्या सद्गृहस्थांना मनमुराद छळतां येतें. १८१८ च्या रेग्युलेशनचीच धाकटी बहीण म्हणजे ऑर्डिनन्सची सत्ता होय. पाहिजे त्याला वारंटाशिवाय पकडावें, पुराव्याचा कायदा गुंडाळून टेवून पाहिजे तशी झटपट व गुप्त रीतीनें चौकशी करावी आणि पाहिजे ती शिक्षा ठोठावावी, असा ऑर्डिनन्सचा वरवंटा सहा महिन्यांपर्यंत बंगाल्यांत फिरावयाचा आहे. ह्या झटपट कोर्टांचें काम गुपचुप चालावयाचें आहे. कोणी कोणाविरुद्ध कशा साक्षी दिल्या व काय पुरावा पुढें आला हें याः कानाचें त्या कानासहि समजावयाचें नाहीं. असल्या खटल्यांत आपण साक्ष दिली असतां लोक रागावतात व सूड उगवतात म्हणून साक्षीलाच कोणी पुढें येत नाहींत, अशी पोलिसांची तक्रार असल्यामुळें आरोपींना पटदिशी शिक्षा सांगण्याकरितां आणि साक्षीदारांचें व पोलिसांचें गुप्त कृत्य झांकून ठेवण्याकरितां आर्डिनन्सच्या नव्या वरवंट्याची योजना आहे. कलकत्त्यांतील काँग्रेसच्या ऑफिसमधलें बहुतेक सर्व पुढारी पकडण्यांत आले असून एकटे देशबंधु दास काय ते आज त्यांच्या पक्षांत तुरुंगाच्या बाहेर अहेत. देशबंधु दास ह्यांना आज पकडण्यांत येणार नाहीं असें प्रसिद्ध झालें आहे. तथापि सहा महिन्यांचा हा वरवंटा त्यांच्या डोक्यावर केव्हां आदळेल ह्याचा नेम नाहीं. नोकरशाहीच्या ह्या अनन्वित अत्याचारांचें कारण काय ? कायदा व व्यवस्था राखण्याकरितां आम्हीं हे अत्याचार करीत आहोंत, असें नोकरशाही म्हणत आहे. कायदा व व्यवस्था गेल्या दोन चार महिन्यांत कोठें बिघडली होती ? गेले दोन तीन महिने बंगाल्यांत

* वरवंटा फिरूं लागला

इंग्लंडांत कॉंझव्हेंटिव्ह पक्षाच्या हातीं अधिकार जाण्याच्या पूर्वीच हिंदुस्थानांतील नोकरशाहीनें घाई करून बंगाल्यांत वरवंटा जोरानें फिरविण्यास प्रारंभ केला असून ७२ पुढाऱ्यांना एकदम अटकेंत ठेवण्यांत आलें आहे! १८१८ च्या रेग्युलेशनखालीं कलकत्ता म्युनिसिपालिटीचे चीफ ऑफिसर बाबू सुभाषचंद्र बोस व आणखी १५–१६ पुढारी ह्यांना कैदेंत ठेवण्यांत आलें असून लाटसाहेबांनीं काढलेल्या नव्या ऑर्डिनन्सच्या हुकुमाखालीं इतर पुढाऱ्यांना पकडून आतांपर्यंत ७२ वळी नोकरशाहीनें घेतले आहेत. कॉंझव्हेंटिव्ह पक्ष उद्यां अधिकारारूढ झाल्यावर आणखी शेपन्नास इसमांना कैदेंत टाकण्यांत येईल, असा अंदाज आहे. १८१८ च्या रेग्युलेशनखालीं कैदेंत टाकण्यांत आलेल्यांची चौकशीहि करावी लागत नाहीं व आरोपीनें कोणता गुन्हा केला हें खुद्द आरोपींनाहि कळविण्याची जरुरी नाहीं. १८१८ सालच्या रेग्युलेशनच्या दोरीनें तुला फांसावर चढविण्यांत येत आहे एवढा मंत्र उच्चारला म्हणजे काम भागतें. ही असली बेबंदशाही करण्यास पुरेसा पुरावा आहे असें सर्टिफिकिट लार्ड रीडिंग ह्यांनीं दिलें असून लॉर्ड रीडिंग हे इंग्लंडचे मुख्य न्यायाधीश होतें, तेव्हां त्यांच्या सर्टिफिकिटानें चौकशींत कांहीं न्यून उरलेलें नाहीं, असा नोकरशाहीतर्फे गवगवा करण्यांत येत आहे. लाटसाहेबांचे अर्डिनन्सखालीं पकडलेल्या पन्नास साठ इसमांची स्थितीहि १८१८ च्या रेग्युलेशनखालीं कैदेंत टाकलेल्यांच्या सारखींच आहे. रौलेट ॲक्टमुळें चौकशी न करतां तुरुंगांत टाकण्याचे जे अधिकार सरकार घेऊं पहात होतें, तेच अधिकार सहा महिन्यांच्या

---

* नवाकाळ, ता. ३१ आक्टोबर १९२४

मुदतीपुरते कोणत्याहि प्रांतिक सरकारास, ऑर्डिनन्स काढून लाटसाहेबांना देतां येतात. लाटसाहेबांनीं ऑर्डिनन्स काढून असे अधिकार दिल्याबरोबर पाहिजे त्याला वारंटाशिवाय एकदम पकडून स्वतः निर्माण केलेल्या व झटपट चौकशी करणाऱ्या कोर्टांचे मार्फत पाहिजे तेवढी मोठी शिक्षा देऊन प्रांतिक सरकारांना पाहिजे तितक्या सद्गृहस्थांना मनमुराद छळतां येतें. १८१८ च्या रेग्युलेशनचीच धाकटी बहीण म्हणजे ऑर्डिनन्सची सत्ता होय. पाहिजे त्याला वारंटाशिवाय पकडावें, पुराव्याचा कायदा गुंडाळून ठेवून पाहिजे तशी झटपट व गुप्त रीतीनें चौकशी करावी आणि पाहिजे ती शिक्षा ठोठावावी, असा ऑर्डिनन्सचा वरवंटा सहा महिन्यांपर्यंत बंगाल्यांत फिरावयाचा आहे. ह्या झटपट कोर्टांचें काम गुपचुप चालावयाचें आहे. कोणी कोणाविरुद्ध कशा साक्षी दिल्या व काय पुरावा पुढें आला हें याः कानाचें त्या कानासहि समजावयाचें नाहीं. असल्या खटल्यांत आपण साक्ष दिली असतां लोक रागावतात व सूड उगवतात म्हणून साक्षीलाच कोणी पुढें येत नाहींत, अशी पोलिसांची तक्रार असल्यामुळें आरोपींना पटदिशी शिक्षा सांगण्याकरितां आणि साक्षीदारांचें व पोलिसांचें गुप्त कृत्य झांकून ठेवण्याकरितां आर्डिनन्सच्या नव्या वरवंट्याची योजना आहे. कलकत्त्यांतील काँग्रेसच्या ऑफिसमधलें बहुतेक सर्व पुढारी पकडण्यांत आले असून एकटे देशबंधु दास काय ते आज त्यांच्या पक्षांत तुरुंगाच्या बाहेर अहित. देशबंधु दास ह्यांना आज पकडण्यांत येणार नाहीं असें प्रसिद्ध झालें आहे. तथापि सहा महिन्यांचा हा वरवंटा त्यांच्या डोक्यावर केव्हां आदळेल ह्याचा नेम नाहीं. नोकरशाहीच्या ह्या अनन्वित अत्याचारांचें कारण काय ? कायदा व व्यवस्था राखण्याकरितां आम्हीं हे अत्याचार करीत आहोंत, असें नोकरशाही म्हणत आहे. कायदा व व्यवस्था गेल्या दोन चार महिन्यांत कोठें बिघडली होती ? गेले दोन तीन महिने बंगाल्यांत

सर्व कांहीं सुरळीत चालले आहे, मग नोकरशाहीचा ह्या वरवंट्याचा अत्याचार कशासाठीं ? आज नाहीं उद्यां खून-अत्याचारांकडे लोकांचें लक्ष अधिक लागेल, कारण अरेरावी जुलूम पद्धतीचा अंगिकार करून स्वराज्याचें हक्क लोकांना देण्यास नोकरशाही टाळाटाळी करीत आहे, अशा तऱ्हेचें उद्‌गार पं. मोतीलाल नेहरू व देशबंधु दास ह्यांच्या तोंडून असेंब्लीमध्यें व असेंब्लीच्या बाहेर निघाले आहेत. हे उद्‌गार म्हणजे कबुलीच होय असें अँग्लो-इंडियन पत्रांचें म्हणणें आहे. ह्या उद्‌गारांत कबुली कोठें आहे ? जुलमाचा अतिरेक झाला असतां व प्रजाजनांच्या हक्काकडे एकसारखें दुर्लक्ष होत गेलें असतां जुलूम असह्य होऊन खुनी अत्याचारांकडे लोकांची प्रवृत्ति होते, हा सर्व देशांचा व सर्व काळांतील इतिहासाचा सिद्धांत आहे. ह्या सिद्धांताची आठवण देण्यापलीकडे देशबंधू दास किंवा पं. मोतीलाल नेहरू ह्यांनीं आज कांहीं केलेलें नाहीं. अशी आठवण देणें म्हणजे अत्याचारांची वजवजपुरी माजली आहे म्हणून कबुली देणें कसें होईल ? महात्मा गांधी ह्यांच्या नॉन व्हॉयलन्सच्या उर्फ शांततेच्या तत्त्वाला देशबंधू दास ह्यांनीं व त्यांच्या अनुयायांनीं पूर्णपणें वाहून घेतलेलें आहे. असहकारितेच्या चळवळींत पडल्यापासून देशबंधु दास किंवा पं. मोतीलाल नेहरू ह्यांनीं शांततेचें व्रत बिलकूल सोडलेलें नाहीं. बंगाल्यांतील ऑर्डिनन्सचा नवा वरवंटा सुरू झाल्यानंतर सिमल्याहून कलकत्त्यास परत जातांना दे. बं. दास ह्यांनीं सांप्रतच्या अनन्वित जुलमासंबंधानें जे उद्‌गार काढले आहेत त्या उद्‌गारांतहि शांततेची शपथ आपण व आपल्या पक्षाच्या लोकांनीं घेतलेली आहे, असें देशबंधु दास ह्यांनीं ठासून जाहीर केलें आहे. मग ऑर्डिनन्सच्या वरवंट्याची जरुरी काय ? बिन चौकशीनें साठसत्तर पुढाऱ्यांना आज कैदखाना कां दाखविण्यांत येत आहे ? स्वराज्याचे हक्क जर दिले नाहींत तर अत्याचाराकडील लोकांची आजची प्रवृत्ति वाढेल, ह्या सिद्धांताला

अनुसरून भविष्यकाळची ही प्रवृत्ति हाणून पाडण्यासाठी आजचा भयंकर जुलूम नोकरशाही करीत आहे. तूं नाहीं तुझ्या बापानें पाणी गढूळ केलें असेल असें म्हणून इसापनीतींतील लांडग्यानें कोकराला खाऊन टाकलें; तशा प्रमाणें तूं नाहीं तुझा मुलगा पाणी गढूळ करील असें म्हणून बंगाल्यांतील शांततापिय व निरुपद्रवी कोकरांना आज बळी देण्यांत येत आहे! स्वराज्याच्या हक्काकरितां झगडणाऱ्या राजकीय चळवळीला दडपून टाकण्याकरितां हा वरवटा फिरत आहे. आज प्रत्यक्ष अत्याचार घडून आल्याची सबब कांहीं दाखवितां येण्यासारखी नाहीं. तुम्हाला स्वराज्याचे हक्क देत नाहीं ते नाहींच, पण असल्या जुलमामुळें उत्पन्न होणाऱ्या नैसर्गिक असंतोषालाहि आगाऊच आम्ही दडपून टाकतों, असें ह्या वरवंट्याचें स्वरूप आहे. राजकीय चळवळ करणारा कोणताहि पक्ष असो. नेमस्तांचा पक्ष असो किंवा सरकारी बगलबच्च्यांचा असो, सर्वांनाच हा वरवंटा सारखा जाचक होणार आहे. विप्रानें भरलेल्या बाटल्या सर्वांच्या पुढें ठेवण्यांत आल्या असून जबरदस्तीनें कोणाला हें विष पाजण्यांत येईल ह्याचा बिलकूल नियम राहिलेला नाहीं. ह्या विषाच्या हंड्या घराबाहेर फेकून देणें प्रत्येकाचें पवित्र कर्तव्यकर्म आहे. आम्ही नोकरशाहीच्या विश्वासांतले, म्हणून कोणीहि ह्या वेळीं स्वस्थ बसतां कामा नये. कारण विष कोणत्या वेळीं कोणाच्या अन्नांत घालण्यांत येईल हें कोणासहि समजणार नाहीं. सख्ख्या भावानेंहि सख्ख्या भावाचा ह्या कामी विश्वास धरूं नये. हें विष घरांत आहेतों कोणासहि झोंप येणें शक्य नाहीं. हें विष घरांतून बाहेर कसें काढावयाचें, हा सर्व हिंदुस्थानपुढें आज मुख्य प्रश्न होऊन बसला आहे. आपल्या विषारी दांतानें चावा घेत ७२ सद्गृहस्थांना विप्रानें घायाळ करून, जुलमी अत्याचारांचा काळसर्प बंगाल्यांत सहा महिने एकसारखा फिरावयाचा आहे. आपल्या विषारी दंशाचें

काम बंगाल्यांत चालू असतांना, इतर ठिकाणीं हा ऑर्डिनन्सचा काळसर्प फिरणार नाहीं असें कोणत्याहि राजकीय संस्थेनें किंवा प्रांतानें ह्या वेळीं मानतां कामा नये. ह्या नव्या वरवंट्याला तोंड देण्यासाठीं काय व्यवस्था करावी, ह्या संबंधाचा खल करण्याकरितां देशबंधू दास ह्यांनीं स्वराज्य पक्षाच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलची सभा कलकत्त्यास पुढील आठवड्यांत भरविण्याचें ठरविलें असून, पं. मोतीलाल नेहरू हे ह्या आठवड्यांत महात्मा गांधी ह्यांजबरोबर ऑर्डिनन्सनें उत्पन्न केलेल्या नव्या परिस्थितीचा विचार दिल्ली येथें करणार आहेत. नेमस्त, डॉ. मुंजांटबाई, वगैरे सर्व पक्षांची एकी काँग्रेसमध्यें व्हावी म्हणून हातानें सूत काढण्याच्या शर्तीस पं. मोतीलाल नेहरू यांनीं संमति देण्याचें म. गांधी यांजपाशीं कबूल केलें आहे. पुढाऱ्यांना ह्याप्रसंगीं आत्मयज्ञ पूर्वीहूनहि अधिक स्वार्थत्यागानें करावा लागेल ह्यांत संशय नाहीं, पण तेवढ्यानें भागावयाचें नाहीं. पुढाऱ्यांना ठेंचण्याकरितांच हा वरवंटा आहे. पुढारी आत्मयज्ञ स्वेच्छेनें करोत किंवा न करोत, ऑर्डिनन्सच्या बकासुरानें बळी मागितला असतां कारागृहवासाच्या यातनांतून सुटणें त्यांना शक्य नाहीं. नोकरशाहीच्या ह्या वरवंट्याच्या जुलमाला जर आळा बसावयाचा असेल, तर सामान्य लोकांच्या स्वार्थत्यागाच्या व शांततेच्या आत्मयज्ञानेंच बसणार आहे. ह्या प्रसंगीं बहुजनसमाजानें करावयाच्या स्वार्थत्यागाची दिशा महात्मा गांधी ह्यांजबरोबर होणाऱ्या वाटाघाटींत या आठवड्यांत मुक्रर ठरल्यानंतर बहुजनसमाजानें जर झपाट्यानें त्या दिशेनें पावलें टाकलीं, तरच वरवंटा फिरविणाऱ्या नोकरशाहीवर योग्य परिणाम होणार आहे. तेव्हां सर्व पक्षांचे पुढारी व अनुयायी यांनीं सर्वांनीं एक होऊन, जरूर तो आत्मयज्ञ श्रद्धेनें व स्वेच्छेनें करण्यास ह्यावेळीं पुढें येणें अत्यंत जरुरीचें आहे.

---

* त्रिमूर्तीचा खादीचा अवतार

कलकत्त्यांत दे. बं. दास ह्यांच्या घरीं स्वराज्यपक्ष व म. गांधी ह्यांजमध्यें चाललेल्या वाटाघाटींचा शेवट काँग्रेसमध्यें पूर्ण एकी घडवून आणण्यानें झाला आहे, ही संतोषाची गोष्ट होय. बंगाल्यांतील दडपशाहीनें ही एकी ताबडतोब घडून आणली, हें दडपशाहीचे उपकारच झाले आहेत. नानाप्रकारच्या जुलमांनीं मनुष्य त्रासला असतां परमेश्वराला मनुष्याच्या अंतःकरणावर छाप बसविण्यास संधि मिळते म्हणून म्हणतात तें खोटें नाहीं. गांजलेला मनुष्य तेव्हांच भक्त होऊं शकतो. मनुष्याची आपत्ति ही परमेश्वराची संधी आहे ! लाटसाहेबांनीं नवा अर्डिनन्स काढून बंगाल्यांत दडपशाहीची जर खळबळ उडवून दिली नसती, तर म. गांधी, दे. बं. दास व मोतीलाल नेहरू ह्या त्रिमूर्तीची एकी होणें फार कठिण गेलें असतें. पण आज ह्या त्रिमूर्तीची एकी झाली आहे. तिघांच्या सहीनें जें जाहीर पत्रक कलकत्त्यास प्रसिद्ध करण्यांत आलें आहे, तें जाहीर पत्रक म्हणजे त्रिमूर्तीचा खादी–अवतार होय. म. गांधी व दे. बं. दास ह्यांजमध्यें कलकत्त्यास जी चर्चा झाली, त्या चर्चेचें त्रोटक स्वरूप मद्रासच्या हिंदु पत्राच्या वातमीदारानें प्रसिद्ध केलें आहे. चर्चेकरितां जमलेल्या सर्व पुढाऱ्यांची तोंडमिळवणी एका बाबींत चटदिशीं झाली. दडपशाहीला राष्ट्रानें सणसणीत उत्तर दिलें पाहिजे ह्याबद्दल सदर चर्चेंत वादच नव्हता; पण सणसणीत उत्तर म्हणजे काय ? बंगालची दडपशाही सुरू होण्या-बरोबर सर्व हिंदुस्थानभर चोहोंकडे सभा भरवून दडपशाहीचा पूर्ण निषेध करण्यांत आला; मुंबईच्या प्रेसिडेन्सी असोसिएशननें देखील निषेध केला;

---

* नवाकाळ, ता. ९ नोव्हेंबर १९२४

पण निषेध करून कोठें भागतें ? असल्या निषेधाला नोकरशाही थोडीच जुमानणारी आहे ? सर्व बंगालभर हरताळ पडला, कलकत्ता शहरांतील सभांना वीस-वीस हजार तीस-तीस हजार लोक लोटले, पण दडपशाहीला आळा कसा घालावयाचा हा प्रश्न शिल्लकच राहिला. लोकांच्या अंत:करणाची संतप्त स्थिति पाहून विलायत सरकार कांहीं तरी करील म्हणून म्हणावें तर काँझव्हेंटिव्ह पक्ष अधिकारारूढ झाल्यानें एकीकडे आड तर दुसरीकडे विहीर अशी स्थिति झाली. हिंदुस्थानच्या नोकरशाहीच्या चुलींतील अग्नीच्या भडकणाऱ्या ज्वाळा इंग्लंडांतील वैलांतून निघत आहेत, अशी स्थिति दृष्टीस पडली.दडपशाहीला आळा घालण्यासंबंधानें योजण्यांत यावयाच्या उपायांची चर्चा दे. बं. दास ह्यांच्या घरीं चालली असतांना शेवटीं बहिष्काराशिवाय दुसरा उपाय नाहीं, असें सर्वांचें म्हणणें पडलें असें मद्रासच्या हिंदु पत्राच्या वातमीदारानें प्रसिद्ध केलें आहे. बहिष्कार घालावयाचा कसा ? बंगालच्या बंगभंगापासून आज वीस वर्षें बहिष्काराचें शस्त्र लोकांपुढें आहे. स्वदेशी व बहिष्कार ह्या जोडगोळीच्या पायींच सुरतच्या काँग्रेसमध्यें रणें माजलीं हें सर्वांना विश्रुत आहे. हा बहिष्कार यशस्वी होईल, अशा रीतीनें काम करण्याचा मार्ग कोणता ? हिंदुस्थान देश कापसाचा असल्यामुळें कापडा-वरील बहिष्कार हिंदुस्थानच्या शक्तीबाहेरचा नाहीं, पण हा बहिष्कार तरी गेल्या वीस वर्षांत कोठें सफल झाला आहे ? हा सफल न होण्याचीं कारणें जर पाहूं गेलें, तर गिरणीवाल्यांनीं बंगभंगाच्या वेळच्या बहिष्काराला पाठिंबा दिला नाहीं आणि त्यानंतर विलायती कापडाऐवजीं जपानी किंवा अमेरिकन कापडावर तहानभूक भागविण्याची प्रवृत्ति दिसूं लागली; अशीं कारणें बहिष्काराचें शस्त्र जाज्वल्य न होण्याचीं दृष्टीस पडत आहेत. हीं कारणें टाळावयाचीं कशीं ? कापडाचा धंदा व सूत काढण्याचा उद्योग सामान्य बहुजनसमाजाच्या हातीं गेल्याशिवाय बहिष्काराला निर्बल करणारीं

कारणें टाळतां यावयाचीं नाहींत, असा गेल्या वीस वर्षांचा अनुभव आहे. सूत काढणें व कापड विणणें ह्या उद्योगांचा व बहुजन-समाजाचा एकजीव कसा करावयाचा ? शेतकरी वर्ग व सामान्य बहुजन-समाज ह्यांच्यामध्यें खादीची उत्पत्ति व स्थिति कायम कशी करावयाची ? उत्पत्ति करावयास लागलें आणि स्थितीचें आसन थोडेंसें आवलें गेलें म्हणजे मँचेस्टरला लगेच चिमटा बसून हिंदु-मुसलमान, ब्राम्हण-ब्राम्हणेतर, अंत्यज व जातीवंत हिंदु, असे नानाप्रकारचे तंटे लावण्यांत येत आहेत, आणि त्या तंट्यांच्या पायीं बहुजनसमाजाच्या स्वतःच्या सुताच्या व स्वतःच्या कापडाच्या धंद्यांचा विनाश होत आहे. उत्पत्तीला प्रोत्साहन मिळालें पाहिजे. स्थितीची जोपासना होण्यास व लय टाळण्यास हिंदु-मुसलमानांची एकी आणि अस्पृश्यतेचें निवारण ह्या गोष्टी अत्यंत जरुरीच्या आहेत, तेव्हां ह्या बाबीसंबंधाचा म. गांधी ह्यांचा कार्यक्रम दे. बंधु दास ह्यांच्या घरीं जमलेल्या सर्व पुढाऱ्यांनीं तेव्हांच कबूल केला, ह्यांत कांहीं नवल नाहीं. विलायती कापडावर बहिष्कार घालण्याऐवजी सर्व परदेशी कापडावर बहिष्कार घालण्याचा ठराव सर्वानुमतें पास होऊन, ह्या बहिष्कारासंबंधानें सर्वांची एकी व्हावी म्हणून असहकारितेच्या कार्यक्रमापैकीं कोर्टांवरील व इतर बहिष्कार म. गांधी ह्यांनीं पूर्वी जाहीर केल्याप्रमाणें, सांप्रत अधांतरीं ठेवण्यांत आले. अधांतरीं ठेविलेल्या बहिष्कारासंबंधानें व्यक्तिशः कोणी आपलें आचरण बदलण्याचें कारण नाहीं, हें उघड आहे; पण वकिलांचा वर्ग, सावकारांचा वर्ग, कोर्टामध्यें जाणें भाग असलेल्या कुळांचा वर्ग काँग्रेसमध्यें राजरोसपणें सामील होण्यास कोणतीच हरकत उरलेली नाहीं. शिवाय सर्व परदेशी कापडावर बहिकार घालण्यांत यावा, असें म्हटलेलें असल्यामुळें एकट्या इंग्लंडच्या द्वेषाचाहि दोष हा बहिष्कारांत उरलेला नाहीं. अशा स्थितींत बिझांटबाईसारख्यांना व ना. श्रीनिवास शास्त्री ह्यांच्या-

सारख्या नेमस्तांना काँग्रेसमध्यें सामील होण्यास तत्वतः कोणतीच हरकत उरलेली नाहीं. बहिष्काराच्या सभोंवारच्या हरकती दूर करण्यासंबंधाचा हा बंदोबस्त झाला. पण तेवढयानें बहिष्कार यशस्वी कसा होईल? घराचें सभोंवारचें अंगण म्हणजे घर नव्हे. खरी शक्ति घरांत असते, अंगणांत नसते. बंगालच्या दडपशाहीला उत्तर द्यावयाचें असेल तर अंगण साफ करून दरवाजांतून अंगणांत येण्यास अडथळा करणाऱ्या दरवाजाच्या आडकाडया काढून टाकल्यानें काम भागणारें नाहीं. घरांत शक्ति पाहिजे! परदेशी कापडावरील बहिष्कार शक्तीशिवाय यशस्वी कसा होईल? बहुजन-समाजाचें व कापडाच्या उद्योगाचें लग्न लावल्याशिवाय घरांत शक्ति केव्हांहि उत्पन्न व्हावयाची नाहीं. हातानें सूत काढण्याचा व कापड विणण्याचा धंदा लोकांच्या नेहमींच्या संसाराशीं संलग्न कसा करावयाचा? सर्वांनीं खादी वापरली पाहिजे, असा निश्चय केल्याशिवाय बहुजन–समाजाच्या संसारांत खादीच्या धंद्याला प्रतिष्ठान मिळावयाचें नाहीं. परदेशी कापडावर बहिष्कार घालावयाचा म्हणजे खादीला प्रोत्साहन द्यावयाचें, असेंच होऊन बसलें आहे. हें प्रोत्साहन कसें द्यावयाचें? काँग्रेसचें कामकाज करीत असतांना आणि सार्वजनिक सभांतून किंवा राजकीय सभांतून हजर असतांना काँग्रेसच्या सर्व सभासदांनीं खादीच वापरली पाहिजे, असा नियम म. गांधी, दे. बं. दास, व पं. मोतीलाल नेहरू ह्या त्रिमूर्तींनीं आपल्या जाहीर पत्रकाच्या द्वारें सर्वांना घालून दिला आहे. खादी वापरण्याविषयींच्या आचारासंबंधाचा हा नियम सरकारी नोकरींत असणारांनाहि फार उपयोगी पडणारा आहे. साहेब रागावेल म्हणून ज्यांना साहेबापुढें खादी वापरतां येणें संसाराच्या दृष्टीनें सोयीचें नाहीं, त्यांनीं इतर सार्वजनिक मेळ्यांच्या प्रसंगीं, मग ते मेळे धार्मिक स्वरूपाचे असोत किंवा राजकीय स्वरूपाचे असोत, राष्ट्राचा पोषाक म्हणून खादीच वापरली पाहिजे, अशी त्रिमूर्तींच्या

जाहीरनाम्यांत आज्ञा आहे. परदेशी कापडावर बहिष्कार घालून खादी वापरण्याचा फैलाव जसजसा अधिक होईल तसतशी खादीची उत्पत्ति अधिक होत जाणारच, हें उघड आहे. पण हातानें सूत काढणें व कापड विणणें हे धंदे बहुजन–समाजाच्या घरादारांत कायमचें आसन ठोकून बसल्याशिवाय परदेशी कापडाशीं झुंजण्याचें खरें सामर्थ्य राष्ट्रांत उत्पन्न व्हावयाचें नाहीं. ह्या धंद्याचा स्वीकार स्वेच्छेनें व निश्चयानें बहुजन–समाज केव्हां करील? शिकले सवरलेले वरचे लोक उत्साहानें सूत काढीत आहेत व खादी वापरीत आहेत, असा प्रत्यक्ष अनुभव आल्याशिवाय बहुजनसमाज ह्या धंद्याचा स्वीकार निश्चयानें करणार नाहीं. बहुजनसमाजास तसा अनुभव आणून देण्यापुरता आणि बरच्या वर्गाचा स्वार्थत्याग बहुजन–समाजाच्या अंतःकरणास पटविण्याकरितां काँग्रेसचा सभासद होण्याची चार आण्याची शर्त काढून टाकून त्याच्या जागीं प्रत्येक सभासदानें दर महिन्याला स्वतः किंवा हस्तकाकडून काढलेलें दोन हजार यार्ड सूत काँग्रेसला वर्गणीदाखल दिलें पाहिजे, असा नियम बेळगांवच्या काँग्रेसच्या वेळीं पास करून घेण्याचें म. गांधी, दे. बं. दास व पं. मोतीलाल नेहरू ह्या त्रिमूर्तीनीं ठरविलें असून सर्व देशभक्तांना आपल्या जाहीर पत्रांत तशी आज्ञा केली आहे. प्रत्येकानें स्वतःच हातानें सूत काढलें पाहिजे, एरव्हीं काँग्रेसच्या सभासदांचा आत्मयज्ञ बहुजन–समाजास पटावयाचा नाहीं असा म. गांधी ह्यांचा आग्रह आहे; पण खादीच्या चळवळीला तन-मन-धन अर्पण न करितां इतर चळवळींत प्राधान्येंकरून पडलेल्यांना बहिष्काराची खादीची चळवळ उचलून धरण्यास सोयीचें पडावें व काँग्रेसला पूर्ण पाठिंबा देतां यावा म्हणून सूत काढण्याचा हा आत्मयज्ञ जरी स्वतः केला नाहीं तरी उपाध्यायाला सुपारी देऊन उपाध्यायाचे मार्फत हा आत्मयज्ञ करण्यास हरकत नाहीं अशा तडजोडीला म. गांधी राजी झाले, आणि ह्या उपाध्यायाच्या तडजोडीमुळें

म. गांधी, दे. बं दास, व पं. मोतीलाल नेहरू ह्या त्रिमूर्तींची एकी झाली. बंगालच्या दडपशाहीला उत्तर देतां यावें म्हणून कापडावरील बहिष्काराचें शस्त्र जाज्वल्य करण्याकरितां सर्व अडचणींचा व तडजोडींचा विचार करून त्रिमूर्तींनीं आपल्या जाहीरनाम्यांत नवा खादीचा अवतार लोकांपुढें ठेवला आहे. ह्या अवताराची पूजा–अर्चा व भक्ति बहुजन समाजानें अंतःकरण-पूर्वक केली असतां हा नवा अवतार नवसास पावून दडपशाहीच्या संकटांतून सर्वांना सोडवून स्वराज्याचें फळ राष्ट्राच्या पदरांत टाकल्यावांचून राहणार नाहीं. बेळगांवच्या काँग्रेसच्या वेळचीं सर्व भांडणें त्रिमूर्तींच्या जाहीरनाम्यानें नाहीशीं केलीं अहित. सर्वांची एकी उत्तमप्रकारें झाली आहे. कौन्सिलमध्यें व इतर ठिकाणीं काँग्रेसचा स्वतंत्र घटकावयव ह्या नात्यानें आपलें कामकाज करण्यास व फंड उभारण्यास स्वराज्य पक्षास ह्या जाहीरनाम्यानें पूर्ण मुभा दिली असून, काँग्रेसच्या संस्थांनीं तन-मन-धन अर्पण करून खादीचा अवतार सफल करण्याचे अनुष्ठान चालविलें असतांना स्वराज्य पक्षास मनोभावें मदत करण्यास कोणतीच अडचण उरलेली नाहीं. प्रत्येक संप्रदायाचा स्वतंत्रपणा कायम राखून काँग्रेसमध्यें सर्वांची एकी करून खादीचा अवतार यशस्वी करणारा मार्ग त्रिमूर्तींच्या जाहीरनाम्यानें आंखलेला आहे. तत्त्वांचा गलबला मिटला असल्यामुळें स्वार्थत्यागपूर्वक जोरानें खादीच्या कामास लागण्याची वेळ आलेली आहे. खादीचा अवतार जर यशस्वी झाला तर एकट्या बंगाल्यांत दरमहा दोन कोटींचा नवा व्यवहार सुरू होणार आहे, हें आचार्य रॉय ह्यांनीं सिद्ध केलेलें आहे. सर्व हिंदुस्थानभर दरमहा पांच-दहा कोटींचा नवा व्यवहार सुरू करण्याची ज्या अवताराची शक्ति, त्या अवतारार्चे कार्य व्यवस्थित रीतीनें पार पाडण्यास प्रत्येक तालुक्यांत व जिल्ह्यांत किती तरी चोवीस तास राबणाऱ्या खादीच्या सेवकांची जरुरी आहे. राष्ट्रीय सभेच्या संस्थांनीं हे सेवक कसे नेमावयाचे, सेवकांच्या संसाराची सोय कशी

लावावयाची व खादीचें कार्य व्यवस्थितपणें रोजच्या रोज लोकांकडून कसें पार पाडून घ्यावयाचें ह्या संबंधाची मोठी योजना तयार करण्यांत म. गांधी सांप्रत गुंतले असून, बेळगांवच्या काँग्रेसपर्यंत परदेशी कापडावरील बहिष्काराचा निश्चय अंमलांत येऊन सर्व राष्ट्राला व्यापणाऱ्या राष्ट्रसेवकांच्या नव्या जाळ्याची व्यवस्था म. गांधी, दे. बं. दास व पं. मोतीलाल नेहरू ह्या त्रिमूर्तींना जोरानें सुरू करतां येईल, असा अंदाज आहे. ही सेवकांची व्यवस्था सुरू झाल्यावर वर्ष दोन वर्षांच्या अवधींत खादीच्या अवताराचें दृश्य फळ लोकांच्या संसारांत प्रत्यक्षपणें दृष्टीस पडल्यावांचून राहणार नाहीं. बंगालच्या दडपशाहीनें त्रिमूर्तींच्या खादीच्या अवताराचें स्वरूप लोकांपुढें ठेवून बेळगांवाच्या काँग्रेसमधील सर्व तंटेबखेडे टाळल्याबद्दल व बहिष्काराचें शस्त्र जाज्वल्य करण्याचा खरा मार्ग लोकांना दाखविल्याबद्दल दडपशाहीचें अभिनंदन जेवढें करावें तेवढें थोडेंच होणार आहे !

---

* वेडयाचा चरखा

"कांहीं लोक म. गांधी यांना वेडा समजतात. या वेडयाचा चरखा वेळगांवच्या काँग्रेसनें आपल्या शिरावर कसा धारण केला ह्या संबंधाचें आश्चर्य सदर धूर्तांना वाटत आहे. वेळगांवास काँग्रेसच्या मंडपांत चौदा-पंधरा हजार स्त्री पुरुष हजर होते, शिवाय विजयनगरची काँग्रेसची यात्रा एक लाख लोकांनीं तरी केली असावी असा अंदाज आहे. एवढया मोठया समुदायाला चरख्यांतील वेडेपणा कसा दिसला नाहीं, ह्याबद्दल सांप्रत टीका होत आहे. लाख-दीड लाख लोकांच्या डोळ्यावर भुरळ पाडण्याची जादू म. गांधी ह्यांच्या अंगीं कोणती आहे, ह्याबद्दल वादविवाद धूर्तानीं सुरू केला आहे. म. गांधी वेडा आहे म्हणजे काय? ह्या वेडयांत व टीका करणाऱ्या धूर्तांत फरक कोणता आहे? बुद्धिमत्तेच्या दृष्टीनें विचार केला तर म. गांधी ह्यांचे लेख टीका करणाऱ्या धूर्तांच्या लेखांहून अधिक विद्वत्तेचे असतात, असेंच म्हणणें भाग येतें. विद्वत्तेच्या दृष्टीनें टीका करणारे धूर्त फार कमी प्रतीचे आहेत. म. गांधी विद्वान आहे, तर मग वेडा कसा? विद्वत्तेचेंच वेड ह्याला लागलें आहे, असें ह्या धूर्तांचें म्हणणें आहे. विद्वत्ता एकांगी होऊं शकते, आणि एकाच गोष्टीचा नाद लागला असतां इतर व्यवहाराची व विद्वत्तेची फारकत होते. व्यवहाराचा व म. गांधी ह्यांच्या विद्वत्तेचा कांहीं संबंध नाहीं, असें ह्या धूर्तांचें म्हणणें आहे. जसजसें विद्वत्तेचें शिखर गगनचुंबी होऊं लागतें तसतशी विद्वत्तेची दृष्टी आकाशांतील ढगांवर खिळून राहून जगांतील व्यवहार अत्यंत श्रेष्ठ विद्वानालाहि समजेनासे होतात, असा धूर्तांचा ठाम सिद्धांत आहे. म. गांधी

---

* नवाकाळ, ता. ४ जानेवारी १९२५

विद्वान आहेत ह्या कलमाची अशी बिल्ल्हेवाट लावल्यानंतर म. गांधी अत्यंत स्वार्थत्यागी आहेत, ह्या सद्गुणालाहि हे धूर्त फारशी किंमत देत नाहींत. विद्वान असून स्वार्थत्यागी झाल्यानंतर खादीच्या एका पंचावर जर म. गांधी दिवस कंठीत असले तर ते मोक्षाच्या मार्गाला अधिक लागले आहेत आणि व्यवहाराशीं त्यांचा संबंध तुटला आहे असें समजा, म्हणून हे धूर्त लोकांना सांगत आहेत. मोक्षाच्या मार्गाला लागलेला साधुपुरुष ह्या नात्यानें महात्माजींची किंमत मोठी असेल, पण लोकांच्या रोजच्या संसाराच्या गरिबीचा बिचार करतांना ह्या वेड्याच्या चरख्याचा काय उपयोग होणार, म्हणून सवाल हे धूर्त करीत आहेत. जितकी अधिक विद्वान तितका व्यवहारांत अधिक निरुपयोगी, जितका अधिक स्वार्थत्यागी तितका व्यवहारांत अधिक कुचकामाचा, अशी ह्या धूर्तांची विचारसरणी आहे. कांही छक्केपंजे पाहिजेत, थोडीं लबाडी पाहिजे, आपमतलबहि साधला पाहिजे, एरव्हीं राजकारणांतला लोकसंग्रह कसला होणार ? व्यवहारांतील लोकसंग्रहाला व्यवहारांतीलच धूर्त, वस्ताद व अंशतः लबाड असलेलीं माणसें पुढारी पाहिजेत, एरव्हीं व्यवहारांत यश यावयाचें नाहीं, अशा तऱ्हेचा ह्या धूर्तांचा संप्रदाय आहे. ह्या संप्रदायाच्या विचारसरणीला वेळगांवच्या काँग्रेसनें खोटें ठरविलें आहे. वेड्याचा चरखा लाख दीड लाख लोकांनीं जाणून बुजून, समजून उमजून, वेळगांवच्या यात्रेचे हाल सोसून स्वतःच्या शिरावर धारण केला आहे. हे लाख दीड लाख लोक आकाशांतील ढगांत संचार करणारे नाहींत; विद्वत्तेचे उपासक नाहींत; संसारांतील सुखःदुखें रोजच्या रोज उपभोगणारे हे सर्व लाख दीड लाख आहेत. महात्माजी एकटा वेडा असेल, पण हे दीड लाख लोक वेडे कसे झाले ? महात्माजींच्या चरख्याला पूज्य मानण्याइतके तरी वेड इतक्या संसारी व व्यवहारी लोकांना कसें लागलें ? गतानुगतिक लोक आहेत असें म्हणावें, तर महात्माजींच्या मतांशीं गेलीं दोन वर्षें झगडा करीत

असलेले स्वराज्य पक्षाचे प्रतिनिधि बेळगांवच्या काँग्रेसमध्यें भरपूर हजर होते. ह्याहि पक्षाच्या डोळ्याला चरख्याची भुरळ कशी पडली? आमचा तितकासा भरंवसा खादीवर नाहीं पण महात्माजींच्या म्हणण्याप्रमाणें वागण्यास आपण तयार आहोंत, अशी कबुली सब्जेक्टस् कमिटीमध्यें आणि भर काँग्रेसमध्यें स्वराज्य पक्षाच्या कित्येक पुढाऱ्यांनी एकामागून एकसारखे उठून कशी दिली? महात्माजींना सोडून आपलें कांहीं दिवस भागावयाचें नाहीं, असें स्वराज्य पक्षास वाटत असल्यामुळें स्वराज्य पक्षानें कशीबशी कबुली दिली, आणि स्वराज्य पक्ष व महात्माजींचा पक्ष एक होण्याबरोबर लाख दीड लाख लोकांना एकदम आनंद होऊन त्यांनीं उत्साहानें चरख्याला नमस्कार केला, अशी बेळगांवच्या चमत्काराची मीमांसा धूर्तांनीं केली आहे. म. गांधीशिवाय आपलें कांहीं दिवस भागावयाचें नाहीं असें स्वराज्य पक्षाला तरी कां वाटावें? कौन्सिलांतील स्वराज्य पक्षाचें कोणतें काम महात्माजींवर आज अवलंबून आहे? कौन्सिलवर माझा विश्वास नाहीं, असें महात्माजी स्पष्टपणें बेळगांवासहि म्हणत असतांना महात्माजींना चिकटून राहण्याचें कारण काय? दोनहि पक्ष एक झाले आणि दोनहि पक्षांनीं मिळून काँग्रेसच्या ठरावानें चरखा चालविण्यास आम्हांस आज्ञा दिली, ह्याबद्दल बेळगांवास जमलेल्या लाख दीड लाख लोकांच्या समाजाला एवढा आनंद कां वाटावा? देव प्रसन्न झाला आणि त्यानें चरखा चालीव सांगितलें, ह्यांत संसारी मनुष्यांना उत्साहाची आणि आनंदाची गोष्ट कोणती आहे? धूर्तांच्या दृष्टीनें विचार केला असतां असला हा देव तरी कसला, आणि ह्या देवानें प्रसन्न होऊन चरख्याचा वर तरी देऊन काय उपयोग, असे उद्गार बेळगांवास जमलेल्या लाख दीड लाख लोकांच्या तोंडून निघावयास पाहिजे होते; पण तसे उद्गार निघाले नाहींत. बरें झालें, चरख्यासंबंधानें एकी झाली हें

चांगलें झालें, असेच उत्साहाचे उद्‌गार लोकांच्या तोंडून निघाले. बरें झालें, असे उद्‌गार साहजिक रीत्या तोंडून निघण्याइतका लोकांचा संसार कोठें नडला,आहे ? आज व्यवहाराला चरख्याची तावडतोब जरुरी कोणती आहे ? मग लोकांनीं उगाच बरें झालें म्हणून कां म्हणावें ? महात्माजींना चिकटून राहणें भाग पडण्याइतकें स्वराज्य पक्षाचें आज कांहींच नडलेलें नाहीं ! महात्माजींच्या विरोधालाहि न जुमानतां कौन्सिलचें कामकाज आपल्या दृष्टीनें चालविण्यास स्वराज्य पक्ष आज समर्थ आहे. काँग्रेसची यात्रा करण्याकरितां वेळगांवास जमलेल्या लाख दीड लाख यात्रेकरूंचा रोजचा संसार आज म. गांधी ह्यांच्या उपदेशावर बिलकूल अवलंबून नाहीं, जो तो आपापला संसार चालविण्यास पूर्णपणें समर्थ आहे. ह्या कामीं महात्माजींची मदत कोणास नको आहे; नेहरूंचा पुढारीपणा कोणास नको आहे. ह्या स्वतंत्र लोकांना व्यवहारांत महात्माजींची काडीचीहि अपेक्षा नसतांना, बरें झालें, सर्वांनीं चरखा चालवावा म्हणून काँग्रेसनें ठराव पास केला, बरें झालें, असें कां वाटावें ? असें वाटलें ही गोष्टी खरी आहे आणि धूर्तांच्या विचारसरणीच्या कसाला लावून पाहिलें असतां असें वाटण्याचा उलगडा नीट होत नाहीं. विद्वेत्तेच्या व स्वार्थत्यागाच्या नादीं लागून जें व्यक्त वेड खुद्द महात्माजींना लागलें आहे, तेंच वेड अस्पष्टपणें व अव्यक्तपणें स्वराज्य पक्षाला व वेळगांवास जमलेल्या राजकीय कलाच्या लाख दीड लाख संसारी लोकांना लागलेलें असल्याशिवाय म. गांधीच्च केवळ नव्हे तर स्वराज्य पक्षाच्या पुढाऱ्यांसकट सर्व संसारी लोक एका माळेंतील मण्याप्रमाणें कसे दृष्टीस पडले असते ? गेल्या पांच सहा वर्षांचा राष्ट्रीय सभेचा इतिहास जर नीट रीतीनें पाहिला तर हिंदी राजकीय चळवळीच्या हातीं कांहीं तरी स्वतंत्र सँक्शन उर्फ हत्यार असलें पाहिजे, असें वेड लोकांच्या मनाला पक्कें लागलें आहे: ह्याबद्दल शंका राहात नाहीं हें

वेड जर नसतें तर कलकत्त्याची असहकारितेची काँग्रेस, नागपूरची काँग्रेस, अहमदाबादचीं काँग्रेस, गयेची काँग्रेस, कोकोनाडाची काँग्रेस आणि कालची वेळगांवची काँग्रेस येथें संसारी लोकांतील लाखों राजकीय यात्रेकरू कधींच दृष्टीस पडले नसते. हें वेड जर नसतें तर राजेरजवाड्यांहून अधिक थाटाच्या ऐषआरामांत पडलेले पं. मोतीलाल नेहरू आपली वकिली सोडून देऊन खादीचा पोषाख वापरण्यास कधीच तयार झाले नसते. हें वेड जर नसतें तर ३०–४० हजार रुपये दरमहा प्राप्तीचा आपला धंदा सोडून दे. बं. दास फकीर बनले नसते. हें वेड जर नसतें, तर हजारो सुखवस्तूंच्या डोक्यांवर आज दिसत असलेली खादीची टोपी बिलकूल दिसली नसती. हें वेड जर नसतें तर बेळगांवच्या विजयनगरकरितां हमालाप्रमाणें राबणारे दीड दोन हजार स्वयंसेवकांचें सैन्य बेळगांवास जमाच झालें नसतें. हें वेड जर नसतें तर गंगाधररावांच्या तट्ट्याच्या झोपड्या पहाण्याकरितां दीड लाख यात्रेकरू बेळगांवास न जमतां, लखनौला डॉ. परांजपे यांचें भाषण ऐकून लखनौच्या नवाबांनीं क्रोडो रुपये खर्च करून उभारलेल्या टोलेजंग इमारती पहाण्याला लोक धांवले असते. म. गांधी एकटा वेडा आहे असें म्हणण्यांत अर्थ काय ? सँक्शन उर्फ हत्यार हातीं कसें येईल, ह्याची तळमळ दे. बं. दास ह्यांच्या अंतःकरणाला आज एकसारखी लागून राहिलेली आहे आणि राजकीय दृष्ट्या काँग्रेसकडे पहाणारा बहुजनसमाज कोणत्या हत्याराचा मार्ग सर्व पुढारी मिळून कायम ठरवितात हे समजून घेण्याच्या वेडानें व्यापलेला आहे. सर्वांच्या अंतःकरणाची प्रवृत्ति एकच आहे ! कांही तरी हत्यार किंवा सँक्शन आहे काय म्हणून हिंदी राष्ट्राचा अंतरात्मा आंतून ओरडून विचारीत आहे. हा शब्द म. गांधी ह्यांच्या ठिकाणीं प्रत्यक्षपणें व्यक्त होत असून स्वराज्य पक्षांत अर्धवट व्यक्त होत आहे; आणि बहुजनसमाजाच्या प्रत्यक्ष जरी हा शब्द एकं येत नसला तरी अंतःकरणाच्या

तळमळीची कमी जास्त प्रमाणानें जाणीव आहे. पुढाऱ्यांना व लोकांना सँक्शन उर्फ हत्यार आज पाहिजे आहे. ही अंतरात्म्याला भासत असणारी जरुरी आहे. हिंदी राजकारणांत ही आत्म्याची तळमळ ज्यांना भासत देखील नाहीं त्यांची गणना आज धूर्तांमध्यें होत आहे. सँक्शन उर्फ हत्यार पाहिजे म्हणून बुद्धीच्या ज्या भागाला जाणीव होऊं शकते तेवढ्यापुरतें बुद्धीचें इंद्रियच ह्या धूर्तांना नसल्यामुळें सज्ञान झालेल्या लोकांचें वर्तन त्यांना वेडेपणाचें वाटत आहे. बेळगांवच्या काँग्रेसनें पास केलेला चरख्याचा ठराव जर सर्व देशभक्तांनी ताबडतोब अंमलांत आणला तर सत्संगतीचा फायदा त्या धूर्तांना मिळून पुढील बारा महिन्यांत धूर्तांचा वर्ग निराळा राहूं शकणार नाहीं, हें सांगणें नकोच.

---

* एका घमेंडखोराचा मृत्यु

वंगभंगाच्या वेळचे हिंदुस्थानचे प्रसिद्ध व्हॉइसरॉय लॉर्ड कर्झन हे गेले शुक्रवारीं (ता. २० मार्च १९२५ रोजीं) वारले असून त्यांच्या मृत्यूनें इंग्लंडच्या कॉंझर्व्हेटिव्ह पक्षांतील एक कर्ता पण अत्यंत घमेंडखोर मुत्सद्दी नाहींसा झाला आहे. हिंदुस्थानचे लाटसाहेब होण्यापूर्वी अभ्यासी, मेहनती, व विद्वान म्हणून लॉर्ड कर्झन ह्यांची ख्याति होती. एशियाटिक सर्व राष्ट्रांवर प्रभुत्व गाजविण्यास जर कोणी लायक असतील तर ते इंग्रजच होत, असें आपलें ठाम मत लॉर्ड कर्झन ह्यांनीं इराण, अफगाणिस्थानची सरहद्द, पामीर, हिंदुस्थानची सरहद्द, व चीन येथील प्रवासांसंबंधाच्या पुस्तकांतून १८९८ सालापूर्वी १२ वर्षें एकसारखें प्रतिपादन केलेलें होतें. डौलदार व शास्त्रीय पद्धतीची भाषा, भरपूर माहिती, आणि इंग्रजांच्या कर्तृत्वाबद्दल घमेंड, ह्याबद्दल लॉर्ड कर्झन ह्यांच्या पुस्तकांची ख्याती झाल्यानंतर कॉंझर्व्हेटिव्ह पक्षाचे त्यावेळचे म्होरके लॉर्ड सॅलिबसरी ह्यांनीं आपल्या १८९५ सालच्या मंत्रिमंडळांत लॉर्ड कर्झन ह्यांना परराष्ट्रीय खात्याचे अंडर सेक्रेटरी नेमलें, आणि स्वतः लॉर्ड सॅलिसबरी हे परराष्ट्रीय मंत्री जरी होते तरी लॉर्डांच्या सभेंत त्यांना बसावें लागत असल्यामुळें पार्लमेंट सभेंतील वादविवादाचा बोजा लॉर्ड कर्झन यांजवरच येऊन पडला. लॉर्ड सॅलिसबरी व लॉर्ड कर्झन ह्यांचीं मतें तंतोतंत जुळत असल्यामुळें लॉर्ड कर्झन ह्यांचें तीन वर्षांचें काम पाहून, १८९८ सालच्या अखेरीस लॉर्ड कर्झन ह्यांची नेमणूक हिंदुस्थानच्या लाटसाहेबांच्या जागीं लॉर्ड सॅलिसबरी ह्यांनीं केली. लॉर्ड सॅलिसबरी ह्यांच्या मतें फ्रान्स, इटली, स्पेन, रशिया वगैरे

---

* नवाकाळ, ता. २२ मार्च १९२५

लॅटिन संस्कृतीचीं समजलीं गेलेलीं युरोपांतील राष्ट्रें आपलें डोकें वर काढण्यास नालायक ठरलीं होतीं. फ्रान्स, इटली, स्पेन हीं राष्ट्रें नालायक, रशिया आवाढव्य पण कर्तृत्वहीन, आणि जगावर राज्य करण्याची खरी लायकी अँग्लो-सॅक्सन लोकांमध्यें म्हणजे जर्मनी, इंग्लंड व अमेरिका एवढ्या तीनच राष्ट्रांत, असा लॉर्ड सॅलिसबरी ह्यांचा सिद्धांत होता. इतरांना कुचकामाचें समजण्याच्या पद्धतीमुळें इंग्लंड सर्वांत श्रेष्ठ असें जरी समजण्यांत येत होतें तरी जर्मनी त्यावेळीं वर डोकें काढूं लागला होता; पण आमच्या तालमींतला पठ्ठया असें इंग्लंड जर्मनीला समजत असे. इंग्लंडला येऊन जाऊन काय ती भीति रशियाच्या आवाढव्य स्वरूपाची, असें त्या वेळीं मानण्यांत येत असे. रशियाची सैबेरियन आगगाडी तयार होऊन चीनच्या मँच्युरिया प्रांताला रशिया गांठणार आणि अफगाणिस्थान व इराण ह्या दोन्ही मुसलमानी देशांना खाऊन टाकणार, अशी भीति इंग्रजी मुत्सद्यांना त्यावेळीं वाटत असे. ह्या भीतीचें निराकरण करण्याकरितां लॉर्ड सॅलिसबरी ह्यांनीं जपानशीं गट्टी केली आणि इराण; अफगाणिस्थान, पामीर वगैरे ठिकाणीं प्रवास करून हुषार ठरलेल्या व विद्वान म्हणून नांवाजलेल्या लॉर्ड कर्झनसाहेबांना हिंदुस्थानच्या बंदोबस्ताकरितां १८९८ सालीं पाठविलें. रशियाचें धूड उत्तरेकडून खाली उतरून इराणच्या मार्फत अरबी समुद्रांत येऊन पडलें तर जें युद्ध उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंत एकसारखें दुमदुमत राहील तें युद्ध सुरूं केल्यावांचून इंग्लंड राहणार नाहीं, (A war that will ring from pole & pole) अशा प्रकारची धमकी इराण आखातासंबंधानें लिहितांना लॉर्ड कर्झन ह्यांनीं त्यावेळी दिली होती. अफगाणिस्थाला खूष ठेवावयाचें, सरहद्दीवरील पठाणांना लांचलुचपत देऊन आपल्या सैन्यांत त्यांची भरती करावयाची; आणि रशिया मुसलमानांना खाऊन टाकणार असल्यामुळें इंग्रजांच्या बाजूचें राहून मुसलमानांनीं आपलें

कल्याण करून घेतलें पाहिजे अशी मुसलमानांची समजूत करून हिंदूपेक्षां मुसलमानांवर राजाश्रयाच्या वांटणीच्या वेळीं विशेष मेहेरबानी दाखवावयाची, हें लॉर्ड कर्झन ह्यांच्या कारकीर्दीचें हिंदुस्थानांत मुख्य धोरण होतें. नोकरशाहीचा अधिकार निष्कंटक ठेवण्यास लॉर्ड कर्झन केव्हांहि विरुद्ध नव्हते, पण नोकरशाहीपैकीं प्रत्येक इसमानें आपापल्या कामांत दक्ष, तत्पर व मेहनती असलें पाहिजे, अशा करडया नजरेनें लॉर्ड कर्झन यांनीं नोकरशाहीचा गाडा हिंदुस्थानांत चालविला होता. लॉर्ड कर्झन ह्यांच्या कारकीर्दींत नोकरशाहीचा अजागळपणा बराच कमी झाला हें खरें आहे; पण मुसलमानांना आवडत्या वायकोप्रमाणें विशेष मेहरबानी दाखवून वागविण्याची पद्धत लॉर्ड कर्झन ह्यांनी बंगभंगाच्या वेळीं हिंदुस्थानच्या राजकारणांत सुरू केली ! आपण हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीचा बंदोबस्त केला, रूसो-जपानी युद्धांत रशियाचा पराभव झाल्यानंतर रशियानें इराणच्या किंवा अफगाणिस्थानच्या बाजूस बघूं देखील नये इतकी मुसलमानांची मनोवृत्ति इंग्रजांकडे ओढून घेतली, बंगभंग करून हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या चळवळीला चिरडून टाकलें, आणि नोकरशाहीचीं सर्व भांडीं घासून पुसून लखलखीत करून नोकरशाहीला लायक (Efficient) बनविल्यामुळें हिंदुस्थानासंबंधानें आतां धास्ती उरली नाहीं, अशी घमेंड मारण्यास लॉर्ड कर्झन यांनीं आपली पांच सात वर्षांची कारकीर्द संपल्यानंतर बिलकूल कमी केलें नाहीं ! लॉर्ड कर्झन हे मेहनती व विद्वान जसे होते तसे अत्यंत घमेंडखोरहि होते. आपल्या विद्वत्तेच्या व तत्परतेच्या घमेंडीवर लॉर्ड कर्झन इतरांना तुच्छ मानतात आणि विद्वान कर्मठ शास्त्र्याचा टेंभा मिरवितात, अशा तऱ्हेची टीका लंडन टाइम्सनें देखील लॉर्ड कर्झन यांजवर दोन तीन वेळां केलेली आहे. परराष्ट्रीय कचेरींतील घमेंडखोर पंडित अशा नांवानें संबोधून लॉर्ड कर्झन ह्यांची कित्येक वेळां अवहेलना करण्यांत येत असे; पण

लॉड कर्झन ह्यांनीं आपली घमेंड अखेरपर्यंत सोडली नाहीं. पण दैवानें मात्र ह्या घमेंडीचा नखरा उतरविण्यास कसूर केली नाहीं! लॉर्ड कर्झन चीन व जपान ह्यांना तुच्छ मानीत असत, आणि जपाननें रशियावर मिळविलेल्या विजयाचा परिणाम एशिया खंडावर कांहीं होणार नाहीं, अशी त्यांची अटकळ होती. बंगभंगाच्या वेळींच ही अटकळ खोटी ठरली. जपानच्या विजयामुळें नवीन राष्ट्रीय वारे हिंदुस्थानांत शिरलें, आणि बहिष्काराची चळवळ इतक्या जोरानें सुरू झाली कीं, वज्रलेप (Settled fact) म्हणून ठरलेला बंगभंग इंग्रजी मुत्सद्यांना रद्द करावा लागला! लॉर्ड सॅलिसबरी ह्यांनीं ज्या धोरणानें परराष्ट्रीय कारस्थान आखलें होतें तें धोरण १९०८ सालानंतर जर्मनीच्या वाढत्या शक्तीमुळें एकदम बदलून गेलें. रशियाच्या धुडाला शत्रु मानण्याचे ऐवजीं जर्मनीच्या आरमाराला शत्रु मानणें इंग्रज मुत्सद्यांना भाग पडलें; आणि सातवे एडवर्ड बादशहा यांनीं प्रथम फ्रान्सशीं मैत्री संपादन केल्यावर फ्रान्समार्फतची इंग्लंड, फ्रान्स व रशिया ह्यांची गट्टी एका बाजूला, आणि जर्मनी, आस्ट्रिया व इटली ह्यांची गट्टी दुसऱ्या बाजूला, असे दोन तट १९०८ सालानंतर युरोप खंडाच्या कारस्थानांत स्पष्टपणें दिसूं लागले. हे नवे दोन तट होण्याबरोबर लॉर्ड सॅलिसबरी ह्यांच्या तालमींत तयार झालेल्या लॉर्ड कर्झन ह्यांच्या धोरणाला कवडीचीहि किंमत शिल्लक राहिली नाहीं. हिंदुस्थानांत बंगभंग रद्द झाला; आवडत्या बायकोचे—मुसलमानांचे-चोचले नाहींसे झाले; आणि लॉर्ड मोर्ले ह्यांना स्वराज्याच्या चांदोबाकडे कशाला लक्ष देतां असें म्हणत म्हणत निवडणुकीचे हक्क हिंदुस्थानांस देणें इष्ट वाटलें! रशियाविरुद्ध तयारी करण्याचा काळ लॉर्ड कर्झन ह्यांच्या लाटसाहेबांच्या कारकीर्दीच्या वेळचा होता; पण १९१० सालानंतर जर्मनी-विरुद्ध तयारी करण्याचा काळ सुरू झाला. महायुद्धाची अशी तयारी चालली

असतांना लॉर्ड कर्झन इंग्लंडांत मावळल्यासारखेच वसले होते ! महायुद्ध सुरू होऊन सर्व पक्षांचें मंत्रिमंडळ स्थापण्यांत आल्यानंतर कोनाकोपऱ्यांत पडलेल्या लॉर्ड कर्झन ह्यांना मंत्रिमंडळांत प्रथम दुय्यम दर्जाची जागा देण्यांत आली; आणि महायुद्धाच्या अखेरीस बोल्शेव्हिकांचा नवा रशिया इंग्लंडच्या शत्रुस्थानीं शिल्लक राहिल्यामुळें, लॉर्ड सॅलिसबरी ह्यांनीं रशियाच्या विरुद्ध स्थापलेल्या तालमींत कसरत करण्यास पटाईत बनलेले लॉर्ड कर्झन ह्यांना माजी मुख्य मंत्री मि. लॉईड जार्ज ह्यांनीं इंग्लंडचे परराष्ट्रीय प्रधान नेमलें. लॉर्ड कर्झन व मि. चर्चिल ह्या दोन मुत्सद्यांनीं मिळून महायुद्धाच्या अखेरीस बुखारा, समरकंद, अफगाणिस्थान, इराण आणि सर्व टर्की हा टापू इंग्रजी पांघरुणाखालीं आणण्याचा प्रयत्न केला; पण ह्या फाजील घमेंडीच्या उद्योगांत लॉर्ड कर्झन ह्यांना एकसारख्या थपडाच खाव्या लागल्या ! रशियांतील बोल्शेव्हिक आपला पराभव करून घेईनात; टर्कीमध्यें गाझी केमालपाशा ह्यांच्या तलवारीपुढें लॉर्ड कर्झन ह्यांचें कांहीं चालेना; आणि इराणच्या शहाला दोन कोट रुपये चैनीकरितां दिले तरी लांचलुचपतीचें वस्तान इराणांत कांहीं केल्या बसेना; अफगाणिस्थाननें तर लढाई पुकारून आपलें स्वातंत्र्य लॉर्ड कर्झन परराष्ट्रीय मंत्री असतांनाच स्थापून घेतलें; अशी आपल्या धोरणाची दैना झालेली पहाणें लॉर्ड कर्झन ह्यांच्या नशिबीं शेवटीं शेवटीं आलें ! टर्कीच्या लासेनच्या तहाच्या वेळीं लॉर्ड कर्झन ह्यांनीं क्रोधाचा अविर्भाव आणून टर्कीच्या वकिलांना वळविण्याचा प्रयत्न आपणाकडून बराच केला; पण ह्या घमेंडखोरांत आतां शक्ति उरलेली नाहीं, हें पुरतें ओळखून टर्कीनें अखेरीस लॉर्ड कर्झन ह्यांना नमतें घेणें भाग पाडलें ! चीन व जपान ह्यांच्यांत प्राण नाहीं म्हणून पंचवीस तीस वर्षांपूर्वी द्वाही फिरविणाऱ्या लॉर्ड कर्झनना, मरावयाच्याअगोदर जर्मनीच्या ऐवजीं आतां जपानच्या आरमाराची भीति इंग्लंडला एशिया खंडांत आहे, असें

कबूल करावें लागलें. मोरोक्कोमधील मुसलमान स्वतंत्र झाले; टर्कीचे मुसलमान युरोप खंडाची युद्धकला इतरांस शिकविण्यास लायक झाले; इराणांत दुसरा केमालपाशा उत्पन्न होऊन इराणचें भय इंग्लंडला अधिक वाटलें; अफगाणिस्थानानें रशिया, जर्मनी व फ्रान्स ह्या देशांशीं संधान बांधलें आणि रशिया, चीन व जपान ह्यांची गट्टी होऊन हिंदुस्थानच्या जमिनीच्या सरहद्दीवरच नव्हे तर समुद्रावरहि १९०८ सालापूर्वीहून अधिक भय उभें राहिलें, असें डोळ्यांनीं पाहिल्यानंतर लॉर्ड कर्झन आज गेले आहेत ! लॉर्ड सॅलिसबरी ह्यांच्या तालमींतील अँग्लो–सॅक्सनांची बढाई देखील आतां शिल्लक राहिलेली नाहीं. फ्रान्स, इटली वगैरे लहान राष्ट्रें जर्मनीच्या पराक्रमाचा पराभव झाल्यानंतर, इंग्लंडांतहि पराक्रमाचा दम उरला नाहीं असें समजून, भूमध्य समुद्रांत आमच्या आर्जवानें वागा, असें इंग्लंडलाच बजावीत आहेत. लॉर्ड सॅलिसबरी ह्यांच्या परराष्ट्रीय धोरणांतील बत्तीस घमेंडीची मूर्ति म्हणून समजले गेलेले लार्ड कर्झन त्या धोरणाची आज पक्की वाताहत झाल्यानंतर मृत्यु पावले आहेत. धोरण लयास गेलें, घमेंडीची मूर्तीहि नष्ट झाली; पण हिंदु–मुसलमानांत दुही पाडण्याची कृति तेवढी आज नोकरशाहीकडून सजीव करण्यांत आली आहे ! मूळ धोरणाची वाताहात झाल्यानंतर त्या धोरणाला अनुसरून योजलेला सामान्य तोडगा किती दिवस उपयोगी पडणार ? ह्या जुन्या तोडग्यांत आतां कांहीं अर्थ नाहीं, अशी स्पष्ट इशारत लॉर्ड कर्झन ह्यांचा मृत्यु हिंदुस्थानच्या नोकरशाहीला देत नाहीं काय ?

* नीतिभ्रष्ट आणि निर्लज्ज

इंग्लंडची समाजव्यवस्था अत्यंत विस्कळित झाली असून समाजाची नीतिबंधनें तुटत चाललीं आहेत आणि पैशापुढें सामाजिक व कौटुंबिक नीतीची किंमत उरली नाहीं, असे सिद्ध करणारे नीतिभ्रष्टतेचे खटले इंग्लंडांत गेले आठ दहा महिने एकसारखे कोर्टापुढे येत आहेत ! बाहेरून प्रतिष्ठित व बडया घराण्यांतील संभावित बायकोचा आव आणून नवऱ्याच्या संमतीनें व मदतीनें वेश्यावृत्तीनें राहणाऱ्या एका बाईच्या नादीं लागून काश्मीरच्या युवराजांनीं कोट अर्धाकोट रुपयांवर कसें पाणी सोडलें, ह्यासंबंधीच्या खटल्याची हकीगत तीनचार महिन्यांपूर्वी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालीच आहे. हा खटला संपतो न संपतो तोंच मिसेस डेनीस्टौन हिच्या खटल्याला इंग्लंडांत प्रारंभ झाला आणि गेले दोन महिने ह्या नव्या खटल्यानें इंग्रजी समाजाला हालवून सोडलें. क. डेनीस्टौन ह्यांची देखणी, हुषार व नीतिभ्रष्ट बायको मिसेस डेनीस्टौन हिनें आपल्या नवऱ्याला म्हणजे क. डेनीस्टौन ह्यांना काडी मोडून दिल्यानंतर नवऱ्यावर अब्रूनुकसानीची फिर्याद आणली नाहीं, तर पैशाच्या नुकसानीची भरपाई नवऱ्यानें करून द्यावी म्हणून फिर्याद आणली व लाखों रुपयांची मागणी केली ! महायुद्धांत फ्रान्सच्या रणांगणावर इंग्लंडचे कर्ते सेनापति म्हणून नांवाजलेले ज. सर जॉन कॉवन्स ह्यांजबरोबर नवऱ्याला बढती मिळावी म्हणून नवऱ्याच्या संमतीनें आपण व्यभिचारसंबंध कसा केला, पुढें मोठमोठया लोकांशीं आपला संबंध कसा आला, ह्या व्यभिचाराच्या वेळीं इंग्लंडचे प्रसिद्ध कोटयधीश लॉर्ड कार्नार्व्हन व लेडी कॉर्नार्व्हन ह्यांनीं आपणाला

---

* नवाकाळ, ता. १६ एप्रिल १९२५

मदत कशी केली, लेडी कॉर्नार्व्हन ह्यांचीहि सेनापति सर जॉन कॉवन्स ह्यांच्याशी मैत्री असल्यामुळें लेडी कॉर्नार्व्हन ह्यांनीं पंधरा सोळा लाख रुपये खर्च करून जखमी झालेल्यांच्या शुश्रूषेकरितां इस्पितळ काढलें असतां सदर इस्पितळांत सर जॉन कॉवन्स ह्यांची भेट व्हावी म्हणून नर्सचीं कामें कशीं करण्यांत आलीं, लेडी कॉर्नार्व्हन ह्यांचें व क. डेनीस्टौन ह्यांचें सूत मिसेस डेनीस्टौन ह्यानीं कसें जुळवून दिलें आणि लॉर्ड कॉर्नार्व्हन हे मृत्यु पावल्यानंतर लेडी कॉर्नार्व्हन ह्यांचेबरोर लग्न लावण्यास क. डेनीस्टौन ह्यांना अडथळा राहूं नये म्हणून मिसेस डेनीस्टौन ह्या बाईनें कोर्टांत काडी मोडून कशी दिली, इत्यादि इंग्लंडांतील अत्यंत श्रीमंत, प्रतिष्ठित व अधिकारसंपन्न वर्गांतल्या घाणेरड्या कृत्यांचें पेंव मिसेस डेनीस्टौनच्या खटल्यांत फुटलेलें आहे. नवराबायकोनें मिळून एकमेकांच्या सोयीनें व्यभिचार करावयाचा आणि खूप पैसे मिळवावयाचे, अशी जी हकीकत काश्मीरच्या युवराजांच्या खटल्यांत दृष्टीस पडते तीच हकीकत मिसेस डेनीस्टौन खटल्यांतहि दृष्टीस पडत आहे. ह्या घाणेरड्या कृत्यांचा स्फोट झाल्यामुळें इंग्रजी समाज आंतून फार कुजलेला आहे असें मानण्याचें कारण नाहीं, म्हणून जस्टिस मॅकार्डी ह्यांनीं ह्या खटल्याचा निकाल सांगतांना शेरा मारला आहे. कोणत्याहि देशांत, कोणत्याहि धर्मांत आणि कोणत्याहि समाजांत नीतिभ्रष्टता असावयाचीच. फ्रान्समधील अवाढव्य इंग्रज सैन्याचे प्रख्यात सेनापति सर जॉन कॉवन्स व काश्मीरचे युवराज हे दोघेहि एका माळेचे मणी होत. ह्याबाबींत इंग्लंडनें हिंदुस्थानास हंसण्याचें कारण नाहीं किंवा हिंदुस्थाननें इंग्लंडास नांवें ठेवण्याचें कारण नाहीं. घरोघर मातीच्याच चुली आहेत ! नीतिभ्रष्टता अमक्या समाजाची अधिक किंवा अमक्या समाजाची कमी, असें कोर्टांतील खटल्यावरून म्हणतां यावयाचें नाहीं, हें खरें आहे. पण काश्मीरच्या युवराजांचा खटला किंवा मिसेस

डेनीस्टौन ह्यांचा खटला ह्या दोनहि खटल्यांचें स्वरूप सामान्य नीतिभ्रष्टतेहून निराळें आहे. नवरा–बायकोच्या संमतीनें व्यभिचार करण्याचीं उदाहरणें जगभर सांपडतील, नाहीं असें नाहीं. इंग्लंडांत प्रामुख्यानें पुढें आलेल्या सदर दोन खटल्यांत विशेष हा आहे कीं, सर्वांनीं मिळून चोरी केल्यानंतर चोरीच्या लुटीच्या वेळीं चोर आपापसांत भांडले असून, पैशाची वाटणी आपणाला कमी आली म्हणून निर्लज्जपणानें कोर्टाची पायरी चढण्यास ह्या चोरांना बिलकूल दिक्कत वाटलेली नाहीं ! चोरी करणें हें पाप तर खरेंच; पण चोरी उजेडांत येईल म्हणून पर्वाहि न बाळगणें ही स्थिति अत्यंत भयंकर आहे ! समाजांतील व्यक्तींची स्थिति बिघडली असतां लज्जा नाहींशी होते, पण जनलज्जाहि गुंडाळून ठेवणें म्हणजे सर्व समाज बिघडला आहे असें आपण होऊन जगजाहीर करून असल्या समाजांत वावरण्यास आपणास बिलकूल अडथळा येणार नाहीं, असेंच म्हणण्यासारखें आहे. काश्मीरच्या युवराजांशीं केलेल्या व्यभिचारामुळें सर्व चोरांना लाखो रुपये मिळाले. ह्या चोरांना एवढयावरच संतुष्ट राहण्यास हरकत कोणती होती ? पण लाखो रुपये मिळण्यावर संतुष्ट न राहून नवऱ्यानें नफ्याची वाटणी बरोबर मिळाली नाहीं म्हणून फिर्याद केली ! चोराचोरांमध्येंहि प्रामाणिकपणा असावा लागतो. व्यभिचार करणारांनाहि बंधनें पाळावीं लागतात. पण इंग्लंडांत चोरी व व्यभिचार आज अमर्यादित झालीं आहेत. मनाचा कल व सुख घेणाऱ्या वासनांची वक्रगति इत्यादि कारणांमुळें व्यभिचार व चोरी यांजवर इष्टमित्रांचें पांघरूण पडूं शकतें. पण इंग्लंडांत जे खटले पुढें आले आहेत, त्या खटल्यांत मनाच्या कलालाहि किंवा वक्रगतीच्या हौसेलाहि बिलकूल किंमत नसून श्रीमंती राहणीच्या चैनीपेक्षां इंग्लंडांतील श्रीमंतांना दुसरें तिसरें कांहीं दिसत नाहीं, असा पैशाचा निर्लज्जपणा बाहेर आला आहे ! क. डेनीस्टौन ह्यांनीं मुख्य सेनापति कॉक्रन्स ह्यांजकडे व ऑस्ट्रिया

वगैरे ठिकाणच्या राजपुत्रांकडे आपल्या बायकोची सोय लावून दिली व बायकोनेंहि उलट लेडी कार्नार्व्हन ह्या कोटयधीश सरदार घराण्यांतील बाईशीं आपल्या नवऱ्याचें जुळवून देऊन विवाहबंधनें कोर्टापुढें तोडून टाकण्यांत आलीं. येथपर्यंतचा प्रकार ग्राम्य व्यभिचाराचा असला तरी व्यक्तींच्या दुर्गुणाचे व पापाचे सदराखालीं पडण्यासारखा आहे. समाजाचें रक्त बिघडलें आहे असें त्यावरून अनुमान काढणें धोक्याचें होईल. पण मिसेस डेनीस्टौन ह्यांची फिर्याद वरील प्रकाराच्या पुढच्या पायरीची आहे. व्यभिचार करणारे सेनापति सर जॉन कॉवन्स मरून गेले, इतर पुरुषांनींहि सोडून दिलें, आणि काडी मोडून दिलेला जुना नवरा लेडी कार्नार्व्हन ह्यांच्या पैशावर श्रीमंत राहणीनें रहात आहे असें पाहून लेडी कॉर्नार्व्हन ह्यांजपासून मिळविलेल्या पैशांतील वाटणी मला दे, कारण एकमेकांनीं एकमेकांच्या व्यभिचाराला मदत केली आहे, असा दावा मिसेस डेनीस्टौन ह्यांचा आहे.ह्या खटल्यांत प्राप्तीची अर्धी वाटणी मिसेस डेनीस्टौन ह्यांना मिळाली नाहीं हें योग्यच झालें. पण इतक्या निर्लज्जपणानें व्यभिचाराच्या प्राप्तींतील वाटणी मागण्यास इंग्लंडांतील बडया घराण्यांत प्रतिष्ठितपणानें वावरणाऱ्या बायका पुढें येऊं शकतात, हें समाजाच्या अवनतीचें स्पष्ट लक्षण आहे ! एक वेळ पाप पुरवतें, पण पापाबरोबरचा निर्लज्जपणा राष्ट्रास अधोगतीस नेल्यावांचून कधींहि रहात नाहीं. पश्चात्तापानें पापापासून शुद्धि होते व पापाचें क्षालनहि होऊं शकतें, पण निर्लज्जपणा एकदां माजल्यावर पश्चात्तापास अवसरच राहत नाहीं. इंग्लंड पापी बनलें आहे इतकेंच नव्हे तर निर्लज्ज झालें आहे. आणि हा निर्लज्जपणा, केवळ पैशाची पूजाअर्चा करावयाची अशी समाजाची ठेवण बनल्यामुळें, इंग्लंडांत सर्व प्रकारें अधिकच वाढीस लागला आहे. सामाजिक बाबींत काय, धार्मिक बाबींत काय किंवा राजकीय बाबींत काय, इंग्लंडइतकें निर्लज्ज राष्ट्र दुसरें कोणतेंहि

नाहीं. ईजिप्तसारख्या शहरावर लष्करी जबरदस्ती करतांना किंवा हिंदुस्थानांतील दुर्बलांना सर्टिफिकिटाच्या वरवंट्याखालीं चिरडतांना बड्या मुत्सद्यांच्या सद्सद्विवेकबुद्धींत जो निर्लज्जपणा दृष्टीस पडतो तोच निर्लज्जपणा मिसेस डेनीस्टौन किंवा काश्मीरचे युवराज ह्यांच्या व्यभिचाराच्या खटल्यांत दृष्टीस पडत आहे ! पतितांचा उद्धार करणारा परमेश्वर पाप्यांना सांवरून धरूं शकेल, पण निर्लज्जापुढें परमेश्वराचीहि मात्रा चालणारी नसून, पश्चात्तापाचा मार्ग खुंटून यमदंडाची जरुरी निर्लज्जपणाच्या वेळीं सर्वांच्या मनाला पटल्यावांचून राहत नाहीं. इंग्लंडच्या ह्या निर्लज्जपणापासून अलिप्त राहून इंग्रजी समाजाचें अनुकरण हिंदुस्थाननें सोडून देणें श्रेयस्कर नाहीं काय ?

* मुमताज खटल्याचा निकाल

चार महिने मुंबईंत गाजत असलेल्या मुमताजच्या खटल्याचा निकाल गेले शनिवारीं लागून तिघांना फांशीची व चौघांना जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा झाली. ह्या सातहि आरोपींना दोषी ठरविण्यांत ज्यूरीनें आपलें योग्य कर्तव्यकर्म बजावलें, ह्यांत संशय नाहीं. फाशीची शिक्षा मात्र कठोरपणाची झाली. आरोपीतर्फेच्या तिन्ही बॅरिस्टरांनीं सदय दृष्टीनें शिक्षा देण्याविषयीं केलेल्या विनंतीचा जर अव्हेर झाला नसता, तर अधिक बरें झालें असतें. न्यायमूर्तींनीं ज्यूरीला उद्देशून केलेल्या भाषणांत आरोपी हे नुस्ते हस्तक असून, खरा गुन्हा इंदूरचा आहे, असें सुचविलें आहे. 'इंदूरचे महाराज' असे शब्द वापरण्याच्या ऐवजीं नुस्ता 'इंदूर' हा शब्द न्यायमूर्तींनी वापरला आहे; पण 'इंदूर' ह्या शब्दाचा व्यंग्यार्थ 'इंदूरचे महाराज' असाच करण्यांत येईल, ह्यांत संशय नाहीं. मुमताझच्या खटल्यांत विशेष हा आहे कीं, खुद्द मुमताझच्या साक्षीशिवाय ज्यानें त्यानें इंदूर दरबाराविषयीं व्यंग्यार्थानें बोलून आपलें काम भागवून घेतलें आहे. मलबारहिलवरील खून झाल्यानंतर मुमताजनें जी माहिती पोलिसाला दिली त्या माहितीच्या आधारावर ह्या खटल्याची रचना करण्यांत पोलिसांनीं मोठीशी शिताफी दाखविली अशांतला भाग नाहीं. आरोपी पकडले व साक्षी पुरावा गोळा केला, ह्यांत कोठेंच मोठेंसें कौशल्य दिसत नाहीं. पोलिसाला मदत करण्याचे कामीं मुंबईच्या नागरिकांची कुचराई होती, असेंहि म्हणतां येत नाहीं. तेव्हां आरोपी पकडल्याबद्दल पोलिसांची वाहवा करणें योग्य होणार नाहीं. तथापि इंदूरच्या दरबारला खटल्यांत न खेचतां व्यंग्यार्थानें खटल्याची रचना करण्यांत जें

---

* नवाकाळ, ता. २६ मे १९२५

चातुर्य दाखविण्यांत आलें, तें चातुर्य मात्र विशेष कुशलतेचें आहे, असें म्हणणें भाग पडतें. पोलिस काय, आरोपी काय, प्रॉसिक्यूशनतर्फेचे बॅरिस्टर काय, आरोपींचे बॅरिस्टर काय किंवा न्यायमूर्ति काय, सर्वच इंदूरच्या दरबारभोंवती दुरून प्रदक्षिणा करून प्रत्यक्ष हस्तस्पर्श न होईल इतक्या बेतानें अंतरावरचा नमस्कार घालून मागें परतत आहेत, असा देखावा ह्या खटल्यांत एकसारखा दिसत होता. तारेवर चालण्याप्रमाणें जपून व्यंग्यार्थानें सूचक ध्वनि करावयाचा हें काम अत्यंत नाजूक असून सर्वांनीं ह्या नाजूक कामांत चांगलें प्राविण्य दाखविलें आहे, ही ह्या खटल्यांतील विशेष गोष्ट होय. मुमताज़ला इंदुरास झालेली मुलगी नर्सकडून मारविण्यांत आली म्हणून मुमताजच्या अंतःकरणांत सलत असलेलें शल्य झाकून ठेवण्याकडे मॅजिस्ट्रेटचे कोर्टांत व हायकोर्टांत कोण खटपट करण्यांत आली! पण अखेरीस हें शल्य बाहेर पडलेंच. ह्या खटल्यांतील कायद्याचा भाग एका बाजूस ठेवून समाजस्थितीच्या दृष्टीनें जर ह्या शल्याकडे पाहिलें, तर सर्व खटल्याच्या बुडाशीं हें शल्य आहे, असेंच दिसून येतें. अरेरावीपणानें दुसऱ्याच्या अंतःकरणाला जबरदस्तीने त्रास देण्यालाहि सीमा असते, ही गोष्ट इंदुरांत विसरली गेली. आपल्या मुठींतील बटीक झाली काय किंवा पैशाच्या जोरावर गुलामाप्रमाणें राबलेली रखेली झाली काय, बायकांच्या अंतःकरणांतील मातृपणाच्या आकांक्षा राजसत्तेच्या राजवैभवाच्या शृंखलांनीं बांधल्या जाऊं शकत नाहींत. अंतःकरणांतील नैसर्गिक प्रवृत्तींचा जोर श्रीमंतीच्या किंवा राजसत्तेच्या कृत्रिम भितीना जुमानीत नाहीं आणि एकदां अंतःकरण दुखावलें गेले म्हणजे नंदनवनासारखे ऐषआरामहि विषासारखे कडू लागतात! ह्या स्वयंसिद्ध अंतःकरणाच्या जोराकडे इंदूरनें दुर्लक्ष केलें. मुमताजला पळवून नेण्याचा कट इंदूरच्या सांगण्यावरून करण्यांत आलेला असो, किंवा इंदूर प्रसन्न होईल म्हणून परस्पर करण्यांत आलेला असो, कोणत्याहि हेतूनें हा

कट जरी करण्यांत आला असला तरी अखेर ह्या कटाचें पर्यवसान मि. वावला ह्यांच्या खुनांत झालेलें असल्यामुळें, खुनास खून, ह्या न्यायानें फांशीची शिक्षा न्यायनिष्ठुरतेला धरूनच आहे. पण हस्तक व दयार्द्र दृष्टि या दोन मुद्यांकडे लक्ष दिलें असतां खटल्याच्या अखेरीस आरोपींच्या बॅरिस्टरांनीं केलेलीं भाषणें सामान्य लोकांच्या मनाला पटल्यावांचून राहणार नाहींत. इंदूरला संभाळण्यासाठीं जर तारेवरचा नाच एकसारखा दृष्टीस पडतो, तर या खटल्यांतील गुन्हेगारांना तरी इतकी कडक शिक्षा कशासाठी ? इंदूरला अदृश्यांत ढकलण्यांत न्यायमूर्तींनीं जो नाजुकपणा दाखविला तोच नाजुकपणा 'शिक्षा सांगावयाच्या' वेळीं दिलयाला जावा, हें बरोबर नाहीं. हस्तकाचा दर्जा शिक्षेच्या वांटणीच्या वेळींहि कायम रहावयास पाहिजे होता. इंग्रजी मुलखांत, मुंबई सारख्या शहरांत मुमताजला पळवून नेऊन प्राण घेण्याचें किंवा प्राण देण्याचें साहस करण्यास ज्या सद्यःस्थितीमुळें हे पंचवीस तीस वर्षांचे अविचारी तरुण तयार झाले, त्या सद्यःस्थितीला मात्र कोणीहि दोष देत नाहीं आणि त्या सद्यःस्थितींतून निघणाऱ्या अविचारांना तेवढें निष्ठुरतेनें वागविण्यांत येतें, हा पंक्तिप्रपंच नव्हे काय ? फांशीं जाणारे व काळ्या पाण्यावर जाणारे जसे हस्तक आहेत, तसें इंदूरहि हस्तकच आहे. इंदूर चांगलें 'शिकलेंसवरलेलें' आहे, इंग्रजी रीतिरिवाजांत तरवेज आहे, चार दोन तास गप्पागोष्टी बोलण्याची वेळ आली असतां सुसंस्कृत मनाशीं आपण बोलत आहों असा भास झाल्यावांचून रहात नाहीं ! मग असल्या सुसंस्कृत मनाची प्रवृत्ति स्वतःच्या आवडत्या खेळीचें मन मातृपदासंबंधानें अत्यंत दुखावून टाकण्याकडे कां व्हावी ? पाहिजे त्याला पाहिजे. तसें आपण राखवूं शकतों आणि पैशाच्या व राजसत्तेच्या कारवाईला सीमा नाहीं, अशी धुंदी ह्या सुसंस्कृत मनाच्या डोळ्यांवर कां चढावी ? अंतःकरणांतील निसर्गदत्त सुशील प्रवृत्तीचा प्रवाह मातृपदाच्या

अभिमानाच्या प्रसंगीं वेश्यावृतींत वाढलेल्या मुमताजच्या अंगीं दिसावा आणि निसर्गाच्या नाजूक व सत्वशील प्रवृत्तीचा लोप इंदुरास झालेला असावा, हा परिणाम कशाचा? वेश्यांहूनहि हलक्कीं मनें संस्थानिकांचीं कां व्हावीं? ह्या नैतिक अधःपाताचें कारण काय? समाज-दृष्टीनें विचार करतांना मुमताजच्या खटल्यांतील गुन्हेगारांना हस्तक म्हणून एका बाजूस सारून इंदूरकडे जशी दृष्टि जाते, त्याचप्रमाणें इंदूरच्या अधःपाताचा विचार करतांना संस्थानिक हे इंग्रजांच्या राजकीय धोरणाचे हस्तकच आहेत असें ध्यानांत येऊन, हिंदुस्थानांतील अरेरावी दडपशाहीकडे मन वळल्यावांचून रहात नाहीं. स्वतःच्या संस्थानचा पैसा व स्वतःच्या संस्थानची सत्ता ह्यामुळें उत्पन्न होणारी धुंदी संस्थानांस सावळागोंधळ घालण्यास पुरेशी होऊं शकेल; पण मुंबईसारख्या शहरांत आपण पाहिजे तो सांवळागोंधळ घालून यश मिळवूं असे विचार इंदूरच्या हस्तकांच्या डोक्यांत का घोळावे? खालसा प्रांतांतील अरेरावी दडपशाहीला मदत करणारे आधारस्तंभ आम्हीं असल्यामुळें, राजकीय बाबींत सरकारी अधिकाऱ्यांची अरेरावी दडपशाही जशी चालू शकते, तशीच आमचीहि दडपशाही खालसा इलाख्यांतील खाजगी बाबींत कां चालूं नये, असें संस्थानिकांना वाटणें साहजिकच आहे. मोठ्या गुन्ह्याच्या वेळीं जर आमची मदत घेण्यांत येते, तर आमच्या धाकटया गुन्ह्यांवर पांघरूण कां घालण्यांत येऊं नये, अशी संस्थानिकांच्या मनाची समजूत झाल्यास त्यांत गैरशिस्त कोणतें? मुमताजच्या खटल्यामुळें निदर्शनास आलेले सद्यःस्थितींतील दोष जर टाळावयाचे असतील तर व्यंग्यार्थाची दृष्टि इंदूरकडे लावण्यांत कांहीं अर्थ नसून, खालसामधील राजकीय दडपशाहीकडे जर लावण्यांत आली तरच ह्या खटल्यापासून ध्यावयाचा बोध घेतल्यासारखें होईल, नोकरशाही व्यंग्यार्थीतीत ह्या व्यंग्याकडे लक्ष पुरवील काय?

* दास बाबू

देशबंधु चित्तरंजन दास ह्यांस गेल्या मंगळवारीं (ता. १६ जून १९२५ रोजीं) दार्जिलिंग येथें हृदयाच्या विकारानें एकाएकीं देवाज्ञा झाली, हें फळविण्यास आम्हांस अत्यंत वाईट वाटतें. दे. बं. दास ह्यांचा जन्म १८७० सालचा असून मरणसमयीं त्यांचें वय अवघें ५५ वर्षांचें होतें. स्वराज्य पक्षाच्या व इतर पक्षांच्या राजकीय पुढाऱ्यांत तरुण वांडाच्या उसळीनें काम करणारे जोरकस लढवय्ये अशी त्यांची ख्याती असून, वयानें त्यांच्या बरोबरीच्या मंडळींतहि, दिसण्यांत, हुरुपेंत, आणि ढर्‍यांत ते सर्वांत तरुण आहेत, असेंच नेहमीं भासत असे. बुद्धीनें तरतरीत, आवेशानें भरलेले आणि काम करण्याच्या हौसेनें इतरांना नेहमीं प्रोत्साहन देणारे असे तरुणच, दास बाबू इष्टमित्रांना व अनुयायांना नेहमीं दिसत असत. १९०५ सालच्या वंगभंगाच्या चळवळीचे वेळीं बंगालचा राष्ट्रीय पक्ष निर्माण करतांना राष्ट्रीय पक्षाच्या वतीचें लेखकाचें काम बाबू अरविंद घोष ह्यांनीं 'वंदेमातरम्' ह्या पत्राच्या द्वारें केलें, बिपिन बाबूंनीं आपल्या वक्तृत्वानें राष्ट्रीय पक्षाच्या उभारणीस त्यावेळीं बंगाल्यांत मदत केली, अमृतबझार पत्रिकेचे बाबू मोतीलाल घोष ह्यांनीं आपल्या नेहमींच्या पोक्त सल्लामसलतीनें राष्ट्रीय पक्षास सांवरून धरलें, आणि बॅ. चक्रवर्ती व बॅ. चित्तरंजन दास ह्या जोडीनें राष्ट्रीय पक्षाचा योगक्षेम चालविला; अशी वंगभंगाच्या चळवळीच्या वेळच्या निरनिराळ्या बंगाली पुढाऱ्यांची कीर्ति आहे. वंगभंगाच्या चळवळीला राष्ट्रीय वळण देण्याकरितां श्री शिवाजी महोत्सवाचे निमित्तानें लोकमान्य टिळक ह्यांना १९०६ सालीं काँग्रेसच्यापूर्वी कलक-

---

* नवाकाळ, ता. १८ जून १९२५

घ्यास बोलावण्यांत आलें होतें. अमृतबझार पत्रिकेचे बाबू मोतीलाल घोष व लो. टिळक ह्यांचा पूर्वीचाच निकट संबंध होता, पण १९०६ सालापासून बिपिन बाबू व दे. बं. दास ह्यांचेशी त्यांचा निकट संबंध जुळून आला. सुरतेच्या बखेडयानंतर बंगाल्यांत बाँबचा स्फोट झाल्यावर दे. बं. दास व बॅ. चक्रवर्ती ह्यांनीं वरींच वर्षें राजकारणांतून आपलें अंग काढून घेतलें होतें; तथापि तुरुंगांत गेलेल्यांच्या आप्तइष्टांना मदत करण्याचे कामीं, व इतर राष्ट्रीय उद्योग चालवणाऱ्यांकडे लक्ष देण्याचे कामीं दे. बं. दास आपल्या दरमहा तीस चाळीस हजारांच्या प्राप्तीपैकीं निम्मी अधिक रक्कम खर्चीं घालण्यास सदर काळांत कधींहि विसरले नाहींत. मंडालेहून लोकमान्य टिळक सुटून आल्यावर लखनौच्या काँग्रेसच्या पूर्वी बेळगांवच्या प्रांतिक परिषदेंत लोकमान्य टिळक ह्यांनीं होमरूल लीग स्थापून काँग्रेसला राष्ट्रीय पक्षानें मिळावें असें ठरविल्यानंतर, बंगालचे सर्व राष्ट्रीय पक्षाचे पुढारी लखनौला हजर राहिले आणि लखनौच्या बैठकीपासून नेमस्तांच्या हातांतील काँग्रेस राष्ट्रीय पक्षाच्या हातीं गेली. १९१७ सालीं कलकत्त्यास बिझांटबाईंचे अध्यक्षतेखालीं भरलेल्या काँग्रेसचें खरें चालकत्व दे. बं. दास ह्यांजकडेच होतें. प्रांतिक संपूर्ण स्वराज्यावर माँटेग्यू-चेम्सफर्ड ह्यांची तयार करण्यास घातलेली त्यावेळची योजना भागवून द्यावी, असें बंगालच्या पुढाऱ्यांचें कलकत्त्याच्या काँग्रेसच्या वेळीं १९१७ सालीं मत होतें. पण लखनौ येथें काँग्रेसनें तयार केलेला तरजुमा हिंदु-मुसलमानांच्या संमतीनें तयार झालेला असून कलकत्त्यास लगेच एका वर्षांत त्या तरजुम्यांत मुसलमानांच्या संमतीशिवाय फेरबदल करणें इष्ट नाहीं, अशी विचारसरणी बंगाली पुढाऱ्यांपुढें मांडून लो. टिळक ह्यांनीं १९१७ सालीं संपूर्ण प्रांतिक स्वराज्याचा प्रश्न प्रामुख्यानें पुढें येऊं दिला नाहीं. माँटेग्यू-चेम्सफर्ड ह्यांचा रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यानंतर मुंबईस भरलेल्या स्पेशल काँग्रेसमध्यें

ह्या रिपोर्टांतील कलमें अजिबात त्याज्यहि मानण्यांत आली नाहींत, किंवा मनोभावें स्वीकारण्यांतहि आलीं नाहींत. नेमस्तांनीं सदर कलमें मनोभावें स्वीकारलीं, क्रॉनिकल वगैरें पत्रांनीं त्याज्य म्हणून त्यावर शेरा मारला, पण मुंबईच्या काँग्रेसनें दोहोंमधला मार्ग स्वीकारून पोलिस व न्यायखातें वगळून बाकीच्या खात्यांचें प्रांतिक स्वराज्य मागितलें. ही तडजोड दे. बंधु दास व लोकमान्य टिळक ह्या दोघांनीं मिळून मुंबईच्या जादा काँग्रेसच्या वेळीं घडवून आणली. जादा काँग्रेसच्या पूर्वीच लोकमान्य टिळक विलायतेस जावयाचे होते, पण ऐत्यावेळीं परवानगी न मिळाल्यामुळें सिलोनहून त्यांस परत यावें लागलें. मुंबईच्या जादा काँग्रेसच्या वेळीं बंगाली युढाऱ्यांची व आपली गाठ पुनः पडली ह्याबद्दल लोकमान्य टिळक ह्यांना विशेष आनंद झाला, आणि काँग्रेसचें काम आटोपल्यावर दे. बं. दास, बॅ. चक्रवर्ती, पालबाबू आणि घोषबाबू ह्या चौघांना पुण्यास गायकवाड वाड्यांत दोन दिवस घालविण्यास अत्यंत आग्रहाचें आमंत्रण देण्यांत आलें. त्या प्रसंगीं पुण्यास झालेल्या बंगाली पाहुण्यांच्या भाषणांत माँटेग्यु-चेम्सफर्ड सुधारणांवर विशेष तुटून पडणारें जर कोणाचें भाषण झालें असेल, तर तें दासबंधूंचेंच भाषण होय. आपल्या भक्ष्यावर झडप घालून वाघ ज्याप्रमाणें नखाग्रांनीं व भयंकर दाढांनीं सावजाचा चेंदामेंदा करून टाकतो, त्याप्रमाणें माँटेग्यु-चेम्सफर्ड सुधारणांतील प्रमुख तत्त्वांचा चेंदामेंदा करून टाकण्यांत दे. बं. दास ह्यांच्या वक्तृत्वाला नेहमीं हौस वाटत असे! मुंबईच्या स्पेशल काँग्रेसनंतर माँटेग्यु-चेम्सफर्ड सुधारणांचें त्याज्य स्वरूप लोकांपुढें मांडण्यास दे. बंधु दास ह्यांनीं पुण्यास जो आरंभ केला त्याचा शेवट अमृतसरच्या काँग्रेसमध्यें माँटेग्यु-चेम्सफर्ड सुधारणा स्वीकारूं नयेत, असें ठासून प्रतिपादण्यांत दे. बं. दास ह्यांजकडून करण्यांत आला. लो. टिळक, म. गांधी वगैरेंनीं तडजोड करून

घ्यास बोलावण्यांत आलें होतें. अमृतबझार पत्रिकेचे बाबू मोतीलाल घोष व लो. टिळक ह्यांचा पूर्वीचाच निकट संबंध होता, पण १९०६ सालापासून बिपिन बाबू व दे. बं. दास ह्यांचेशी त्यांचा निकट संबंध जुळून आला. सुरतेच्या बखेडयानंतर बंगाल्यांत बाँबचा स्फोट झाल्यावर दे. बं. दास व बॅ. चक्रवर्ती ह्यांनीं बरींच वर्षें राजकारणांतून आपलें अंग काढून घेतलें होतें; तथापि तुरुंगांत गेलेल्यांच्या आप्तइष्टांना मदत करण्याचे कामीं, व इतर राष्ट्रीय उद्योग चालवणाऱ्यांकडे लक्ष देण्याचे कामीं दे. बं. दास आपल्या दरमहा तीस चाळीस हजारांच्या प्राप्तीपैकीं निम्मी अधिक रक्कम खर्ची घालण्यास सदर काळांत कधींहि विसरले नाहींत. मंडालेहून लोकमान्य टिळक सुटून आल्यावर लखनौच्या काँग्रेसच्या पूर्वी चेळगांवच्या प्रांतिक परिषदेंत लोकमान्य टिळक ह्यांनीं होमरूल लीग स्थापून काँग्रेसला राष्ट्रीय पक्षानें मिळावें असें ठरविल्यानंतर, बंगालचे सर्व राष्ट्रीय पक्षाचे पुढारी लखनौला हजर राहिले आणि लखनौच्या बैठकीपासून नेमस्तांच्या हातांतील काँग्रेस राष्ट्रीय पक्षाच्या हातीं गेली. १९१७ सालीं कलकत्त्यास बिझांटबाईंचे अध्यक्षतेखालीं भरलेल्या काँग्रेसचें खरें चालकत्व दे. बं. दास ह्यांजकडेच होतें. प्रांतिक संपूर्ण स्वराज्यावर माँटेग्यू-चेम्सफर्ड ह्यांची तयार करण्यास घातलेली त्यावेळची योजना भागवून घ्यावी, असें बंगालच्या पुढाऱ्यांचें कलकत्त्याच्या काँग्रेसच्या वेळीं १९१७ सालीं मत होतें. पण लखनौ येथें काँग्रेसनें तयार केलेला तरजुमा हिंदु-मुसलमानांच्या संमतीनें तयार झालेला असून कलकत्त्यास लगेच एका वर्षांत त्या तरजुम्यांत मुसलमानांच्या संमतीशिवाय फेरबदल करणें इष्ट नाहीं, अशी विचारसरणी बंगाली पुढाऱ्यांपुढें मांडून लो. टिळक ह्यांनीं १९१७ सालीं संपूर्ण प्रांतिक स्वराज्याचा प्रश्न प्रामुख्यानें पुढें येऊं दिला नाहीं. माँटेग्यू-चेम्सफर्ड ह्यांचा रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यानंतर मुंबईस भरलेल्या स्पेशल काँग्रेसमध्यें

ह्या रिपोर्टांतील कलमें अजिबात त्याज्यहि मानण्यांत आली नाहींत, किंवा मनोभावें स्वीकारण्यांतहि आलीं नाहींत. नेमस्तांनीं सदर कलमें मनोभावें स्वीकारलीं, क्रॉनिकल वगैरे पत्रांनीं त्याज्य म्हणून त्यावर शेरा मारला, पण मुंबईच्या काँग्रेसनें दोहोंमधला मार्ग स्वीकारून पोलिस व न्यायखातें वगळून बाकीच्या खात्यांचें प्रांतिक स्वराज्य मागितलें. ही तडजोड दे. बंधु दास व लोकमान्य टिळक ह्या दोघांनीं मिळून मुंबईच्या जादा काँग्रेसच्या वेळीं घडवून आणली. जादा काँग्रेसच्या पूर्वीच लोकमान्य टिळक विलायतेस जावयाचे होते, पण ऐत्यावेळीं परवानगी न मिळाल्यामुळें सिलोनहून त्यांस परत यावें लागलें. मुंबईच्या जादा काँग्रेसच्या वेळीं बंगाली युढाऱ्यांची व आपली गाठ पुनः पडली ह्याबद्दल लोकमान्य टिळक ह्यांना विशेष आनंद झाला, आणि काँग्रेसचें काम आटोपल्यावर दे. बं. दास, वॅ. चक्रवर्ती, पालबाबू आणि घोषबाबू ह्या चौघांना पुण्यास गायकवाड वाडयांत दोन दिवस घालविण्यास अत्यंत आग्रहाचें आमंत्रण देण्यांत आलें. त्या प्रसंगीं पुण्यास झालेल्या बंगाली पाहुण्यांच्या भाषणांत माँटेग्यु–चेम्सफर्ड सुधारणांबर विशेष तुटून पडणारें जर कोणाचें भाषण झालें असेल, तर तें दासबंधूंचेंच भाषण होय. आपल्या भक्ष्यावर झडप घालून वाघ ज्याप्रमाणें नखाग्रांनीं व भयंकर दाढांनीं सावजाचा चेंदामेंदा करून टाकतो, त्याप्रमाणें माँटेग्यु–चेम्सफर्ड सुधारणांतील प्रमुख तत्त्वांचा चेंदामेंदा करून टाकण्यांत दे. बं. दास ह्यांच्या वक्तृत्वाला नेहमीं हौस वाटत असे ! मुंबईच्या स्पेशल काँग्रेसनंतर माँटेग्यु–चेम्सफर्ड सुधारणांचें त्याज्य स्वरूप लोकांपुढें मांडण्यास दे. बंधु दास ह्यांनीं पुण्यास जो आरंभ केला त्याचा शेवट अमृतसरच्या काँग्रेसमध्यें माँटेग्यु-चेम्सफर्ड सुधारणा स्वीकारूं नयेत, असें ठासून प्रतिपादण्यांत दे. बं. दास ह्यांजकडून करण्यांत आला. लो. टिळक, म. गांधी वगैरेंनीं तडजोड करून

सुधारणांच्या कायद्याप्रमाणें वागावें, येवढे शब्द सुधारणा निराशाजनक ठरविणाऱ्या ठरावांत कसेबसे घातले. अमृतसरच्या काँग्रेसनंतर बनारस येथें भरलेल्या ऑल-इंडिया काँग्रेस कमिटीच्या बैठकींत असहकारितेच्या चळवळीचा विचार करण्याकरितां स्पेशल काँग्रेस भरवावी किंवा कसें ह्यासंबंधाची चर्चा चालली असतांना लो. टिळक तटस्थ राहिले आणि दे. बं. दास ह्यांनीं कलकत्त्यास स्पेशल काँग्रेस भरविण्याची सूचना उचलून धरून काँग्रेसची व्यवस्था ठेवण्याचें अभिवचन दिलें. कलकत्त्याच्या स्पेशल काँग्रेसच्या वेळीं महात्मा गांधी ह्यांच्या असहकारितेच्या चळवळीविरुद्ध दे. बं. दास फारसे नव्हते, पण काँग्रेसनें कौन्सिलावरील बहिष्कारासकट असहकारितेचा ठराव पास करावा असेंहि त्यांचें मत नव्हतें. कलकत्त्यास असहकारितेचा ठराव पास झाल्यानंतर दे. बंधु दास ह्यांनीं आपली वकिली सोडून दिली आणि कौन्सिलाकरितांहि उभे राहण्याचें नाकारलें. नागपूरच्या काँग्रेसच्या वेळीं असहकारितेच्या ठरावाविरुद्ध बंगालच्या प्रतिनिधींनीं जावें अशी विपिन बाबूंनीं फार खटपट केली, पण देशबंधू महात्माजींच्याच बाजूचे झाल्यामुळें देशबंधूंचा पंथ निराळा, विपिन बाबूंचा पंथ निराळा आणि बॅ. चक्रवर्ती ह्यांचा पंथ निराळा, असे तीन फांटे बंगालच्या राष्ट्रीय पक्षाला फुटले. दे. बंधु दास ह्यांच्या अलौकिक स्वार्थत्यागामुळें, राजकीय संन्याशाच्या खादीच्या पोषाखामुळें, आणि कोणतेंहि कार्य तडीस नेण्याच्या आवेशामुळें महात्माजींच्या बरोबरीची योग्यता अहमदाबादच्या काँग्रेसच्या वेळीं दे. बं. दास ह्यांना प्राप्त झाली. युवराजांच्या आगमनामुळें मुंबईस दंगा होऊन लाहोर, अलाहाबाद व कलकत्ता येथें स्वयंसेवकांच्या हालचाली अत्यंत जोराच्या होऊं लागल्यामुळें लाला लजपतराय, पं. मोतीलाल नेहरू व दे. बं. दास ह्या तिघांनाहि हजारों स्वयंसेवकांसह सरकारनें अवचित तुरुंगांत टाकलें.

अहमदाबादच्या काँग्रेसच्या सुमारास मुसलमानांना वगळून हिंदु पुढाऱ्यांना तुरुंगांतून सोडण्याची तडजोडीची भाषा लॉर्ड रीडिंग यांनीं सुरू केली. पण अहमदाबादच्या काँग्रेसमध्यें हिंदु-मुसलमानांत आपसांत भेद पाडणारी तडजोड महात्माजींनीं धुडकावून लांवल्यामुळें अहमदाबादच्या काँग्रेसनंतर महात्माजींनाहि कैदखाना पहावा लागला. कैदेंतून सुटून आल्यानंतर दे. बं. दास ह्यांनीं गयेच्या काँग्रेसच्या वेळीं कौन्सिलांत प्रवेश करणारा स्वराज्य पक्ष स्वतंत्र स्थापला, आणि दिल्लीच्या स्पेशल काँग्रेसमध्यें ह्या स्वराज्य पक्षास कौन्सिलांत जाण्यास काँग्रेसकडून हरकत घेण्यांत येऊं नये अशी परवानगी मिळवून बंगालच्या कायदे-कौन्सिलांतील स्वराज्य पक्षाचें पुढारी दे. बं. दास स्वतः झाले. बंगालच्या कायदेकौन्सिलांत दिवाणांच्या जागा नाकारून दिवाणांचे पगार दास बाबूंच्या पक्षानें दोन वेळां नामंजूर केले. म. गांधी सुटून आल्यानंतर बेळगांवच्या काँग्रेसपर्यंत कौन्सिलापासून दे. बं. दास ह्यांनीं परावृत्त व्हावें म्हणून महात्माजींनीं आपल्याकडून शिकस्तीची खटपट केली; पण असहकारितेची चळवळ संपूर्णपणें मान्य असूनहि कौन्सिलांतील टक्करीची जोड ह्या चळवळीस दिली असतां चळवळीला अधिक टिकाऊपणा येणारा आहे असें दे. बं. दास ह्यांचें अंतःकरणपूर्वक मत असल्याबद्दल महात्माजींची खात्री पटून, देशबंधूंनीं कौन्सिलचें काम करावें अशी कामाची विभागणी करण्यांत आली. आपल्या विषयींचा गैरसमज दूर करण्याकरितां शांततेच्या व्रताचें आश्वासन पुनः सर्वांना देऊन व लॉर्ड बर्कनहेड ह्यांजबरोबर सहकार्य करण्यास हरकत नाहीं असें जाहीर करून कौन्सिलच्या कामाची निरवानिरव करण्यांत व महात्मा गांधी ह्यांचें खादीचें कलम सर्व ठिकाणीं सारखें लागूं करण्याच्या उद्योगाला लागण्यांत निमग्न असतांनाच निर्घृण कालानें दार्जिलिंग येथें देशबंधूंवर आकस्मित घाला घातला आणि एका अत्यंत तडफदार

निस्सीम देशभक्ताचें व संपूर्ण स्वार्थत्यागी पुरुषाचें चरित्र संपवून टाकलें! देशबंधु दास ह्यांच्या मरणानें सर्व बंगाल्यावरच नव्हे तर सर्व हिंदुस्थानावर आणि हिंदु-मुसलमानांच्या एकीवर एक प्रकारचा घालाच येऊन पडला आहे. दास बाबूंचें चरित्र आठवून, त्यांच्या स्वार्थत्यागाचा कित्ता गिरवून बंगालचे पुढारी बंगालच्या व त्याबरोबरच हिंदुस्थानच्या राजकारणाला यापुढें योग्य मार्ग लावतील व देशबंधूंच्या ऋणांतून बंगालला मुक्त करतील, असा भरंवसा बंगालविषयीं ह्याप्रसंगीं आम्हाला वाटत आहे.

* संसारापुरती मजुरी

मुंबईतील गिरण्यांच्या मालकांनीं शेंकडा ११॥ टक्यांनीं म्हणजे रुपयाला जवळ जवळ दोन आण्यानीं गिरण्यांतील कामगारांची मजुरी कमी करण्याचा ठराव केला असल्यामुळें गिरणी कामगार सहाजिकपणेंच संतापून गेले आहेत. संप करावा तर पोटाच्चे अधिक हाल होणार आणि अखेरीस कमी पगारावर काम करणें भाग पडणार, अशी दैना गिरणी कामगारांची झाली आहे. गेल्या सालच्या संपामुळें शिल्लक जवळ उरलेली नाहीं; शिवाय गिरण्यांच्या मालकांपाशीं माल फार सांठलेला असल्यामुळें चार सहा महिने गिरण्या बंद ठेवण्यांत मालकांचें नुकसान नसून गिरणी कामगारांच्या संसाराची मात्र राखरांगोळी होणारी आहे ! मुंबईतील धरभाडयाचा आणि रोजच्या संसारास लागणाऱ्या जिन्नसांच्या किंमतीचा जर विचार केला तर गिरणी कामगारांची हल्लींचीच मजुरी जेमतेम संसाराला पुरणारी आहे, असेंच म्हणणें भाग येतें. मग ह्या मजुरींत रुपयाला दोन आणे कमी करून कसें भागणार ? मुंबईतील गिरण्यांचा माल आज खपत नसल्यामुळें त्याबद्दल गिरणी काममारांना प्रायश्चित्त ध्यावयास लावणें केव्हांहि योग्य होणार नाहीं. गिरण्यांचा माल खपत नाहीं ह्याबद्दल जर कोणाकडे दोष असेल तर तो दोष सरकारच्या किंवा गिरण्यांच्या मालकांच्या माथींच मारला पाहिजे. इंलंडांतील कोळशाच्या खाणींच्या स्थितीसंबंधानें रिपोर्ट करण्याकरितां जशी कमिटी बसली होती, तशी कमिटी गिरण्यांच्या धंद्यासंबंधानें रिपोर्ट करण्याकरितां मुंबईस बसविण्यांत आली, तर गिरणी कामगारांना कोणीहि दोष देऊं नये असा रिपोर्ट सदर कमिटीकडून झाल्या-

---

* नवाकाळ, ता. ३१ जुलै १९२५

वांचून रहाणार नाहीं. इंग्लंडांतील कमिटीनें कोळशाच्या खाणींतील मजुरांना हल्लीं मिळत असलेलें वेतन संसारापुरतें किंवा 'लिव्हिंग वेजीस' आहे असेंच ठरविलें असून, ह्या पगारांत कमी करून चालावयाचें नाहीं, असा आपला निर्णय दिला आहे. मुंबईच्या गिरण्यांचा माल न खपण्याच्या कारणांपैकीं एक कारण असें आहे कीं, चीनमध्यें व जपानमध्यें गिरण्यांचा धंदा गेल्या पांचदहा वर्षांत विशेष वाढला असून चीनच्या गिऱ्हाइकाला मुंबईच्या गिरण्या मुकल्या आहेत. चीनमध्यें व जपानमध्यें गिरण्यांचा धंदा वाढतो आहे आणि त्याचा परिणाम आपल्या खपावर झाल्यावांचून रहाणार नाहीं, ह्या गोष्टीकडे गिरण्यांच्या मालकांनीं गेल्या पांचदहा वर्षांत लक्ष कां दिलें नाहीं? हिंदुस्थान सरकारचें व गिरण्यांच्या मालकांचें असें लक्ष पुरविण्याचें काम होतें. तें काम त्यांनीं बजावलें नाहीं. त्यांच्या आळसाबद्दल व हलगर्जीपणाबद्दल गरीब मजुरांचे पोटाला दर रुपयामागें आज दोन चिमटे घेण्यांत येत आहेत! फ्रान्स, जर्मनी वगैरे देशांत गेल्या पांच वर्षांत नवीन कोळशांच्या खाणी सुरू करण्यांत आल्या असून, नद्यांच्या व धबधब्यांच्या पाण्याच्या शक्तीवर विजेनें कारखाने चालविण्याची प्रवृत्ति अधिक उत्पन्न झाली आहे; मोठमोठाल्या जहाजांवर इंजिनें चालविण्यास दगडी कोळशाच्या ऐवजीं रॉकेल तेलाचा उपयोग करण्यांत येत आहे; युरोप खंडांतील ह्या फेरबदलामुळें इंग्लंडांतील कोळसा पूर्वीप्रमाणें खपत नाहीं, असें चौकशीच्या कमिटीचें मत असून, सांठलेल्या मालाबद्दल मजुरांना शिक्षा न करतां सरकारला व मालकांना तोशीस लागली पाहिजे, असें सदर कमिटीचें म्हणणें आहे. जर्मनी व फ्रान्स येथें नवीन यंत्रें सुरू करून अधिक कोळसा जर खाणींतून काढण्यांत येतो तर इंग्लंडनेंहि तसें कां करूं नये? नवीन यंत्रें व नवे शोध ह्यांजकडे इंग्लंडच्या भांडवलवाल्यांनीं व मुत्सद्यांनीं दुर्लक्ष कां करावें?

जपानी गिरण्यांत चांगलीं यंत्रें वापरतात आणि हलक्या दर्जाचा कापूस व लांब धाग्याचा कापूस ह्यांचें योग्य तऱ्हेचें मिश्रण करून हलक्या दर्जाच्या कापसाचें चांगलें कापड काढतात, ही गोष्ट जपानी माल गिरण्यांच्या बोकांडी बसून चांगला मार देईतों हिंदुस्थान सरकारच्या व गिरणीवाल्यांच्या लक्षांत कां येऊं नये ? आपण आळसांत निजून राहावयाचें आणि गरिबांना बळी द्यावयाचे, असला प्रकार दृष्टीस पडल्यावर इंग्लंडांत कोळशाच्या खाणी राष्ट्रीय मालकीच्या झाल्या पाहिजेत, अशी ओरड सुरू झाली आहे, त्याप्रमाणें हिंदुस्थानांतील गिरण्यांसारखे मोठे मोठे धंदे राष्ट्रीय मालकीचे झाले पाहिजेत, अशी चळवळ आज नाहीं उद्यां सुरू झाल्यावांचून कशी राहील ? अल्लाउद्दीन खिलजी, जाधव राजांच्या देवगिरीच्या किल्याला वेढा देईतों सिंधू नदीच्या पलिकडील मुसलमान हिंदुस्थानवर स्वाऱ्या कशा करतात ह्याची वार्ताहि महाराष्ट्राच्या कानीं नसल्यामुळें जसें अवचित महाराष्ट्रांत चार पांचशें वर्षांपूर्वी मुसलमानी राज्य सुरू झालें, तशीच स्थिति जपाननें आज मुंबईच्या गिरण्यांची केली आहे. त्यावेळच्या राजांना नवीन काळांतील निजलेले राजे असा दोष देण्याची इंग्रज लेखकांची पद्धत आहे ! पण आज महायुद्धानंतरच्या चार पांच वर्षांत पूर्वीचे गांवढळ ठरले गेलेले आळशी व चैनी राजे मुंबईतील गिरणी मालकांच्या स्वरूपानें पुन्हां जन्मास आलेले दिसत नाहींत काय ? अल्लाउद्दीन खिलजीनें अवचित आमच्या राजधानीला वेढा दिला, तरी आम्ही राजांनीं काय करावें असे म्हणणारे वेडगळ मुत्सद्दी ज्याप्रमाणें चारशेंपांचशें वर्षांपूर्वी हिंदुस्थानांत होते, त्याप्रमाणें आज मुंबईतील गिरण्यांचे मालक जपान अवचित आमच्या बोकांडीं बसलें आहे म्हणून दीनवाणीनें ओरडत आहे ! नालायकीचें आणखी दुसरें कोणतें चिन्ह असतें ? गिरण्यांचा धंदा मुंबईच्या मागून जपानांत सुरू झाला, असें असतां जपानच्या गिरण्या हिंदुस्थानचाच कापूस वापरून

हिंदुस्थानांतील निरनिराळ्या बाजारांत आपला माल अधिक स्वस्त विकत आहेत ! हिंदुस्थानांत सरकार आणि गिरण्यांचे मालक हे दोघेहि घोरत पडून जपाननें घर व्यापून टाकल्यानंतर गरिबांच्या पोटाला चिमटा घेऊं पहात अहेत. मुंबईतील गिरणी कामगारांच्या अंगीं आज संप करण्याचें सामर्थ्य नाहीं, तेव्हां त्यांनीं संप करून आपल्या संसाराच्या अधिक हालअपेष्टा करून घेऊं नयेत, हेंच रास्त आहे. पण परमेश्वरी प्रेरणेनें म्हणा किंवा इतर कारणानें म्हणा, जर गिरणींतील कामगारांनीं संप केला आणि बरेच महिने झगडत राहून गिरणीवाल्यांच्या व सरकारच्या डोळ्यांत चांगलें अंजन घातलें, तर झोंपी गेलेल्या मालकांना व अधिकाऱ्यांना कामावरून दूर करून एकंदर हिंदी राष्ट्राचें कल्याण करण्याचें पुण्य त्यांना लागणारें आहे, ह्यांत संशय नाहीं. हिंदुस्थान सरकार व हिंदुस्थानांतील भांडवलवाले आज इतके घोरत निजलेले अहेत कीं, मद्रास, कलकत्ता, व मुंबई ह्या बंदरांपैकीं एखादें बंदर जपानच्या आरमारानें एखाद्या रात्रीं अवचित कबजांत घेतल्याची बातमी येण्याचा संभव नाहीं, असें आज मुंबईच्या गिरण्यांच्या बोकांडी बसलेल्या जपानकडे पाहिलें असतां कोणींहि म्हणूं शकणार नाहीं. संप न झाल्यानें हिंदी राष्ट्रीयत्वाकडे गिरण्याचे मालक व हिंदुस्थान सरकार अधिकच बेपर्वाईनें वागून हिंदी राष्ट्रास आपल्या हलगर्जीपणानें, आळसानें व स्वार्थानें नव्या खड्ड्यांत पाडल्यावांचून रहाणार नाहीं ! तुम्ही निजलेले आहां तेव्हां जागे व्हा, आणि जपानांत किंवा चीनमध्यें राष्ट्रीय भावना ज्याप्रमाणें आज तेथील सरकार व श्रीमंत लोक नांवारूपास आणीत आहेत, त्याप्रमाणें हिंदुस्थानांतहि हिंदुस्थान सरकारला राष्ट्रीय भावनांचा सन्मान करण्यास लावा, अशी जपानची चढाओढ गिरण्यांच्या मालकांच्या कानींकपाळीं आज ओरडत आहे. स्वतःचा माल हिंदुस्थानच्या हिंदुस्थानांतच कसा खपवावा व त्याबद्दल

लोकांच्या अनुरोधानें वागून स्वदेशीची साधी चळवळ कशी करावी, हे ज्या गिरण्यांच्या मालकांना समजत नाहीं, ते गिरण्यांचे मालक जपानशीं टक्कर देण्यांत कसचे समर्थ होणार! गिरणी-कामगार आज दुबळे आहेत असें पाहून, त्यांच्या पोटाला चिमटे घेण्याचा पराक्रम नोकरशाहीला करून दाखविण्याच्या पलीकडे गिरण्याच्या असल्या मालकांच्या हातून होणार तरी काय?

* मेलेल्यांना खाऊन जगणें

दास बाबूंचें स्मारक म्हणून सर्व हिंदुस्थानभर मोठा फंड उभारून, त्या फंडांतून खादीची चळवळ चालविण्याचा संकल्प महात्मा गांधी ह्यांनीं केला आहे. ह्या फंडाचे ट्रस्टी नेमण्यांत आले असून, ह्या फंडास सर्वांनीं मदत करावी म्हणून काढलेल्या विनंति-पत्रकावर स्वराज्य पक्षाचे अध्यर्यू पं. मोतीलाल नेहरू, स्वतंत्र पक्षाचे पुढारी पं. मदन मोहन मालवीय, बंगालचे कवि रवींद्रनाथ टागोर इत्यादि लोकनायकांच्या सह्या आहेत. खादीची चळवळ महात्मा गांधी ह्यांनीं स्वतंत्रपणें करावी, त्या चळवळीच्या खर्चा-करितां महात्मा गांधींजवळ पुरेसा फंड असावा, आणि दास बाबूंचें सर्व हिंदुस्थानचें स्मारक म्हणून सदर फंड उभारण्यांत यावा, ह्या संबंधानें सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांचें एकमत झालें आहे. ह्या फंडाकरितां महात्मा गांधी ह्यांनीं वीस हजार रुपये गोळा केले असून, ह्या पुढील महात्माजींचे दौरे सदर फंडाकरितां निघणार, ह्यांत संशय नाहीं. दास बाबूंच्या स्मारकाकरितां निरनिराळ्या प्रांतांत फिरून प्रत्येक ठिकाणीं मोठा फंड उभारून, खादीच्या चळवळींतील स्वयंसेवकांची तरतूद लावणें, हें काम महात्माजी मुख्यत्वें-करून करणार आहेत. प्रत्येक तालुक्याला दरमहा तीस रुपयांवर रहाणारे एक दोन स्वयंसेवक नेमून, त्यांच्या मार्फत तेथील खादीची चळवळ चालवावयाची, असा दास-स्मारक-फंडाचा उपयोग करून घेण्याचा महात्माजींचा उद्देश आहे. तालुक्यांत काम करणाऱ्या स्वयंसेवकानें स्वतःच्या हातानें काढलेल्या सुतावर आपला उदरनिर्वाह केला पाहिजे, असें महात्माजींचें मुळींच म्हणणें नाहीं. चरखा दुरुस्त करणें, हातानें सूत काढणें, विणण्याच्या

---

* नवाकाळ, ता. ११ ऑगस्ट १९२५

कामांतील अडचणी जाणणें, इत्यादि कामांत स्वयंसेवकानें स्वतः तरबेज झाल्यावर आपल्या तालुक्यांत चाललेल्या चरख्यांना सूत काढण्याच्या कामीं योग्य सल्ला देणें, कापसाचा पुरवठा करणें, आणि सूत काढणारें, विणणारें व खादी विकणारे ह्या तीनहि वर्गांची नीट तोंडमिळवणी होण्याकरितां मध्यस्थाचीं कामें करून खादीच्या चळवळीवर देखरेख ठेवणें, असलें मुख्य काम तालुक्यांतील स्वयंसेवकांना सांगण्यांत येणार आहे. प्रत्येक तालुक्यांत जर खादीची उत्पत्ति नीट रीतीनें होऊं लागली आणि तालुक्यांतील जाडी भरडी खादी तालुक्यांतच खपून, बारीक सूत कांतण्यांत पटाईत झालेल्यांचा माल तेवढा इतर ठिकाणीं पाठवावयाचा अशा स्थितीला जर तालुक्यांतील खादीची चळवळ जाऊन पोहोंचली, तर सर्वांची तोंडमिळवणी करणाऱ्या मध्यस्थ स्वयंसेवकाचाहि निर्वाह खादीच्याच उद्योगावर चालल्यावांचून राहणार नाहीं. आज खादीची चळवळ चालू आहे, कालांतरानें ह्या चळवळीला खादीच्या उद्योगाचें स्वरूप यावयाचें आहे. उद्योगाचें स्वरूप प्राप्त झाल्यावर स्वयंसेवकांना दास बाबूंच्या स्मारक फंडांतून दरमहा तीस रुपयांची मदत देण्याची जरुरी रहाणार नाहीं. पण चळवळीला उद्योगाचें स्वरूप येईपर्यंत अशी मदत करणें जरुरीचें असून दास-स्मारक फंड स्वयंसेवकांच्या उद्योगाकरितांच प्राधान्येंकरून काढण्यांत आला आहे. ह्या फंडाला वीस हजार रुपये विनंति-पत्रक काढल्याबरोबर महात्माजींनीं मिळविले, हें वाचून कांहीं अँग्लो-इंडियन पत्रांनीं महात्माजींची टर उडविण्यास सुरुवात केली आहे. मेलेल्यांना खाऊन आपल्या चेल्यांचीं पोटें भरण्याचा हा कांवा आहे, असा टीकाकारांचा मुख्य आक्षेप आहे. पण शांतपणें विचार केला असतां, ह्या आक्षेपांत कांहीं अर्थ नाहीं असेंच दिसून येईल. हिंदुस्थानसारख्या पतित राष्ट्राला मृतांच्या व पूर्वजांच्या स्मरणाशिवाय दुसऱ्या कोणाचा आधार आहे?

पूर्वजांचें स्मरण करून आणि आपल्या पुढाऱ्यांपैकीं नुकत्याच मेलेल्या पुढाऱ्यांचें स्मारक म्हणून आपल्या चळवळींत नवजीवन उत्पन्न करावयाचें नाहीं तर दुसऱ्या कोणत्या मार्गानें जागृति करावयाची? पराधीन झालेल्या राष्ट्राचे व समाजाचे हातीं पूर्वीच्या कर्त्या, पराक्रमी व स्वतंत्र पुरुषांचें स्मरण हेंच काय तें मुख्य भांडवल असतें. ह्या भांडवलावरच मृतप्राय झालेल्या आजच्या समाजाची जागृति करावी लागते. आजच्या प्रत्यक्ष जगांतील साधनें आमच्या हातीं कोणतीं आहेत? राष्ट्रांतील मनुष्यबळ व द्रव्यबळ परक्यांच्या मुठींत आहे. बुद्धिबलहि परक्यांच्या सेवेंत निमग्न आहे. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणें बुद्धिबलाच्या मुख्य मुख्य केन्द्रस्थानांवर परक्यांची छाप आहे. प्रसंगाप्रसंगानें व पूर्वजन्मींच्या संस्कारामुळें बुद्धीचा कांहीं कांहीं भाग स्वतंत्र राहिलेला आहे. बुद्धीच्या ह्या स्वतंत्र भागाला आधार कोणता? मनाचा आधार नाहीं, शरीराचा आधार नाहीं, आणि सभोंवारच्या वस्तूंचा ऊर्फ द्रव्याचाहि आधार नाहीं; मग ह्या स्वतंत्र असलेल्या बुद्धीनें काम कसें करावें? परक्यांच्या तावडींत सांपडलेल्या मनाला पूर्वजांची आठवण करून देऊन मन विसावा घेत असतांना तसल्या फावल्या वेळीं जिज्ञासा म्हणून म्हणा किंवा करमणूक म्हणून म्हणा, पूर्वजांच्या पराक्रमाकडे लक्ष देऊन आजच्या स्वतंत्र बुद्धीची अल्प स्वल्प सेवा कर, म्हणून पराधीन मनाला शिकविणें जरुरीचें नाहीं काय? पोटापाण्याकरितां परक्यांच्या अंगणांत राबणाऱ्या शरीराला पूर्वीच्या समाज-स्थितीची आठवण देऊन, आपल्या पूर्वजांचीं शरीरेंहि खादीच्याच उद्योगामुळें पराधीन झालीं नव्हतीं, असें वारंवार दृष्टोत्पत्तीस आणून दिल्याशिवाय राष्ट्रोन्नतीचीं मोठी चळवळ कशी करावयाची? हिंदुस्थान देश एके काळीं हातानें काढलेल्या सुताच्या जोरावर केप ऑफ गुडहोपपासून जपानपर्यंत सर्व प्रदेशाला रोजचा लागणारा कपडा पुरवीत

असे, इतकेंच नव्हे, तर युरोप खंडांतील श्रीमंतांची कपड्यांच्या छानछुकीची हौसहि हिंदुस्थानच भागवीत असे. असलें पूर्वजांचें स्मरणच खादीच्या चळवळीचा आज मुख्य पाया नाहीं काय? मग खादीच्या चळवळीकरितां आस्था बाळगणाऱ्या आणि खेड्यापाड्यांचे उद्धाराचे कामीं केंद्रस्थानीं खादीला बसविण्याची उत्कंठा धरणाऱ्या दासबाबूंचें स्मारक खादीच्या स्वयंसेवकांना पोसणारें कां होऊं नये? ह्यांत गैर कोणतें आहे? आमच्या पूर्वजांनीं संपादन करून ठेवलेलें वैभव आमच्या हातीं राहिलेलें नाहीं. दासबाबूंसारख्या पुढाऱ्यांच्या मरणानंतर त्यांनीं उत्पन्न केलेली शक्ति ढांसळून टाकण्याचा प्रयत्नहि नोकरशाही झपाट्यानें करीत आहे. त्यांचें स्मरण तेवढें स्वतंत्र असलेल्या बुद्धीचा योगक्षेम चालविण्यास समर्थ आहे. त्यांच्या ह्या स्मरणामुळेंच खादीला वाहून घेतलेले स्वयंसेवक खादीचे चळवळीला प्रत्येक तालुक्यांत उद्योगाच्या दृष्टीनें व्यवस्थित स्वरूप देण्यास पुढें येणार अहेत; त्यांच्या ह्या स्मरणामुळेंच शेतकऱ्यांचा वर्ग व दीन झालेला स्त्रीसमूह हातानें सूत काढण्यास प्रवृत्त होणार आहे; त्यांच्या ह्या स्मरणामुळेंच तालुक्यांतील खादी तालुक्यांत खपणारी आहे; त्यांच्या ह्या स्मरणामुळेंच बारीक सुताचें चीज श्रीमंत वर्गाकडून होणारी आहे; आणि त्यांच्या ह्या स्मरणामुळेंच मनानें व शरीरानें पराधीन झालेल्या परंतु सुख-वस्तू असलेल्या लोकांचीं अंतःकरणें खादीकडे वळून खादीच्या चळवळीचें संगोपन करण्याकरितां लागणारा दास बाबूंचा स्मारक फंड महात्मा गांधी ह्यांना पाहिजे तेवढा जमवितां येणें शक्य आहे. ह्यांत लबाडी कोठें आहे? प्रेतें उकरून काढून खाण्याची हातचलाखी कोठें आहे? आजच्या स्वतंत्र बुद्धीच्या मोठया चळवळीला मृताविषयींच्या पूज्य भावाचें स्मरण जुंपावयाचें, असा हा साधा व स्वयंसिद्ध प्रकार आहे. मनुष्यबळ, द्रव्यबळ व बुद्धिबळ स्वतःच्या मुठींत धरून आज जिवंत माणसांचीं हाडें जे घुसळत

आहेत, त्यांनींच मेलेल्यांच्या हाडांनाहि स्वतःच्या अंगणांतील फुलझाडांनां व फळझाडांना खतांकरितां घालण्यांचा अट्टाहास धरणें म्हणजे मरून कचाटयांतून बाहेर गेला तरी सोडणार नाहीं, असा निष्ठुरपणा दाखविण्यासारखें नाहीं काय ? पूर्वजांचें स्मरण आणि मृत झालेल्या हल्लींच्या लोकनायकांचें स्मरण राष्ट्रकार्याला जुंपणाऱ्या पुरुषाला प्रेतें उकरून चेल्यांचें पोट भरणारा पुरुष अशा तऱ्हेचें निंदास्पद नांव ठेवणें म्हणजे कुत्सितपणाची कमाल करणें होय.

---

* सुताची संस्था

पाटणा येथें ऑ. इं. कॉं. कमिटीच्या बैठकीचे वेळीं कॉंग्रेस स्वराज्य पक्षाच्या हवालीं करून ऑ. इं. कॉं. कमिटीच्या ठरावानेंच म. गांधी ह्यांनीं स्वतंत्र सुताची संस्था सुरू केली आहे. खादीची चळवळ आणि कॉंग्रेसचें कार्य ह्यांचा पूर्ण मिलाफ बेळगांवच्या कॉंग्रेसनें केला असतांना आज विभक्त निघण्याचें कारण कोणतें? म. गांधी ह्यांना पाटणा येथील ऑ. इं. कॉं. कमिटीमध्यें खादीच्या चळवळीविषयीं अनुकूल मताधिक्य नव्हतें असें म्हणावें, तर स्वराज्य पक्षाच्या पुढाऱ्यांच्या विरुद्ध कॉंग्रेसच्या सभासदांनीं नेहमीं खादीच वापरली पाहिजे असा ठरावहि प्रथम पास करण्यास पाटणा येथील ऑ. इं. कॉं. कमिटीनें कमी केलेलें नाहीं. ऑ. इ. कॉं. कमिटीनें सतत खादी वापरण्याचा ठराव पास केला असतांहि म. गांधी ह्या वादांत मध्यें पडले, आणि त्यांच्या आग्रहावरून पास झालेल्या कलमाचा पुन्हां विचार होऊन स्वराज्य पक्षाच्या पुढाऱ्यांना संतुष्ट करण्याकरितां कॉंग्रेसच्या सभांच्या व समारंभांच्या वेळीं खादी वापरलीच पाहिजे आणि इतर प्रसंगीं खादी वापरली नसतांना चालेल, अशी सवलत स्वराज्य पक्षाकरितां आणि विशेषतः महाराष्ट्रांतील स्वराज्य पक्षाच्या पुढाऱ्याकरितां देण्यांत आली. मताधिक्य आपल्या बाजूला नाहीं म्हणून महात्माजींनीं माघार घेतली असें वरील प्रकारावरून म्हणतां येणें शक्य नाहीं. खादी वापरण्यासंबंधानें व खादीच्या चळवळीसंबंधानें मताधिक्याच्या जोरावर स्वराज्य पक्षाच्या सभासदांना जर नावडतें काम करावयास सांगितलें तर रोजच्या रोज कटकट उत्पन्न होऊन धड कॉंग्रेसचें काम नाहीं आणि धड खादीचें काम नाहीं असा प्रसंग येतो. तो येऊं नये म्हणून आणि दोनहि चळवळी आपापल्या

---

* नवाकाळ, ता. २६ सप्टेंबर १९२५

क्षेत्रस्थानांत निर्विघ्नपणें चालवितां याव्यात म्हणून मताधिक्य आपल्या बाजूचें असतांहि म. गांधी ह्यांनीं गोडीगुलाबीनें सुताची संस्था स्वतंत्र करून घेतली आहे. सुताच्या संस्थेला दोन हजार यार्ड सूत पुरवून दाखला घेतला असतां काँग्रेसचे सभासद होतां येतें आणि काँग्रेसच्या अनुयायांनीं काँग्रेसच्या समारंभाचे प्रसंगीं खादीच वापरली पाहिजे, एवढ्या दोनच गोष्टी काँग्रेस आणि सुताची संस्था ह्यांना एकमेकांशीं संलग्न करणाऱ्या आहेत. सुताच्या नव्या संस्थेच्या हातीं काँग्रेसचीं सर्व खादीची बोर्डें मालमत्तेसह व देण्या-घेण्यासह देण्यांत आलेली असल्यामुळें, बेळगांवच्या काँग्रेसपासून आतांपर्यंत जी खादीची चळवळ काँग्रेसच्या मार्फत चाललेली आहे ती चळवळ खंड पडूं न देतां सुताच्या संस्थेनें पुढें चालवावयाची आहे. रोजच्या राजकीय प्रश्नाशीं खादीच्या चळवळीचा प्रत्यक्ष संबंध आतां उरलेला नसल्यामुळें केवळ आर्थिक दृष्टीनें विचार करणारालाहि सुताच्या संस्थेंत सामील होण्यास हरकत उरलेली नाहीं. काँग्रेसचीं खादीचीं बोर्डें आणि सर्व खादीची चळवळ ह्यांजवर देखरेख करण्याकरितां बारा सभासदांची कमिटी नेमण्यांत आली असून, ह्या कमिटीचा अधिकार पांच वर्षें कायम टिकावयाचा आहे. फंड गोळा करणें, पैसे कर्जाऊ काढणें, खादीच्या कार्याकरितां कर्जाऊ पैसे देणें, आणि खादीच्या कार्याला मदत करणाऱ्या सर्व शाळांना द्रव्यानें साहाय्य करणें, इत्यादि सर्व कामें ही बारा सभासदांची कमिटी प्रांतिक कमिट्यांच्या द्वारें करणार आहे. आज खादी बोर्डाच्याजवळ सर्व हिंदुस्थानांत मिळून चारपांचशें पगारी स्वयंसेवक आहेत. दास स्मारक फंड झपाट्यानें गोळा करून चारपांचशें पगारी स्वयंसेवकांचें हल्लींचें पथक चारपांच हजारांपर्यंत होईल तितक्या लवकर नेऊन पोहोंचवावयाचें, आणि ह्या कामासाठीं एक दोन वर्षांच्या अवधींत दास-स्मारक फंड एक कोटीपर्यंत पोचवावयाचा, असा निश्चय म. गांधी ह्यांनीं केलेला आहे. मुख्य बारा सभासदांच्या कमिटींत,

खादी बोर्डांत, आणि प्रांतिक कार्यकारी- मंडळांत बसणाऱ्या सभासदांनीं खादीच्या चळवळीचें काम आलें असतां आपलीं इतर खाजगी किंवा सार्वजनिक कामें एका बाजूस ठेवून खादीच्याच चळवळीला स्वतःस वाहून घेण्याची शपथ घेतली पाहिजे, अशी एक अट आहे. ही अट अत्यंत महत्त्वाची आहे. खादी बोर्डांत किंवा प्रांतिक आणि स्थानिक कार्यकारी मंडळांत किंवा सर्वांत श्रेष्ठ असलेल्या बारभाईंच्या कमिटींत काम करूं इच्छिणाऱ्यांना खाजगी कामकाजाची किंवा सार्वजनिक इतर कामाची हरकत सांगतांच येण्याजोगी नाहीं. कार्यकारी सभासद म्हणजे सर्वस्वी स्वतःला खादीलाच वाहून घेणारा सभासद, असा हा अर्थ आहे. इतक्या जोमाचीं व निश्चयाचीं माणसें प्रत्येक ठिकाणीं जरूर तितकीं आपणास मिळतील, असा पूर्ण भरवंसा म. गांधी ह्यांना वाटत असून अशारीतीनें सतत खादीचेंच काम करणाऱ्यांच्या हातीं सुताच्या संस्थेच्या सर्व व्यवहाराचें नियंत्रण रहाणार, हें उघड आहे. कामकाजांत टंगळमंगळ होण्याची सवडच नाहीं. जेथें तेथें तत्परता दिसून येऊन खाजगी व्यापाऱ्यांची उत्तम रीतीनें चाललेली संस्था ज्याप्रमाणें टापटीपीनें, एकाग्र दृष्टीनें आणि तत्परतेनें अहर्निश काम करीत असते, त्याप्रमाणेंच सुताच्या संस्थेचें काम चाललें पाहिजे, असें घोरण महात्माजींनी आंखलेलें आहे. डोळ्यांत तेल घालून बसलेल्या लोभी व्यापाऱ्यांमध्यें जी तत्परता; चिकाटी व हिशोबी बाणा दृष्टीस पडतो, तोच करारीपणाहि सुताच्या संस्थेच्या अंगी दृष्टीस पडावा, अशी महात्माजींची इच्छा आहे. कृपण व्यापारी खाजगी लोभासाठींच तत्परतेनें राबतो, सुताची संस्था देशाच्या हितासाठीं त्याच तत्परतेनें राबणार, एवढाच कायतो फरक दिसून येणार आहे. म. गांधी स्वतःला ह्या सुताच्या संस्थेच्या कार्याला वाहून घेणार असल्यामुळें आणि अहर्निश निरपेक्ष बुद्धीनें काम करण्याची व करून

घेण्याची हातोटी त्यांना चांगली साधलेली असल्यामुळें सुताच्या संस्थेच्या कोणाहि सभासदाला ते कधीहि आळशी होऊं देणारच नाहीं. ह्या संस्थेंत आळसाला व आरामाला स्थळच नाहीं. कार्यकारी सभासदांनीं आपल्या खाजगी किंवा इतर सार्वजनिक कामाची केव्हांहि सबब सांगतां कामा नये. ह्या शपथेचा परिणामच वरील तऱ्हेचा आहे. ज्यांना अशा रीतीनें सर्वस्वी वाहून घ्यावयाचें नसेल त्यांनीं दुसऱ्या नंबरचे सभासद व्हावें पण कार्याचा बोजा आपल्या माथीं घेऊं नये, अशी व्यवस्था लावण्यांत आली आहे. पहिल्या प्रतीचा सभासद असो, किंवा दुसऱ्या प्रतीचा सभासद असो, खादीच्या चळवळीवर आपला पूर्ण भरंवसा असून ह्याच चळवळीनें देशाचें कल्याण होणार असल्यामुळें दररोज अर्धा तास आपण हातानें सूत काढून सुताच्या संस्थेला दरमहा एक हजार यार्ड स्वतः काढलेलें सूत देऊं, अशी लेखी कबुली द्यावयाची आहे. पहिल्या प्रतीच्या व दुसऱ्या प्रतीच्या ह्या सभासदांनीं आपापलें स्थानिक कार्यकारी मंडळ निवडावयाचें असून, ह्या मंडळाच्या मार्फत वारभाई कमिटीच्या हुकमा-प्रमाणें त्या त्या ठिकाणची खादीची चळवळ चालवावयाची आहे. पगारी स्वयंसेवक नेमणें, खेड्यापाड्यांतून खादीची उत्पत्ति करून तेथेंच खादीचा खप करणें, राष्ट्रभर खादीचें कार्य सामान्य व्यवहाराच्या दर्जाला पोहोंचवून तीनचार वर्षांच्या अवधींत कोणत्याहि फंडाच्या मदतीची जरुरी खादीच्या व्यवहाराला रहाणार नाहीं, अशी परिस्थिति निर्माण करणें, आणि खादीच्या नव्या शक्तीचा अनुभव सर्व राष्ट्राला लवकर आणून देणें ह्या उद्देशांना अनुलक्षून म. गांधी ह्यांनीं सुताच्या संस्थेला पाटणा येथें प्रारंभ केला आहे. ज्यांना पहिल्या प्रतीचे किंवा दुसऱ्या प्रतीचे सभासद होतां येण्या-सारखें नाहीं त्यांनीं दरसाल १२ रुपये वर्गणी सुताच्या संस्थेला देऊन आश्रयदाते व्हावें व खादीच्या चळवळीला मदत करावी, अशी सवड

सुताच्या संस्थेच्या रचनेंत ठेवली आहे. ज्यांना सभासद होणें किंवा आश्रयदाते होणें इष्ट वाटत नसेल पण चळवळीविषयीं ज्यांच्या मनांत कळकळ असेल, त्यांनीं आपल्या धार्मिक व खाजगी समारंभाच्या वेळीं खादी वापरून खादीच्या बाजूचे आपण आहों असें मुद्दाम सर्वांच्या ध्यानीं आणून देण्यास आळस करूं नये; कारण खादीला दिलेल्या असल्या मदतीवरच बहुजन समाजांतील खादीचा फैलाव बऱ्याच अंशीं अवलंबून आहे. सुशिक्षित वर्गांत कळकळ, तत्परता व आस्था खादीच्या चळवळी-संबंधानें आहे असें ज्याप्रमाणें खेडयापाडयांतील लोकांच्या निदर्शनास व अनुभवास येईल, त्याप्रमाणें सुताच्या संस्थेच्या खेडयापाडयांतील स्वयंसेवकांच्या व्यवहारास यश मिळणारें आहे. सुशिक्षितांमध्यें खादीसंबंधानें निदान तंटाबखेडा तरी नाहीं, असें प्रत्यक्ष दृष्टीस पडण्याकरितांच आणि वाद मिटविण्याकरितांच सुताची संस्था म. गांधी ह्यांनीं स्वतंत्र काढली असल्यामुळें, वादविवादाचा व उखाळ्यापाखाळ्यांचा संसर्ग ह्या संस्थेस बाधणार नाहीं आणि सर्व लोक मनोभावें ह्या संस्थेला मदत करून महात्माजींचे मनोरथ होईल तितक्या जलदीनें परिपूर्ण करतील, असा आम्हास भरंवसा वाटत आहे.

---

* नामदार तांबे

नागपूरच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष व स्वराज्य पक्षाचे एक प्रमुख पुढारी ना. तांबे ह्यांनीं नागपूर–सरकारच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलरची. जागा स्वीकारली, ही गोष्ट राष्ट्रहिताच्या दृष्टीनें अत्यंत वाईट झाली आहे. ना. तांबे हुषार आहेत, कर्ते आहेत, आणि देश-कल्याणाची कळकळहि त्यांच्या अंगीं आहे, ह्यासंबंधानें वाद नाहीं. वरील गुण त्यांचें अंगीं आहेत म्हणूनच मध्यप्रांताच्या स्वराज्य पक्षानें त्यांना थोडे दिवसांपूर्वी कौन्सिलचे अध्यक्ष निवडले. देशभक्त पटेल ह्यांना ज्याप्रमाणें असेंब्लीचे अध्यक्ष निवडण्यांत आले त्याप्रमाणें ना. तांबे ह्यांची अध्यक्षाच्या जागीं निवडणूक झाली. अध्यक्ष होणें किंवा सरकारी महत्त्वाच्या कमिट्यांतून काम करणें हिंदी स्वराज्यास अत्यंत धोक्याचें आहे, असें आतां ना. तांबे यांच्या वर्तनानें लोकांच्या निदर्शनास चांगलें आलें आहे. असेंब्लीचा अध्यक्ष किंवा स्टेट–कौन्सिलचा अध्यक्ष एखाद्या गव्हर्नराच्या जागेजवळ किंवा सिमल्याच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलच्या जागेजवळ पोहोंचलेला असतो आणि ह्या मोठया सत्तेच्या नैसर्गिक उबाऱ्याजवळ वसलें असतां कोणाहि मनुष्याच्या अंगचें लोणी विरघळूं लागणें अगदीं साहजिक होतें. सरकारची ही तर भेदनीतिच आहे. मोठया आमिषाच्या परिघांत आणून सोडावयाचें आणि संसर्गानें आमिषास वळी पडण्याची वृत्ति उत्पन्न करावयाची, असें चक्र नेहमीं फिरत असतें. देशसेवा माझ्या हातून होत नाहीं असें वाटल्याबरोबर मी क्षणभरहि ह्या खुर्चीवर बसणार नाहीं, असें अध्यक्षांच्या खुर्चीवर बसल्यानंतर ना. पटेल ह्यांनीं कितीहि

---

* नवाकाळ, ता. १५ आक्टोबर १९२५

सांगितलें तरी त्यांच्या शब्दावर पूर्ण भरंवसा ठेवण्यास लोक तयार होत नाहींत. "यथा स्त्रीणां तथा वाचां साधुत्वे दुर्जनो जनः" हें भवभूतीचें वाक्य येथें बरोबर लागू पडतें. देशसेवेच्या कल्पना अध्यक्षांच्या खुर्चीवर बदलूं लागतात, विचारसरणीला नवें वळण लागतें, बुद्धिभ्रंश होतो; आणि सरकारी नोकरी पत्करण्यानेंच खरी देशसेवा आपल्या हातून होणार आहे असें वाटून नोकरशाहीच्या जाळ्यांत मोठा पुढारी आंस्ते आस्ते सांपडतो! मुंबईचे एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलर आज मुंबईच्या कौन्सिलचे अध्यक्ष आहेत; नागपूर कौन्सिलचे अध्यक्ष ना. तांबे आज एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलर झाले आहेत; स्टेट–कौन्सिलचे माजी अध्यक्ष नागपूरचे गव्हर्नर बनले आहेत; अशा ह्या प्रवाहांत एखादेवेळीं दे. पटेल ह्यांना एखाद्या निरुपद्रवी प्रांताचे गव्हर्नर होतां काय म्हणून पृच्छा करण्यांत येणार नाहीं कशावरून? गव्हर्नर व्हावयाला मोठासा अनुभव लागतो, असें मुळींच नाहीं. कारभाराचा विशेष अनुभव नसतांहि ना. तांबे आज एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलर झाले नाहींत काय? सामान्य बुद्धिमत्ता आणि हजारो लोकांच्या स्वार्थत्यागानें देशाभिमानी ठरलेल्या पक्षाचा पुढारीपणा, इतकी सामग्री जवळ असली म्हणजे नोकरशाहीच्या नेत्रकटाक्षास तो मनुष्य आपोआप पात्र होतो. विरुद्ध पक्षांतील पुढारी फोडणें, हें राजकारणांतील मुख्य अंग आहे. अमात्य राक्षस ह्यांना नंदाच्या पक्षांतून फोडून स्वतःच्या पक्षांत ओढून घेण्याची खटपट चाणक्यानें किती केली, हे मुद्राराक्षस वाचणारांना माहीतच आहे. पुढारी फोडण्यावर बऱ्याच गोष्टी नोकरशाहीच्या अवलंबून असतात. अमका तमका पुढारी फुटला म्हणून किंवा अमका तमका फुटला नाहीं म्हणून राज्यकारभार अधिक सुरळीत चालतो किंवा सुरळीत चालण्याचें बंद पडतें अशांतला भाग मुळींच नाहीं. राज्यकारभाराला ह्या गोष्टीची जरुरी नसते. राज्यकारभार सुधारतहि नाहीं व बिघडतहि

नाहीं. पण एखाद्या मोठ्या पक्षाच्या रंगभूमीवरील प्रमुख पात्र फोडण्याचा नोकरशाहीच्या राज्यकारभाराला चांगला उपयोग होतो. नोकरशाही नेहमीं भिते ती विरुद्ध पक्षाच्या विचारसरणीला भिते, आणि विचारसरणी उर्फ थॉट पुढाऱ्यांच्या मार्फत सदेह व कार्यक्षम बनत असल्यामुळें विचार-सरणीचा नायक (लीडर ऑफ थॉट) फोडला असतां विरुद्ध पक्षाच्या देहावर आघात करण्याचें फळ प्राप्त होतें. आज ना. तांबे एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलर होण्याच्या मोहाला बळी पडून नोकरशाहीच्या घरांत शिरल्यामुळें प्रत्येकजण त्यांना दोष देत आहे, ह्यांचें कारण झालें तरी स्वराज्यपक्षाच्या विचारसरणीला हा काळिमा लागला आहे, हें होय. ना. तांबे स्वराज्य पक्षाच्या इतर पुढाऱ्यांना चिकटून राहिले असते तर त्यांच्या हातून व्यक्तिशः मोठीशी देशसेवा घडली असती असें मुळींच नाहीं. आपल्या परांतून उडून दुसऱ्याच्या घरांत ना. तांबे शिरल्यानें मध्यप्रांत देशसेवेच्या कार्याला मुकणार आहे, असें कोणीच म्हणत नाहीं. नागपूरचे एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलर झाल्यानें रोजच्या राज्यकारभारांत कोणाच्या तरी उपयोगी ते पडत राहातील व सद्बुद्धीनें राज्यकारभार त्यांनीं चालविण्यास सामान्य जनसमूहाचेंहि अल्पस्वल्प प्रत्यक्ष कल्याण त्यांच्या हातून होईल, हें खरें आहे. एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलर झाल्यानें प्रत्यक्ष कल्याण त्यांचें स्वतःचें, इष्टमित्रांचें व सामान्य बहुजनसमाजाचें त्यांच्या हातून जितकें होण्याचा संभव आहे तितकें कल्याण सरकारी नोकरीच्या बाहेर राहून घडवून आणण्याची ताकद ना. तांबे ह्यांच्या अंगीं मुळींच नाहीं, हीहि गोष्ट खरी आहे. मग माफक दमाच्या पुढाऱ्यानें एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलर होण्यानें स्वतःचें, आप्तइष्टांचें व देशाचें प्रत्यक्ष कल्याण होईल तितकें करण्यास कां पुढें येऊं नये? ह्या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, देशभक्तीच्या एका विचारसरणीशीं पुढारीपणाचें नातें जर ना. तांबे ह्यांचें

आलें नसतें तर सरकारी नोकरींत शिरणाऱ्या इतर नोकरांप्रमाणें त्यांनाहि कोणी दोष दिला नसता. एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलरची जागा स्वीकारून स्वराज्य पक्षाचे पुढारी विश्वासाला लायक नाहींत आणि स्वराज्य पक्षाची विचारसरणी मोठया मोठया जागा मिळविण्याच्या पलीकडे जात नाहीं, असा जो मोठा डाग स्वराज्य पक्षाला त्यांनीं लावला आहे, तो डागच राष्ट्रकार्याची हानि करणारा आहे. असली आपल्या पक्षास काळोखी लागल्या-मुळेंच पं. मोतीलाल नेहरू चपापले आहेत, बॅ. सेनगुप्त भांबावून गेले आहेत आणि बॅ. अभ्यंकर ह्यांना अग्नीशेजारीं नवनीत ठेवल्यासारखी स्थिति राष्ट्रीय पक्षाची केली कीं काय, अशी भीति वाटूं लागली आहे ! राजकारणाचीं सूत्रें लोकांच्या हातीं जाऊन राज्यकारभार लोकांच्या विश्वासाच्या पुढाऱ्यांनीं चालवावा, हें स्वराज्याचें स्वरूप आहे. हें स्वराज्य मूर्तिमंत अंमलांत आणण्याकरितां आज बहिष्कार व असहकारिता ह्यांची विचारसरणी सर्व राष्ट्रीय पक्षानें आपापल्या पोटभेदाप्रमाणें कमी जास्ती प्रमाणानें स्वीकारलेली आहे. राज्यसत्तेचीं सूत्रें हातांत घेऊन देशसेवा करण्याचें सुख सोडणें आणि राज्य-सत्तेच्या वैभवाबाहेर राहून शारीरिक व संसारी दुःखांना कवटाळून लोकांच्या अंगीं स्वतःची शक्ति उत्पन्न करण्याच्या मार्गाला लागणें, ही बहिष्काराची व असहकारितेची निष्ठा आहे. दुःखमय तपश्चर्या भावी पिढीच्या सुखासाठींच करावयाची असते आणि राजसत्तेचा सतत त्याग करावयाचा नसतो, हें खरे आहे; पण अकालीं व्यक्तिशः सुखसेवन केल्यानें एकंदर समाजाचें व भावी पिढीचें फार नुकसान होत असतें. राष्ट्रीय कार्याच्या बाजूला खरे बुद्धिवान, स्वार्थत्यागी व कर्ते पुरुष जेव्हां असतात तेव्हांच राष्ट्रीय पक्ष वरचढ होतो. आज राष्ट्रीय पक्षांत सरकारी नोकरांहून लायक पुरुष आहेत म्हणूनच राष्ट्रीय पक्षाच्या विचारसरणीपुढें नोकरशाही फिक्की पडूं लागली आहे. पण पुढारी फुटल्यानें पारडें पालटतें. एखादा सेनानायक माझ्या

कृतीमुळें जर निर्माण करूं शकलो तर तें मोठेंच देशकार्य माझ्या हातून होईल असें मानून आज एक पुढारी कमिटींत गेला, तर आगगाडींतील तिसऱ्या वर्गाच्या उतारूंपैकीं एकाचे जरी हाल कमी झाले तर मी धन्य होईन असें मानून दुसरा दुसऱ्या कमिटींत जातो, आणि तिसरा अध्यक्ष होऊन हळूच एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलर बनतो ! भिंतीचा एकेक दगड हलकें हलके पडत जाऊन राष्ट्रीय पक्षाच्या भिंतीचा मालमसाला नोकरशाहीच्या बंगल्याला उपयोगी पडावा, अशी आज स्वराज्य पक्षाची लांछनास्पद स्थिति ना. तांबे ह्यांनीं करून सोडली आहे ! शिस्त बिघडली ह्यांत संशय नाहीं. पण शिस्तीकडेच नुसतें पाहून स्वराज्य पक्षाचें भागावयाचें नाहीं. लोकांमध्यें स्वावलंबनाची शक्ति पूर्णपणें उत्पन्न होईतों अग्निपासून नवनीत दूर ठेवण्याची खबरदारी घेण्याकरितां कौन्सिलबाहेरीलच कामावर विशेष लक्ष पोहोंचविणें स्वराज्य पक्षास जरुरीचें नाहीं काय ?

* कंटाळवाणा चरखा !

म. गांधी आणि सर रवींद्रनाथ टागोर ह्या दोघांमध्यें हातानें सूत काढण्याच्या चळवळीसंबंधानें काव्याच्या दृष्टीचा एक वाद चालला आहे. कवि ह्या नात्यानें सर रवींद्रनाथ टागोर यांनीं हातानें सूत काढण्याच्या चळवळीविरुद्ध टीका केली असून, सदर टीकेला महात्माजींनीं गेल्या 'यंग इंडिया'चे अंकांत उत्तर दिलें आहे. हातानें सूत काढण्याच्या चळवळीवर सर रवींद्रनाथ टागोर ह्यांचा मुख्य आक्षेप असा आहे कीं, चरखा घेऊन हातानें सूत काढणें हें काम बुद्धीची तरतरी नाहींशी करणारें असून, ह्या उद्योगधंद्यांत काव्यहि कोठें नाहीं ! बुद्धिमंदाचें कंटाळवाणें काम सर्वांच्या मागें लावण्यांत अर्थ कोणता ? बुद्धिमंदांना श्रेष्ठत्व द्यावयाचें म्हणजे शास्त्राच्या वाढीची हानि करावयाची आणि काव्याच्या प्रसाराला अडथळा करावयाचा, इतकेंच नव्हे तर सर्वांचा संसार नीरस व कंटाळवाणा करून टाकावयाचा, असा हातानें सूत काढण्याच्या चळवळीचा परिणाम आहे. यंत्रांची व शास्त्रांची वाढ मनुष्याच्या बुद्धीनेंच केली असून, यंत्रसामग्रीनें व शास्त्रीय ज्ञानानें मनुष्याच्या बुद्धींतील अहंकारास रमविण्याकरितां पाहिजे तेवढें मोठे मैदान मिळत असतें, आणि संसारांत चित्रविचित्रपणा उत्पन्न होऊन संसार काव्यमय होतो. मनुष्यानें मोठमोठीं यंत्रें शोधून काढलीं आहेत आणि हीं यंत्रें पृथ्वीच्यावरून नाहीशीं होणें आतां शक्य नाहीं. तेव्हां यंत्राच्याच मागें लागून आपला संसार शक्य तितका सुखाचा आणि काव्याच्या आनंदाचा करून घेणें इष्ट नाहीं काय ? कापूस पिंजत रहा,

---

* नवाकाळ, ता. ७ नोव्हेंबर १९२५

कापसांतील घाण काढून टाक, आणि चरखा फिरवून हजार दोन हजार यार्ड सूत रोजचें काढ, ही कायमची भगभग मनुष्यानें आपल्या मागें कां लावून ध्यावी? कालच्या सारखीच चाती आज फिरणार, आजच्या सारखीच चाती उद्यां फिरणार, तोच चरखा, तोच कापूस, तेंच सूत, ह्याच्यांत नवीनपणा कसा उत्पन्न होणार? नाविन्याशिवाय काव्य नाहीं, अशी स्थिति असल्यामुळें चरख्याची चळवळ नीरस टरेल आणि अखेरीस सर्व लोक कंटाळून यंत्रांच्या गिरण्यामागें जातील असा कवींचा अंदाज आहे. मनुष्यानें यंत्रें शोधून काढलीं तीं अहंकाराच्या तृप्तीसाठींच काढलीं ह्यांत संशय नाहीं. हीं यंत्रें आतां नाहींशीं होत नाहींत हेंहि खरें आहे. पण ह्या यंत्रामुळें मनुष्याच्या अहंकाराची तृप्ति होऊन ज्या राष्ट्रांनीं यंत्र शोधून काढण्यांत पुढाकार घेतला त्या राष्ट्रांचा संसार तरी सुखाचा व काव्यमय झाला आहे काय? मास प्रॉडक्शन ऊर्फ एकाच तऱ्हेच्या नगांचे डोंगराएवढे मोठे ढीग रोज उत्पन्न करणाऱ्या हल्लींच्या मोठ्या कारखान्यांवर कोणते आक्षेप युरोपखंडांत घेण्यांत येत आहेत? एकच नग एकसारखा रात्रंदिवस वर्षानुवर्षें काढावा लागतो; अशा मास प्रॉडक्शन-शिवाय किंवा ढिगांच्या उत्पत्तीशिवाय व्यापारांतील चढाओढीस तोंडच देतां येत नाहीं. ज्यानीं हीं प्रचंड यंत्रें बांधतांना बुद्धि खर्च केली, त्यांच्या बुद्धीला नाविन्याचें व त्याबरोबरच काव्याचेंहि सुख मिळालें हें खोटें नाहीं; ज्याच्याकडे ह्या यंत्रांची मालकी आली त्या भांडवलवाल्याला इतरांवर सत्ता चालविण्याच्या काव्यमय आयुष्याचा लाभ होतो हें खरें आहे; पण इतरांची वाट काय? ह्या दोन इसमांचा संसार काव्यमय सुखाचा करण्याकरितां प्रत्येक गिरणींत राबणाऱ्या हजारो लोकांचा संसार आज कंटाळवाणा झालेला आहे ना? रोजचें तेंच यंत्र, तोच पट्टा, तोच कापूस आणि तोच नग, रोजच्या रोज पाहण्यांत तरी सुख कोणतें? 'अति परिचयादवज्ञा' ह्या

नात्यानें कंटाळा हा आलाच पाहिजे. रोज एका यंत्राभोंवतीं काम करणाऱ्यास नाविन्य प्राप्त होईल काय ? हातानें सूत कांतणाराला तोच कापूस जसा रोजच्या रोज डोळ्यापुढें येतो, त्याचप्रमाणें एका ठराविक यंत्राचा दांडा हातीं धरून बारा बारा तास काम करणारांना कंटाळा येतो. तोच रस्ता, तीच माणसें, तीच इमारत आणि तोच दांडा ! कैदखान्यांतील कंटाळवाण्या क्रमाची छाया प्रत्येक कारखान्यावर नेहमीं पडलेली असते. कारखाना लहान असो वा मोठा असो, यंत्रें बदलण्याची पाळी क्वचित्च येते. शेतांतील खत एका ठिकाणचें काढून दुसऱ्या ठिकाणीं टाकणारा हमाल काय, किंवा नियमितपणें शहर साफ करणारा भंगी काय, ह्यांच्या कामांतील कंटाळवाणा भाग जरतारी रेशमी कापडाचे गठ्ठे रोजच्या रोज गिरणीच्या बाहेर नेणाऱ्या किंवा टांकसाळींतील रुपयांच्या थैल्या रोजच्या रोज डोक्यावर उचलून तिजोरीच्या पेटीकडे पोहोंचविणाऱ्या हमालाच्या कंटाळवाण्याहून निराळा कोठें आहे ? सर्वच कामें कंटाळा उत्पन्न करितात. यंत्राचें नाविन्य प्रथम कांहीं दिवस असतें. पुढें कंटाळा येतो, इतकेंच नव्हे तर यंत्रावरोबर स्वतः बारा बारा तास गरगर फिरणारा मनुष्य स्वतः निर्जीव यंत्रच बनून मनाचा प्रफुल्लितपणा व बुद्धीची तरतरी ह्या दोनहि सुखांना त्याला आंचवावें लागतें ! तेलाचा घाणा एकसारखा फिरविणारा बैल होण्याचें पुरवलें, पण कारखान्यांतील यंत्राकरितां रोजच्या रोज मजकूर पुरविण्याचा बोजा नको, अशी यंत्रामुळें निरुत्साहाची कंटाळवाणी स्थिति उत्पन्न होते. तेंच तेंच काम रोज करावयाचें हा न्याय कोठला ? रोजचा एक व्यवसाय एकाच पद्धतीनें चालवावयाचा, हें मनुष्याच्या स्वतंत्र बुद्धीला केव्हांहि खपणारें नाहीं. 'सततमपि स्वेच्छा दृश्यो नवोनव एष यः' अशी नाविन्याची बाग यंत्रें मुळींच भरून काढीत नाहींत. यंत्रांभोंवती सतत राबणारांना यंत्राचा व त्यावरोबरच स्वतःच्या उद्योगाचा तिटकारा जितका येऊं शकतो तितका

तिटकारा दुसऱ्या कोणत्याहि पदार्थाचा येऊं शकत नाहीं. गरीब स्थितींत असलेल्या मनुष्याला रोज ठराविक वेळीं नुसती भाकर खाण्याचा कंटाळा येतो. भाकरी भात खा; भाकरी खा, भात खा; असें आयुष्य साठ साठ सत्तर सत्तर वर्षें एकसारखें ढकलण्यापेक्षां गर्भावस्थेंतून बाहेर पडण्या-बरोबर कांहीं मुलें मरतात तें अधिक बरें नव्हे काय? पण करावयाचें काय? कंटाळा सोसण्यासहि मनुष्य तयार असतो, काव्य नसलें तरी मनुष्य जीवंत रहातो. दुःख आणि कंटाळा ह्यांच्याशीं झगडण्यांतच आपलें दीर्घायुष्य जावें असा बाणा मनुष्यांत उत्पन्न होतो. तसें नसतें तर आत्महत्येमुळें मानवी प्राणी केव्हांच पृथ्वीतलावरून नाहींसा झाला असता. आज युरोप खंडांत यंत्रामुळें संसार सुखाचा न होतां सोशॅलिस्ट, बोल्शेव्हिक व भांडवल-वाले एकमेकांच्या नरडीचा घोट घेण्यास प्रवृत्त झालेले आहेत! धंद्यांत वैचित्र्य असावें, कामांत वैचित्र्य असावें, व संसारांत नाविन्य उत्पन्न व्हावें, ही इच्छा वाईट नाहीं; पण करावयाचें काय? तेच हातपाय व तेंच नाक-डोळे घेऊन आयुष्याचीं साठ सत्तर वर्षें काढावीं लागतात! लहानपणीं हातापायांचें कांहीं दिवस कौतुक वाटतें, तरुणपणीं नाकाडोळ्यांना कांहीं दिवस महत्त्व प्राप्त होतें, पण इतर सर्व दिवस शरीराच्या ठराविक घाणीशीं झगडत काढावे लागतात. ज्या राष्ट्राला अशा प्रकारच्या ठराविक आणि आंखलेल्या मार्गानें जाण्याचा अभ्यास करतांना कंटाळा येत नाहीं, तेंच राष्ट्र नाविन्याचा व काव्याचा आस्वाद घेण्यास लायक होतें. नित्यकर्माची हेळसांड केली असतां सृष्टिक्रमाप्रमाणें उत्पन्न होणारें नाविन्य उपभोगतांच येत नाहीं. अणुरेणूंपर्यंत सृष्टि निरनिराळी आहे, पण रोजचा क्रम सर्वांचा एकच आहे. विभक्त असलेल्या मण्यांमध्यें सूत जसें गोवलें जावें त्याप्रमाणें रोजचा नित्यक्रम सर्व भिन्नभिन्न व्यवहारांत एकसारखा गोंवला गेलेला आहे. ह्या नित्यक्रमाला मनुष्य कंटाळतो, हें बुद्धीच्या तरतरीचें लक्षण

नसून बुद्धिमांद्याचेंच लक्षण होय, असें सर्व तत्त्ववेत्यांचें मत आहे. यम-नियमाला कंटाळून चालत नाहीं. यमनियमाला कंटाळलें असतां आसनच डळमळीत होतें, आणि बुद्धीच्या प्रसन्नतेचें सुख कधींहि प्राप्त होत नाहीं. सत्कार्यानें बुद्धि प्रसन्न होते, इतर कशानेंहि प्रसन्न होत नाहीं. राष्ट्रा-राष्ट्रांमधील व्यापारी चढाओढींत एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राचें रक्त-शोषण करण्याची पद्धत जर बंद पडावयाची असेल तर प्रत्येक राष्ट्रांत रावापासून रंकापर्यंत प्रत्येकानें रोज राष्ट्राच्या उदरपोषणाचा व राष्ट्राच्या कपडयालत्त्याचा धंदा राष्ट्रांतच नीट चालावा म्हणून अर्धी घटका पाव घटका नित्यकर्म म्हणून रावण्यास तयार झालेंच पाहिजे. ही तयारी दृष्टीस पडल्याशिवाय रक्तशोषणाचें काम बंद पडावयाचें नाहीं. यंत्र अमर होवो, निरनिराळ्या उद्योगांना लाखो फाटे फुटून नाविन्य उत्पन्न होवो, पण ह्या सर्वांची जोपासना नीट होण्यास हिंदुस्थानसारख्या देशास हातानें थोडा वेळ तरी सूत काढण्याचा रोजचा अभ्यास करून सत्कार्याचा प्रसाद त्या अभ्यासांत सद्बुद्धीनें घातल्याशिवाय आज गत्यंतर नाहीं.

———

* नवे संभाजी

पं. मोतीलाल नेहरू ह्यांच्या विरुद्ध नोकरशाहीवाल्या पोटभेदाचें बंड पुकारतांना बॅ. जयकर ह्यांनीं पुण्यास जयकर–केळकर ह्या जोडीला शिवाजी संभाजी म्हणवून घेतलें! बॅ. जयकर हे नवे शिवाजी असून रा. केळकर हे नवे संभाजी आहेत. ह्या नव्या किताबांची वाटणी करतांना बॅ. जयकर स्वतः शिवाजी झाले आहेत, हें त्यांच्या नेहमींच्या वकिली बाण्याला जरी धरून असलें तरी संभाजीचा किताब त्यांनीं भलत्यालाच दिला असें त्यांचें त्यांनाहि वाटणें शक्य नाहीं. शिवाजी आणि संभाजी अशीं नांवें वापरण्याऐवजी कलुषा आणि सभाजी अशीं नांवें वापरलीं असतीं तर बरें झालें असतें. अंगठीवरील खड्यासारखें व्यवहार्य राज्य असावें, सर्व हिंदुस्थानच्या उलाढालींत पडूं नये, आणि स्वतःच्या चैनीपलीकडे पाहूं नये, असाच पोक्त व व्यवहार्य सल्ला कलुषानें संभाजीस दिलेला होता व जयकर ह्यांचा नोकऱ्या मिळविण्याचा सल्लाहि वरील तऱ्हेचाच आहे. दे. केळकर संभाजीप्रमाणें देशभक्त असून महाराष्ट्राला दिल्लीच्या वरवंट्याखालीं चिरडून टाकण्यास संभाजीप्रमाणेंच कारणीभूत होण्याचीं चिन्हें दिसत आहेत. शिवाजीच्यासारख्या दास बाबूंच्या पक्षास त्यांनीं सोडून दिलें आहे, लालजींचा सल्ला त्यांना रुचला नाहीं, म. गांधी ह्यांना भिंतींत गाडून टाकण्याचा प्रयत्न चालूच आहे, आणि पं. मोतीलाल नेहरू ह्यांच्याविरुद्ध तर उघडपणें लढाई पुकारण्यांत आली आहे! अशा स्थितींत कलुषा–संभाजी ह्या जोडीचा नवा अवतार आज महाराष्ट्रांत झाला आहे असें म्हणण्यास हरकत कोणती? जयकर-केळकर स्वतःस शिवाजी-संभाजी म्हणवून घेवोत,

---

* नवाकाळ, ता. १४ नोव्हेंबर १९२५

किंवा इतर लोक त्यांना कलुषा–संभाजी वनवोत, ऐतिहासिक उपमांच्या नादीं सांप्रतच्या चर्चेंत फार लागणें इष्ट नाहीं. असल्या उपमा नेहमीं चुकीच्या असतात. एकमेकांची वाहवा करतांना किंवा दूषणें देतांना असल्या उपमांचा उपयोग होतो, हें खरें आहे. पण श्रीशिवाजी महाराजां-सारख्या ऐतिहासिक विभूतींचें मात्र निष्कारण हसें होतें ! जयकर-केळकर ह्या जोडीनें वंडाचें निशाण उभारल्यामुळें अँग्लो–इंडियन वर्तमानपत्रें आज खूप झालीं आहेत आणि मुंबईचा टाइम्स ह्या वंडाचें एकसारखें समर्थन करीत आहे. आपल्या कृत्याचा काय परिणाम होत आहे ह्याचा विचार दे. केळकर व वॅ. जयकर ह्यांनीं वेळींच करणें जरुरीचें नाहीं काय ? दे. पटेल ह्यांनीं असेंब्लीचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याबरोबर विरुद्ध पक्षास आम्ही आपल्या गोटांत ओढण्यास प्रारंभ केला म्हणून नोकरशाहीला आनंद झाला आहे. आज इंग्लंडचे मुख्य मंत्री मि. बाल्डविन हेहि हिंदु-स्थानासंबंधानें बोलतांना आतां काळजी करण्याचें कारण उरलें नाहीं असेंच म्हणत आहेत. जयकर-केळकर ह्यांच्या बंडाची वातमी ऐकून, खुशाल झोपी जाण्याचे दिवस आतां आले असें नोकरशाहीला वाटल्यावांचून कसें राहील ? म. गांधी ह्यांच्या चार पांच वर्षांच्या चळवळीनें सर्व घाण केली, असा जयकर-केळकर ह्या जोडीचा मुख्य आरोप आहे. महात्माजींच्या असहकारितेच्या तत्त्वाला अनुसरून कौन्सिलांत टक्कर देण्याचें ध्येय स्वराज्य पक्षानें स्वीकारल्यामुळें मोठमोठ्या जागांचें सुख उपभोगणें दोनतीन वर्षें नाहक लांबणीवर पडलें, अशी नव्या संभाजीच्या कंपूची तक्रार आहे. म. गांधी ह्यांच्या असहकारितेच्या चळवळीमुळें स्वराज्य चारपांच वर्षांतहि मिळालें नाहीं, हें खरें आहे; पण बिनदगदगीच्या आणि उपभोगाच्या कलुषाच्या ध्येयामुळें म. गांधी ह्यांच्या चळवळीच्या वेळची लोकांची ताकदहि आज नाहींशी झाली आहे. सीरियामध्यें फ्रेंच सरकार अरबांचा

अमानुष छळ करीत आहे. ह्या छळाच्या वेळीं हिंदुस्थाननें कांहीं तरी हालचाल करावी व अरबांना हस्तें परहस्तें मदत पोहोंचवावी, अशी हकीम अजमलखान ह्यांची इच्छा आहे. ही इच्छा नुसती असून काय करावयाचें? जुलूम प्रत्यक्ष दिसत आहे, पण प्रतिकार कसा करावयाचा? टर्कीवर ओढवलेल्या प्रसंगाच्या वेळीं हिंदु-मुसलमान एक होते, आणि असहकारितेच्या तत्त्वांनीं सर्वांचीं अंतःकरणें भरून गेलीं होतीं. त्यावेळच्या चळवळींत सामर्थ्य होतें. चळवळ करून महात्माजींनीं हें सामर्थ्य उत्पन्न केलें होतें. युवराजांच्या दौऱ्यावर घालण्यांत आलेल्या बहिष्काराच्या स्वरूपानें हें सामर्थ्य प्रकट झालें. हिंदुस्थानांत चाललेल्या चळवळीकडे पाहिलें असतां तुर्कांशीं मिळतें घेणेंच योग्य होय, असे उद्‌गार काढणें फ्रेंच मुत्सद्यांनांहि त्यावेळीं भाग पडले होते. सर्वांच्या निदर्शनास हें सामर्थ्य आल्यामुळें टर्कीवरोवर लढाई पुकारण्यांत अर्थ नाहीं, असें इंग्लंडच्या लोकांना वाटून त्यावेळींच मुख्य मंत्री मि. लॉईड जॉर्ज ह्यांना अधिकारावरून इंग्लंडच्या लोकांनीं काढूनहि टाकलें! हिंदुस्थानांतील चळवळीनें त्यावेळीं वरील प्रकारें टर्कीला अंशतः तरी मदत केली, पण आज स्थिति काय आहे! नव्या संभाजीनीं महात्माजींना काँग्रेसमधून हाकून लावण्यांत जय मिळविला आहे! राजाश्रयाच्या वाटणींवर लक्ष ठेवण्याचें व्रत स्वीकारण्यांत आल्यामुळें हिंदु व मुसलमान, ब्राम्हण व ब्राम्हणेतर, स्वराजिस्ट आणि नोकरीवाले असे नानाप्रकारचे भेद उत्पन्न होऊन सामर्थ्य कोठेंच उरलेलें नाहीं! तीनचार वर्षांपूर्वीचें सामर्थ्य पार नाहींसें करून दुबळेपणा सर्वांच्या गळ्यांत बांधण्याचें काम तडीस नेण्याकरितां जयकर-केळकर ह्या जोडीनें बंडाचें निशाण उघडपणें उभारलें आहे. अशा दुहीच्या आणि बंडाच्या वेळीं हिंदुस्थानांतील लोकमताचा उपयोग अमानुष छळांत सांपडलेल्या अरबांना काय होणार? दुबळेपणा अरबांच्या उपयोगीं पडणार नाहीं, इतकेंच

नव्हे तर ह्या दुबळेपणाच्या दुहीमुळें बरें झालें, मुसलमानांची चांगली खोड मोडली अशा तऱ्हेचे उद्गार लखनौच्या काँग्रेसच्या वेळीं हिंदु–मुसलमानांची एकी करणाऱ्या लो. टिळकांच्या कांहीं अनुयायांकडून आज निघत आहेत. संभाजीची कारकीर्द म्हणतात ती हीच! दुबळेपणा आणि फाटाफूट चोहोंकडे माजून राहिली आहे. स्वराज्य पक्षांत शिस्तीचें महत्त्व अतिशय म्हणून दे. बं. दास नेहमीं म्हणत असत. पण आज बेबंदशाहीची बंडाळी स्वराज्य पक्षाइतकी दुसऱ्या ठिकाणीं सांपडणें शक्य नाहीं, असें म्हणण्याचे दिवस पुन्हां आले आहेत. राष्ट्रांतील हा दुबळेपणा व फाटाफूट पाहून म. गांधी ह्यांनीं हकीम अजमलखान ह्यांच्या इच्छेला मान दिला नाहीं आणि राष्ट्रसंघाकडे हिंदुस्थानच्या काँग्रेसच्या मार्फत अरबांचीं गाऱ्हाणीं मांडण्याचें नाकारलें हें यथायोग्यच झालें. सामर्थ्य नाहीं तर उगीच वळवळ करून काय उपयोग? सामर्थ्य उत्पन्न होईल अशी आतां चळवळ केली पाहिजे. राजाश्रयाच्या पिंडावर डोळा ठेवण्याची वळवळ चळवळीच्या पायरीला कधींहि चढावयाची नाहीं. सांप्रतच्या फाटाफुटीस एका बाजूस सारून नवें सामर्थ्य उत्पन्न करावयाचें असेल तर खादीच्याच चळवळीकडे वळणें भाग आहे, असें महात्माजींनीं हकीम अजमलखान ह्यांना स्पष्टपणें कळविलें आहे. नव्या संभाजीच्या काळ्या छायेंत सांपडलेल्या लोकांनीं संकटांतून मुक्त होण्याकरितां खादीची चळवळ करावयाची नाहीं तर दुसरी कोणती देशसेवा करावयाची?

———

* काँग्रेस आणि उद्ध्यांतील रस

पं. मोतीलाल नेहरू ह्यांचा लढाईच्या कार्यक्रमाचा ठराव कानपूर काँग्रसपुढें गेल्या सोमवारीं वादविवादाकरितां आला असतांना, नेमस्तांकडून त्या ठरावास जसा विरोध ह्यापुढें काँग्रेसच्या बाहेर करण्यांत येईल त्या प्रमाणें काँग्रेसच्या मंडपांतहि बॅ. जयकर वगैरे नोकरीवाल्या पक्षाकडूनहि विरोध करण्यांत आला. ह्या ठरावास काँग्रेसमध्यें विरोध करावा इतकें धारिष्ट्य सब्जेक्ट कमिटीच्या वादविवादाच्या वेळीं बॅ. जयकर ह्यांच्या अंगीं नव्हतें, पण आयत्या वेळीं पं. मदन मोहन मालवीय काशीहून आल्यामुळें आणि त्यांनीं विरोधाचें काम आपल्या शिरावर घेतल्यामुळें नोकरीवाल्या पक्षाच्या विरोधास काँग्रेसच्या मंडपांत वाचा फुटली, अशा तऱ्हेचा खुलासा ह्या विरोधासंबंधी बॅ. अभ्यंकर ह्यांनीं आपल्या भाषणांत केला आहे. असहकारितेच्या चळवळीपासूनच पं. मदन मोहन मालवीय हे, जरा जपून वागा, घाई नको, कौन्सिलांतून निघेल तेवढें पदरांत घ्या, असें म्हणत आहेत. कौन्सिलांत व असेंब्लींत जरूर तेव्हां विरोध करावा, नाहीं तर सहकार्य करावें, असें गोखले–मेथा ह्यांचेंच व्रत पं. मदन मोहन मालवीय ह्यांनीं गेलीं चारपांच वर्षें एकसारखें स्वीकारलें आहे. प्रामाणिकपणानें विरोध करण्यास व प्रसंग विशेषीं बजेट फेटाळून देण्याचा पुढाकारहि घेण्यास पं. मदन मोहन मालवीय ह्यांनीं कसूर केली नाहीं, हेंहि खरें आहे. असहकारितेच्या तत्त्वांबद्दल त्यांना अभिमान आहे, पण हीं तत्वें अंमलांत येऊं शकतील असें त्यांना वाटत नाहीं. कौन्सिलांत शिरून टक्कर देण्याचा मार्गहि पंडितजींना पसंत नाहीं. गयेच्या काँग्रेसपूर्वी कलकत्त्यास भरलेल्या ऑ. इं. कॉं. कमिटीच्या बैठकींत पं. मदन मोहन मालवीय ह्यांनीं वरील

---

* नवाकाळ, ता. ३० डिसेंबर १९२५

प्रकारचींच मतें बोलून दाखविलीं होतीं आणि स्वराज्य पक्षाच्या टक्करीच्या मार्गास विरोध केला होता. गयेच्या काँग्रेसच्या वेळीं स्वराज्य पक्षांत ते सामील झाले नाहींत व कानपूरच्या काँग्रेसमध्यें गेल्या सोमवारीं जी प्रामाणिक नेमस्तांची विचारसरणी काँग्रेसपुढें मांडली तीच विचारसरणी त्यांनीं गया काँग्रेसच्या वेळीं काँग्रेसपुढें मांडली होती. ह्या विचारसरणीला काँग्रेसच्या किंवा स्वराज्य पक्षाच्या कार्यक्रमांत स्थळ नाहीं असें पाहून गेलीं दोन वर्षें काँग्रेसच्या मंडपांत त्यांनीं भाषणहि केलें नाहीं, आणि यंदाहि कानपूरच्या काँग्रेसला हजर राहण्याचा त्यांचा विचार नव्हता. पण नोकरीवाला पक्ष पुढें आला आहे असें पाहून ते आयत्या वेळीं पुढें आले, आणि मला दुजोरा देणारे कोणीतरी यंदा आहेत ह्याबद्दल त्यांनीं संतोष व्यक्त केला ! लो. टिळक जर असते तर त्यांनीं नोकरीवाल्या पक्षासच उचलून धरलें असतें आणि प्रामाणिकपणाचा विरोध करीत असतांना नोकरशाहीच्या घरांतील शक्य तेवढा रस चाखून धष्टपुष्ट होण्यास हरकत घेतली नसती, हाच नोकरीवाल्या पक्षाचा मुख्य मुद्दा पं. मदन मोहन मालवीय ह्यांनीं कानपूरच्या काँग्रेसपुढें ठेवला आणि ह्या मुद्यास बॅ. जयकर ह्यांनीं उचलून धरलें. लो. टिळक ह्यांच्या नांवाची अशा प्रकारें नालस्ती करण्यांत यावी ह्याबद्दल बॅ. अभ्यंकर ह्यांना खेद प्रदर्शित करावा लागला. लो. टिळक ह्यांच्या हयातींत जे दहा मैलांच्या अंतरावरहि लो. टिळक ह्यांच्या जवळ उभे राहूं शकले नाहींत त्यांनींच आतां लो. टिळक ह्यांच्या नांवाचे धिंडवडे काढावे ह्याबद्दल जोरदार भाषेंत बॅ. अभ्यंकर ह्यांनीं निषेध प्रदर्शित केला. उष्टयांतहि रस असतो आणि तो रस भुकेलेल्यांना उपयोगी पडतो, ह्याबद्दल वाद नाहीं. जगांत दारिद्र्य व गरिबी जोंपर्यंत आहे तोंपर्यंत उष्टयाचें हें असलें माहात्म्य कायम रहावयाचेंच ! दुःखमय संसारांत उष्टयाच्या दैव-दुर्विलासाला व्यवहार्य मानणें सर्व गरिबांच्या कपाळीं केव्हांना केव्हां तरी येतेंच; पण व्यक्तीच्या किंवा राष्ट्राच्या अभ्युदयाचा हा मार्ग आहे म्हणून

उपदेश करणें आणि लो. टिळक ह्यांच्या नांवानें उष्टयाचा झेंडा उभारणें म्हणजे लो. टिळक ह्यांच्या स्वावलंबनाच्या व्रताचें हंसें करणें होय ! नोकर-शाहीच्या उष्टयांतील थेंब ना थेंब जोरजोरानें चघळून गिळला पाहिजे, असें बॅ. जयकर ह्यांचे कानपूर काँग्रेसमधील भाषणाचें तात्पर्य आहे ! थेंब ना थेंब कसा गिळावा ? नोकरशाहीचें उष्टेंमाष्टें गरीब हिंदी लोकांना मोह पाडण्याइतकें जरी असलें तरी त्यांत रस बिलकूल न ठेवण्याची खबरदारी नोकरशाही नेहमीं घेत असते, हें विसरतां कामा नये. उसांतील रस पिण्या-करितां नोकरशाही राज्य करीत आहे. उसाचा प्रत्येक करवा नोकरशाही चावून खाते आणि फेकून दिलेल्या चोयटयांत कांहीं रस शिल्लक ठेवीत नाहीं. ह्या फेकून दिलेल्या चोयटयांतहि वाळलेले साखरेचे कण कोठें कोठें असतात आणि ते सर्व कण मोठया शिताफीनें व कष्टानें आपण कां शोधून काढूं नयत, असें नोकरीवाल्या पक्षाचें म्हणणें आहे. नोकरशाही खात असतांना नोकर म्हणून आपण अगदी तोंडाजवळ बसावें म्हणजे ओलसर तरी चोयटया आपल्या मुखांत पडतील व तितके कष्ट वांचतील, असा महत्त्वाचा फायदा लोकांपुढें सांप्रत ठेवण्यांत आला आहे. मॉंटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणांच्या चोयटयांतून जेवढे साखरेचे कण बाहेर काढतां येण्यासारखे आहेत तितके काढण्याचा प्रयत्न कसोशीनें अद्याप झालेला नाहीं आणि एक्स्प्लॉयटेशनचें किंवा रसशोषणाचें कार्य ह्या बाबींत अधिक जोरानें करण्यास पुष्कळ वाव आहे, असें सर मोरोपंत जोशी ह्यांनीं कलकत्ता येथें भरलेल्या नेमस्तांच्या परिषदेंत नुकतेंच बोलून दाखविलें असून, ह्या रसशोषणाच्या किंवा उष्टयाच्या झेंडयाभोवतीं सर्वांनीं जमावें असें आमंत्रण नोकरीवाल्या पक्षाला नेमस्तांच्या परिषदेनें दिलें आहे. प्रामाणिक नेमस्त म्हणवून घेण्यास माझी हरकत नाहीं, अशा तऱ्हेचे उद्गार पं. मदन मोहन मालवीय ह्यांनीं कानपूर काँग्रेसमध्यें काढले आहेत. तेव्हां नोकरीवाला

पक्ष अधिकाऱ्यांच्या ओठाजवळ टपत बसून उष्ट्यांतील रसाचा प्रत्येक थेंब ताजाच्या-ताजा गिळण्याकरितां स्वतः नेमस्त म्हणवून घेण्यास ह्या पुढें कांकूं करणार नाहीं, अशीं चिन्हें दिसत आहेत! स्वतःचीं मतें संभाळून राष्ट्रीय सभेच्या लढाऊ कार्यक्रमास हरएक प्रकारें मदत करण्यास म. गांधी तयार असल्यामुळें असहकारितावादी व स्वराज्यपक्ष ह्यांचा मिलाफ होऊन, नेमस्त व नोकरीवालापक्ष ह्यांच्या उष्ट्याच्या झेंड्याविरुद्ध काँग्रेसला ह्यापुढें झगडावें लागेल ह्यांत संशय नाहीं. उष्टेंमाष्टें का स्वावलंबन, असा प्रश्न राष्ट्रापुढें आहे. उष्ट्यांतील रसाचें महत्त्व गरिबांना असतें, ह्या दुर्दैवी व्यवहाराकडे लक्ष देऊन स्वराज्य मिळणें शक्य नाहीं. माँटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांत पै पैसा तरी रस आहे किंवा कसें, हा वाद राष्ट्रांपुढें नाहीं. वसाहतीच्या धर्तीचें स्वराज्य हें सर्वांत कमी दर्जाचें व नेमस्तांनींहि पसंत केलेलें ध्येय दोनचार वर्षांच्या अवधींत प्रत्यक्ष अंमलांत येण्यास राष्ट्रानें कोणता स्वार्थत्याग केला पाहिजे, आणि कोणता कार्यक्रम स्वीकारला पाहिजे, हा मुख्य प्रश्न आहे. ज्यांच्या घरांत सर्पणहि नाहीं अशा गरीब लोकांना नोकरशाहीच्या गुऱ्हाळाची चिपाडें सर्पणास उपयोगी पडतील हें खरें आहे, पण आपल्या गुऱ्हाळास ह्या चिपाडांच्या सर्पणांचा उपयोग करून, पुन्हां नोकरांनीं आसपासच्या लोकांची बाभळ तोडून दमदार सर्पण नोकरशाहीला द्यावें अशा धर्तीनें राबवून घेणारीं नोकरशाही आहे, हें विसरतां कामा नये. अशा स्थितींत स्वार्थत्यागाच्या व स्वावलंबनाच्या लढाऊ कार्यक्रमाशिवाय तड लागणें मुळींच शक्य नाहीं. ही परिस्थिति ओळखून चिपाडांतील रसाच्या थेंबाचा नाद कानपूर काँग्रेसनें बिलकूल धरला नाहीं, ह्याबद्दल कानपूरच्या काँग्रेसचें जेवढें अभिनंदन करावें तेवढें थोडेंच होणार आहे.

——

* होळकर गादी सोडणार

इंदूरची गादी श्रीमंत सरकार तुकोजीराव होळकर एक दोन दिवसांत सोडणार अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे. इंग्लंडचे प्रसिद्ध बॅ. सर सायमन ह्यांना दहा हजार पौंड म्हणजे सव्वा दीड लाख रुपये अगाऊ बयाणा देऊन खटला चालविण्यास बोलावण्यांत आलें होतें; सर तेज बहादुर सप्रू किंवा लॉर्ड सिंह ह्यांच्यासारखे नामांकित कायदेपंडित कायद्याचा सल्ला देण्यास तयार होते; महाराजांचा मुमताज-प्रकरणाशीं प्रत्यक्ष कांहीं संबंध नाहीं अशा प्रकारच्या चाळीस पन्नास जबान्या इंदूरच्या अधिकाऱ्यांकडून टिपून घेण्यांत आल्या होत्या; दिवाण नरसिंगराव खटल्याची व्यवस्था स्वतः पाहाणार होते, व सर सेहेव सबनीस इंदूरच्या दिवाणाचें काम पाहणार होते; इतकी सर्व तयारी झाल्यावर महाराजांनीं स्वतः राजीनामा देण्याचें ठरविलें, ही गोष्ट राजकारणाच्या दृष्टीनें वाईट झाली, ह्यांत संशय नाहीं ! महाराजांचा राजीनामा दोन तऱ्हेचा आहे, असें म्हणतात. दोन वर्षेपर्यंत महाराजांनीं अज्ञातवासांस इंग्लंडांत रहावें, लष्कर व पोलिस ह्यांजवर युरोपियन ऑफिसर नेमण्यांत यावे, मुमताजच्या प्रकरणामुळें ब्रिटिश प्रजाजनांचें जें नुकसान झालें असेल तें भरून देण्यांत यावें आणि सरकारनें पसंत केलेल्या कौन्सिलच्या मार्फत राज्यकारभार चालविण्यांत यावा; अशा अटींचें राजीनाम्याचें एक स्वरूप होतें. महाराजांनीं राजीनामा अजिबात द्यावा आणि युवराज वयांत येईतों सरकारला योग्य वाटेल त्या रीतीनें राज्यकारभार चालविण्यांत यावा, असें राजीनाम्याचें दुसरें स्वरूप आहे. गादीचा राजीनामा तरी द्या, नाहीं तर चौकशीला तरी उभे रहा, असें

* नवाकाळ, ता. २६ फेब्रुवारी १९२६

हिंदुस्थान सरकारनें सांगितलें असतांना अर्धवट राजीनाम्यास महाराज तयार झाल्यावर सरळ राजीनाम्याशिवाय 'हिंदुस्थान सरकार तरी कसें महाराजांना सोडणार? चौकशीला उभें रहावयाचें नाहीं तर सरळ व संपूर्ण राजीनाम्याच्या थरावरच गोष्ट जाणार ह्यांत शंका नाहीं. नाभाच्या महाराजांनीं जसा राजीनामा दिला तसाच राजीनामा देण्याची पाळी होळकर सरकारवर आज आली आहे. दिवाण नरसिंगराव नाभाहून इंदूरास आले आणि इंदूरासहि राजीनाम्याचीच गोष्ट घेऊन आली! होळकर सरकारच्या राजीनाम्याच्या अगोदर दिवाण नरसिंगराव ह्यांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला आहे असें म्हणतात. नाभाचा राजीनामा व होळकर सरकारचा राजीनामा ह्या दोन गोष्टींमध्यें होळकर सरकारच्या राजीनाम्यासंबंधानें हिंदुस्थान सरकार मात्र उघड्या न्यायाचें चहातें म्हणून त्यांतल्या त्यांत नांवलौकिक मिळवणार ही ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट होय! होळकर सरकारास उघड्या चौकशीची संधी दिली असतांना ती टाळण्यांत आल्यामुळें इतर कोणा संस्थानिकास गुपचूप स्थानभ्रष्ट करण्यांत आल्यास हिंदुस्थान सरकारास ह्यापुढें नैतिक दृष्ट्या दोष लावतां येणार नाहीं, असा होळकर सरकारच्या राजीनाम्याचा परिणाम होणार आहे. होळकर सरकारची चौकशी करण्याकरितां हिंदुस्थान सरकारनें जें कमिशन नेमलें आहे, त्या कमिशनमध्यें दोन मोठीं व्यंगें आहेत. होळकर सरकारच्या बरोबरीच्या नुसत्या संस्थानिकांकडून चौकशी व्हावयास पाहिजे होती; चौकशीचें तसें स्वरूप नसल्यामुळें होळकर सरकारास न्याय मिळाला नाहीं असें चौकशीच्या वेळीं म्हणतां आलें असतें; तेव्हां बरोबरीच्या संस्थानिकांपुढें चौकशीकरितां पुढें उभे रहाण्याचा संस्थानिकांचा जन्मसिद्ध हक्क नष्ट होण्यास होळकर सरकारचा राजीनामा कारणीभूत होणार आहे! संस्थानिक दुबळे व पराक्रमशून्य

झाले आहेत, ह्यांत संशय नाहीं. परंतु दुबळ्यांना देण्याचा न्याय निराळा व सशक्तांना देण्याचा न्याय निराळा, असा पंक्तिप्रपंच हिंदुस्थान सरकारला करतां येत नाहीं. केवळ संस्थानिकांचें कमिशन नसल्यामुळें आपणास न्याय मिळणार नाहीं अशी भीति होळकर सरकारास वाटणें साहजिक आहे. पण राजीनामा द्या किंवा चौकशीला तरी पुढें या असें आव्हान झालें असतां नैतिक दृष्टया आपणांकडे बोल नाहीं हें सिद्ध करण्याकरितां चौकशीला तोंड देणेंच संस्थानिकांच्या हक्कासंबंधानें अधिक उचित होय. होळकर सरकारचे व इंग्रज सरकारचे तहनामे असल्या चौकशीच्या विरुद्ध आहेत. पण तहनाम्यांतील हक्कांवर अवलंबून रहाण्याची ताकद संस्थानिकांमध्यें आहे कोठें ? रेसिडेंटची खुशामत करणारा एक बडा श्रीमंत ह्या पलीकडे संस्थानिकांना दर्जाच राहिलेला नाहीं. पावलो पावलीं रोजच्या व्यवहारांत जर ताटाखालचें मांजर होऊन रहावयाचें तर बडया चौकशीच्या वेळीं तहनाम्यांतील अटींना तरी कोण पुसणार ? चौकशी झाली तरी पदच्युत होणार आणि न झाली तरी पदच्युत होणार, हें खरें आहे. हा शक्तीचा प्रश्न आहे, न्यायाचा नव्हे. तथापि नैतिक दृष्टया विचार केला असतां आपल्याजवळचा सर्व पुरावा प्रसिद्ध करण्याचा मार्ग स्वीकारणें अधिक श्रेयस्कर होय. महाराजांनीं तसा मार्ग स्वीकारला नाहीं ह्यामुळें सर्व संस्थानिकांना ह्यापुढें अधिक त्रास झाल्यावांचून रहाणार नाहीं. इंग्लंडांत दोन वर्षें महाराज जाऊन राहिले तर तेथें काश्मीरच्या सांप्रतच्या महाराजांसारखीं प्रकरणें उद्भवणार नाहींत म्हणून कशावरून ? अशीं नांवें सर्व संस्थानिकांना ठेवण्यास होळकर सरकारच्या राजीनाम्यानंतर लोक कमी करणार नाहींत ! होळकर सरकारनीं राजीनामा दिल्यानंतर कौन्सिलचे दिवाण सर सचनीस झाले काय किंवा इंदूरच्या पोलिस खात्यावर एखादा युरोपियन नेमला गेला काय,

राज्यकारभाराच्या असल्या नेमणुकींना महत्त्व नाहीं. कांहीं युरोपियनांची मनधरणी करावयाची व इतर बाबतींत पाहिजे तसें वागावयाचें ह्याचा अखेर परिणाम काय होतो हें होळकर सरकारच्या सांप्रतच्या प्रकरणावरून संस्थानिकांनीं चांगलें शिकण्यासारखें आहे. तहनाम्यांतील अट व संस्थानिकांचा दर्जा म्हणजे केवळ भ्रमाचा भोपळा होय ! ह्या अटींना व ह्या दर्जांना कस्पटाप्रमाणें मानण्याची ताकद हिंदुस्थानच्या नोकरशाहींत आहे आणि जर वाकडें पाऊल पडलें तर खरपूस प्रायश्चित्त देण्यास नोकरशाही कमी करणारी नाहीं, हेंहि होळकर सरकारच्या राजीनाम्यावरून सिद्ध होणारें आहे. अशा प्रसंगीं दिवाण नरसिंगराव ह्यांचाहि उपयोग होत नाहीं किंवा दिवाण सर साहेब सबनीस ह्यांचेंहि औषध लागू पडत नाहीं. आपला रुपया बदबद वाजत चालला आहे आणि खोटा म्हणून चोहोंकडे गवगवा झाला आहे असें अनुभवास आल्यावर, स्वतःची सुधारणा करून घेण्याकडे व स्वतःस खरा रुपया बनविण्याकडे संस्थानिकांनीं अधिक लक्ष पोचविणें जरुरीचें नाहीं काय ?

---

* छातीवरचें दडपण

राष्ट्रीय सभेच्या आज्ञेप्रमाणें स्वराज्य पक्षाचें चाळीस सभासद असेंब्लींतून उठून गेल्यानंतर दे. पटेल ह्यांनीं केलेल्या भाषणामुळें आपल्या छातीवर दडपण पडलें, असें सरकारतर्फे सर मुडिमन ह्यांनीं बोलून दाखविलें. दडपण पडण्याचें कारण काय? चाळीस सभासद उठून गेले म्हणून सरकार थोडीच पर्वा करीत आहे? अशा रीतीनें उठून जाणें म्हणजे स्वतःस हास्यास्पद बनविणें, असें नोकरशाहीचें मत आहे. स्वराज्यपक्ष उठून गेला आणि राष्ट्रांत स्वराज्य पक्षानें मोठी चळवळ केली म्हणून सरकारास भीति मुळींच नाहीं! असहकारितेची मोठी चळवळ शिखरास पोहोंचली असतांना त्या चळवळीला ज्या नोकरशाहीनें भीक घातली नाहीं, ती नोकरशाही उद्यां थोडीच भीक घालणार आहे! स्वराज्यपक्ष उठून गेला म्हणून सर मुडिमन ह्यांच्या छातीवर दडपण पडलें नाहीं. पटेल साहेब अध्यक्ष ह्या नात्यानें सरकारतर्फें पुढें येणाऱ्या मंजुरींना वादग्रस्त म्हणून असेंब्लीचें कामकाज वारंवार तहकूब ठेवतात कीं काय ह्या भीतीचें दडपण पडलें. दे. पटेल ह्यांनीं गेल्या सोमवारीं असेंब्लींत केलेल्या भाषणांत दोन महत्त्वाचे मुद्दे आहेत. पहिला मुद्दा असा आहे कीं, स्वराज्यपक्ष उठून गेल्यानें असेंब्लीचें लोकमताचें निदर्शक स्वरूप नष्ट झालें आहे. हा मुद्दा म्हणजे स्वराज्यपक्षाच्या उठून जाण्याच्या वर्तनावर अध्यक्षांनीं केलेली टीका होय. अध्यक्षांच्या मतें उठून जाण्याचा अर्थ काय होतो हें जाहीर करण्यापलिकडे पहिल्या मुद्यास महत्त्व नाहीं, असा भाषणांत दे. पटेल ह्यांनीं आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. नोकरशाहीला हा अभिप्राय सम्मत असो वा नसो, सर्व हिंदी राष्ट्राचें मत दे. पटेल ह्यांच्याप्रमाणेंच ह्या

---

* नवाकाळ, तारीख ११ मार्च १९२६

अभिप्रायासंबंधानें आहे, ह्यांत संशय नाहीं. उठून गेलेले चाळीस सभासद म्हणजे लोकमताचें निदर्शक. ह्या नात्यानें असेंब्लीचा खरा जीव होय. हा जीव निघून गेल्यानंतर असेंब्ली प्रेतवत् होते किंवा विधवेच्या स्थिती-प्रत जाते, असें म्हणण्यास कोणती हरकत? पं. मोतीलाल नेहरू ह्यांचें असेंब्लींतील अनुयायी म्हणजे अधिकारारूढ असलेला पक्षच होय, अशा प्रकारचा आपला अभिप्राय थोडे दिवसांपूर्वी असेंब्लींतील एका युरोपियन सभासदानें दिला होता, हें सर्वांना माहीत आहेच. पार्लमेंटरी पद्धत जर खरोखर हिंदुस्थानांत सुरू झाली असती तर पं. मोतीलाल नेहरू ह्यांचेंच मंत्रिमंडळ असेंब्लींत सरकारी खुर्च्यांवर बसून, पं. मोतीलाल नेहरू ह्यांच्याच मंत्रिमंडळाला सरकार म्हणून संबोधण्यांत आलें असतें. पार्लमेंटरी पद्धत अंशतःहि सुरू झालेली नसून सांप्रतची असेंब्ली म्हणजे जबाबदार राज्य-पद्धतीचा एक फार्स असल्यामुळें असेंब्लींतून उठून जाण्याचा प्रसंग पं. मोतीलाल नेहरू ह्यांजवर आज आला आहे. पण लोकनियुक्त सभासदांच्या शक्तीकडे लक्ष दिलें असतां असेंब्लीचे खरे मालक आज पं. मोतीलाल नेहरू ह्यांचा पक्षच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. कायदा तसें बोलत नसेल, पण न्याय तसें बोलत आहे! दे. पटेल ह्यांनीं कायद्याच्या भाषेच्या दृष्टीनें योग्य शब्द वापरले नसले तरी न्यायाच्या दृष्टीनें खरे शब्द वापरले आहेत, ह्यांत संशय नाहीं. अरेरावी राज्यपद्धतींत कायदा व न्याय ह्यांजमध्यें नेहमीं अंतर असतेंच. हें अंतर प्रसंगामुळें विसरून न्यायाची भाषा एकदम सुरू होते. स्वाभाविक जोरानें न्यायाचे शब्द आपोआप बाहेर पडतात आणि न्यायाच्या बतीचा बहुजनसमाज कालांतरानें होऊन कायदा बदलत असतो. प्रसंग असल्या गोष्टींना जबाबदार असतो. प्रसंगाची छाप दे. पटेल ह्यांजवर पडून न्यायाचे शब्द आपोआप त्यांच्या तोंडून बाहेर पडले. हे न्यायाचे शब्द ऐकून आणि तेहि असेंब्लींत अध्यक्षांच्या तोंडून ऐकून नोकरशाही चपापून जाणें अगदीं साहजिक

होतें आणि सर मुडिमन ह्यांच्या छातीवर दे. पटेल ह्यांच्या शब्दाचें दडपण चांगलें पडलें. कायद्याच्या दृष्टीनें विचार केला असतां असेंब्लीतील स्वतंत्र पक्षाचे व इतर पक्षाचे लोकनियुक्त सभासद जोंपर्यंत आपल्या खर्च्यांवर बसलेले आहेत तोंपर्यंत कायद्यानें लोकमताचें निदर्शक समजलें जाणारें असेंब्लीचें स्वरूप कायद्याच्या भाषेंत नष्ट होत नाहीं. असेंब्ली न्यायाच्या दृष्टीनें विधवा झाली असली तरी कायद्याच्या दृष्टीनें सौभाग्यवतीच आहे, आणि मूल–बाळ झालें असतां तें बेकायदेशीर ठरणार नाहीं, असा मुडिमन वगैरे मंडळींचा अभिप्राय आहे ! आम्ही नांवाचे लोकनियुक्त नसलों तरी कायदेशीर लोकनियुक्त आहोंत आणि आमचें हें कायदेशीर नातें तुम्हीं कसें काढून घेतां, अशा तऱ्हेचा वितंडवाद दे. पटेल ह्यांजबरोबर कांहीं लोकनियुक्त व इतर सभासदांनीं सोमवारी सायंकाळीं त्यांच्या घरीं जाऊन केला. आपण न्यायाच्या दृष्टीनें बोलत होतों, कायद्याच्या दृष्टीनें बोलत नव्हतों, तेव्हां तुमचा कायदेशीर हक्क चुकीचा नाहीं; अशा तऱ्हेचें आश्वासन दे. पटेल ह्यांनीं खाजगी बैठकींत दिलें; आणि मंगळवारीं असेंब्लीला सुरवात करतांना असेंब्लीचें लोकनियुक्त स्वरूप नष्ट झालें नसलें तरी बऱ्याच अंशानें नाहींसें झालें आहे, असा आपल्या भाषणाचा खुलासा अध्यक्षांकडून करण्यांत आला. आपल्या कायदेशीर हक्कांच्या विरुद्ध अध्यक्षांचा अभिप्राय आहे म्हणून अध्यक्षांवर निंदाव्यंजक ठराव नोकरशाहीच्या प्रेरणेनें आणण्याचा बेत होता, पण ह्या खुलाशामुळें तो बेत फसला ! निंदाव्यंजक ठराव पुढें आला असतां असेंब्लीची बैठक तहकूब करण्यास जर दे. पटेल प्रवृत्त झाले असते तर सर मुडियम व सर शिवस्वामी अय्यर ह्यांनीं अध्यक्षांच्या खुर्चीपर्यंत धावत जाऊन अध्यक्षांना दोन्ही हातांनीं पकडून तसेंच डांबून ठेवून, अध्यक्षांच्या देखत निंदाव्यंजक ठराव पास करून घेतला असता आणि निंदाव्यंजक ठरावाच्या आधारानें अध्यक्षपदावरून दे. पटेल ह्यांना हांकून देण्यांत आलें

असतें, अशा तऱ्हेचा अंतःस्थ व्यूह रचला गेला होता अशी बातमी मुंबईच्या टाइम्सच्या दिल्लीच्या बातमीदाराचे पत्रांत दिसून येत आहे ! इंग्लंडांत पार्लमेंट सभेंत राजाच्या बाजूचा अध्यक्ष असतांना अध्यक्षाला खुर्चीवर पकडून ठेवून लोकांनीं आपले ठराव पास करून घेतल्याचीं उदाहरणें आहेत. लोकांच्या बतीचा अध्यक्ष असतांना सरकारनें अध्यक्षाला खुर्चीवर दोरीनें बांधून ठेवून आपले ठराव पास करून घेण्याचा दिव्य देखावा हिंदुस्थानच्या पार्लमेंट सभेंत गेल्या मंगळवारीं दृष्टीस पडावयाचा होता; पण दे. पटेल ह्यांनीं आपलें मत न सोडतां कायदेशीर भाषाच वापरण्यास सुरवात केल्यामुळें नोकरशाहीची ती लीला दृष्टीस पडली नाहीं ! असेंब्ली निःसत्व झाली हा आपला अभिप्राय दे. पटेल ह्यांनीं कायद्याची भाषा वापरतांनाहि सोडलेला नाहीं, ही संतोषाची गोष्ट होय. असेंब्ली निःसत्व किंवा विधवा झाली असतांना सरकारनें आपण होऊन असेंब्ली मोडून नव्या निवडणुकीस सुरवात केली पाहिजे, अशी इंग्लंडच्या पार्लमेंटरी पद्धतीची वहिवाट आहे. ह्या वहिवाटीकडे सोमवारच्या आपल्या भाषणांत दे. पटेल ह्यांनीं सरकारचें लक्ष वेधलें, पण तसें कांहीं करण्यास नोकरशाही आज बिलकुल तयार नाहीं. असेंब्लीचे खरे मालक घरांतून निघून गेल्यानंतर जर मुलें बाळें झालीं तर तीं कायदेशीर होतील किंवा कसें ह्या संबंधाचाहि आपला अभिप्राय अध्यक्ष ह्या नात्यानें सोमवारच्या भाषणांत दे. पटेल ह्यांनीं व्यक्त केला आहे. प्रत्यक्ष तशी गोष्ट घडून येईतों एखाद्या विधवेसहि आगाऊ नांवें ठेवणें शिष्टसंप्रदायास धरून नसल्यामुळें तसा अभिप्राय व्यक्त करण्यांत आपण थोडी घाई केली, ही गोष्ट दे. पटेल ह्यांनीं मंगळवारच्या भाषणांत कबूल केली असल्यामुळें सर मुडिमन ह्यांच्या छातीवरील दडपण आतां बरेंच हलकें झालें आहे ! पण दे. पटेल ह्यांनीं आपलें मत बिलकुल सोडलेलें नसल्यामुळें तसाच प्रसंग आल्यास दे. पटेल व सर मुडिमन ह्यांचा खटका पुनः उडाल्यावांचून कसा राहील ?

---

* पहारेकऱ्याला हजार रुपये !

कलकत्त्यांतील दंग्यासंबंधानें लिहितांना अँग्लो-इंडियन पत्रांनीं असें प्रसिद्ध केलें आहे कीं, दोन चार तास घरांवर पहारा करण्याकरितां किंवा घराच्या मालकाला सुरक्षित ठिकाणीं नेऊन पोहोंचविण्याकरितां हजार हजार रुपये कलकत्त्याच्या कांहीं श्रीमंतांनीं युरोपियनांना देऊं केले व कांहींनीं असे हजार रुपये मिळविलेहि ! लुटालूट करणाऱ्या बदमाषांची धाड घरांवर आली असतां टेलिफोन करून ओळखीच्या एका युरोपियनाला पहाऱ्यासाठीं बोलवावें आणि हजारो रुपये द्यावे असें घडून आल्याचीं उदाहरणें आहेत. ज्यांच्या घरांत लाखो रुपयांची इस्टेट सांठलेली आहे त्यांनीं लुटालूट होणार अशी भीति वाटल्याबरोबर हजारों रुपये दोन चार तासांच्या नोकरीसाठीं द्यावेत ह्यांत कांहीं नवल नाहीं. प्राणांवर बेतली असतां हजारों रुपयांना कोण विचारतो ? युरोपियन पहारेकऱ्यांची अशी मागणी करण्यांत आल्यामुळें अँग्लो-इंडियन पत्रें असें म्हणत आहेत कीं, उद्यां जरी स्वराज्य हिंदु लोकांना देऊन टाकलें तरी दोनतीन तासांच्या पहाऱ्यासाठीं हजारो रुपये युरोपियनांना हिंदुस्थानांत कमावतां येण्यासारखे असल्यामुळें स्वराज्यांत इंग्रजांची चंगळच उडणार आहे ! युरोपियनांची जर अशी चंगळ उडणारी आहे, तर देऊन टाकीनात एकदां स्वराज्य, उगीच उशीर कशाला ? स्वराज्य लांबणीवर टाकून इंग्रजांनीं आपलें पैशाचें नुकसान कां करून घ्यावें ? क्लाइव्हसाहेबांच्या वेळेपासून हत्यारबंद इंग्रजाला हजारो रुपये चारण्यास हिंदुस्थानांतील श्रीमंतांनीं कमी केलें नाहीं. हे हजारो रुपये हत्यारबंद इंग्रज पहारेकऱ्याला पूर्वीं कां देण्यांत आले आणि आजहि कां देण्यांत येत आहेत ? इंग्रजी

---

* नवाकाळ, ता. १३ एप्रिल १९२६

लढवय्याहून हिंदी लढवय्या कमी शूर असतो अशांतला भाग मुळींच नाहीं. इंग्रजाहून अधिक शूर असलेले कित्येकसे लढवय्ये कलकत्त्याच्या हिंदी लोकांत आज, सांपडतील, पण त्यापैकीं कोणासहि हजारो रुपये तास दोन तासाला कमविणारा पहारेकरी अशी किंमत स्वप्नीं सिद्धत्व नाहीं. मग इंग्रजांना ही किंमत कोठून आली ? बाजारभाव त्यांचा असा कसा वाढला ? ह्या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, इंग्रजांच्या नीतीला, इंग्रजांच्या स्वभावाला किंवा इंग्रजांच्या मर्दुमकीला ही किंमत देण्यांत येत नसून, इंग्रजांच्या हातांतल्या असलेल्या हत्याराला व त्या हत्यारामुळें बसलेल्या दराऱ्याला ही किंमत देण्यांत येत आहे. फ्रेंचांच्या डुप्लेसाहेबांच्या वेळीं किंवा इंग्रजांच्या क्लाइव्ह साहेबांच्या वेळीं छोट्या युरोपियन लष्कराला जो मान मिळत होता तो मान युरोपियन बंदुकीमुळें आणि गोळीबाराच्या लढाईच्या डावपेंचामुळें न मिळत होता. अत्यंत शूरपणानें व जिवावर उदार होऊन युरोपियनांच्या बंदुकीच्या माऱ्यावर तुटून पडणारे शूर लढवय्ये त्यावेळीं हिंदुस्थानांत कमी नव्हते. पण बंदुकीच्या गोळीबाराच्या लढाईचा नवा अनुभव हिंदी लष्कराला येऊन हां हां म्हणतां शेंकडो लोक दुरून मारतां येतात असा भयंकर गवगवा चोहोंकडे झाला; आणि त्यामुळें इंग्रजी लष्कराचा दरारा बसला. हें हत्यारांचें बळ होय, केवळ मनगटाचें शौर्य नव्हे ! हत्यारबंद युरोपियन पहारेकऱ्यांना पूर्वी फार मागणी होती आणि राजेरजवाडे त्यांच्या मदतीकरितां लाखो रुपये देतहि असत. मदतीकरितां लाखो रुपये घेऊन आपल्या छोट्या-लष्कराच्या बंदुकींतील गोळीचा दरारा चोहोंकडे बसवावयाचा आणि अखेरीस ज्याला मदत केली त्यालाच खाऊन टाकून आपलें राज्य स्थापावयाचें, असा इंग्रजी राज्याचा इतिहास आहे. शस्त्रास्त्रांची आणि यांत्रिक ज्ञानाची ही करामत आहे ! कलकत्त्यास जर दंग्याच्या वेळीं मूळच्या किंमतीहून पांचपटीनें किंवा दसपटीनें अधिक किंमतीनें मशीनगन्स इंग्रजांनीं

विकल्या असत्या तर युरोपियन पहारेकऱ्यांना जेवढ्या मागण्या कलकत्त्यास दंग्याच्या वेळीं आल्या त्याच्याहून शेकडो पटीनें अधिक मागण्या मशिनगन्सना व कांडतुसांच्या माळांना आल्या असत्या. यांत्रिक कलेचा व शस्त्रास्त्रांचा हा प्रभाव आहे, माणुसकीबद्दलच्या आदराचा हा प्रभाव नव्हे! इंग्रजांना हिंदुस्थानांत जशीं शस्त्रास्त्रें वापरण्याची परवानगी आहे तशीं शस्त्रास्त्रें वापरण्याची परवानगी हिंदूंना व मुसलमानांना मिळूं द्या आणि इंग्रजांना ज्याप्रमाणें शस्त्रास्त्रांचा पुरवठा एकसारखा होऊं शकतो त्याप्रमाणें हिंदी लोकांच्या ताब्यांतले भरपूर शस्त्रास्त्रांचें कारखाने हिंदुस्थानांत सुरू होऊं द्या, मग क्षणाच्या पहाऱ्याकरितां कोण कोणास हजारों रुपये देऊन बोलावतो हें तेव्हां अनुभवास आल्यावांचून रहाणार नाहीं. हिंदी राष्ट्र जर अशा रीतीनें सशस्त्र झालें आणि यांत्रिक कलेंत जर निष्णात ठरलें तर हिंदु–मुसलमानांत एखाद दुसरी लढाई होईल हें खरें आहे. पण तशा प्रसंगांतून एकदां पार पडून गेल्यानंतर किरकोळ तक्रारीमुळें मोठ्या शहरांत हिंदु–मुसलमानांच्या दंग्याच्या मिषानें बदमाष चार पांच दिवस एकसारखी लुटालूट करीत आहेत असा देखावा मुळींचं दृष्टीस पडणार नाहीं. अंतःस्थ व्यवस्था हिंदु-मुसलमानांच्या पुढाऱ्यांना आपण होऊन नीट लावावी लागेल आणि तशी व्यवस्था फारसा त्रास न होतां आपोआप लागेलहि. परचक्राचेंहि भय मग हिंदुस्थानास रहाणार नाहीं. परचक्रापासून संरक्षण करण्याकरितां साठसत्तर कोट रुपयांचा मलिदा चारून जो युरोपियन पहारेकरी आज हिंदुस्थानास आपल्या दरवाजावर ठेवावा लागत आहे त्याच्याऐवजी दहावीस कोट रुपयांच्या खर्चांत हिंदी राष्ट्र स्वतःचें संरक्षण करूं शकेल; इतकेंच नव्हे तर फ्रान्सच्या लष्करी शक्तीचा जो दरारा आज सर्व युरोप खंडाला वाटत आहे तोच दरारा हिंदी राष्ट्राच्या लष्करी शक्तीचा स

आशिया खंडाला दरसालच्या वीस पंचवीस कोट रुपयांच्या खर्चानें वाटल्यावांचून रहाणार नाहीं. स्वराज्य म्हणजे कौन्सिलांत व्याख्यानें देण्याचा परवाना नव्हे, अंतःस्थ शांततेकरितां व परचक्रापासून संरक्षण करण्याकरितां शस्त्रास्त्रांची निपज करून व्यवस्थेशीर रीतीनें राष्ट्रांतील शूर तरुणांना तसल्या राष्ट्रसेवेला जुंपणें होय ! हा परवाना जर मिळाला तर आपापसांत डोकीं फोडून इंग्रजांचा धावा करीत तासाला हजार रुपये देतों पण तुम्हीं या, असें म्हणण्याची पाळी हिंदुस्थानावर येईल ही कल्पनाच चुकीची आहे. तुर्कांसंबंधानें असेंच भाकीत करण्यांत आलें होतें, पण पहिल्यांदा कोठून तरी एकदां भरपूर शस्त्रास्त्रांचा पुरवठा झाल्यावर इंग्रजांच्या मदतीशिवाय आज तुर्कांना शस्त्रास्त्रांचे कारखाने काढतां येतात, अंतःस्थ बंडाळी मोडतां येतें, आणि युरोप खंडाच्या कारस्थानावरहि आपलें वजन पाडतां येतें, असा अनुभव आलेला आहे. शस्त्रास्त्रांविषयीं अज्ञान असलेल्या, निःशस्त्र केलेल्या आणि शस्त्रास्त्रांचा पुरवठा काडीचाहि होऊं नये म्हणून अत्यंत दक्षतेनें एकतऱ्हेच्या कोंडवाड्यांत कोंडून ठेवण्यांत आलेल्या लोकांनीं, बदमाषांच्या लुटालुटीची लाट उसळली असतां आपल्या पहाऱ्याकरितां हजारो रुपये हत्यारबंद इंग्रजांना देऊं केलें तर त्यावरून स्वराज्याची नालायकी कशी सिद्ध होते ?

* शर्यतीचा जुगार

इंग्लंडचें फडणीस मि. चर्चिल ह्यांनीं शर्यतीच्या जुगारातील देवघेवीवर शेकडा ५ टक्के कर बसविण्याचें ठरविल्यामुळें इंग्लंडांत शर्यतीच्या जुगारासंबंधानें कडाक्याचा वादविवाद सुरू झाला आहे. दारू आणि शर्यतीचा जुगार हीं दोन भयंकर व्यसनें इंग्रजांच्या हाडींमाशीं खिळलेलीं आहेत. व्यापारांत, उद्योगधंद्यांत, व राजकीय बाबतींत पराक्रमी म्हणवून घेण्याची महत्त्वाकांक्षा जर इंग्रजी राष्ट्रांत नसती तर ह्या दोन व्यसनांनीं इंग्रजांच्या घराद्वारांची रांखरांगोळी केव्हांच केली असती. पराक्रमाच्या हौसेनें राष्ट्र ज्यावेळीं पुढें पाऊल टाकीत असतें त्यावेळीं असल्या व्यसनांना कर्त्या पुरुषांत एक प्रकारचा आळा बसलेला असतो. पण पराक्रमाला घाव नसला म्हणजे हीं व्यसनें उरावर बसून राष्ट्राचा चक्काचूर होण्यास कारणीभूत होत असतात! इंग्लंडचा पराक्रम सांप्रत आटत चालला आहे आणि उद्योगधंद्याच्या फैलावाला अडथळा आला आहे, अशा स्थितींत हीं व्यसनें इंग्लंडला चांगलीं जाचक झाल्यावांचून रहाणार नाहींत. पराक्रमाच्या वेळीं ह्या व्यसनांचा फैलाव इंग्रजांनीं जगभर केला असून जिंकलेल्या राष्ट्रांना तर इंग्रजांचीं हीं व्यसनें अत्यंत त्रासदायक झालीं आहेत. इंग्रजांच्या हाडींमाशीं हीं व्यसनें खिळून राहिलेलीं असल्यामुळें राष्ट्राच्या जिवाला मारून टाकणारें कांहीं विष ह्या व्यसनांत आहे असें इंग्रजांना मुळींच वाटत नाहीं. दारू पिणें व जुगार खेळणें ह्यांत कांहीं कमीपणा आहे असें इंग्रजांचें मतच नाहीं. शर्यतीचा जुगार काय किंवा इतर कोणत्याहि वस्तूसंबंधाचा जुगार काय, जुगार येथून तेथून एकच. पत्त्यांच्या डावांतील

* नवाकाळ, ता. १ मे १९२६

जुगार, गांजिफांचा जुगार, फांशांचा जुगार, सट्ट्यांच्या भावाचा जुगार, कोणत्या वेळीं कोठें किती पाऊस पडतो त्यासंबंधाचा जुगार, सर्व जुगारांचें कार्य व परिणाम एकच असतात. एकदम पैसे मिळविणें किंवा घालविणें जुगारामुळें होत असल्यामुळें, कित्येक महिन्यांच्या उद्योगांत पैसे मिळवण्यासाठीं जी तरतरी मनुष्याच्यां अंगांत उत्पन्न होते आणि ज्या तरतरीमुळें उद्योग सुखद वाटतो ती तरतरी तास दोन तासांत एकदम एकवटली गेल्यामुळें जुगाराच्या वेळीं बेहोषपणा उत्पन्न होऊन तरतरीचें सुख बेहोषपणानें उपभोगावयास मिळतें. दारूच्या व्यसनांचेंहि असेंच आहे. शरीर व मन आरोग्याच्या व प्रफुल्लतेच्या स्थितींत असतांना जी सुखाची लहर उपभोगावयास मिळते त्याच लहरीचा अर्क काढल्यासारखें सुख दारूबाजांना थोडा वेळ दारूच्या एका पेल्यानें प्राप्त होतें. जें शरीरसामर्थ्य आपल्यापाशीं नाहीं आणि तुष्टिपुष्टीचा जो स्वाभाविक आनंद आपल्यापाशीं नाहीं, त्या सर्वांचा खोटा आभास दारूमुळें उत्पन्न होऊन सर्व संपत्तीच्या आनंदांत दारूबाज थोडा वेळ तरी निमग्न होऊन जातो. संसार दुःखमय व कष्टाचा असल्यामुळें खरा आनंद मिळत नसणारांना खोट्या सुखाच्या भजनीं लागणें सोयीचें पडतें. हें बेहोष व बेफिकीर वृत्तीचें सुख घेण्याकडे दुःखीकष्टी समाजाची प्रवृत्ति साहजिक असते. पण असलें व्यसन राष्ट्रास लागलें असतां खऱ्या सुखाला राष्ट्र कायमचें मुकतें ! इंग्लंडच्या पराक्रमामुळें स्वतः इंग्रजांना खऱ्या सुखाला कायमचें मुकण्याचीं दुःखें आज तितकीं भोगावीं लागत नाहींत हें खरें आहे; पण त्यांच्या पराक्रमानें जिंकलेल्या लोकांच्या बोकांडीं मात्र हीं दुःखें कायमचीं बसलेलीं आहेत ! जुगाराकडे असलेल्या दुःखीकष्टी साहजिक प्रवृत्तीला शर्यतीच्या जुगारानें हिंदुस्थानांत अधिक मोहक बनविलें आहे. राज्यकर्त्यांचें व्यसन म्हणून हिंदी लोकांच्या दृष्टीनें ह्या व्यसनाला महत्त्व आलें आहे. साहेबाची ओळख-

देख हे.ण्याला, साहेबाच्या व्यसनांत आम्ही सामील आहों म्हणून मिरवि-ण्याला, आणि साहेबाची सुधारणा आमच्यांत आली आहे म्हणून धन्यता मानण्याला हें व्यसन चागलें उपयोगीं पडतें ! गंजिफांच्या किंवा फाशांच्या जुगाराऐवजीं शर्यतीच्या जुगारांत साहेबाच्या सान्निध्यामुळें प्रतिष्ठितपणा वाटतो. शिवाय बड्या समुदायानें ह्या जुगारांत एकाच वेळीं पडण्यास संधि मिळत असल्यामुळें समुदायाच्या बेहोष वृत्तीचीहि .भर व्यक्तीच्या बेहोष वृत्तींत पडत असतें. पराक्रमी व उद्योगी पुरुषाला बेहोष वृत्तीची तरतरी अल्प अंशानें उपभोगिली असतां तितकीशी त्रासदायक होत नाहीं. किंबहुना साहसी वृत्तीला असल्या तरतरीचे लहान सहान वळसेच उपयोगी पडतात असें ह्या जुगाराचें समर्थन करण्यांत येतें. पण तरतरीची एकदां लालूच लाग.ल ावर त्या नादांत मनुष्य निमग्न होऊन त्याच्या संस.ारांची राखरांगोळी होते ह्यांत संशय नाहीं ! शर्यतीच्या जुगारावर किंवा दारूवर जकात बसवून ह्या व्यसनांना आळा घालण्याचा प्रयत्न जर सरकारनें केला तर त्याबद्दल सरकारास पाठिंबाच विचारी लोकांनीं दिला पाहिजे. पण इंग्लंडांत आज तशी स्थिति नाहीं. कॉन्झव्हेंटिव पक्षाचें मंत्रिमंडळ व्यसनाला आळा घालण्याच्या सद्धेतूनें शर्यतीच्या जुगारावर कर बसवीत आहे असें मुळीच नाहीं. पैसे गोळा करण्याचें एक साधन एवढयाच दृष्टीनें ह्या कराकडे मि. चर्चिल पहात आहेत. पण करामुळें जुगाराला थोडासा आळा बसल्या-वांचून रहाणार नाहीं. हा लहानसा अळहि इंग्रजांना आज सोसवत नाहीं. पार्लमेंट सभेंतील कित्येक कॉन्झव्हेंटिव पक्षाचे प्रतिनिधी, सर्व लिबरल पक्ष, सर्व मजूर पक्ष आणि इंग्लंडचें बरेंच लोकमत शर्यतीच्या जुगारावरील कराच्या विरुद्ध गेलें आहे. इंग्रजांच्या कुटुंबांतील एका पवित्र भावनेला सरकार कोण धक्का देणार अशा तऱ्हेची टीका ह्या करावर करण्यांत येत आहे. घोडयांची निपज चांगली व्हावी ह्या भावनेला धरून ह्या जुगाराची

उत्पत्ति झाला हें खरें आहे; पण अत्यंत वाईट जुगाराचें स्वरूप आतां ह्याला प्राप्त झालें आहे. पवित्र भावनेऐवजीं छानछुकीचा भपका मात्र ह्या जुगाराच्या सभोंवतीं कायमचा वसला आहे. पण इंग्लंडांतले गरीब व श्रीमंत सर्वच लोक ह्या जुगाराला आयुष्याच्या शतकृत्यांतील एक कृत्य असें समजत असतात. दारूला परमेश्वराच्या प्रसाद समजण्यासारखाच हाहि जुगाराचा हट्ट आहे! दारूवर जबर जकात बसविली असतां किंवा मद्यपानाचा प्रतिबंध अंमलांत आणला असतां लोक चोरून दारू अधिक पिऊं लागतील अशी तक्रार हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें नोकरशाही करीत असते, त्याचप्रमाणेंच शर्यतीच्या जुगारावरील कराविरुद्धहि आज तक्रार करण्यांत येत आहे. शर्यतीच्या मैदानावरील देवघेवींवर जर तुम्ही कर बसवला तर मैदानाजवळच्या रस्त्यावर उभे राहून लोक शर्यतीला अनुसरून आपापसांत जुगार खेळूं लागतील आणि जुगाराच्या व्यसनांत खोदलेला लपंडावाच्या भर पडेल, अशा तऱ्हेची टीका माजी मुख्य मंत्री मि. लॉईड जॉर्ज ह्यांनीं केली आहे. हिंदुस्थानांतील मद्यपानप्रतिबंधक चळवळीविरुद्ध जेवढे आक्षेप सरकारकडून घेण्यांत येतात, तेवढे सर्व आक्षेप मि. चर्चिल ह्यांनी करविरुद्ध इंग्लंडांत घेण्यांत येत आहेत. व्यसनाधीन लोकांचे हे आक्षेप आहेत आणि खरा अर्थ ह्या आक्षेपांत कांहीं नाहीं, असें इंग्लंडचें मंत्रिमंडळ सिद्ध केल्यावांचून रहाणार नाहीं. इंग्लंडच्या मंत्रिमंडळाला जी विचारसरणी आतां पटूं लागली आहे, त्याच विचारसरणीचा योग्य सन्मान करून हिंदुस्थानांतील नोकरशाहीनें दारूच्या व शर्यतींतील जुगाराच्या व्यसनांचें उच्चाटण हिंदुस्थानांतून करणें जरुरीचें नाहीं काय?

* इंग्लंडची सद्दी संपली

कोळशाच्या खाणींतील तंट्यामुळें इंग्लंडांत सार्वत्रिक संप सुरू झाला असून, कोळशाच्या खाणींवरोबरच आगगाड्या, मोटारी, वर्तमानपत्रें, वगैरे सर्व कारखानें बंद पडले आहेत. जे कारखाने चालू आहेत, तेथील नोकरांना कारखाना गाठण्यासाठीं सातें आठ मैल पायीं चालावें लागत आहे. ह्यामुळें कारखाना उघडा असला तरी कामकाज कांहीं होत नाहीं. सार्वत्रिक संपाचें संकट इंग्लंडवर ओढवल्यामुळें इंग्लंडची सद्दी संपली असून इंग्रजी साम्राज्याच्या शेवटास आतां प्रारंभ झाला आहे, अशा तऱ्हेचे उद्गार फ्रेंच वर्तमानपत्रांनीं ह्या प्रसंगीं काढले आहेत! स्वतःच्या मनांतील इच्छेला अनुसरून फ्रेंच वर्तमानपत्रें ठोंका करीत आहेत, हें उघड होय. इंग्रजांची सद्दी संपावी व इंग्रजी साम्राज्य विलयास जावें अशी इच्छा फ्रान्स, इटली वगैरे देशांची असणें अगदीं साहजिक आहे. आपल्या मनाच्या चष्म्याला अनुसरून बाहेरचा रंग मनुष्याला दिसत असतो. तेव्हां फ्रान्सला सांप्रतच्या संपांत इंग्लंडच्या विनाश दिसावा, ह्यांत कांहीं नवल नाहीं. अमेरिकन वर्तमानपत्रें फ्रान्सच्या दृष्टीनें ह्या संपाकडे पहात नाहींत. इंग्रजी साम्राज्याचा विनाशकाल जवळ आला आहे, असें ह्या संपामुळें त्यांना वाटत नाहीं. तथापि इंग्लंडच्या बुद्धीनें इंग्लंडला ह्यावेळीं धोका दिला, आणि इंग्लंडची अक्कल चकली, असें अमेरिकेचें म्हणणें आहे. एखाद्या लहान किंवा मोठ्या लढाईला तोंड देऊन त्या आपत्तींतूनहि बाहेर पडण्याची शक्ति इंग्रजी साम्राज्यांत आज आहे, ह्यांत संशय नाहीं. पण इंग्लंडची बुद्धि चकल्यामुळें मोठ्या लढाईची ठेंच

---

* नवाकाळ, ता. ६ मे १९२६

लागल्यासारखें आज इंग्लंडला झालें आहे! ह्या रूपानें नाहीं त्या रूपानें तरी इंग्लंडचें दुखणें बाहेर पडावयाचेंच होतें. पण यादवीच्या रूपानें हा स्फोट झालेला असल्यामुळें संप मोडून स्थिरस्थावर झाल्यावरहि ह्या दुखण्याचे अनिष्ट परिणाम इंग्लंडला फार दिवस भोगावे लागतील, ह्यांत संशय नाहीं. महायुद्धामुळें पैशाचा चुराडा होऊन जर्मनीला दिवाळें काढावें लागलें; फ्रान्सलाहि पैशाच्या टंचाईच्या भोवऱ्यांत गरगर फिरावें लागलें; इटलीमध्यें लढवय्या पक्षाच्या जबरदस्तीमुळें मजुरांचीं बंडें बंद पडलीं; इंग्लंडनें इतके दिवस अब्रूनें काढले, पण इतर राष्ट्राप्रमाणें इंग्लंडनेंहि आज आपली अब्रू गमावली आहे! महायुद्धाच्या अखेरीस इंग्लंडनें जर जबाबदारीनें तुर्की साम्राज्य खाऊन टाकलें असतें आणि माजी मुख्य मंत्री मि. लॉईड जॉर्ज ह्यांना टर्कीच्या लढाईत शेपन्नास कोट रुपये उधळण्यास जर परवानगी दिली असती तर परक्याच्या घरांत स्वतःच्या बेकारांना जेवूं घालण्याची व्यवस्था इंग्लंडला करतां आली असती. कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षानें मि. लॉईड जॉर्ज ह्यांना घोडयावरून खालीं ओढलें, पण कॉन्झर्व्हेटिव्ह पक्ष अधिकारारूढ होण्याबरोबर उद्योगधंद्याच्या खालावलेल्या स्थितीशीं कशी टक्कर द्यावयाची हा प्रश्न कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षापुढें आला आणि मि. बाल्डविन ह्यांना बावरल्यासारखें होऊन सुसंरक्षित व्यापाराचें तत्त्व मि. बाल्डविन ह्यांनीं मान्य केलें. त्याबरोबर पुन्हां दुसरी निवडणूक होऊन मजुरांचा पक्ष एक वर्षभर अधिकारारूढ झाला. मजुरांचा पक्ष सोशॅलिस्ट मतांकडे वळत आहे आणि रशियाशीं स्नेह संपादन करून इंग्लंडच्या व्यापाराला नवें कुरण उत्पन्न करीत आहे, असें पाहून कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षानें पुन्हां निवडणुकीचा प्रसंग आणला आणि मि. बाल्डविन पुन्हां मुख्य मंत्री झाले. रशियाला वाळींत टाकावयाचें, चीनमध्येंहि रशियाशीं झुंजत रहावयाचें, आणि युरोपखंडांत सर्वांना

रशियावर बहिष्कार घालावयास लावून रशियाची खोड मोडावयाची, ह्या धोरणानें कॉन्झर्व्हेटिव्ह पक्ष वागूं लागल्यानें युरोपखंड स्थिरस्थावर होईना आणि इंग्रजी व्यापाराची सोय लागेना अशी स्थिति प्राप्त झाली ! इंग्लंडला दरसाल ३० कोट पौंड म्हणजे सांडेचार अब्ज रुपये अन्नसामग्रीकरितां परदेशांना द्यावे लागतात. सांडेचार अब्ज रुपये इंग्लंड कसें देतें ? परदेशांत इंग्लंडनें गुंतविलेलें भांडवल, इंग्लंडनें गुंतवलेल्या भांडवलावरील व्याज, बंदर भांडवलाच्या कारखान्यांतील इंग्रजी नोकरांचीं पेन्शनें व शिलक, परदेशींच्या राज्यकारभारांतील इंग्रजी नोकरांची पेन्शनें व शिलक, इंग्रजी जहाजांकडून जगभर होत असलेल्या व्यापाराच्या ने-आणींतील इंग्रजांचा फायदा व शिलक, ह्या रूपानें अन्नसामग्रीचा मोबदला देण्यांत येतोच; पण त्याशिवाय दगडी कोळसा, लोखंड, पोलाद, आगगाडयांचीं यंत्रे, जहाजें, सूत व कापड ह्या मालाच्या रूपानें अन्नसामग्रीचा मोबदला देण्यांत येऊन इंग्लंडला फायदा चांगला मिळतो. पण दगडी कोळसा, लोखंड व पोलाद व त्यावरोवर सूत व कापड ह्या जिनसासंबंधानें परदेशच्या भावाशीं इंग्लंडला आज टक्कर देववत नाहीं. त्यामुळें अन्नसामग्रीकरितां सांडेचार अब्ज रुपये दरसाल कसे भरावयाचे, ह्याची काळजी इंग्लंडला लागली आहे. इंग्लंडच्या दगडी कोळशाच्या खाणींतून पंचवीस कोट टन दगडी कोळसा दरसाल बाहेर पडतो. ह्यापैकीं तीन चतुर्थांश माल इंग्लंडांतच खपतो, बाकीच्या एक चतुर्थांश मालाला युरोपखंडांत गिऱ्हाईक नसल्यामुळें खाणींतील मजुरांना पोटभर मजुरी देण्याचें सामर्थ्य इंग्लंडच्या कारखान्यांचे अंगीं राहिलेलें नाहीं. इंग्लंडच्या दगडी कोळशाच्या खाणींची ही स्थिति पाहिली असतां इंग्लंडच्या शरीराला कोठे तरी मोठा रोग झालेला आहे असें म्हणणें भाग पडतें ! इंग्लंडांत चांगलें पीक उत्पन्न होण्यासारख्या व पाण्याचा पुरवठा असलेल्या जमिनी ओसाड पडाव्यांत आणि इंग्लंडनें

साडेचार अब्ज रुपयांची अन्नसामग्री परदेशांत खरेदी करावी हा न्याय तरी कोठला ! इंग्लंडच्या दगडी कोळशाच्या खाणींचे इतके निरनिराळे विभाग आहेत कीं, एकंदर पंधराशें बोर्डांतील निरनिराळे सूत्रचालक ह्या खाणींच्या बोकांडीं बसले आहेत असें म्हणतात ! हिंदुस्थानांतील शेतीचे जसे लहान-सहान विभाग पडले अहेत तसे इंग्लंडच्या खाणींचे पंधराशें विभाग अहेत. परदेशी मालाशीं टक्कर देण्यास असले विभाग मोडून खाणींचे मोठमोठे गट बनविल्याशिवाय व यंत्रांत दुरुस्ती केल्याशिवाय सोय नाहीं, अशी इंग्लंडच्या खाणींची नाडीपरीक्षा करण्यांत आली आहे. ह्या नाडी-परीक्षेच्या रिपोर्टाला पुढें यावयास एक वर्ष लागलें आणि एका वर्षांत पंधरा कोट रुपयांची मदत सरकारी तिजोरीला करावी लागली. मोठे गट पाडून नवीं यंत्रें आणून तरी मजुरांना पोटभर मजुरी मिळेलच अशी खात्री कोणास वाटत नसल्यामुळें मजुरांनीं मजुरी कमी घ्यावी असें टुमणें मजुरांच्या मागें लावण्यांत आलें, आणि शेवटीं सार्वत्रिक संपाचा प्रसंग ओढवला ! मजुरांची मजुरी कमी करण्याचा हट्ट कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचा आहे. मजुरी कमी केल्याशिवाय शेतकीसंबंधानें आपलें बस्तान कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षास नीट बसवितां येत नाहीं. टर्कीचें राज्य घशांत टाकून जें बस्तान बसविण्याचा मि. लॉइड जॉर्ज ह्यांचा हेतु होता तेंच बस्तान बसविण्याचा हेतु मजुरांच्या मजुरीवर हल्ला चढविण्यांत कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचा आहे. तुर्की लढाईसारखीच ही लढाई आहे. मि. लॉईड जार्ज ह्यांनीं तुर्की लढाई सुरू केली असती; तर इंग्रजांची सद्दी संपली, असें फ्रान्स किंवा इटली ह्यांना वाटलें नसतें. पण यादवीच्या स्वरूपाची सांप्रतची लढाई असल्यामुळें आतां इंग्लंडची सद्दी संपली, असें इंग्लंडच्या प्रतिस्पर्ध्यांस वाटल्यास त्याबद्दल त्यांस दोष कसा देतां येईल ?

---

* टिळक आणि प्रतियोगी सहकारिता

देशोद्धारे प्रवीणं टिळक–सुचरितं
ध्यायते तद्वरेण्यम् ।
उद्दीप्तं राष्ट्रभक्त्या जनपदहृदयं
यस्य कारानिवासैः ॥
श्रद्धाकांक्षः स्वराज्ये परिणतवचसा
भारतो यस्य जातः ।
दृश्यो गीतारहस्ये विमलयतु
गुरुर्नो धियो लोकमान्यः ॥

काँग्रेसच्याविरुद्ध नोकरीवाल्या पक्षानें जें निशाण उभारलें आहे त्या निशाणाच्या बुडाशीं रिस्पॉन्सिव्ह कोऑपरेशन किंवा प्रतियोगी सहकारिता हें तत्त्व प्रमुख आहे, लो. टिळक ह्यांनीं अमृतसरच्या काँग्रेसला जात असतां वाटेंत बादशहांना तार करून प्रतियोगी सहकारितेचें तत्त्व पुढें आणलें आणि त्या तत्त्वाला धरूनच आजचा नोफरीवाल्यांचा कार्यक्रम आंखलेला आहे आणि लो. टिळक जर हयात असते तर त्यांनीं हाच कार्यक्रम आज उचलला असता असें नोकरीयाल्या पक्षाचें म्हणणें आहे! लो. टिळक हयात असते तर काय झालें असतें हा वाद घालीत बसण्यांत हंशील नाहीं. प्रसंगानुसार राजकीय परिस्थिति जसजशी बदलते तसतसे राजकारणहि बदलत जातें. तथापि राजकारण बदलत असतांना मुख्य तत्त्वाकडे दुर्लक्ष केल्यानें मोठी हानि होते! लो. टिळक ह्यांच्यासारख्या विभूतीच्या पुण्यतिथीच्या किंवा जयंतीच्या समारंभाचे वेळीं प्रमुख राजकीय

---

* नवाकाळ, ता. ३१ जुलई १९२६

तत्त्वें त्यांच्या चरित्रांत कशीं गोवलेलीं आहेत आणि त्यापासून प्रोत्साहन आपण कसें घ्यावें एवढेंच त्यांच्या अनुयायानीं पहावयाचें असतें. लो. टिळक ह्यांच्या चरित्राकडे पाहिलें असतां महा मा गांधी यांच्या असहकारितेचाच मार्ग आजच्या घटकेसहि त्यांना पसंत पडला असता यांत संशय रहात नाहीं. कारण आरंभापासून इतीपर्यंत त्यांचें चरित्रच असहकारितेनें भरलेलें आहे; तथापि लो. टिळक आज म. गांधींच्या बाजूचे झाले असते किंवा दे. केळकर ह्यांच्या बाजूचे झाले असते हा वाद एका दृष्टीनें आज गौण समजला जात आहे. तेव्हां तो वाद एका बाजूला ठेवून रिस्पॉन्सिव्ह कॉऑपरेशन उर्फ प्रतियोगी सहकारिता आणि काँग्रेसचें धोरण ह्यासंबंधानें त्यांचीं मतें इंग्लंडांतून आल्यापासून म्हणजे डिसेंबर-जानेवारी १९१९-२० पासून जून १९२० अखेरपर्यंत कोणतीं होतीं हें केसरीमधील त्यांच्याच लेखांवरून व भाषणांवरून त्यांच्या जयंतीच्या व पुण्यतिथीच्या निमित्तानें वाचकांपुढें ठेवण्याचें योजलें आहे. अमृतसरच्या काँग्रेसहून परत आल्यानंतर लो. टिळक ह्यांनीं ता. १९ माहे जानेवारी १९२० च्या केसरीचे अंकांत "काँग्रेसचा तिहेरी लढा" आणि "बादशहास टिळकांची तार आणि तिचे तारवटलेले टीकाकार" असे दोन लेख प्रसिद्ध केले आहेत. जून १९२० अखेरपर्यंत रा. खाडिलकर केसरीचे संपादक होते आणि त्यावेळीं लो. टिळकांनीं स्वतः रिस्पॉन्सिव्ह कॉऑपरेशन उर्फ प्रतियोगी सहकारिता आणि अमृतसरच्या काँग्रेसचें धोरण ह्यासंबंधानें स्वतः लेख लिहून व केसरींत प्रसिद्ध झालेलीं भाषणें नीट तपासून लो. टिळक यांनीं आपल्या मतांचा उहापोह केलेला आहे. प्रतियोगी सहकारिता हा शब्द बॅ. बॅपटिस्टा ह्यांनीं प्रथम कसा सुचविला व होमरूल स्पेशलमधें हजर असलेल्या बॅ. बॅपटिस्टा, दे. केळकर, रा. ब. चिंतामणराव वैद्य, दे. गंगाधरराव देशपांडे वगैरे पुढाऱ्यांनीं बादशहास पाठविलेल्या तारेस

संमति कशी दिली इत्यादि गोष्टी सांगून लो. टिळक ह्यांनीं रिस्पॉन्सिव्ह को-ऑपरेशन उर्फ प्रतियोगी सहकारिता ह्याचा अर्थ स्वतः येणेंप्रमाणें दिला आहे. "Responsive (प्रतियोगी) हा शब्द सहकारितेला प्रायः लावीत नाहींत हें खरें, पण त्याच कारणामुळें प्रस्तुतच्या तारेंतील ह्या शब्दाकडे टीकाकारांचें विशेष लक्ष जावयास पाहिजे होतें. बादशहाच्या जाहीरनाम्यांत सहकारित्वाचा उपदेश नोकरशाही आणि प्रजा या दोघांसहि केला होता. टिळकांच्या मतें प्रजेस हा उपदेश करणें जरूर नव्हतें. कारण प्रजेच्या कल्याणाच्या गोष्टींत प्रजेनें आपण होऊन कधी अडथळा आणला नाहीं किंवहुना आणणेंहि शक्य नाहीं. आजपर्यंत जो अडथळा आणि विरोध झाला तो सर्व नोकरशाहीचा. ही नोकरशाही जर सहकारिता करावयास तयार असेल व करील तर त्याला प्रतियोगित्वाच्या नात्यानें म्हणजे जबाबाला प्रतिजबाब म्हणून लोकहि सहकारिता दाखविण्यास तयार आहे असें बादशाहास आश्वासन द्या, असा टिळकांच्या ह्या तारेचा अर्थ होता. पण एवढया खोल पाण्यांत शिरावें कोणी? आपल्याप्रमाणें टिळकहि अविचारी आणि घाईनें काम करणारे असतील अशा समजुतीनें टीकाकार टिळकांवर तुटून पडले आहेत. पण मूळ पायाच जेथें खोटा तेथें टीका तरी कशी खरी ठरणार?... सहकारिता नेहमींच दोहों बाजूंकडे सापेक्ष असते. त्यांतून जी गोष्ट प्रजेच्या कल्याणाची तींत सहकारिता करा हें प्रजेस सांगावयासच नको. स्वतःच्या कल्याणास आडकाठी घालणारा मनुष्य पशु समजला पाहिजे. म्हणून सहकारित्वाचा उपदेश प्रजेस करणें योग्य नव्हतें. या कामांत आजपर्यंत जर कोणी आडकाठी घातलेली असली तर ती नोकरशाहीनें. यासाठीं बादशहाच्या आज्ञेबरहुकूम सहकारिता करण्याची नोकरशाहीची तयारी असल्यास लोकहि आपल्या बाजूनें सहकारिता करण्यास तयार आहेतच, नसल्यास मात्र विरोध करावा लागेल; असा टिळकांच्या तारेचा खरा मथि-

तार्थ आहे आणि ह्याच अर्थाचे शब्द जर काँग्रेसच्या ठरावांत पहिल्यापासूनच योजण्यांत आले असते तर मग त्यास कोणी विरोध केला नसता. पण हें तत्त्व पंडितजींनीं आपल्या भाषणांत जरी कबूल केलें होतें तरी त्यांनीं पुढें आणलेल्या ठरावांत "सहकारिता" येवढाच नसता शब्द वापरला असल्यामुळें वाद माजला. आणि अखेरीस सहकारितेच्या स्वरूपाबद्दल कांहींच न बोलतां नव्या ॲक्टान्वयें आपल्या उन्नतीसाठीं काम करा (Work) येवढयावरच अखेर तडजोड करण्यांत आली. पण मुंबई अगर पुणे येथें आपापल्या खोलींत सर्वज्ञत्वाच्या घमेंडींत वावरणाऱ्या लोकांना ही गोष्ट कशी कळावी?" नोकरशाहीनें प्रथम सहकारिता केली पाहिजे आणि मग लोकांनीं सहकारिता करावयाची असें लो. टिळक ह्यांचें स्पष्ट मत होतें, ह्याबद्दल वरील उतारे वाचणारांना बिलकूल संशय रहाणार नाहीं. बादशहांनीं आपल्या नोकरांना सहकारिता करण्यास उपदेश केला आणि राजकीय कैद्यांना सोडून दिले ह्या संबंधाची लो. टिळक ह्यांची तार असून, स्वराज्याच्या दृष्टीनें मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांचा कायदा म्हणजे नोकरशाहीची सहकारिता असें लो. टिळक बिलकूल मानीत नव्हते. फरिदपूरच्या प्रांतिक परिषदेमध्यें कै. देशबंधु दास ह्यांनीं नोकरशाहीनें प्रथम सहकारिता करावी मग आम्हीहि सहकारिता करूं म्हणून जें तत्त्व जाहीर केलें आणि ज्या तत्त्वाला धरून बंगालच्या कौन्सिलांत दिवाणांच्या पगाराला मंजुरी देण्यास दे. बंधु दास ह्यांनीं पुन्हां नाकारलें, तेंच तत्त्व लोकमान्य टिळक ह्यांनीं वरील उताऱ्यांत विशद करून टेविलें आहे. मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा म्हणजे नोकरशाहीनें प्रथम सहकारितेच्या मार्गानें पुढें केलेला हात, असें दे. बंधु दास ह्याच्याप्रमाणेंच लो. टिळक हेहि मानीत नव्हते. अमृतसरच्या काँग्रेसमध्यें जो लढा पडला होता तो ह्याच मुद्यासंबंधानें पडला होता. सदर लढा "काँग्रेसचा तिहेरी लढा" ह्या मथळ्याखालीं

लो. टिळक ह्यांनीं स्वतः लिहिलेल्या लेखांत स्पष्टपणें मांडला आहे. अमृतसरच्या काँग्रेसमध्यें नेमस्तांनीं भाग घेतला नाहीं. कलकत्त्यास त्यावेळीं त्यांनीं आपली निराळी परिषद भरविली. मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा म्हणजेच सरकारचा रिस्पॉन्स ऊर्फ सहकारिता असें समजून रिस्पॉन्सिव्ह को-ऑपरेशन सरकारशी करतां यावें म्हणून नेमस्तांनीं काँग्रेसमधून फुटून कलकत्त्यास स्वतंत्र परिषद भरविली. तथापि नेमस्तांशीं संगनमत करून "विझांटणाई व त्यांचे बट्टे कल्याण" ह्यांनीं नेमस्तांच्या तर्फेंचा ठराव काँग्रेसपुढें मांडला! पं. मदन मोहन व म. गांधी ह्यांच्याहि मनांत त्यावेळीं मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा म्हणजे सरकारनें पुढें केलेला हात असेंच होतें, आणि त्या समजुतीला अनुसरून लो. टिळक व देशबंधु ह्यांच्या पक्षास पं. मदन मोहन विरोध करीत होते. मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांचा कायदा पास झाला तरी नोकरशाहीला एकसारखा विरोध करून कौन्सिलांत व कौन्सिलाबाहेर टक्कर देण्याची आपली चळवळ काँग्रेसनें बंद पाडतां कामा नये व असली टक्करीची चळवळ चालविली असतां साम्राज्यांतर्गत संपूर्ण स्वराज्य आपणांस दहा वर्षांच्या आंत प्राप्त होईल अशीं रोखठोक तत्त्वें काँग्रेसपुढें व लोकांपुढें मांडून लो. टिळक व दे बं. दास ह्या दोघांनीं त्यावेळीं राष्ट्रीय पक्षाचा झेंडा उभारला होता. आज तुम्ही टक्करीची चळवळ जर सोडून दिलींत, तर दहा वर्षांच्या आंत संपूर्ण स्वराज्य तुम्हास मिळावयाचें नाहीं, इतकेंच नव्हे तर सुधारणांचा दुसरा हप्ता दहा वर्षांचा पुढेंहि यावयाचा नाहीं, हा लो. टिळक ह्यांचा युक्तिवाद म. गांधी व पं. मदन मोहन मालवीय ह्यांना पटून मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा म्हणजे सरकारचा सहकारितेचा हात नव्हे आणि त्यासंबंधानें प्रतियोगी सहकारितेचें तत्त्व लागू करण्याचीहि जरूरी नाहीं असें अखेरीस अमृतसरच्या काँग्रेसमध्यें ठरलें. प्रतियोगी सहकारितेचें तत्त्व

माँटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणांना लागू करणारे बिझांटबाईचे व पं. मदन मोहन मालवीयांचें ठराव होते म्हणून त्यास करून विरोध करणें काँग्रसमध्यें भाग पडलें, असा स्पष्ट खुलासा लो. टिळक ह्यांनीं आपल्या लेखांत केलेला आहे. ह्यावरून प्रतियोगी सहकारितेच्या तत्त्वाची कांस धरून नेमस्तांप्रमाणें किंवा बिझांटबाईच्या म्हणण्याप्रमाणें दिवाणांच्या जागा स्वीकारणें लो. टिळक ह्यांना केव्हांहि रामंत नव्हतें असेंच सिद्ध होत आहे. दे. केळकर आज ज्या मतांचा पुरस्कार करीत आहेत तीं मतें अमृतसरच्या काँग्रेसच्या वेळीं बिझांटबाई व नेमस्त पक्ष ह्यांचीं होतीं. हीं मतें हाणून पाडण्यासाठीं अमृतसरच्या काँग्रेसच्या वेळीं लो. टिळक, दे. बं. दास ह्यांनीं अत्यंत परिश्रम करून काँग्रेसमध्यें विजय मिळविला. ह्या विजयामुळें अमृतसरच्या काँग्रेसनंतर जून अखेरीस आजारी पडेपर्यंत म्हणजे बनारसची ऑ. इं. काँ. कमिटी होऊन जाईपर्यंत लो. टिळक बिझांट पक्ष व नेमस्त पक्ष ह्यांजवर एकसारखे तुटून पडत होते. नोकरशाहीशीं सहकारिता करूं नये म्हणून व माँटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणा म्हणजे नोकरशाहीपुढें केलेला हात असें समजण्यांत येऊं नये म्हणून, लो. टिळक ह्यांनीं शरीर अस्वस्थ असतांहि जे एकसारखे परिश्रम केले त्या परिश्रमांना धाब्यावर बसवून देशभक्त केळकर आज बिझांटबाई व नेमस्तांना मिळाले आहेत!

---

* बंगालखाना आणि खादी

लोकमान्य टिळक ह्यांच्या पुण्यतिथीच्या समारंभास उद्देशून म. गांधी ह्यांनीं महाराष्ट्रास पाठविलेला संदेश फार महत्त्वाचा आहे. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणिं स्वराज्य मी मिळवीनच, ह्या महामंत्राचा उपदेश लो. टिळक ह्यांनीं महाराष्ट्रास व सर्व हिंदुस्थानास केला आहे. ध्येयाची जाणीव व ध्येय गांठण्याचा निश्चय, ह्या दोन भागांचा समावेश लो. टिळक ह्यांच्या महामंत्रांत झालेला आहे. आपल्या लोकांवर लो. टिळक ह्यांचा विश्वास फार होता. इतरांनीं कांहीं म्हटलें तरी आपले लोक स्वराज्य चालविण्यास पात्र आहेत, अशी लो. टिळक ह्यांची खात्री होती. स्वराज्य चालवावयास जरूर तें मनुष्यबळ, जरूर तेवढें द्रव्यबळ व लायक बुद्धिबळ हिंदुस्थानाशीं आहे, ह्या विषयीं लो. टिळक ह्यांना बिलकूल संशय वाटत नव्हता. मुसलमान काय किंवा हिंदु काय दोघांच्याहि अंगीं ऑर्गनायझिंग पॉवर उर्फ संघशक्ति आहे. इतिहासांत हें त्यांनीं सिद्ध करून दाखविलें आहे. दिल्लीपासून दक्षिणेंत व दक्षिणेंतून दिल्लीस त्यांनीं लाखों सैन्य नेलें आहे व आणलें आहे. संघशक्तीशिवाय ह्या गोष्टी होऊं शकत नाहींत. व्यापारी धोरणाचें द्रव्यबळ व यांत्रिक शक्तीची लढाई, ह्या दोन बाबींच्या आधारामुळें इंग्रजांचें बस्तान हिंदुस्थानांत बसलें, पण ह्या दोनहि बाबी अशा आहेत कीं स्वराज्याची संधी मिळाली असतांना एकदोन पिढ्यांच्या अवकाशांत या दोनहि बाबींसंबंधाचें वैगुण्य हिंदी पुढाऱ्यांस सहज काढून टाकतां येण्यासारखें आहे. काँग्रेसच्या राजकीय चळवळीच्या संस्थांवर दृढ विश्वास ठेवून स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण ह्यांची कास धरली

* नवाकाळ, ता. ४ आगस्ट १९२६

असतां, स्वराज्य मिळण्याचा निश्चय सफल झाल्यावांचून राहणार नाहीं, असा लो. टिळक यांचा कार्यक्रम होता. स्वदेशी व बहिष्कार ह्या दोन चळवळींचा उपयोग इंग्रजांच्या व्यापारी धोरणास व यांत्रिक शक्तीस तोंड देणारी नवी शक्ति उत्पन्न करण्याकडे लो. टिळक करीत असत. लो. टिळक ह्यांच्या मार्गानें चळवळ केली असतां राष्ट्र जागें होऊं शकते व इंग्रजांच्या शक्तीचा पाया डळमळूं लागतो, तसा अनुभव म. गांधी ह्यांच्या असहकारितेच्या चळवळीच्या वेळीं सर्वांना आला. पण स्वदेशीची चळवळ काय, बहिष्काराची चळवळ काय किंवा असहकारितेची चळवळ काय, हरएक प्रकारची चळवळ मोठ्या लष्कराप्रमाणें पोटावरच चालत असते. पोटावर चालल्याशिवाय जोराचें धिमें पाऊल पुढें पडत नाहीं. पायाला चालावयास लावणारी शक्ति पोटांत आहे. ऑर्गनायझिंग पॉवर किंवा संघशक्ति केवढीहि मोठी असली तरी पोटावर चालतां येईनासें झालें म्हणजे पाय लटपटूं लागतात आणि जगांतील अत्यंत संघटित व शूर लष्करालाहि माघार खावी लागते, हें महायुद्धांतील जर्मनीच्या पराभवानें सर्वांच्या निदर्शनास चांगलें आणलें आहे! राष्ट्रीय सभेची शक्ति पोटावर कशी चालू शकेल, हा राष्ट्रापुढें आज मुख्य प्रश्न आहे. हिंदुस्थानांतील मोठ्या कंगालखान्याच्या पोटापाण्याच्या प्रश्नाशीं जर राष्ट्रीय सभेची चळवळ संलग्न झाली नाहीं, तर दोन चार वर्षांच्या तडफेशिवाय अधिक महत्त्वाचे हत्यार राष्ट्रीय सभेच्या हातीं कधींहि दिसणार नाहीं. दोन चार वर्षांची तडफ इंग्रजी मुत्सद्दी जिरवूं शकतात, असा राजकीय चळवळीचा गेल्या वीस पंचवीस वर्षांचा इतिहास आहे. ह्या दिशेनें दोन चार वर्षांची तडफ दाखवावी आणि तडफ बंद होऊं लागली म्हणजे थोडा वेळ स्वस्थ बसून पुन्हां दुसरी संधि साधून अवचित निराळ्याच दिशेनें तडफेची लाट उसळावी, असा क्रम राजकीय चळवळींत एकसारखा दिसत आहे. तडफेचा किंवा लढ्याचा

* बंगालखाना आणि खादी

लोकमान्य टिळक ह्यांच्या पुण्यतिथीच्या समारंभास उद्देशून म. गांधी ह्यांनीं महाराष्ट्रास पाठविलेला संदेश फार महत्त्वाचा आहे. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणिं स्वराज्य मी मिळवीनच, ह्या महामंत्राचा उपदेश लो. टिळक ह्यांनीं महाराष्ट्रास व सर्व हिंदुस्थानास केला आहे. ध्येयाची जाणीव व ध्येय गांठण्याचा निश्चय, ह्या दोन भागांचा समावेश लो. टिळक ह्यांच्या महामंत्रांत झालेला आहे. आपल्या लोकांवर लो. टिळक ह्यांचा विश्वास फार होता. इतरांनीं कांहीं म्हटलें तरी आपले लोक स्वराज्य चालविण्यास पात्र आहेत, अशी लो. टिळक ह्यांची खात्री होती. स्वराज्य चालवावयास जरूर तें मनुष्यबळ, जरूर तेवढें द्रव्यबळ व लायक बुद्धिबल हिंदुस्थानापाशीं आहे, ह्या विषयीं लो. टिळक ह्यांना बिलकूल संशय वाटत नव्हता. मुसलमान काय किंवा हिंदु काय दोघांच्याहि अंगीं ऑर्गनायझिंग पॉवर उर्फ संघशक्ति आहे. इतिहासांत हें त्यांनीं सिद्ध करून दाखविलें आहे. दिल्लीपासून दक्षिणेंत व दक्षिणेंतून दिल्लीस त्यांनीं लाखों सैन्य नेलें आहे व आणलें आहे. संघशक्तीशिवाय ह्या गोष्टी होऊं शकत नाहींत. व्यापारी धोरणाचें द्रव्यबळ व यांत्रिक शक्तीची लढाई, ह्या दोन बाबींच्या आधारामुळें इंग्रजांचें बस्तान हिंदुस्थानांत बसलें, पण ह्या दोनहि बाबी अशा आहेत कीं स्वराज्याची संधी मिळाली असतांना एकदोन पिढ्यांच्या अवकाशांत या दोनहि बाबींसंबंधाचें वैगुण्य हिंदी पुढाऱ्यांस सहज काढून टाकतां येण्यासारखें आहे. काँग्रेसच्या राजकीय चळवळीच्या संस्थांवर दृढ विश्वास ठेवून स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण ह्यांची कास धरली

* नवाकाळ, ता. ४ आगस्ट १९२६

असतां, स्वराज्य मिळण्याचा निश्चय सफल झाल्यावांचून राहणार नाहीं, असा लो. टिळक यांचा कार्यक्रम होता. स्वदेशी व बहिष्कार ह्या दोन चळवळींचा उपयोग इंग्रजांच्या व्यापारी धोरणास व यांत्रिक शक्तीस तोंड देणारी नवी शक्ति उत्पन्न करण्याकडे लो. टिळक करीत असत. लो. टिळक ह्यांच्या मार्गानें चळवळ केली असतां राष्ट्र जागें होऊं शकते व इंग्रजांच्या शक्तीचा पाया डळमळूं लागतो, तसा अनुभव म. गांधी ह्यांच्या असहकारितेच्या चळवळीच्या वेळीं सर्वांना आला. पण स्वदेशीची चळवळ काय, बहिष्काराची चळवळ काय किंवा असहकारितेची चळवळ काय, हरएक प्रकारची चळवळ मोठ्या लष्कराप्रमाणें पोटावरच चालत असते. पोटावर चालल्याशिवाय जोराचें धिमें पाऊल पुढें पडत नाहीं. पायाला चालावयास लावणारी शक्ति पोटांत आहे. ऑर्गनायझिंग पॉवर किंवा संघशक्ति केवढीहि मोठी असली तरी पोटावर चालतां येईनासें झालें म्हणजे पाय लटपटूं लागतात आणि जगांतील अत्यंत संघटित व शूर लष्करालाहि माघार खावी लागते, हें महायुद्धांतील जर्मनीच्या पराभवानें सर्वांच्या निदर्शनास चांगलें आणलें आहे! राष्ट्रीय सभेची शक्ति पोटावर कशी चालू शकेल, हा राष्ट्रापुढें आज मुख्य प्रश्न आहे. हिंदुस्थानांतील मोठ्या कंगालखान्याच्या पोटापाण्याच्या प्रश्नाशीं जर राष्ट्रीय सभेची चळवळ संलग्न झाली नाहीं, तर दोन चार वर्षांच्या तडफेशिवाय अधिक महत्त्वाचे हत्यार राष्ट्रीय सभेच्या हातीं कधींहि दिसणार नाहीं. दोन चार वर्षांची तडफ इंग्रजी मुत्सद्दी जिरवूं शकतात, असा राजकीय चळवळीचा गेल्या वीस पंचवीस वर्षांचा इतिहास आहे. ह्या दिशेनें दोन चार वर्षांची तडफ दाखवावी आणि तडफ बंद होऊं लागली म्हणजे थोडा वेळ स्वस्थ बसून पुन्हां दुसरी संधि साधून अवचित निराळ्याच दिशेनें तडफेची लाट उसळावी, असा क्रम राजकीय चळवळींत एकसारखा दिसत आहे. तडफेचा किंवा लढ्याचा

काळ असा बदलावयाचाच. काळहि बदलावा लागतो व स्थानहि बदलावे लागतें, व तसें करतांना सेनानायकाची चतुराई दिसून येते. काळ व स्थान बदलावाच लागतो. सेनानायकाची अक्कल तेथें चालूं शकत नाहीं. युद्धाची सामग्री व पोटावर चालण्याची राष्ट्राची शक्ति ह्या दोन गोष्टींचा बंदोबस्त मुत्सद्यांनीं करावा लागतो, आणि तसा बंदोबस्त झाला नसल्यास सेनानायकाचें तेज फिकें पडतें ! 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' ह्याची जाणीव राष्ट्राला होऊं लागली आहे. प्रत्येक तडफेच्यावेळीं ह्या जाणिवेचा पसारा अधिकाधिक वाढत गेला आहे. गोरगरिबापर्यंत ही जाणीव पसरवून इंग्रजांच्या बरोबरीचे आम्ही आहोंत असें बहुजन समाजासहि म. गांधी ह्यांनीं पटविलें आहे. स्वराज्याची इच्छा गोरगरिबांनाहि उत्पन्न झाली आहे. पण तें स्वराज्य मी मिळवीनच, हा निश्चय बहुजन समाजाचे दृष्टीस पडत नाहीं ! असा निश्चय करण्यास बुद्धिमत्तेमुळें बहुजनसमाज असमर्थ आहे, अशांतला भाग मुळींच नाहीं. बुद्धीनें समजतें पण निश्चय करून त्याप्रमाणें वागणें होत नाहीं. ह्याचें कारण हिंदुस्थानदेश बडा कंगालखाना झाला असून, गोरगरिबांना आपल्या पोटावर राष्ट्राची संघशक्ति वाहून नेतांना किंवा राष्ट्राकरितां पोटावर चालतांना अत्यंत कठीण पडतें, हें होय ! शरीर रोजच्या रोज एकवेळेलाहि नीट रीतीनें पोसणें ज्याच्या पोटाला संकटाचें असतें त्यांच्या हातून स्वतःच्या शरिराकरितां नव्हे तर राष्ट्राच्या शरिराकरितां पोटावर चालणें कसें शक्य होईल ? राष्ट्रकल्याणाकरितां पोटावर चालण्याची कसरत सर्व राष्ट्राला राष्ट्रीयसभेनें शिकविणें आज भाग आहे. स्वराज्याच्या मार्गानें चाललें असतांना, राष्ट्र पोटावर चालूं शकेल अशी युक्ति अंमलांत आणल्याशिवाय, एखाद दुसऱ्या तडफेशिवाय स्वराज्यदृष्टीनें दृष्यफल राष्ट्रीय सभेला दाखवितां यावयाचें नाहीं. स्वदेशी व बहिष्कार ह्या लो. टिळक ह्यांच्या चळवळींतूनच खादीची चळवळ म. गांधी ह्यांनीं

काढली असून, स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, ह्या महामंत्राची पूर्तता खादीच्या मार्फत मी स्वराज्य मिळविणारच, ह्या उत्तरार्धानें म. गांधी करीत आहेत. खादीची चळवळ गोरगरिबांना पोटावर चालण्यास कशी शिकवते व गोरगरिबांमध्यें स्वाभिमान उत्पन्न होण्यास ह्या चळवळीचा फायदा किती होतो, हे बंगाल्यांत सर पी. सी. रॉय, बिहार प्रांतांत बाबू राजेंद्रप्रसाद, कर्नाटकांत दे. गंगाधरराव देशपांडे व मद्रासचे बाजूला दे. राजगोपाळाचारियर ह्यांनीं खादीच्या चळवळीला गेल्या चार सहा महिन्यांत दिलेल्या संघटित स्वरूपावरून सहज लक्षांत येणारें आहे. गोरगरिबांना राष्ट्रीयसभेच्या स्वराज्याशीं व लो. टिळक ह्यांच्या महामंत्राशीं संलग्न करतां येतें, हें चारपांच प्रांतांत प्रत्यक्ष कृतीनें वरील पुढाऱ्यांनीं सिद्ध केलें आहे. प्रयोगाच्या अवस्थेंतून खादी आज बाहेर पडली आहे व प्रत्यक्ष काम कोणत्या स्थितींत किती होऊं शकतें हें कोणास महाराष्ट्रांत पहावयाचें असल्यास चेळगांवास दे. गंगाधरराव देशपांडे ह्यांना भेटलें असतां त्यांचें कार्य डोळ्यांनीं पाहून सर्व शंका दूर होणाऱ्या आहेत. खादीच्या चळवळीवर कानपूरच्या राष्ट्रीय सभेची पूर्ण श्रद्धा असल्यामुळें कानपूरच्या राष्ट्रीय सभेला धरून चाललेल्या निवडणुकीच्या चळवळींतहि खादी प्राधान्येंकरून दिसावी, हें सहाजिक आहे. खादीची चळवळ शेतकऱ्यांत व खेड्यापाड्यांत यशस्वी होऊं शकते, ह्यांत संशय नाहीं. शहरांतल्या लोकांनीं खादी वापरण्याचा जर निश्चय केला तर राष्ट्रीय सभेच्या ह्यापुढील एखाद्या तडफेच्या लाटेच्या प्रसंगीं पोटावर चालण्याची कला राष्ट्रास साध्य होऊन, राष्ट्रीय सभेच्या स्वराज्यासंबंधाची ह्यापुढील लाट यशाला नेऊन पोचविण्याइतकी दमदार ठरणार नाहीं काय !

---

* दरिद्र नारायण

हिंदु-मुसलमानांच्या बेकीसंबंधानें लाला लजपतराय व काँग्रेस पुढारी पं. मोतीलाल नेहरू ह्यांजमधील तंटयांत पडून महात्माजींनीं निवडणुकीच्या वेळीं ज्ञाति-द्वेषास आळा घालावा म्हणून महात्माजींना केलेल्या विनंतीस महात्माजींचें उत्तर आम्ही कालच्या अंकांत प्रसिद्ध केलेंच आहे. येत्या निवडणुकीच्या वेळीं ज्ञातिद्वेषाची छाप निवडणुकीवर पडणार असें सर्वांचें भाकीत आहे. नोकरशाहीला हें पाहिजेच आहे. ज्ञाति-विषयक मतदारांचे संघ मोडून टाकल्याशिवाय ही आपत्ति टळणार नाहीं. ज्ञाति-विषयक मतदारांचे संघ ज्यावेळीं माँटेग्यू–चेम्सफर्ड कायद्यांत शिरले, त्याचवेळीं ह्या आपत्तीस सुरवात झाली. असहकारितेची चळवळ जोंपर्यंत जोरावर होती, तोंपर्यंत ह्या आपत्तीचें स्वरूप पूर्णपणें लोकांच्या समोर आलें नाहीं; पण सदर चळवळीचा जोर कमी होण्याबरोबर नोकरशाहीनें गेल्या तीन वर्षांत ह्या आपत्तीस चांगलें पोसलें असून, निवडणुकीच्या वेळीं ह्या आपत्तीचा पगडा किती बसतो, ह्यासंबंधानें पुष्कळांना चिंता उत्पन्न झाली आहे. मुसलमानांनीं ज्ञाति-विषयक भांडणांचा पूर्ण फायदा घ्यावा, असें पंजाबांत व बंगाल्यांत ठरविलें असून लाला लजपतराय वगैरे हिंदूंचे पुढारी ज्ञाति–विषयक तंटयांना पुढें करून त्याच जोरावर निवडणुकी लढूं पहात आहेत. स्वराज्याचा झेंडा लाला लजपतराय ह्यांनीं आजन्म हातीं धरलेला आहे, तेव्हां ते स्वराज्याविषयीं उदासीन आहेत असें महात्माजी म्हणूं शकत नाहींत. स्वराज्य लवकर मिळणार असें मुसलमानांनाहि वाटत असल्यामुळें आपल्या वांटणीला स्वराज्याचे जेवढे फायदे येतील तेवढे

* नवाकाळ, ता. १० सप्टेंबर १९२६

फायदे पदरांत पाडून घेण्याची मुसलमानांची धडपड आहे. ब्राह्मण-ब्राह्मणेतरांच्या वादांत हाच मुद्दा आहे. राजाश्रयाची वांटणी कशी करावयाची, ह्या धोरणानें हे सर्व वाद चाललेले आहेत. हे वाद बरेच विकोपास गेले असल्यामुळें महात्माजींना स्वतःच्या मध्यस्थीचा कांहीं उपयोग होईल असें वाटत नाहीं. हिंदूंनीं हा वाद सोडून द्यावा तर त्यांच्याकडे दुर्बलतेचा दोष येतो. दुर्बलता स्वीकारण्यापेक्षां लढण्याची तालीम करणें कांहीं वाईट नाहीं, असें महात्माजींचें मत आहे. मुसलमानांना व ब्राह्मणेतरांना स्वराज्य नको आहे असें नाहीं. पण राजाश्रयाचा फायदा आज पाहिजे आहे. काँग्रेस राजाश्रयाच्या फायद्याकडे पूर्ण दुर्लक्ष करण्यास लोकांना शिकवीत असून, पं. मोतीलाल नेहरू ह्यांचें व कानपूरच्या काँग्रेसचें धोरण हिंदु-मुसलमानांच्या वादामुळें एका बाजूस पडतें कीं काय, अशी भीति कांहींना वाटत आहे. ही भीति निराधार आहे असें नाहीं; पण ह्या भीतीमुळें सांप्रतच्या लढ्यात आपण स्वतः पडावें, असें महात्माजींना वाटत नाहीं. जातिद्वेषाचें भांडण त्यांना नको आहे. जातिविशिष्ट अभ्युदय स्वराज्याची पायरी होय, असें समजून त्या दृष्टीनें काम करणें इष्ट नाहीं असें त्यांचें स्पष्ट मत आहे. शिवाय त्यांच्या स्वभावासहि हें काम बिलकूल मानवणारें नाहीं. तेव्हां हिंदु–मुसलमानांच्या तंट्यांत मन न घालण्याची आपली सांप्रतची प्रवृत्ति सोडून देण्यास ते तयार नाहींत. भांडण मिटवा असें सांगण्यापेक्षां भांडण विकोपास गेलें असतां कांहीं दिवस मध्यस्थी न करणें हेंच योग्य होय. स्वराज्याची इच्छा जसजशी बळावत जाईल तसतशी असल्या भांडण्याचीहि प्रवृत्ति कमी झाल्यावांचून रहाणार नाहीं. आश्रमाच्या कामाकरतां व प्रकृतीच्या स्वास्थ्याकरतां महात्माजींनीं आपले दौरे बंद ठेवले आहेत. हे दौरे पुन्हां निघाल्यानंतरहि हिंदु–मुसलमानांच्या तेढीसंबंधानें महात्माजी उद्योग करणार आहेत,

अशांतला भाग मुळींच नाहीं. तो प्रश्न मुळीं त्यांनीं स्वतःच्या चळवळींतून गाळून टाकला आहे. अस्पृश्यता–निवारण, राष्ट्रीय शिक्षण व खादी एवढ्यासंबंधाच्याच चळवळी त्यांनीं आपल्याकडे घेतल्या असून, काँग्रेसच्या चळवळीचा पुढारीपणा स्वराज्य पक्षाकडेच त्यांनीं दिला आहे. पं. मोतीलाल नेहरू व काँग्रेसचे इतर पुढारी कौन्सिलांत व कौन्सिलांचे बाहेर स्वराज्यासंबंधानें जें काम करीत आहेत, तें महात्माजींना नापसंत नाहीं. कौन्सिलांत काम करण्याची त्यांची स्वतःची इच्छा नाहीं आणि कौन्सिलांच्या द्वारें स्वराज्य मिळेल अशी त्यांची श्रद्धाहि नाहीं. बहुजन समाजांत वास करीत असलेला दरिद्र–नारायण जर खादीच्या आराधनेमुळें प्रसन्न झाला तर परदेशी कापडावरील बहिष्काराची तयारी झाली अशी महात्माजींची निष्ठा आहे. खादीची उत्पत्ती व खादीची विक्री ह्यांच्या-संबंधाचीं कामें आतां व्यवस्थितपणें होऊं लागलीं असून, हें काम संथपणानें होत असलें तरी मजबूत आणि टिकाऊ स्वरूपाचें होत आहे, असा महात्माजींचा अनुभव आहे. खादीची उत्पत्तीहि वाढली आहे आणि विक्रीहि वाढली आहे. व्यवस्था आणि पद्धत उत्पत्तीला व विक्रीला लागलेली असल्यामुळें मोठ्या प्रमाणावर पूर्वापेक्षां चांगली खादी निघत आहे. बहुजनसमाज दरिद्री आहे आणि दारिद्र्यांतच स्वतःचा उद्धार करून घेण्याची जी शक्ति परमेश्वरानें ठेवली आहे ती शक्ति दरिद्री लोकांनीं आत्मयज्ञानें जर जागी केली तर दरिद्री लोकांतच परमेश्वराचें आसन येऊन पडल्यावांचून रहात नाहीं. दारिद्र्याचा महिमाच असा आहे. स्वतःचीं दुःखें स्वतःच निवारण करून घेण्याचें सामर्थ्य दारिद्र्यांत आहे. ह्या सामर्थ्यास दरिद्र-नारायण असें म्हणतात. ह्या दरिद्र–नारायणाची आराधना महात्माजींनीं आरंभली असून, आणखी दोन महिन्यांनंतर विश्रांतीचा काळ संपल्यावर ह्या दरिद्र–नारायणाचे आराधनेकरतां दौरे किंवा

निरनिराळ्या यात्रांचे प्रवास महात्माजी करणार आहेत. बहुजन समाज हिंदु-मुसलमानांच्या दंग्यापासून किंवा ज्ञातिद्वेषापासून अलिप्त आहे. बहुजन समाजातील दरिद्र-नारायण खादीच्या बाजूचा आहे. काँग्रेसचा पक्ष निवडणुकींत आज गुंग असला तरी उद्यां ह्या दरिद्र-नारायणाचीच सेवा करणें काँग्रेसच्या पक्षाला भाग आहे. स्वराज्याची जाणीव जसजशी अधिक वाढत जाईल तसतशी दरिद्र-नारायणाची सेवा हितकर वाटूं लागेल, आणि ज्ञातिवैषम्य एका बाजूस टेवण्याची प्रवृत्ति दिसूं लागेल, ह्यांत संशय नाही. आज ना. शास्त्री ह्यांच्यासारखे नेमस्तहि युरोपियनांचे ज्ञातिविषयक मतदार संघ काढून टाका म्हणजे मुसलमानहि ज्ञातिविषयक मतदार संघ काढून टाकण्यास तयार होतील, असें जोरानें प्रतिपादन करूं लागले आहेत. दरिद्र-नारायण जसाजसा जागा होत जाईल तसतसें पुढाऱ्यांनाहि ज्ञाति-विषयक प्रश्नांकडे दुर्लक्ष करणें मरण्याचें वाटूं लागेल हें उघड आहे. खादीच्या मार्फत दरिद्र-नारायणाची उपासना करणारांनी हिंदु-मुसलमानांच्या तेढीस फाजील महत्त्व देऊं नये आणि ह्या तेढीमुळें सर्वच घर कोसळतें कीं काय अशा भीतीनें गांगरून न जातां निवडणुकीच्या घेळां खादीला अनुकूल असलेल्या काँग्रेसच्याच पक्षास आपलीं मतें देण्यास तयार व्हावें, हाच सांप्रतच्या ज्ञाति-द्वेषाच्या प्रसंगीं खऱ्या देशभक्तीचा मार्ग आहे.

* साम्राज्य आणि हिंदुस्थान

इंग्रजी साम्राज्यांतील प्रमुख वसाहतींना साम्राज्य परिषदेमध्यें बरोबरीचा दर्जा देऊन व परराष्ट्रांत आपले वकील नेमण्याची परवानगी देऊन इंग्लंडनें आपल्या साम्राज्याची वाटणी निरनिराळ्या भाऊबंदांत आज करून टाकली आहे. गोडीगुलाबीनें अशी वाटणी केल्यामुळें एकमेक एकमेकांच्या मदतीस संकट-समयीं आणि लेहमींच्या व्यवहारांत पुढें येतील अशी इंग्रज मुत्सद्यांची अटकळ आहे. या अटकळीसंबंधानें अमेरिका व फ्रान्स येथें निरनिराळीं मतें प्रसिद्ध झालीं आहेत. गोडीगुलाबीच्या ह्या विभक्तपणामुळें इंग्लंडची शक्ति वाढेल असें अमेरिकेंतील कांहीं पत्रांचें म्हणणें आहे. गोडीगुलाबीच्या ह्या विभक्त-पणाकडे पाहिलें असतां अमेरिकेला देखील इंग्रजी साम्राज्याचा घटकावयव समजण्यास हरकत नाहीं, अशी कांहींची टीका आहे. महायुद्धाच्या वेळीं अमेरिकेनें इंग्लंडला मदत केली. अमेरिका जर इंग्लंडच्या वतीनें महायुद्धांत पडली नसती तर महायुद्धाचा निकाल इंग्लंडच्या विरुद्धच झाला असता. इंग्लंडच्या सर्व दोस्तांना अमेरिकेनें जर भलें मोठें कर्ज दिलें नसतें तर जर्मनीची सरशी रणांगणावर खात्रीनें झाली असती. अमेरिकेनें इंग्लंडला एवढी मोठी मदत कां केली? इंग्रजी भाषा, इंग्रजी संस्कृति आणि इंग्रजी रक्त ह्या बंधनांनीं अमेरिका इंग्लंडशीं जखडली गेलेली आहे. इंग्रजी भाषा, इंग्रजी संस्कृती व इंग्रजी रक्त यांजवर जेव्हां जेव्हां संकट येईल, तेव्हां तेव्हां अमेरिका इंग्लंडच्या मदतीस धांवल्यावांचून रहाणार नाहीं. इंग्रजी संस्कृतीच्या दृष्टीनें विचार केला असतां आज अमेरिका, इंग्लंड व इंग्लंडच्या वसाहतीइतके देश मिळून इंग्रजी साम्राज्य होय असें म्हणणें भाग पडतें,

* नवाकाळ, ता. २४ नोव्हेंबर १९२६

आणि हें भलें मोठें इंग्रजी साम्राज्य फ्रान्स, जर्मनी, इटली वगैरे युरोपियन राष्ट्रांच्या सामान्य संस्कृतीला आशियाटिक राष्ट्रांविरुद्ध उचलून धरणारें असल्यामुळें युरोपियन राष्ट्रें इंग्रजी साम्राज्याला आशिया खंडांत व इतर ठिकाणीं धोका आणूं इच्छित नाहींत. युरोपियनांची संस्कृति व इंग्रजांची संस्कृती असे दोन विभाग स्वतंत्र असून, महायुद्धामुळें इंग्रजी संस्कृति आज जगांत मुख्य झाली आहे. ह्या इंग्रजी संस्कृतीच्या दृष्टीनें इंग्रजी मुत्सद्दी स्वतःच्या साम्राज्याकडे पहात असल्यामुळें, स्वतःच्या वसाहतींना बरोबरीचा दर्जा देण्यास आणि अमेरिकेच्या कक्षेंत कांहीं वसाहती फिरूं लागल्यास त्यांना अडथळा न करण्यास तयार झाले आहेत. अमेरिका बंड करून इंग्रजी साम्राज्यांतून फुटून गेली तरी अखेरीस महायुद्धाच्या वेळीं उपयोगी पडली, असा इंग्रजी मुत्सद्यांना अनुभव आलेला आहे. मग बरोबरीचा दर्जा देण्याचें नाकारून वसाहतींना तरी नाखूष का करा, अशी इंग्रजी मुत्सद्यांची विचार-सरणी आहे. अमेरिकेच्या महायुद्धांतील मदतीनें इंग्रजी संस्कृतीचा जो प्रभाव एकदम दृष्टीस पडतो, तो प्रभाव म्हणजे इंग्रजी साम्राज्याची नेहमींची शक्ति नव्हे आणि त्या प्रभावाला अनुसरून जर वसाहतींचा विभक्तपणा मान्य करण्यांत आला तर इंग्रजी साम्राज्य केवळ शब्दांत शिल्लक रहातें, अशी फ्रेंच पत्रांची टीका आहे. लंडन शहर महायुद्धापूर्वी जगाच्या सावकारांचें माहेरघर होतें. आज महायुद्धानंतर जगाची सावकारी अमेरिकेकडे गेली आहे, तथापि वसाहती व हिंदुस्थान ह्यांना पुरण्याइतकी सावकारी लंडनांत अद्याप शिल्लक आहे. संघामुळें, उद्योगधंद्यांतील पिच्छेहाटी-मुळें आणि वसाहतींच्या वाढत्या संपत्तीमुळें लंडन शहरची सावकारी जसजशी नष्ट होत जाईल, तसतशी व्यवहारांतील वसाहतीवरील इंग्लंडची छाप नाहिशी होईल, असें फ्रेंच पत्रांचें म्हणणें आहे. वसाहतींची सावकारी इंग्लंडकडे आहे व इंग्लंडची सावकारी अमेरिकेकडे आहे.

इंग्लंडकडे असलेली वसाहतींची सावकारी हलके हलके अमेरिकेकडे जाईल आणि मग हल्लींचा एकोप्याचें इंग्रेजी साम्राज्य दृष्टीस पडणार नाहीं, असा फ्रेंच पत्रांचा कयास आहे. इंग्रजी पैसा, इंग्रजी संस्कृति व इंग्रजी साम्राज्य, ह्यांची स्थिति वरील प्रकारची असल्यामुळें हिंदुस्थानकडे पहाण्याचा इंग्लंडचा दृष्टिकोनहि आपोआप बदलला आहे. महायुद्धाच्या वेळीं अमेरिकेच्या हातीं इंग्लंडची सावकारीच तेवढी होती असें नव्हे तर लष्करी शेंडीहि अमेरिकेच्या हातीं गेली होती. इंग्रजी संस्कृतीचा पुढारीपणा आज अमेरिकेकडे अप्रत्यक्षपणें आहे, पण महायुद्धाच्यावेळीं तो प्रत्यक्षपणें होता. जबाबदार राज्यपद्धतीच्याविरुद्ध जर्मनी आहे असें म्हणून अमेरिका महायुद्धांत सामील झाली. इंग्रजांच्या ह्या प्रौढीला कमीपणा येऊं नये म्हणून हिंदुस्थानांत मॉंटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणांच्या स्वरूपानें जबाबदार राज्यपद्धतीचें नासकें कुसकें बीज पेरण्यांत आलें! आज अमेरिका युरोप-खंडाच्या भानगडीपासून अलग झालेली असल्यामुळें अमेरिकेकडे इंग्रजी संस्कृतीचा पुढारीपणा उरलेला नाहीं. अर्थात् जबाबदार राज्यपद्धतीची उभारणी व जोपासना हिंदुस्थानांत करण्याचें तितकेसें प्रयोजन इंग्लंडला राहिलेलें नाहीं. साम्राज्य परिषदेनें वसाहतींचा दर्जा देतांना हिंदुस्थानच्या वाटणीला मॉंटेग्यू–चेम्सफर्ड कायद्यांतील बंधनाशिवाय दुसरें कांहींहि देण्यांत आलेलें नाहीं! वसाहतींची सावकारी इंग्लंडकडे जरी आज असली तरी वसाहतींत मजुरांच्या पक्षाचीं मतें विशेष जोरानें पोसलीं जात असल्यामुळें इंग्लंडची सावकारी वसाहतीपेक्षां हिंदुस्थानकडे अधिक लोभी नजर टाकील, ह्यांत संशय नाहीं. इंग्रजी साम्राज्यांत इंग्लंडचें महत्त्व जसजसें कमी होत जाईल, तसतसें सावकार ह्या नात्यानें इंग्लंड हिंदुस्थानच्या बोकांडी अधिक बसेल हें सांगणें नकोच ! तेव्हां वसाहतींचा विभक्तपणा सावकारीच्या दृष्टीनें हिंदुस्थानास जाचक ठरल्यावांचून रहाणार नाहीं. इंग्लंडच्या

भांडवलशाहीचा मोठा बोजा हिंदुस्थानच्या डोक्यावर येऊन बसणारा आहे! लष्करी व आरमारी दृष्टीनें विचार केला असतांहि बसाहतींना विभक्तपणा हिंदुस्थानचें रक्तशोषण अधिक केल्यावांचून रहाणार नाहीं, असेच म्हणणें भाग पडतें. संकटसमयीं अमेरिकेप्रमाणें बसाहती इंग्लंडच्या उपयोगीं विभक्तपणामुळें विशेष पडतील, ही गोष्ट खरी आहे; पण इंग्लंडच्या जिवावर बेंतेल त्यावेळचा हा उपयोग आहे. जिवावर बेतण्याच्या अगोदरच्या व्यवहारांत बसाहतींच्या विभक्तपणामुळें तलवार उगारण्याची इंग्लंडची शक्ति कमी झालेली आहे. हुकमतशीर तलवार उगारण्याची शक्ति हिंदुस्थानच्या पैशानें वाढवून व ती हिंदुस्थानची शक्ति एकटया इंग्लंडच्या मनगटांत सांठवून बसाहतींच्या विभक्तपणामुळें आलेला कमजोरपणा इंग्लंडला भरून काढणें भाग आहे. बसाहती विभक्त झाल्या ह्यामुळें हिंदुस्थानच्या बोकांडीं इंग्लंडची सावकारी अधिक जोरानें बसून हिंदुस्थानच्या कपाळचें आरमारी व लष्करी दास्य अधिक दृढ होणारें आहे. अशा स्थितींत मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांच्या स्वरूपाचें जबाबदार राज्यपद्धतीचें अंधुक चिन्ह तेवढें कायम ठेवून, स्वराज्याच्या भरीव हक्कांसंबंधानें इंग्लंडनें हिंदुस्थानची फसवणूक करूं नये तर काय करावें?

---

* एकी आणि काँग्रेस

संयुक्त प्रांताच्या प्रांतिक परिषदेला संदेश पाठविताना म. गांधी ह्यांनीं खादीशिवाय स्वराज्य मिळणार नाहीं अशा तऱ्हेचे उद्‌गार काढले आहेत; पं. मोतीलाल नेहरू ह्यांनीं सदर परिषदेला काँग्रेसचा पक्ष हिंदुस्थानभर कौन्सिलांत व असेंब्लींत पूर्वीइतकाच सबळ असून गेल्या तीन वर्षांच्याच टक्करी पुनः असेंब्लींत हटीस पडतील, असें कळविलें आहे; आणि पं. मदन मोहन मालवीय ह्यांनीं सर्वांची एकी व्हावी असा आशीर्वाद परिषदेला दिला आहे. गोहत्तीच्या काँग्रेसपुढें वरील तीनहि प्रकारचीं मतें प्राधान्यें-करून येतील ह्यांत संशय नाहीं. म. गांधी हे ता. २४ डिसेंबर रोजीं गोहत्तीस जाऊन पोहोंचणार आहेत. महाराष्ट्रांतील नोकरीवाला पक्ष गोहत्तीच्या काँग्रेसमध्यें फारशी लुडबुड करील अशीं चिन्हें दिसत नाहींत. नागपुरांत असेंब्लीकरतां डॉ. मुंजे निवडून आले असले तरी त्यांचें सहकार्याचें मत मध्यप्रांताच्या निवडून आलेल्या सभासदांनीं जबलपूरच्या खलबतांत नष्ट केले असून, दिवाणांच्या जागा कोणी स्वीकाराव्या ह्या संबंधानें डॉ. मुंजे ह्यांच्या मताला बिलकूल किंमत उरलेली नाहीं. डॉ. मुंजे म्हणतील तो दिवाण होईल अशी तीन वर्षांपूर्वीची स्थिति होती; आज दिल्लीच्या असेंब्लींत मी जाऊन पडलों आणि नागपुरांतील दिवाणगिऱ्या स्वीकारण्यासंबंधींच्या बदनामीपासून मी वांचलों, असें म्हणण्याची पाळी डॉ. मुंजे ह्यांजवर आली आहे ! वऱ्हाडांत दे. अणे ह्यांच्या चार पैशांतला एक पैसा कसाबसा शिल्लक राहिला आहे आणि नोकरीवाल्यांची किंमत पैशांनीं न मोजतां पैनीं मोजणें भाग पडलें आहे. मुंबईस नोकरीवाल्यांना

---

* नवाकाळ, ता. १२ डिसेंबर १९२६

रिवाण किंवा अध्यक्ष ह्यांपैकीं एखादी जागा मिळविण्याकरितां वॅ. जयकर ह्यांची झोळी हातांत घेऊन भिक्षांदेही करावी लागत आहे! बालेकिल्ल्यांत मताधिक्याच्या जोगवर शिरण्याच्या गप्पा पार विलयास गेल्या असल्यामुळें गोहत्तीस महाराष्ट्रांतील नोकरीवाले आपल्या वतीनें बोलण्याची सुपारी ठाकुरद्वारच्या भिक्षुकाचे हातीं देऊन स्वस्थ बसतील ह्यांत संशय नाहीं! लाला लजपतराय ह्यांनीं काँग्रेसच्याहि संस्था पाहिजेत आणि महासभेच्याहि संस्था पाहिजेत असें म्हणण्यास प्रारंभ केला असून, आपसांतील दुही होईल तितक्या लवकर मिटविली पाहिजे, असें आपलें मत लालाजींनीं पंजाबांत प्रसिद्ध केलें आहे. अर्ल विंटरटन हिंवाळ्यांत हिंदुस्थानांत यावयास निघाले असल्यामुळें नाताळच्या सुट्टींत हिंदुस्थानांत येऊन पोहोंचल्याबरोबर त्यांच्या कानांवर काँग्रेसमधील एकीच्या बातम्या प्रथम घडकल्या पाहिजेत असें म्हणणारा एक पक्ष पुढें आला आहे. काँग्रेसमध्यें एकी कशी व्हावयाची? आम्ही नोकरीवाले आहोंत असें काँग्रेसनें जाहीर केल्यानें अर्ल विंटरटन आणि कॉन्झर्व्हेटिव पक्ष ह्यांजवर कोणता परिणाम होईल? अर्ल विंटरटन हिंदुस्थानांत येत आहेत ते हिंदी स्वराज्याच्या [illegible]मुळें येत आहेत अशांतला भाग मुळींच नाहीं. हिंदुस्थानांत इंग्रजी माल अधिक कसा खपेल आणि नव्या आरमाराकरितां व नव्या विमानांकरितां हिंदुस्थानच्या तिजोरींतील पैसे सिंगापूरच्या रोखानें कसे खर्च करतां येतील, ही मुख्य काळजी अर्ल विंटरटन ह्यांना लागली आहे. ह्या काळजीच्या पायीं स्वराज्याचे कांहीं हक्क हिंदुस्थानास नवें कमिशन लवकर पाठवून देण्यास कॉन्झर्व्हेटिव पक्ष कसा तयार होईल? ठिकठिकाणच्या कौन्सिलांतील व असेंब्लींतील जमाखर्चाचे खडें बिनबोभाट पास होऊन कौन्सिलांतील व असेंब्लींतील आमदारांनीं करासंबंधानें देशभर असंतोष पसरविण्याची चळवळ केली नाहीं म्हणजे नोकरशाहीचें काम भागत असतें. असेंब्लींतील टक्करीमुळें

नोकरशाहीला पैशाची तूट पडते असें बिलकूल नाहीं. बजेट फेटाळलें तरी सर्टिफिकिटाच्या जोरावर पाहिजे तो खर्च पाहिजे त्या ठिकाणीं मंजूर करून घेतां येतो. टक्करीचा उपयोग खर्च तोडण्याच्या कामीं होत नाहीं, तर लोकांत जागृति उत्पन्न करण्याच्या कामीं होतो. टक्करीचा असा उपयोग करून बहिष्कार व खादी ह्यांची चळवळ राष्ट्रांत जोरानें होऊं नये अशी नेमस्तांची इच्छा आहे आणि त्याच इच्छेला महाराष्ट्रांतील नोकरीवाला पक्ष बळी पडला आहे. बहिष्कार व खादी ह्यांची चळवळ पसरूं नये अशा धोरणानें जर काँग्रेसमध्यें एकी झाली तर स्वराज्याचें पाऊल त्या एकीमुळें बिलकूल पुढें न पडतां अर्ल विंटरटन ह्यांना आयतें फावणारें आहे. काँग्रेसमध्यें एकी होऊन जर गेल्या तीन वर्षांप्रमाणेंच नव्या करांना अडथळा करण्यांत आला व बजेट फेटाळून देण्यांत आलें तर तसल्या टक्करींच्या आघाताचा प्रत्याघात लोकांच्या मनांवर होणारा असल्यामुळें बहिष्कार आणि खादी ह्यांची चळवळ करणारांना टक्करीमुळें प्रोत्साहन मिळणारें आहे. पानगलच्या संप्रदायावर विसंबून राहून खादीची, स्वराज्याची व काँग्रेसची चळवळ हाणून पाडतां येईल हा जो नोकरशाहीला इतक्या दिवस भ्रम होता, त्या भ्रमाचा भोपळा मद्रासनें फोडला आहे; मुसलमानांवर विसंबून राहून हिंदूंना ठेचण्याचेंहि धोरण अंगलट आल्याशिवाय रहाणार नाहीं असें एशिया खंडाची परिस्थिति नोकरशाहीला बजावीत आहे; अशा स्थितींत काँग्रेसनें एकी करून दिवाणगिऱ्याच्या स्वीकारण्याचें साफ नाकारून कौन्सिलांत व असेंब्लींत जोरकस विरोध जर सुरू केला तर कौन्सिल-बाहेरची बहिष्काराची व खादीची चळवळ झपाट्यानें पुढें सरसावल्या-वांचून रहाणार नाहीं. पानगलच्या संप्रदायाचा फोलपणा आणि मुसलमानांची एशिया खंडांतील नवी जागृति ह्यांचा योग्य परिणाम नोकरशाहीच्या मनावर होत असतांना कौन्सिलांतील विरोधाचे आणि कौन्सिलाबाहेरच्या

खादीच्या चळवळीचे जोराचे घाव अर्ल विंटरटन ह्यांच्या मनावर घालणें फार जरुरीचें आहे. ह्या धोरणानें स्वराज्याचें कल्याण होणार आहे. हें धोरण उचलून धरतांना लाला लजपतराय किंवा पं. मदन मोहन मालवीय काँग्रेसच्या विरुद्ध जातील अशांतला भाग नाहीं. म. गांधी ह्यांना हें धोरण नापसंत होणारें नाहीं. महाराष्ट्रांतील नोकरीवाले काँग्रेसच्या ह्या असल्या एकीला विरोध करतील काय?

* स्वामी श्रद्धानंद

स्वामी श्रद्धानंद ह्यांच्या दिल्ली येथें झालेल्या आकस्मित व अत्यंत खेदजनक खुनामुळें सर्व हिंदुस्थान विस्मयचकित व दुःखीकष्टी झाल्यावांचून रहाणार नाहीं. हिंदु–मुसलमानांच्या ऐक्याचा विचार केला असतां एखाद्या मोठ्या दंग्याहूनहि ह्या खुनाचे फार अनिष्ट परिणाम होतील असें म्हणणें भाग पडतें. मोठ्या दंग्यास सुरवात झाल्यावर दंग्यांत होणारी प्राणहानि लढाईच्या स्वरूपाची असते आणि तसल्या लढाईचें वारें निघून गेल्यानंतर त्या प्राणहानीकडे कोणाचेंहि लक्ष वेधून रहात नाहीं. पण स्वामी श्रद्धानंद ह्यांच्या खुनासारख्या अत्यंत हिडीस अत्याचारांनीं सर्व समाजाच्या मनाला झालेल्या जखमा भरून येण्यास फार वेळ लागतो. स्वामी श्रद्धानंद हे संन्याशांतले मोठे साधुपुरुष होते व मुसलमानांचेहि पुढारी "बहादूर पुरुष" ह्या नात्याचा स्वामीजींचा गौरव करण्यास मागें पुढें पहात नसत. कलकत्त्याच्या दंग्यानंतर हिंदु–मुसलमानांतील दंगे शांत झाले होतें; आणि दिल्लींत सुद्धां मुसलमान बाईला किंवा हिंदु बाईला पळवून नेण्याच्या आरोपावरून एकमेकांवर फिर्यादी चालवण्यापलीकडे हिंदु–मुसलमानांच्या वैमनस्यास अलीकडे जोर उरलेला नव्हता. अशा स्थितींत स्वामी श्रद्धानंद ह्यांचा झालेला हिडिस खून, संतापाचें कोणतेंहि कारण नसतांना स्वामीजींना मारून उलट पक्षाला एकदम कमजोर करण्याच्याच नीच हेतूनें झाला असला पाहिजे असें म्हणणें भाग पडतें. निवडणुकीच्या संबंधानें मनोविकार चिडलेले असतांना तसल्या त्रस्त स्थितींत एखाद्या मुसलमान माथेफिरूनें हा खून केला, असें

---

* नवाकाळ, ता. २५ डिसेंबर १९२६

म्हणावें तर निवडणुकींत स्वामी श्रद्धानंद ह्यांनीं प्रत्यक्षपणा मुळींच घेतला नव्हता; इतकेंच नव्हे तर हिंदुमहासभेच्या तर्फे उमेदवार उभे करण्यांत कांहीं हंशील नाहीं असा आपला स्पष्ट सिद्धांत स्वामीजींनीं निवडणुकीच्या पूर्वी जाहीर केला होता. निवडणुकीच्या काळांत स्वामी श्रद्धानंद सदरच्या सिद्धांताला गोडून केसभरहि वागले नाहींत हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. कांहीं मुसलमान पुढाऱ्यांशीं स्वामी श्रद्धानंद ह्यांचा स्नेह चांगल्यांतला होता व डॉ. अनसारी ह्यांजवर त्यांचा पूर्ण विश्वासहि होता. नव्हेंबर अखेरपासून स्वामीजी न्युमोनियानें व इन्फ्लुएंझानें अंथरुणावर पडूत होते. खोलींतल्या खोलींतहि हालण्याचालण्याची त्यांना शक्ति नव्हती; आणि डॉ. अनसारी ह्यांच्या औषधोपचारामुळेंच खुनापूर्वी चार पांच दिवस त्यांचा ताप थांबला होता. १९२३ सालापासून म्हणजे मलकानांच्या शुद्धिप्रकरणापासून मुसलमानांचा समाज निष्कारण स्वामीजींकडे वाईट दृष्टीनें पाहूं लागला. खिलाफतीच्या चळवळीच्या वेळीं व सत्याग्रहाच्या वेळीं स्वामी श्रद्धानंद ह्यांजवर मुसलमानांचा इतका मोठा विश्वास होता कीं, दिल्लीच्या चांदणी चौकांत पांच पांच दहा दहा हजार हिंदूंबरोबर पांच पांच दहा दहा हजार मुसलमानहि त्यांच्या मागोमाग चालण्यास नेहमीं हजर असत. दिल्लीच्या जुन्या मशिदीत राष्ट्रीय प्रश्नासंबंधानें मुसलमानांना उपदेश करण्याचा मान एकवेळीं मुसलमानांनीं स्वामी श्रद्धानंद ह्यांना दिला होता, हें विसरतां कामा नये. दिल्ली येथील म. गांधी ह्यांच्या मोठ्या उपवासाचे वेळीं हिंदु-मुसलमानांत तडजोडीची जी परिषद भरली होती, त्या परिषदेमध्येंहि हिंदु-मुसलमानांची एकी घडून यावी म्हणून स्वामी श्रद्धानंद ह्यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला होता. शुद्धि व संघटन ह्यासंबंधानें स्वामी श्रद्धानंद ह्यांचे विचार केव्हांहि संकुचित नव्हते. एखाद्या हिंदूचा मुसलमान जर करतां येतो तर मुसलमानाचा हिंदूहि करतां आला पाहिजे;

आणि तसा कोणी हिंदु झाला असतां किंवा एखाद्याजवळून नेलेल्या घ नाइलाजानें मुसलमान झालेल्या एखाद्या बाईस पुन्हां हिंदु केलें असतां मुसलमानांनीं वृथा रागावण्याचें कारण नाहीं, असें स्वामी श्रद्धानंद ह्यांचें म्हणणें होतें. पंजाबांत व दिल्ली–लखनौकडे गोपाची चाल फार कडक आहे. गरीब व अनाथ बाईस मुसलमानांनीं पळवून नेलें असतां तिचा पत्ता कोणासहि न लागून तिला मुसलमानी धर्म स्वीकारण्याच्याशिवाय गत्यंतर रहात नाहीं. असल्या गरीब अबलांना पुन्हां शुद्ध करून घेतलें पाहिजे, असा स्वामी श्रद्धानंद ह्यांचा आग्रह होता आणि असल्या फसवणुकीची बातमी कानीं पडल्याबरोबर बाईचा पत्ता लावून तिला शुद्ध करून घेण्याच्या कामीं स्वामीजी केव्हांहि आळस करीत नसत. ह्यामुळें त्याचें दिल्लीचें घर म्हणजे पळवून नेऊन मुसलमान करण्यांत आलेल्या बायाबापड्यांच्या आप्तइष्टांनीं करावयाच्या तक्रारींची चावडीच होऊन बसलें होतें. अनाथांची हांक ऐकण्याची साधुवृत्ति अंगांत पूर्णपणें मुरल्यामुळेंच स्वामीजींचा खून होऊन आपल्या जिवाचाहि बळी स्वतःच्या आवडत्या चळवळीसाठीं त्यांना द्यावा लागला, ह्यांत संशय नाहीं. आपला अंत अशा रीतीनें होईल असें स्वामी श्रद्धानंद ह्यांना मलकाना शुद्धीची चळवळ जोरावर असतांना एक दोन वेळां वाटलें होतें. तशा धमकीचीं पत्रें त्यांना गेलीं होतीं. पण अलिकडे तो काळ निघून गेला अशीच सर्वांची समजूत झाली. आर्य समाज, हरिद्वारचे गुरुकुल, सत्याग्रह व शिखांचें गुरुकाबाग प्रकरण, ह्या प्रसंगांना स्वामी श्रद्धानंद ह्यांनीं आपलें सर्वस्व अर्पण केलें होतें आणि आतां त्यांचा खून झाल्यामुळें त्यांनीं अंगीकृत कार्याला पूर्णाहुती दिली असें म्हणण्यास हरकत नाहीं. डॉ. अनसारी, म. हंसराज आणि दिवाण चमणलाल ह्यांनीं सर्व हिंदु–मुसलमानांना ह्या हिडीस खुनाचे प्रसंगीं शांत वृत्तीनें रहाण्याचा उपदेश केला आहे आणि तो उपदेश पंजाब व संयुक्तप्रांत

येथें सर्वतोपरी मानण्यांत येईल असा आम्हांस भरंवसा वाटत आहे. आपण काय करीत आहों व कोणत्या भलत्या दिशेनें जात आहों ह्या संबंधाचे योग्य विचार जर मुसलमानी समाजांत ह्या खुनामुळें जागृत झाले, तर खुनी इसमाच्या पिस्तुलाला स्वामी श्रद्धानंद ह्यांच्या जिवाची पडलेली आहुती निष्फळ झाली असें होणार नाहीं. खुद्द अफगाणिस्थानांतलेहि मुसलमान हिंदु आमचे वडीलबंधु होत व पूर्वी आम्ही हिंदूच होतों, असें म्हणूं लागले असून हिंदूंना उद्देशून 'काफर' हा शब्द आजकाल ते वापरत नाहींत. गोहत्या व मशिदीपुढें वाद्यें वाजविणें ह्या दोनहि बाबींत हिंदुस्थानांतील मुसलमान चूक करीत आहेत, असेंच अफगाणिस्थानच्या सुशिक्षित मुसलमानांचें मत आहे. आपल्या चुकीचें हिडीस स्वरूप डोळ्यांपुढें नीट प्रत्यक्ष उभें राहिल्याशिवाय मनुष्याला सुविचार सुचत नाहींत. हिंदुस्थानांतील सुशिक्षित मुसलमानांना अफगाणिस्थानच्या नव्या सुशिक्षितांची दृष्टि नाहीं असें नाहीं. मुसलमानांच्या खालच्या समाजापुढें आपलें कांहीं चालत नाहीं म्हणून गप्प बसणारे सुशिक्षित मुसलमान पुढारी स्वामी श्रद्धानंद ह्यांच्या खुनानंतर गप्प बसणें जर सोडून देतील तर स्वामी श्रद्धानंद ह्यांचा अत्यंत खेदजनक अंतकाळहि राष्ट्राच्या उपयोगी पडला, असें ठरणार नाहीं काय ?

* काँग्रेस व खादीचे नोकर

गोहत्ती काँग्रेसच्या मंडपांत खादीचा व काँग्रेसचा संबंध तोडण्याचा प्रयत्न कांहींनीं केला, पण त्या प्रयत्नास मुळीच यश आलें नाहीं. कौन्सिल व असेंब्ली ह्यांच्या बाहेरची चळवळ आणि कौन्सिलांच्या आंतील चळवळ ह्यांचा निकट संबंध असला पाहिजे, आणि हा संबंध खादी वापरण्यानें राहूं शकतो असें गौहत्तीच्या काँग्रेसनें ठरविलें असून, काँग्रेसच्या हरएक प्रकारच्या सभेच्या वेळीं काँग्रेसच्या सभासदांनीं खादीच वापरली पाहिजे असा ठराव झाला आहे. काँग्रेसच्या जिल्हा कमिट्या, तालुका कमिट्या, व प्रांतिक कमिट्या किंवा ऑ. इं. कॉं. कमिटी, ह्या सर्व कमिट्यांचे सभासद होण्यास व अधिकारी होण्यास खादी वापरण्याची शर्त पाळली पाहिजे आणि ह्या कमिट्यांच्या निवडणुकीसाठीं खादी न वापरणारास उभें राहतां यावयाचें नाहीं, असें काँग्रेसनें ठरविलें असून काँग्रेसच्या रचनेंत सदर तऱ्हेचा नियम घालण्यांत आला आहे. हा नियम अंमलांत येण्याकरितां हरएक प्रकारचे पोटनियम करून सदर नियमाची अंमलबजावणी बरोबर होते किंवा नाहीं हें पहाण्याचें काम वर्किंग कमिटीकडे सोपविण्यांत आलें आहे. जे कोणी खादी वापरीत नाहींत आणि खादीची हेटाळणी नेहमीं करीत असतात, त्यांना ह्यापुढें प्रांतिक कमिट्यांचे सभासद व अधिकारी होतां येणार नाहीं, हें उघड आहे. काँग्रेसचा जनतेशीं संबंध खादीच्या मार्फतच यावयाचा असल्यामुळें वरील प्रकारचे निर्बंध काँग्रेसनें यंदा घातले, ही संतोषाची गोष्ट होय. खादीसंबंधानें मनोभावें काँग्रेसला मदत करणाऱ्यांच्या हातीं काँग्रेस कमिटीच्या अधिकाराचीं सूत्रें ह्यापुढें जातील आणि

---

* नवाकाळ, ता. ३० डिसेंबर १९२६

खादीसंबंधानें मोठ्या जोमाची चळवळ पुढील सालीं राष्ट्रभर सुरू होईल, ह्यांत संशय नाहीं. खादीकार्याचा गेल्यासालचा अहवाल प्रसिद्ध झाला असून जोमानें चळवळ केली असतां खादीचा प्रचार केवढ्या मोठ्या प्रमाणावर एकदोन वर्षांच्या अवधींत होणार आहे हें सदर अहवालावरून कोणाच्याहि ध्यानांत आल्यावांचून रहाणार नाहीं. हजारो गोरगरीब स्त्रियांच्या संसाराला खादीमुळें आज चांगली मदत मिळत आहे. गरीब शेतकऱ्याच्या संसारासीं खादीची चळवळ जखडून टाकणें शक्य आहे, असा गेल्या सालीं पूर्णपणें अनुभव आला आहे. जानेवारीपासून म. गांधी खादीच्या कार्याकरितां चोहोंकडे दौरे काढणार असून खादीच्या ॲसोसिएशननें खादीचे नोकर प्रत्येक जिल्ह्यांत ठेवण्याची व्यवस्था केली आहे. खादीचे आजच शेकडों नोकर आहेत. ह्यांत कित्येक बी. ए., एम्. ए. झालेले सुशिक्षित असून अल्पवेतनावर देशसेवा करीत आहेत. सोळा वर्षें वयानें झालेल्या व हिशेबाची सामान्य माहिती असलेल्या कोणाहि सद्वर्तनाच्या मनुष्यास खादीचा नोकर होतां येतें, खादीसंबंधानें ज्यांना कांहीं माहिती नाहीं, अशांनीं तीन वर्षें दरमहा बारा रुपयांची स्कॉलरशीप घेऊन आपल्या जिल्ह्यांतील खादीच्या अधिकाऱ्याच्या हाताखालीं सहा महिने, साबरमतीच्या आश्रमांत खादीसंबंधानें हरएक प्रकारचें ज्ञान मिळविण्यासाठीं दोन वर्षें, आणि पुन्हां आपल्या जिल्ह्याच्या अधिकाऱ्याच्या हाताखालीं सहा महिने काढावयाचे असून, पुढें पाहिजे तर खादीची नोकरी त्यांनीं करावी, असा निर्बंध स्कॉलरशिप घेणारांवर घालण्यांत आला आहे. खादीच्या शिक्षणासंबंधानें आज जे प्रविण आहेत त्यांना त्यांच्या लायकीप्रमाणें स्कॉलरशिपच्या तीन वर्षांपैकीं सर्व वर्षें किंवा कांहीं काळ माफ करण्यांत येणार आहे. खादीचें शिक्षण पुरें झालें आहे असें सर्टिफिकेट मिळाल्यानंतर प्रारंभी दरमहा रुपये तीस व पुढें पन्नास

रुपयांपर्यंत वाढ, अशी खादीच्या नोकराच्या पगाराची सांप्रत व्यवस्था लावण्यांत आली आहे. आज खादीचे नोकर शेकडयांनीं मोजतां येण्यासारखे आहेत. पण दोन तीन वर्षांच्या अवधींत हे नोकर हजारानीं मोजले जावेत अशी खादीची मोटी चळवळ करण्याचा महात्माजींनीं संकल्प केला आहे. हिंदी राष्ट्रांत लाखो काय, क्रोडो चरखे फिरत रहाणें शक्य आहे आणि हजारों देशभक्तांना खादीचें काम मनोभावें करीत असतांना खादीच्या प्रचड उद्योगापासून अल्पसंतोषाच्या उपजीविकेचीं साधनें मिळणेंहि शक्य आहे. राष्ट्राची मनोवृत्ति खादीकडे नेहमीं ओढून घेणें, खादीमुळें व्यवहारांत आपोआप दिसून येणाऱ्या परकीय कापडावरील बहिष्कारास उचलून धरणें, स्वतःच्या उपजीविकेला जरुरी नसतांहि स्वतः हातानें सूत काढून व खादी नेहमीं वापरून खादीविषयींचें योग्य उदाहरण आप्तइष्टांना घालून देणें, सर्व गरीब शेतकऱ्यांच्या घरांत चरखा चालविण्यास लावून बहुजन समाजांत खादीच्या खपाबरोबरच राष्ट्रीय जागृति उत्पन्न करणें, आणि खादीच्या ह्या प्रचंड उद्योगाचें व व्यापाराचे सर्व काम दक्षतेनें पाहून आपणास मिळणाऱ्या अल्प वेतनावर संतुष्ट रहाणें, इत्यादि अत्यंत महत्त्वाचीं कामें खादीच्या नोकरांकडून पार पडावयाचीं आहेत. ही खादीची नोकरी म्हणजे राष्ट्राची सेवा होय. खादीचा व्यवहार नफ्यावर नजर ठेवून चालणेंच शक्य नाहीं. लोकांनीं द्यावयाच्या वर्गणीवर हा व्यवहार चालणारा असल्यामुळें देशभक्तीनें अल्प वेतनावर सेवा करण्यासच सर्वांनीं पुढें आलें पाहिजे. पांच सात इयत्ता इंग्रजी शिक्षण मिळविणारांना प्रारंभ जो पगार हल्ली मिळूं शकतो त्या पगाराच्या मानानें खादीचा नोकरांचा प्रारंभाचा तीस रुपये पगार बिलकूल कमी नाहीं. आपल्या अंगच्या तरतरीतपणावर व हुषारीवर विसंबून राहून मोठया पगाराच्या जागेपर्यंत आपण वाढूं अशी जी सामान्य नोकरांना हाव असते, ती हाव मात्र खादीच्या नोकरीत सफल होणार नाहीं;

तथापि खेड्यापाड्यांतील सर्व लोकांच्या संसाराशीं निकट संबंध येऊन देशसेवेमुळें सर्वांकडून भलें म्हणून घेण्याची संधी खादीच्या नोकरींत जितकी मिळणारी आहे तितकी दुसऱ्या कोणत्याहि सेवेंत मिळणारी नसल्यामुळें तरतरीत बुद्धीचे व चांगल्या जोमाचे भरपूर सुशिक्षित तरुण म. गांधी ह्यांच्या खादीच्या सेवेला मिळतील ह्यांत संशय नाहीं. गोहत्तीच्या काँग्रेसनें म. गांधी ह्यांच्या अपेक्षेप्रमाणें खादीच्या चळवळीला भरपूर पाठिंबा दिला आहे; म. गांधी स्वतः आपली योजना अंमलांत आणण्याकरतां चोहोंकडे फिरणार अहित; खादीच्या असोशिएशननें ह्या कामाची व्यवहाराच्या दृष्टीची योजना चांगल्यारीतीनें आखली आहे; तेव्हां खादीच्या कार्याला मनुष्यबळ व द्रव्यबळ ह्या दोनहि दृष्टीनें भरपूर मदत लोकांकडून झाल्याशिवाय कशी राहील ?

* नवी दिल्ली

गेल्या मंगळवारीं लाटसाहेब लॉर्ड आर्विन ह्यांच्या हस्तें नव्या दिल्लींतील नवा कौन्सिलहॉल उघडण्याचा समारंभ मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. नव्या कौन्सिलहॉलची इमारत अद्याप पुरी व्हावयाची आहे व तिसरा मजला वर चढावयाचा आहे. ह्या इमारतीचा खर्च काम पूर्ण झाल्यावर एक कोटीहून अधिक होईल असा अंदाज आहे. कौन्सिलहॉलच्या इमारतींत संस्थानिकांचें मंडळ, स्टेट्र कौन्सिल व असेंब्ली ह्या तीन संस्थांची सोय केलेली असून, प्रेक्षणीय स्थळ ह्या नात्यानें इमारतीची सजावट चांगली झालेली आहे. राजधानीचें नवें शहर म्हणून नव्या दिल्लींत ज्या नव्या इमारतीं उभारल्या जात आहेत, त्या अद्याप पुऱ्या झालेल्या नाहींत. तथापि नव्या दिल्लीच्या कामकाजास गेल्या मंगळवारपासून सुरवात झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. ह्या समारंभाचे प्रसंगीं बादशहांचा खास संदेश लाट साहेबांनीं वाचून दाखविला. न्याय व शहाणपणा नव्या कौन्सिहॉलमध्यें कायमचा नांदो, असा आशीर्वाद बादशहांनीं नव्या कौन्सिलहॉलला दिला आहे. नवी दिल्ली म्हणजे हिंदुस्थानांतील इंग्रजी साम्राज्याचें कायमचें टिकणारें स्मारकच होय, अशा तऱ्हेचे उद्गार लाटसाहेब लॉर्ड आर्विन ह्यांनीं काढले आहेत. हिंदुस्थानांत आजपर्यंत वैभवशाली साम्राज्यें कित्येक होऊन गेलीं. त्या सर्व साम्राज्यांनीं दगडामातीचें आपलें स्मारक मागें ठेवलेंच आहे. नवी दिल्ली म्हणजे इंग्रजी सत्तेचा तशाच प्रकारचा एक उद्योग होय. दगड आणि माती मनुष्यापेक्षां व राजघराण्यापेक्षां अधिक टिकाऊ आहे. तेव्हां स्मारकाच्या वेळीं दगड व

---

* नवाकाळ, ता २० जानेवारी १९२७

माती ह्यांचा आश्रय मनुष्यानें घेणें अगदीं साहजिक आहे. पूर्वीच्या बादशहांनीं व राजघराण्यांनीं आपली कीर्ति दगडांतील कलाकौशल्याच्या रूपानें मागें ठेवली आहे आणि ह्या पूर्वीच्या कीर्तीलाहि लोपवून टाकणारी नवी दिल्ली निर्माण करण्याचें काम इंग्रजांनीं चालवलें आहे. पंधरा वर्षांपूर्वी नव्या दिल्लीच्या पायाचा दगड बादशहानीं स्वतः बसवला आणि आज नव्या दिल्लींतील एक महत्त्वाची इमारत उघडण्याचा समारंभ पार पडला. नव्या दिल्लींतील लाटसाहेबांचा राजवाडा पूर्णपणें तयार होण्यास आणखी कांहीं काळ लागेल. वीस वर्षें दगड-मातींत क्रोडो रुपये घालवल्यानंतर हें इंग्रजी सत्तेचें स्मारक तयार व्हावयाचें आहे! स्मारक तयार होण्याची वेळ आली म्हणजे कर्त्या पुरुषांना वृद्धावस्था प्राप्त झाली असें मानण्यास हरकत नाहीं. इंग्रजी सत्ता हिंदुस्थानांत आज वृद्ध व परिपक्व स्थितींत आहे. इतरांनीं आपलीं जीं स्मारकें पूर्वी केलीं आणि नव्या दिल्लीचें आज जें नवें स्मारक तयार होत आहे, त्यांतला फरक लाटसाहेबांनीं असा दाखविला आहे कीं, लोकनियुक्त सभासदांसाठीं दिवाणखाने पूर्वीच्या स्मारकांत बिलकूल नसून लोकनियुक्त राजसत्तेचें गोंडस व सुंदर बाह्य चिन्ह नव्या कौन्सिल-हॉलच्या रूपानें इंग्रजांनीच प्रथम सुरू केलें आहे. लोकांचा दिवाणखाना व खाजगी दिवाणखाना अशा तऱ्हेच्या इमारती दिल्लीच्या मुसलमान बादशहांच्या कारकीर्दीत होत्या, नाहीं असें नाहीं; पण लोकांनीं निवडून दिलेल्या प्रतिनिधींची संस्था इंग्रजांनींच प्रथम हिंदुस्थानांत सुरू केलेली आहे. जबाबदार राज्यपद्धतीला सुरवात इंग्रजांनींच प्रथम केलेली असल्यामुळें नव्या दिल्लींतील कौन्सिलहॉलची इमारत प्रथम उघडण्यांत आली, ह्याबद्दल लाट आर्विन ह्यांना एक प्रकारची धन्यता वाटत आहे. नव्या कौन्सिलहॉलमध्यें असेंब्लीच्याच शेजारी संस्थानिकांची संस्था असून, हिंदुस्थानांतील बड्या श्रीमंतांचें कौन्सिल ऑफ स्टेटहि आहे. इंग्लंडांत

लोकांच्या प्रतिनिधींच्या छातीवर लॉर्डांची सभा वसलेली आहे, पण हिंदुस्थानांत असेंब्लीच्या डोक्यावर कौन्सिल ऑफ स्टेट असून, ह्या कौन्सिल ऑफ स्टेटच्याहि डोक्यावर राजेरजवाड्यांचें नरेंद्र मंडळ आहे. असेंब्लींतील लोकांच्या प्रतिनिधींच्या हातीं खरी सत्ता देण्याचा विचार नोकरशाहीच्या मनांत नाहीं, हें नव्या कौन्सिलच्या इमारतीच्या रचनेवरून कोणाचेहि ध्यानीं आल्यावांचून रहाणार नाहीं. मुत्सद्दी येतात जातात; कर्तें पुरुष जगतात व मरतात; आणि राजघराण्याची परंपरा वैभवास पोंचल्यावर नामशेषहि होते; पण इमारतींचें बाह्यचिन्ह वैभवाच्या व मृत्यूच्या ह्या सर्व उलाढालींना पुरून उरतें. बाह्य चिन्हांवरून पार्लमेंटरी संस्थांची किंवा जबाबदार राज्यपद्धतीची कोणती दिशा इंग्रजांनीं हिंदुस्थानांत आंखली होती, ह्याचें अनुमान कालान्तरानें करण्याचा जर प्रसंग आला तर स्वतःची प्रतिष्ठा, त्याच्या खालीं राजेरजवाड्यांची महति, त्याच्याहि खालीं श्रीमंतांचा डामडौल आणि शेवटी तळाला पार्लमेंटरी संस्थांचें अंधुक चिन्ह, असें अनुमान भावी इतिहासकरांना काढणें भाग पडेल; ह्यांत संशय नाहीं. माँटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांच्या रिपोर्टांत पार्लमेंटरी संस्थांच्या दृष्टीनें दिल्ली फार दूर आहे, असे उद्गार काढले आहेत, तेच उद्गार आजहि जशाच्या तसे खरे असून नव्या दिल्लीच्या कौन्सिलहॉलच्या इमारतीकडे पाहिलें असतां जबाबदार राज्यपद्धतीची दिल्ली अद्याप फार दूर आहे, असेंच म्हणणें भाग पडतें! सुधारणांच्या दुसऱ्या हप्त्याच्या वेळीं संस्थानिकांच्या मार्फत माँटेग्यू चेम्सफर्ड सुधारणांची पिच्छेहाट कशी करावी ह्याचा विचार सांप्रत चालू आहे आणि स्वामी श्रद्धानंद ह्यांच्या खुनामुळें राजाश्रयाच्या बाबींत न्याय व शहाणपण सत्ताधाऱ्यांत उरलेलें नाहीं असें लोक बोलत आहेत; अशा वेळीं नव्या दिल्लीतील कौन्सिलहॉलची नवी इमारत उघडली जात असतांना लोकांत उत्साह कोठून दृष्टीस पडणार!

---

* नव्या चीनचें दैवत

नव्या चीनचें दैवत सन्यत्सेन असून १९२३ सालपासून राष्ट्रीय पक्षाची वाढ चीनमध्यें कशी झाली आणि रशियांतील बोल्शेव्हिकांनीं चीनच्या नव्या पक्षाला कशी मदत केली, त्यासंबंधाची माहिती अमेरिकन लेखक मि. रूटस् यांनीं 'एशिया' मासिकाच्या फेब्रुवारी महिन्याच्या अंकांत प्रसिद्ध केली आहे. चीनमध्यें लोकशाही स्थापन करण्याकरितां सन्यत्सेन यांनीं जिवापाड मेहनत केली, आणि १५ वर्षांपूर्वी चीनचें बादशाही मँचू घराणें उलथून पाडून चीनमध्यें रिपब्लिक स्थापलें व स्वतः त्या रिपब्लिकचे अध्यक्ष झाले. सन्यत्सेन ह्यांना अध्यक्ष या नात्यानें चीनची नवी घटना अंमलांत आणण्यास फुरसतच मिळाली नाहीं. पुन्हां राज्यक्रांति झाली आणि पेकिंग येथून सन्यतसेने यांना पळून जावें लागलें. त्यानंतर चीनच्या कँटनच्या प्रांतांत त्यांनीं नवें रिपब्लिक स्थापन केलें. पण प्रजासत्ताक पद्धतीचीं तत्त्वें चीनमध्यें रूढ झालेलीं नसल्यामुळें कँटन येथेंहि वारंवार त्यांच्या योजनेला अडथळा येऊं लागला. गरिबांचा कैवारी, निरपेक्ष बुद्धीनें राष्ट्राची सेवा करणारा आणि अत्यंत स्वार्थत्यागी सत्पुरुष या दृष्टीची त्यांची महति सर्व चीनभर झाली खरी, पण स्वतःच्या कँटन प्रांतांतच श्रीमंत व्यापारी, बडे जमीनदार व प्रसिद्ध सेनानायक यांजकडून त्यांना अडथळा होऊं लागला. सामान्य बहुजनसमाजाचें पाठबळ मिळावें तितकें त्यांना मिळेना व आपल्याच प्रांतांतील बडया धेंडांपुढें त्यांचें चालेना! अडचणीच्या वेळीं १९२३ सालीं शांघाय येथें कांहीं काळ घालवीत असतांना सन्यत्सेन यांची व बोल्शेव्हिक बोरोडिन यांची गांठ पडली, व दोघांचा स्नेह जमला. बोरोडिन

---

* नवाकाळ, ता. १३ फेब्रुवारी १९२७

यांच्यामार्फत, सैबिरियांत रशियाचें जें लढाऊ सामान पडलें होतें त्या सामानाची मदत सन्यत्सेन यांना झाली आणि बोरोडिन व त्यांचे सहकारी इतर पन्नास साठ बोल्शेव्हिक यांना बरोबर घेऊन सन्यत्सेन कँटनला शांघायहून परत गेले. लोकशाहीच्या नुसत्या तत्त्वामुळें बहुजनसमाजाचा पाठिंबा मिळत नाहीं असें पाहून सोशॅलिझमच्या म्हणजे ट्रेड युनियनच्या तऱ्हेवर स्थापलेल्या मजुरांच्या व शेतकऱ्यांच्या संघाची पुस्ती सन्यत्सेन ह्यांनीं आपल्या मतांना दिली, आणि १९२३ सालीं तीन तत्त्वांचा आपला संप्रदाय स्थापन केला. नॅशनॅलिझम उर्फ राष्ट्रीयत्राणा, डेमॉक्रसी उर्फ लोकशाही आणि सोशियालिझम उर्फ रावणारांचे संघ, अशी सन्यत्सेन यांच्या संप्रदायाचीं तीन मुख्य अंगें आहेत. रशियाचें एम्. बोरोडिन व पन्नास साठ बोल्शेव्हिक हस्तक यांजकडे मजुरांचे व शेतकऱ्यांचे संघ स्थापण्याची चळवळ देण्यांत आली आणि सन्यत्सेन ह्यांच्या संप्रदायाची शपथ घेणाऱ्या चिनी लोकांचा राष्ट्रीय पक्ष निर्माण करण्यांत आला. या पक्षाच्या ठिकठिकाणीं संस्था स्थापण्यांत येऊन त्या संघामार्फत आलेल्या प्रतिनिधींची सहामाही काँग्रेस भरविण्याची वहिवाट १९२३ सालानंतर सन्यत्सेन ह्यांनीं पाडली, आणि या काँग्रेसनें निवडलेल्या छोट्या कमिटीच्या हातीं राष्ट्रीय पक्षाचें धोरण जाऊन वर्किंग कमिटीच्या हातीं राष्ट्रीय पक्षाची सत्ता गेली. दक्षिण चीनमध्यें सनदशीर व पद्धतशीर निवडून आलेल्या प्रतिनिधींचें पार्लमेंट नाहीं. सन्यत्सेन यांच्या संप्रदायाच्या सहामाही काँग्रेसनें ढोबळ मानानें पसंत केलेल्या वर्किंग कमिटीच्या उर्फ बारभाईंच्या हातांत सर्व सत्ता आहे. सन्यत्सेन यांचा संप्रदाय बहुजन समाजांत पसरविण्याचें काम रशियांतील बोल्शेव्हिकांच्या पद्धतीवर चाललें असून लष्करी अंमलदार शिकविण्याचें कामहि रशियाचे प्रोफेसर्स करीत आहेत. प्रत्यक्ष पैशाची किंवा सैन्याची मदत रशियन सरकारकडून होत

नाहीं, असें मि. रूटस् यांचें म्हणणें आहे. बोल्शेव्हिकांची राज्यपद्धति चीनमध्यें रूढ होणारी नसून मजुरांचे व शेतकऱ्यांचे संघ स्थापून मजुरांना व शेतकऱ्यांना आपल्या श्रमाचा मोबदला अधिक मिळवून देण्यापलीकडे बोल्शेव्हिक मतांचा उपयोग सांप्रत चीनमध्यें कांहीं होत नाहीं. मास्को येथें सन्यत्सेन युनिव्हसिटी स्थापली गेली असून नव्या संप्रदायाचे चार-पांचशें विद्यार्थी लष्करी व शास्त्रीय तऱ्हेचें नवें शिक्षण घेत आहेत. दरसाल येथें चारपांचशें नवे विद्यार्थी शिक्षण घ्यावयास जात असून १९२७-२८ सालीं तीन वर्षें शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची तुकडी राष्ट्रीय सेनेकरितां चीनमध्यें परत जाईल, असा अंदाज आहे. रशियाची मदत चीनला जी होते, त्या मदतीचें स्वरूप वरील प्रकारचें आहे. कँटनच्या लष्करी कॉलेजमध्यें विद्यार्थी घेतांना सन्यत्सेनच्या संप्रदायाची शपथ विद्यार्थ्यांस घ्यावी लागते आणि नव्या राष्ट्रीय सैन्यांतील सैनिकांना या संप्रदायाचीं तत्त्वें नीट समजावून देऊन सदर तत्त्वाप्रमाणें त्यांचें वर्तन बनतें किंवा कसें याजवर कायमची नजर ठेवण्यांत येते. सत्ता व पैसा ज्यांना पाहिजे असेल त्यांनीं या शाळेंत किंवा कॉलेजांत येऊं नये, अशा प्रकारच्या मोठमोठ्या पाट्या सर्व लष्करी शाळांवर व कॉलेजांवर लावून ठेवलेल्या आहेत. गरिबांना त्यांच्या श्रमाचा मोबदला न देतां कोणीहि श्रीमंत होतां कामा नये, हें सन्यत्सेन यांच्या संप्रदायांतील डेमॉक्रसीचें आणि सोशीआलिझमचें मुख्य तत्त्व आहे. या तत्त्वाला धरून मजुरांचे ऊर्फ शेतकऱ्यांचे संघ स्थापण्यांत येत असल्यामुळें बहुजनसमाजाचा पाठिंबा सन्यत्सेन यांच्या संप्रदायाला पूर्णपणें मिळत आहे. परकी लोकांची कोणत्याहि प्रकारची व्यापारी अगर राजकीय सत्ता आपल्यावर नको, हें तत्त्व म्हणजेच चीनचा राष्ट्रीय बाणा होय. या बाण्यामुळें सुशिक्षितांचा व सामान्य श्रीमंत लोकांचा मोठा समुदाय सन्यत्सेन यांच्या संप्रदायाला मिळाला

आहे. राष्ट्रीयवाणा म्हणजे परकयांचा बहिष्कार, मजुरांचें संघ म्हणजे गरिबाचें रक्तशोषण करणाऱ्या पद्धतींना घालण्यांत आलेला आळा आणि लोकशाही या तीनच मुख्य आधारस्तंभांवर सन्यत्सेन यांच्या संप्रदायाची सत्ता उभारली असून बोल्शेव्हिक तत्त्वाकडे चीनच्या राष्ट्रीय पक्षानें अद्याप लक्ष पुरविलेलेंच नाहीं. सन्यत्सेन हे वारल्यानंतर कँटन व शांघाय येथें मजुरांच्या तर्फे चिनी विद्यार्थ्यांची मोठी चळवळ चालली असतां १९२५ सालीं इंग्रजी बंदुकांनीं चिनी विद्यार्थ्यांवर गोळ्या झाडल्या व शेकडों चिनी विद्यार्थ्यांचें रक्त चिनी भूमीवर सांडण्यांत आलें. लष्करी दृष्ट्या आपण दुबळे आहोंत असें पाहून इंग्रजांविरुद्ध कडकडीत बहिष्कार घालण्याची चळवळ सन्यत्सेन यांच्या संप्रदायानें सुरू केली आणि दोन तीन वर्षें कडकडीत बहिष्कार घालून इंग्रजी व्यापाऱ्यांना मेटाकुटीस आणण्याचें श्रेय संपादन केलें. बहिष्काराचें जंगी अस्त्र पेलण्याइतकी शक्ति चिनी राष्ट्रांत आहे, असा अनुभव येण्याबरोबर राष्ट्रीय पक्षाची सत्ता हां हां म्हणतां चोहोंकडे पसरली; आणि सन्यत्सेन यांची मूर्ति नव्या चीनचें दैवत बनून दर सोमवारीं सन्यत्सेन यांच्या तजविरीची आराधना चीनमध्यें चोहोंकडे सुरूं झाली. आजकाल सन्यत्सेन यांना अवतारी पुरुष मानण्यांत येत असून, मजूर, शेतकरी, सुशिक्षित व श्रीमंत लोक त्यांच्या संप्रदायाचे सभासद झाले आहेत. राष्ट्राकरितां व राष्ट्रीय भावनेकरितां लढणारें राष्ट्रीय सैन्य असून परकयांची व्यापारी किंवा राजकीय सत्ता आपल्या देशांत नको, म्हणून जो तो बहिष्काराच्या चळवळींत सामील होत आहे. बहिष्काराचें अस्त्र तुमच्या तोफांहून अधिक किंमतीचें आहे असें मि. चेन इंग्रजांना बजावीत असून, उत्तरेकडील चांगसोलिन यांचें भाडोत्री लष्कर राष्ट्रीय भावनेच्या लष्करापुढें मेल्यासारखेंच आहे, अशी गर्वोक्ति एम्. बारोडिन यांच्या तोंडून निघत आहे. बोल्शे-

व्हिकांच्या हातीं चीनचें भविष्य गेलें नसून सन्यत्सेन यांच्या संप्रदायाशीं वागतांना जर इंग्लंडनें नमतें घेतलें तर त्यांत चीनचें व इंग्लंडचें कल्याण आहे, असा सल्ला मि. रूटस यांनीं इंग्लंडला दिला असून, नव्या चीनच्या नव्या संघटनेपुढें युरोपियनांचें कांहीं चालणार नाहीं, असें अमेरिकेचें मत बनत चाललें आहे.

* शिवाजी आणि सह्याद्री

श्रीशिवाजी महाराजांचा तीनशें वर्षांचा जन्मोत्सव ता. १ मे पासून ता. १० मेपर्यंत साजरा करण्याचें काम बॅ. जयकर यांच्या अध्यक्षतेखालीं उत्सव-कमिटीनें मोठ्या नेटानें सुरू केलें आहे आणि उत्सवासंबंधानें कोणत्याहि प्रकारचा मतभेद महाराष्ट्रांत उरला नसून महाराजांच्या जन्माचा ता. ३ मे हा दिवस सर्व हिंदुस्थानांत मोठ्या समारंभानें पाळला जाणार आहे, ही संतोषाची गोष्ट होय. परमेश्वराची मेहेरबानी म्हणून श्रीशिवाजी महाराजांसारख्या मोठ्या विभूति परमेश्वरी कार्याकरितां जन्मास येत असतात. महाराष्ट्रांत असली विभूति तीनशें वर्षांपूर्वी जन्मास आली आणि हिंदुधर्माच्या संरक्षणाचें पवित्र कार्य तडीस नेणाऱ्या महाराष्ट्रधर्माची उभारणी व जोपासना योग्य प्रकारें महाराष्ट्रांत होऊन हिंदुधर्मावरील मोठें संकट टळलें, ह्यावद्दल महाराष्ट्रास विशेष अभिमान वाटणें अगदीं साहजिक आहे. गोब्राह्मणप्रतिपालक श्रीशिवाजी महाराज ह्यांच्या कारकीर्दीवर टीका करणाऱ्या श्रीयुत जदुनाथ सरकार ह्यांच्यासारख्या लेखकांनीं असें म्हटलें आहे कीं, धार्मिक वेडाचें अवडंबर महाराष्ट्रांत माजविण्याचें काम तेवढें महाराजांनीं केलें, पण आधुनिक तऱ्हेच्या राष्ट्रीय विचारांच्या पायावर महाराष्ट्राच्या नव्या राज्याची उभारणी श्रीशिवाजी महाराजांना करितां आली नाहीं, हा विभूति या नात्यानें महाराजांच्या चरित्रांत मोठा दोष आहे. आजच्या राष्ट्रीय भावनांच्या विचारसरणीनें श्रीशिवाजी महाराजांच्या चरित्राकडे पहाणें म्हणजे मोठी चुकी करणें होय. श्रीशिवाजी महाराजांचा काळच असा होता कीं, श्रीशिवाजी महाराज जन्मास आले नसते तर अवरंगजेब

---

* नवाकाळ, ता. २८ एप्रिल १९२७

बादशहाच्या जंगी लष्करी वरवंट्याखालीं हिंदुधर्माचा पक्का चुराडा होऊन गेला असता. स्मार्त व भागवत या दोन मतांच्या उभारणीनें व संचलनानें दक्षिणेंतील श्रीशंकराचार्य व श्रीरामानुजाचार्य वगैरे तत्त्ववेत्त्यांच्या विचार-सरणीवर, हिंदुधर्माची वैदिक काळची परंपरा कायम राखून सनातन हिंदुधर्माचा विजय सर्व हिंदुस्थानभर एकेकाळीं झाला होता; पण मुसलमानांच्या स्वाऱ्यांमुळें व राज्यामुळें सनातन हिंदुधर्मावर मोठें संकट ओढवलें व अवरंगजेब बादशहाच्या वेळीं हा धर्म सपशेल बुडतो कीं काय, अशी भीति उत्पन्न झाली. विजयनगरचें राज्य विजापूरच्या मुसलमानांनीं बुडविल्यामुळें दक्षिणेकडील तत्त्वज्ञान्यांचे दिवस संपले असें सर्वांना वाटूं लागले, आणि उत्तर हिंदुस्थानांत तर अवरंगजेब बादशहाचा वरवंटा जोरानें फिरूं लागला! श्रीशिवाजी महाराजांचे वडील शहाजी राजे कर्तृत्वांत, पराक्रमांत व वैभवांत दक्षिणेंतील हिंदूंत सर्वांत उच्च पदास चढलेले होते. त्यांच्या लायकीचा व दर्जाचा हिंदु सरदार त्यांच्या वेळीं कोणीहि नव्हता. मुसलमानांतील अंतस्थ कलहांचा पूर्ण फायदा घेऊन, रणभूमीवरील स्वत:च्या पराक्रमानें दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांचे ते आधारस्तंभ बनले होते; पण मुसलमानी संस्कृतीशीं व दरबारांशीं त्यांचा इतका निकट संबंध आला होता कीं, ती संस्कृति व ते दरबार सोडून देऊन, त्या संस्कृतीच्या व दरबारांच्या बाहेर पडून गोब्राह्मण प्रतिपालक आपण होऊं शकूं, व हिंदुधर्माचें संरक्षण करणारें राज्य आपण स्थापूं शकूं, हा विचार त्यांच्या स्वप्नांतहि शिवला नाहीं. ते बुद्धिमान नव्हते असें नाहीं; ते पराक्रमी नव्हते असें नाहीं; ते साहसी नव्हते असें नाहीं; किंवा हिंदु धर्मावर त्यांची भक्ति नव्हती असेंहि नाहीं! पण मुसलमानी दरबारांतील उलाढालींत त्यांची बुद्धि अहर्निश गुंगून राहिल्यानें, मुसलमानी दरबारांच्या तऱ्हेनेंच व स्वरूपानेंच विचार करण्याची संवय त्यांना इतकी लागून गेली होती कीं, विचार

करण्याची दुसरी एतादी पद्धत आहे हें त्यांच्या बुद्धीला श्रीशिवाजी महाराजांच्या अभ्युदयानंतर देखील केव्हांहि पटलें नाहीं. फाजील संघटनाचा हा परिणाम आहे. इंग्रजी साम्राज्याच्या स्वरूपाला धरूनच विचार करण्याची संवय कित्येक नामांकित विद्वानांना जशी लागलेली आहे, तशांतलाच हा प्रकार होय. हा संसर्ग—दोष आहे. दुसऱ्यांच्या विचारसरणीच्या चाकोरींतून एकसारखें फिरत राहिल्यानें त्या विचारसरणीलाच मनुष्याची बुद्धि वळी पडते आणि बुद्धीच्या ह्या दास्यामुळें स्वतंत्र शक्ति-निर्माण करण्याचें कार्य बुद्धिमान व पराक्रमी पुरुषांच्या हातून केव्हांहि घडून येत नाहीं! श्रीशिवाजी महाराज ह्यांचा जन्म शिवनेरी येथें झाला व सह्याद्रीला धरूनच त्यांना नेहमीं वावरावें लागलें ही श्रीशिवाजी महाराजांवर परमेश्वरी कृपाच होय. सह्याद्री पर्वत त्यावेळीं सर्व राजसत्तेच्या दृष्टीनें टाकाऊ समजला जात होता. समाजाशीं फारसा संपर्क नको अशा वैतागानें गांजलेल्या पोळलेल्या श्रीज्ञानेश्वर महाराजांसारख्या साधुसंतांचें निवासस्थान सह्याद्री पर्वत श्रीशिवाजी महाराजांच्या वेळीं शेकडों वर्षें होऊन बसला होता. महाराष्ट्राच्या विद्वत्तेचें व धार्मिक सामर्थ्याचें केंद्रस्थान त्यावेळीं गोदावरीचा किनारा असतांहि पुणें, सातारा ह्या जिल्ह्यांतील सह्याद्रीच्या खोऱ्यांत राहून काम करणें श्रीसमर्थ रामदास स्वामी व श्रीतुकाराम महाराज ह्यांच्यासारख्या साधुसंतांना इष्ट वाटलें होतें. रूढ झालेल्या विचारसरणीच्या संपर्कापासून अलिप्त राहिल्याशिवाय नवीन सांप्रदाय केव्हांहि जन्मास येत नसतो! राजसत्तेनें व रूढ विचारसरणीनें टाकाऊ समजलेली भूमीच नवीन विचारसरणीची व सांप्रदायाची जोपासना करीत असते. श्रीशहाजी राजे ह्यांच्यावरील संकटानें व घरगुती इतर कारणांमुळें सह्याद्रीच्या टापूंत श्रीशिवाजी महाराजांना व मातोश्री जिजाबाईंना एक तऱ्हेनें टाकून देण्यांत आलें होतें आणि त्यांची ही मुसलमानी दरबारपासून अलिप्त स्थिति (Detached Position) त्यांच्या

अंगच्या धार्मिक श्रद्धेस चेतविण्यास व परमेश्वरी कृपा संपादन करून साहसी कृत्यांस प्रवृत्त करण्यास बऱ्याच अंशीं कारणीभूत झाली, ह्यांत संशय नाहीं. दक्षिणेंतील मुसलमानी राज्यें व दिल्लीची बादशाही त्या दोघांनाहि सह्याद्रीचा फारसा उपयोग होत नव्हता. सर्वांत कमी दर्जाचें ठिकाण असें सह्याद्रीला समजण्यांत येत असे. ह्या सह्याद्रीच्या अलिप्त स्थितींत महाराज जन्मास आले व वाढले. परमेश्वराची कृपा आपणावर आहे, अशा प्रकारचा धार्मिक संचार महाराजांना होण्याइतकी महाराजांची श्रद्धा परिपक्व झाली. कोणत्याहि गोष्टीबद्दलची श्रद्धा उत्पन्न झाल्याशिवाय पराक्रमाला चेतविणारा परमेश्वरी संचार (Inspiration) उत्पन्न होत नसतो! धार्मिक बाब बगळून इतर दृष्टींनीं मोठ्या विभूतींकडे पाहिलें असतां परमेश्वरी संचाराचा पाठिंबा ल्या विभूतींच्या चरित्रास फारच महत्त्वाचा असतो, असेंच दिसून येतें. तर्क कुंठित झाल्यावर श्रद्धेवर व असल्या संचारावर अवलंबून रहाणें मोठ-मोठ्यांना भाग पडतें. रूढ विचारसरणी व तर्क ज्या ठिकाणीं कुंठित होतो व पुढील मार्ग सुचत नाहीं, त्या ठिकाणीं मार्गदर्शक होऊन आपल्या राष्ट्राला जे वैभवाला चढवितात, ते परमेश्वरी संचारावर पूर्ण विश्वास ठेवणारेच असतात. श्रीशिवाजी महाराज ह्यांचा हा असला विश्वास पूर्व वयांतच दृढ झालेला होता. मुसलमानी दरबारांत व कौन्सिलांत वसण्याची शहाजी राजे ह्यांच्ची संवय श्रीशिवाजी महाराजांना बिलकूल लागलेली नव्हती. सह्याद्रीनें त्यांना ह्या संवयीपासून अलिप्त ठेवलें होतें. त्यामुळें परमेश्वरी कृपेचा जो अनुभव शहाजी राजे ह्यांना आला नाहीं तो शिवाजी महाराजांना आला; परमेश्वरी संचाराचें जें तेज शहाजी राजे ह्यांना दिसलें नाहीं, तें तेज शिवाजी महाराजांच्या डोळ्यांपुढें नेहमीं खेळूं लागलें; शहाजी राजांच्या बुद्धीला जीं कामें अत्यंत अवघड म्हणून त्याज्य वाटलीं, तींच कामें आपल्या पराक्रमाच्या आटोक्यांत आहेत, असें महाराजांच्या बुद्धीला सहज पटलें !

सह्याद्रीचा टापू टाकाऊ ठरलेला असल्यानें, पूर्ववयांतील महाराजांच्या पराक्रमाकडे व साहसाकडे मोठमोठ्या मुसलमानी दरबारांचें लक्षच गेलें नाहीं. सह्याद्रीनें महाराजांच्या पराक्रमावर इतरांची पापी नजर लागणार नाहीं असा बंदोबस्त केला; आणि ज्यावेळीं महाराजांचा पराक्रम सह्याद्रीला पुरून बाहेर पडूं लागला, त्यावेळीं पापी नजरेला थोपवून धरण्याइतकी शक्ति व मसलत महाराजांच्या राजकारणांत उत्पन्न झाल्यानें महाराजांपुढें कोणाचेंच कांहीं चाललें नाहीं. परमेश्वरी संचाराचा अनुभव घेण्याइतकी महाराजांच्या श्रद्धेची परिपक्व स्थिति हा महाराजांच्या चरित्रांत दोष नसून, हिंदु धर्माचा संरक्षक या नात्यानें बलवत्तर सद्गुणच महाराजांच्या चरित्रांत समजला पाहिजे, यांत संशय नाहीं. महाराजांच्या अंगीं हा गुण जर नसता आणि ह्या गुणास वाढीस लावण्याचें सामर्थ्य जर सह्याद्रीच्या त्यावेळच्या अलिप्त स्थितीमुळें उत्पन्न झालें नसतें, तर अवरंगजेबच्या बादशाहीला जेरीस आणणारा सह्याद्रीच्या आश्रयाखालील महाराष्ट्र दृष्टीस पडला नसता. तीनशें वर्षांपूर्वी हिंदुधर्मावरील संकटाच्या वेळीं अत्यंत धार्मिक श्रद्धेचाच पराक्रमी पुरुष जन्मास यावयास पाहिजे होता. हल्लींच्या राष्ट्रीय विचारांचा तो काळ नव्हता आणि धार्मिक बाब एका बाजला ठेवून निव्वळ राष्ट्रीय विचारांना उचलून धरणें त्यावेळीं शक्यहि नव्हतें. त्यावेळीं जरूर नव्हते व शक्य नव्हते असले विचार महाराजांनीं आपल्या राजसत्तेनें रूढ केले नाहींत म्हणून श्रीशिवाजी महाराजांना व त्यांच्या सह्याद्रीला दोष लावण्यांत अर्थ कोणता ?

———

* शिवाजी आणि कोंकणपट्टी

श्रीशिवाजी महाराज ह्यांना सह्याद्री पर्वतानें शिवनेरी किल्ल्यांत जन्म दिला इतकेंच नव्हे, तर. हिंदुधर्माची स्थापना करूं पहाणारा पराक्रमी पुरुष ह्या नात्यानें सुसंरक्षित घरहि सह्याद्री पर्वतानें बांधून दिलें. सह्याद्रीच्या सावलींतील देशावरचा भाग आणि समुद्रकिनाऱ्यावरची कोंकण पट्टी हा टापू मुळींच सुपीक नाहीं. गोवा आणि वसई ह्या दोन मुलखांच्या आसपासच्या टापूंत जहाजांना उपयोगीं पडणारें चांगलें लाकूड निर्माण होतें. ह्या लाकडाच्या संपत्तीशिवाय दुसरी संपत्ति सह्याद्री पर्वतांत नाहीं. हें दारिद्र्यच सह्याद्री पर्वताला एकप्रकारें स्वतंत्र ठेवण्यास, आधुनिक यांत्रिक युगाच्या पूर्वी कारणीभूत झालेलें आहे. सह्याद्रीचे स्वाभाविक किल्ले हस्तगत करणें मोठमोठ्या सैन्याला त्या वेळीं अत्यंत कठीण जात होतें, आणि इतकेंहि करून दरिद्री मुलखावर व दरिद्री लोकांवर स्वतःचा पैसा खर्च करून सत्ता गाजविण्यापलीकडे दुसरा कांहीं लाभ होत नव्हता. साधल्यास राज्य करावें न साधल्यास सह्याद्रीला मोकळें सोडावें, असें सर्व राज्यकर्त्यांचें धोरण सह्याद्रीसंबंधानें होतें. पोर्तुगीज लोकांनीं शेकडों वर्षें कोंकणपट्टीवर राज्य केलें, पण सह्याद्री ओलांडून देशावर जाण्याची महत्त्वाकांक्षा धरली नाहीं. आफ्रिकेच्या केप-ऑफ-गुडहोपपासून चीनच्या लगतच्या सिंगापूरच्या ठाण्यापर्यंत अरबी समुद्र, हिंदीमहासागर व बंगालचा उपसागर ह्या समुद्रांत संचार करणाऱ्या सर्व जहाजांवर डोईपट्टी बसवून व कोंकणपट्टींत समुद्राजवळच्या टापूंत ख्रिस्ती धर्माशिवाय इतर धर्मांना अनुसरून खाजगी घरांतूनहि परमेश्वराची पूजाअर्चा बंद पाडून,

* नवाकाळ, ता. २९ एप्रिल १९२७

पोर्तुगीज लोकांनीं कोकणपट्टीवर मोठ्या दिमाखानें राज्य केलें; पण सह्याद्रीनें पोर्तुगीज लोकांच्या महत्त्वाकांक्षेला व कर्तृत्वाला आळा घातला आणि देशावर पोर्तुगीजांचें संकट जाऊं दिलें नाहीं. पोर्तुगीजांच्या ह्या आमदानींत कोकणपट्टींत समुद्राजवळ रहाणारे सर्व हिंदु, देशावर रहाणाऱ्या हिंदूंच्या दृष्टीनें वाटगे आणि आजकाल विलायतेला राहून आलेल्या हिंदूंप्रमाणें साहजिकपणेंच धर्महीन समजले जात होते. पोर्तुगीज लोकांची कोकणपट्टींतील ही सत्ता अत्यंत करडी होती. पण शिवाजी महाराजांच्या जन्माच्या वेळीं पोर्तुगीज लोकांचा अंमल खालावलेला होता. युरोपखंडांत कॅथॉलिक-प्रोटेस्टंट ह्यांच्यामधील युद्धाचा शेवट होऊन धार्मिक जुलमांच्या फंदांत पडावयाचें नाहीं आणि सर्व राष्ट्रांनीं व्यापारी उद्योगधंद्यांत व कारखान्यांत अधिक लक्ष घालावयाचें, असें तहनाम्यांत नमूद करण्यांत आलें. कित्येक पिढ्या सदर तहनाम्यांतील धोरणाचा अंमल करण्यांत गेल्या, आणि अरबी समुद्रांतील पोर्तुगालची अग्रपूजा नष्ट होऊन डच, फ्रेंच, इंग्रज, अरब व हबशी ह्या सर्वांचीं जहाजें अरबी समुद्रांत हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर सारखेपणानें व स्वतंत्र रीतीनें व्यापार करूं लागलीं. सतराव्या शतकाचे प्रारंभीं कोकणपट्टीचा समुद्र खुला झाला, पाहिजे तें जहाज कोकणपट्टीच्या बंदराला येऊं लागलें; आणि पाहिजे तो व्यापार करूं लागलें. गोवा, दाभोळ आणि वसईची खाडी हीं व्यापारांचीं केंद्रस्थानें व मोठीं नामांकित बंदरें होतीं. कर्नाटकचा व्यापार गोव्याचे मार्फत चाले; अहमदनगर, विजापूर वगैरे टापूंचा व्यापार चिपळूणच्या खाडीवरील दाभोळ बंदराच्या मार्फत चाले; पण देशावरील मुसलमानांच्या उलाढालीमुळें आणि पोर्तुगालच्या सत्तेखालील कोकणपट्टीवर धार्मिक दृष्टीनें देशावरील हिंदूंनीं बहिष्कार घातलेला असल्यामुळें कोकणपट्टीच्या व्यापाराला श्रीशिवाजी महाराजांचे वेळीं महत्त्वच राहिलें नाहीं. काठेवाडचा किनारा

आणि गुजराथच्या किनाऱ्यावरील सुरतचें बंदर हा टापू त्यावेळीं व्यापाराच्या दृष्टीनें फार महत्त्वाचा होता. ह्यामुळें कोकणपट्टीच्या किनाऱ्यावर कोणतें जहाज कसें लागतें, ह्याकडे कोणाचेंच लक्ष नव्हतें. कोकणपट्टीचा व्यापार धनधान्याचा त्यावेळीं नसून, हत्यारांची विक्री करण्याची मोठी बाजारपेठ कोकणपट्टी होऊन बसली होती. विजापूरकरांहून किंवा दिल्लीच्या मोंगल बादशहाहून अधिक सरस व लांब तलवारी आणि लांब पल्ल्यांच्या बंदुका ह्यांचा मुबलक पुरवठा त्यावेळीं कोकणपट्टी करूं शकत असे आणि हत्यारांच्या ह्या बाजारपेठेचा पूर्ण उपयोग करून घेण्यास श्रीशिवाजी महाराजांनीं बिलकूल कसूर केली नाहीं. परक्यांच्या हत्यारांवर अवलंबून रहाण्याचें महाराष्ट्रानें सतराव्या शतकाच्या आरंभीं जें धोरण स्वीकारलें तें धोरण एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत अव्याहत अमलांत राहिलें. इंग्रजांविरुद्ध फ्रेंचानीं हत्यारें पुरवावींत, फ्रेंचांविरुद्ध इंग्रजांनीं हत्यारें पुरवावींत, असा क्रम एकसारखा दोनशें वर्षें चालू होता ! फ्रान्समध्यें मोठी राज्यक्रांति होऊन हिंदुस्थानांतील फ्रेंचांचीं मनें निराश व खट्टू होईपर्यंत आणि समुद्राची सत्ता इंग्रजांच्या हातीं पूर्णपणें जाईपर्यंत फ्रेंचांनीं महाराष्ट्रास हत्यारें पुरविण्यास व लष्करी कवाईत शिकवण्यास कमी केलें नाहीं. फ्रेंच राज्यक्रांति झाल्यावर शिंद्यांच्या लष्करांतील फ्रेंच सरदारांनीं हातपाय गाळले आणि इंग्रजांची चलती कबूल करून महाराष्ट्राला सोडून दिलें. १७९५ सालच्या खर्ड्याच्या लढाईपर्यंत महाराष्ट्राच्या लष्करी चलतींत कमीपणा आला नाहीं, पण फ्रेंचांची राज्यक्रांति झाल्यानंतर एकट्या इंग्लंडशिवाय हिंदुस्थानशीं संबंध ठेवणारें दुसरें प्रमुख राष्ट्र युरोपखंडांत नाहीं सें झाल्यामुळें इंग्रजांच्या हत्यारांच्याच ओंजळीनें महाराष्ट्रास पाणी प्यावें लागलें आणि सर्व घर क्रमाक्रमानेंच इंग्रजांच्या कबजांत गेलें ! एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभीं युरोपखंड व हिंदुस्थान ह्यांच्या संबंधांत इंग्रजांच्या अग्रपूजेची जी नवी परिस्थिति उत्पन्न झाली ती श्रीशिवाजी

महाराजांच्या जन्माचे वेळीं हिंदुस्थानांत बिलकूल नव्हती. कोकणपट्टी हत्यारांच्या खुल्या व्यापाराची बाजारपेठ होऊन बसली होती आणि हत्यारांच्या ह्या बाजारपेठेचा महिमा दोनशें वर्षें एकसारखा चालला होता. श्रीशिवाजी महाराजांच्या जन्माच्या वेळीं ह्या हत्यारांच्या बाजारपेठेचें स्वरूप देशावरील मुत्सद्यांच्या लक्षांत आलेलें नव्हतें. बाजारपेठेला प्रारंभ झाला होता आणि देशावरील मुत्सद्यांचा निकट संबंध असल्या बाजारपेठेशीं आलेला नव्हता. श्रीशिवाजी महाराजांच्या कुशाग्र बुद्धीनें अर्धवट झांकलेल्या व अर्धवट उमलूं लागलेल्या मुग्धावस्थेंतील ह्या पेठेचा पूर्ण फायदा घेतला आणि मराठ्यांचें लष्कर रणांगणावर पुढें ज्या योगानें विशेष कार्यक्षम ठरलें त्या योगाचें धोरण श्री शिवाजी महाराजांनीं एकदम अंमलांत आणलें. सह्याद्रीनें किल्ल्यांचें सुसंरक्षित घर महाराजांना दिलें; कोंकणपट्टीच्या समुद्रानें निराळ्या तऱ्हेच्या हत्यारांचीं रत्नें आपण होऊन महाराजांच्या चरणीं अर्पण केलीं; सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत रहाणाऱ्या साधुसंतांनीं धर्माकरितां मरण्याची प्रवृत्ति सह्याद्रीच्या टापूंत उत्पन्न केली; आणि महाराजांच्या वीरवृत्तीनें, साहसी स्वभावानें, कुशाग्रबुद्धीनें आणि परमेश्वरी संचारापर्यंतची मजल गांठलेल्या धर्मनिष्ठेनें कोंकणपट्टींतील रायगडच्या किल्ल्यांत हिंदुधर्माचें संरक्षण करणाऱ्या राज्यसत्तेची स्थापना करून महाराष्ट्रास कृतार्थ केलें; हत्यारांचा पुरवठा होण्याइतकी परराष्ट्रीय उलाढालींची झुंज आपल्या परडींपर्यंत परमेश्वरानें आणून सोडल्यावर आणि शत्रूची दृष्ट लागणार नाहीं अशा घरांत वसविल्यावर परमेश्वराच्या कृपेंतल्या विभूतीला, टाकाऊ भूमींतून, तुच्छ मानलेल्या जनसमूहांतून, आणि निराशेच्या वातावरणांतून परमेश्वरी कार्य तडीस नेणारी नवी शक्ति निर्माण करतां येते. श्रीशिवाजी महाराजांनीं हेंच कार्य रायगडला महत्त्व देऊन केलें आणि शहाजीराजे ह्यांच्या स्वप्नींहि जें आलें नाहीं तें प्रत्यक्ष करून दाखविलें !

———

* शिवाजी आणि मुसलमान

गोब्राम्हणप्रतिपालक ही विजयानगरच्या हिंदु राजघराण्याची पदवी श्रीशिवाजी महाराज ह्यांनीं घेतली होती आणि त्या पदवीला अनुसरून परमेश्वरी कार्य त्यांनीं तडीसहि नेलें. तथापि मुसलमानांचा द्वेष त्यांच्या चरित्रांत बिलकूल दृष्टीस पडत नाहीं. हिंदूंचें स्वतंत्र राज्य महाराजांनीं स्थापलें खरें, पण विजापूरचें राज्य बुडविण्याची द्वेषबुद्धि मनांत धरली नाहीं. हिंदुधर्मावर खरें संकट दक्षिणेंतील मुसलमानी राज्यामुळें उत्पन्न झालेलें नसून औरंगजेब बादशहासारख्या धर्मवेड्या मुसलमानांकडून उत्तरेस हें संकट उत्पन्न झालें आहे आणि ह्या कामीं दिल्लीचा बंदोबस्त प्रथम केला पाहिजे, असेंच महाराजांचें वर्तन होतें. सतराव्या शतकाच्या प्रारंभीं युरोप खंडांत धार्मिक लढायांच्या आठवणींना व त्या संबंधाच्या कारस्थानांना मुळींच महत्त्व राहिलेलें नव्हतें. व्यापारी पद्धतीचें व कारखानदारीचें नवें ध्येय युरोपखंडापुढें त्यावेळीं होतें. भूमध्य समुद्राच्या कांठच्या मुसलमानांतहि धार्मिक कर्तव्यनिष्ठा दृष्टीस पडत असली तरी जबरदस्तीनें इतरांना मुसलमान करण्याचें धार्मिक वेड त्यावेळीं उरलेलें नव्हतें. आरबस्थानची किंवा भूमध्य समुद्राच्या कांठची मुसलमानी संस्कृति उत्तरेकडील मोंगलांची नव्हे, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. औरंगजेबाचें वेड त्यावेळीं इतर मुसलमानी प्रदेशांत बिलकूल नव्हतें. आज हिंदुस्थानाबाहेर मुसलमानी वेड नाहीं. पण पंजाबच्या बाजूला तें वेड शिल्लक आहे. ह्यामुळें हिंदुस्थानांतील मुसलमान आणि टर्की व आफगाणिस्थान येथील मुसलमान ह्यांच्या धार्मिक धोरणांत आज जमीनअस्मानाचें अंतर आहे. तशाच तऱ्हेची

---

* नवाकाळ, ता. ३० एप्रिल १९२७

स्थिति ईजिप्त, ॲबिसीनिया व तांबड्या समुद्राकांठचा मुसलमानी प्रदेश ह्यांच्या धार्मिक दृष्टींत सतराव्या शतकाच्या प्रारंभीं उत्पन्न झाली होती. आरबी समुद्रांतून कोंकण पट्टीवर जे मुसलमान त्यावेळीं उतरत होते, ते ऐहिक वैभवाच्या लालुचीनें साहस कर्मास प्रवृत्त झालेले होते; धार्मिक वेडेपणाची दृष्टी त्यांच्या अंगीं नव्हती. युरोपखंडाची आज जशीं एकी नाहीं तशी त्यावेळीं मुसलमानांची एकी नव्हती. आज जर्मन इंग्रजांच्या विरुद्ध जाऊ शकतो, फ्रेंच लोक जर्मनीचा द्वेष करूं शकतात, आणि रशियांतले बोल्शेव्हिक तर सर्व युरोपियनांचें वैभव उलथें पालथें झालें तरी बिलकूल पर्वा करीत नाहींत. आरबी समुद्रांत येणाऱ्या महाराजांच्या वेळच्या युरोपियनांची व मुसलमानांची दृष्टि केवळ व्यापारी स्वरूपाची होती, आणि त्यांतल्यात्यांत हबशी व आरबी व्यापाऱ्यांचें समुद्रावर युरोपियनांच्या पुढें त्यावेळीं चालत नव्हतें. ह्यामुळें स्वतःचें घोडें पुढें ढकलण्याकरितां आजकालच्या रशियांतील बोल्शेव्हिकांप्रमाणें धर्म व राष्ट्र यांजकडे दुर्लक्ष करून पाहिजे त्यास पाहिजे ती मदत करण्यास आरबी व हबशी मुसलमान तयार झाले होते. राजकाजांतील धार्मिक धोरण एका बाजूस पडून व्यापारी धोरण पुढें आलें होतें. युरोपखंडाच्या पालटलेल्या ह्या परिस्थितींत तांबड्या समुद्राच्या कांठचे मुसलमान व्यापारी बाबींतहि आजकालच्या बोल्शेव्हिकांप्रमाणें ना मंत्र ना तंत्र अशा धर्तीच्या स्वतंत्र स्वरूपाचे होते. कोंकणपट्टींत असल्या मुसलमानांचा शेजार महाराजांना सहाजिकपणें त्यावेळीं मिळाला. बोल्शेव्हिकांची आज अफगाणिस्थानांत जी स्थिती आहे ती स्थिती कोंकणपट्टींत आरबी समुद्रामार्फत व्यापार करणाऱ्या मुसलमानांची सतराव्या शतकाच्या प्रारंभीं होती. हा शेजार शहाजी राजे ह्यांना लाभला नाहीं, हा शेजार रजपूत सरदारांना मिळाला नाहीं, हा शेजार फक्त सह्याद्रीपर्वताच्या उदरीं जाऊन पडलेल्या श्रीशिवाजी महाराजांना मिळाला. ह्यामुळें केवळ

मुसलमान एवढ्याचकरतां द्वेष करण्याची किंवा मुसलमानांवर गैरविश्वास करण्याची प्रवृत्ति महाराजांच्या अंगीं बिलकूल दिसून आली नाहीं. आज चोल्शेच्छिक अफगाणिस्थानच्या अमीरसाहेबांच्या पदरीं विमानी खात्याचे प्रमुख म्हणून जसे नोकरीस आहेत आणि त्यांच्यावर जसा अमीरसाहेबांचा पूर्ण विश्वास आहे, तशीच स्थिती आरबी समुद्रांतून कोंकणपट्टींत उतरलेल्या मुसलमानांसंबंधानें श्रीशिवाजी महाराजांची होती. तलवारी, बंदुका व तोफा ह्यांच्या संबंधाच्या कामगिरींत मुसलमानांवर श्रीशिवाजी महाराजांनीं पूर्ण विश्वास टाकला होता. हें धोरण पुढें इतकें बळावत गेलें कीं, खुद्द पानिपतच्या लढाईंत तोफखान्याची व्यवस्था मुसलमानी सरदाराच्या हातीं होती, इतकेंच नव्हे तर रणभूमीवर आपली कामगिरी योग्य रीतीनें बजावण्यास मुसलमानांच्या हातांतील त्या तोफखान्यानें बिलकूल कमी केलें नाहीं. शहाजी राजे ह्यांनीं दक्षिणेंतील एका मुसलमानी राज्याविरुद्ध दुसऱ्या मुसलमानी राज्याचें कसें संरक्षण करावयाचें ह्या मसलतींत प्राविण्य मिळविलें. शहाजी राजे ह्यांचे सद्गुण श्रीशिवाजी महाराजांत तंतोतंत उतरले होते, पण दृष्टी मात्र निराळी होती. हिंदूंचें स्वतंत्र राज्य पाहिजे, हिंदूंना उपयोगी पडणाऱ्या मुसलमानांची काळजी बरोबरीच्या नात्यानें घेऊन दक्षिणेंतील मुसलमानांचीं राज्यें न बुडवतां औरंगजेबाला ताळ्यावर आणावयाचें, हें ध्येय महाराजांनीं डोळ्यांपुढें ठेवलें होतें. ह्या ध्येयामुळें मराठ्यांच्या साम्राज्याच्या वेळीं प्रसंगाप्रसंगानें दिल्लीचें कारस्थान मुख्य झालें. अंगांत ताकद असतांहि हैदराबादचें निजामचें घराणें अजिबात बुडविण्याची बुद्धि खर्ड्याच्या लढाईंत निजामाला कैद केला असतांहि कोणीहि धरली नाहीं; आणि इराणच्या नादीरशहाची स्वारी दिल्लीवर झाली असतांना परदेशच्या मुसलमानांपासून दिल्लीच्या मुसलमानांचें संरक्षण करण्याचें अगत्य मराठ्यांच्या लष्कराला तेव्हांच पटलें ! मुसलमानांसंबंधाच्या

ह्या उदार व व्यापक धोरणाचा पाया श्रीशिवाजी महाराजांनीं स्वतःच्या वर्तनानें स्वतःच्या कारकीर्दीतच रचून टाकला. धर्मवेडेपणानें हिंदुधर्माची पायमल्ली करण्याची ज्या मुसलमानांना जरुरी वाटत नव्हती त्या मुसलमानांना हाताशीं धरण्यास, त्यांच्या लायकीप्रमाणें त्यांना मोठया नोकऱ्या देण्यास, व हिंदूंशीं योग्य रीतीनें वागणाऱ्या दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांचा हिंदूंचें स्वराज्य स्थापल्यानंतर स्नेह संपादन करण्यास महाराजांनीं बिलकुल कसूर केली नाहीं. परमेश्वरी संचाराचा अनुभव घेण्याइतकी धर्मनिष्ठा महाराजांत होती हें खरें, पण त्याबरोबरच आकुंचित दृष्टि न ठेवतां शें दोनशें वर्षें महाराष्ट्रास उपयोगी पडणारें धोरण आंखून व त्याचा पाया मजबूत करून, मुसलमानी प्रजेला, मुसलमानांच्या बायकांना, मुसलमानांच्या मशिदींना आणि स्नेही ठरलेल्या मुसलमानी राज्यांना यत्किंचित्हि तोशीस न लागेल असलें व्यापक धोरण अंमलांत आणण्याइतका परमेश्वरी वरदहस्त महाराजांच्या मस्तकावर होता ह्यांत तिळमात्र संशय नाहीं. जे मुसलमान धर्मवेडेपणा एका बाजूस ठेवून महाराजांशीं स्नेहवृत्तीनें वागले त्यांचें कल्याण दख्खनमध्यें शें दोनशें वर्षें होईल इतक्या व्यापक प्रेमळपणानें महाराज त्यांच्याशीं वागण्यास तयार झाले. हिंदुस्थानच्या हितसंबंधाकडे लक्ष देऊन स्नेहबुद्धीनें वागणाऱ्या युरोपियन व्यापाऱ्यांचें हिंदी स्वराज्यांत यत्किंचित्हि नुकसान होणार नाहीं; अशी ऐतिहासिक खातरजमा जर कोणास पाहिजे असेल तर श्रीशिवाजी महाराज व मुसलमान ह्यांच्यामधील संबंधाकडे त्यांनीं अवश्य पहावें अशी आमची शिफारस आहे. धार्मिक बलात्काराविरुद्ध श्रीशिवाजी महाराज होते, मुसलमानांच्या विरुद्ध श्रीशिवाजी महाराज नव्हते. आज धार्मिक बलात्काराचे दिवस नाहींत; व्यापारी रक्तशोषणाचे दिवस आहेत. पण एका परिस्थितीचा न्याय ध्येयांतील फरक संभाळून दुसऱ्या परिस्थितीस लागू पडणारा आहे. महाराष्ट्रांतील धर्मबुद्धि साधुसंतांनीं परमेश्वरी स्वरूपास

ओळखून जागृत केलेली होती; दुसऱ्याच्या द्वेषाच्या पायावर ही धर्मबुद्धि उभी राहिलेली नव्हती. स्वतः झीज सोसावयाची, स्वतः कावाडकष्ट करावयाचे आणि आपला संसार आपण संभाळून फावल्या वेळांत तालीम करून एक प्रकारच्या युरोप खंडांतील कॉन्सक्रिप्शनच्या किंवा सर्वांना लष्करी काम करावयास भाग पाडणाऱ्या कायद्याप्रमाणें घरचें खाऊन, घरचा घोडा घेऊन, घरची तरवार कमरेस लटकावून, व घरचा भाला हातांत घेऊन लष्करी नोकरी करावयाची ही आत्मयज्ञाची प्रवृत्ति साधुसंतांच्या शिकवणुकीमुळें महाराष्ट्रांत उत्पन्न झाली होती. ह्या स्थितीचा फायदा शहाजी राजे ह्यांनीं थोडासा घेतला; जिजाबाई व दादोजी कोंडदेव ह्यांनीं ह्या स्थितीला अंशतः देहधारी उर्फ ऑर्गनाइज्ड बनविलें; महाराजांनीं ह्या लष्करी देहाची जोपासना केली; आणि पुढें हा देह वाढीस लागून दक्षिणेंत कावेरी नदीपासून उत्तरेस गंगा–यमुनेपर्यंत महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांच्या सैन्याचा दरारा चोहोंकडे बसला. रजपूत सरदारांना जें दिसूं शकलें नाहीं तें महाराजांना सह्याद्रीच्या शिखरावर बसून स्वच्छ दिसलें; शहाजी राजे ह्यांना जें समजलें नाहीं तें कोंकणपट्टीतील परक्यांच्या हत्यारांच्या बाजारामुळें श्री शिवाजी महाराजांना स्वच्छपणें समजलें; आणि परमेश्वरी कृपाप्रसादाच्या महाराजांच्या बुद्धीला पुढील शें दोनशें वर्षांचा काल एकदम आकलन करणें मुळींच कटीण झालें नाहीं ! तीनशें वर्षांपूर्वीची स्थिति आज नाहीं; पण इतिहासाची पुनरावृत्ति होते ह्या न्यायानें पूर्वीचेच कांहीं कांहीं प्रसंग नव्या स्वरूपांत आज पुढें येत आहेत. व्यापारी रक्तशोषणाच्या युरोपियन धोरणाची ताकद महायुद्धानें कंबरडे मोडल्यामुळें आज फार कमी झाली आहे आणि व्यापारी धोरणाशीं सोशालिस्टिक मतांचें संमिश्रण करणें युरोपांतील राष्ट्रांना जरुरीचें होऊन बसल्यामुळें, धार्मिक वेडेपणाचा नव्हे, आर्थिक रक्तशोषणाचा नव्हे व साम्राज्यसत्तेचाहि नव्हे असा नवा

संप्रदाय इंग्रजी मुत्सद्यांनाहि इष्ट वाटूं लागला आहे. तीनशें वर्षांपूर्वीचें राजकारस्थान जरी निराळें असलें तरी महाराजांचें चरित्र इतकें उज्ज्वल व मार्गदर्शक आहे कीं, नव्या परिस्थितींतहि महाराजांचें चरित्र आठवून, महाराजांचे सद्गुण गाऊन, आणि पडताळ्याकरितां महाराजांचें वर्तन डोळ्यांपुढें ठेवून, आजकालच्या हिंदुस्थानास स्वतःचा फायदा करून घेणें मुळींच कठीण नाहीं.

———

* ओडवायर आणि डायर

जनरल ओडवायर मृत्यु पावले ह्या गोष्टीचा उपयोग सर मायकेल ओडवायर हे स्वतःच्या अरेरावी व क्रूर मतांच्या प्रचारार्थ सांप्रत करून घेत आहेत. पंजाबांतील लष्करी कायद्याच्या वेळीं सर मायकेल ओडवायर यांच्या प्रोत्साहनानें जो अत्यंत क्रूरपणाचा व अपमानास्पद जुलूम पंजाबवर करण्यांत आला, त्या जुलमाबद्दल डायर ह्यांच्याप्रमाणेंच ओडवायरसाहेबहि शिक्षेस पात्र आहेत. जनरल डायर यांजवर ठपका ठेवण्यांत आला आणि ओडवायर-साहेब हिंदुस्थानांतून तसेच निसटून गेले. जनरल डायर यांच्या मृत्यूचा फायदा घेऊन त्या वेळचें आपलें निष्ठुर अरेरावी धोरण योग्य होतें, असें म्हणण्यास ओडवायरसाहेब आतां पुनः पुढें आले आहेत. मृत्यूच्या वेळीं मेलेल्या मनुष्याच्या चरित्राकडे सर्वजण सहाजिकपणेंच दयार्द्र दृष्टीनें पहात असतात. होऊन गेलेल्या गोष्टीची आठवण झाली तरी जुना बागुल-बोवा पुनः उभा करण्याची खटपट कोणीहि करीत नाहीं. उलट मृत्यूमुळें होऊन गेलेल्या गोष्टीवर पांघरूण घालण्याचाच शिष्टाचार आहे. जनरल डायर यांच्या मृत्यूमुळें जालियनवाला बागेच्या कत्तलीकडे सहानुभूतीनें पाहण्यांत येणार असें पाहून, ओडवायरसाहेबांनीं ह्या धांदलींत आपलें अरेरावी धोरणहि स्वच्छ धुवून काढण्याचा उद्योग आरंभिला आहे. उलटया काळजाशिवाय असलें कृत्य कोणीहि करूं शकणार नाहीं ! ओडवायरसाहेबांची पंजाबांतील कारकीर्द उलटया काळजाची होती, ह्याविषयीं कोणास शंका असल्यास ओडवायरसाहेबांच्या सांप्रतच्या उद्गारांकडे त्यांनीं अवश्य लक्ष पुरवावें, अशी आमची शिफारस आहे. ओडवायरसाहेब म्हणतात, पंजाबांत

---

* नवाकाळ, ता. २७ जुलई १९२७

त्यावेळीं खरोखरच बंड होणार होतें आणि हें बंड जर कोणी थांबविलें असेल तर तें जालियनवाला बागेमधील जनरल डायर यांनीं केलेल्या कत्तलीनेंच थांबविलें ह्यांत संशय नाहीं. अशी बहादुरकी गाजविल्याबद्दल जनरल डायर ह्यांना मोठें बक्षीस मिळालें पाहिजे होतें, पण हंटर कमिशननें त्यांना दोषी ठरविले आणि हिंदुस्थान सरकारनें व मॉंटेग्यूसाहेबांच्या लिबरल पक्षानें त्यांची मानहानि केली, हा विलक्षण अन्याय झाला असें ओडवायर-साहेबांचें मत असून, ह्या अन्यायामुळें झुरणीस लागून डायरसाहेब मृत्यु पावले, असा ओडवायरसाहेबांचा अभिप्राय प्रसिद्ध झाला आहे. चोरांच्या उलट्या बोंबा म्हणून म्हणतात त्या ह्याच ! डायरसाहेब मृत्यु पावल्या-नंतर लिबरल पक्षाच्या धोरणाला डायरसाहेब बळी पडले आणि मॉंटेग्यू-साहेबांसारख्या मुत्सद्यांनीं डायरसाहेबांचा हा खूनच एक तऱ्हेनें केला, अशा धर्तीची भाषा वापरण्यास ओडवायरसाहेब आज तयार झाले आहेत. ओडवायरसाहेबांच्या ह्या अभिप्रायास पुष्टी देण्याकरितां डॉक्टरचीहि मतें प्रसिद्ध झालीं आहेत. जनरल डायर यांना औषधपाणी करणाऱ्या डॉक्टरांचें असें म्हणणें आहे कीं, आपणांवर ठपका ठेवला गेला ह्या गोष्टीमुळें जनरल डायर यांच्या मनाला जो धक्का बसला त्या धक्क्यांतून रोग उत्पन्न झाला; आणि धक्क्याचा जोर नेहमीं कायम राहिल्यामुळें रोगावर औषधपाणी कांहीं केल्या चाललें नाहीं ! जनरल डायर जालियनवाला बागेच्या कत्तलीचें समर्थन नेहमीं करीत असत आणि लाखों वेळां जरी आपणावर असा प्रसंग आला तरी अशीच कत्तल आपण लाखों वेळां करण्यास चुकणार नाहीं, असें ठांसून सांगून आपला कत्तलीचा पुण्यमार्ग इष्टमित्रांच्या मनावर ठसवीत असत, असेंहि जनरल डायर यांच्या मृत्यूच्या वेळीं जाहीर करण्यांत आलें आहे. राक्षसी दहशतीचा व कत्तलीचा उपाय हिंदुस्थानास जरुरीचा आहे आणि तसला उपाय अंमलांत आणल्याबद्दल कोणासहि पाप लागणारें

नसून उलट पुण्यच लागणारें अहे, असें जनरल डायर यांच्या नांवानें ओरडून, ओडवायरसाहेब व त्यांचे इष्टमित्र जनरल डायरच्या मृत्यूचें खापर लिबरल पक्षाच्या माथीं मारीत आहेत! राक्षसी कत्तलीचा मार्ग म्हणजे पुण्यमार्ग होय, हें मॉंटेग्यूसाहेबांच्या वेळीं पार्लमेंट सभेला पटलें नाहीं. पार्लमेंट सभेनें त्यावेळीं अमृतसरच्या कत्तलीला दोषच दिला व मॉंटेग्यू साहेब व चर्चिलसाहेब ह्या दोघांनीं डायरसाहेबांची निर्भत्सनाच केली; पण लॉर्डांच्या सभेनें ओडवायरसाहेबांच्या संप्रदायाला उचलून धरलें, आणि पार्लमेंट सभेंतहि कॉन्झर्व्हेटिव पक्षातर्फे सर विल्यम हिक्स, सांप्रतच्या मंत्रिमंडळाचे होम सेक्रेटरी, यांनीं हिंदुस्थानांतील सिव्हिल सर्व्हंट व युरोपियन ह्यांच्या समाजापैकीं शेकडा ऐंशी नव्वद लोक जनरल डायर यांना शाबास म्हणणारे अहेत, असें लिबरल पक्षाला बजावण्यास कमी केलें नाहीं. आज पार्लमेंट सभेंत लिबरल पक्ष मृतप्राय आहे; मजुरांच्या पक्षाचेंहि कांहीं चालत नाहीं; अशी संधी साधून डायरसाहेबांविषयीं पूर्ण सहानुभूति चोहोंकडे उत्पन्न करण्याचा प्रयत्न ओडवायरसाहेब करीत आहेत. बंडाची ती वेळ होती आणि बंडाच्या वेळीं अशीच कत्तल करून दहशत बसवावी लागते, हें ओडवायरसाहेब व डायरसाहेब यांच्या संप्रदायाचें ब्रीदवाक्य आहे. इंग्रजांविरुद्ध आज हिंदुस्थानांत कोण बंड करूं शकतो? प्रजेला निःशस्त्र करण्यांत येऊन शे-सवाशे वर्षें उलटून गेलीं आहेत, प्रजाजनांचे बंड होणें शक्यच नाहीं. कांहीं हिंदी लष्करी पलटणी फिरल्या तरी बंड करण्यास कोणीहि शहाणा तयार व्हावयाचा नाहीं. तलवारींची किंवा भाल्यांची लढाई उरलेली नाहीं. बंदुकानांहि बंड करितां यावयाचें नाहीं. तोफखाना व विमानें आजकाल बंड करूं शकतील. इतराचें बंड होणार आहे असें म्हणणें म्हणजें बंडाची नुसतीं थट्टा करणें होय. बंडच होण्याचा जेथें संभव नाहीं तेथें बंड हाणून पाडण्याकरितां दहशत बसण्यासाठीं

कत्तल केली, असें म्हणण्यांत अर्थ कोणता? लोक अरेरावी सत्तेच्या विरुद्ध गेले असतां माथेफिरू बनून आपल्या लहरीपणानें लोकांचा छळ करण्याची पाशवी वृत्ति जालियनवाला बागेच्या कत्तलींत पूर्ण भरलेली आहे. कॉन्झर्व्हेटिव पक्ष सांप्रत अधिकारारूढ आहे. तेव्हां जनरल डायर ह्यांच्या मृत्यूचा उपयोग स्वतःच्या तोंडास लागलेली काळोखी धुवून काढण्याकडे करून टाकूं या, असें आडेवायर संप्रदायानें आज कितीहि मनांत आणलें तरी ओडवायरसाहेबांना अमेरिका, फ्रान्स वगैरे सर्व जगांतील विचारी पुरुषांच्या डोळ्यांत धूळ कशी टाकतां येईल?

---

* अफगाणिस्थानचे अमीर

हिंदुस्थानचे लाटसाहेब लॉर्ड अर्विन ता. ११ डिसेंबर रोजीं सकाळीं मुंबईस येणार असून, एक आठवडा त्यांचा मुक्काम मुंबईत होणार आहे. ता. १४ डिसेंबर रोजीं सकाळीं अफगाणिस्थानचे अमीरसाहेब युरोपच्या प्रवासास जाण्याकरितां मुंबईस यावयाचे आहेत व तीन दिवस अमीर साहेबांचा मुक्काम मुंबईस होणार आहे. अमीरसाहेबांचें स्वागत चांगल्या रीतीनें व्हावें आणि खाजगी संभाषणांचा योग बरेच वेळां येऊन कित्येक राजकीय बाबींचा खल नीट करितां यावा, म्हणून लाटसाहेबांनीं आपला मुक्काम मुंबईस चार दिवस अधिक ठेविला आहे. अमीरसाहेब रावळपिंडी–दिल्लीच्या मार्गानें मुंबईस येणार नसून केट्टा–कराचीच्या मार्गानें मुंबईस येणार आहेत. पंजाब–दिल्लीच्या मार्गानें मुंबईस आले असते तर हिंदुस्थानचा बराच महत्त्वाचा भाग त्यांच्या दृष्टिपथांतून गेला असता; पण प्रवासाच्या घाईमुळें म्हणा किंवा इतर कारणांमुळें म्हणा, हिंदुस्थानांत फार दिवस काढणें अमीरसाहेबांना आवडत नाहीं असें दिसतें. युरोपखंडांतील प्रवास संपवून अमीरसाहेब पुन्हां हिंदुस्थानांत येऊन अफगाणिस्थानांत जाणार नसून, रशियाची राजधानी मॉस्को येथून निघून रशियाच्या आगगाडीनें बुखारा–समरकंद मार्गानें काबुलास परत जाणार आहेत. ज्या मार्गानें ते अफगाणिस्थानांत परत जाणार आहेत त्याच मार्गानें युरोपखंडाकडे जावयास निघाले असते तरी प्रवासाच्या दृष्टीनें त्यांना तें अधिक सोयीचें झालें असतें. पण प्रवासाच्या वेळीं हिंदुस्थानालाहि थोडासा मान द्यावा आणि समुद्रावरील पर्यटनाची व आरमारी शक्तीची प्रत्यक्ष माहिती मिळावी, म्हणून मुंबईस

---

* नवाकाळ, ता. २५ नोव्हेंबर १९२७

येऊन युरोपमध्यें जाण्याचा द्राविडी प्राणायाम अमीरसाहेब करीत आहेत. मुंबईहून निघाल्यावर प्रथम ईजिप्तला भेट देऊन नंतर इटलीमध्यें जाण्याचा अमीरसाहेबांचा विचार आहे. टर्कीला भेट देऊन फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी व रशिया येथील प्रवास आटोपून अमीरसाहेब अफगाणिस्थानाकडे परतणार आहेत. अफगाणिस्थानचे अमीरसाहेब आतां पूर्णपणें स्वतंत्र आहेत, आणि पारिस व बर्लिन येथें विद्यार्थ्यांना पाठवून नवीन तऱ्हेचें स्वरूप अफगाणिस्थानला देण्याचा उपक्रम अफगाणिस्थानांत सुरू झाला आहे. सेनानायक, मुत्सद्दी व तरुण दरबारी वारंवार युरोपखंडांत पाठवून राज्यकारभाराला नवें वळण देण्याचें काम अफगाणिस्थानांत झपाट्यानें सुरू झालें असल्यानें कांहीं गोष्टी स्वतः डोळ्यांनीं पहाव्या व कांहीं गोष्टींचा खल युरोपखंडांतील मुत्सद्द्यांशीं स्वतः करावा, असें नव्या जोमाच्या ह्या अमीरसाहेबांना वाटणें अगदी सहजिक आहे. जर्मन, फ्रेंच, इटालियन व इंग्लिश अशा चारहि देशांचे कर्तबगार पुरुष अफगाणिस्थानांत निरनिराळ्या नोकरीवर असून रशियन लोकांचा तर इंग्रजांच्या हटीनें एक तऱ्हेचा सुळसुळाटच अफगाणिस्थानांत झालेला आहे. रशियांतले बोल्शेव्हिक आणि हिंदुस्थानांतील इंग्रजी सत्ता ह्यांच्या कैचींत अफगाणिस्थान सांपडलें असून सांप्रतच्या अमीरसाहेबांचें मत कोणत्या बाजूला झुकतें, ही गोष्ट इंग्लंडच्या परराष्ट्रीय उलाढालींत आज महत्त्वाची होऊन बसली आहे. इंग्लंडला तरी रशियाशीं लढावें लागेल किंवा रशियाला तरी इंग्लंडबरोबर कुरापत काढावी लागेल, एरव्ही पुढील पांच दहा वर्षें जाणार नाहींत, अशी इंग्लंड व रशिया ह्या दोन राष्ट्रांमधील संबंधांची नाजुक स्थिति झाली आहे. रशियाच्या झार साहेबांच्या वेळींहि रशिया व इंग्लंड ह्या दोन राष्ट्रांना अफगाणिस्थानच्या बाजूला लढल्याबांचून गत्यंतर नाहीं, अशी स्थिति होती. जर्मनीच्या महत्त्वाकांक्षेमुळें इंग्लंड व रशिया यांची दोस्ती महायुद्धाच्या

पूर्वी झाली, पण आतां बोल्शेव्हिकांच्या कारकीर्दीत रशिया व इंग्लंड यांचें पूर्वीचें वैर पुन्हां सुरू झालें असून अफगाणिस्थानच्या कारस्थानाला विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. अफगाणिस्थानाला आतां स्वातंत्र्य मिळालें आहे; अमीरसाहेबांनीं अफगाणिस्थानला पूर्वीच्या झोपेंतून जागा करून ताजातवाना करण्याचा विडा उचलला आहे; अफगाणिस्थान हळूहळू युरोपियन राष्ट्रांच्या दृष्टीनेंहि लष्करी शक्ति बनत चाललें आहे, आणि पांचदहा वर्षांच्या अवधींत अफगाणिस्थानच्या लष्करी शक्तीला स्वतःचें घर अपुरें होऊन घराबाहेर ती शक्ति वाहूं लागण्याचा संभव आहे. इराण व अफगाणिस्थान ह्यांच्या सरहद्दीला धरून आपली आगगाडी आरबी समुद्राला बंदर आब्बास येथें आणून पोहोंचविण्याचा रशियाचा इरादा जसा फार पूर्वीपासून आहे, तसा अफगाणिस्थानचाहि इरादा बलुचिस्थानच्या मार्गानें समुद्र गाठण्याचा फार पूर्वीपासून आहे. आरबी-समुद्र आगगाडीनें गाठला म्हणजे रशियाची तहानभूक भागणारी आहे, आणि त्या आगगाडींत अफगाणिस्थानला वाटा मिळाला असतां अफगाणिस्थान-लाहि सध्यांपुरतें कृतकृत्य वाटणारें आहे. इराणच्या नव्या शहावर बोल्शे-विकांनीं कुरघोडी केली असून, इंग्रजांपेक्षां बोल्शेव्हिकांकडे इराणचा कल सध्यां अधिक आहे. व्यापारी आगगाडया व राजकीय बंदरें आणि विमानांचे मार्ग ह्यांचें महत्त्व जर युरोपखंडाच्या प्रवासांत अमीरसाहेबांच्या मनावर विशेष बिंबलें, तर पुढील चारपांच वर्षांत अफगाणिस्थानांत आगगाडया धावूं लागून रशियाच्या आगगाडयांचें जाळें व पंजाबांतील आगगाडयांचें जाळें ह्यांना एकमेकांशीं संलग्न करण्याचें काम अफगाणि-स्थानची आगगाडी केल्यावांचून रहाणार नाहीं. इतर जगापासून अलिप्त राहून स्वतःच्या घरटयांत स्वतःला कोंडून ठेवण्याचें धोरण सांप्रतच्या अमीरसाहेबांनीं सोडून दिलें आहे. जगाच्या प्रवाहांत उडी घेऊन आपलें

महत्त्व वाढविण्याचें नवें धोरण अफगाणिस्थानच्या दरबारनें स्वीकारलें आहे, ह्या विषयीं आतां बिलकूल शंका नाहीं. अमीरसाहेब स्वतः युरोप-खंडाच्या प्रवासास जात आहेत, हें नव्या धोरणाचेंच द्योतक होय. स्वतःच्या घरटयांतच स्वतःच कोंडून टेवून इतर जगास अफगाणिस्थाननें तोंड दाखविलें नाहीं तर तें बरें, अशी इंग्लंडची आजपर्यंतची राजनीति आहे; पण महायुद्धानें अफगाणिस्थानास जागें केलें असून सांप्रतच्या अमीरसाहेबांना तर स्वतःच्या देशाच्या ऊर्जितावस्थेची तळमळ रात्रंदिवस लागून राहिली आहे. अफगाणिस्थान निद्रावस्थेंत पुन्हां जाणें शक्य नाहीं, आणि रशियांतील बोल्शेव्हिकांचा अफगाणिस्थानच्या उत्तरेस, पश्चिमेस व खुद्द अफगाणिस्थानांत चाललेला सुळसुळाट अफगाणिस्थानला झोंप येऊं देणार नाहीं. इराण ज्याप्रमाणें मॉस्कोच्या बोल्शेव्हिकांच्या नादीं लागलें आहे. त्याप्रमाणें काबूलचे अमीरसाहेबहि बोल्शेव्हिकांचे तंत्रानें वागूं लागतात कीं काय, अशी भीति इंग्लंडला वाटणें साहजिक आहे. इंग्लंडच्या मैत्रींत अफगाणिस्थानचें अधिक हित आहे असें अमीरसाहेबांच्या मनाला पटावें म्हणून, हिंदुस्थानांत असतांना काय किंवा इंग्लंडांत असतांना काय अमीरसाहेबांचें स्वागत मोठ्या थाटानें केल्यावांचून इंग्रजी मुत्सद्दी कसें राहातील ?

* अफगाणिस्थान व जर्मन विमानें

अमीर अमानुल्लाखान यांच्या इंग्लंडच्या दौऱ्यांतील बादशाही पाहुणचाराचे तीन दिवस गेल्या शुक्रवारीं संपले असून, एप्रिलआरंभापर्यंत खाजगी नात्यानें इंग्लंडच्या कारखान्यांचीं निरनिराळीं केंद्रस्थानें अमीरसाहेब पहाणार आहेत. एप्रिलच्या प्रारंभीं इंग्लंडच्या बलाढ्या आरमाराचा प्रमुख तांडा अमीरसाहेबांना दाखविण्यांत आल्यावर रशियांतील दौऱ्याकरतां अमीरसाहेब मास्कोकडे जाणार आहेत. इंग्लंडांतील स्वागत बादशाही थाटाचें झालें; पण कोणत्याहि मेजवानीचेवेळीं महत्त्वाचें भाषण कोणीच केलें नाहीं. इंग्लंडचा व अफगाणिस्थानचा सांप्रतचा स्नेहसंबंध असाच पुढें टिकून स्नेहबुद्धीनें दोनहि राष्ट्रें एकमेकांस मदत करोत, अशा तऱ्हेच्या आशीर्वादापलीकडे महत्त्वाचे उद्गार मेजवान्यांचेवेळीं निघाले नाहींत. परराष्ट्रीय मंत्री सर ऑस्टिन चेंबरलेन यांच्या मेजवानींचेवेळीं अफगाणिस्थान व हिंदुस्थान ह्यांच्यामधील संबंधाविषयीं कांहीं तरी बोलण्यांत येईल असें वाटत होतें; पण ह्या मेजवानीचेवेळीं भाषणेंच टाळण्यांत आलीं ! ईजिप्त, अरबस्तान, इराण वगैरे मुसलमानी राष्ट्रांसंबंधानें कुरकुर सुरूं असतांना अफगाणिस्थानासंबंधानें विशेष कांहीं न बोलणेंच बरें, असें इंग्रजी मुत्सद्यांना वाटलें असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. रशिया व अफगाणिस्थान ह्यांचे संबंध; हिंदुस्थान व सरहद्दीवरील स्वतंत्र पठाण ह्यांचे संबंध; आणि इटली, फ्रान्स व जर्मनी येथें अफगाणिस्थान अमीरांविषयीं दाखविण्यांत आलेली स्नेहबुद्धि; ह्या सर्व गोष्टी इंग्लंडच्या परराष्ट्रीय कारस्थानांत इतक्या नाजुक स्वरूपाच्या आहेत कीं, त्या संबंधानें बोलतांना इंग्लंडच्या परराष्ट्रीय मंत्र्यांना गोंधळल्यावांचून गत्यंतर नाहीं. अमीरसाहेबांपुढें गोंधळ घालण्यापेक्षां

नवाकाळ, ता. १८ मार्च १९२८

भाषण करण्याचें टाळणेंच सर ऑस्टिन चेंम्बरलेन यांना योग्य वाटणें साहजिक आहे. मेजवानीच्याप्रसंगीं एकमेकांच्या शुभचिंतनासाठीं दारू पिण्याचा प्रसंग आला असतांना कुराणाच्या आज्ञेला अनुसरून दारू पिण्याचें टाळून पाण्याचा पेला ओठाला लावण्याचा प्रघात अमीर अमानुल्लाखान यांनीं इटली, फ्रान्स, जर्मनीप्रमाणें इंग्लंडांतहि कायम ठेवला, हें अमीरसाहेबांना भूषणावह आहे. इटली व फ्रान्स येथील स्वागत थाटाचें व कौतुकाचें झालें आहे; जर्भनीच्या स्वागतांत थाटमाट कमी होता; पण अंत:करणाचा उमाळा अधिक होता; बादशाही वैभवाला साजेसें इंग्लंडचें स्वागत झालें, पंण मौनव्रतामुळें अंत:करणाचा मिलाफ दिसून आला नाहीं. जर्मनींत प्रेसिडेंट हिंडेन्बुर्ग यांनीं दिलेल्या मेजवानीचेवेळीं जर्मन मुत्सद्दी अफगाणिस्थानाकडे साफ अंत:करणाच्या स्वच्छ नजरेनें पहात आहेत असें सर्वांच्या अनुभवास आलें. जर्मनीनें एक विमान अफगाणिस्थानास नजर केलें असून अफगाणिस्थानांतील वि ानांच्या वाढीस व विमानांच्या व्यवहारास जर्मनीकडून चांगली मदत होईल, अशा प्रकारची सदिच्छा जर्मनीच्या सर्व वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली आहे. यांत्रिक बाबतींत जर्मनीनें मिळविलेलें ज्ञान व जर्मनीचा अनुभव अफगाणिस्थानच्या पदरांत टाकण्यास जर्मन राष्ट्र तयार आहे, अशा तऱ्हेचें आश्वासन प्रे. हिंडेन्बुर्ग यांनीं अमीर अमानुल्लाखान यांना सरकारी मेजवानीचे वेळीं दिलें. विमानांच्या यांत्रिक ज्ञानांत जर्मन राष्ट्र आज सर्वांच्या पुढें आहे. रशियांतील व्यापारी विमानांचा व्यवहार जर्मन कंपनीकडेच असून सदर कंपनीचीं विमानें इराणांत तेहरानपर्यंत आणि तास्कंदच्या मार्गानें अफगाणिस्थानांत काबूलपर्यंत सांप्रत येरझारा घालीत असतात, हें प्रसिद्धच आहे. विमानांच्या मार्गानें बर्लिन व काबूल ह्यांचा संबंध रशियामार्फत आज आलेला आहे. जर्मनीनें अमीर अमानुल्लाखान यांना बर्लिन येथें आपल्या विमानांची करामत मुख्यत: दाखविली, आणि यांत्रिक विद्येस मोकळ्या अंत:करणानें

अफगाणिस्थानास मदत करण्याचें वचन दिलें. यांत्रिक ज्ञानाचें व यांत्रिक शक्तीचें जर्मनीचें वचन फोल नाहीं, हे अमीरसाहेबांना पटावें म्हणून जर्मनीचे व्हाईस चॅन्सलर राष्ट्रीय पक्षाचे प्रमुख हर हर्गट यांनीं अफगाणिस्थानविषयीं जर्मनीचें अंतःकरण कां कळवळतें ह्याचा खुलासा अमीरसाहेबांशीं केला. स्वतःच्या बचावासाठीं व स्वातंत्र्यासाठीं एकसारखी धडपड अफगाणिस्थाननें केली आहे व त्यांपुढेंहि अफगाणिस्थानला करावी लागणार आहे; जर्मनीला देखील असल्या घडपडीसाठीं श्रम करावे लागत आहेत. जर्मनी व अफगाणिस्थान ह्या दोनहि राष्ट्रांवरील पूर्वीचें व पुढचें संकट एकाच स्वरूपाचें असल्यामुळें जर्मन लोकांचें अंतःकरण अफगाणकडे आपोआप वळतें असें हर हर्गट यांचें म्हणणें आहे. अफगाणिस्थानच्या संकटाविषयीं इंग्लंडला हर हर्गट यांनीं टोला मारला, आणि अशा प्रकारचा टोला मारणें मुत्सद्दीपणास शोभेसें नाहीं, असें सोशालिस्ट पक्षाच्या व्हालवर्ड पक्षाचें मत आहे. पूर्वी बोअर वारंच्या प्रसंगीं प्रे. क्रूगर यांना सहानुभूतीची तार पाठवून कैसरसाहेबांनीं जी चूक केली, तीच चूक अफगाणिस्थानच्या अमीरसाहेबांशीं बोलतांना हर हर्गट यांनीं केली आहे, असा जर्मनींतील सोशालिस्ट पत्रांचा अभिप्राय आहे. दक्षिण आफ्रिकेचे प्रे. क्रूगर यांना पूर्वीच्या कैसरसाहेबांनीं चिथवून सोडलें, पण लढाईंच्या वेळीं बोअर लोकांना जर्मनीकडून कांहींच मदत झाली नाहीं. इंग्लंडचें संकट आज अफगाणिस्थानला आहे असें पर्यायानें अमीरसाहेबांना सुचवून आणि इंग्लंडनेंच जर्मनीचें आरमार नाहींसें करून जर्मनीला दारिद्र्याच्या खड्ड्यांत पाडलें आहे अशा तऱ्हेचे उद्गार काढून, अफगाणिस्थानाविषयीं जर्मनीची कळकळ खऱ्या अंतःकरणाची आहे, असें हर हर्गट यांनीं अमीर अमानुल्लाखान यांना पटविलें आहे हें खरें; पण तसाच प्रसंग आल्यास जर्मनी कोणती मदत अफगाणिस्थानास करूं शकणार असा प्रश्न जर्मनींतील सोशॅलिस्टांनीं सर्वांपुढें ठेविला असून भलतेंच कांहीं

तरी बरळण्याबद्दल हर हर्गट यांना दोष दिला आहे. हर हर्गट हे व्हाईस चॅन्सेलर आहेत. बर्लिनचे मुख्य चॅन्सेलर आजारी होते व परराष्ट्रीय मंत्री परदेशी गेले होते, ह्यामुळें मुख्य मंत्री व परराष्ट्र मंत्री ह्यांच्याकरितां हर्गट यांना व्हाईसं चॅन्सेलर ह्या नात्यानें मुत्सद्दीपणाच्या दोन गोष्टी अमीर अमानुल्ला यांजपाशीं बोलाव्या लागल्या व त्या दोन गोष्टी त्यांनीं वरील प्रकारें बोलून दाखविल्या, हें चांगलें झालें नाहीं, अशी जर्मनींतील सोशॅलिस्ट पक्षाची टीका आहे. समुद्रावर कांहींच शक्ति नसल्यामुळें बोअर युद्धाच्या वेळीं त्यावेळच्या कैसरचे बोल फोल ठरले; पण अफगाणिस्थान व जर्मनी ह्यांच्यामध्यें विमानांचा नवा संबंध आजकाल उत्पन्न झाला असून तो संबंध तोडणें रशियाशिवाय दुसऱ्या कोणाचेहि हातीं नसल्यामुळें इंग्लंडची तितकीशी पर्वा हर हर्गट यांना वाटत नसल्यास त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. पण इंग्लंडला चिमटा घेणारे उद्दार अमीर अमानुल्लाखान यांजपाशीं बोलून दाखविणें व तशा उद्गारांना वर्तमानपत्रांतून प्रसिद्धि देणें हें मुत्सद्दीपणाचें लक्षण नव्हे, ह्यांत संशय नाहीं. जर्मनीनें अंतःकरणपूर्वक मदत केल्यास विमानांच्या बाबींत आणि लष्करी यांत्रिक विद्येंत अफगाणिस्थानचें स्वरूप हां हां म्हणतां बदलून जाईल हें खरें आहे, पण इंग्लंडचें संकट तुम्हाला आहे म्हणून आम्ही अंतःकरणपूर्वक मदत करितों असें बोलून आपलें हृदय उघडें केलें असल्याचें प्रसिद्ध करणें, ह्याला शहाणपणा कोण म्हणेल? हर हर्गट ह्यांनीं आपलें बोलणें प्रसिद्ध करण्यांत चूक केली असली, तरी प्रे. हिंडेन्बूर्ग यांनीं जर्मन राष्ट्रांतर्फें एक विमान अमीरसाहेबांना देऊन यांत्रिक अनुभवाचें व ज्ञानाचें जें उदक अफगाणिस्थानच्या हातावर सोडलें, त्या उदकाबद्दल अफगाणिस्थानचे लोक जर्मनीविषयीं सदोदीत कृतज्ञता बुद्धि दाखविल्यावांचून कसे रहातील?

---

* सरकार उलथलें जाईल काय ?

बारडोलीच्या वाढलेल्या शेतसाऱ्याची पुनः चौकशी करावी अशी अगदीं अल्प मागणी बारडोलीच्या शेतकऱ्यांची आहे, पण ही मागणी मान्य केली असतां मुंबईसरकार उलथून पडेल, अशी भीति मुंबईच्या 'टाईम्स' ला वाटत आहे आणि त्यामुळें अखेरपर्यंत आपल्या स्वतःच्या शेतकऱ्यांशीं सरकारनें टक्कर द्यावी, असें मुंबईच्या 'टाईम्स' चें म्हणणें आहे. चौकशीकरितां बिनसरकारी तज्ज्ञांची किंवा सरकारी लोकांची कमिटी नेमली असतां सरकार कसें उलथलें जाईल, हेंच आम्हांस समजत नाहीं. मुंबईच्या सरकारास उलथून पाडावें असा निर्णय या कामीं कोणती कमिटी देणार आहे? कमिटीनें तसा निर्णय दिला तर सदर निर्णय अंमलांत कोण आणणार आहे? सरकार उलथून पाडण्याची भीति फुकाची आहे. सरकार घसरून पडत नाहीं, उलथें पालथें होत नाहीं; किंवा एखाद्या शिपायाच्या पगारांतील दिडकीहि कमी होणारी नाहीं. बारडोली तालुक्याच्या चौकशीकरितां नवी कमिटी न नेमतां सरकारनें आपण होऊन जरी वाढलेला सारा आज एकदम रद्द केला तरी देखील सरकारच्या उलटापालटीची भीति नाहीं. वाढलेल्या साऱ्याचे रुपये नाहींसे होण्यानें सरकारचें एखादें अंग अर्धांगवायूसारखें व्याकूळ होईल, अशांतलाहि प्रकार नाहीं. बॅंकवेच्या जुगारांत क्रोडो रुपये गमविण्यास समर्थ असलेलें सरकार बार्डोलीच्या वाढलेल्या साऱ्यावर थोडेंच अवलंबून आहे? पैशाच्या दृष्टीनें सरकार जरी उलथें पालथें झालें नाहीं तरी सरकारच्या शहाणपणाची एकदां नाचक्की झाली म्हणजे सरकार उलथून पडतें असें सरकारतर्फेचें

---

* 'नवाकाळ', ता. १४ जून १९२८

म्हणणें आहे. कमिटी नेमण्यानें सरकारच्या शहाणपणाची नाचक्की होते असें जर म्हटलें तर हिंदुस्थानांत व इंग्लंडांत निरनिराळ्या प्रश्नांची चौकशी करण्याकरितां काय कमी कमिट्या नेमल्या जात आहेत? कमिटी नेमून वाईट गोष्टी चव्हाठ्यावर आल्या असतां सरकारास त्या वाईट गोष्टी अधिक त्रासदायक होतात हें खरें; पण करट आंतल्याआंत जिरूं न देतां सडलेला भाग बाहेर पडणें हाच शहाणपणाचा खरा मार्ग होय. इंग्लंडांतले पोलिस लष्कराप्रमाणें अरेरावी वाण्याचे बनले आहेत आणि भल्या लोकांची व चांगल्या स्त्रियांची अब्रु मलिन करण्यास मागेपुढें पहात नाहींत, अशा प्रकारचा गवगवा झाल्यामुळें सांप्रतच्या कॉन्झर्व्हेटिव पक्षानें पोलिसाच्या वर्तनाची चौकशी करण्याकरितां विरुद्ध पक्षाच्या संमतीनें चौकशी कमिटी नेमली नाहीं काय? पोलिसनें अपराध कांहीं केला नाहीं असें पोलिसांचें म्हणणें पार्लमेंट सभेपुढें मांडत असतांना उघड उघड होणाऱ्या चौकशीस गृहमंत्री मि. जॉईन्सन हिक्स यांनीं नुकतीच मान्यता दिलेली आहे ना? सरकारी अधिकाऱ्यांच्या कृत्याची उघड उघड चौकशी व्हावी असा गवगवा झाला असतांना गवगव्याला अनुसरून चौकशीची कमिटी नेमणें हें शहाणपणाचेंच लक्षण होय म्हणून मि. हिक्स यांची पाठ कॉन्झर्व्हेटिव पक्षाच्या पत्रांनींहि थोपटली आहे. कमिटी नेमण्यास संमति दिल्यानें कॉन्झर्व्हेटिव पक्ष उलथून पडेल असा अभिप्राय कोणीहि प्रसिद्ध केलेला नाहीं. करट वाहूं दिलें हें कॉन्झर्व्हेटिव पक्षानें चांगलें केलें, असें इंग्लंडांत सर्वांचें मत पडलेलें आहे. असल्या प्रसंगीं स्वतंत्र कमिटीची चौकशीकरितां स्थापना केली असतां वाईट होतें असे उद्गार कोणीच काढलेले नाहींत. जो कॉन्झर्व्हेटिव पक्ष इंग्लंडांत सांप्रत अधिकारारूढ आहे त्या कॉन्झर्व्हेटिव पक्षांतीलच मुंबईचे सांप्रतचे गव्हर्नर आहेत. मग त्यांनीं चौकशी कमिटी नेमण्यांत कमीपणा कां मानावा? विलायतेंत जें

शहाणपणाचें ठरतें तें हिंदुस्थानांत शहाणपणाचें कां टरूं नये ? सरकारच्या हाताखालील अधिकाऱ्यांची इज्जत ही बाब विलायतेस फार महत्त्वाची समजली जात नाहीं; हिंदुस्थानांत मात्र बार्डोलीच्या कुरणांत सोडलेल्या पठाणांपासून कमिशनरसाहेबांपर्यंत सर्वांच्या इज्जतीला डोक्यावर घेऊन नाचण्याचा प्रघात सरकारनें पाडला आहे. या असल्या इज्जतीसाठीं चौकशीची कमिटी नेमण्यास सरकार तयार नाहीं, असें लोकांचें म्हणणें आहे. मुंबईचा 'टाईम्स' म्हणतो, तसें नाहीं. अधिकाऱ्यांच्या इज्जतीचा हा प्रश्न नसून सरकार उलथून पडेल कीं काय, अशी भीति असल्यामुळें सरकारला अखेरपर्यंत आपल्याच प्रजाजनांशीं झुंजणें भाग आहे, असा मुंबईच्या 'टाईम्स'चा लोकांना टोमणा आहे. चौकशी कमिटी नेमली असतां सरकारनें आपलें स्वतःचें काम दुसऱ्यास सांगितल्यासारखें होतें; आणि जें सरकार आपलें काम स्वतः करीत नाहीं, तें सरकार सरकार या नांवालाहि योग्य नाहीं असें गव्हर्नर साहेबांचें मत आहे. चौकशी-कमिटी नेमली असतां सरकार स्वतः आपलें कामकाज करीत नाहीं असें कसें ठरतें ? चौकशीची कमिटी नेमली जावयाची ती सरकारकडूनच नेमली जावी अशीच लोकांची मागणी आहे. चौकशीच्या वेळीं सरकारनें कामकाज करावयाचें म्हणजे काय करावयाचें ? गव्हर्नर साहेब व त्यांचे एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलर्स इतके मिळून मुंबईचें सरकार बनतें. या सरकारनें चौकशीची कमिटी नेमावी अशी जी लोकांची मागणी आहे, त्या मागणीला अनुसरून जर चौकशीची कमिटी नेमली गेली तर त्यांत सरकारच्या फंक्शनला उर्फ कर्तृत्वाला कोठें प्रेतकळा येते ? बारडोलींत दे. वल्लभभाई पटेल यांनीं स्वतःची एखादी कमिटी नेमली आणि त्या कमिटीचा निर्णय निमुटपणें अंमलांत आणण्याची पाळी जर सरकारवर आली, तर मुंबईसरकारच्या फंक्शन करण्याच्या ताकतीवर मृत्यूची छाया पडल्याबांचून

राहणार नाहीं हे खरें आहे. कमिटी सरकारनेंच नेमली पाहिजे, असें लोकांचें मागणें आहे; कमिटीला लोकांनीं नेमून त्या कमिटीचे हुकूम सरकारनें पाळले पाहिजेत असें मागणें नाहीं; मागणी मागण्याचा हक्क लोकांचा आहे; ती मागणी ऐकण्याचे फंक्शन किंवा कर्तव्य सरकारचें आहे. मागणी ऐकल्यानें सरकार स्वतःचें काम सोडून देतें, अशांतला भाग मुळींच नाहीं. किंबहुना सरकारच्या वरिष्ठ दर्जाच्या ज्या कामगिऱ्या समजल्या जातात त्या जबाबदारीच्या कामगिऱ्यांमुळें लोक क्षुब्ध झाले असतांना लोकांची मागणी न्यायाची आहे किंवा कसें हे ठरविण्याकरितां योग्यवेळीं कमिटी नेमून लोकांचा क्षोभ शांत करणें ही कामगिरी राज्यकर्त्यांच्या फंक्शनच्या किंवा कर्तव्यांच्या शिरोभागीं ठेवण्यांत येत असते. बारडोली तालुक्यांतील चळवळीमुळें सरकारचे अधिकार स्वतःच्या हातीं घेण्यास शेतकरी प्रवृत्त झाले आहेत, आणि सरकारचे अधिकार इतरांच्याहातीं गेले असतां राज्यक्रांति होऊन मुंबईसरकार नष्ट होणारें आहे, असें म्हणणें म्हणजे गरीब शेतकऱ्यांना नाहक चुरडण्यासाठीं एक थोतांड पुढें करणें होय! बारडोलीच्या शेतकऱ्यांची चळवळ यशस्वी झाली तर काय होणार आहे? वाढलेला शेतसारा रद्द होईल एवढेंच फळ शेतकऱ्यांच्या पदरीं पडणार आहे ना? जुलमाचा प्रतिकार करण्याचा एक मार्ग सांपडल्यासारखें सर्व हिंदुस्थानाला वाटेल हें खरें आहे, पण तसें वाटलें म्हणून शहाण्या सरकारला वाईट वाटण्याचें कारण काय? जुलूम होऊं न देण्याची खबरदारी घेतली म्हणजे सरकारच्या कामकाजाला कोठें अडथळा येणार आहे? जुलूम करणें हें जोंपर्यंत सरकारचें फंक्शन किंवा कर्तव्यकर्म नाहीं तोंपर्यंत सिव्हिल डिसओबिडियन्स किंवा सविनय कायदेभंग सरकारच्या सरकारीपणाला केव्हांहि अडथळा करूं शकणार नाहीं. अमुक गोष्ट जुलमाची आहे हें सरकारच्या प्रत्यक्ष अनुभवास आणून देण्याचें काम सविनय-

कायदेभंगाचें आहे. वाढलेल्या सान्यासाठीं आपल्या जमिनीच्या मालकीवर तिलांजुलि देण्यास जेथें शेतकऱ्यांचीं मनें तयार होतात तेथें जुलूम होत आहे असें सरकारनें मानणें जरुरीचें नाहीं काय ? शेतकऱ्यांना प्राणाहूनहि अधिक प्रिय स्वत:चीं शेतें असतात. प्राण वेंचण्यास जेथें शेतकरी सत्याग्रहासुळें तयार होतात तेथें सरकारच्या बाजुला न्याय कोठून असणार ? न्यायनीतीला अनुसरून प्रजाजनांची जोपासना करणें याहून निराळें फंक्शन किंवा कर्तव्य जगांतील कोणत्याहि सरकारास नाहीं. हें कर्तव्य सोडून पठाणांच्या इज्जतीस सरकार उराशीं कवटाळून धरूं लागलें असतांना सत्याग्रहाच्या चळवळींत पोळले जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या मदतीस धावून जाण्याशिवाय दुसरा मार्ग देशभक्तांना कोणता आहे ?

* चीनचें नवें स्वरूप

पेकिंग आणि टिन्स्टीन ही दोनहि बंदरें चिनी राष्ट्रीय पक्षाच्या हातीं पडलेलीं असल्यामुळें सर्व चीनभर राष्ट्रीय पक्षाचें निशाण आतां फडकूं लागलें आहे. राष्ट्रीय पक्षाची सत्ता अद्याप कायमच्या स्वरूपाची झाली नाहीं, हें खरे आहे; तथापि कांहीं महिन्यांच्या अवधींत हें काम तडीस जाईल ह्यांत संशय नाहीं. राष्ट्रीय पक्षाची सत्ता अबाधित झाल्यानंतर चीनला कोणतें स्वरूप येईल, ह्यासंबंधाची चर्चा सांप्रत चीनमध्यें सुरू आहे. पेकिंग व टिन्स्टीन ह्या दोनहि टापूंत थोडे दिवसांत पूर्णपणें शांतता नांदूं लागल्यावर राष्ट्रीय पक्षाकडून चीनच्या स्वराज्याचा खर्डा तयार करण्याकरितां एक परिषद बोलविण्यांत येईल, असें प्रसिद्ध झालें आहे. सन्यत्सेन यांनीं मँच्यूचे बादशाही घराणें काढून टाकून चीनचें रिपब्लिक ऊर्फ प्रजासत्ताक राज्य स्थापलें. त्यावेळीं चीनच्या नव्या राज्याचें स्वरूप आखलें गेलें असलें तरी आज त्या गोष्टीला बरींच वर्षें होऊन गेलीं आहेत. सन्यत्सेन यांचें रिपब्लिक टिकलें नाहीं. प्राण वाचविण्याकरितां त्यांना पेकिंग येथून पळून जावें लागलें; आणि त्यांच्यामागें सेनानायकांच्या घराण्यांच्या हातीं चीनची सत्ता जाऊन रिपब्लिकचें नांव तेवढें शिल्लक राहिलें. जपानांतून कँटन येथें परत येऊन सन्यत्सेन यांनीं कँटन प्रांताची सुभेदारी आपणाकडे घेतली, व लष्कर बाळगणाऱ्या सुभेदारांच्या हातून चिनी राष्ट्राची सुटका कशी करावयाची ह्या नव्या उद्योगास आरंभ केला. चीनमध्यें सत्ताधारी झालेला हल्लींचा राष्ट्रीय पक्ष सन्यत्सेन यांनीं कँटन येथें स्थापला व बोल्शेव्हिकांच्या सहाय्यानें राष्ट्रीय पक्षाचें नवें सैन्य उभारण्यास प्रारंभ

---

* नवाकाळ, ता. १७ जून १९२८

केला. राष्ट्रीय पक्षाची नवी घडी बसते न बसते तों सन्यत्सेन यांना मृत्युमुखीं पडावें लागलें. सन्यत्सेन यांच्या मृत्युमुळें लष्करी सुभेदारांचीच सत्ता चीनमध्यें कायम होते कीं काय आणि चीनचे तुकडे कायमचे पडतात कीं काय, अशी भीति वाटूं लागली असतांना चँग-कै-शेक वगैरे सन्यत्सेनच्या चेल्यांनीं सन्यत्सेन यांचा संप्रदाय जोरानें पुढें चालविला; आणि यांगत्सी नदीवर चाल करून हँको, नानकिंग व शांघाय हीं शहरें घेऊन राष्ट्रीय पक्षाचा नांवलौकिक प्रस्थापित केला. तेव्हांपासून चीनकडे सर्व जगाचें लक्ष लागलें. यांगत्सी नदी घेतल्यानंतर पेकिंग, टिन्स्टीन वगैरे शहरें घेऊन राष्ट्रीय पक्षाचें निशाण सर्व चीनभर फडकावण्यास राष्ट्रीय पक्षास दोन वर्षें लागलीं. लष्करी सुभेदारांच्या आपापसांतील लढायांचा काळ चीनमध्यें आतां संपला आहे. ह्यापुढें चीनचें स्वरूप पालटावयाचें आहे. गेल्या तीन चार वर्षांतील लढायांच्या अनुभवाला अनुसरून चीनची नवी राज्यघटना तयार करण्यांत येईल, ह्यांत संशय नाहीं. राष्ट्रीय पक्षाच्या पुढाऱ्यांनाच एके ठिकाणीं बोलावण्यांत येऊन राष्ट्रीय पक्षाच्या मतांचा छाप ज्या असेंब्लीवर पक्का उमटलेला दृष्टीस पडेल अशाच असेंब्लीच्या हातीं राज्यसूत्रें जातील, हें उघड आहे. निवडणुकीची अशी पद्धत अंमलांत येईल कीं, राष्ट्रीय पक्षाच्या सांप्रतच्या पुढाऱ्यांना असेंब्लीचे पुरस्कर्ते म्हणून राज्यकारभार हांकण्यास फारशी अडचण येणार नाहीं. मतदारांच्या मतांनीं आजचा राष्ट्रीय पक्ष निवडून आलेला नाहीं; तथापि ह्याच राष्ट्रीय पक्षास हरकत रहाणार नाहीं, अशीच निवडणुकीची व मतदानाची पद्धत सुरू होईल ह्यांत शंका नाहीं. वर्ष सहा महिन्यांत कॉंस्टिटयुअंट असेंब्लीच्यामार्फत चीनचें पार्लमेंट बोलावण्यांत आलें तरी चीनच्या राष्ट्रीय पक्षाची सांप्रतचीच विचारसरणी सत्ताधारी राहील हें उघड आहे. गेल्या दोन चार वर्षांच्या लढायांत

लष्कर बाळगणाऱ्या लहान मोठ्या ज्या सुभेदारांनीं आपलें वजन राष्ट्रीय पक्षाच्या पारड्यांत टाकलें त्या सुभेदारांची कीर्ति व थोरवी कायम ठेवणें राष्ट्रीय पक्षास भाग आहे. अशा दृष्टीनें विचार केला असतां चीनचें नवें स्वरूप अमेरिकेच्या लोकशाहीसारखें होईल, असें म्हणवत नाहीं. राष्ट्रीय पक्षांतील बड्या घराण्यांचें दडपण अंशतः तरी चीनच्या नव्या लोकशाहीवर पडल्यावांचून रहाणार नाहीं. हिंदुस्थानाहूनहि चीनचें राष्ट्र लोकसंख्येच्या व क्षेत्रफळाच्या मानानें अधिक मोठें असल्यामुळें भाषा, धार्मिक संप्रदाय, हवापाणी, इत्यादि कारणांनीं चीनची बाटणी दहा पांच प्रांतांत करणें भाग आहे. ह्या प्रांतांना प्रांतिक स्वराज्य देऊन नानकिंग येथील सरकारला मध्यवर्ती सरकार बनविण्याचा राष्ट्रीय पक्षाचा संकल्प आहे. प्रांतिक कौन्सिलें व मध्यवर्ती पार्लमेंट ह्यांच्या हातीं सर्व सत्ता जावयाची आहे; ही नवी रचना करितांना अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांचें उदाहरण चीनचे मुत्सद्दी आपल्या डोळ्यापुढें ठेवतील, असा अंदाज आहे. अमेरिकेंत शिकून आलेल्या चिनी विद्वानांचा विशेष भरणा आज चीनच्या राष्ट्रीय पक्षांत आहे. शिवाय अमेरिकन मिशनऱ्यांनीं चीनच्या शिक्षणास चांगली मदत केली आहे. चीनच्या राष्ट्रीय पक्षासंबंधानें अमेरिकेनें गेल्या दोन तीन वर्षांत जी सहानुभूति दाखविली ती सहानुभूति राष्ट्रीय पक्षाच्या मार्गांतील अडथळें दूर करण्यास चीनला फार उपयोगी पडली आहे. यांगत्सी नदीच्या जवळ ज्यावेळीं राष्ट्रीय पक्ष गेला त्यावेळीं इंग्लंडनें उग्र स्वरूप दाखविलें; पण अमेरिकेमुळें तें उग्र स्वरूप आपोआप मऊ झालें! पेकिंगवरील चढाईच्यावेळीं जपानला इतर राष्ट्रांहून अधिक हक्क मागण्याची परवानगी मिळणार नाहीं असें अमेरिकेनें दटावल्यामुळें जपानला उग्र स्वरूपावर पांघरूण घालावें लागलें. नवीन स्वरूपांतील चीनच्या सरकारला पाहिजे तितकें कर्ज देण्यास अमेरिका आज समर्थ आहे; इतकेंच

नव्हे तर एक प्रकारें उत्सुक आहे. जपानपासून किंवा इंग्लंडपासून जर चीननें कर्ज घेतलें तर चीनचें राष्ट्रीयत्व जपानच्या किंवा इंग्लंडच्या हातीं कबजेगहाण पडण्याचा संभव आहे. तशी भीति अमेरिकेच्या कर्जाची नाहीं. कबजेगहाण घेऊन राजसत्ता स्थापण्याची हांव अमेरिकेला नाहीं. आपला व्यापार नीट चालला म्हणजे पुरे आहे, अशी अमेरिकेची आज स्थिति आहे. मध्यवर्ती सरकार स्थापल्यानंतर ठिकठिकाणच्या सुभेदारांचें व राष्ट्रीय पक्षाचें आजचें लढें सैन्य कमी करून कालवे, रस्ते, आगगाड्या, खाणी वगैरे राष्ट्रीय उद्योग मोठ्या प्रमाणावर चालविण्याच्या कामीं सदर मनुष्यबलाचा उपयोग करावयाचा, असें राष्ट्रीय पक्षानें ठरविलें आहे. मोठमोठ्या नद्यांमध्यें चालणाऱ्या गनबोटस, लहानसें आरमार, व भरपूर विमानें ह्यांचा नवीन तऱ्हेचा पुरवठा मध्यवर्ती सरकारजवळ असल्याशिवाय मध्यवर्ती सरकारची सत्ता परराष्ट्रीय व्यापाऱ्यांचें जरूर तेवढें संरक्षण करण्याइतकी समर्थ होणार नाहीं. परक्यांचे सैन्य व परक्यांची सत्ता आपल्या भूमीवर नको, आणि परकी लोकांसाठीं परक्यांचे कायदे व परक्यांचे मॅजिस्ट्रेटहि चीनमध्यें नकोत असा राष्ट्रीय पक्षाचा मुख्य बाणा आहे. आज टर्कीं ज्याप्रमाणें परकी व्यापाऱ्यांना वागवीत आहे, त्याचप्रमाणें परकी लोकांना चीनमध्यें वागविण्याचा राष्ट्रीय पक्षाचा संकल्प आहे. ह्या संकल्पाला अनुसरून परराष्ट्रांशीं नवे तह करण्याचें बोलणें राष्ट्रीय पक्षाकडून लवकर सुरूं होईल; पण चीनमध्यें नव्या स्वरूपाची राज्यघटना अंमलांत येऊन निवडणुकीनंतर सदर घटनेला अनुसरून नवे मध्यवर्ती सरकार अधिकारारूढ होईतों अमेरिका, जपान, इंग्लंड वगैरे राष्ट्रें आपलें सैन्य काढून घेण्यास व आपले व्यापारी चीनच्या कायद्याच्या हवाली करण्यास राजी होतील, असें चिन्ह दिसत नाहीं. राज्यसत्तेला नवें स्वरूप देतांना आणि नव्या

सरकारास समर्थ बनवितांना अमेरिकेच्या कलाकडे लक्ष देणें आज चीनच्या राष्ट्रीय पक्षास भाग आहे. अमेरिकेच्या सहाय्यानें जर नवें स्वरूप देण्यांत आलें व नवें बल उत्पन्न करण्यांत आलें तर अमेरिका आपण होऊन आपलें आरमार व सैन्य चीनच्या भूमींतून काढून घेतल्यावांचून रहाणार नाहीं; आणि मग अमेरिकेचेंच उदाहरण जपान व इंग्लंड यांना गिरवावें लागेल, हें उघड आहे. अशा स्थितींत चीनच्या नव्या स्वरूपावर अमेरिकेची छाप पडल्यावांचून कशी राहील?

---

* शेतकऱ्यांचें बंड

बारडोली तालुक्यांतील स्थिति स्वतः डोळ्यांनीं पाहून त्यासंबंधानें आपला अभिप्राय प्रसिद्ध करण्याकरितां मुंबईच्या 'टाईम्स'नें पाठविलेल्या खास बातमीदारानें गेल्या मंगळवारच्या अंकांत एक लेख लिहिला आहे. बारडोली तालुक्यांत सरकारी यंत्र बंद पडलें असून शेतकऱ्यांनीं बंड उभारलें आहे, अशा अर्थाचे मथळे या लेखावर घालण्यांत आले आहेत. सरकारी नोकरांचें बारडोली तालुक्यांत कोठेंच कांहीं चालत नसून दे. वल्लभभाई पटेल यांच्या २५० स्वयंसेवकांचें राज्य बारडोलींत सुरू आहे, असें सदर बातमीदारानें जाहीर केलें आहे. सरकारचे ३५० सशस्त्र पोलिस बारडोली तालुक्यांत आहेत हें खरें, पण त्यांची अशी स्थिति आहे कीं, त्यांना शिधा-सामग्री विकत घ्यावयाची असल्यास बाजारभावाहून दंडादाखल २५ टक्के अधिक किंमत दिल्याशिवाय कोणताहि माल मिळूं शकत नाहीं. बारडोली तालुक्यांतील ८० हजार लोकांची जूट वरील स्वरूपाची करण्यांत आली आहे. कमिश्नरला किंवा कलेक्टरला मोटार गाडी पाहिजे असली तर दे. वल्लभभाई पटेल यांचा परवाना पर्वांयानें काढावा लागतो, येरव्ही कोठेंच कांहीं जुळत नाहीं. प्रत्येक सरकारी नोकर स्वयंसेवकांच्या नजरेखालीं बारडोली तालुक्यांत फिरूं शकतो. स्वयंसेवकांची नजर सोडून प्रवास करतां येणेंच शक्य नाहीं. गाडी मिळत नाहीं, बैल मिळत नाहीं, वाटाड्या मिळत नाहीं, बोचकें उचलणारा मिळत नाहीं, पाणी प्यावयास मिळत नाहीं, किंवा चहाचा पेलाहि मिळत नाहीं; सरकार म्हणून कांहीं आहे याची जाणीवहि बारडोली तालुक्यांत कोठें राहिली नाहीं. सरकारची इभ्रत पूर्णपणें गेलेली

---

* नवाकाळ, ता. ४ जुलै १९२८

अहे. लंगडा आंधळा कुत्राहि सरकारला विचारीत नाहीं. सरकारी कामकाज अशा रीतीनें बंद पडलें असून सरकारच्या नाड्या वहाणेंच संपलें आहे. हातपाय थंड पडले अहेत; कलेक्टर किंवा कमिशनर तालुक्यांत गेले असतांना छातीचे ठोके थोडेसे ऐकूं येतात; आणि नाकाला सूत लावल्यानंतर सरकार जिवंत आहे असा भास होतो, पण नाडी कोठेंहि चालत नाहीं आणि प्रत्यक्ष शुद्धि उरलेली नाहीं; असा मुंबईच्या 'टाईम्स'च्या बातमीदाराचा अनुभव आहे. आमचें ठीक चाललें आहे, आणि बरेच लोक सारा देत अहेत अशी जी फुशारकी सरकारी अधिकाऱ्यांकडून मारण्यांत येते त्यांत कांहीं अर्थ उरलेला नाहीं, अशी स्पष्ट कबुली देणारा मुंबईच्या 'टाईम्स'चा हा लेख आहे. बारडोली तालुक्यांतील शेतकऱ्यांच्या जुटीसंबंधानें हा लेख वाचल्यानंतर कांहीं संदेह रहात नाहीं. ही जूट दे. वल्लभभाई पटेलांच्या २५० स्वयंसेवकांनीं घडवून आणिलेली आहे. या २५० स्वयंसेवकांपैकीं सुमारें शंभर स्वयंसेवक बारडोलीच्या मुख्याश्रमांत रहातात व या मुख्याश्रमांत बसूनच दे. वल्लभभाई पटेल व त्यांचे हस्तक बारडोलीच्या राज्यकारभाराचीं सूत्रें चालवितात. या आश्रमाला बारडोलीचें सोव्हिएट किंवा बोल्शेव्हिकांचें राज्य, असें नांव मुंबईच्या टाइम्सच्या बातमीदारानें दिलें आहे. या बोल्शेव्हिक सरकारचा रोजचा खर्च ७०० रुपयांहून अधिक आहे. शंभर स्वयंसेवक व येतील जातील ते पाहुणे यांच्या जेवण्याखाण्याची सोय बोल्शेव्हिक सरकारकडून करण्यांत येते व मुंबईच्या 'टाईम्स'च्या बातमीदारालाहि या बोल्शेव्हिकांचाच पाहुणचार घेणे भाग पडलें होतें. सरकारी नोकर असो, किंवा मुंबईच्या 'टाईम्स'चा बातमीदार असो, पाहुण्याची सोय पाहण्यांत बोल्शेव्हिकांकडून आळस होत नाहीं. २५० स्वयंसेवक आपलीं उष्टीं काढतात, ताटें घासतात, आणि गरिबांचें अन्न खाऊन हरेक प्रकारचे कायाकष्ट करतात. या स्वयंसेवकांची शिस्त अत्यंत

वाखाणण्यासारखी असून सर्वांशींच ते विनयानें वागतात. सोव्हिएट सरकारच्या मुख्य कचेरींत असलेले शंभर स्वयंसेवक निरनिराळ्या कामगिरीवर रोज बाहेर पाठविण्यांत येतात. बाकीचे दीडशें स्वयंसेवक बारडोली तालुक्यांत निरनिराळ्या दहा बारा आश्रमांत व दहा बारा नव्या चौक्यांत ठेवण्यांत आले आहेत. त्या सर्वांचें वागणें उत्तम प्रकारचें आहे; अधिकाऱ्यांशीं किंवा कोणाशीहि विनय सोडून कोणी वागत नाहीं; पाहुण्यांचा आदरसत्कार करण्यांत येतो; पण तत्त्वाची बाब आली असतां तुरुंगांत जाण्यापर्यंत प्रत्येकाची तयारी असते. हे २५० स्वयंसेवक गुजराथ विद्यापीठ, म. गांधींचा आश्रम, गुजराथ, काठेवाड, मध्यप्रांत व मुंबई येथून बार्डोलीस गेलेले आहेत, आणि दे. पटेल त्यांचे अध्वर्यु झाले असून बोल्शेव्हिक तत्त्वें अंमलांत आणण्याचा प्रयोग बारडोलीस चालला आहे. मुंबईच्या 'टाईम्स' च्या बातमीदाराचें असें म्हणणें आहे कीं, शेतकऱ्यांच्या गरिबीमुळें वाढलेला सारा देण्यास ते तयार नाहींत असें मुळींच नसून, सरकारला मृतप्राय करण्याच्या उद्देशानें बोल्शेव्हिकांचें सोव्हिएट स्थापण्याकरितां बारडोलीतील शेतकऱ्यांनीं बंड उभारलें आहे. बारडोलींतील शेतकरी गुजराथेंतच नव्हे तर सर्व मुंबई इलाख्यांत सर्वांत सुसंपन्न आहेत आणि ह्या श्रीमंतीमुळें त्यांनीं सारा न देण्याचें बंड केलें आहे. इतके दिवस त्यांनीं व्यवस्थेनें झुंज चालविली आहे यावरून त्यांच्यापाशीं पैसा आहे हें उघड होय, असा सदर लेखकाचा कोटिक्रम आहे. मुंबईच्या गिरण्यांतील कामगारांनीं सांप्रतचा संप ज्या अर्थी दोन तीन महिने चालविला आहे त्याअर्थी त्यांच्याजवळ पैशाची ऊब असली पाहिजे, म्हणून द्रव्यसहाय्य करण्याची जरुरी नाहीं; अशा धर्तीचे जे आक्षेप अँग्लो-इंडियन पत्रांतून हल्ली पडतात तेच आक्षेप बारडोली संबंधानें आतां प्रसिद्ध झाले आहेत. बार्डोलीची लोकसंख्या ८० हजार

असून त्यांत १७ हजार खातेदार आहेत. या १७ हजार खातेदारांपैकीं एक हजारांहून अधिक खातेदारांची प्रत्येकीं दीड दोन एकरच जमीन स्वतःच्या मालकीची आहे. या असल्या प्रजेला श्रीमंत प्रजा म्हणून कसें म्हणावयाचें? बारडोलींत कांहीं नामांकित सावकार आहेत ही गोष्ट खरी, पण ही सावकारी जमिनीच्या धंद्यांसंबंधाची नसून मुंबईस मिळविलेल्या पैशामुळें आहे. बारडोलीचे बरेच लोक आफ्रिकेंत जाऊन उपजीविका करतात, आणि तेथें मिळविलेले पैसे बारडोलींत जमिनी खरेदी करण्यांत व घरें बांधण्यांत खर्च करितात. हें उत्पन्न बाहेरच्या उद्योगाचें आहे; बारडोलीच्या शेतीशीं त्यांचा कांहीं संबंध नाहीं. जमिनीची किंमत शेतीच्या धंद्याला अनुसरून वाढलेली नसून परदेशीं मिळविलेले पैसे जमिनींत घातल्यामुळें वाढलेली आहे. कोकणपट्टींतील जेथील लोक आफ्रिकेंत जातात, तेथील जमिनीच्या तुकड्यांची किंमत शेतीच्या धंद्याच्या दृष्टीपेक्षां फार वाढलेली आहे. परटिकाणीं किंवा परदेशीं जाऊन श्रम करावयाचे व सांचलेली पुंजी घरीं घेऊन येऊन पूर्वजांच्या घरांतच किंवा घराजवळच आपला देह ठेवावयाचा, ही जी स्वतःच्या जमिनीसंबंधाची आसक्ति हिंदी लोकांत दिसून येतें त्या आसक्तीमुळें जमिनीच्या किंमती कांहीं ठिकाणीं वाढलेल्या आहेत. जन्मभूमि–वात्सल्य हा एकप्रकारचा दोष केव्हां केव्हां होतो. या दोषामुळें कोकणांत किंवा बारडोली तालुक्यांत पाहिजे तसा शेतसारा वाढवून परदेशीं केलेल्या श्रमाचे पैसे लुबाडून घेण्यास सरकारास सोयीचें झालें आहे. यालाच एक्स्प्लॉयटेशन किंवा नागवणूक असें म्हणतात. असलें एक्स्प्लॉयटेशन किंवा नागवणूक चालली असतांना हताश व दुबळ्या लोकांनीं सत्याग्रह करून आपला बचाव केला पाहिजे, असें महात्मा गांधी यांनीं दक्षिण आफ्रिकेंत प्रत्यक्ष प्रयोगानें ज्या थोड्या हिंदी लोकांना शिकविलें त्यांपैकीं सत्याग्रहाचे

कांहीं निस्सीम भक्त बारडोलीचे रहाणारे आहेत, दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रहांत भाग घेणारे कांहीं लोक बारडोलींत आहेत, आणि बारडोलीकडे पैसे दक्षिण आफ्रिकेंतून येत असतात, एवढ्याच आधारावर बारडोलींतील शेतकऱ्यांचें बंड उभारलें आहे अशी आरोळी मुंबईच्या 'टाईम्स'नें फोडली आहे. बंड व बोल्शिव्हिकांचें सोव्हिएट सरकार, हीं दोन नांवें बारडोलीच्या सत्याग्रहाला देऊन मुंबईच्या 'टाईम्स' नें सरकारची एक-प्रकारची निर्भत्सना केली आहे. शल्य ज्याप्रमाणें कर्णाला लढाईच्या वेळीं टोचून बोलत असे त्याचप्रमाणें मुंबईचा 'टाईम्स' आज बारडोलीच्या बाबतींत सरकारला टोचत आहे. तेजोभंग करण्याचा मात्र उद्देश नाहीं; सरकारला नाहक चेतविण्याचा उद्देश आहे. दे. पटेल यांनीं बारडोलीला सोव्हिएट सरकार स्थापलें आणि तुम्हीं नामर्दाप्रमाणें गप्प काय बसलां आहांत, अशा आशयाची ही टोचणी आहे. ८८ पाटिलां-पैकीं ७९ पाटील आणि ४८ तलाठ्यांपैकीं २०-२५ तलाठी दे. वल्लभभाई पटेल यांनीं फितविले असून सर्वच्या सर्व पाटील व सर्वच्या सर्व तलाठी लवकरच पूर्णपणें फितूर होतील, असें सदर बातमीदाराचें मत आहे. पाटील व तलाठी म्हणजे खेड्यांतील मोंगल बादशहाच; सरकारचे डोळे व हातपाय. इंग्रज सरकारचें हे अहीमही रावण सत्याग्रह आश्रमानें जर बोल्शेव्हिक बनविले तर सरकार पार मरून गेलें म्हणून बारडोलीच्या शेतकऱ्यांनीं कां समजूं नये, असा सवाल सदर बातमीदारानें मुंबई सरकारास टाकला आहे. तुमचे पाय गेले, डोळे गेले, कान फुटले व जबरदस्त म्हणून समजलेले बाहूहि गळाले, मग लुल्यासारखे पडून बारडोली तालुक्यांत तुमचा निभाव कसा लागणार, अशा तऱ्हेनें मुंबई सरकारचे कान मुंबईच्या 'टाईम्स'नें आपल्या बातमीदाराच्या मार्फत उपटले आहेत. वेळींच महात्मा गांधींच्या सत्याग्रहाच्या पांघरूणाखालील

बोल्शेव्हिक स्वरूपाच्या चेष्टा बंद करा, दे. वल्लभभाई पटेल यांचें बोल्शेव्हिक सरकार नष्ट करा, आणि बारडोली तालुक्यांतील सोव्हिएटच्या चौक्या उलथून पाडा; नाहीं तर प्राणावरच गांठ येईल असा इषारा देण्याचा हा उद्देश आहे. गेल्या दीडशें वर्षांत हिंदुस्थानांत कोठेंहि व कधींहि झाला नाहीं अशा तऱ्हेचा बोल्शेव्हिक थाटाचा बारडोलीचा हा प्रयोग दे.वल्लभभाई पटेल यांच्या मार्फत महात्मा गांधी यांनीं सुरू केलेला आहे; हा अभूतपूर्व प्रयोग जर बारडोलींत सिद्धीस गेला तर सरकारच्या दराऱ्यास कोणीहि भीक घालणार नाहीं, असा मुंबईच्या 'टाईम्स'चा सिद्धांत असल्यामुळें बंगाल्यांतील बरवंट्याच्या कायद्यासारखे कायदे सुरू करून सोव्हिएट शेतकऱ्यांचें हें बंड सरकारनें हाणून पाडलें पाहिजे, असा सदर लेखाचा एकंदर कटाक्ष आहे. बारडोलीचें प्रकरण तडजोडीनें मिटविण्याऐवजीं बरवंट्याच्या कायद्याखालीं बारडोलीच्या दे. पटेल यांच्यासारख्यांच्या अनुयायांना ठेचून हें प्रकरण मिटविलें पाहिजे, असा नोकरशाहीचा अंशतः तरी हट्ट असल्याबद्दलची साक्ष मुंबईच्या 'टाईम्स'मधील लेख देत नाहीं काय ?

---

* पाहिजे दाता

सुरतच्या खलबतांत बारडोलीच्या प्रश्नासंबंधानें गव्हनरसाहेब व दे. वल्लभभाई पटेल यांचें मेतकूट नीट जुळलें नाहीं. दोन तीन किरकोळ बाबींसंबंधानें आणि एका मुख्य बाबीसंबंधानें मतभेद झाला व गव्हर्नर साहेब सुरतेहून पुण्याकडे तडजोड न करतां निघून गेले. तडजोडीची आशा अद्याप नाहींशी झालेली नाहीं. तडजोड घडवून आणण्यास कालाचा अवधि अद्याप बराच आहे. सध्यां बारडोलीस शेतकरी आपापल्या शेतांतील काम-काज दरसालप्रमाणें करीत आहेत व सरकारनें जप्तीचें काम बंद ठेवलें आहे. लढाई तात्पुरती तहकूब आहे. येत्या ऑक्टोबरमध्यें पीक कापणीस येईतों तंटाबखेडा होण्याचा फारसा संभव नाहीं; त्याच्या आंत तडजोड झाली म्हणजे भागणारें आहे. देशभक्त वल्लभभाई पटेल आज उद्यां पुण्यास जाणार आहेत; आणि सोमवारपासून सुरू होणाऱ्या कायदे-कौन्सिलामार्फत पुन्हां उघड व खाजगी चर्चा सुरू होऊन सुरतेचें खलबत पुण्यास पुढें चालू करण्यांत येईल, अशीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. सुरतेच्या खलबतांतील सरकारतर्फेच्या सूचना सरकारी जाहीर पत्रकांत प्रसिद्ध झाल्या आहेत आणि दे. वल्लभभाई पटेल यांनींहि आपल्यातर्फेच्या मागण्या प्रसिद्ध केल्या आहेत. दे. वल्लभभाई पटेल यांच्या मागण्या इतक्या साध्या, सोप्या व जरुरीच्या आहेत कीं, त्यांच्या चांगुलपणाबद्दल देशभक्त नरसिंह चिंतामण केळकर यांनाहि संदेह उरलेला नाहीं. सरकारी सूचना व लोकांच्या मागण्या यांची तुलना केली असतां एका मुद्याशिवाय इतर बाबींत तडजोड होण्यासारखी आहे, असेंच मुंबईच्या 'टाईम्स'चें देखील मत पडलें आहे.

---

* नवाकाळ, ता. २१ जुलै १९२८

एक रिव्हेन्यू ऑफिसर व हायकोर्टाचे न्यायाधीश यांची कमिटी नेमून सारावाढीची चौकशी करण्यास सरकार तयार आहे; बिनसरकारी कोणी तरी या कमिटींत असल्याशिवाय स्वतंत्र स्वरूपाची ही चौकशी होणार नाहीं असें बारडोलीच्या शेतकऱ्यांचें म्हणणें आहे. लेजिस्लेटिव्ह कौन्सिलांतील गुजराथच्या ज्या सभासदांनीं बारडोलीकरितां आपले राजीनामे दिले त्या सभासदांपैकीं एखादा विद्वान व निस्पृह सभासद जर या कमिटीवर नेमला गेला तर कोणतीच तक्रार रहाणार नाहीं. मुंबईच्या कौन्सिलला असली शिफारस सहज करतां येण्यासारखी आहे. कौन्सिलनें अशी शिफारस केली असतां सरकारासहि ती मान्य होणारी आहे. चळवळीला भीक घालून आम्ही बिनसरकारी सभासद कमिटीवर घेतला असें नव्हे तर कौन्सिलच्या शब्दाला मान दिला, असें म्हणून आपली इभ्रत संभाळण्यास सरकारला अडचण पडणार नाहीं. अशा दृष्टीनें विचार केला असतां, कमिटीवर कोणास नेमावयाचें यासंबंधाचा प्रश्न दोनहि पक्षांस समाधान होईल अशा रीतीनें सोडवितां येणारा आहे. एकदां चौकशीस प्रारंभ झाला म्हणजे आजूबाजूच्या दोन चार बाबींच्या संबंधानेंहि पुरावा गोळा करण्यांत आल्यानें कोणाचेंहि बिघडणारें नाहीं. सारावाढीच्या मुख्य प्रश्नाचा निकाल काय तो या कमिटीनें द्यावयाचा आहे. सदर निकाल मान्य करण्यास व त्याप्रमाणें वागण्यास दोनहि पक्ष तयार आहेत. जप्तीमुळें झालेलें नुकसान कसें भरून द्यावयाचें हा एक प्रश्न आहे. ज्या जमिनी इतरांना विकल्या गेल्या त्या जमिनी परत घेतां यावयाच्या नाहींत, पण नुसत्या जप्त केलेल्या जमिनी परत देऊं, असें सरकारचें म्हणणें आहे; जप्तीमुळें झालेलें नुकसान मिळालें पाहिजे अशी लोकांची मागणी आहे. इतरांना सरकारनें विकलेल्या जमिनी कायदेशीर रीतीनें त्यांजपासून पुन्हां परत सरकारास मागतां येणार नाहींत हें खरें आहे; पण सरकारची तशी मर्जी दिसून आल्यास त्यांनीं

जमिनी विकत घेतल्या ते जमिनी परत देणार नाहींत असा थोडाच भाग आहे ? याकामीं कागदोपत्रीं सरकार स्वतःस बांधून घेणार नसेल तर सरकारचें वजन या कामीं खर्च करण्यास येईल एवढें आश्वासन असलें म्हणजे बस्स आहे. पाटील व तलाठी यांना पुन्हां कामावर घेणें व तुरुंगांत टाकलेल्या सत्याग्रहींना सोडून देणें, या गोष्टी सरकारास सहज करतां येण्यासारख्या असल्यामुळें तेवढ्याकरितां तडजोड मोडेल असा रंग मुळींच नाहीं. अडचण आली आहे ती सारावाढीचे पैसे कोणी तरी सरकारी खजिन्यांत अगोदर भरले पाहिजेत या सरकारी हट्टासंबंधाची आहे. सरकारला सारा-वाढीचे पैसे अगोदर कशाला पाहिजेत ? आज तडजोड झाली नाहीं तर ज्या पद्धतीनें सरकार आज नाहीं उद्यां पैसे वसूल करणार आहे त्या पद्धतींतील शक्ति नवी चौकशी संपल्यानंतर थोडीच नष्ट होणार आहे ? आपला पक्ष सत्पक्ष आहे असा बारडोलीच्या शेतकऱ्यांचा सिद्धान्त असून या सिद्धान्ताला अनुसरून सारावाढीचे पैसे द्यावयाचे नाहींत अशा शपथा शेतकऱ्यांनीं घेतलेल्या आहेत. आपणास संमत असलेल्या चौकशीमध्यें जी साऱ्याची वाढ योग्य ठरेल तीहि द्यावयाची नाहीं, अशा स्वरूपाच्या शेतकऱ्यांच्या शपथा नाहींत. नवी चौकशी होऊन जाईतों साऱ्याची वाढ द्यावयाची नाहीं एवढीच काय ती बारडोलीची प्रतिज्ञा आहे. नवी चौकशी होऊन गेल्यावर त्या चौकशींत जी वाढ योग्य ठरेल ती देण्यास शेतकरी नाकबूल नाहीं. दोनहि पक्षांस संमत असलेली कमिटी नेमून चौकशीस सुरवात होण्यावरोबर एकजुटीच्या शपथेच्या बंधनांतून शेतकरी मुक्त होणार आहेत. ज्या सरकारला येत्या आक्टोबरांत पिकें उभीं असतांना जमिनीचा सर्व महसूल शेतकऱ्यांच्या जुटीला न जुमानतां वसूल करण्याची शक्ति आहे त्या सरकारनें चौकशी कमिटी नेमण्यावरोबर जूट मोडलेल्या शेतकऱ्यांपासून योग्य ती वाढ वसूल करण्यास कोणता त्रास पडणार आहे ? चौकशी

एक रिव्हेन्यू ऑफिसर व हायकोर्टाचे न्यायाधीश यांची कमिटी नेमून सारावाढीची चौकशी करण्यास सरकार तयार आहे; बिनसरकारी कोणी तरी या कमिटींत असल्याशिवाय स्वतंत्र स्वरूपाची ही चौकशी होणार नाहीं असें बारडोलीच्या शेतकऱ्यांचें म्हणणें आहे. लेजिस्लेटिव्ह कौन्सिलांतील गुजराथच्या ज्या सभासदांनीं बारडोलीकरितां आपले राजीनामे दिले त्या सभासदांपैकीं एखादा विद्वान व निस्पृह सभासद जर या कमिटीवर नेमला गेला तर कोणतीच तक्रार रहाणार नाहीं. मुंबईच्या कौन्सिलला असली शिफारस सहज करतां येण्यासारखी आहे. कौन्सिलनें अशी शिफारस केली असतां सरकारासहि ती मान्य होणारी आहे. चळवळीला भीक घालून आम्ही बिनसरकारी सभासद कमिटीवर घेतला असें नव्हे तर कौन्सिलच्या शब्दाला मान दिला, असें म्हणून आपली इभ्रत संभाळण्यास सरकारला अडचण पडणार नाहीं. अशा दृष्टीनें विचार केला असतां, कमिटीवर कोणास नेमावयाचें यासंबंधाचा प्रश्न दोनहि पक्षांस समाधान होईल अशा रीतीनें सोडवितां येणारा आहे. एकदां चौकशीस प्रारंभ झाला म्हणजे आजूबाजूच्या दोन चार बाबींच्या संबंधानेंहि पुरावा गोळा करण्यांत आल्यानें कोणाचेंहि बिघडणारें नाहीं. सारावाढीच्या मुख्य प्रश्नाचा निकाल काय तो या कमिटीनें द्यावयाचा आहे. सदर निकाल मान्य करण्यास व त्याप्रमाणें वागण्यास दोनहि पक्ष तयार आहेत. जप्तीमुळें झालेलें नुकसान कसें भरून द्यावयाचें हा एक प्रश्न आहे. ज्या जमिनी इतरांना विकल्या गेल्या त्या जमिनी परत घेतां यावयाच्या नाहींत, पण नुसत्या जप्त केलेल्या जमिनी परत देऊं, असें सरकारचें म्हणणें आहे; जप्तीमुळें झालेलें नुकसान मिळालें पाहिजे अशी लोकांची मागणी आहे. इतरांना सरकारनें विकलेल्या जमिनी कायदेशीर रीतीनें त्यांजपासून पुन्हां परत सरकारास मागतां येणार नाहींत हें खरें आहे; पण सरकारची तशी मर्जी दिसून आल्यास ज्यांनीं

जमिनी विकत घेतल्या ते जमिनी परत देणार नाहींत असा थोडाच भाग आहे ? याकामीं कागदोपत्रीं सरकार स्वतःस बांधून घेणार नसेल तर सरकारचें वजन या कामीं खर्च करण्यास येईल एवढें आश्वासन असलें म्हणजे बस्स आहे. पाटील व तलाठी यांना पुन्हां कामावर घेणें व तुरुंगांत टाकलेल्या सत्याग्रहींना सोडून देणें, या गोष्टी सरकारास सहज करतां येण्यासारख्या असल्यामुळें तेवढ्याकरितां तडजोड मोडेल असा रंग मुळींच नाहीं. अडचण आली आहे ती सारावाढीचे पैसे कोणी तरी सरकारी खजिन्यांत अगोदर भरले पाहिजेत या सरकारी हट्टासंबंधाची आहे. सरकारला सारा-वाढीचे पैसे अगोदर कशाला पाहिजेत ? आज तडजोड झाली नाहीं तर ज्या पद्धतीनें सरकार आज नाहीं उद्यां पैसे वसूल करणार आहे त्या पद्धतींतील शक्ति नवी चौकशी संपल्यानंतर थोडीच नष्ट होणार आहे ? आपला पक्ष सत्पक्ष आहे असा बारडोलीच्या शेतकऱ्यांचा सिद्धान्त असून या सिद्धान्ताला अनुसरून सारावाढीचे पैसे द्यावयाचे नाहींत अशा शपथा शेतकऱ्यांनीं घेतलेल्या आहेत. आपणास संमत असलेल्या चौकशीमध्यें जी साऱ्याची वाढ योग्य ठरेल तीहि द्यावयाची नाहीं, अशा स्वरूपाच्या शेतकऱ्यांच्या शपथा नाहींत. नवी चौकशी होऊन जाईतों साऱ्याची वाढ द्यावयाची नाहीं एवढीच काय ती बारडोलीची प्रतिज्ञा आहे. नवी चौकशी होऊन गेल्यावर त्या चौकशींत जी वाढ योग्य ठरेल ती देण्यास शेतकरी नाकबूल नाहीं. दोनहि पक्षांस संमत असलेली कमिटी नेमून चौकशीस सुरवात होण्यावरोबर एकजुटीच्या शपथेच्या बंधनांतून शेतकरी मुक्त होणार आहेत. ज्या सरकारला येत्या आक्टोबरांत पिकें उभीं असतांना जमिनीचा सर्व महसूल शेतकऱ्यांच्या जुटीला न जुमानतां वसूल करण्याची शक्ति आहे त्या सरकारनें चौकशी कमिटी नेमण्यावरोबर जूट मोडलेल्या शेतकऱ्यांपासून योग्य ती वाढ वसूल करण्यास कोणता त्रास पडणार आहे ? चौकशी

कमिटी नेमल्यानंतर सारावाढीच्या वसुलासंबंधानें अडचण रहात नाहीं. मग सरकारला अगोदर पैसे पाहिजेत कशाला? प्रसंग विशेषीं साऱ्याची तहकुबी सरकार मंजूर करीत नाहीं काय? चार सहा महिन्यापुरती बारडोलीच्या वाढीची तहकुबी देण्यास सरकारनें कां पुढें येऊं नये? अशी तहकुबी दिली असतां आपली इज्जत जाते, अशी खोटी समजूत असल्यामुळेंच तडजोडीच्या बाबींत आज गोंधळ माजला आहे. या इज्जतीला वळी पडल्यामुळें सरकारच्या वर्तनाला पोरकट स्वरूप येऊं लागलें आहे. शेतकऱ्यांनींच साऱ्याची वाढ दिली पाहिजे असें नव्हे, तर त्यांच्याकरितां कोणी तरी लाख सव्वा लाख रुपये सरकारी तिजोरींत भरले असतां ते रुपये सारा म्हणून नव्हे तर ठेव म्हणून घेण्यास सरकार तयार आहे. बारडोलीचे शेतकरी नव्या चौकशींत ठरल्यास साऱ्याची वाढ देण्यास तयार आहेत. ते तसे पैसे भरतील म्हणून हमी सरकारास पाहिजे आहे. हमीचें कारण काय? शेतकऱ्यांच्या जमिनी लाखों रुपये किंमतीच्या आहेत. पाहिजे त्याप्रमाणें या जमिनींना पायाखालीं तुडविण्याचें सामर्थ्य सरकारच्या अंगीं आहे. लँड रेव्हेन्यू कोडनें जबरदस्तीनें या जमिनीची एक तऱ्हेची मालकीच सरकारच्या पदरीं टाकली असून, शेतकऱ्याला बाहेर फेकून देऊन वटकीप्रमाणें या जमिनीला वापरण्यास सरकारला मुभा दिली आहे. ही मुभा म्हणजेच साऱ्याबद्दल हमी होय. या हमीहून आणखी मोठी हमी कोणती असणार? सरकारच्या मुठींत अशी हमी असतांहि लाख सव्वा लाख रुपये हमी म्हणून कोणाकडून तरी घेण्यास सरकारनें तयार व्हावें म्हणजे पोरकटपणानें भलत्या इभ्रतीच्या नादीं आपण लागलों आहोंत असें जाहीर करणेंच नव्हे काय? कसेंहि असो, सरकारनें आपली इभ्रत या मुद्यावर ठेवली आहे; आणि सुरतेच्या खलबतांतून पुण्याच्या खलबतांत हा मुद्दा टाकला तरी सरकार आपला

हट्ट सोडील असें दिसत नाहीं. या मुद्यासंबंधानें बार्डोलीच्या लोकांचें असें म्हणणें आहे कीं, सान्याची वाढ द्यावयाची नाहीं, अशा शपथा घेतलेल्या असल्यामुळें कोणाकडून तरी एकदम रक्कम पटवि ण्याचा उपद्व्याप बारडोलीच्या लोकांनीं करणें शक्य नाहीं. सरकारला कोणी तशी रक्कम दिल्यास बारडोलीच्या लोकांची ना नाहीं; पण आपणांत वर्गणी भरून अथवा इतर कोणापाशीं भीड खर्च करून पैसा गोळा करण्यास बारडोलीचे लोक तयार नाहींत. या कामासाठीं दे. वल्लभभाई पटेल यांनीं फंड उभारला असतां योग्य मुदतींत लाख सव्वा लाख जुळणार नाहींत असेंहि म्हणतां येत नाहीं. पैसे जुळतील, पण सारावाढीच्या विरुद्ध चळवळ करावयाची आणि पुन्हां सारावाढीच्या हमीकरितां फंड उभारावयाचा, या परस्परविरोधी गोष्टी सत्याग्रहाला मानवणाऱ्या नाहींत. सरकारला वाढीची तहकुबी सहज करतां येण्यासारखी आहे. बाब अगदी छोटी आहे. केवळ इभ्रतीच्या नादीं लागून सरकारनें हा हट्ट धरला आहे. अशा स्थितींत एक अब्रु वांचविण्यासाठीं दुसरी अब्रु सरकार गमावीत आहे. इभ्रत राहिल्यासारखें वाटेल खरें, पण पोरकटपणा पदरीं पडेल, हें सरकारच्या ध्यानीं आलेलें नाहीं. केवळ पोरकटपणामुळें तडजोड मोडली असा सरकारास दोष लागणार आहे. मुंबईच्या टाईम्सच्या लक्षांत ही गोष्ट आली असून मुंबई इलाख्यांतील कोणी तरी धनिकानें पुढें यावें आणि एक लक्ष रुपये सरकारी खजिन्यांत ठेव म्हणून ठेवण्यास तयार व्हावें, अशी सरकारतर्फे मुंबईच्या 'टाईम्स' नें धनिकांजवळ काल च्या अंकांत याचना केली आहे. सबंध लाख सव्वालाखाची रक्कम ठेवली पाहिजे असेंहि नाहीं, एक चतुर्थांश रक्कम ठेवली असतां भागणार आहे, असा कायद्याचा आधार सांपडला आहे. तेव्हां मुंबईच्या 'टाईम्स' च्या अर्धवट सरकारी याचनेला अनुसरून कोणी तरी दाता पांच पन्नास हजार रुपये भरण्यास

पुढें येईल, असा अंदाज आहे. मोठया मोठया मठांतून अयाचित वृत्तीनें राहणारे असे महंत असतात. तसेच महंत मुंबईच्या सेक्रेटरीएटमध्यें सांप्रत शिरले असले पाहिजेत, असा संशय येतो. आम्हांला असे पैसे मिळाले तरी चालतील, पण याचना आम्ही करणार नाहीं; असा सरकारी महंतांचा हट्ट आहे. सरकारच्या मोठेपणाकडे लक्ष देऊन ही अयाचित वृत्ति धनिक लोकांनीं सांभाळली पाहिजे. सेक्रेटरीएटमधील अधिकाऱ्यांनीं तसा इषारा दिला असतांना एक लाख काय, दहा लाख रुपये हां हां म्हणतां जमतील, पण अयाचित वृत्तीला तसें करणें शोभत नाहीं. कारण जवळच्याच चेल्यानें किंवा सेवेकऱ्यानें महंतासाठीं भिक्षा मागितली असतां अयाचित वृत्ति पाळली जात नाहीं. अयाचित वृत्तीचा गवगवा गावांत गांवाच्या लोकांनींच करावयाचा असतो, महंताच्या चेल्यांनीं करावयाचा नसतो. नाहीं तर पुन्हां इभ्रत जाते. मुंबई सरकार अशा पेचांत सांपडलें असल्यामुळें सरकारला पैसे भरणारा कोणी तरी दाता पाहिजे अशी जाहिरात मुंबईच्या 'टाईम्स'नें आपल्या कालच्या अग्रलेखांत प्रसिद्ध केली आहे; अशी जाहिरात लागल्यानंतर कोणी तरी दाता पुढें आल्यावांचून कसा राहील ?

---

* अफगाणिस्थानांत राज्यक्रांति

गेल्या चार पांच दिवसांत अफगाणिस्थानची राजधानी काबूल येथें राज्यक्रांति घडून आली असून, अमीर अमानुल्लाखान यांना आपली गादी सोडून कंदाहारकडे पळून जावें लागलें, व त्यांच्या मागून गादीवर बसलेले त्यांचे वडील बंधू सरदार इनायतुल्लाखान यांनाहि दोन दिवसांची अमिरी भोगून हिंदुस्थानांत पेशावर येथें यावें लागलें! सांप्रत काबूल शहरांत चोरांचे व लुटारूंचे प्रमुख बच्चा–इ–साकू, (बच्चा–ए–सक्काई, ह्याचा अर्थः बच्चा (मुलगा) ए (चा) सक्काई (भिस्ती) 'भिस्तीचा पोरटा,) हे हबीबुल्लाखान गाझी असें नांव धारण करून अफगाणिस्थानच्या गादीवर बसले आहेत. सरदार इनायतुल्ला यांना बच्चा–ई–साकूच्चे परवानगीनें हिंदुस्थान–सरकारच्या विमानांतून पेशावरास आणण्यांत आलें असलें तरी क्वेट्टाच्या मार्गानें ते कंदाहार येथें रहावयास जाणार आहेत. बच्चा–ई–साकू यांचे वडील पाणक्याचा किंवा भिस्त्याचा धंदा करणारे असून, लष्करांत कांहीं दिवस सामान्य शिपायाची नोकरी करून लुटारूंच्या धंद्यास त्यांनीं कांहीं वर्षांपूर्वी प्रारंभ केला. धाडसी, हुषार व श्रीमंतांना लुटून गरिबांना अन्नदान करणारा, अशी बच्चा–ई–साकू याची ख्याति चोहोंकडे पसरली असल्यामुळें, डिसेंबर महिन्यांत जलालाबादचे टापूंत शनिवारीं पठाणांचें बंड सुरू असतांना काबूलच्या आसपासच्या प्रांताला त्रस्त करून सोडण्याचें काम बच्चा–ई–साकू यांजकडे सोंपविण्यांत आलें. डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यांतील जलालाबाद व काबूल येथील बंडाळीची हकीकत रशियांत मास्को येथें सविस्तरपणें प्रसिद्ध झाली असून, त्यांतील

---

* नवाकाळ, ता. २० जानेवारी १९२९

महत्त्वाचे भाग आतां हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाले आहेत. गरिबांचा कैवारी व श्रीमंतांचा लुटारू बचा–ई–साकू ह्याचें डोकें तोडून आणणारास अमीर अमानुल्ला यांनीं डिसेंबरचे दंगलींत मोठें बक्षीस लाविलें होतें. उलट बचा–ई–साकू यानेंहि अमीर अमानुल्ला यांचें डोकें उडविणारास मोठें बक्षीस मिळेल अशा जाहिराती काबूल–जलालाबाद या रस्त्यांवर त्या वेळीं लावल्या होत्या. सामान्य चोर व दरवडयाचे पैसे गरिबांना वाटणारा दरवडेखोर यापलीकडे बचा–ई–साकू याची किंमत डिसेंबरच्या पहिल्या आठवडयांत नव्हती. पण डिसेंबरच्या दुसऱ्या आठवडयांत बचा–ई–साकू यानें काबूल शहरास वेढा देऊन अमीर अमानुल्ला-खान यांना चार दिवस 'जगतों कां मरतों' असें करून सोडलें होतें. काबूल शहरांतच नव्या भरतीचीं माणसें म्हणून बचा–ई–साकूचे लोक शिरले होते; व काबूल शहराजवळील माऱ्याची टेकडी, विमानांचें स्टेशन आणि बिनतारी तारायंत्र यांच्या जागा आपल्या स्वाधीन केल्या होत्या. थोडक्यांत चुकलें, नाहींतर त्याच्यावेळीं अमीर अमानुल्ला ह्यांना बचा–ई–साकूनें जीवंत धरलें असतें; पण आयत्यावेळीं अमीरसाहेबांना नव्या सैन्याची कुमक मिळाली, व बचा–ई–साकू याचा पराभव डिसेंबरच्या दुसऱ्या आठवडयांत होऊन काबूलच्या उत्तरेस १०–२० मैल बचा–ई–साकूला पळून जावें लागलें ! डिसेंबरच्या दुसऱ्या आठवडयापासून परवांपर्यंत बचा–ई–साकूच्या सैन्याच्या व अमीरसाहेबांच्या सैन्याच्या चकमकी केव्हां काबूलपासून २० मैलावर तर केव्हां काबूलपासून ४–५ मैलावर एकसारख्या झडत होत्या. डिसेंबरच्या दुसऱ्या आठवडयांत बचा–ई–साकूचें सैन्य सहा हजाराहून अधिक होतें; ह्या सैन्याच्या बंदुका अफगाण बंदुकांहून अधिक चांगल्या होत्या; लढाऊ सामान ह्या सैन्यापाशीं भरपूर होतें; सैन्याची शिस्त व बंदोबस्त उत्तम होता; इतकेंच नव्हे तर

लढण्याचे डावपेंचहि युरोपियन तऱ्हेचे होते ! सैन्याच्या ह्या बंदोबस्तावरून मास्को येथील रशियन पत्रकारांनीं असा आरोप इंग्लंडवर ठेवला आहे कीं, इंग्रजांच्या चोरट्या मदतीशिवाय बच्चा-ई-साकूचें प्रस्थ अशा रीतीनें माजलेलें नाहीं. बच्चा-ई-साकू यांजपाशीं नव्या तऱ्हेचीं हत्यारे कोठून आलीं ? चोरांत व लुटारूंत लष्करी शिस्त कोणी उत्पन्न केली ? नवीन तऱ्हेच्या लढाईचें ज्ञान बच्चा-ई-साकूंत कसें इन्स्ट्रक्ट पडलें ? पेशावर-खायबर-जलालाबाद-काबूल या पट्ट्यांत बंडाचा धुमाकूळ चालला असतांना जलालाबादच्या दक्षिणेकडील शिनवारी पठाण व उत्तरेकडील मोहंमदी पठाण या दोन पठाणांच्या जातींनीं राजे अमानुल्ला यांच्या सुधारणांविरुद्ध व विशेषतः स्त्रियांचा गोषा काढून टाकण्याच्याविरुद्ध तक्रारी केल्या, आणि अफगाणिस्थानांतील व पंजाबांतील मुल्लांचें पाठबळ ह्या तक्रारींना मिळालें. राजे अमानुल्ला मुसलमानी धर्माला हरताळ लावीत आहेत अशी ओरड मुल्लांनीं केल्यामुळें शिनवारींच्या बंडास सुरवात झाली. हें बंड शांत करण्याकरितां जानेवारीच्या पहिल्या आठवड्यांत मुल्लांची अठरा कलमांची यादी राजे अमानुल्ला यांनीं मान्य करून आपल्या सुधारणा मागें घेतल्या आणि अफगाणिस्थानांत स्थिरस्थावर झालें असें जाहीर करण्यांत आलें. मुल्लांच्यापुढें हात टेकल्यानें अमानुल्लाखान यांची शक्ति न वाढतां उलट काबूल शहरांत ते कमकुवत ठरले; आणि पांच सहा दिवसांपूर्वी बच्चा-ई-साकू पुन्हां काबूल शहराच्या सभोंवतीं दंगा करूं लागला अमीर साहेबांच्या सैन्यापैकीं बरेच लोक बच्चा-ई-साकू यांना मिळाले, आणि बंडखोरांची संख्या १२ हजारांहून अधिक झाली. अमीर-साहेबांचा तोफखाना शत्रूला मिळाला, आणि राजे अमानुल्ला यांच्याच तोफा काबूल शहरावर डागण्यांत आल्या ! मुल्लांच्या मागण्या कबूल केल्या तरी भागत नाहीं असें पाहून राजे अमानुल्ला यांनीं आपले वडील बंधु

सरदार इनायतुल्ला यांना गादीवर बसविलें, आणि मुल्लांचें शिष्टमंडळ बचा–ई–साकू यांना वरील बातमी कळवून बंड शांत करण्याकरितां बंडखोरांकडे निघून गेले. ह्या दिवशीं अमानुल्ला कंदाहारकडे पळून गेले; मुल्लांनीं बंड थंड केलें, व इनायतुल्लाखान अमीर झाले; अशा बातम्या चोहोंकडे पसरविण्यांत आल्या. हिंदुस्थानांतील मुल्लांना पाहिजे तेथें संचार करण्याची व लोकांकडून धर्मगुरु म्हणून पूजा करून घेण्याची सनद एक तऱ्हेनें देण्यांत आली आहे, असेंहि सरदार इनातुल्लाखान यांच्या औट घटकेच्या अमीरीच्या प्रारंभी प्रसिद्ध करण्यांत आलें! काबीर अमानुल्ला पडले व मुल्लांचें बाहुलें गादीवर बसलें, असा अमीर अमानुल्लाखान यांच्या पलायनाचा अर्थ झाला. अमीर इनायतुल्ला यांचें राज्य एक दोन दिवस टिकतें न टिकतें तोंच असें प्रसिद्ध झालें कीं मुल्लाच्या तंत्रानें बचा–ई–साकू वागणारे नसून काबूल शहरांत शिरून बंडखोरांनीं राजवाड्याला गराडा दिला आहे! ज्या मुल्लांनीं व सरदारांनीं अमीर अमानुल्लाखान यांच्याशीं बेइमानी करून अमीर इनायतुल्लाखान यांस गादीवर बसविलें त्यांच्याहि तोंडाला बचा–ई–साकू यानें पानें पुसलीं; आणि इनायतुल्लाखान यांना पेशावर येथें इंग्रजी विमानांतून निघून जाण्यास परवानगी देऊन आपल्या स्वतःच्या नांवाची द्वाही हबीबुल्लाखान गाझी म्हणून काबूल शहरांत फिरवून बचा–ई–साकू अफगाणिस्थानचे राजे झाले. रशिया, फ्रान्स व जर्मनी या देशांतील लोकमत इंग्रजांच्या चोरट्या मदतीनें बचा–ई–साकूची राज्यक्रांति घडून आली असें आहे; व विलायतचीं वर्तमानपत्रें अफगाणिस्थानच्या अंतस्थ स्थितीशीं इंग्रजांचा कांहीं संबंध नाहीं असें ठासून सांगत असून, फ्रान्सनें इंग्रजांवर असा आरोप करणें म्हणजे इंग्रजी विमानांनीं काबूल येथील फ्रेंच वकिलातींतील बायकामुलांना सुरक्षितपणें पेशावर येथें आणल्याबद्दल चांगले उपकार फेडणें होय, अशी

टीका विलायतचीं पत्रें फान्सवर करीत आहेत. मुल्लांनीं बंड उभारलें, पण मुल्लांना तोंडघशीं पडावें लागून इंग्रजांच्या बंदुकींच्या आश्रयानें पुढें आलेला एक लुटारू आज काबूलच्या गादीवर बसला ! काबूलच्या गादीच्या अंगीं आज हुकमत कोणती आहे ? खजिन्यांत पैसा नाहीं; बाहेरून आलेल्या दहा बारा हजार बंदुकींना नवीन दारूगोळ्याचा पुरवठा करण्याचें सामर्थ्य नाहीं; पूर्वपरंपरेच्या श्रीमंतीचें व मुल्लांचेंहि आतां पाठबळ नाहीं ! असला हा हबीबुल्ला गाझी, गरिबांचा कैवारी व श्रीमंतांचा कर्दनकाळ म्हणून नांवाजलेला मूळचा पाणक्या, कितीहि हुषारीनें वागला, तरी इंग्रजांच्या हातांतलें बाहुलें होऊन नाचण्यापलीकडे व दरसालची पूर्वीची सतरा लाखांची देणगी इंग्रजांकडून पुन्हां घेण्यापलीकडे बचा–ई–साकू याचें हातून अधिक करामत अफगाणिस्थानांत होऊं शकेल असें दिसत नाहीं. अमीर अमानुल्लाखान ह्यांचा कल इंग्रजांपेक्षां रशियाकडे अधिक होता; ह्यामुळें बचा–ई–साकू यांना १०–१५ हजार बंदुकांची मदत मिळून काबूल येथील बोल्शेव्हिकांच्या बस्तानाची खच्ची करण्यांत आली, असें जर्मन पत्रकारांचें मत आहे. अमानुल्लाखान कंदाहार येथें आतां राहिले असून, काबूलच्या दक्षिणेकडील गझनीपासून कंदाहारपर्यंतचा मुलूख त्यांच्या हुकमतींत असल्यासारखा आहे. कंदाहारचे पठाण दुराणी जातीचे असून सूरिया राणीहि दुराणी जातीचीच आहे. गझनी, कंदाहार व हिरात हे टापू अमानुल्लाखान यांच्या बाजूचे आहेत व तीस हजारपर्यंत सैन्य अमानुल्लाखान यांना चार सहा अठवड्यांत उभें करतां येईल, असा अंदाज आहे. अमानुल्लाखान यांनीं तीस हजार सैन्य उभें केलें तरी हिरातच्या बाजूनें हत्यारांची व दारूगोळ्यांची मदत झाल्याशिवाय काबूलवर चाल करून जाणें त्यांना शक्य नाहीं. अफगाणिस्थानच्या दारूगोळ्याचा सांठा, तोफखाना व नव्या तऱ्हेच्या बारा

पंधरा हजार बंदुकी बचा–ई–साकू उर्फ अमीर हबीबुल्ला गाझी यांच्या हातीं असून, रशियाच्या मदतीशिवाय अफगाणिस्थानांत काबुलांतून ह्यांना घिटाळून देण्यास कोणीहि समर्थ नाहीं. काबूलचा टापू पेशावरला जितका जवळ आहे तितकाच कंदाहार–गझनीच्या मुलुखालाहि जवळ आहे. पूर्वी डिसेंबरांत ज्या मार्गानें बचा–ई–साकू यांना हत्यारांची व दारूगोळ्याची मदत मिळाली त्याच मार्गानें पुढेंहि मदत मिळणारी असल्यामुळें, कंदाहार–गझनीच्या टापूचें रशियाची चोरटी मदत मिळूनहि तावडतोब फारसें चालेल असें म्हणतां येत नाहीं. काबूल येथून बचा–ई–साकूचें उच्चाटण होण्यास, काबूलच्या उत्तरेकडील सोव्हिएट तुर्कस्थानांतून म्हणजे बोल्शेव्हिकांच्या टापूंतून उत्तर अफगाणिस्थानांतील चोरांच्या व लुटारूंच्या प्रमुखांना हत्यारांची व दारूगोळ्याची भरपूर मदत मिळून बचा–ई–साकूसारखे कित्येक लुटारू गरिबांचा कैवार घेत व श्रीमंतांना लुटीत किंवा बोल्शेव्हिकांच्या मतांचा प्रसार करीत काबूलच्या आसपास येऊन पोहोंचले पाहिजेत. तोंपर्यंत कंदाहार–गझनी–हिरात प्रांतांतील अमीर अमानुल्लाखान यांच्या वर्चस्वाला महत्त्व येणार नाहीं. बचा–ई–साकूसारख्या लुटारूला बंदुकांची व दारूगोळ्याची मदत इंग्रजांनीं केली, असा आरोप मास्कोचे बोल्शेव्हिक इंग्रजांवर उघडपणें करीत आहेत. तेव्हां उत्तर व पश्चिम अफगाणिस्थानांत म्हणजे काबूल व सोव्हिएट तुर्कस्थान यांच्यामधील टापूंत बोल्शेव्हिक मताचे लुटारू चोहोंकडे पेरून टाकण्यास बोल्शेव्हिकांचे एजंट मागेंपुढें पहाणार नाहींत, असा अंदाज आहे. पश्चिम अफगाणिस्थानांत बंडाळीला सुरवात झाल्याची बातमी आली, म्हणजे ज्यांनीं बचा–ई–साकूला बंदुका पुरविल्या त्यांना बोल्शेव्हिक स्वरूपाची बंडाळी उत्तर किंवा पश्चिम अफगाणिस्थानांत दृष्टीस पडल्यानंतर आपल्या चेहऱ्यावरील बुरखा दूर करणें भाग पडेल, हें उघड आहे.

दक्षिणेच्या भागांत अमानुल्लाखान यांचें वर्चस्व, उत्तरेच्या व पश्चिमेच्या भागांत बोल्शेव्हिक चळवळीची बंडाळी, सरहद्द व जलालाबाद येथें तोंडघशी पडलेल्या मुल्लांची धांदल, व काबूल येथें परकी बंदुकींच्या जोरावरील बच्चा-ई-साकू यांची सत्ता, अशा चार पांच वाटण्या अफगाणिस्थानच्या होऊन हिंवाळ्यानंतर जोराची लठ्ठालठ्ठी सुरू झाल्यावर, इंग्लंडची किंवा रशियाची आजची तटस्थवृत्ति कायम टिकणें शक्य अहि काय?

श्री. कृ. प्र. खाडिलकर यांचेवरील राजद्रोहाच्या खटल्यास कारणीभूत झालेला लेख

* मुंबईचे दंगे व बोल्शेव्हिक बिल

ता. ७ रोजीं दिल्लीस असेंब्लीमध्यें बोल्शेव्हिक बिल ६१ विरुद्ध ५० अशा बहुमतानें सिलेक्ट कमिटीकडे सोपविण्याचा ठराव पास झाला. या ठरावाला बहुमत मिळण्यासाठीं नोकरशाहीच्या घटकांनीं ज्या गोष्टींचा फायदा घेतला, त्यांत मुंबईच्या दंग्याची प्रामुख्यानें गणना करावी लागते. येथील दंग्याचें निमित्तकारण पठाण लोक मुलें पळवितात अशा अर्थाची हूल असून, गिरणी कामगारांत अलिकडे बरेच दिवस पसरलेला असंतोष हा त्या अफवेला पडलाच तर एक प्रकारें केवळ पार्श्वभूमीसारखा उपयोगीं पडणारा आहे; परंतु नोकरशाहीच्या सभासदांनीं असेंब्लींत कम्युनिस्टांचीं हिंदुस्थानांतील कारस्थानें व मुंबईतील दंगे यांचा संबंध जोडून आपल्या बाजूला बरींच मतें ओढलीं. कम्युनिस्टांच्या तत्त्वांची असेंब्लींत जी चर्चा झाली ती लक्षांत घेतली किंवा या तत्त्वांचा प्रसार थांबविण्याकरितां प्रत्यक्ष जीं कलमें आहेत त्यांचा विचार केला तरी मुंबईतील दंगे हें कम्युनिस्टांच्या कारस्थानांचें फळ कसें ठरतें, याचा पत्ता लागत नाहीं. कम्युनिस्ट हे भांडवलशाहीचे कट्टे शत्रू समजले जातात. पठाणांनीं मुलें पळविण्याच्या

---

* नवाकाळ, ता. ९ फेब्रुवारी १९२९

हुलीचा व भांडवलशाहीचा साहजिकच कांहीं संबंध नाहीं, शिवाय पटाण हे किरकोळ सावकारी करणारे असले तरी त्यांचा भांडवलशाहीमध्यें अंतर्भाव होत नाहीं. मग त्यांच्याविरुद्ध सुरू झालेल्या दंग्याचें कम्युनिस्टांच्या कारस्थानाशीं नातें कसें जोडलें जातें, हें एक फक्त नोकरशाहीलाच ठाऊक! देशांतल्या मजूरवर्गांत स्वस्थितीविषयीं निःसंशय असंतोष आहे आणि त्याचीं कारणें पं. मालवीय व सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास यांनीं आपल्या भाषणांत उत्कृष्ट रीतीनें दाखविलीं आहेत. देशाचें दारिद्र्य दिवसानुदिवस वाढत आहे. या कारणाला हिंदी कारखानदारांच्या बाजूनें ब्लॅकेटसाहेबांनीं ठरविलेल्या हुंडणावळीच्या भावाची भर पडली आणि अप्रत्यक्षरणें या भावानें कारखानदार मालकांच्या वरकतीला खोडा लागून कामगारांची आर्थिक प्रगति अडकवून धरली गेली. कामगारांच्या असंतोषांत जर बोल्शेव्हिकांचें भूत दिसत असेल तर त्याला गाडण्यास उपयोगी पडणारा मंत्र शोधण्यासाठीं पुढाऱ्यांना एकत्र बोलावून उभयपक्षीं दिलसफाईनें या प्रश्नाची साधकबाधक चर्चा होऊं द्या असें आव्हान सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास यांनीं नोकरशाहीला केलें होतें. पं. मालवीय यांनीं लोकांच्या सर्वसामान्य दैनेचा जास्त तपशिलवार विचार आपल्या भाषणांत केला असून मजूर आणि शेतकरी यांच्या असंतोषाचें मूळ नोकरशाहीच्या कारभाराशीं नेऊन भिडविलें आहे. परंतु नोकरशाहीला आपल्या कारभारांत सुधारणा करावयाची नसून त्या कारभारांत फेरफार घडवून आणण्यासाठीं उत्पन्न झालेल्या चळवळी नव्या नांवाखालीं नव्या साधनांच्या साह्यानें झोडपून काढावयाच्या आहेत. मजूर व शेतकऱ्यांच्या असंतोषाला नोकरशाहीनें कम्युनिस्टांच्या कारस्थानाचा अवतार असें नांव दिलें असून तिला अगदीं ऐनवेळीं पूर्वी जणूं काय योजनाच केल्याप्रमाणें मुंबईचे दंगे आपली पोळी भाजून घेण्याला उपयोगी पडले आहेत. जेव्हां जेव्हां विवेचनांत अडचणुकीचा

प्रश्न आला तेव्हां तेव्हां मुंबईच्या 'सध्यांच्या परिस्थितीकडे पहा' अशा अर्थाचे उद्गार नोकरशाहीच्या लोकांनीं व त्यांच्या पुरस्कर्त्यांनीं बेधडक काढले. मि. क्रेरार, सर डेनिस ब्रे, सर डासीं लिंडसे यांनीं कितीहि कंठशोष केला तरी 'बोल्शेव्हिकांच्या मतप्रसाराशीं सध्यांच्या परिस्थितीचा साक्षात संबंध बिलकूल नाहीं' या लोकपक्षांतील पुढाऱ्यांच्या ठाम सिद्धान्ताविरुद्ध वरच्यापैकीं कोणालाहि सयुक्तिक मुद्दा मांडतां आलेला नाहीं. उलट उत्तर न देतां या दंग्याकडे बोट दाखविण्याचा नोकरशाहीच्या लोकांनीं सपाटा ठेवल्यामुळें, बोल्शेव्हिक बिल असेंब्लींत निघायला व मुंबईंत दंग्याची आग भडकायला एकच गांठ पडली तेव्हां या चमत्कारपूर्ण योगायोगाच्या मुळाशी बोल्शेव्हिक बिलाचे पाठीराखे तर नसतील ना, हा संशय फोफावण्यास जागा झाली आहे. बोल्शेव्हिक मतांच्या वर्चस्वाखालीं भावी काळांत केव्हां तरी चार पांच पिढ्यांनंतर हिंदी राष्ट्र जाण्याच्या शक्यतेचें भय आज येथील ब्रिटिश राज्यकर्त्यांचें धाबें दणाणून सोडीत आहे. त्या शक्यतेचीं कारणें उत्पन्न होण्यापूर्वीच उपटून काढण्यासाठीं बोल्शेव्हिक बिलाचा जन्म आहे आणि बिलाच्या आवश्यकतेचा पुरावा काय तर असेंब्लींत बिल निघण्याच्या सुमारास मुंबईस सुरू झालेले दंगे ! द्राविडी प्राणायामानें देखील सिद्ध न होऊं शकणारा हा बादरायण संबंध पाहिला म्हणजे, मि. क्रेरार प्रभृति मंडळीनें हिंदी लोकमतामागें असलेल्या बुद्धिमत्तेची थट्टा चालविली होती कीं, त्यांच्या समजुतीप्रमाणें कां होईना देशांत उत्पन्न झालेल्या बोल्शेव्हिक मतप्रसाराच्या भयंकर परिस्थितीची ते गंभीर व अंतःकरणपूर्वक चर्चा करीत होंते, हेंच कळेनासें होतें. आयत्या वेळच्या दंग्याचा ज्यांनीं अशा रीतीनें खोटा फायदा घेतला, त्यांच्याकडेच दंग्याच्या उत्पत्तीचा संबंध त्यांच्या बुद्धिवादाचें अनुकरण करून जोडण्यास काय हरकत आहे? हिंदुस्थानांतल्या ब्रिटिश नोकरशाहीची

अनियंत्रिक सत्ता पुढें देखील अबाधित रहावी यासाठीं तळमळणाऱ्या लंडन टाईम्स, डेलीमेल वगैरे पत्रांच्या संपादकांना तर मुंबईचे दंगे ही एक अमृतसिद्धियोगाची पर्वणीच वाटत आहे. या दोन्ही पत्रांनीं मुंबईच्या दंग्याकडे सायमन कमिशनचें लक्ष वेधलें असून असे दंगे जेथें घडतात तेथले लोक स्वराज्याला अपात्र आहेत, अशी इषारत कमिशनला दिली आहे. कोलंबोस व मुंबईस झालेल्या दंग्यांत मजूर वर्गाचा अंशतः संबंध आहे, यावरून मास्कोच्या मदतीनें सार्वजनिक संपाची दंग्याच्या रूपांत हिंदी मजुरांनीं रंगीत तालीम चालविली आहे, असा अभिप्राय लंडन टाईम्सनें ठोकून दिला असून मजूर पक्षांत नेमस्त व जहाल असे भेद पाडण्याचा यत्न केला आहे. डेलीमेल पत्राला हिंदुस्थानांतल्या ब्रिटिश भांडवलाची काळजी पडली असून, हिंदी पुढाऱ्यांना राज्यकारभारांत जे हक्क द्यावयाचे असतील ते हक्क बहाल करतांना इंडियन गव्हर्मेंट सिक्युरिटीची व्यवस्था ते ठेवतील असा बंदोबस्त करावा, असें सायमन कमिशनला मोठ्या कळकळीनें सुचविलें आहे. वस्तुतः जो कोणी मुंबईतील दंग्याची निर्विकार बुद्धीनें छाननी करील त्याला स्वच्छ दिसेल कीं, दंग्यांत कामगारांचा जो संबंध आला तो रोजगाराच्या नात्याचा नसून मुलें पळवून नेण्याच्या भीतीनें क्षोभलेले मुलांचे पालक या दृष्टीचा संबंध आहे. परंतु ज्यांनीं येनकेन प्रकारेण हिंदी चळवळ ठेचण्या-करितां बुद्धिपुरःसर आपल्या सारासारज्ञतेला सोडचिठ्ठी दिली आहे, त्यांच्यापासून वरच्यासारख्या निर्विकार तारतम्याची अपेक्षा कशी धरतां येईल? दंग्यांत मजूर होते या बातमींतल्या मजूर शब्दावर दृष्टि खिळून बोल्शेव्हिकांच्या बागुलबोवानें त्यांच्या मेंदूचा कब्जा घेतल्याप्रमाणें 'हा घ्या बोल्शेव्हिकांच्या मतप्रचाराचा पुरावा' अशा आरोळ्या इकडे असेंब्लींत मि. क्रेरार व त्यांच्या मताची री ओढणारे यांनीं ठोकल्या, तर

तिकडे लंडन टाईम्स, डेलीमेल यांनीं 'बोल्शेव्हिकांच्या कारवाईची रंगीत तालीम सुरू झाली' 'हिंदी जनता स्वराज्याला नालायक आहे' 'हिंदुस्थानांतलें ब्रिटिश भांडवल बुडण्याच्या पंथास लागलें, त्याला तारण्याची तजवीज करा', अशा अर्थाच्या किंकाळ्यांनीं ब्रिटिश जनता भेदरून सोडण्याला प्रारंभ केला! बोल्शेव्हिक बिल ४ महिन्यांमागें असेंब्लींत आलें होतें, आणि तेव्हां हिंदुस्थानांत किंवा सिलोनांत दंग्याचें स्वप्न देखील नव्हतें. चार महिन्यांमागें बिल आणलें; यावरून तेव्हांच नोकरशाहीपाशीं बिलाच्या समर्थनाकरितां भक्कम पुरावा होता, हें उघड आहे. मग आयत्या वेळच्या दंग्याचा फायदा नोकरशाहीनें कां घ्यावा? चार महिन्यांपूर्वी नोकरशाहीचें चाललें नाहीं; मुंबईच्या दंग्याचा आश्रय घेऊन आतां बिल पुढें सरकलें; मग प्रेताच्या टाळूवरील लोणी चाटून खाण्यासारख्या पद्धतीनें या दंग्याचा फायदा घेणाऱ्या ह्या बिलाच्याच माथ्यावर दंग्याच्या उत्पत्तीचें खापर कां फोडूं नये? दंग्याच्या बातम्यांनीं मनावर पडलेल्या ताणामुळें असेंब्लीतील बऱ्याच लोकनियुक्त सभासदांचा बुद्धिभेद मि. क्रेरार प्रभृतींना करतां आला व या एकाच गोष्टीवरून नोकरशाहीकडे झुकलेल्या बहुमताचा उलगडा होण्यास हरकत नाहीं. एका शहराच्या स्थानिक दंग्यावरून एकदम सगळ्या देशाच्या राजकारभाराची तपासणी करून सुधारणा सुचविण्यासाठीं नेमलेल्या कमिशनकडे धांव घेणें यासारखा बुद्धीचा दुरुपयोग कोणता असणार? पण हा अत्याचार लंडन टाईम्स, डेलीमेल या एरवी विचारी व भारदस्त समजल्या जाणाऱ्या विलायती पत्रांनीं केला आहे! यावरून त्यांची दानत व हिंदुस्थानाविषयींची भावना सहज ध्यानांत येते. हिंदुस्थानांत जबाबदार राज्यपद्धति सुरू व्हावी अशी निर्मल इच्छा असेल तो कोणीहि, डेलीमेल, लंडन टाईम्सप्रमाणें निमित्ताला टेकल्यासारखा या इच्छेला न शोभणारी

भलतीच हाकाटी करणार नाहीं. मि. क्रेरार यांचें बोल्शेव्हिक बिल तर बोलून चालून हिंदी चळवळीचा गळा आवळण्याचा फांस आहे आणि सायमन कमिशनपासून कसलीच प्राप्ति होणार नाहीं, अशी हिंदी पुढाऱ्यांची खात्री झालेली आहे. बोल्शेव्हिक बिल, विलायती वृत्तपत्रें आणि सायमन कमिशन यांचें एकंदर मेथकूट सिद्धसाधकांच्या टोळीसारखें असल्यावर त्यांनीं या दंग्याचा फायदा घ्यावा यांत आश्चर्य कसलें?

खाडिलकरांचीं अध्यक्षीय भाषणें

नाट्य संमेलनापुढील भाषण

१९१७ सालीं ता. ४ जून रोजीं गंधर्व नाटक मंडळीतर्फे पुणें येथें भरलेल्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष या नात्यानें कै. काकासाहेब खाडिलकर यांनीं केलेल्या भाषणाचा वृत्तांत पुढें दिला आहे—

तत्त्वज्ञानीं व कवि

" मला आपण हा अध्यक्षपदाचा बहुमान दुसऱ्यांदा दिलात याबद्दल मी आपला फार आभारी आहें. गंधर्व नाटक मंडळीमार्फत होणाऱ्या संमेलनाचें अध्यक्षस्थान स्वीकारणें म्हणजे सारा ' घरगुती प्रकार झाला ' असा समज होण्याचा संभव असल्यानें मी तें नको म्हणत होतों. पण सन्मित्रांच्या आग्रहावरून ह्या पदाचा स्वीकार करणें मला भाग पडत आहे. शिवाय माझा धंदा नाटकें लिहिण्याचा, माझी उपजीविका नाटकांवर, आणि माझा चरितार्थहि नाट्यकलेवरच. तेव्हां नाट्यकलेंतील दोन दाक्षिणात्य या धंद्याच्या बाहेरील माणूस कोणी असता तर बरें झालें असतें. परंतु हल्लीं २।४ वर्षें याच धंद्यांतील मनुष्य अध्यक्षस्थानीं नेमण्याचा प्रघात पडला असल्यामुळें मीं आपली आज्ञा मान्य केली आहे. आजच्या दिवसाचें माहात्म्य व विशिष्टपणा म्हणून मी ' बादशहांस आयुरारोग्य प्राप्त व्हावें व ब्रिटिश सरकारचा महायुद्धांत जय व्हावा ' असा ठराव आपल्यापुढें मांडतों. हा ठराव आम्हांला यापूर्वी मान्य झालेला आहे व ब्रिटिश प्रजाजन या नात्यानें हें आपलें कर्तव्य आहे. काव्याचा मुख्य विषय संसार; समाजाचा, देशाचा

संसार कसा काय चालला आहे हें राजसंस्थेवरून कळतें. 'राजा कालस्य कारणम्' या न्यायानें राजा हा देशाच्या संसाराची खूण होय. 'बादशहा सुखी होवो!' असें ज्यावेळीं आपण म्हणतों त्या वेळीं 'बादशहांचें घराणें सुख भोगो' असा आपला ज्याप्रमाणें अर्थ असतो, तसेंच 'लोकसमाजांतील स्वराज्य-सत्तेचा अंश वाढीस लागो' असेंहि आपण चिंतितों.

तत्त्वज्ञानी हा सत्य जाणतो, परमेश्वरी आनंदांत तल्लीन होतो; पण तो वेदाभ्यासजड व 'विषय-व्यावृत्त-कौतुहल' असतो. तत्त्वज्ञान खुंटतें, तर्कशास्त्र कुंठित होतें, तेथेंहि कवीची प्रतिभा सत्यशोधन करते. हा कवि व तत्त्वज्ञानी यांमधील फरक होय! आनंद हा तुडुंब वाहूं लागला म्हणजे त्याला रसाची पातळ अशी 'वाहणारी' अवस्था प्राप्त होत असते. ह्या रसाचें कोणीहि व कितीहि जरी पान केलें तरी तो कमी न होतां वाढतच असतो. कवि हा स्वतः संसारांतील आनंद उपभोगून दुसऱ्याचा संसार आनंदमय करीत असतो.

राजसत्तेला व्यापून उरणारा कवि

कवि हे मुख्यतः संसाराभोंवतींच गुरफटलेले असतात. संसाराचें केंद्र म्हणजे राज्यव्यवस्था होय. राजाला कवि प्रिय असेल तर तो कवीला आश्रय देतो; पण तोच अप्रिय असेल तर तो कवीला घालवून देतो, त्याचीं पुस्तकें जप्त करतो. मी हा जो राजा शब्द वापरला आहे तो 'पंचमजॉर्ज' या अर्थी नव्हे, तर 'अधिकारी' या अर्थी आहे हें पक्के ध्यानांत ठेवलें पाहिजे. कवीचें जीवित राजसत्तेच्या मर्जीवर अवलंबून असतें. तिला एखादा कवि अप्रिय असला म्हणजे असें वाटूं लागतें कीं 'हा कवि बोकांडी बसणारा पिशाच्च आहे!' मग ती मांत्रिक बोलावते व कवीच्या नाकांत मिरच्यांची धुरी घालावयालाहि कमी करीत नाहीं. मी 'हा मिरच्यांचा धूर अनुभवलेला' मनुष्य आहें. कवीनें जवळ जावें व राजानें दूर सारावें अशी अप्रिय कवीची

स्थिति होते. मी राजा असतों तरी मलाहि एखादे वेळीं असेंच करावें लागलें असतें ! तेव्हां अमूक एकावर मी दोष ठेवूं इच्छित नाहीं. असे कांहीं राजकारणाचे प्रसंग येतात कीं त्यावेळीं कवीचीं कितीहि लाडकीं व मुख्य अस्त्रें असलीं तरी राजसत्तेच्या निर्घृण वृत्तीला तीं बळी पडतात. जेव्हां रुळ रस्त्यावरून फिरतो तेव्हां क्षुद्रांचा चुराडा व्हावयाचाच; यांत रुळाला दोष देण्यांत अर्थ नाहीं. वा रुळा, तूं केवढा हा भक्कम, तूं फार मोठा, अरेंहि म्हणून कांहीं उपयोग नाहीं. ही क्षुद्रकणांची परीक्षेची वेळ असते. राजाची परीक्षा ज्याप्रमाणें रणांगणावर त्याचप्रमाणेंच तांदुळाची परीक्षा उखळांत होत असते. मुसळाचे घाव बसत असतां जो तांदुळाचा दाणा अखंड राहील तोच तेजाला चढेल व त्याचेंच मोल वाढेल !

कवि हा कांहीं केल्या राजसत्तेच्या झाडाला सोडीत नाहीं, तो मांत्रिकाला जुमानीत नाहीं. त्याची प्रतिज्ञा असते कीं 'रसानें मी राजाला भिजवून टाकीन.' ब्रह्म जसें विश्वाला व्यापून दशांगुळें उरतें तसाच कवि हा राजसत्तेला व्यापून पुन्हां रंगभूमीवर प्रकट होतच असतो. रसामध्यें जो एकप्रकारचा वेग असतो त्यामुळेंच कवीमध्यें सामर्थ्य येत असतें. अधिकाऱ्यांना किंवा राजाला बरें वाटत असो वा नसो, आम्हीं कविराज सिंहासनाच्या वर, खालीं, बाजूला चोहोंकडे व्यापून रहातों. अर्थात् या प्रवृत्तीला अनुरूप असाच हा बादशहांच्या अभिनंदनाचा ठराव आहे.

रणभूमीचें सामर्थ्य

महायुद्धांत रणांगणावर तलवार चालवावी, पराक्रम गाजवावा, सरकारास मदत करावी, वीरांची ओझी उचलावीं, अशी इच्छा स्वाभाविकच वीरांची असते. या वीरांच्या कारभारांत नट, नाटककार, कवि, रसिक यांचें कांहीं काम नाहीं, फ्रान्सच्या रणांगणावर नाटकाचें प्रदर्शन फुकट जाईल, तुर्क–जर्मन हे गवयांच्या तानबाजीला झुगारतील, असा आक्षेप आम्हांवर येण्याचा

संभव आहे. कवींची गोष्ट सध्यां बाजूला टाका, पण इतर लोक तरी युद्धाच्या बातम्या मोठ्या प्रेमानें कां वाचतात ? 'युद्धस्य कथा रम्या' असें यावर उत्तर येईल. युद्धाची बातमी वाचण्याची ज्यांना चटक लागली त्यांना बारीक सारीक लढाईची, १०।१५ मागसें मेल्याची, बातमी ऐकून बरेंच वाटत नाहीं ! ५।२५ हजार लोक ठार झाले, पांचपन्नास तोफा डागल्या गेल्या किंवा राष्ट्रेंच्या राष्ट्रें बेचिराख झालीं, अशा बातम्या ऐकल्या म्हणजे वाचकाला बरें वाटत असतें ! युद्धकथेचा वाचक केवळ यमसदृश होत असतो ! ही मनुष्याची सहज अशी निर्घृण वृत्ति कां बरें ? आपली मंडईतून भाजी आणावी, खावें, प्यावें, बायकांमुलांमध्यें आनंदानें कालक्रमणा करावी, अशी कोणी वृत्ति धारण केली तरी सरकार त्याला लढाईची बातमी देतें ! सरकार व्याख्यानकार गांवोगांवीं पाठवितें. मेसापोटेमियांत अशी लढाई झाली, तसा जय झाला, हें कळवितें व लोकांत युद्धाविषयीं गोडी (Interest) उत्पन्न करतें, तें कां ? महायुद्धाच्या काळांत वृत्तिच शांत राहूं शकत नाहींत. रणभूमीच्या अंगीं संसाराकडून लक्ष खेंचण्याचें सामर्थ्य आहे.

रणभूमीचें सामर्थ्य परमेश्वरी सामर्थ्यापेक्षांहि मोठें आहे. परमेश्वरानें बायबल, गीता, वेद, निर्माण करून अनेक तऱ्हांनीं मनुष्यांना जागृत करण्याचा प्रयत्न केला, पण शेवटीं त्याला हात टेकावे लागले. आपल्या देशांतील संसारी लोकांची स्थिति अत्यंत निर्बुद्ध प्राणी जो गाढव—वाईट शब्दाबद्दल रागावूं नका, अलीक भाषा मानूं नका—त्याच्यासारखी झाली आहे ! या देशांतील ३३ कोटी दगडांना, बुद्धिहीन जनांना, गाढवांना, परमेश्वराच्या उपदेशानें कांहीं जागृति आली नाहीं. 'अडला नारायण गाढवाचे पाय धरी' या न्यायानें परमेश्वरानें हात टेकले तरी आम्हीं जागें

झालों नाहीं. ३३ कोटी लोकांची ही जडावस्था पाहिली कीं मनाला लाज उत्पन्न होते. जें परमेश्वराच्या उपदेशानें, लोटांगणांनीं झालें नाहीं तें आज यां रणांगणानें केलें आहे. आतां कोठें जगावरील या उंलाढाली पाहून आम्हीं जागे होऊं लागलों आहों.

कवि व वीरपुरुष

रणांगणांपासून जसा वीरवृत्तीचा उगम तशीच पुरुषार्थापासून, वीरवृत्तीपासून, राजवैभवापासून रसाची–काव्याचीहि उत्पत्ति आहे. आम्हां कवींच्या मागोमाग वीरपुरुष आणि वीरवृत्तींच्या मागोमाग आम्हीं, असा हा पराक्रम व रस यांमधील अन्योन्य संबंध आहे ! महायुद्धामुळें कवींच्या स्फूर्तीना एक प्रकारचा वेग उत्पन्न होत असतो !

माझा हिंदुस्थान, माझें महाराष्ट्र, वीरपुरुषांनीं केव्हां गजबजून जाईल, यश उज्ज्वल स्वरूपानें केव्हां वावरूं लागेल, अशी तळमळ कवींना लागून राहिलेली असते. 'कवी व वीर पुरुष' यांचा हा आधीं-मागूनचा परस्पर. पोषक चमत्कार पूर्वी महाराष्ट्रांत स्वराज्याच्या वेळीं दिसून आला. कवीचें राज्य व वीरपुरुषाचें राज्य महाराष्ट्रांत एकाच वेळीं नांदलें. नाटककाराच्या भोंवतीं जशा नटवर्गाच्या संस्था तशा या कवीच्या भोंवती हरिकीर्तनांच्या संस्था निर्माण झाल्या. हरिकीर्तनांचा पूर्वरंग धार्मिक, पण उत्तररंगांत मात्र एखाद्या वीर पुरुषाच्या पुरुषार्थाचा प्रसंग घेऊन तो हरिदास समजावून सांगतो. हरिदास हा आख्यानांतील सर्व पात्रांचीं–पुरुषांचीं–नायकांचीं–भाषणें स्वतःच व नटाच्या अभिनयानें बोलतो ! स्वराज्यामुळेंच ही हरिकीर्तन–संस्था महाराष्ट्रांत उज्ज्वल स्वरूपानें विनटली. ही संस्था इतक्या उज्ज्वल स्वरूपांत महाराष्ट्राबाहेर दिसत नाहीं. मद्रासला कथेंत मोरोपंताच्याच आर्या म्हणतात असें सांगतात ! मी एकदां नेपाळांत गेलों होतों, तेथें एकदां मला नाटकाला बोलावणें आलें. सूत्रधार हातांत मशाली घेऊन

नाचूं लागला तरी त्याचें लक्ष माझ्याकडे होतें. तो न समजेल असें कांहीं तरी मराठी बोलत होता ! इतकी आमची हरिकीर्तनाची संस्था परप्रांतींसुद्धां प्रिय आहे.

कालचे शास्त्री-हरिदास आजचे नाटककार-नट

या हरिकीर्तन संस्थेपासूनच नाट्यकलेचा महाराष्ट्रांत अभ्युदय झाला. पूर्वी जे पंडित, शास्त्री, कथेकरी होते तेच स्वराज्यकाळीं राजकारणांत पडले. रामशास्त्री इतके निस्पृह व विरक्त कीं घरामध्यें फक्त एक दिवसाची सामग्री ठेवावयाची, पण तेच राजकारण करीत होते. त्यांचा निस्पृहपणा एवढा कीं त्यांनीं स्वतःच्या संसारावर पाणी सोडलें. पण राघोबाला देहांत शिक्षा फर्माविली ! त्यावेळीं लोकांना शास्त्री लोक महाभारताचेंच शिक्षण देत. पुढें स्वराज्य गेलें. पूर्वीचीच संस्था, तेच शास्त्री, पुन्हां इंग्रजींत निराळ्या रूपानें पुढें आले. कृष्णशास्त्री, विष्णुशास्त्री यांनींच आपल्यापुढें बी. ए. एम. ए. पदव्या लावून लोकशिक्षणाचें काम अंगावर घेतलें. विष्णुशास्त्र्यांनीं न्यू स्कूल काढलें तेव्हां हेच हरिदास–पुराणिक तेथें गोळा झाले. त्याच प्रभावळींत रा. देवल प्रकट झाले त्या रामशास्त्र्यांच्याच स्वार्थत्यागानें व निस्पृहपणानें 'केसरी' काढला व चालविला. त्यांनीं सरकारवर स्पष्ट व निर्भीड टीका करून आपला निस्पृहपणा सिद्ध केला. तेच हे शास्त्री. टिळकांच्याच जवळचे आश्रित–पुराणिक पुढें नाटककार आत्मचरित्रपर बनले (गहिंवरानें उचंबळून व अस्पष्ट शब्दांनीं) पूर्वीच्या टिळकांच्या या आश्रित–पुराणिकांनीं 'केसरी' सोडल्यावर जायचें कुठें ? परिस्थितीप्रमाणें नाटककार व्हावें लागतें. हें सारें पूर्वसंस्थेला धरूनच आहे ! हे शास्त्री जसे पुढें नाटककार बनले तसे हरिदास नट बनले. सध्यांचे गंधर्व मंडळींतील हीरो हरिदासच होते. हें असेंच आहे. लोकांमध्यें मिसळून जागृति करावयाची ही महाराष्ट्राची पुरातन पद्धतीच आहे.

वीर वृत्तीशीं तादात्म्य पावणारा तोच कवि

'दुनियेचें कल्याण मी करीन' अशी वीरवृत्ति ज्यांच्यांत अहि त्यांची कीर्ति कवींनीं गायची नाहीं, तर काय डुकरांची गावयाची? संसारी जनास कर्मयोगाला, प्रवृत्त करणें हें वीरांचें काम, हें कवींचें काम!— राष्ट्राला सुखी करीन हा पीळ वीरांना पडेल तेव्हां कवीच्या अंतःकरणांत कालवाकालव होईल, तो काव्य बोलेल, तो रस ओतेल, तो नाटक गाईल! काममोहित क्रौंचमिथुनाला मारतांना पाहून वाल्मीकिसारख्या आद्य कवीच्या तोंडून काव्यरूपानें शापवाणी प्रकट झाली 'मा निषाद प्रतिष्ठा त्वमगमःशाश्वतीःसमाः ॥ यत्क्रौंचमिथुनादेकं अवधीः काममोहितं ॥ ही ती शापवाणी होय. संसारसुखाची राखरांगोळी झालेली पाहून शापवाणी उच्चारणें कवीला अपरिहार्य आहे. कवि शाप बोलेल, तोच वीरवृत्ति ओळखील. स्वराज्यामध्यें महाभारत जास्त उमजत होतें. आज इतकें भारत सवंग पण तें कळतच नाहीं. तपः सामर्थ्य वाढवा, पुरुषार्थाकडे दृष्टि लावा, म्हणजे काव्यरस सहज प्रकट होईल. ज्याचें कीर्तनविषयाशीं तादात्म्य होतें तोच उत्तम हरिदास असें रामदासांनीं सांगितलें आहे. ज्याचें राष्ट्राच्या वीरवृत्तीशीं, परम पुरुषार्थाशीं तादात्म्य झालें तोच उत्तम नाटककार होतो, व जो स्वतःच्या भूमिकेशीं तादात्म्य पावला तोच उत्तम नट होतो. हा कर्मयोगाचा संप्रदाय महाराष्ट्रांत फार पुरातन आहे. महायुद्धानें राजकीय वातावरण धडाडून पेटलें आहे, हाच काळ कवींना अनुकूल, वीरांना अनुकूल, राष्ट्रभाग्योदयाला अनुकूल होय. याच काळीं महाभारत समजेल. हाच काळ नटांना व नाटककारांना हितावह आहे. महाराष्ट्राचें, हिंदुस्थानचें, हित व्हावें म्हणून आम्हींहि पहिल्या प्रथमच बादशहांना आयुरारोग्य चिंतिलें बादशहांना यशःप्राप्ति होवो अशी प्रार्थना केली."

कीर्तन संमेलनापुढील भाषण

१९२१ सालीं नाशीक शहरीं भरलेल्या पांचव्या कीर्तन संमेलनाचे अध्यक्ष या नात्यानें कै. काकासाहेब खाडिलकर यांचें भाषण झालें त्याचा वृत्तांत कीर्तन मासिकाच्या दुसऱ्या वर्षाच्या पांचव्या अंकांत आलेला होता. तो वृत्तांत पुढें दिला आहे--

प्रास्ताविक

प्रथमतः श्रीहरि-चरणाला नमन करून, या संमेलनाचें अध्यक्षस्थान आपण मला दिलें, याबद्दल मी आपले आभार मानतो. आपण शेंसवाशें वर्षें कीर्तनस्वरूपीं हरीचें रूप धारण करणारे महंत येथें जमला असतां मजसारख्यानें अध्यक्ष होणें उचित नाहीं. आपण परमेश्वराचें घरीं वावरणारे हरीचे दास आहांत व मी भूमितलावर वावरणारा एक संसारी मनुष्य आहें. हें जरी खरें तरी मीं केवळ आपलपोटेपणानें हें स्थान स्वीकारलें आहे. कांहीं तरी सेवा होईल या बुद्धीनें माझी पात्रता नसतांहि मीं हें स्थान स्वीकारलें आहे. नाशिक क्षेत्र, श्रीरामसीता-सान्निध्य, गोदावरीतटाक व सिंहस्थ पर्वणी, हा योगायोग अपूर्व असल्याकारणानें गोदावरीचें स्नान करावें व पातकें टाकून देतां यावींत या बुद्धीनें मी येथें आलों. रामचरण शितोष्णपमा समजतात. पण हरिदास बोलते चालते देवदूत आहेत. त्यांना आपल्या पापाचे वाटेकरी करून आपला बोजा त्यांजवर लादावा असें मला वाटलें! आपण परमेश्वराच्या घरचे दूत असल्यामुळें हा बोजा संभाळून मजवर अनुग्रह कराल अशी आशा आहे. नागपूरच्या काँग्रेसचे वेळीं स्वागत-मंडळाच्या उपाध्यक्षांनीं मला अध्यक्ष होण्याची आज्ञा केली व मीहि वरील हेतु मनांत धरून हपापलेल्या वृत्तीनें हो म्हटलें. तरी पण

औंधकारांसारखे अध्यक्ष आपणांस लाभले असते तर बरें झालें असतें. कीर्तन–संमेलनांचा हा पांचवा प्रसंग आहे. संमेलनाच्या पूर्वीच्या अध्यक्षांकडे लक्ष दिलें असतां, लो. टिळक व त्यांच्या सभोंवतींच्या मंडळींपैकीं अध्यक्ष निवडण्याचा आपला परिपाठ दिसतो, व त्याच अनुसंधानानें माझी निवडणूक आपण केली असावी असें मला वाटतें. नाटकी विषयांशीं माझा विशेष संबंध असतो, एवढ्या करितां मला हें स्थान द्यावयास नको होतें. तरी पण माझी निवड करून गोदावरीच्या तीरीं सर्व पातकें धुवून टाकण्याची मला संधी दिलीत यावद्दल मी आपला अत्यंत आभारी आहें!

आसन विधाप्रमाणें काम

नागपुरास अशा संमेलनास सुरवात होऊन लो. टिळक व डॉ. मुंजे यांनीं आपणांस प्रोत्साहन दिलें. लो. टिळकांची गोष्ट सोडली तर त्यांच्या सभोंवतींच्या इतर मंडळींना अध्यक्ष निवडण्यांत आपला कांहीं हेतु दिसतो. राष्ट्रीय सभेसारखाच अशा संमेलनाचा एक आसन–विधि असतो असें मला वाटतें. हीं संमेलनें कशीं भरवावीं, त्याविषयीं नियम कोणते आहेत, हें समजून संघटित कार्याची दिशा सांपडावी व कार्य सुकर व्हावें या हेतूनेंच आपण माझी निवड केलेली दिसते व मीहि या आसन–विधी–प्रमाणेंच काम करणार आहें.

हरिदास व राष्ट्रीय कार्यकर्ते

हरिदास व राष्ट्रीय सभेचे चळवळे लोक यांत एक प्रकारचें साम्य आहे. राष्ट्रीय सभेंत कार्याची दिशा ठरविणारे महात्मे व त्यांच्या भोंवतीं गोळा होणारे मजसारखे चळवळे लोक असतात. धर्मासंबंधीहि तीच स्थिति आहे. महंत, साधु वगैरे परमेश्वर–कृपेचे सांटे यांचें काम निराळें व त्यांच्या चेल्यांचें कार्य निराळें असतें. कीर्तन संप्रदायांतहि अशी महंत मंडळी आहेत, पण हा जो २००–३०० हरिदासांचा पसारा आहे हा धार्मिक

चळवळ्यांचा होय. हरिदासांसारखे धार्मिक चळवळे व मजसारखे राजकीय चळवळे या दोघांनीं एकत्र होऊन एकमेकांची अडचण लक्षांत घेऊन उभयतांचा मार्ग सोपा करणें हेंच आपणांस उचित होय.

मुंबईच्या कीर्तन–संमेलनाच्या सहाव्या ठरावाकडे लक्ष दिलें असतां, वृत्तपत्रकार, लेखक व वक्ते यांनीं ह्या संप्रदायाकडे लक्ष पुरवून ठिकठिकाणीं त्यांचा उल्लेख करावा व उत्तेजन द्यावें हाच त्यांतील हेतु दिसतो. आह्मां राजकीय चळवळ्यांचीहि तीच स्थिति आहे. आमचा उल्लेख करावा, उत्तेजनपर दोन शब्द बोलून लोकाश्रय मिळावा व त्यानें कार्यास हुरूप यावा हाच आमचाहि हेतु असतो. दुसराहि एक महत्त्वाचा उल्लेख त्या ठरावांत आहे. कीर्तनकारांची स्थिति खालावलेली आहे त्यास उपाय काय याची चर्चा करून त्या स्थितीचें निदान करावें हीच ती महत्त्वाची गोष्ट होय. माझ्या मतें याचीं तीन कारणें दिसतात. पहिलें कारण सुशिक्षितांचें औदासिन्य, दुसरें रुचिवैचित्र्य व तिसरें दानपद्धतीसंबंधीं अनास्था हें होय. या कारणांकडे व १५–२० वर्षांपूर्वीच्या राजकीय चळवळीकडे पाहिलें असतां त्या वेळेलाहि आह्मांला असेच उद्‌गार काढावे लागत असत. अंतःकरणाला पीळ पडून राजकीय प्रगतीकरितां खटपट करावी, पण लोक मात्र उदासीन. १९०८ सालींहि हीच स्थिति होती. स्वदेशीचा उपदेश ऐकावा पण अंमलांत मात्र आणूं नये अशी स्थिति होती.

लोकांचे औदासिन्य

आजहि महात्माजींचा वकील–वर्गावर रोष झाला आहे याचें कारण त्यांची उदासीनता होय. इंग्रजी शिक्षणानें तयार केलेला माल (हा सुशिक्षितांचा वर्ग) देशकार्यांत नेहमीं उदासीन असतो. या बाबतींत आमची व तुमची स्थिति सारखीच आहे. ज्या महाराष्ट्रामध्यें देशकार्यार्थ हजारों लोक

प्राण देण्यास तयार असत तेथेंच आज उदासीनता पसरलेली दिसत आहे. पानिपतचे लढाईचे वेळीं दीड लाख बांगडी फुटली असें म्हणतात. एवढी प्रचंड शक्ति ज्या महाराष्ट्रांत नांदत होती त्याच महाराष्ट्राला जागे करतां करतां लोकमान्य टिळकांना जन्मभर हाडांचीं काडें करावीं लागलीं! याचें कारण येवढेंच कीं, लोकांचीं रुची पालटली. लोकांची द्रव्य देण्यास तयारी नाहीं. तुह्मी पैसे न मागतां स्वार्थत्याग करा, त्यास त्यांची हरकत नाहीं! याचें कारण लोकांची प्रवृत्ति बदलली, दानपद्धतींत फरक झाला.

हरिदास हे परमेश्वराचें स्वरूप समजून सांगणारे व परमेश्वराविषयीं प्रेम उत्पन्न करणारे संत होत. गेलीं १५० वर्षें इंग्रजी शिक्षणानें व या राज्ययंत्रानें आमच्या धार्मिक कल्पना तोडण्याचें काम केलें आहे. या अवधींत शाळामास्तर, प्रोफेसर, पुस्तकें हीं सर्व ह्या प्रेमाखालीं आग पेटवीत होतीं. धर्म जाळणारांच्या हातांत गेलीं १५० वर्षें हिंदुस्थानच्या अभ्युदयाचा अर्धा भाग आहे. शिक्षण, व्यापार, कलाकौशल्य यापैकीं कोठेंहि दृष्टिक्षेप करा. आपला अभ्युदय इतरांच्या हातींच आहे. राज्यकर्त्यांची शक्ति मोठी, त्यांचें तत्त्वज्ञान उज्वल, त्यांचा धर्म चांगला, असा या असत्संगानें सुशिक्षितांच्या मनावर अनिष्ट परिणाम झाला होता. अशा स्थितींतहि आमचें तत्त्वज्ञान शिल्लक आहे हेंच आश्चर्य! त्याच्यांत असें ओज व सत्यत्व आहे कीं, विकट परिस्थितीशीं टक्कर देऊनहि तें जिवंत राहूं शकतें.

कीर्तनकारांत परमेश्वरी निष्ठा प्रकट होत असते. भक्तीची भावना व धर्माविषयीं आस्था स्त्रियांमध्यें विशेष जागृत असते हें कोणीहि कबूल करील. ही आस्था जर नसती. तर महाराष्ट्रांत आज हरिदासांची जी २००–३०० घराणीं दृष्टीस पडतात तींहि नामशेष झालीं असतीं. गेलीं १५० वर्षें अशा खालावलेल्या स्थितींतच काढावीं लागलीं.

पालटलेली स्थिति

गेल्या ४–५ वर्षांपासून मात्र जगाची स्थिति पार पालटली आहे व हा योगायोग ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. परिस्थिति पालटली आहे, लोक मार्ग शोधूं लागले अहेत, विचार करूं लागले अहेत. लोकांत चलनशक्ति जागृत झाली आहे. भक्तांचा भाव व देवाची इच्छा कालालाहि आटोपणें शक्य नाहीं. हे दोन ओघ कसे उत्पन्न झाले व ते एकमेकांकडे कसे वाहूं लागले अहेत याकडे लक्ष द्या, हा प्रेमाचा ओघ जाळण्याचा खटाटोप करणारांची आज परमेश्वरानें काय स्थिति केली आहे याकडे लक्ष द्या. आज त्यांना अभ्युदयाच्या प्रसंगीं उपयोगी पडत नाहीं हें रशियाच्या व ऑस्ट्रियाच्या सध्यांच्या स्थितीवरून व्यक्त होत आहे. ख्रिस्ती धर्माचे पोप काय म्हणतात त्याच्याकडेहि लक्ष पुरवा. देवानें मनुष्याकरितां अन्न निर्माण केलें, पण आज ऑस्ट्रियांतील लोकांना त्यांच्या पाश्चिमात्य सुधारणेनेंच अन्नान्न स्थितीस पोहोचविलें आहे. ऑस्ट्रियांतील लोक आज स्वातंत्र्य देऊन पोटाला मागत आहेत. हीच त्या ख्रिस्ती धर्माची महति. उच्च नीच भावना नाहींशा करणारें बोलशेविझमचें भूत त्यांच्या समाजरचनेच्या मानगुटीस बसून, उघडी नागडी झालेली ती समाजरचना आज जगापुढें वावरत आहे. ही समाजरचना परमेश्वरी कशी असूं शकणार ? जें भक्तानें भाविलें तें परमेश्वरानें आपणची केलें. (टाळ्या) या रामदासांच्या उक्तीची सत्यता आज आपणाला पटत आहे. सुशिक्षितांना युरोपियनांचा पेहराव, आचार, विचार कशास हवा, असा प्रश्न करून कांहीं दिवसांपूर्वी हरिदासांनीं जर राष्ट्रीय सभेला वेढा दिला असतां तर ज्या सुशिक्षितांनीं तुम्हांला वेडयांत काढलें असतें, त्याच सुशिक्षितांची आस्था आतां तुम्हांकडे वळूं लागली आहे. तुमच्या सिद्धांतांत काय जादू आहे हें ते शोधूं लागले आहेत. त्यांचीं तोंडें घराकडे वळलीं आहेत. लवकरच आम्हांला हें गूढ सांगा असा ते

आग्रह धरतील. ५।१० वर्षांत ही गोष्ट घडलीच पाहिजे. एका पिढींत हीं फळें आपल्या पदरांत पूर्ण पडतील अशी तयारी आम्हीं केली पाहिजे. परमेश्वर काम करून चुकला आहे. तुमचें कार्य मात्र राहिलें आहे.

लोकाभिरुचीला नवें इष्ट वळण

लोकांची रुची बिघडली होती, पण ती आतां पुनः शुद्ध स्वरूपाकडे वळली आहे. परमेश्वरानें तें विघ्न दूर केलें आहे. आपलें सामर्थ्य वाढवा, लोकसंग्रह करा, आपला भक्तिभाव सर्वांना मुबलक मिळेल, सुशिक्षित येतील, कीर्तने ऐकतील हा हव्यास धरा व त्याच मार्गास लागा. या मार्गास अनुरूप असें वर्तन करा. श्रीसमर्थ रामदास हे आपल्या सांप्रदायाचे मोठे प्रवर्तक होते. त्यांचें सांगणें ध्यानांत ठेवा. प्रबोधशक्ति स्वाधीन करून घेतली पाहिजे. बहुतांचीं मनोगतें हातीं घेतलीं पाहिजेत. सुशिक्षितांचें मनोगत जाणलें पाहिजे व मनोगत ओळखून कार्याची दिशा ठरविली पाहिजे. लोकीं जें केलें तें यानें उलथविलें. आपल्या देवता लोकांच्या मंदिरांत स्थापन करणें अशी एक इंग्रजी म्हण आहे. लोकीं जें तर्किलें तें दाविलें निष्फळ करूनी. सुशिक्षितांच्या मनांत उत्पन्न झालेल्या भावना निष्फळ करून दाखविल्या पाहिजेत. व 'आमच्या कुळीं असे समर्थ। आमच्या कुळीं असे परमार्थ॥' या समर्थांच्या उक्तींतील मर्म ओळखून आपल्यांतील आकर्षणशक्ति या हरीची सेवा करण्याकरतांच प्रकट केली पाहिजे. या सेवेचा अभाव म्हणजे अधःपातच होय. कीर्तन ही नवविधा भक्तींतील दुसरी भक्ति आहे. दास्य ही सातवी भक्ती आहे. परमेश्वराचें हें प्रेमाचें दास्य पत्करून सेवा करतांकरतांच 'हे यादव हे सखा इति' या उक्तीप्रमाणें सखा या पदवीस मनुष्य प्राप्त होतो. सर्वस्वाचा त्याग करून देवाचें दास्य केलें पाहिजे. म्हणून प्राणाचें पतनहि करावें लागलें, जिवलगांची तुटी झाली तरी ती पत्करून परमेश्वराचें कार्य करावें (दुष्टांचा) दुर्गुणांचा

संहार करणें व साधूंना (सद्गुणांना) आधार देणें हें परमेश्वराचें कार्य आहे. रामदासांच्या समुदायांचा हव्यास धरा व प्रबोधन शक्तीनें सुशिक्षितांचीं मनोगतें हातीं घेऊंन कार्यास लागा.

सुशिक्षितांचीं मनें काबीज करण्याचें शस्त्र

आज हरिदासांनीं सुशिक्षितांना लहान मुलें समजून त्यांच्या चालीनें चालावें व त्यांच्या बोलीनें बोलावें. दीडशें वर्षें इंग्रजी शिक्षणानें लागलेली सुशिक्षितांची बोगडी संवय हरिदासांनीं समजून घेतली पाहिजे. बहुतांचीं मनोगतें हातीं घेतल्याशिवाय हरिदासांना कार्य करून दाखवितां येणार नाहीं. सुशिक्षित लोक राजकारणाचा जो विटीदांडूचा खेळ खेळत आहेत त्यांत हरिदासांनीं प्रत्यक्ष भाग जरी न घेतला तरी सावलींत बसून खेळ कसा चालला आहे, कोणाची सरशी होत आहे हें कौतुकपूर्ण दृष्टीनें मात्र पाहिलें पाहिजे. राजकारणाविषयीं उदासीन राहून मात्र चालणार नाहीं. हरिदासांनीं दुसऱ्या धर्माच्या हालचालीकडेहि सेनानायकासारखें लक्ष पुरविलें पाहिजे. दक्षता राखली पाहिजे. रामदास स्वामींनीं शिवरायाला सांगितलें होतें कीं तुला परमेश्वराची मदत आहे पण सावधपणा ठेविला पाहिजे. चतुरपणानें सुशिक्षितांचें मनोगत ओळखून त्याला वेसण घालून परमेश्वरी कार्याकडे लावणें हेंच हरिदासाचें कार्य आहे. बुद्धी ही मनाच्या वरची स्थिति आहे. इंद्रियांमधला सापेक्षपणा ती पाहात असते. मनाच्या ठिकाणीं सर्व शक्ति आहे. ' इंद्रियाणां मनश्चास्मि ' असें गीतेंत सांगितलें आहे. मन वाईटहि आहे, त्याप्रमाणें चांगलेंहि आहे. मनाच्या यंत्रावर आरूढ होऊनच परमेश्वर कार्य करीत असतो असें गीतेंत सांगितलें आहे. भक्ताच्या मनांत शिरण्याचा मार्ग सांपडावा म्हणून परमेश्वर भक्ताभोंवती घिरट्या घालीत असतो याचा विचार करा. सूक्ष्म विचार करा, एकांत सेवा, अखंड चालना करा, परमेश्वर बुद्धीला केव्हां तरी गति देईलच. बुद्धि एकाग्र होऊन प्रफुल्ल

होते. बुद्धि प्रफुल्ल झाली कीं तिथें परमेश्वर शिरलाच म्हणून समजा; कुशाग्र बुद्धीचें महत्त्वहि एवढ्याचकरितां आहे. एकदां बुद्धि कुशाग्र झाली, तेथें परमेश्वराचें अधिष्ठान झालें कीं चांगलें बोलावें कसें, लिहावें कसें हें सर्व सुचतें. सुचलें सुचलें म्हणजे काय ? तें कसें सुचलें ? कोठून सुचलें ? पाश्चात्यांनीं अजून या सुचण्याची उपपत्ति लाविली नाहीं. सुचलें म्हणजे काय झालें हें त्यांना सांगतां येणार नाहीं. हें आपल्या तत्त्वज्ञानांत आहे. सुचलें म्हणजे परमेश्वरानें प्रेरणा केली. लोकांची मनोगतेंहि आकर्षून घेण्याची आपल्यांत शक्ति उत्पन्न होते. लोकांचीं मनोगतें कशीं आकर्षण करावीं हें शिकायचें असल्यास लोकमान्य टिळकांचा गीतारहस्य ग्रंथ पहा. पूर्वींचेच विचार नवीन शब्दांनीं कसे नटवावे हें व त्याचप्रमाणें भाषेचा तार्किकपणाहि त्यांत पूर्ण दाखवून दिला आहे. श्री शिवरायाच्या काळास जसा दासबोध तसाच गीतारहस्य हा ग्रंथ आधुनिक काळास अनुसरून आहे. हें लक्षांत बाळगून त्याचा अभ्यास करा. तें शास्त्र सुशिक्षित लोकांचीं मनें वळविण्यास फार उपयोगी पडेल.

मनाला आकर्षून घेण्यासाठींच गायनाचें कीर्तनांत महत्त्व आहे. गाण्याचा महिमाच असा आहे कीं तें तार्किकांनाहि आपणाकडे ओढून घेतें, गायनाच्या केवळ कलेकडेच लक्ष पुरवून कलावान होऊन मात्र राहूं नका.

कीर्तनकारांच्या संप्रदायाचे आद्य प्रवर्तक हे वीणा हातीं घेऊन गात असत. गायनाचा महिमा समजणें निराळें व गाणें निराळें. हरिकथा ही गावयाची असते. मनांत आनंदाच्या उर्मि उत्पन्न होतील तेव्हांच आपण गातों. तो प्रहर्ष, तो अनुराग गायनांत असल्याशिवाय गायन मधुर लागणार नाहीं. वेद–वाक्यसुद्धां नुसतें म्हणण्यापेक्षां गाइल्यानें अधिक प्रिय वाटतें. वेदानां 'सामवेदोऽस्मि' वेदांचा मी सामवेद आहें असें भगवंतांनीं

सांगितलें आहे. या वाक्यावरील गीतारहस्यांतील टीका आपण अवश्य वाचावी म्हणजे गायनाला प्राधान्य कां आहे हें समजेल.

सुशिक्षितांवरोवर चालावें कसें, वोलावें कसें हें रामदास स्वामींना विचारा. 'मुख्य हरिकथा निरूपण। दुसरें तें राजकारण॥' सुशिक्षितांची ही दुसरी चाल ओळखली पाहिजे. या मुलांवरोवर आपण खेळलें पाहिजे. अंगणांत चाललेला हा खेळ सावलींत वसून पाहिला पाहिजे, नाहींतर आपलें पतन होईल. मुलांचें ऐकणें, त्यांचे विचार नापसंत असले तरी समजून घेणें हें कार्य आपण केलें पाहिजे. अंगणांत खेळत असलेली सुशिक्षित मंडळी आपणाकडे पाहतील असे वागा.

या सर्व गोष्टी नीट लक्षांत घेऊन आपण परमेश्वराचें अव्याहत कार्य चालवलें तर आपणास परमेश्वर खास यश देईल. आज आमच्या कोणी पायां पडतन्न नाहीं अशी तुमची तक्रार आहे. पण याच पद्धतीनें आपण सतत कार्य चालू ठेवल्यास आपल्या पाया पडण्यास फार लोक येतात व त्यामुळें त्रास होतो अशी तक्रार करण्याची आपल्यावर पाळी येईल! (टाळ्या)

नागपूर साहित्य संमेलनाचें अध्यक्षीय भाषण

नागपूर येथें महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचें अठरावें अधिवेशन ता. २५ डिसेंबर १९३३ रोजीं भरलें होतें. त्यावेळीं श्री. कृ. प्र. उर्फ काकासाहेब खाडिलकर यांनीं अध्यक्ष या नात्यानें जें भाषण केलें तें पुढें दिलें आहे.

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः । भद्रं पश्येमाक्षभियजत्राः ॥
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवांसस्तनूभिः । व्यशेम देवहितं यदायुः ॥
भद्रं नो अपि वातय मे मनः ॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

स्वागताध्यक्ष कुलगुरु श्री. भवानीशंकर नियोगी, संमेलन प्रतिनिधी, व मराठी भाषेचे अभिमानी बंधु भगिनींनों, नागपूर येथील महाराष्ट्र साहित्य-संमेलनाच्या १८ व्या अधिवेशनाचें अध्यक्षस्थान मला देऊन आपण माझा जो बहुमान केला त्याबद्दल मी आपला फार आभारी आहें. आपलें आमंत्रण स्वीकारतांना , स्वीकारल्यानंतर आतांपर्यंतच्या वेळांत, आणि आपल्या सेवेस आरंभ करीत असतांहि मनाचा भिऱ्हेपणा सुटला नाहीं व सुटत नाहीं. ह्या परिषदेच्या अध्यक्षाचें काम करून मी आपणांस प्रसन्न करूं शकेन असें माझें मलाच वाटत नाहीं. आपणास मी प्रसन्न करूं शकलों नाहीं, तरी मराठी भाषेच्या सेवेच्या आपल्या पराक्रमांत माझा अपशकून मी होऊं देणार नाहीं. एवढी खबरदारी मला दोनतीन दिवसांत घेतां आली तरी मी स्वतःस भाग्यवान समजल्यावांचून रहाणार नाहीं. माझ्यामागें गेल्या तीस चाळीस वर्षांतील निरनिराळ्या प्रकारच्या उद्योगांचीं बरीवाईट ओझीं आहेत आणि ह्यांतील कांहीं कांहीं ओझीं फार जड असून सोबतीच्या संतांच्या पाठीवर तीं लादल्याशिवाय मला कोणताच मार्ग पाय न अडखळतां

किंवा ठेंच न लागतां आक्रमितां येत नाहीं. माझी स्वतःची दुबळेपणाची अशी स्थिति असल्यामुळें, दुसऱ्याला त्रास द्यावयास बाहेर जा कशाला, अशा तऱ्हेचा घरकोंबडेपणा मला स्वीकारावा लागत आहे; पण इतिहास-प्रसिद्ध भोसल्यांच्या नागपूरचे लोक वीरवृत्तीचे असल्यामुळें नागपूरच्या कर्तबगारीवर भिस्त ठेवून, माझ्यांतील दोष आपण सहज लीलेनें खालीं दडपून टाकाल आणि संमेलनाचें कार्य निर्विघ्नपणें आपण तडीस न्याल, असा मला पूर्ण भरंवसा वाटत आहे. आपण कर्ते आहांत, तेव्हां माझ्यांतील न्यून भरून काढून माझा गबाळी अव्यवस्थितपणा सहज एका बाजूला कोणाच्या लक्षांत येतो न येतो तोंच आपण सारून टाकावा, अशी प्रारंभीच आपणाला माझी नम्रपणाची विनंति आहे. हें काम करण्यास आपण समर्थ आहां; आपला पूर्वीचा इतिहास तसा आहे, आपली तडफहि तशीच आहे, आणि कार्यास एकदां वाहून घेतलें म्हणजे कांहीं झालें तरी मागें फिरावयाचें नाहीं असा आपला बाणा आहे.

नागपूरचें महत्त्वाचें केंद्रस्थान

नागपूर–वऱ्हाड म्हणून मराठी भाषेचा जो प्रांत समजला जातो तो प्रांत संस्कृत भाषेंतील कांहीं प्रसिद्ध ग्रंथकारांची जन्मभूमि ह्या नात्यानें पवित्र आहे, इतकेंच नव्हे तर पुराणांतील कांहीं प्रसिद्ध राजघराण्यांचें निवासस्थान म्हणूनहि नामांकित आहे. संस्कृत भाषेस ह्या प्रांतानें जशी मदत केली आहे तशीच मदत 'प्राकृत महाराष्ट्री' भाषेसहि केली. पाली, अर्धमागधी व शूरसेनी ह्या प्राकृत भाषांचे प्राकृत महाराष्ट्राशीं संमेलन साहजिकपणें नागपुरांत होतें, आणि त्याच प्राकृत भाषांचे अपभ्रंश होऊन आस्ते आस्ते बनलेल्या हिंदी, बंगाली व मराठी भाषांचें संमेलनहि नागपुरांत केंद्रस्थान ह्या नात्यानें झालेलें आहे. मराठेशाहींतील नागपूरचा प्रचंड उद्योग, मराठीला पूर्वेस कलकत्त्यांतील बंगालीजवळ नेऊन ठेवण्यास आणि

हिंदी व मराठी यांना एकमेकांशी सलगीनें मिसळून टाकण्यास कारणीभूत झालेला असल्यामुळें, नागपूरला मराठी भाषेच्या दृष्टीनें ग्वालेरहून अधिक महत्त्व आहे. अशा महत्त्वाच्या ठिकाणीं मराठी भाषेंत अति चपलतेनें मुलुखगिरी करणारा एखादा धाडसी लेखक अध्यक्षस्थानीं असता तर अधिक बरें झालें असतें. मुंबई शहरांत मराठी बोलणारांची संख्या सर्वांत जरी मोठी आहे आणि मुंबई शहर जरी महाराष्ट्राचा भाग म्हणून गणलें जात आहे, तरी मराठी भाषेला शहराच्या कर्तबगारींत आणि लौकिकांत कांहीं मान नाहीं. दुबळ्या व हलक्या स्थितींत आम्ही मराठी लेखक तेथें आहों. आमची भाषा म्हणजे ताटाखालच्या मांजराची भाषा मुंबईस आहे. मुंबई शहर पूर्णपणें इंग्रजी भाषेच्या घशांत उतरलेलें आहे. कोणत्याच देशी भाषेला स्वतंत्रपणें मिरविण्याची पदवी नाहीं. मुंबई शहर 'कॉस्मापॉलिटन' होऊन चुकलें आहे. मोडकें तोडकें सदर फाटर इंग्रजी येत असलें म्हणजे मग तो चिनी असो, इटालियन असो, सरहद्दीवरला पठाण असो, बंगाली असो, किंवा मद्राशी असो, मुंबईस त्याला आपापल्या कर्तबगारीप्रमाणें, एक दिडकीची कोथिंबीर विकत घेण्यास किंवा विकण्यास, दहा वीस लाखांचीं मोतीं खरेदी करण्यास किंवा बाहेरगांवीं पाठविण्यास, आणि पांच पन्नास लाखांच्या गिरणीचा कारभार थाटण्यास किंवा एकदम बंद पाडण्यास, मराठी किंवा गुजराथी भाषेची क्षणभरहि जरूरी लागत नाहीं. तीस चाळीस वर्षांपूर्वी देशी भाषांना धाब्यावर बसविणारी म्हणजे 'कॉस्मापॉलिटन' मुंबई नव्हती. तीस चाळीस वर्षांपूर्वी कांहीं कांहीं बाबींतील प्रत्यक्ष अनुभव आज आठवून डोळ्यापुढें ठेवला आणि आजची मुंबई शहरांतील देशी भाषांची गुदमरलेली स्थिति पाहिली म्हणजे नागपूर–वऱ्हाडकडे पळून जावें असें मुंबईत असतांना मनांत आल्यावांचून रहात नाहीं. दोन चार दिवसांपुरतें तरी आपण मला मोकळ्या हवेंत येऊं दिलें आहे, हा आपला मजवर प्रसादच झालेला आहे.

नागपूरचें मराठी विद्यापीठ

पुण्या-मुंबईच्या बाजूला मराठी युनिव्हर्सिटीच्या गोष्टी कानावर येत असतात. पारिभाषिक शब्दकोश साहित्य परिषदेनें तयार करून ठेवला आहे; शास्त्रीय पुस्तकें लिहिण्याची कसरत झपाट्यानें चालू आहे; टिळक विद्यापीठानें उच्च दर्जाच्या परीक्षेकरितां मराठी भाषेंत ग्रंथांची कशी तयारी सहज करतां येईल त्याचा स्तुत्य उद्योग गेलीं दहा बारा वर्षें फार दक्षतेनें केला आहे; मुंबई युनिव्हर्सिटीच्या कांहीं भागांवर मराठी भाषेंत लिहिलेल्या पाट्या लावल्याबरोबर एकदम दुसऱ्या क्षणाला पुण्यास मराठी विश्वविद्यालय कसें निर्माण होऊं शकतें याचें मोजमाप घेण्यांत आलेलें आहे. सर्व तयारी आहे, पण मराठीच्या जेवणाची घंटा कांहीं केल्या तेथें वाजत नाहीं. हातांत दोरी धरून मोठ्या चतुराईनें घंटा वाजविण्याचा प्रयत्न झाला; पण अन्न शिल्लक राहिलेलें नाहीं असा अनुभव आला. युनिव्हर्सिटीच्या दृष्टीनें विचार करतां आपण नागपूरचे लोक अधिक भाग्यवान् आहां; दहा पंधरा वर्षांनीं केव्हांतरी पुण्यास मराठी युनिव्हसिटी होण्याच्या अगोदर मराठी-हिंदी भाषांची युनिव्हर्सिटी नागपुरास दृष्टीस पडेल, आणि हल्लींच्या नागपूरच्या युनिव्हर्सिटीचें स्वतंत्र अस्तित्व नागपुरास दृष्टीस न पडतां प्रमुख भाषेचा मान इंग्रजीकडून जाऊन मराठी व हिंदी या दोन देशीं भाषांकडे आपोआप येईल, असा अंदाज आहे. मराठी भाषेला उत्तेजन देण्याच्या कामीं नागपूरची युनिव्हर्सिटी आज मुंबई युनिव्हर्सिटीच्या फार पुढें गेली आहे. युनिव्हर्सिटीचे कुलगुरु श्रीमत् भवानीशंकर नियोगी आज नागपुरांत मराठी साहित्य संमेलनास स्वागताध्यक्ष होऊं शकले आहेत. मजसारखा अध्यक्ष असतांना देशी भाषेच्या संमेलनास हजर राहण्याची विनंति मुंबई युनिव्हर्सिटीच्या बड्या कर्णधारांना कोणी केली तर, सरकार करीत आहे त्याहून अस्पृश्योद्धाराची अधिक चळवळ

करण्याची कोणती जरुरी आहे म्हणून विनदिक्कत सवाल टाकण्यांत येईल, असें मुंबई नागपूर ह्यामध्यें अंतर आहे. नागपूरची युनिव्हर्सिटी मराठी भाषेला जो मान देत आहे आणि मराठी भाषेचें संमेलन पार पाडून नेण्यास स्वागताध्यक्ष या नात्यानें जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेण्यास ज्या हौसेनें कुलगुरु श्री. नियोगी पुढें आले आहेत तो मान व ती हौस म्हणजे मराठी युनिव्हर्सिटीची मुहूर्तमेढ इतर ठिकाणांहून येथें अगोदर रोवली जाणार अशी प्रसादचिन्हेंच झपाटयानें आँपणाकडे धावत येत असलेल्या शुभ कालाचीं आज प्रत्यक्ष दिसूं लागलीं आहेत!

मराठी भाषेचे सेवेकरी

बंधुभगिनींनो, मी आपल्यापुढें अवलोकनाकरितां गेल्या बारा महिन्यांतील प्रसिद्ध झालेल्या कांहीं प्रमुख पुस्तकांची यादी या भाषणास जोडलेल्या परिशिष्टांत ठेवीत आहे. ह्या यादीतील सर्व पुस्तकें विकत घ्यावयाचीं म्हणजे जवळ जवळ शंभर रुपये खर्च करणें होय. शालोपयोगी क्रमिक पुस्तकें आणि पूजेसाठीं किंवा पठणासाठीं लागणाऱ्या धार्मिक पुस्तकांच्या पुनरावृत्त्या यांचा हिशेब या यादींत नाहीं. इतरांच्या सांगण्यावरून नव्हे किंवा धंद्याच्या प्रेरणेमुळें नव्हे तर स्वतःच्या हौसेमुळें व गोडीमुळें मेधावी लेखक जें लिखाण करीत असतात त्याची ही यादी आहे. सामान्यतः दोन हजार प्रति प्रत्येक पुस्तकाच्या निघतात असा हिशेब केला तर दोन लाख रुपये किंमतीचा हा उद्योग होतो. यादींतील ग्रंथकारांच्या सांपत्तिक स्थितीकडे पाहिलें तर नियम खरा ठरण्यास अपवाद म्हणून जेवढे थोडे पुढें यावे लागतात तेवढे थोडे या यादींत छापण्याचा व प्रकाशनचा खर्च स्वतःच्या शिरावर विनदिक्कत घेणारे आहेत. दुसऱ्यावर अवलंबून रहाणाऱ्या गरिबांचा भरणा या यादींत फार मोठा आहे.

मासिकें व वर्तमानपत्रें या दोन लाखांच्या बोजांत पडत नाहींत. सर्वांचा हिशेब केला आणि पैशाच्या दृष्टीनें भयंकर भोवऱ्यांत सांपडलेल्या व आधीच दरिद्री म्हणून नांवाजलेल्या आपल्या देशाची सांपत्तिक स्थिति मनांत आली म्हणजे मराठी भाषेचे सेवेकरी आळशी झाले आहेत, असें कोणासहि मुळींच म्हणतां येणार नाहीं.

लेखक मेधावी व तपस्वी आहेत, त्यांच्या उद्योगाचें पाऊल मंदगतीनें कां होईना पण पुढें पडत आहे, तेव्हां निराशेला जागा नाहीं, असें म्हणणें भाग पडतें. आजकालचा सांपत्तिक ग्रहदशेचा काल मराठी भाषेच्या उत्कर्षाला त्रासदायक झाल्यावांचून रहाणार नाहीं हें खरें, पण हा काल आमच्यांतील गरीब श्रीमंत लेखकांना, छापखानेवाल्यांना, ग्राहकांना व वाचकांना तेवढाच भोवतो आहे असें नाहीं, तर हिंदुस्थान सरकारपासून युरोप व अमेरिका खंड येथील सर्व सत्ताधाऱ्यांपर्यंत सर्वांनाच आज ह्या पैशाच्या टंचाईनें अत्यंत जिकिरीस आणलेलें असल्यामुळें, सर्वांच्यावरोबरचें मरण शुभच्च होय ह्या न्यायानें मराठी भाषेच्या कैवाऱ्यांनीं पैशांच्या आपत्तीमुळें गांगरून जाण्याचें कांहींच कारण नाहीं. दारिद्र्याच्या ह्या काल-चक्रांत जर कोणी मरणार असतील तर ते मोठे सत्ताधारी व मोठे श्रीमंत ! आजच्या मनूंत मरणाची पाळी गरिबांवर नाहीं. मरणाचें भय श्रीमंतांना आहे; मराठी भाषेला नाहीं. कारण ही भाषा दरिद्री लोकांची आहे. गरीब जर तपस्वी नसेल तर त्याच्या गळ्यांत दगड बांधून त्याला पाण्यांत बुडवावा आणि श्रीमंत जर आपल्या पैशाचा उपयोग दानधर्म करून गरिबांच्या कल्याणाकडे करीत नसेल तर त्याला गळ्यांत दगड बांधून पाण्यांत बुडविण्यांत यावें, अशी स्मृति म्हणजे महाभारताची शिकवणूक आहे.

द्वावम्भसि निवेष्ठव्यौ गले बध्वा दृढां शिलाम् ।
धनवन्तमदातारं दारिद्र्यं चातपस्विनम् ॥ ६० ॥

—उद्योगपर्व अ. ३३

महाभारतांतील ह्या वचनाप्रमाणें मोठ्या क्रांतीच्या वेळीं तपस्या न करणारे गरीब व दानशून्य श्रीमंत यांचा नायनाट होत असतो, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

निर्भय मराठी भाषा

राज्यक्रांति, विचारक्रांति, दुर्गादेवीच्या दुष्काळासारख्या दैवी आपत्तीनें घडून येणारी लोकक्रांति, या सर्व क्रांत्यांमुळें भाषेचें स्वरूप पालटून एक भाषा अधोगतीला लागते व तिच्या जागीं येणाऱ्या दुसऱ्या भाषेच्या अभ्युदयास सुरवात होते. महायुद्धापासून सुरू झालेल्या व चालू सालीं प्रत्यक्ष प्रकट झालेल्या आर्थिक क्रांतीच्या प्रवाहांत आपण सांपडलेले आहों. दोन तीन वर्षांपूर्वी ह्या प्रवाहाचें पूर्ण स्वरूप सर्वांच्या ध्यानांत आलेलें नव्हतें. सूक्ष्म विचार करणारांना तें कळलेलें होतें पण इतरांना त्याचा गंध नव्हता. गेल्या बारा महिन्यांत, सहा महिन्यांत किंवहुना दोन तीन महिन्यांत अमेरिकेंतील प्रेसिडेंट रुझवेल्टसारखीं धेंडें या दारिद्र्याच्या प्रवाहानें पार उखडून जाऊन, सुकर्णभूमि म्हणून नांवाजलेली अमेरिका अशी कशी क्षणांत उलथी पालथी होते, याचा सर्वांना अचंबा वाटत आहे; आणि भयभीत होऊन प्रत्येक श्रीमंत खिन्नवदन झालेला आहे. अशा स्थितींत मराठी भाषेच्या उत्कर्षासंबंधानें विचार करणारांच्या मनावर खिन्नतेचा पगडा पडणें साहजिक आहे. पण त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट अशी आहे कीं, मराठी भाषा मुळचीच दरिद्री असल्यामुळें आणि हजार बाराशें वर्षें दारिद्र्यांतच दिवस काढून आपला जोम वाढविण्याची संवय त्या भाषेच्या हाडींमाशीं खिळलेली असल्यामुळें, महाप्रलयाच्या वेळेप्रमाणें युरोप व अमेरिका खंडांला बुडवूं पहाणाऱ्या दारिद्र्याच्या महापुराविषयीं स्वतः निशंक व निर्भय रहाण्यास मराठी भाषेस मुळींच हरकत नाहीं. दारिद्र्याला दरिद्री कसा भील ? शिवाय आम्ही तपस्वी नसतों तर गोष्ट निराळी होती.

आम्ही तपस्वी आहोंत, दारिद्र्याच्या वेळीं निर्भय राहून आपली ताकद वाढविण्याचें संधान आम्हाला माहीत आहे. इंग्रजी भाषेनें श्रीमंतच्या जोरावर आम्हांस सहानुभूति दाखवून मोठा प्रसाद म्हणून अल्पस्वल्प मदत करण्याची ऐट मिरविण्याचे दिवस राहिलेले नाहींत. दारिद्र्यानें आम्हांस निर्भय केलें आहे; त्याचप्रमाणें आमच्या भाषेस इतरांना मदत करण्याच्या पदवीस चढविलें आहे. मराठी भाषेचा पहिला मुख्य ग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरी ह्या वर्षांत इंग्रजी भाषेच्या रूपानें युरोप खंडास अर्पण करण्यांत आला आहे. ज्ञानेश्वरीचें सर्व अध्ययांचें संस्कृत भाषांतर जत संस्थानचे श्री. विष्णुपंत खासनीस यांनीं केलें आहे, तर इंग्रजी सारांशरूप भाषांतर श्री. मनु सुभेदार यांचेकडून प्रसिद्ध करण्यांत आलें आहे, व आर्थिक क्रांतीमुळें दृग्गोचर होणाऱ्या नव्या मनूस ज्ञानेश्वरीच्या त्या इंग्रजी भाषांतरानें प्रारंभ झालेला आहे. तेव्हां यापुढें ज्ञानेश्वरी देखील इंग्रजींतून वाचण्याची शिकण्याची पाळी तुम्हां आम्हांवर येईल अशी शंका या भाषांतरामुळें, मराठी भाषा दोन चारशें वर्षांनीं मरणार तेव्हां तिच्या सेवेंत व्यर्थ वेळ कां घालविता असें म्हणणाऱ्यांकडून या ठिकाणीं शंका घेण्यांत येईल हें खरें, पण आजकालच्या परिस्थितीकडे पाहिलें असतां त्या शंकेंत कांहीं अर्थ नाहीं, असेंच दिसून येईल. मराठी भाषेच्या गेल्या पांचसात संमेलनांच्या वेळीं, मराठी भाषा मरणारी आहे काय, ह्या प्रश्नाचा बराच ऊहापोह झालेला आहे. माझ्या मतें मराठी भाषा मरणार आहे काय, ह्या शंकेच्या भुतास कायमचें गाडून टाकण्याची आजची वेळ आहे! इंग्रजी भाषा श्रीमंत आहे, सत्ताधारी आहे; आणि मोठा मासा लहान माशाला सहज खाऊन टाकतो या न्यायानें दरिद्री मराठीला आपल्या वाढत्या पोटांत दोनचारशें वर्षांत सहज पचवून टाकील, असें इंग्रजी भाषेच्या आजच्या वाढीकडे पाहिलें असतां म्हणतां येईल. पण नुसत्या वाढीकडे पाहून काय उपयोग? पोट

वाढत असलें आणि खा खा झालेली असली तरी एवढ्याच चिन्हावरून जवळच्यावर आक्रमण करून हातीं लागलेल्यांना आत्मसात करणाऱ्या जिवंतपणाची शक्ति वृद्धिंगत होत आहे असें म्हणतां येत नाहीं. काल-चक्राचीं चिन्हें तशीं नाहींत ! दारिद्र्याचा महापूर कांहीं वर्षांनीं ओसरून गेल्यावर इंग्रजी भाषा मराठी प्रमाणें दरिद्र्यांची होईल असें नाहीं. आणखी कित्येक पिढ्या इंग्रजी भाषा श्रीमंतांचीच राहील, ह्यांत संशय नाहीं. पण स्पर्श झाला कीं, हातीं लागलेल्याला अल्पकाळांत खाऊन गिळून टाकण्याची अमर्याद धमक युरोपांतील कोणत्याच भाषेच्या अंगीं ह्या पुढें दृष्टीस पडणें शक्य नाहीं. युरोपांतील क्रांत्यांमुळें युरोपखंडांतील सर्व भाषा आज उतरणीस लागल्या आहेत. घसरगुंडीवर कोण कोण आपल्या भाषेस सांवरून धरतो, याचीच कसरत युरोप खंडाकडे पहात असतांना ह्यापुढें इतर जगाच्या दृष्टीस पडावयाची आहे. ही कसरत आपल्या चापल्यानें व पराक्रमानें तुमच्या आमच्या या दरिद्री भाषेला व हिंदुस्थानांतील इतर देशी भाषांना आश्चर्यचकित केल्यावांचून रहाणार नाहीं; पण सर्कशींतील वाघसिंहाची कसरत अगदीं आपल्या शेजारीं चाललेली असली तरी आश्चर्यचकित करण्यापलीकडे भयभीत करूं शकत नाहीं. युरोप खंडांतील सर्व भाषांचीं अस्त्रें, वाघ व सिंह आर्थिक क्रांतीच्या पिंजऱ्यांत सांपडले असून ह्या पिंजऱ्यांतून बाहेर पडण्याच्या उद्योगांतच त्यांच्या कांहीं पिढ्या जावयाच्या आहेत. हा काळ इतर सर्व भाषांना निर्भयतेचा आहे आणि ह्या निर्भयतेच्या काळाचा म्हणजे पुढील शेपन्नास वर्षांचा देशी भाषांनीं जर पूर्ण उपयोग करून घेतला तर मराठी, गुजराथी , हिंदी, बंगाली, इतर देशी भाषा इंग्रजी भाषेच्या दडपणाखालीं चिरडून जाण्याचा प्रसंग हिंदुस्थानवर केव्हांहि येणार नाहीं.

भाषांचें जन्ममरण

हिंदुस्थानांतील कांहीं भाषा मेलेल्या आहेत व कांहीं भाषा मेलेल्या भाषांच्या मरणांतून उत्पन्न झालेल्या आहेत. खुद्द मराठी भाषा व मराठी भाषेपूर्वी असलेल्या व मराठीला जन्म देऊन मेलेल्या महाराष्ट्रांतील मृत भाषा यांच्या इतिहासाकडे पाहिलें, तर सांप्रतच्या आर्थिक क्रांतीच्या वेळीं मराठी भाषेवर मरणाची पाळी येणार नाहीं. इतकेंच नव्हे तर गेल्या हजार वर्षांत दृष्टीस पडणाऱ्या तीव्र जोमानें आपलें डोकें वर काढण्याची संधि आज मराठी भाषेस मिळाली आहे, असें ध्यानीं आल्यावांचून रहात नाहीं. मराठी भाषा जन्मली कशी व तिची वाढ ज्ञानेश्वरीपासून इंग्रजी भाषेचा पूर्ण अंमल बसेपर्यंत म्हणजे विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या काळापर्यंत कसकशी होत गेली, ह्याचा विचार व माहिती डॉ. भांडारकर, राजवाडे व रा. कृष्णाजी पांडुरंग कुळकर्णी यांच्या लेखांतून झालेला आहे. 'मराठी भाषा, उद्गम व विकास' या पुस्तकांत ह्यासंबंधाची माहिती बऱ्याच विस्तारानें रा. कुलकर्णी यांनीं दिली आहे. या बाबतींतील सर्व लेखकांचे मुद्दे एकसारखेच आहेत असें नाहीं; वादग्रस्त प्रश्न बरेंच आहेत. तें एका बाजूस ठेवले तरी एक भाषा मरते कशी व त्या मरणांतून दुसरी उत्पन्न होते कशी ह्या संबंधाचे सामान्य नियम आतां ठरून गेलेले आहेत. दुसऱ्या कोणत्याहि बाहेरच्या भाषेनें आक्रमण केलें नाहीं तरी देश व काळ यांच्या तावडींत सांपडून भाषेचें रूपांतर होऊन एका रूपास मरण येतें व दुसऱ्या रूपाचा जन्म होतो. या मर्त्य लोकच्या नियमास अनुसरून सांप्रतच्या मराठी भाषेस आणखी हजार दीड हजार वर्षांनीं केव्हां मरण यावयाचें असेल तर येवो; त्याबद्दल मृत्युलोकीं अत्यंत उच्च कोटींतल्या मानवांनींहि काळजी वहात बसण्याची मुळींच जरुरी नाहीं. इंग्रजी भाषेसारख्या युरोप-

खंडांतील भाषांच्या आक्रमणामुळें होणाऱ्या शक्तिपाताचा तेवढा विचार करणें भाग आहे. ऋग्वेदांतील संस्कृत मागें पडून पाणिनी–कालचें संस्कृत पुढें आलें, तेंहि संस्कृत मागें पडून पाली, अर्धमागधी, शौरसेनी, महाराष्ट्री यांचा जन्म व प्रसार झाला. सर्व हिंदुधर्माच्या विचारावर व विचार करण्याच्या पद्धतीवर सर्वांत सारखा दिसणारा छाप पडणाऱ्या महाभारत-रामायण वगैरे राष्ट्रीय ग्रंथांची रचना ज्या संस्कृतांत झाली त्या संस्कृत भाषेचा काळ पाणिनीनंतरचा आहे. संस्कृत भाषा तीन चार स्वरूपांत दृष्टीस पडून नंतर अंतर्धान पावली. संस्कृत जोमांत असतांना पाली, अर्धमागधी, महाराष्ट्री, शौरसेनी या प्राकृत भाषांनीं हातपाय पसरलेले होते. या प्राकृत भाषांतून त्यांचे अपभ्रंश जन्मून व कांहीं काळ नांदून मराठी, हिंदी, गुजराथी व बंगाली, अशा देशी भाषा जन्मास आल्या. चौथ्या पांचव्या शतकाच्या वेळीं मराठी भाषा, महाराष्ट्री प्राकृत भाषेचे अपभ्रंश स्वरूप टाकून, हल्लींच्या स्वरूपांत पुढें येऊं लागली होती. आठशें नऊशें शतकाच्या सुमारास लघुकथा व लहान सहान काव्यें मराठी भाषेंत होत होतीं. ११००, १२०० व १३०० शतकांतील मराठींतील ग्रंथरचना उपलब्ध आहे. पण तेराव्या शतकांत ज्ञानेश्वरी उत्पन्न होईतों संस्कृतकडे विद्वानांचें लक्ष होतें. शंकराचार्यांनीं संस्कृत भाषेचें साहाय्य घेतलें; द्वैत, विशिष्टा द्वैत वगैरे मतांचा प्रसार मध्वाचार्य व रामानुजाचार्य यांनीं संस्कृत भाषेचें साहाय्य घेऊनच केला; भक्तिमार्गास पुष्टि देणारें भागवत संस्कृतांतच रचलें गेलें. गंगायमुनेच्या काठीं गुप्त घराण्याचें वैभवशाली साम्राज्य तिसऱ्या चौथ्या शतकांत स्थापलें गेल्यानंतर संस्कृतालाच नवा जोम आलेला होता, आणि बुद्धाची क्रांति हिंदुस्थानांत नामशेष व्हावयाच्या वेळीं तर म्हणजे चौथ्या पांचव्या शतकापासून पुढें पांचसहाशें वर्षें पाली वगैरे प्राकृत भाषांना अपभ्रंशाच्या अधोगतीला लावून, हल्लींच्या देशी

भाषांच्या सामान्य वाढीच्या वेळीं संस्कृत भाषा ही विद्वानांच्या व सत्ताधारी लोकांच्या खांद्यावर बसून चोहोंकडे पट्टाभिषिक्त महाराणीप्रमाणें मिरवत होती!

ज्ञानेश्वरीची प्रेरणा

अशा स्थितींत ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ ज्ञानेश्वरांनीं मराठी भाषेंत कां लिहिला? मराठी भाषेचें सहाय्य घेऊन आपलीं मतें प्रदर्शित करण्यास त्यांना सांगितलें कोणी? संस्कृतमध्यें जर हा ग्रंथ झाला असता तर त्या वेळच्या विद्वानांकडून त्याची वाहवा चांगली झाली असती, नाहीं असें नाहीं; ज्ञानेश्वरमहाराजांचा संस्कृतचा अभ्यास फार! उपनिषदें, भाष्यें व इतर संस्कृत ग्रंथ त्यांनीं फार अवलोकन केले होते, हें त्यांच्या ग्रंथाकडे वरवर पहाणारासहि दिसून येईल. हल्लीं जसे कांहीं लेखक म्हणतात कीं, लिहिणें व बोलणें इंग्रजींत त्यांना सोपें जाऊन देशी भाषा इंग्रजीप्रमाणें पेलतां येत नाहीं, तसें ज्ञानेश्वरमहाराजांच्या संस्कृतच्या अभ्यासाकडे पाहिलें तर श्रीमद्भगवद्गीतेवर भावार्थ दीपिका म्हणून भाष्य संस्कृतांत करणें त्यांना अधिक सोपें झालें असतें; मग मराठींत ज्ञानेश्वरी लिहिण्याची उठाठेव ज्ञानदेवांना सांगितली कोणी? ह्या प्रश्नाचें उत्तर देणें म्हणजे मराठी भाषेस महत्त्व कसें प्राप्त झालें व ह्यापुढें दोन चार पिढ्या मराठी भाषेस विशेष महत्त्व कसें मिळणारें आहे, ह्या प्रश्नाचा उलगडा करणें होय. ज्ञानेश्वर-महाराज मच्छेंद्रनाथांच्या नाथ संप्रदायांतील असून, गहिनीनाथांनीं ज्ञानदेवांचे गुरु व वडील बंधु निवृत्तिनाथ यांना अशी आज्ञा केली कीं, कलिकाल जोरानें पुढें पाऊल टाकत आहे, तेव्हां जगाच्या रक्षणाकरितां आपल्या हातून शक्य तितक्या पराकाष्ठेचा उद्योग करणें जरूर आहे. आपल्याजवळील समाधिस्वरूपाचें धन ज्ञानदेवमहाराजांच्या हातीं देतांना भक्तिमार्गांतील तत्त्वविचारांचा व मराठी भाषेंतील सर्व निवडक शब्दरत्नांचा आणि

साहित्याचा मोठा पाऊसच आपणांवर गुरूंनीं पाडला आणि त्या तीर्थोदकाचा आपण केलेला निवडक सांठा म्हणजेच आपला ग्रंथ होय, असें ज्ञानेश्वरीच्या प्रेरणेसंबंधाचें वर्णन ज्ञानेश्वरमहाराजांनीं केलें आहे. मोठा आणीबाणीचा प्रसंग आला आहे आणि ह्या प्रसंगीं सामान्य जनसमूहाला जागृतावस्थेंत ठेवण्याचा जर उपाय योजला नाहीं तर बहुजनसमाजाचा म्हणजे 'जगाचा' नाश होईल, ही महत्त्वाची प्रेरणा म्हणजे नाथ संप्रदायाचा आदेश किंवा संस्कृत विद्येंत ज्ञानदेवांना तयार केल्यावर निवृत्तिनाथांनीं त्यांना दिलेली दीक्षा होय! ही दीक्षा आपण पाळली आणि आपल्या संप्रदायानें व गुरूनें आपणाला निमित्त करून जगाचें रक्षण केलें, अशा तऱ्हेचे उद्गार प्रेरणे-संबंधींच्या विवेचनांत ज्ञानेश्वरमहाराजांनीं काढले आहेत. आणीबाणीच्या प्रसंगीं करावयाचें कार्य त्यावेळच्या विशिष्ट विद्वानांच्या संस्कृतानें होण्या-सारखें नव्हतें. देशी भाषेच्या उपायाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि उद्योगानें बहुजनसमाजाच्या अंगीं किंवा लोकांच्या अंगीं किंवा 'जगा'च्या अंगीं स्वतःचें रक्षण करण्याचें सामर्थ्य उत्पन्न झालें नसतें. मराठी भाषा बोलणारा महाराष्ट्र-देशांतील जो 'समुदाय' त्याला 'जग' ह्या शब्दानें ज्ञानदेवांनीं आपल्या ग्रंथांत संबोधिलें आहे. त्यावेळचे विद्वान लोक जगास किंवा 'समुदाया'स किंवा हल्लींच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे बहुजनसमाजास कोणत्या मार्गानें जागृत करीत असत? हल्लीं ज्याप्रमाणें निरनिराळ्या चळवळींतून काम करणारे लोक आपला मार्ग प्रथम इंग्रजींत मुक्रर करतात आणि नंतर त्या इंग्रजी ठरावांचें देशी भाषांतून भाषांतर होऊन त्याचा फैलाव करण्यांत येतो, तीच पद्धत ज्ञानेश्वरांच्या वेळीं रूढ होती. शास्त्री मंडळीनें संस्कृतांत निश्चय करावयाचा आणि नंतर पुराणिक व कीर्तनकार यांनीं त्या ठरावाचें देशी भाषेंत भाषांतर करून गांवोगांवीं आणि प्रांतोप्रांतीं त्यांचें संकीर्तन म्हणजे फैलावानें कीर्ति वाढविण्याचा उद्योग

चालू ठेवावयाचा असा यज्ञकालापासूनचा प्रघात आहे. मोठा यज्ञ होत असतांना अशा फैलावाच्या किंवा बहुजनसमाजाच्या जागृतीच्या उद्योगाकरितां, 'उत्सव' असाच शब्द वापरून, कथाकीर्तनांना व तत्सादृश्य मिरवणुकींना मुद्दाम रोज दोन तीन तास सायंकाळीं देण्याचा प्रघात होता. ह्या पद्धतीमुळें प्राकृत भाषेचें व संस्कृत विद्येचें आपोआप संमेलन होत असे. बुद्धाच्यावेळीं व बुद्ध मरून गेल्यावर संस्कृताशीं संमेलन करून फैलावाचें काम करणें साहजिकपणेंच त्रासदायक झालें; प्रथम प्रथम बुद्धाच्या शिष्यांनीं संस्कृतचाच उपयोग केला, पण संस्कृताची मदत न घेतां स्वतंत्र रीतीनें फैलाव केल्याशिवाय डाळ शिजेना. तेव्हां प्राकृत भाषेचा उपयोग करून स्वतंत्र मार्गानें बहुजनसमाजास गांठणें बुद्धधर्मीयांना भाग पडलें, आणि त्या धर्माचे महत्त्वाचे ग्रंथ पाली भाषेंत निर्माण होऊं लागले. जैनांनीं ह्याच कारणाकरितां अर्धमागधी व महाराष्ट्री या दोन प्राकृत भाषांचा प्रसंगानुसार एकमेकांत अंशतः मिसळ करून उपयोग केला.

लोकांची भाषा व लोकसंग्रह

बहुजन समाजास जागें करण्याचा प्रसंग कर्त्या विद्वानांवर येऊन पडला म्हणजे त्या त्या वेळच्या त्या समाजाच्या बोलत्या चालत्या भाषेला शरण जावें लागतें. ही शरण जाण्याची स्थिति—तदर्थ, तन्निष्ठ आणि तत्परायण—ही स्थिति प्राप्त होण्यास त्या त्या भाषेंतील हरएक तऱ्हेच्या गोडीशीं लेखकाचें तादात्म्य व्हावें लागतें. गोडी नाहीं तर समाजाच्या अंतःकरणापर्यंत शब्दच पोहोंचत नाहीं! त्यांतच सर्वस्वीं सुख पहाण्याची संवय मनास लागल्याशिवाय—त्या त्या भाषेंत मन बांधलें गेल्याशिवाय—म्हणजे मनाचा देशबंध होऊन धारणाशक्ति उत्पन्न झाल्याशिवाय—आणि या बंधाला प्रेमाचें स्वरूप येऊन वृत्ति तल्लीन झाल्याशिवाय किंवा ध्यान लागल्याशिवाय, कार्यनिष्पत्ति किंवा समाधि प्राप्त होत नाहीं. भाषेची उत्पत्तीच मुळीं

साहित्याचा मोठा पाऊसच आपणांवर गुरूंनीं पाडला आणि त्या तीर्थोदकाचा आपण केलेला निवडक सांठा म्हणजेच आपला ग्रंथ होय, असें ज्ञानेश्वरीच्या प्रेरणेसंबंधाचें वर्णन ज्ञानेश्वरमहाराजांनीं केलें आहे. मोठा आणीबाणीचा प्रसंग आला आहे आणि ह्या प्रसंगीं सामान्य जनसमूहाला जागृतावस्थेंत ठेवण्याचा जर उपाय योजला नाहीं तर बहुजनसमाजाचा म्हणजे 'जगाचा' नाश होईल, ही महत्त्वाची प्रेरणा म्हणजे नाथ संप्रदायाचा आदेश किंवा संस्कृत विद्येंत ज्ञानदेवांना तयार केल्यावर निवृत्तिनाथांनीं त्यांना दिलेली दीक्षा होय! ही दीक्षा आपण पाळली आणि आपल्या संप्रदायानें व गुरूनें आपणाला निमित्त करून जगाचें रक्षण केलें, अशा तऱ्हेचे उद्गार प्रेरणे-संबंधींच्या विवेचनांत ज्ञानेश्वरमहाराजांनीं काढले आहेत. आणीबाणीच्या प्रसंगीं करावयाचें कार्य त्यावेळच्या विशिष्ट विद्वानांच्या संस्कृतानें होण्या-सारखें नव्हतें. देशी भाषेच्या उपायाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि उद्योगानें बहुजनसमाजाच्या अंगीं किंवा लोकांच्या अंगीं किंवा 'जगा'च्या अंगीं स्वतःचें रक्षण करण्याचें सामर्थ्य उत्पन्न झालें नसतें. मराठी भाषा बोलणारा महाराष्ट्र-देशांतील जो 'समुदाय' त्याला 'जग' ह्या शब्दानें ज्ञानदेवांनीं आपल्या ग्रंथांत संबोधिलें आहे. त्यावेळचे विद्वान लोक जगास किंवा 'समुदाया'स किंवा हल्लींच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे बहुजनसमाजास कोणत्या मार्गानें जागृत करीत असत? हल्लीं ज्याप्रमाणें निरनिराळ्या चळवळींतून काम करणारे लोक आपला मार्ग प्रथम इंग्रजींत मुक्रर करतात आणि नंतर त्या इंग्रजी ठरावांचें देशी भाषांतून भाषांतर होऊन त्याचा फैलाव करण्यांत येतो, तीच पद्धत ज्ञानेश्वरांच्या वेळीं रूढ होती. शास्त्री मंडळीनें संस्कृतांत निश्चय करावयाचा आणि नंतर पुराणिक व कीर्तनकार यांनीं त्या ठरावाचें देशी भाषेंत भाषांतर करून गांवोगांवीं आणि प्रांतोप्रांतीं त्यांचें संकीर्तन म्हणजे फैलावानें कीर्ति वाढविण्याचा उद्योग

चालू ठेवावयाचा असा यज्ञकालापासूनचा प्रघात आहे. मोठा यज्ञ होत असतांना अशा फैलावाच्या किंवा बहुजनसमाजाच्या जागृतीच्या उद्योगाकरितां, 'उत्सव' असाच शब्द वापरून, कथाकीर्तनांना व तत्सादृश्य मिरवणुकींना मुद्दाम रोज दोन तीन तास सायंकाळीं देण्याचा प्रघात होता. ह्या पद्धतीमुळें प्राकृत भाषेचें व संस्कृत विद्येचें आपोआप संमेलन होत असे. बुद्धाच्यावेळीं व बुद्ध मरून गेल्यावर संस्कृताशीं संमेलन करून फैलावाचें काम करणें साहजिकपणेंच त्रासदायक झालें; प्रथम प्रथम बुद्धाच्या शिष्यांनीं संस्कृतचाच उपयोग केला, पण संस्कृताची मदत न घेतां स्वतंत्र रीतीनें फैलाव केल्याशिवाय डाळ शिजेना. तेव्हां प्राकृत भाषेचा उपयोग करून स्वतंत्र मार्गानें बहुजनसमाजास गांठणें बुद्धधर्मीयांना भाग पडलें, आणि त्या धर्माचे महत्त्वाचे ग्रंथ पाली भाषेंत निर्माण होऊं लागले. जैनांनीं ह्याच कारणाकरितां अर्धमागधी व महाराष्ट्री या दोन प्राकृत भाषांचा प्रसंगानुसार एकमेकांत अंशतः मिसळ करून उपयोग केला.

लोकांची भाषा व लोकसंग्रह

बहुजन समाजास जागें करण्याचा प्रसंग कर्त्या विद्वानांवर येऊन पडला म्हणजे त्या त्या वेळच्या त्या समाजाच्या बोलत्या चालत्या भाषेला शरण जावें लागतें. ही शरण जाण्याची स्थिति—तदर्थ, तन्निष्ठ आणि तत्परायण—ही स्थिति प्राप्त होण्यास त्या त्या भाषेंतील हरएक तऱ्हेच्या गोडीशीं लेखकाचें तादात्म्य व्हावें लागतें. गोडी नाहीं तर समाजाच्या अंतःकरणापर्यंत शब्दच पोहोंचत नाहीं! त्यांतच सर्वस्वीं सुख पहाण्याची संवय मनास लागल्याशिवाय—त्या त्या भाषेंत मन बांधलें गेल्याशिवाय—म्हणजे मनाचा देशबंध होऊन धारणाशक्ति उत्पन्न झाल्याशिवाय—आणि या बंधाला प्रेमाचें स्वरूप येऊन वृत्ति तल्लीन झाल्याशिवाय किंवा ध्यान लागल्याशिवाय, कार्यनिष्पत्ति किंवा समाधि प्राप्त होत नाहीं. भाषेची उत्पत्तीच मुळीं

गोडीकरितां म्हणजे धारणेकरितां, ध्यानाकरितां म्हणजे तन्निष्ठतेकरितां– आणि कार्यनिष्पत्तिकरितां म्हणजे समाधिधनाकरितां होय. शे-दोनशे वर्षांच्या कालावर छाप पडणारे ग्रंथकार अशा समाधिधनानेंच परिपूर्ण असतात. त्यांत नटावें म्हणजे तत्त्वप्रसाद होतो !

अस्तीत्येवोपलब्धस्य तत्त्वभावो प्रसीदति ।
(कट–२–६–१३)

मोठ मोठ्या क्रांति घडवून आणणारांचे ग्रंथ प्रासादिक असतात हें खरें आहे. कारण गोडी व प्रसाद यापासूनच भाषेची उत्पत्ति झाली असें कृष्णयुजुर्वेदांत वर्णन आहे.

"वाग्वै पराच्यव्याकृतावदते इन्द्रमब्रुवन्निमां नो वाचं व्याकुर्वति सोऽब्रवीद्वरं वृणै मह्यं चैवेष वायवे च सह गृह्याता इति तस्मादैन्द्रवायवः सह गृह्यते तामिन्द्रो मध्यतोऽवक्रम्य व्याकरोत्तस्मादियं व्याकृता वागुद्यते !"

भाषेचे निरनिराळे भाव स्पष्ट व्हावेत किंवा निरनिराळ्या लोकांची व उद्योगांची बोलती चालती भाषा एकमेकांपासून अलग व स्पष्ट स्वरूपाची व्हावी अशी विनंति देवांनीं इंद्रास केली असतांना, एकाच पेल्यांत मजकरितां व वायुकरितां म्हणजे शक्तीकरितां सोमरस ओता असें इंद्रानें देवांना सांगितलें; दोघांच्याकरितां एकाच गोडीचा एकच प्याला तयार झाल्यावर त्या पेल्यांत शिरून इंद्रानें पृथक्करण केलें; आणि तेव्हांपासून विश्वमोहिनी सरस्वतीला म्हणजे भाषेला व्यक्त व प्रकट स्वरूप मिळालें; अशी भाषेच्या उत्पत्तीची हकीकत आहे. कोणत्याहि बहुजन समाजाची भाषा घ्या, त्या समाजाची गोडी व त्या समाजांतील वायु म्हणजे बळ या भाषेंत असतें. मोठ्या ग्रंथकाराला भाषेंतील ह्या मूळच्या गोडीशीं आपल्या ग्रंथांतील गोडीचा संगम घडून आणावा लागतो; आणि आपल्या तत्त्वविचाराचें बळ भाषेंतील मूळच्या वायूशीं म्हणजे सामर्थ्याशीं मिसळून

टाकावें लागतें. असा ग्रंथ निर्माण झाला म्हणजे तो कार्यकर्ता होतो, आणि कार्य सिद्धीस गेल्यावर त्याला प्रासादिक ग्रंथ असें म्हणतात. बहुजनसमाजांत साहजिकपणें अव्यक्त व निद्रित स्थितींत असलेला प्रसाद ग्रंथकर्त्याच्या सामर्थ्यानें 'अलख' म्हटल्याशिवाय 'आदेश' म्हणून केव्हांहि ओ देत नाहीं. रूढ झालेल्या सामर्थ्याच्या व वैभवाच्या मार्गानें काम होत नाहीं, असा अनुभव आल्यावर कर्त्या पुरुषांना आपलें सर्वस्व पणाला लावून–सर्व परिग्रह सोडून–आपल्या कार्याच्या गोडींतच मन व बुद्धि पूर्णपणें गुंतवून–बहुजनसमाजाला हाक मारून–तुमच्या नेहमींच्या क्रमाहून तुमच्या ध्यानांत न आलेला असा उपदेश मी अत्यंत कळकळीनें तुम्हांस करीत आहें–असा हंबरडा अगदीं निकराच्या वाणीनें फोडावा लागतो; मग बहुजनसमाज 'ओ' देऊन "आज्ञा सांगा" असें म्हणावयास तयार होतो व लोकसंग्रहाचें काम तडीस जातें. पाली भाषा पुढें येण्यास जीं कारणें बुद्धाच्या वेळी झाली, ज्या कारणामुळें जैनांनीं अर्धमागधीस हातीं धरलें, त्याच कारणामुळें ज्ञानदेवांनीं मराठीवर अनुग्रह केला. संस्कृताला धरून चालणाऱ्या पुराणांनीं व कीर्तनांनीं काम भागणारें नव्हतें. फैलावाचा हा मार्ग गुप्ताच्या कारकीर्दीत व त्यानंतर दोनतीनशें शतकापर्यंत पुराणिकांनीं व कीर्तनकरांनीं फार चांगल्या रीतीनें अमलांत आणला. संस्कृतावरोवर प्राकृत, अपभ्रष्ट, व हल्लींच्या देशी भाषा, यांचें संरक्षण पुराणाचें वेळीं प्रकट होणाऱ्या भक्तीमार्गाच्या फैलावासाठीं संस्कृत पंडितांना करावें लागलें; भागवत–पुराण व इतर सर्व पुराणें यांचा फैलाव संस्कृत भाषेनें देशीं भाषांना वटिक म्हणून हातांशीं धरून केला. सत्ताधारी राजांचें व श्रीमंतांचें पाठवळ संस्कृताला जोंपर्यंत होतें तोंपर्यंत ती भाषा वरील फैलावाच्या मदतीनें बहुजन समाजास एकतऱ्हेनें जागृत ठेवण्यास उपयोगी पडली. पण हजार, अकराशे व बाराशे या शतकांच्या सुमारास

हिंदुस्थानांत बरींच शतकें टिकणारीं राज्यक्रांति यवनांकडून घडून येत आहे असें लोकनायकांच्या व विचारप्रवर्तकांच्या ध्यानीं येऊन चुकलें, भक्तिमार्गास विशेष पुष्टि देणारे विशिष्टाद्वैताचे प्रवर्तक रामनंद यांनीं उत्तरेस जाऊन तुळशीदास व कबीर यांच्या देशी भाषांच्या संप्रदायांना प्रोत्साहन देण्यापूर्वी व अंत्यंजांसकट सर्वांना गंगायमुनेच्या काठीं भक्तिमार्गांत समानतेनें वागविण्यास उद्युक्त होण्यापूर्वी, राघवानंदांनीं उत्तरेस देशी भाषांतील भक्तिमार्गाची भूमिका रचून ठेवली होती. राघवानंदांचा हा संप्रदाय ज्ञानदेव महाराजांना आपल्या अनुगृहीतांत ओढतो; पण तसा पुरावा मराठींत सांपडत नाहीं. त्या सांप्रदायाचे लोक बंगाल्यांत व दिल्लींत मुसलमानांची सत्ता स्थापली गेल्यामुळें भयभीत झाले होते; मुसलमानांच्या स्वाऱ्या दिल्लीपासून बंगालपर्यंत होऊं लागल्या होत्या; यामुळें दूरदर्शी कार्यकर्ते मोठ्या काळजींत पडले होते. राजसत्ता हातची गेल्यावरोबर संस्कृतची व संस्कृतांतील विचारांचा फैलाव करण्याकरितां हातीं घेतलेल्या देशी भाषांची सहाजिकच दैना होऊं लागली. अशावेळीं संस्कृतांत साठवून ठेवलेलें आपलें ज्ञान नव्या देशी भाषेंतून म्हणजे बंगाली, हिंदी व मराठी या भाषांतून चोहोंकडे पसरून टाकून, बहुजन समाजास आपलें आपण संरक्षण करण्यास तयार केल्याशिवाय घरांत येऊन शिरलेल्या अरिष्टापासून बचाव करण्याचा दुसरा मार्गच राहिला नाहीं. मंत्रविद्या व योगसाधनें यांचा फैलाव नाथ संप्रदायानें त्यावेळीं चोहोंकडे केला आणि गुप्त गुप्त म्हणून ठेवण्याच्या घातुक सवयीच्या शैव संप्रदायाच्या व शक्ति संप्रदायाच्या र्‍हासांतून, दत्तात्रयाच्या शिकवणीनें म्हणजे शैव व वैष्णव यांच्या संमेलनानें चालणाऱ्या नाथ-संप्रदायानें योगविद्येची सुटका केली.

मराठी भाषेचा आईपणा

दक्षिण महाराष्ट्रांत यादवांच्या सत्तेला ज्ञानेश्वर महाराजांच्या वेळीं

मुसलमानांच्या आगीची ज्वाळा लागलेली नव्हती हें खरें; पण मुसलमानांनीं घडवून आणलेली क्रांति कित्येक शतकें टिकणारी आहे आणि बहुजनसमाजास शरण गेल्याशिवाय संस्कृत भाषा व देशी भाषा या सर्वांचाच नाश परदेशी भाषेकडून झाल्यावांचून रहाणार नाहीं, याची जाणीव त्यावेळच्या विचार-प्रवर्तकांना पूर्णपणें होती. तुमच्या महाराष्ट्रांतहि कलिकाल जवळ आला आहे; तुमच्या घराचा नाश होणार आहे; आणि हा नाश टाळण्याकरितां संस्कृत पंडितांना चिकटून रहाण्यांत हंशील नसून बहुजनसमाजाची भेट देशी भाषेच्या मार्फतच घेतली पाहिजे आणि 'जगा'चें रक्षण केलें पाहिजे, अशी आज्ञा गहिनीनाथाकडून निवृत्तिनाथाला आणि निवृत्तिनाथाकडून समाधिधनासकट ज्ञानदेवापर्यंत येऊन पोहोंचली व ज्ञानेश्वरीमुळें मराठी भाषेला एकदम नागर स्वरूप प्राप्त झालें. नागर म्हणजे मोठया नगरांतील संस्कृति. हा नागरपणाचा मान शके १२१२ पूर्वी मराठी भाषेला नव्हता. राजाश्रयाच्या अभावामुळें संस्कृत जरी म्लानवदन झाली तरी संस्कृताच्या सर्व संस्कृतीचा छाप नागर भाषा म्हणून मराठीवर मारून, स्वतःच्या जिवंतपणाकरितां व उत्कर्षाकरितां संस्कृताकडे पाहूं न शकणाऱ्या बहुजन समाजाच्या घरांत संस्कृतच्या ऐवजी मराठी भाषा 'आई' म्हणून ज्ञानेश्वरीमुळें नांदूं लागली नसती, तर मराठी भाषा संस्कृतच्या रोडकेपणाच्या वेळींहि नागर पदवीस म्हणजे संस्कृतच्या बरोबरीच्या श्रेष्ठतेला चढली नसती. मराठी भाषेला संस्कृताच्या ऐवजी आईपणाचा मान हिंदुजगांत ज्ञानेश्वरमहाराजांनीं आणून दिल्यावर मराठी भाषा बोलणारे लोक हिंदी भाषा बोलणाऱ्या लोकांच्या मदतीला त्यांचा हात मुसलमानी अंमलांच्या चरकांत पूर्णपणें सापडला असतां धावून गेले आणि मराठी भाषेनें आपलें तेवढेंच नव्हे तर हिंदी, बंगाली, कानडी वगैरे सर्व देशी भाषांचें संरक्षण केलें! जगाचें रक्षण गुरूंनीं केलें अशा आशयाचे जे उद्गार ज्ञानेश्वर

महाराजांनीं आपल्या ग्रंथाच्या अखेरीस प्रेरणेचें विवेचन करतांना काढले आहेत, त्याचा अर्थ वरील तऱ्हेचा आहे. समाधिधनाशिवाय म्हणजे आपल्या कार्यांतच पूर्णपणें गुंग होऊन इतर सर्व परिग्रहाचा त्याग केल्याशिवाय, आणि बहुजनसमाजास जागृत करण्याचें आपलें कार्य आजन्म चोहोंकडे एकसारखें फिरत राहून संकीर्तनाच्या मार्गानें करीत राहिल्याशिवाय म्हणजे लोकसंग्रह करण्याचा उपाय योजल्याशिवाय, आणीबाणीच्या प्रसंगांतून म्हणजे अपमृत्यूच्या व महामृत्यूच्या भयांतून बहुजन समाज पार पडूं शकत नाहीं, हीच शिकवणूक मराठी भाषेची आई सर्वांना शिकवीत आहे ! लोकसंग्रहाकरितां जागृतीचा फैलाव करण्याची चळवळ मराठी भाषेनें जशी परिणत स्थितींत आणली तशी महाराष्ट्राबाहेर इतर ठिकाणीं दृष्टीस पडत नाहीं. ज्ञानेश्वरामागून एकनाथांनीं पंढरीच्या संप्रदायास नागरपणाचा नवा पोषाख चढवून मुसलमानी अमदानींत फैलावाच्या ह्या मार्गाला अधिक जोर आणला. एकनाथांचे गुरु जनार्दन स्वामी, दत्तात्रय संप्रदायांतील होते व त्यावेळच्या या दीक्षाकारांचा दीक्षा म्हणजे गुरुमंत्र द्यावयाचा आणि फैलावाच्या कामाला लागणारे पुरुष एकविचारानें भरून काढून लोकजागृतीकरितां त्यांचे मठ किंवा अड्डे किंवा नुसत्या एकट्या व्यक्ति चोहोंकडे विखरून टाकावयाच्या, अशा स्वरूपाचा दीक्षाकारांचा लोकसंग्रहाचे चळवळीचा त्यावेळचा मार्ग होता. चैतन्य, तुळसीदास व कबीर यांनीं उत्तरेस जें कार्य केलें तेंच कार्य नामदेव, तुकाराम यांच्या सारख्या प्रमुख संतांनीं महाराष्ट्रांत केलें. वारकऱ्यांच्या माळेची दीक्षा सर्व जातींना देऊन पंढरीच्या वारकऱ्यांत ते प्रमुख दीक्षाकार झाले. मराठी भाषेंतील अभंगांच्या द्वारें चोहोंकडे जिवंतपणाचा फैलाव करावयाचा व कोणासहि मरूं द्यावयाचें नाहीं, असा वारकऱ्यांच्या दीक्षांचा कटाक्ष आहे. चोहोंकडे फिरून कीर्तन करणें हा तुकाराम महाराजांचा मुख्य व्यवसाय !

ह्या व्यवसायाच्या गुंगींत व आनंदांतच त्यांच्या हातून अभंग रचले जात; व त्या अभंगांत त्यांच्या व्यवसायांतील सर्व गोडी समाधिधन म्हणून ओतली गेल्यामुळें संस्कृताप्रमाणें त्यांचे अभंग आपोआप 'अमर–अमृत' होत. कधीं न मरणारे व न मेलेले अशी स्थिति प्राप्त होण्यास लोकसंग्रहाकरितां करावयाच्या फैलावाच्या ह्या मार्गाशिवाय दुसरा मार्ग किंवा निष्ठा नाहीं! ह्या मार्गांत साधनांची किंवा द्रव्याची अपेक्षा नाहीं! कोठेंहि उभें राहून परमेश्वराच्या नांवाचें भजन करावयाचें आणि नंतर जमलेल्या मंडळींना उपदेश करावयाचा, असा हा चळवळीचा मार्ग आहे. एकटा पुरुष तन्निष्ठ झाला म्हणजे त्याला दाहीदिशा मोकळ्या, अशी ही शक्ति आहे.

मराठी भाषेची मुलुखगिरी

भाषेची चळवळ द्रव्यसंचयावर चालत नसते, मुलुखगिरीवर चालत असते. युरोप खंडांत लष्कर पोटावर चालतें, साधुसंतांचें लष्कर महाराष्ट्रांत पोटावर चाललें नाहीं; मुलुखगिरीवर चाललें. मुलुख म्हणजे लोक आमचे आहेत आम्ही त्यांचे आहों, आमच्यामधील मधु किंवा अमृत लोकांचें आहे आणि लोकांचें मधु किंवा अमृत आमचें आहे, अशा तऱ्हेचें तादात्म्य झालें कीं मुलुखगिरीवर म्हणजे लोकांकडून मिळणाऱ्या त्या त्या क्षणापुरत्या सहाय्यावर पाहिजे तेवढी मोठी चळवळ सर्व परिग्रहावर उदक सोडणाऱ्या पुरुषाला चमत्काराप्रमाणें करून दाखवितां येते आणि लोकसंग्रहाचें काम पार पाडून नेतां येतें, असा महाराष्ट्रांतील मराठी भाषेचा इतिहास आहे. महाराष्ट्रांतील सेनानायकांनीं व राजांनीं पैशाची पूर्णपणें टंचाई असतांना एक प्रकारच्या दारिद्र्यांतच मुलुखगिरीच्या जोरावर मोठमोठया स्वाऱ्यांत यश मिळविलें. मुलुखगिरीस दोषार्ह स्वरूप केव्हां केव्हां प्राप्त होत असे, हें खरें; पण तो आपद्धर्म होता. लोकांचेंच लष्कर, लोकांचेंच यश, आणि

लोकांनींच आपापल्या मुलुखांत त्या त्या वेळेपुरते लष्कराच्या भाकऱ्या भाजून यशाचे भागिदार व्हावयाचें आणि अमर पदवीस चढावयाचें, अशी मुलुखगिरीच्या संप्रदायाची दीक्षा आहे ! राज्यकर्त्यांनीं व सेनानायकांनीं ही मुलुखगिरीची दीक्षा शोधून काढली असें म्हणण्यापेक्षां, मराठी भाषेनें व मराठी भाषेच्या चळवळ्यांनीं राज्यकर्त्यांना व सेनानायकांना ही दीक्षा दिली असें म्हणणें अधिक संयुक्तिक होईल. रामदासांनीं ह्या दीक्षेच्या व्रतावरच उपदेशाचे निरनिराळे समास रचून नियमबद्ध केले म्हणून त्यास चळवळीच्या दीक्षाकारांत विशेष मान आहे. वैरागी, जोगी व संत महाराष्ट्रांत मंत्रकर्ते म्हणजे लोककर्ते, आणि दीक्षाकर्ते म्हणजे मार्गकर्ते, या नात्यानें मुसलमानीं अंमलांत जोराजोरानें पुढें येत असतांना, शंकराचार्यांनीं संस्कृतांत निर्माण केलेले संन्यासी आपोआपच अस्तास जाऊं लागले. हा संन्याशांचा वर्ग अस्तास न जातां लोकसंग्रहाचें व दीक्षाकारांचें काम त्या वर्गाच्या हातून व्यवस्थित रीतीनें पार पडावें म्हणून मुसलमानी अंमलांतच वऱ्हाड प्रांतांत कारंजें येथें श्रीगुरुदत्तात्रेयाचा अवतार नरसिंह सरस्वतीच्या रूपानें झाला. श्रीगुरुचरित्रांत ह्या अवताराची कारणें सांगतांना हा पुरुष दीक्षाकार होणार आणि एकविचारानें भरलेल्या मंडळ्या स्थापून कलीचें पुढें पडत चाललेलें पाऊल मागें हटवणार, अशा तऱ्हेचें वर्णन करण्यांत आलेलें आहे. कृष्णातटाकाच्या एका ठिकाणीं स्नान, दुसऱ्या ठिकाणीं भोजन, तर तिसऱ्या ठिकाणीं शयन असें त्यांच्या चळवळीच्या चपलपणाचें वर्णन आहे. असल्या चपळपणाशिवाय फलावाचें काम त्या त्या प्रसंगाच्या बंधनांतून मुक्त होऊं शकत नाहीं. प्रासंगिक व स्थानिक बंधनें आपल्या मार्गाच्या आड येऊं नयेत अशी जर इच्छा असेल तर एकेकटयानें भिंगरीसारखें चोहोंकडे फिरत रहाणें हा मुख्य उपाय आहे. मच्छिंद्रनाथ कोल्हापुरांत जेवत, गंगातटाकीं स्नान

करीत, व हिमालयांत निजावयास जात, अशा तऱ्हेचीं जीं वर्णनें आहेत तीं वर्णनें भिभवडी, नरसोबाची वाडी व गाणगापूर येथून चाललेल्या चळवळीलाहि जशींच्या तशीं लागू पडतात. उत्तरहिंदुस्थानांत भक्तिमार्गानें कबीर वगैरे मुसलमानांनाहि आपल्या परिघांत ओढून घेतलें आहे; पंढरीच्या संप्रदायांत कित्येक मुसलमान सामील झालेले आहेत व होत आहेत; आणि यवनराजांना त्यांचे रोग बरे करून व त्यांच्यावर अनुग्रह करून आपल्या चळवळीला मदत घेण्यास कृष्णतटाकच्या दत्तसंप्रदायानें मागेंपुढें पाहिलें नाहीं. अंत्यजोद्धार हें महाराष्ट्रांतील संतांचें प्रमुख काम होतें. आणि संस्कृत संप्रदायांतील अत्यंत सोवळ्या व विरक्त संन्याशांच्या समूहाला बौद्धाच्या महायान मार्गाप्रमाणें लोकसंग्रहाच्या कामास जुंपीत असतांना नरसिंह सरस्वती योगीराजांनीं 'अत्यंजाचें मुखीं निगम संपूर्ण' असा चमत्कार केल्याबद्दल जयजयकाराची आरती श्रीगुरुचरित्राचे ग्रंथकार गंगाधर-तनय यांनीं केली आहे. देशी भाषा हें मुख्य साधन, समतेची दृष्टि हें दुसरें साधन, आणि लोकसंग्रहाचा आग्रह किंवा रामदासी भाषेंत बोलावयाचें म्हणजे 'समुदायाचा दृव्यास' या तीन पायांवर महाराष्ट्राची उभारणी तत्त्वनिश्चयी पुरुषांमार्फत झाली असून, राजकारणाचा चौथा पायाच काय तो राज्यकर्त्यांच्या वाटणीला मराठी भाषेनें दिला आहे. चळवळ करणें हाच आपला मुख्य धंदा, त्या चळवळीशीं तादात्म्य पावत असतां जे उद्गार लोकांना उद्देशून समाधिधन म्हणून बाहेर पडतील तेंच आपलें सामर्थ्य, आणि मुलुखगिरी हा आपला योगक्षेम अशी मराठी भाषेची चार पांचशें वर्षांची मुख्य शिकवणूक आहे. त्या शिकवणुकीचा उदय भक्तिमार्गांतील जीं प्रमुख तत्त्वें श्रीमद्भगवद्गीतेंत भगवानांनीं सांगितलीं आहेत, त्या तत्त्वांपासूनच झालेला आहे. भक्तांनीं एकसारखी चळवळ केली पाहिजे, गप्प बसतां कामा नये, असा विभूतियोगाचा म्हणजे

गीतेच्या दहाव्या अध्यायाचा मुख्य उपदेश आहे. दहाव्या अध्यायांतील आठ, नऊ, दहा व अकरा या चार श्लोकांत भगवंतांनीं चळवळीचीं मुख्य तत्त्वें सांगितलीं आहेत. तत्त्वविचारांचें सूत्र भगवंतांपर्यंत नेऊन आनंदानें आणि संतोषानें सर्वांना बोध करीत व संकीर्तन करीत जर लोकसंग्रहाचें काम आरंभिलें तर त्यांना मी बुद्धियोग देतों व आपल्या ज्ञानदीपानें त्यांना मार्ग दाखवितों, असें भगवंतांचें संकीर्तनाच्या म्हणजे फैलावाच्या मार्गास आश्वासन आहे. आपल्या मुलांना उत्तेजन देण्याकरितां आई ज्याप्रमाणें निरनिराळे खेळ मुलांपुढें ठेवते त्याप्रमाणें सोनियाचा खेळ दावून आणि हातांत कापराची दिवटी धरून,

मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयन्तः परस्परम् ।
कथयन्तश्च मां नित्यं तुष्यंतिच्च रमन्तिच ॥
(गीता अ. १०, श्लो. ९)

या श्लोकांत वर्णिलेल्या चळवळ्यांपुढें वरीलप्रमाणेंच भावार्थ मराठी भाषेच्या आईनें मांडलेला आहे. चळवळ्यांच्या शास्त्राचें हें निरूपण गीता-रहस्यांत आधुनिक पद्धतीनें जरी आलेलें असलें, तरी त्या तत्त्वाचें दर्शन होऊन त्या तत्त्वाला अनुसरूनच लोकांचें वर्तन ज्ञानेश्वरीपासून झालेलें आहे. बुद्धाच्या अनुयायांनीं पालींत चळवळ केली, जैनांनीं अर्धमागधींत चळवळ केली, तर भगवत्गीतेनें दहाव्या शतकानंतर संस्कृत मागें-पडूं लागल्यावर मराठींतून चळवळ करण्यास प्रारंभ करून हिंदी, बंगाली, वगैरे भाषा व्यापून टाकल्या आहेत. तत्त्वें भगवत्गीतेची, पण चळवळ मराठी भाषेची, असा हा योग आहे. चळवळीचा उगम भगवत्गीतेच्या दहाव्या अध्ययापासून होत असून भक्तिमार्गांत चळवळीला फार मोठी जागा दिली आहे, अशा तऱ्हेचेच उदगार डॉ. भांडारकर यांनीं दहाव्या अध्यायावर लिहितांना काढले आहेत.

(There is to be observed here one special characteristic of Bhakti school that is, that all devotees meet together, enlighten each other as to the nature of God, and contribute discourses on Him to each other's elevation and gratification. This is almost a characteristic mark of Bhakti as distiguished from the yogis who have to go through their exercises singly In solitude-Vaishnavism-P 28)

ज्ञानेश्वरी व गीतारहस्य

मुसलमानी आमदानींत लोकसंग्रहाच्या चळवळीचें हें तत्त्व मराठी भाषेच्या जितकें अंगवळणी पडलें होतें तितकें हिंदी किंवा बंगाली भाषेच्या अंगवळणी पडलें नाहीं; हा दोष तेथील धुरीणांचा किंवा लोकांचा नसून मुसलमानी अंमलाच्या तेथील व्यापामुळें व कडवेपणामुळें हिंदी बंगाली भाषांना तितका अवसरच मिळाला नाहीं. ह्या प्रसंगाच्या विशिष्ट अवस्थेंतील चळवळीच्या मार्गाच्या वाढीचा मक्ता अशा रीतीनें मराठी भाषेकडे आल्यामुळें इंग्रजी अंमलांतहि बहुजनसमाजाला उद्देशून चळवळ करण्याचा प्रसंग येण्यावरोबर, मराठी भाषेनें दाखविलेल्या पूर्वीच्या पावलांच्या खुणांना नमस्कार करून–रुपेरी बेडी तोडून टाकून–पूर्वीच्याच पद्धतीनें बहुजन-समाजास उद्देशून लोकमान्य टिळक यांना चळवळ करावी लागली; आणि ज्ञानेश्वरीप्रमाणें मंडालेच्या तुरुंगांत सर्व समाधिधन खर्च करून, आणीबाणीचा प्रसंग किंवा कलिकाल येत चालेला आहे असें पाहून गीतारहस्य ग्रंथ निर्माण करावा लागला. मराठी भाषाच प्रसंगानुसार पुन्हां आई झाली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं; ज्ञानेश्वरीचें कालांतर–शब्दांतर–भाषांतर–म्हणजे गीतारहस्य होय, हें भाषेंतील लोकसंग्रहाच्या पद्धतीकडे पाहिलें असतां कोणाच्याहि लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं. ज्या भाषेंत तत्त्वांचा निश्चय बहुजन समाजांतील कमी अधिक दर्जाच्या विचारवंतांना सुलभ

रीतीनें करण्याची व्यवस्था झालेली असते, त्याच भाषेचे लोक स्वार्थत्यागास पूर्णपणें उद्युक्त होऊं शकतात, आणि दृढ निश्चयी व स्वार्थत्यागी पुढाऱ्यांच्या मदतीनें बहुजनसमाज आणीबाणीच्या प्रसंगांतून पार पडूं शकतो. सर्वांना समजणाऱ्या रीतीनें व तत्त्वांचा दृढनिश्चय करणाऱ्या पद्धतीनें ग्रंथ लिहिला गेला म्हणजे तो ग्रंथ त्या काळची 'आई' किंवा हरएक उद्योगांत मार्गदर्शक 'शास्त्र' होऊन बसतो. गेलीं पांचशें वर्षं ज्ञानेश्वरी आईच्या पदवीला किंवा शास्त्राच्या पदवीला चढून सर्वांना महाराष्ट्रांत मार्गदर्शक झाली; आणि नंतर महाराष्ट्र भाषेच्या संतांनीं केलेल्या सेवेनें औरंगजेब बादशहाचा तळ दहा पांच लाख सैन्यासकट महाराष्ट्रांत कित्येक वर्षं पडून राज्यसत्ता व लष्करी सामर्थ्य उच्छिन्न झालें असतांनाहि, महाराष्ट्रांतील लोक स्वयंस्फूर्तीनें त्या संकटांतून निभावून बाहेर पडले, अशा तऱ्हेचे उद्गार न्या. मू. रानडे यांनीं War Of Independence ह्या आपल्या लेखांत काढले आहेत. शब्दाचें सामर्थ्य कसें सर्वव्यापी असतें याचें हें ठळक उदाहरण आहे. भाषेचा प्रभाव सूक्ष्म पद्धतीनें पडत असतो; कर्त्या पुरुषाचा पराक्रम तत्काळ फलदायी होत असतो. वेदांतून भाषेला धेनु असें म्हटलें आहे; आणि ही धेनु रोजच्या व्यवहाराला लागणारें दूध तर देतेंच, पण तसेच भक्त मिळाल्यास कामधेनूहि होते. कांहीं ऋषी भाषेला कामधेनु म्हणतात तर कांहीं वाणीला 'जाया' या नांवानें संबोधितात. पत्नी या नात्यानें वाणी संसार गोड करणारी असते; इतकेंच नव्हे तर वाक् ही 'परिवेष्ट्री' आहे, म्हणजे हरेक प्रकारचें तुमचें कामकाज रोजच्या रोज व प्रसंगविशेषीं तुमच्या मनाप्रमाणें पार पाडून नेणारी व तुमच्याजवळ वटकीप्रमाणें राखणारी तुमची शक्ति आहे, असें वाणीचें महत्त्व उपनिषदांतून गाईलेलें आहे. परिवेष्ट्री म्हणून भाषेचा उपयोग पूर्णपणें करून घ्या, डोळ्यांना 'गोप्ता' म्हणजे संरक्षण करणारा तुमचा सेनानायक अशा

कामकाजाला लावा, कानांना 'श्रावयिता' म्हणजे आपल्याला मंगलकारक असें तेवढें ऐकविणारा दूत म्हणून योग्य कामगिरी सांगा, म्हणजे 'न याचयेत् इति उपनिषद्' कोणत्याहि वेळीं कोणत्याहि कामीं दीनपणानें दुसऱ्याच्या तोंडाकडे पहाण्याची पाळी यावयाची नाहीं; असा कौपीतकी उपनिषदाचा उपदेश आहे. स्वार्थत्याग व स्वावलंबन यांचें ह्या उपदेशांत संमेलन आहे. ह्या संमेलनाशिवाय कार्यसिद्धि होऊं शकत नाहीं; स्वार्थ-त्यागाची व स्वावलंबनाची दीक्षा जो ग्रंथ देऊं शकतो तो ग्रंथ त्या भाषेची आई किंवा ती भाषा बोलणारांचें शास्त्र आपोआपच होतो!

गीतारहस्य हें शास्त्र आहे

तत्त्वावरचा दृढनिश्चय, स्वार्थत्याग व स्वावलंबन या तीन धर्मांचा प्रसार करून ज्ञानेश्वरीनें व संत मंडळींनीं मराठी भाषेवर जे उपकार केले तेंच उपकार इंग्रजी विचार-पद्धतीच्या साच्यांत पडलेल्या आजच्या नव्या महाराष्ट्रावर व मराठी भाषेवर गीतारहस्यानें केलेले आहेत! नव्या आणीबाणीच्या प्रसंगीं हें 'संसाराचें शास्त्र' मी लोकांपुढें ठेवीत आहें, असे उद्गार लोकमान्य टिळक यांनीं गीतारहस्याच्या प्रस्तावनेंत काढलेले आहेत. स्वतःच्या चारित्र्याच्या मागे असलेल्या तत्त्वांचा दृढ निश्चय आणि तीं तत्त्वें संसारांत उतरविणारी स्वार्थत्यागाची व स्वावलंबनाची दीक्षा व निष्ठा, एवढ्यापुरताच हा ग्रंथ आहे अशा तऱ्हेची टीका गीतारहस्याच्या प्रसिद्धीच्या वेळीं झाली होती. हें शास्त्र आहे म्हणजे लाखों लोकांच्या प्रेरणेची ही आई आहे, अशी कबुली त्यावेळीं देण्यांत येत नव्हती. पण गेल्या तीन चार वर्षांच्या विलक्षण चळवळीमुळें महाराष्ट्रांत हजारो लोकांनीं व त्यांच्या लाखों इष्टमित्रांनीं स्वार्थत्यागाच्या व स्वावलंबनाच्या ज्या हालअपेष्टा सोसल्या आणि उगीच वेडगळासारखें कांहीं तरी केलें असें म्हणणारांची निंदा ज्या हालअपेष्टांना कित्येक वर्षें सोसावी लागणार आहे,

त्या हालअपेष्टा गीतारहस्यांतील उपदेशानें महाराष्ट्रांतील लाखों लोक आज गोड करून घेत आहेत. लोकमान्य टिळक यांनीं गीतारहस्यांत कर्मयोगाचा जो सिद्धांत लोकांपुढें मांडला तोच बरोबर असून, इतर कोणीहि मला दूर लोटलें तरी गीता माऊली मला दूर लोटीत नाहीं इतकेंच नव्हे तर आई-प्रमाणें आपल्या मांडीवर डोकें घेऊन थोपटते, अशा तऱ्हेचे उद्‌गार महात्मा गांधी यांनीं काढले आहेत. आणीबाणीच्या प्रसंगीं लाखो लोकांना मनाची शांति देण्याचें सामर्थ्य गीतारहस्यांत आहे, ही गोष्ट चार पांच वर्षांपूर्वी कांहीं विद्वानांनीं नाकबूल केली असती, पण हाताच्या कांकणाला आरसा कशाला, या न्यायानें अवघ्या चार पांच वर्षांच्या अवधींत तो ग्रंथ शास्त्राच्या पदवीस चढलेला आहे असा आपणांस पावलोपावलीं अनुभव येत आहे. भाषा सूक्ष्म रीतीनें हरेक उद्योगांत व कार्यकर्त्यांना स्वतःकडे कोणतेंहि श्रेय न घेण्याच्या आईच्या पद्धतीनें कशी मदत करीत असते, याचें हें उदाहरण आहे. संसार कर्त्या मुलांचा असतो, आईचा नसतो; पण संसाराला आईच सावरते व कार्यक्षम बनविते! अभिजात व नागर वाङ्मयाचा उलाढालीशीं प्रत्यक्ष संबंध नसतो आणि दुसऱ्यांच्या पराक्रमाचें श्रेय प्रत्यक्ष संबंध ठेवून आपल्याकडे घेण्याचें काम अभिजात वाङ्मय करीत नाहीं. तसा प्रत्यक्ष संबंध नसणें हेंच उभयतांस पुण्यकारक आहे. तथापि आईबापांकडून मिळणाऱ्या शिक्षण-संस्कारांचा उलगडा केल्याशिवाय कर्त्या मुलांच्या पराक्रमाचा उलगडा जसा करतां येत नाहीं, त्याचप्रमाणें संकटकाळांतील पराक्रमाचें भविष्य वर्तवितांना शास्त्रपदवीस चढलेल्या गीतारहस्यासारख्या ग्रंथांचें संकीर्तन करणें भाग पडतें. ज्ञानेश्वरीला आई म्हणतांना जसें संतांच्या सर्व काव्यांचें आपण संकीर्तन करतों तसेंच गीतारहस्यास शास्त्र किंवा आई म्हणून आज हाक मारतांना तत्त्वनिश्चय, स्वार्थत्याग व स्वावलंबन यांना प्रसविणाऱ्या सर्व आधुनिक वाङ्मयाचें

आपण संकीर्तन करीत असतों. कारण हे सर्व लेखक लोककर्ते व मार्गकर्ते या नात्यानें आपली कामगिरी बजावीत असतात. ज्ञानेश्वरांपासून आतांपर्यंत होऊन गेलेल्या कर्त्या ग्रंथकारांचें संकीर्तन केल्याशिवाय कोणाच्याहि मनास शांति प्राप्त होणार नाहीं!

लोककृतः पथिकृतो यजामहे ये देवांना हुतभागा इहस्थ ॥

अशा ऋचेनें लोककृत व पथिकृत म्हणजे लोकांचा संग्रह करणारे व दृढनिश्चित तत्त्वांना अनुसरून लोकांना पथ किंवा मार्ग किंवा निष्ठा बांधून देणारें दीक्षाकार जे असतील त्यांचें संकीर्तन झाल्याशिवाय भाषादेवाचा उत्सव कोणत्याहि काळीं व कोणत्याहि स्थळीं पूर्णतेस जाऊं शकत नाहीं.

गीतारहस्याची टांकसाळ

कलीचा काळ म्हणून पूर्वीच्या आणीबाणीच्या प्रसंगांचें वर्णन करण्यांत येत असे. युरोपियन भाषांचा गेल्या तीन चारशें वर्षांचा काळ आर्थिक तत्त्वांच्या परिपोषाचा आहे. इंग्रजी भाषेचें दडपण मराठीवर पडूं लागल्यापासून मराठी भाषेच्या ज्या हालआपेष्टा झाल्या व होत आहेत, त्यांची मीमांसा आर्थिक स्वरूपाची आहे; धार्मिक किंवा राजकीय स्वरूपाची तितकीशी नाहीं. आर्थिक स्वरूपाचें जर दडपण नसतें तर मुसलमानी अंमलाखालीं जी भाषा मरून गेली नाहीं, ती भाषा भ्रष्ट इंग्रजीच्या स्वरूपांतच व तसल्या शब्दांच्या रूपानें कायम राहील, अर्थात् एक तऱ्हेचा मृत्यु मराठीला आल्यावांचून रहाणार नाहीं, असें अनुमान काढण्यास अवसर मिळाला नसता. या अनुमानानें उत्पन्न केलेल्या वेदनांतून बाहेर पडण्यास दोन तीन वर्षांपूर्वी साधन नव्हतें. सांप्रतच्या राजकीय उलाढालींना पुढील पांच दहा वर्षांत कोणतेंहि स्वरूप प्राप्त होवो, त्या स्वरूपाशीं आपला मराठी भाषेचे अभिमानी या नात्यानें प्रत्यक्ष व स्थूल

संबंध येत नाहीं ! इंग्लंडचा व हिंदुस्थानचा हल्लींचा राजकीय संबंध निरनिराळ्या स्वरूपांतून यापुढें शंभर वर्षें टिको किंवा दोनशें वर्षें टिको, आर्थिक सामर्थ्यानें सर्व भाषांना खाऊन टाकण्याची शक्ति इंग्रजी भाषेंत यापुढें उरणार नाहीं. दारिद्र्याचा व पैशाच्या टंचाईचा सांप्रतचा काळ तुम्हां-आम्हांला दुःसह होणारा असला तरी पुढील निदान एक दोन पिढ्या आर्थिक प्रश्न नीट व्यवस्थेनें सुटेपर्यंत, केवळ पैशाच्या टंचाईमुळें, युनिव्हर्सिटीसकट सर्व शिक्षण खातें कमी जास्त प्रमाणानें देशी भाषेंतील स्वार्थत्यागी व स्वावलंबी सदगृहस्थांच्या हातीं दिल्याशिवाय कोणत्याहि प्रांतिक सरकारचा कारभार सुरक्षितपणें पार पडणार नाहीं. इंग्रजी भाषेंत तरबेज झालेल्या विद्वानांचा खर्च देशी भाषेंतील विद्वानांपेक्षां केव्हांहि डोईजड होणारच. हा डोईजड खर्च तुम्हीं-आम्हीं मागणी न करतां कालाच्या ओघामुळें आपोआप मरणाच्या पंथाला लागल्यावांचून रहाणार नाहीं. इंग्लंड आणि हिंदुस्थान ह्यांमधील संबंधाला अनुसरून सत्ताधारी इंग्रजांच्या शेजारी बसून करावयाच्या चर्चेंत डोईजड खर्चाच्या इंग्रजी भाषेंत प्रवीण झालेल्या देशी विद्वानांची थोडीशी सोय पैशाच्या टंचाईच्या सांप्रतच्या मनूंत देखील लागेल, नाहीं असें नाहीं. पण नुसत्या दक्षिणेवर नजर ठेवणाऱ्या संस्कृत भाषेंत पंडित झालेल्या दीक्षितांची जी फजिती ज्ञानेश्वरींत व इतर संतांच्या काव्यांत आढळते, तीच टवाळी डोईजड ठरलेल्या आमच्यांतील इंग्रजी पंडितांची झाल्यावांचून रहाणार नाहीं. असलें डोईजड पांडित्य आर्थिक टंचाईच्या मनूंत आपल्याजवळ नांदूं देणें म्हणजे एक प्रकारचा उपद्रवच गळ्यांत बांधून घेण्यासारखें आहे. सत्ताधारी इंग्रजांनाहि तो उपद्रव आवडणार नाहीं व देशी भाषा तर असल्या पंडिताकडे भर रस्त्यावर नाकें मुरडल्यावांचून रहाणार नाहीं. आर्थिक टंचाईमुळें 'पढे पारसी बेचे तेल' अशी स्थिति झाल्यावर पांडित्याकरितां

करावयाच्या तपश्चर्येचा ओघ इंग्रजी भाषेकडून मराठी भाषेकडे प्रचंड वेगानें वळणार हें उघड आहे. तपस्वी दारिद्र्यांना एरवी शांति कशी मिळणार? स्वार्थत्यागी व स्वावलंबी पुरुष निर्माण करण्याची टांकसाळ ज्ञानेश्वरीप्रमाणें गीतारहस्यानें आज महाराष्ट्रांत सुरू केली आहे. ह्या टांकसाळींतून बाहेर पडणारे पुरुष पैशाच्या मोहामुळें आपल्या स्वार्थत्यागावर अर्धवट विरघा घालून इंग्रजी भाषेकडे युरोप खंडाच्या आर्थिक वर्चस्वामुळें तोंडें फिरवून बसलेले आहेत. मूळ विहिरींतच पैशाची टंचाई ह्यापुढें कांहीं वर्षें तरी खात्रीनें रहाणारी असल्यामुळें विहिरींतून बाहेर निघणाऱ्या पोहोऱ्याकडे पाहून कोणत्या विद्वानाची तहान भागणार आहे? द्रव्याच्या आशेनें ह्या तपस्व्यांच्या तोंडास पानें पुसलीं गेल्यावर 'कर्तुं नेच्छसि यन्मोहात् करिष्यस्यवशोऽपि तत्' ह्या भगवंतांच्या ताकिदीप्रमाणें देशी भाषेच्या सेवेंत आनंद मानल्याशिवाय गत्यंतर रहाणार नाहीं. मराठी भाषेला सर्वस्व अर्पित करण्याची पाळी विद्वानांवर फार थोडया अवधींत येणारी आहे. आज मराठी भाषेची जे विद्वान—तुसती पूजा व अर्चा करतात त्यांना 'पूजित' व 'अर्चित' ह्या दोन अवस्थांतून वर जाऊन 'अर्पित' म्हणजे सर्वस्व अर्पण करून जी स्थिति प्राप्त होते त्या स्थितींत अव्याहत सेवा करीत राहण्याची तिसरी 'अवस्था' प्राप्त झाल्यावर, अत्यंत काटकसरीच्या खर्चांत नागपूर युनिव्हर्सिटीसारख्या युनिव्हर्सिटीचें कामकाज देशी भाषेंतून चालविण्यास नागपूर वऱ्हाडचे लोक कसे समर्थ ठरणार नाहींत? असल्या कामास लायक असलेले जाडे विद्वान आजहि तुमच्या प्रांतांत भरपूर आहेत. मुंबई इलाख्यांत चोहोंकडे पसरलेली स्वार्थत्यागाची व स्वावलंबनाची वावटळ आज तुमच्या येथेंहि आहे. यवतमाळच्या शारदाश्रमाकडून प्रसिद्ध होणाऱ्या मालेंत महाभारताचे कालासंबंधानें लेख लिहिणारे श्री. माधवरावजी अणे यांच्यासारखे मराठी भाषेचे अभिमानी लोकनायक तुम्हांस मार्ग दाखविण्यास

तयार आहेत. महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे ग्वाल्हेरचे अध्यक्ष आज ह्या प्रसंगीं मंडपांत हजर नसले तरी स्वार्थत्यागाची व स्वावलंबनाची त्यांची मूर्ति तुम्हां आम्हां सर्वांच्या डोळ्यापुढें प्रत्यक्ष उभी आहे. निष्ठावंत व तपस्वी या नात्यानें माधवरावजी आज कारागृहांत आहेत आणि त्यांच्या ह्या तपस्येमुळें महात्मेपणांत ते तुम्हा आम्हासारख्यांच्या कल्पनेबाहेर बजनदार व कणखर ठरले आहेत. कणखर स्वार्थत्यागी लेखक नागपूर-वऱ्हाडच्या बाजूस कमी नाहींत आणि मराठी भाषेसंबंधाच्या आपल्या उद्योगांत लागेल तेवढी मदत आपणांस नागपूर वऱ्हाडांतूनच मिळणारी आहे, हें तत्त्व आपल्या नजरेआड होऊं नये म्हणून ग्वाल्हेरच्या संमेलनाच्या अध्यक्षांचें आजकालचें चरित्र मीं आपणापुढें ठेवलें आहे. सर्व हिंदुस्थानभर चाललेल्या चळवळीचा फायदा मराठी भाषेला कसा मिळत आहे व मिळणारा आहे याचें दुसरें उदाहरण पाहिजे असल्यास मजुरांच्या दृष्टीनें लिहिल्या गेलेल्या पुस्तकांकडे आपण लक्ष द्यावें, अशी आपणांस माझी विनंति आहे. यादींतील पुस्तकांकडे पाहिलें असतां श्री. रघुनाथशास्त्री कोकजे यांचें धर्मस्वरूपनिर्णय व दिवेकरांचें धर्ममंथन, श्री. विट्ठल रामजी शिंदे यांचें अस्पृशांचा प्रश्न व श्री. माटे यांचे अस्पृष्टांचा प्रश्न हीं चार पुस्तकें चळवळीमुळेंच पुढें आलेलीं आहेत. वर्तमानपत्रें व मासिकें यांचें बरेंच जीवन चळवळीवर अवलंबून असल्यामुळें त्यांच्याकडून होणारी आजची भाषेची सेवा म्हणजे चळवळींचेंच एक प्रकारचें फळ होय. तेव्हां त्यांच्या भाषेच्या सेवेसंबंधानें विस्तृतपणें विचार करणें म्हणजे भाषेच्या पटांगणांतून राजकीय आखाड्यांत उतरण्या-सारखें आहे; आणि मराठींतील वर्तमानपत्रांशीं व मासिकांशीं माझा स्वत:चा संबंध चाळीस वर्षांचा असला तरी भाषेच्या संमेलनांत चालू राजकारण आणणें केव्हांहि प्रशस्त होणार नाहीं. नाटकें व कादंबऱ्या

वगैरे मनोरंजनाकरितां उत्पन्न होणाऱ्या वाङ्मयाशींहि माझा संबंध वर्तमानपत्राइतकाच चाळीस वर्षांचा आहे आणि अजूनहि निभवतील तितके दिवस हा संबंध मला ठेवावयाचा असल्यामुळें प्रसिद्ध झालेल्या नाटकांत व कादंबऱ्यांत ह्या किंवा त्या पुस्तकाची अध्यक्ष ह्या नात्याच्या माझ्या ह्या भाषणांत मी शिफारस करणें धंदेवाईक ह्या नात्यानें योग्य होणार नाहीं. गेल्या चाळीस वर्षांतील मराठी भाषेंतील नाटकांकडे व कादंबऱ्यांकडे पाहिलें असतां हिंदी, बंगाली किंवा गुजराथी भाषांच्या मागें आमची मराठी भाषा पडली आहे, असें कोणासहि म्हणतां येणार नाहीं. उलट मराठी भाषा इतरांच्यापुढें एक दोन पावलें गेलेली आहे असा तज्ञांचा अभिप्राय आहे. मराठी भाषेला स्वतःचें गाणें नाहीं; हरिदासी गाणें काय तें मराठी भाषेंत आहे; गाण्याच्या चिजा कानडी प्रदेशांतून किंवा उत्तरहिंदुस्थानांतून घेतल्या पाहिजेत; ही वीस पंचवीस वर्षांपूर्वीची स्थिति पालटली असून मराठी रंगभूमीवर गाइलीं जाणारीं पदें आज चिजांच्या पदवीला चढलीं आहेत. इतिहाससंशोधनाचें काम निरनिराळ्या संस्थांकडून सांप्रतच्या दारिद्र्याच्या दिवसांतहि चांगल्या रीतीनें चाललें असून चालू सालीं मुंबई सरकारच्या सहकार्यानें पेशवे दप्तराचे बरेच भाग प्रसिद्ध झाले असून ४५ भागांपैकीं ३३ भाग बाहेर आले आहेत; चार पांच भाग लवकरच प्रसिद्ध होणारे आहेंत; आणि बाकीच्या आठ भागांचें छापखान्यांतील कार्य पांच सात महिन्यांत पुरें होईल असा अंदाज आहे. पेन्शन घेतल्यावरहि केवळ स्वार्थत्यागाच्या बुद्धीनें ऐतिहासिक कागदपत्रांच्या संशोधनाचें हें काम श्री. सरदेसाई यांनीं आतां बहुतेक संपविल्यासारखें केलें आहे. त्या कामाकडे पाहिलें असतां भाषेच्या सेवेच्याकामीं स्वार्थत्यागाच्या अहमहमिकेनें नोकरी संपल्यावर घरीं स्वस्थ बसावयाच्यावेळींहि सर्वांना कसें पछाडलें आहे हें आपल्या ध्यानीं येईल. बडोदे संस्थानांत नोकरींत असतांना

व नोकरीचे दिवस संपल्यावरहि रा. देसाई यांनीं आपली इतिहासाच्या सेवेची गोडी कायम ठेवली आहे हें त्यांना भूषणावह आहे. पेन्शनरांच्या मराठी भाषेच्या सेवेसंबंधानें बोलतांना ग्वालेर संस्थानांतील इंजिनियर म्हणून काम करून पेन्शन घेतलेले व चालू सालीं वारलेले कै. माधवराव व्यंकटेश लेले यांची आठवण झाल्यावांचून रहात नाहीं. नोकरी करीत असतांना श्री. लेले यांना मराठी भाषेच्या सेवेचा नाद लागला व पेन्शन घेतल्यानंतर त्यांनीं तो अव्याहत पुढें चालविला; त्यांचें राजतरंगिणीचें समग्र भाषांतर प्रसिद्ध आहे; त्याचप्रमाणें प्रमुख पर्शियन पुस्तकांचीं पर्शियन भाषा शिकून त्यांनीं चांगलीं भाषांतरें केलीं असून, संस्कृत नाटकांवरील त्यांच्या विवेचनाप्रमाणेंच भागवत पुराणाचें त्यांचें विवेचनात्मक भाषांतर सर्वांना उपयोगी पडणारें आहे.

मराठी विद्यापीठ

मराठी भाषा बोलणारे लोक दरिद्री असले तरी मराठी भाषा बिलकूल दरिद्री नाहीं आणि इतर देशी भाषांचे लोक पैशाच्या किंवा लोकसंख्येमुळें मिळणाऱ्या आश्रयाच्या जोरावर ग्रंथ व लेख प्रसिद्ध करण्याचें काम आमच्याहून अधिक त्वरेनें आजकाल करीत असले तरी नागर भरीवपणांत मराठी भाषा कोणाच्याहि मागें नसून कांहीं कांहीं बाबींत आमचें अनुकरण इतरांना करावें लागत आहे. ही स्थिति लक्षांत घेतली असतां, सरकारमार्फत स्थापावयाच्या मराठी विद्यापीठाचा प्रश्न धसास लावण्यास जो तो मदत करील, ह्यांत संशय रहात नाहीं. मुंबई इलाख्यांत स्वार्थत्यागी व स्वावलंबी लेखक पसरलेले असल्यामुळें सरकार जेथें मनांत आणील तेथें मराठी विद्यापीठ सुरू करणें सरकारास मुळींच जड जाणार नाहीं. पुण्यास तर मराठी विद्यापीठाच्या जंगलोटाची आयती तयारी आहे आणि

पैशाच्या टंचाईच्या काळांत मुंबईसारख्या फार खर्चाच्या रहाणीच्या शहरांत नवीन विद्यापीठाचा स्वार्थत्याग करूनहि लागणारा डोईजड खर्च करण्यास प्रांतिक सरकार पुढें येण्याचा मुळींच संभव नाहीं. वेताच्या खर्चाची पुण्याची राहणी असल्यामुळें नवीन उपक्रमास तेथें सोईचें होणार आहे. हजार बाराशें पानांचे ग्रंथ योग्य खर्चांत छापणें आज पुण्यास परवडतें; एखादा नवा कोश असो, किंवा ऋग्वेदासारखा जुना ग्रंथ असो, विद्यापीठाच्या नांवाला साजेसें छापण्याचें कामकाज दरिद्र्याच्या पैशाच्या पिशवीला झेपेल येवढया खर्चांत मुंबईत होऊं शकणार नाहीं. क्लिष्ट कामाच्या पुस्तकांना हस्तलिखित प्रत तपासण्यास आणि छापखान्यांतील कामकाजांत चुका राहूं न देण्यास विद्वान स्वयंसेवकांची फार जरुरी असते. मुंबईचे छापखानें पुण्याइतकेंच सवंग व सुबक काम काढूं शकतात; पण वर्षानुवर्षें विद्वान स्वयंसेवकांची मुंबईसारख्या डोईजड खर्चाच्या रहाणींत मदत मिळणें व मागणें संकटांचें होऊन बसतें. मुंबई शहराहून इतर ठिकाणीं अशी अडचण नसल्यामुळें 'वैदिक संशोधन' मंडळाकडून पुण्यासच म्हणून युरोपखंडांतील आवृत्त्यांपेक्षां अधिक सरस ऋग्वेदाची आवृत्ति सांप्रत छापण्यांत येत आहे आणि भागशः प्रसिद्ध होत आहे. वाईच्या प्राज्ञ पाठशाळेनें धर्मकोशाचें काम हातीं घेतलेलें आहे. स्वार्थत्याग व स्वावलंबन यांच्या जोरावरच हीं कामें चाललेलीं असलीं तरी कांहीं प्रमुख विद्वानांचीं वरींच वर्षें व हजारो रुपये या कामीं खर्च होणार आहेत. असलीं कामें युरोपखंडांत निरनिराळी विद्यापीठें हातीं घेत असतात. विद्वानांना त्या त्या विद्यापीठांचा मोठा आश्रय असतो. विद्यापीठांना साजेशीं कामें करणारे विद्वान पुण्या-मुंबईस व इतर ठिकाणीं भरपूर आहेत, पण सर्व सामग्रीनें सज्ज असलेल्या पुण्यासारख्या शहरांतहि मराठी भाषेचें विद्यापीठ नाहीं. टिळक विद्यापीठ हें मराठी भाषेचें विद्यापीठ आहे खरें, पण असलें विद्यापीठ आणीबाणीच्या

प्रसंगीं कायद्यामुळें म्हणा किंवा इतर कारणांमुळें म्हणा बंद पडल्यावर पुन्हां घडी बसविणें दुरापास्त होय. ज्या परिस्थितीमुळें टिळक महाविद्यालया-सारख्या संस्था बंद पडतात त्याच कारणामुळें मुंबई इलाख्यांत मराठी विद्यापीठ सरकारी अनुग्रहानें सुरू होणें कांहीं वर्षें तरी दुरापास्त आहे. नागपूर-वऱ्हाडची तशी स्थिति नाहीं. हिंदुस्थानसरकारच्या साम्राज्यांत भूगोलाच्या दृष्टीनें नागपूर-वऱ्हाडचा प्रांत खरोखर मध्यप्रांत आहे आणि त्यामुळें लष्करी किंवा आरमारी स्वाऱ्यांच्या व बचावाच्या दृष्टीनें हिंदुस्थानसरकारच्या कारस्थानांतून ह्या प्रांतास अजीबात वगळल्यासारखें आहे. मोठ्या कारस्थानीं मुत्सद्यांना ह्या प्रांताकडे कापूस व गहू पिकविणारा प्रांत ह्या दृष्टीहून निराळ्या राजकारणानें पहाण्याची कांहीं जरुरी नाहीं. बड्या मुत्सद्देगिरीची दृष्ट ह्या प्रांतांतील उपक्रमांना व योग्य उद्योगांना लागूं शकत नाहीं. अशा दृष्टीनें विचार केला असतां मराठी विद्यापीठा-संबंधानें स्थानमाहात्म्याचा फायदा पुण्या-मुंबईपेक्षां नागपूरच्या पदरीं पडणें अधिक सोपें आहे. मराठी भाषेची सेवा आनंदानें करून नागपूर युनिव्हर्सिटीत मराठी व हिंदी भाषांना आपण मुंबई युनिव्हर्सिटीहून अधिक योग्यतेचें स्थान दिलें आहे. प्रांतिक स्वराज्यांत देशी भाषेसंबंधानें करावयाचे सरकारी उद्योग प्रयोग या दृष्टीनें नागपुरास इतर ठिकाणांपेक्षां अगोदर सुरू होतील, याबद्दल वाद नाहीं. तत्त्वनिश्चय, स्वार्थत्याग, व स्वावलंबन यासंबंधाची ज्ञानेश्वरीपासून गीतारहस्यापर्यंतची महाराष्ट्राची परंपरा आपल्या प्रांतांत वाढीस लागलेली आहे. पैशाच्या टंचाईचा मनूंत इंग्रजी भाषेचें डोईजड जूं मराठी भाषेच्या मानेवर फार वेळ बसूं शकणार नाहीं; असले स्वयंभू सबलतीचे दिवस मराठीकडे झपाट्यानें धावून येत आहेत. तेव्हां पैशाच्या टंचाईचे हे दिवसच मराठी भाषेला मृत्यूच्या जबड्यांतून सोडवून अभ्युदयाच्या मार्गास इतर ठिकाणांपेक्षां अगोदर नागपुरास लावतील

असें कां मानूं नये ? थोडया वर्षांच्या अवधींत नागपुरच्या युनिव्हर्सिटीचें रूपांतर देशी भाषांच्या विद्यापीठांत होईल, आणि तसें झाल्याची शुभवार्ता आज उतारवयांतहि असलेल्यांच्या कानीं परमेश्वर घालील असा मला पूर्ण भरंवसा वाटत आहे. हीच मंगलदायक हकीकत वृद्धांच्या कर्णांना ऐकावयास मिळावी, हाच मंगलदायक सोहाळा सर्वांच्या डोळ्यांना पहातां यावा, आणि मराठी भाषेच्या सेवेंत रोडकीं शरीरें केविलवाण्या स्थितींत राबविण्याची पाळी न येतां कणखर व समर्थ शरीरांनीं मराठी भाषेची सेवा करण्याची संधि सर्व तरुणांना मिळावी, अशी परमेश्वराची प्रार्थना करून प्रारंभी झालेल्या शांतीच्या मंत्रांनीं अध्यक्ष या नात्याचें माझे भाषण मी संपवीत आहें.

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः । भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवांसस्तनूभिः । व्यशेम देवहितं यदायुः ॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर.
अनुक्रमांक.....१९६६५ दि: .....
वर्ग क्रमांक.....४२०२..... दि: २/१२/०२

REFBK-0007141

खाडिलकरांची

आध्यात्मक ग्रंथमाला

(१) खाडिलकरांचा रुद्र (२) खाडिलकरांचें संध्यावंदन व पुरुषसूक्त (३) खाडिलकरांचें ऐतरेय आणि ईशावास्योपनिषद् (४) खाडिलकरांचें तैत्तिरीयोपनिषद् (५)खाडिलकरांची ॐकाराची उपासना. (६) खाडिलकरांचा याज्ञवल्क्य—मैत्रेयी संवाद व त्रिसुपर्णाची शिकवणूक.

श्री. कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकर यांनीं वैदिक वाङ्मयाचें सतत भक्तिपूर्वक मननचिंतन करून वरील ग्रंथ तयार केले आहेत. या सहाहि ग्रंथांत मूळ मंत्र सार्थ व सटीप दिलेले आहेत. वैदिक शिकवण दररोजच्या संसारापासून ब्रह्मप्राप्तीपर्यंत सर्वत्र उपयुक्त कशी आहे याबद्दलचा अभिनव प्रकाश पाडणारीं त्या त्या ग्रंथावरील विस्तृत व तेजस्वी विवेचनें प्रत्येक पुस्तकांत दिलेलीं आहेत. त्यामुळें नित्य पाठांतरासाठीं व अध्ययनमननासाठीं हे ग्रंथ अत्यंत संग्राह्य असे झाले आहेत. किंमत प्रत्येकीं १ रुपया.

ग्रंथ मिळण्याचीं ठिकाणें:—नवाकाळ ऑफिस, मुंबई नं. ४;
चित्रशाळा प्रेस, पुणें; दत्त एजन्सी, बुधवार पेठ, पुणें.

श्री. कृ. प्र. खाडिलकरांचीं नाटकें

संगीत माला

मेनका—किंमत १२ आणे.
द्रौपदी—किंमत १२ आणे.
स्वयंवर—किंमत १२ आणे.
विद्याहरण—किंमत १ रुपया.
मानापमान—किंमत १२आणे.
सावित्री—किंमत १२ आणे
बायकांचें बंड—कि. १२ आ.
त्रिदंडी संन्यास—कि. १२ आ.

गद्यमाला

कीचकवध—कि. १ रु.
कांचनगडची मोहना—
किंमत १२ आ.
सवाई माधवराव—
यांचा मृत्यु—किंमत १२ आणे.
भाऊबंदकी—किंमत १२ आणे.
प्रेमध्वज—किंमत १२ आणे.
सत्त्वपरीक्षा—किंमत १ रु.
सवती-मत्सर—कि. १२ आणे.

खाडिलकरांचा लेखसंग्रह (भाग पहिला)

श्री. कृ. प्र. खाडिलकर यांच्या सन १८९६ ते १९१० पर्यंतच्या
निवडक लेखांचा संग्रह, भाग १ ला किं. रु. ६

श्री. कृ. प्र. खाडिलकरकृत पहिलें महायुद्ध भाग १ ते ५; किं. रु. ५।

श्री. य. कृ. खाडिलकरकृत कादंबऱ्या:—
संसार शकट, सदानंद, आजकाल; प्रत्येकीं किं. १॥ रु.

श्री. के. रा. पुरोहितकृत:—शून्यजगत्, आकाशपुष्प; प्रत्येकीं किं. २ रु.

श्री. भा. रा. धरंधरकृत:—गीताबोध किं. ६ आणे.

मॅनेजर—नवाकाळ, मुंबई ४.